म. ग्रं. सं. ठाणे
विषय गुरु चरित्र
सं. क्र. ७८३

REFBK-0007792

१८५१.

# हिमालयदर्शन

लेखक

शंकर सखाराम दाते

प्रथमावृत्ति

पौष शु. १ शके १८७१

७०९२

१९४९

REFBK-0007792

मूल्य ] [ १० रु.

मुद्रक व प्रकाशक :— गंगाधर शंकर दाते
कलागृह छापखाना
६६६ सदाशिव पुणें.

चित्रांचे ठसे :— बळवंत शंकर दाते
कलागृह छापखाना
६६६ सदाशिव पुणें.

बांधणी :— विष्णु शंकर दाते
व्ही. एस्. दाते आणि कं.
गायवाडी मुंबई. ४

सर्वाधिकार लेखकाधीन

# प्रकाशकाचें निवेदन

या पुस्तकाचा आराखडा करतांना छपाई वगैरे सर्व काम घरींच करावें असें आम्हीं ठरविलें होतें. त्याप्रमाणें या पुस्तकाच्या निर्मितीस आमच्या घरांतील सर्व मंडळींचा—आजोबांपासून नातवापर्यंत—हातभार लागलेला आहे. सर्वांत लहान असलेल्या ९ वर्षांच्या नातवंडानेंसुद्धां पुस्तकांतील १ पान कंपोज केलेलें आहे. ब्लॉक करणें हा आमचा मूळ व्यवसाय—ज्यांतून पुढें छापखाना निघाला—असल्यामुळें सर्व चित्रांचे ब्लॉक आम्हींच केलेले आहेत हें वेगळें सांगण्याची जरुरी नाहीं. तसेंच सर्व फोटो हेहि ती. काकांनीं घेतलेले आहेत, व त्यांचें पुढील बाळंतपणहि घरींच केलेलें आहे. सारांश, छपाईचें यंत्र व कागदादि साहित्य सोडून दिल्यास पुस्तकाची संपूर्ण निर्मिति घरचीच आहे.

आमच्या घरांत ब्लॉक करणें व छापखाना हा व्यवसाय गेलीं सुमारें ४५ वर्षें चालू आहे. त्यांत वाढ म्हणजे प्रकाशन—व्यवसाय. हाहि सुरू करणें आवश्यक भासूं लागलेलें आहे. त्यादृष्टीनें ती. काकांनीं लिहिलेले घरचेंच पुस्तक व तेंहि भगवंताच्या गुणवर्णनाचें प्रकाशित करण्याचा सुयोग लाभल्यामुळें कलागृहाच्या प्रकाशन विभागाचा सुमुहूर्त तर चांगलाच होत आहे.

ती. काकांचा ७० वा वाढदिवस साजरा करण्याची कल्पना निश्चित झाल्यानंतर त्यांच्या जीवनाच्या ध्येयाचें व जीवित कार्याचें मूर्त व चिरंतन स्वरूपांत कांहीं तरी प्रतीक निर्माण करावें अशी आम्हां सर्व कुटुंबियांना उत्कट इच्छा झाली. ती. काकांना आपल्या जीवनांतील महत्त्वाचें कार्य म्हणजेच कैलास—मानसादि हिमालयांतील पवित्र तीर्थांच्या यात्रा हें वाटत असल्यामुळें या उत्सवानिमित्त त्या हिमालयाचें दर्शन—जें त्यांना साकल्यानें घडलें तें—सर्वांना घडविणें हेंच त्यांच्या कार्याचें उत्तम प्रतीक होय, व त्यासाठींच हें पुस्तक प्रसिद्ध करीत आहों.

वास्तविक वरील माहिती दिल्यानंतर प्रकाशकाचें काम संपत आहे. परंतु लेखकाची ओळख करून देणें हे प्रकाशकाचें उत्तरदायित्व असते. म्हणून वडिलांविषयीं थोडेसें लिहिणें अनवश्यक होणार नाहीं.

आमचे आजोबा–ती. काकांचे वडील–हे त्यांचे काळांत मोठे नामांकित वैद्य होते. त्या काळास अनुसरून ती. काकांचे लग्नहि १५ व्याच वर्षीं झालेलें होते. त्यांचा विद्याभ्यास मॅट्रिकपर्यंत पोहोंचण्याचे आंतच आजोबा वारले. त्यांमुळें ती. काकांना शिक्षण थांबवून उद्योगास लागणें प्राप्त झाले. तथापि स्वावलंबनानें ते मॅट्रिक झाले व पुढें वयाच्या ३५ व्या वर्षीं 'झिंको ब्लॉक्स्' करण्याच्या कलेस शास्त्रीय ज्ञानाचे अधिष्ठान असावे म्हणून फर्ग्यूसन कॉलेजांत ३ वर्षें जाऊन रसायन व फिजीक्सचा अभ्यास केला.

त्यांच्या चुलत्यांनीं त्यांस सरकारी नौकरींत तीन चार वेळ अडकविण्याचा प्रयत्न केला. पण दर वेळीं त्यानीं ती सोडून दिली. पोलीस सब्–इन्स्पेक्टर क्लासकरितां पहिल्या पांचांत त्यांची निवड होऊन लगेच उपस्थित होण्याविषयीं दोन वेळ रिमांइडर्सहि आलेली होती. परंतु नोकरीची गुलामगिरी व नोकरीमुळें आपल्याच दास्याच्या शृंखला बळकट होण्यास आपला हातभार लागणार ह्या कल्पनेमुळें तो जीवनक्रम त्यांच्या स्वभावास मानवणारा नव्हता.

त्यांचे चुलत सासरे जर्मनीहून ब्लॉक करण्याची विद्या हस्तगत करून ब्लॉक करण्याची सर्व साधनें घेऊन येथें परत आले होते. परंतु दुर्दैवानें ते येथें आल्यावर निधन पावले होते. त्यांनीं आणलेल्या सामानाच्या पेट्यासुद्धां उवडलेल्या नव्हत्या. त्यामुळें त्यांच्या बंधूंनीं (ती. काकांच्या श्वशुरांनीं) ती. काकांना म्हटलें कीं धमक असली तर ही कला साध्य करून दाखवा. जर यशस्वी झालात तर स्वतंत्र राहून पोटाचा प्रश्न सुटेल. त्यांच्या म्हणण्यावरून ती. काकांनीं मोठ्या ईर्षेनें प्रयोगास सुरुवात केली. केवळ स्वतःच्या हिंमतीवर व दीर्घोद्योगावर या विषयावरील पुस्तकें वाचून त्यांनीं ब्लॉक करण्याची कला हस्तगत केली. त्यावेळीं मुंबई इलाख्यांत ब्लॉक करणारे कोणीहि नव्हते. त्यास लागणारा तयार पत्रासुद्धां येथे मिळत नसे. तो बाजारांतून आणून ठोकून ठाकून सहाणेवर घासून पॉलिश करून घ्यावा लागत असे.

ब्लॉकचा धंदा यशस्वीपणें सुरू झाल्यानंतर त्यांनींच मोडी पुस्तकें ब्लॉक करून छापलीं असतां शिळाछपाईपेक्षां ज्यास्त चांगलीं

छापलीं जातील असें पाहून त्यावेळचे मोडी पुस्तकांचे कर्ते सिताराम विश्वनाथ पटवर्धन व शाळाखात्याच्या पुस्तकांचे ठेकेदार मंगळदास आणि सन्स ह्यांचेपुढें ही कल्पना मांडून त्यांना पटवून दिली. त्या मोडी पुस्तकांच्या छपाईकरितां म्हणून छापखाना काढावा लागला. दोन्ही धंदे अतीशय नेकीनें व यशस्वीपणानें चालवून त्यांनीं ते भरभराटीस आणले.

ती. काकांच्या तरुणपणीं त्यांना लो. टिळकांसारख्या लोकोत्तर विभूतीचा जीवनक्रम अगदीं जवळून पाहण्यास मिळाला व त्याचा त्यांच्या जीवनावर फार परिणाम झालेला आहे. हातीं घेतलेली कोणतीहि गोष्ट असो, ती ते निश्चयानें तडीस लावल्यांवाचून राहावयाचे नाहींत. त्यांचे मित्र "तुमची काम करण्याची पद्धत पाहिली कीं, टिळकांची आठवण होते" असें पुष्कळ वेळां उद्‌गार काढतात. लो. टिळकांच्या चतु:सूत्रीतील स्वावलंबन ती. काकांनीं आदर्शवत् पाळलें आहे.

१९२७ सालीं छापखान्याच्या वाढीकरितां—त्यावेळीं मोठमोठ्या नामांकित छापखान्यांत सुद्धां नसलेली अशी अद्यावत् नवी कोरी जर्मन—यंत्रसामुग्री घेतली. ती जोडून चालू करून देण्याकरितां एक सहस्र रुपये विक्रेत्यास देण्याचें ठरलें होतें. यंत्रें आल्यावर पेट्या खोलून यंत्रें स्वत:च जोडून चालू केलीं. विक्रेत्याला हें सर्व अशक्य वाटत होतें, कारण त्यावेळीं या प्रकारचीं यंत्रें येथें चालू नव्हतीं. त्यानें स्वत: येथें येऊन खात्री करून घेऊन समाधान व्यक्त केलें. ह्या अनुभवानें ती. काकांचे नांव होऊन मुंबईच्या मोठमोठ्या यंत्रज्ञांना चालू करतां न आलेले कोरे यंत्र जॉन डिकिन्सन्नीं त्यांचे कडून ५०० रुपये देऊन चालू करून घेतले.

कोणतेहि काम करण्याचे त्यांचे मनानें घेतले कीं, रात्रंदिवस त्यांना त्याशिवाय दुसरें कांहीं सुचतच नाहीं. करावयाची गोष्ट उत्तमच झाली पाहिजे असा नेहमी त्यांचा कटाक्ष असतो. उगाच कांहीं तरी थातुरमातुर करून कसें तरी काम पुरे करावयाचे हें त्यांच्या स्वभावांतच नाहीं. हातीं घेतलेले काम उत्तम करण्याकरितां पडेल ते कष्ट करण्यास तें मोठ्या उत्साहानें सिद्ध असतात. १९३०

सालीं "दातेवाडी" बांधली. जवळ असलेल्या जागेंत ज्यास्तींत ज्यास्त आटोपशीर, भाडेकरूस राहण्यास सर्व प्रकारें सोयीस्कर, स्वतंत्र व अत्यल्प भाड्यांत देतां येतील असें 'ब्लॉक्स्' बांधले. सबंध पुण्यांत सुद्धां अशी जागा मिळणार नाहीं. "दातेवाडी" बांधण्याकरितां त्यांना कोणी आर्किटेक्ट वा इंजिनियर वा ठेकेदार लागला नाहीं. नकाशे काढण्यापासून तो सर्व इमारत पुरी होईपर्यंत कोणाहि तंत्रज्ञाचे सहाय्य त्यांना लागले नाहीं. त्यावेळचे सुप्रसिद्ध इंजिनियर दि. ब. गोडबोले हें वास्तुशांतीचे दिवशीं वाडीवरून सहज जात असतांना आंत आले. त्यावेळीं ती. काका तेथें नव्हतें परंतु दि. ब. नीं तेथें असलेल्या त्यांच्या बंधूंकडून माहिती घेऊन "अतिशय थोड्या खर्चांत आदर्श मांडणी व बांधणी" असल्याचे अनाहूत प्रशस्तीपत्र दिलें.

१९२५ सालच्या सुमारास सत्यसोधकांच्या चाळचांना ऊत आलेला होता. तेव्हां ती. काकांनीं पुढाकार घेऊन सभा भरवून, शिष्टमंडळें वगैरे पाठवून त्यास आळा घातला व महाराष्ट्र ब्राह्मण सभेची स्थापना केली. आजतागायत ते सभेचें कणा ( Back Bone ) असल्यासारखेच आहेत. आज ते त्या सभेचे अध्यक्षहि आहेत. गांधी वधानंतरच्या दंगलीच्या आपत्तींत त्यांनींच पुढाकार घेऊन आपद्ग्रस्तांना सहाय्य पोहोंचविण्याची योजना यशस्वी रीतिनें केली.

ती. काकांच्या आयुष्यावर लो. टिळकांच्या प्रमाणेंच गु. वझे मास्तर यांचाहि फार परिणाम झाला आहे. मास्तरांच्या संगतीमुळें त्यांना व्यायामाची गोडी लागली व ते वयाच्या एकोणतीसाव्या वर्षीं तालमींत जाऊ लागले. त्याचे फळ तें आजतागायत उपभोगीत आहेत. १९१४ सालीं त्यांनीं संकल्प करून, धंदा संभाळून, विश्रांतीस वाव नसतांना सुद्धां, चातुर्मासांत एक लाख सूर्यनमस्कार घातले. पण ते असे कीं, त्यांपैकीं एकहि सूर्यनारायणाला कधीं पहावयास सांपडला नाहीं. म. गांधींनीं जसे अन्नासंबंधीं व उपवासासंबंधीं अनेकविध प्रयोग केलें तसेंच ती. काकांनीं त्याबरोबर मेहनतीचेहि प्रयोग केलें. २४ तासांपैकीं दिवसाचा असा एकहि तास नाहीं कीं, ज्यांत त्यांनीं केव्हांना केव्हां प्रयोगादाखल नेहमीची मेहनत केलेली नाहीं. गु. मास्तरांच्याच

देखरेखी खालीं ते मल्लखांब, वेताचा व टांगतासुद्धा आणि कुस्ती शिकले. कुस्ती ही कला जाणणारें जे कांहीं थोडे लोक आहेत त्यांच्यांत ती. काकांची गणना होते.

रुद्रदेवता ही आमच्या घराण्याची उपास्य देवता असल्यामुळें तिचे निवासस्थान जो हिमालय तिकडे ती. काकांना ओढ लागावी हे साहजिकच आहे. ज्यांत त्यांच्या पौरूषी गुणाच्या आविष्कारास वाव नाहीं, अशा गोष्टींत त्यांचे मन रमत नाहीं. यात्रा करावयाच्या त्यासुद्धां अवघडांतील अवघड अशा कैलास – मानस – मुक्तिनाथ याच करण्याची त्यांना हौस वाटते. युद्ध काळांत व युद्धोत्तर काळांत हिमालय–दर्शन हे अशक्य होऊन बसले आहे. म्हणून त्यांनीं दोन वर्षांपूर्वींच एका चातुर्मासांत एकटयानें रोज सुमारें ९ तास बैठक मांडून १ अतिरुद्र पुरा केला व जाणत्यांना आश्चर्यचकित केले.

ती. काकांचे जीवन ध्येय आर्य संस्कृतीस साजेसेच असल्यामुळें वयाच्या ५५ व्या वर्षी त्यांनीं निवृत्त होण्याचे ठरवून धंद्याचे सर्व कर्तृत्व आम्हां मुलांच्यावर सोपविले व जणूकांहीं आधुनिक वानप्रस्थाश्रमच स्वीकारला.

धर्मार्थकामादि पुरुषार्थांचे यथायोग्य आचारण करून परमार्थप्राप्तीकरितां हिंदुमात्रास साधनभूत असलेल्या हिमालयाकडे त्यांचे मन ओढ घेत आहे. त्या हिमालयाचे वाङमयीन पूजन म्हणून त्यांनीं निष्ठेनें जे केलें तेच हें ‘ हिमालयदर्शन ’ आज पुस्तकरुपानें प्रसिद्ध करीत आहोंत.

यमुनोत्तरी, गंगोत्तरी, केदार, नारायण या चार यात्रांचा हा एक खंड प्रसिद्ध झाला. ह्याचेच पुढचे खंड म्हणजे तिबेटी हिमालयांतील कैलास – मानस यात्रा व नेपाळी हिमालयांतील मुक्तिनाथ – पशुपती यात्रा हे लिहून तयार झाले आहेत. ते लौकरच प्रसिद्ध होतील.

प्रकाशक

# प्रस्तावना

या पुस्तकाचें वैशिष्टय असें आहे कीं, यांतील प्रत्येक गोष्ट स्वतःच केलेली आहे. यात्रा करणें, फोटो घेणें, यात्रावर्णन लिहिणें, हें सर्व एका हातीं झालें आहे. आपण स्वतः ब्लॉक कारखाना व छापखाना काढून मुलांच्या स्वाधीन केला असल्यामुळें पुस्तकाचें सर्व साहित्य घरींच तयार झालेलें असतां पुस्तकास दुसऱ्या कोणाकडून प्रस्तावना लिहून घेणें म्हणजे थोडेंसें वैगुण्य त्याच्यांत येणें बरें नाहीं असें वाटल्यावरून मीं प्रस्तावना लिहावी असें मुलांनीं ठरवून मला सांगितलें. प्रस्तावना लिहिण्याची जबाबदारी माझेवर टाकली खरी, पण मला पुस्तकांतील विषयाचा सांगोपांग विचार करून लिहिण्याची संवय आहे कोठें ? मराठी दोन इयत्तेपर्यंत माझें शिक्षण झालेलें आहे; पण मुलांनीं आग्रह केला आहे म्हणून पाहातें आपल्याला लिहिणें जमतें का ?

माझ्या लहानपणीं मोठीं माणसें पत्रिका किंवा हात ज्योतिषाला दाखवून आपल्या नशिबीं यात्रा किंवा महायात्रा आहेत काय असें विचारीत असत; म्हणजे आपल्या आयुष्यांत यात्रा करणें फार मोठें महत्त्वाचें समजलें जाई. हा संस्कार आपल्या मनावर होण्याचें कारण आपल्या पूर्वजांनीं, साधुसंतांनीं, व ऋषीमुनी यांनीं तीर्थयात्रेचा महिमा गाइलेला आहे म्हणून. पुराणकालांत राजे, राजर्षि आपल्या पूर्वार्धात तीर्थयात्रा करत असत व उत्तरार्धांत तपश्चर्या करण्याकरितां कायम वनांत जात असत. किंवा कोठल्याहि पुण्य तीर्थक्षेत्रीं हिमालयांत अगर गंगा–यमुना–सरस्वती कांठीं जात असत.

पौराणिक कालांत तीर्थयात्रेचें वर्णन रामायण, महाभारत, भागवत इत्यादि ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं आलेलें आहे. त्यांत त्यांनीं तीर्थयात्रेपासून लाभ काय होतात तेंहि सांगितलें आहे. तीर्थयात्रांनीं शरीराला कष्ट सोसण्याची न कळत संवय होते व दृष्टीपुढें दुसरें कांहींहि दिसत नसल्यामुळें मनहि एके ठिकाणीं लागतें. इतिहास कालांत श्रीज्ञानेश्वर महाराजांसारखे संत शिरोमणि हरिपाठांत आग्रहपूर्वक सांगतात—

'तीर्थ व्रती भाव धरी रे करुणा। शांती दया पाहुणा हरी करी॥'

तसेंच श्रीएकनाथ महाराजहि तेंच सांगतात—

'शुद्ध झालिया अंतःकरण। करावे गा तीर्थी गमन॥
तीर्थयात्रीं श्रद्धा गहन। तीर्थाटन हे नांव॥
पदोपदीं माझें नांव। गर्जत स्मरती माझें कर्म॥
यात्रा करणें निज निष्काम। तीर्थयात्रा उत्तम या नाम॥'

तसेंच श्रीसमर्थ रामदास स्वामींनीं बारा वर्षें तीर्थाटन व बारा वर्षें गायत्री पुरश्चरण केलें. असा अनेक साधुसंतांनीं तीर्थयात्रेचा महिमा वर्णन केलेला आहे.

ज्या हिमालयांत आतांसुद्धां जाणें कठिण आहे, तर चार पांचशें वर्षांपूर्वी तेथें जाणें किती कठिण असेल याची कल्पनाच केलेली बरी. हिमालय यात्रा म्हणजे शारीरिक कष्ट, म्हणजेच तपश्चर्या. तपश्चर्या झाल्याशिवाय ईश्वरप्राप्ति होत नाहीं. जशी तपश्चर्या तसेंच देवदर्शन. हिमालय यात्रा म्हणजे शारीरिक तप होतें. त्यामुळें विभूतिदर्शनांत "स्थावराणाम् हिमालयः" हें माझेंच स्वरूप आहे असें साक्षात् भगवंतानीं सांगितलें आहे. आधुनिक कालांतहि त्याचें माहात्म्य कमी झालेलें नाहीं. सुशिक्षित—अशिक्षित, तरुण—म्हातारा, पुरुष वा स्त्री कोणीहि असो त्याला प्रवास म्हणून अगर यात्रा म्हणून हिमालयांत जाऊन यावेसें वाटतें. जावें असें वाटत असूनहि जातां आलें नाहीं तरी निदान "काशीस जावें नित्य वदावें" या म्हणीप्रमाणें नेहमीं म्हणत असावें, आम्ही सवड झाली कीं जाणार आहोंत. असें वाटणें म्हणजेच आपल्या मनावर पूर्वजांचे, पूर्वजन्मींचे संस्कार झाले आहेत. ज्यांना कांहींच करावयाचें नाहीं त्यांनीं साधुसंताचे नांवांनीं म्हणावें "ठायीच बैसोनी करा एक चित्त। आवडी अनंत आळवावा" पण हें कोणीं म्हणावें,—ज्याला एके ठिकाणीं बसून देव पाहाण्याचें सामर्थ्य आहे त्यांनीं. रोजचे रोज जेवणें, खाणें, निजणें, बसणें यांत एके ठिकाणीं मन लागणार कसें? म्हणून आयुष्यांत एकदां तरी यात्रा—महायात्रा करावी असें वाटतें.

माझेसारख्या घराच्या बाहेर न पडणाऱ्या बायकांना हिमालय—दर्शन म्हणजे अलभ्य लाभ. कारण परमेश्वराचें, विशाल स्वरूप घरांत

बसून किंवा पुस्तकें वाचून समजत नसतें. पुस्तकें वाचून कल्पना कितीहि मोठी केली तरी प्रत्यक्ष पाहिलें म्हणजे परमेश्वराचें विशाल स्वरूप पाहतांना मन अगदीं आश्चर्यचकित होतें. आपण तर हिंदुधर्मी माणसें. आपल्या मनावर हिमालयदर्शनाची पकड असावी यांत कांहीं नवल नाहीं; पण पाश्चात्यांच्या मनावरहि त्याची मोहिनी पडून ते वेडे झालेले आहेत. दर वर्षी परदेशांतून विक्रम, पराक्रम करावयास तिकडील माणसें इकडे येत असतात.

हिमालयाचें वर्णन कितीहि केलें तरी पुरें होणार नाहीं. तें तर प्रत्यक्ष परमेश्वरस्वरूपच आहे. परमेश्वराचें वर्णन करण्यास मोठे मोठे विद्वान्सुद्धां असमर्थ ठरले. असें असलें तरी माझ्या अल्प बुद्धी-प्रमाणें परमेश्वराची वाङमयीन पूजा करावयास काय हरकत आहे? हिमालयाचें नैसर्गिक सृष्टिसौंदर्याचें वर्णन किती करावें ? हिमालय आणि सृष्टिसौंदर्य या दोन्ही गोष्टी एकमेकाला सोडून नाहीतच. हिमालयाचें आणि सृष्टिसौंदर्याचें वर्णन करण्याला किती हौस वाटावी याला बंधन थोडेंच आहे ? सर्व पर्वतांचा राजा जर हिमालय आहे, तर त्याला शोभेसें सृष्टिसौंदर्याचें वैभव असणारच ! यमुना चित्र-दर्शन ( ६६ ), पवालीतील दृश्य ( १९० ); तुंगनाथ पायथ्याची वनश्री ( २५९ ), विश्वरंगशाळा ( ११९ ) हीं वर्णनें म्हणजे आपण तेथेंच उभे आहोंत असें वाटतें. पर्वतराज हिमालय व त्याचें सृष्टिसौंदर्य हें सर्व जगांत श्रेष्ठ आहे आणि हें आमच्या हिंदुस्थानच्या वांट्याला आलें आहे हें मनांत येऊन आम्ही किती भाग्यवान् आहोंत असें वाटतें. शिवलिंगाबद्दल कांहीं लोकांनीं वेडीवांकडी कल्पना बसविली आहे. पान २११ वर ज्योतिर्लिंग नांवाची उपपत्ति वाचून तिचे निराकरण होईल.

या पुस्तकांत यमुनोत्तरी, गंगोत्तरी, बदरीकेदार व बदरीनारा-यणाचे सविस्तर वर्णनांत, यात्रेस जाण्याची इच्छा कां झाली, जातांना अडचणी किती येतात व त्या कशा निवारण करतां येतात, त्याच-प्रमाणें ती देवभूमि व तपोभूमि कशी आहे, माणसाची श्रद्धा कशी वाढीस लागते, न कळत शरीराला कष्ट सोसण्याची कशी संवय लागते, घरीं राहून संसारांतून मन निघत नाहीं, पण तेथें गेलें म्हणजे

न कळत घराचा विसर कसा पडतो याबद्दल आपला स्वतःचा अनुभव सांगितला आहे. ज्या ठिकाणीं आम्ही गेलों नाहीं त्या ठिकाणची सविस्तर माहिती मिळवून दिली आहे. पुस्तकाचे भाषेसंबंधीं मी काय लिहिणार ? पण बऱ्याच जणांनीं "एकते" मध्यें हिमालयदर्शनाची भाषा प्रौढ व वर्णन उत्तम झालें आहे असें घरीं येऊन वा पत्रांनीं लिहून सांगितलें आहे. समजणाऱ्या माणसांनीं तें चांगलें झालें आहे असें म्हटलें म्हणजे तें चांगलें. माझेसारख्या अशिक्षित माणसांनीं चांगलें म्हणण्याची किंमत किती असणार ? आणि मी यात्रेंत बरोबर असल्यामुळें मला हें वर्णन प्रत्यक्षाची बरोबर आठवण करून देत आहे. पुस्तकांत फारशी, उर्दु शब्द न घालण्याची पुष्कळच काळजी घेतली आहे.

लहानपणापासून स्वावलंबनाची संवय असल्यामुळें फोटो स्वतःच घेतले आणि धंद्यामध्यें कितीहि कष्ट पडले तरी काम चांगलें झालें पाहिजे ही जाणीव असल्यामुळें फोटो घेतांना तो चांगला कोठून येईल याकरितां नदीच्या कडेनें, डोंगरमाथ्यावरून, दरडीवर जाऊन पाहावें आणि मग फोटो घ्यावा. पण हें सगळें करत असतांना मला मोठें भय वाटे. कारण गुडघा व पाऊल फारा दिवसांचें पुष्कळ अधू आहे. रोजची चाल तर पुष्कळ करावी लागे. फोटो घेण्याकरितां उंचसखल जागीं जावें लागे. त्यामुळें फोटो घेण्यास माझा बराच वेळां विरोध होत असे.

या पुस्तकांत वैदिक कालांतील स्थानमाहात्म्य व पुराण कालां-तील तीर्थमाहात्म्य यांचें सविस्तर वर्णन केलें आहे. यमुनोत्तरीचे वाटेनें झाडांना झाडें घासून जेव्हां आगीचे लोट दिसूं लागले तेव्हां मला असें वाटलें कीं, आपल्या यात्रेंत नेहमींच अशी अडचण येणार कीं काय ? पुढें एके ठिकाणीं लांबवर आग दिसत होती, पण आमचे पर्यंत तिचा कांहीं त्रास झाला नाहीं.

पान १५६ वर भागिरथी गंगेचें दैवी स्वरूप तसेंच पान १५८ वर भागिरथी गंगेचें आधिभौतिक स्वरूप, तसेंच पान १६० वर आलेलें गंगामाईचें स्वयंभू पावित्र्य हें वाचतांना मनांत आलें, गंगाकांठीं राहणारीं माणसें किती भाग्यवान् आहेत ! आम्हीहि महाराष्ट्रीय असलों तरी गंगामाईविषयी आमच्याहि मनांत सारखेंच प्रेम असतें.

आमच्यावरहि तिची पूर्ण कृपा झालेली आहे. हरिद्वारच्या रोज दोन दोन अंघोळीनें थोडा थोडा ताप येत होता. त्या तापानें गंगोत्तरीला कळस केला. माझा जीव अगदी घाबरून गेला. पण करणार काय? घरीं जावयाचें म्हटलें तरी पंधरा दिवस लागावयाचे. अशा स्थितींत ती वेळ, तो दिवस कसा जाईल असें झालें होतें. गंगामाईची कृपा सर्वांवर सारखी असते हें खरें, पण माझेवर ती विशेष आहे हें माझें अनुभविक सत्य आहे. त्या प्रसंगाची आठवण या जन्मीं तरी मी विसरणार नाहीं. स्वत:ला विनंतीवजा बजावून सांगितलें असतांना 'पुन्हां ताप आला तर आपण लगेच पुण्याला जाऊं.' असें अश्वासन मिळालें; तापावरील औषधें घेतलीं आणि पुन्हां ताप आला नाहीं. गंगामाईचे घरीं लेकराचे लाड चालावयाचे नाहींत. दोन दोन अंघोळीचो दांडगाई केली म्हणून शिक्षा भोगावी लागली. सर्व निभावलें म्हणून आज कृतज्ञता व्यक्त करतां आली.

या चारी धाम यात्रेचे ठिकाणीं गरम पाण्याचीं कुंडें आहेत. त्यांत आंघोळ करून श्रमपरिहार होतो, पण माहेरवासिनो डोक्यावरून न्हातांना जर का पुष्कळ वेळ पाण्यांत डुंबत बसल्या तर घेरी येते आणि शरीराला हल्लकपणा येतो. ही आई शिस्त व वळण लावणारी आहे. माहेरीं आलें म्हणजे वाटेल तसें वागावयाचें नाहीं. चालतांना खालीं पाहून जर नीट चाललें नाहीं तर तेथेंच नमस्कार घालावयास लावते.

पान २०२ वर आलेलें औषधीप्रस्थ व हिमवत्पुर म्हणजेच त्रिजुगी नारायण हें वाचतांना मनांत आलें आपण एखादे वर्षीं तरी हरितालिकेची पूजा तेथें जाऊन करावी. पण मनांत येणें सोपें आहे. मन वाटेल तेथें भरारी मारूं शकतें, शरीर जड, तें कसें जाणार? आणि हिमालयांत जाण्याची ती वेळ नाहीं. पाऊस धो, धो पडत असतो. अशा स्थितींत प्रत्यक्ष जाणें अशक्यच. "उत्पद्यन्ते, विलीयन्ते, दरिद्राणां मनोरथा:।" याप्रमाणें मनांत आलें तरी प्रत्यक्ष आचरण होण्यास आपलें शरीर दरिद्रीच ठरतें.

प्रसादाच्या ओंब्या ( पान १०४ ); बोजेवाल्याचा विश्वासूपणा ( १२७ ); चोर तया स्वप्नीं ना पुसे; ( १२६ ); हलवायाची

सचोटी ( १२९ ); यांच्यांत शिक्षणाचा अभाव असला तरी संस्कृतीचा प्रभाव त्यांच्या मनावर झालेला असल्यामुळें आपल्याकडील बायाबापड्या सुद्धा हिमालयांतील यात्रा बोजेवाल्यांच्या जिवावर सहज करून येतात.

नारायणाला पंचपक्वान्नाच्या नैवेद्याचा संकल्प केला. चार पक्वान्नें झालीं. पांचवी पुरणपोळी कशी होणार ? डाळ तर मुळींच शिजेना. पण पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून पुरणपोळी सोडावयाची असें ठरविलें होतें, म्हणून कशीतरी नांवाला पोळी केली. ती पोळी नीट झाली नाहीं म्हणून येथें पुरणपोळी करतांना तेथल्या पोळीची नेहमीं आठवण येते.

हिमालयांतील यात्रा पायीं करावयाच्या असल्यामुळें चारी धाम यात्रेंत यमुनोत्तरी झाली कीं गंगोत्तरी पाहण्याची उत्कंठा लागते. गंगोत्तरी झाली कीं केदारला काय नवीन दृश्य पाहावयास मिळेल असें वाटतें. केदार पाहिल्यावर बदरीनारायण दर्शन झालें म्हणजे कृतकृत्य झालों असें वाटतें, आणि आनंदी आनंद होतो. येथपर्यंतची यात्रा कष्टाची असली तरी उत्साहांत झालेलीं असते, पण नारायणाहून निघतांना मनाची स्थिति त्याच्या अगदीं उलट होते. आणि मनांत येते पुन्हां आपल्याला येथें येतां येईल काय ? एकदां येण्याची मारामार तर पुन्हां येणें कसें होणार ? हें मनांत येऊन मन उद्विग्न होतें.

गंगामाईचे घरीं जावयाचें म्हणजे हरिद्वारहून एक सखी बरोबर घ्यावी लागते. तिचा हात धरून गेलें कीं हिमालयांतील यात्रा बिनघोर होते. ही सखी पुष्कळ ठिकाणीं मदत व धीर देत असते. बर्फावरून चालावयाचें असलें तरी ती अगोदर तेथें उभी राहून धोका नाहीं असें कृतीनें सांगते. मग आपण बर्फावरून बिनधोक चालावयास हरकत नाहीं. तसेंच दगडधोंड्यांतून, पाण्यांतून, चढणीला, उतरणीला या बाईसाहेबांची मदत घेतल्याशिवाय चालणें अशक्य होतें. ही सखी आपले अगदीं आज्ञेंत असतें. तिच्याकडून आपल्याला त्रास तर मुळींच होत नाहीं, पण उपयोग मात्र पुष्कळ होतो. अशी अबोल, कर्तव्यदक्ष, आपल्याला अनेक अडचणींतून वांचविणारी ही सखी आपल्याबरोबर घरीं येते. हिचा वाटेंत फार उपयोग झाला असल्यामुळें आपण

आमच्यावरहि तिची पूर्ण कृपा झालेली आहे. हरिद्वारच्या रोज दोन दोन अंघोळीनें थोडा थोडा ताप येत होता. त्या तापानें गंगोत्तरीला कळस केला. माझा जीव अगदी घाबरून गेला. पण करणार काय? घरीं जावयाचें म्हटलें तरी पंधरा दिवस लागावयाचे. अशा स्थितींत ती वेळ, तो दिवस कसा जाईल असें झालें होतें. गंगामाईची कृपा सर्वांवर सारखी असते हें खरें, पण माझेवर ती विशेष आहे हें माझें अनुभविक सत्य आहे. त्या प्रसंगाची आठवण या जन्मीं तरी मी विसरणार नाहीं. स्वत:ला विनंतीवजा बजावून सांगितलें असतांना 'पुन्हां ताप आला तर आपण लगेच पुण्याला जाऊं.' असें अश्वासन मिळालें; तापावरील औषधें घेतलीं आणि पुन्हां ताप आला नाहीं. गंगामाईचे घरीं लेकराचे लाड चालावयाचे नाहींत. दोन दोन अंघोळीचो दांडगाई केली म्हणून शिक्षा भोगावी लागली. सर्व निभावलें म्हणून आज कृतज्ञता व्यक्त करतां आली.

या चारी धाम यात्रेचे ठिकाणीं गरम पाण्याचीं कुंडें आहेत. त्यांत आंघोळ करून श्रमपरिहार होतो, पण माहेरवासिनी डोक्यावरून न्हातांना जर का पुष्कळ वेळ पाण्यांत डुंबत बसल्या तर घेरी येते आणि शरीराला हल्लकपणा येतो. ही आई शिस्त व वळण लावणारी आहे. माहेरीं आलें म्हणजे वाटेल तसें वागावयाचें नाहीं. चालतांना खालीं पाहून जर नीट चाललें नाहीं तर तेथेंच नमस्कार घालावयास लावते.

पान २०२ वर आलेलें औषधीप्रस्थ व हिमवत्पुर म्हणजेच त्रिजुगी नारायण हें वाचतांना मनांत आलें आपण एखादे वर्षीं तरी हरितालिकेची पूजा तेथें जाऊन करावी. पण मनांत येणें सोपें आहे. मन वाटेल तेथें भरारी मारूं शकतें, शरीर जड, तें कसें जाणार? आणि हिमालयांत जाण्याची ती वेळ नाहीं. पाऊस धो, धो पडत असतो. अशा स्थितींत प्रत्यक्ष जाणें अशक्यच. "उत्पद्यन्ते, विलीयन्ते, दरिद्राणां मनोरथा:।" याप्रमाणें मनांत आलें तरी प्रत्यक्ष आचरण होण्यास आपलें शरीर दरिद्रीच ठरतें.

प्रसादाच्या ओंव्या (पान १०४); बोजेवाल्याचा विश्वासूपणा (१२७); चोर तया स्वप्नीं ना पुसे; (१२६); हलवायाची

सचोटी ( १२९ ); यांच्यांत शिक्षणाचा अभाव असला तरी संस्कृतीचा प्रभाव त्यांच्या मनावर झालेला असल्यामुळें आपल्याकडील बायाबापड्या सुद्धा हिमालयांतील यात्रा बोजेवाल्यांच्या जिवावर सहज करून येतात.

नारायणाला पंचपक्वान्नाच्या नैवेद्याचा संकल्प केला. चार पक्वान्नें झालीं. पांचवी पुरणपोळी कशी होणार? डाळ तर मुळींच शिजेना. पण पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून पुरणपोळी सोडावयाची असें ठरविलें होतें, म्हणून कशीतरी नांवाला पोळी केली. ती पोळी नीट झाली नाहीं म्हणून येथें पुरणपोळी करतांना तेथल्या पोळीची नेहमीं आठवण येते.

हिमालयांतील यात्रा पायीं करावयाच्या असल्यामुळें चारी धाम यात्रेंत यमुनोत्तरी झाली कीं गंगोत्तरी पाहण्याची उत्कंठा लागते. गंगोतरी झाली कीं केदारला काय नवीन दृश्य पाहावयास मिळेल असें वाटतें. केदार पाहिल्यावर बदरीनारायण दर्शन झालें म्हणजे कृतकृत्य झालों असें वाटतें, आणि आनंदी आनंद होतो. येथपर्यंतची यात्रा कष्टाची असली तरी उत्साहांत झालेलीं असते, पण नारायणाहून निघतांना मनाची स्थिति त्याच्या अगदीं उलट होते. आणि मनांत येते पुन्हां आपल्याला येथें येतां येईल काय? एकदां येण्याची मारामार तर पुन्हां येणें कसें होणार? हें मनांत येऊन मन उद्विग्न होतें.

गंगामाईचे घरीं जावयाचें म्हणजे हरिद्वारहून एक सखी बरोबर घ्यावी लागते. तिचा हात धरून गेलें कीं हिमालयांतील यात्रा बिनघोर होते. ही सखी पुष्कळ ठिकाणीं मदत व धीर देत असते. बर्फावरून चालावयाचें असलें तरी ती अगोदर तेथें उभी राहून धोका नाहीं असें कृतीनें सांगते. मग आपण बर्फावरून बिनधोक चालावयास हरकत नाहीं. तसेंच दगडधोंड्यांतून, पाण्यांतून, चढणीला, उतरणीला या बाईसाहेबांची मदत घेतल्याशिवाय चालणें अशक्य होतें. ही सखी आपले अगदीं आज्ञेंत असतें. तिच्याकडून आपल्याला त्रास तर मुळींच होत नाहीं, पण उपयोग मात्र पुष्कळ होतो. अशी अबोल, कर्तव्यदक्ष, आपल्याला अनेक अडचणींतून वांचविणारी ही सखी आपल्याबरोबर घरीं येते. हिचा वाटेंत फार उपयोग झाला असल्यामुळें आपण

कृतज्ञतापूर्वक नारायणाची आठवण म्हणून आपल्याजवळ ती ठेवतो.

कुठेंहि यात्रेला किंवा प्रवासाला निघालें तर पुरुष मंडळी बायकांना बरोबर नेण्याचा कंटाळा करतात. पण एवढ्या सहाशें मैलांच्या कष्टाचे यात्रेंत मी बरोबर होतें. पुरुष–माणसांचे चालींत व बायका-माणसांचे चालींत फार फरक पडतो. माझी चाल सावकाश असे. असें असतांनासुद्धां आमची यात्रा समाधानानें व आनंदानें पार पडली.

प्रस्तावना पुरी करावयाची म्हणजे माझे मातोश्रीसमान असलेल्या मामेसासूबाईचा उल्लेख केल्याशिवाय पुरी होणार नाहीं. खरोखरं चारहि वेळेच्या हिमालय यात्रा त्यांच्या जिवावर झाल्या. माझेसारखी चूल आणि मूल करणाऱ्या बाईला कसली आली आहे हिमालय-यात्रा ! पण त्यांनीं माझीं तीन वर्षांपासून लहान मुलें संभाळलीं म्हणून मला जातां आलें. आमचीं मुलें तर संभाळलींच आणि आम्हाला उत्तम आशीर्वाद दिले, त्यामुळें आमच्या यात्रा निर्विघ्नपणें पार पडल्या. या यात्रेंतील अनुभव व फायदा आम्हाला मिळाला असला तरी पुण्य त्यांनाच लाभलें आहे.

आतां माझ्या यात्रा–बांहुणीनें–सौ. माई चापेकर–केलेली हिमालय–प्रार्थना लिहून ही प्रस्तावना पुरी करतें.

हिमालय माय–। बापा नमस्कार। लोभ निरंतर। असो देई ।।
लेक मी अजाण। तुझीच कीं जाण। तुवा माहेरपण। केलें मज ।।
माहेरीं नव्हती। कसलीच चिंता। ताता दयावंता। सांभाळीलें ।।
हर्षलें खेळें। आणि बागडलें। दिवस ते गेले। झटदीशी ।।
पिता तूं प्रेमळ। तसा गुरु पण। दिलेस शिक्षण। नाना रीतीं ।।
शिकविता मला। धाक दाखविला। शिक्षा कधीं मला। केली नाहीं ।।
आम्ही उभयतां। पुन्हां येऊं आतां। बोलविसी ताता। तरीच कीं ।।
तेथें पाय सेवूं। दोघे संगतीनें। तोषवी त्या दिने। लवकरी ।।

सौ. पार्वतीबाई दाते.

कृतज्ञतापूर्वक नारायणाची आठवण म्हणून आपल्याजवळ ती ठेवतो.

कुठेंहि यात्रेला किंवा प्रवासाला निघालें तर पुरुष मंडळी बायकांना बरोबर नेण्याचा कंटाळा करतात. पण एवढ्या सहाशें मैलांच्या कष्टाचे यात्रेंत मी बरोबर होतें. पुरुष–माणसांचे चालींत व बायका-माणसांचे चालींत फार फरक पडतो. माझी चाल सावकाश असे. असें असतांनासुद्धां आमची यात्रा समाधानानें व आनंदानें पार पडली.

प्रस्तावना पुरी करावयाची म्हणजे माझे मातोश्रीसमान असलेल्या मामेसासूबाईंचा उल्लेख केल्याशिवाय पुरी होणार नाहीं. खरोखर चारहि वेळेच्या हिमालय यात्रा त्यांच्या जिवावर झाल्या. माझेसारखी चूल आणि मूल करणाऱ्या बाईला कसली आली आहे हिमालय-यात्रा ! पण त्यांनीं माझीं तीन वर्षांपासून लहान मुलें संभाळलीं म्हणून मला जातां आलें. आमचीं मुलें तर संभाळलींच आणि आम्हाला उत्तम आशीर्वाद दिले, त्यामुळें आमच्या यात्रा निर्विघ्नपणें पार पडल्या. या यात्रेंतील अनुभव व फायदा आम्हाला मिळाला असला तरी पुण्य त्यांनाच लाभलें आहे.

आतां माझ्या यात्रा–बहिणीनें–सौ. माई चापेकर–केलेली हिमालय–प्रार्थना लिहून ही प्रस्तावना पुरी करतें.

हिमालय माय–। बापा नमस्कार। लोभ निरंतर। असो देई ।।
लेक मी अजाण। तुझीच कीं जाण। तुवा माहेरपण। केलें मज ।।
माहेरीं नव्हती। कसलीच चिंता। ताता दयावंता। सांभाळीलें ।।
हर्षलें खेळ कें। आणि बागडलें। दिवस ते गेले। झटदीशी ।।
पिता तू प्रेमळ। तसा गुरु पण। दिलेस शिक्षण। नाना रीतीं ।।
शिकविता मला। धाक दाखविला। शिक्षा कधीं मला। केली नाहीं ।।
आम्ही उभयतां। पुन्हां येऊं आतां। बोलविसी ताता। तरीच कीं ।।
तेथें पाय सेवूं। दोघे संगतीनें। तोषवी त्या दिने। लवकरी ।।

सौ. पार्वतीबाई दाते.

ती. श्री. गोपिकाबाई गोखले



जन्म शके १७५६ ]


[ मृत्यु शके १८४१

ज्यांच्यापासून मला हिमालयांतील

यात्रांची स्फूर्ति झाली त्या माझ्या पूज्य मातामही

**ती. श्री. गोपिकाबाई गोखले**

यांच्या स्मृतीस सादर समर्पण



लेखक

# अनुक्रमणिका

## प्रास्ताविक पान १ ते ६

## भाग १ ला—यमुनोत्तरी पान १ ते १०९


पूर्वतयारी; शुभास्ते पंथानः सन्तु ३
वियोग; पुणें ते हरद्वार ४
हरद्वार ६
हरद्वार, हरिद्वार वा गंगाद्वार ८
नांवांची सार्थ उपपत्ति ९
विश्वोद्धर्त्री भागिरथी १०
गंगाघाट, हरीची पायरी ११
गंगेचें माहात्म्य १२
धार्मिक पण भेदातीत संमेलन
भजन–पूजन सोहळा १३
बिल्वकेदार व हरितालिका
मौनीबाबांची गुहा १४
योगी ईश्वरदास १८
अच्युतानंदस्वामी २०
हिमालयांतील महात्मे २२
नीलधारा व कनखल,
सतीचा अग्निप्रवेश २४
यज्ञविध्वंस व वरप्रदान,
कनखल तीर्थ माहात्म्य २५
गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नील
पर्वते ।...कनखले २६
गुरुकुल व ऋषिकुल २७
हृषीकेश २८
बाबा काळीकमळीवाला क्षेत्र,
बाबा काळीकमळीवाला! २९
भिक्षांदेही ३१
शुभारंभ. कै. बाबा
काळीकमळीवाले ३३
पंजाब क्षेत्रे व अहल्याबाईच्या
धर्मशाळा, मुनीकी रेती ३५
झूले अथवा लोंबते पूल ३६
बोजेवाले ३९
गंगेचे दर्शन ४०
डेहराडून व मसुरी ४२
उदासीपंथ व रामराय.
गिरिराज नमस्तुभ्यम् ४३
मसूरी ४४
पुढचा मार्ग ४७
एका दिवसांत तीनहि ऋतु ४८
ग्रामीण लोकांची आपुलकी ४९
अर्धबिंबाचें सबंध कां दिसावें ५०
हिमालयाचें भव्य नि दिव्य स्वरूप
गंगास्नान ५४
विंचवाचें झाड ५६
गावंढेकऱ्याचे मननीय बोल ५७
देवप्रयाग मार्गाची श्रेष्ठता,
वाटेवरील गांवें व चट्ट्या ५९
हिमालयांतील डोंगरांची
दगड–माती ६०
धरासू. चीड वृक्ष ६१
आरोग्य–भुवन ६३
सिमली व गंगाणी ६४
यमुना भेट ६५
यमुना चित्र–दर्शन ६६
उद्बोधन, आगीचा डोंब ६८
आगीचा प्रताप ७०
घोर अघोर रूपदर्शन ७२
आग विझविण्याची पद्धत ७४
जुटीचें महत्त्व
गंगाणी व जम्नाचट्टी ७५

थोराच्या घरचें श्वान ७६
प्रसंगानें शहाणपण शिकविलें ७८
खरसाळी व जानकी चट्टी
घरें व राहणी ७९
शनीचें देऊळ ८०
तत्रस्थ लोकांचे व्यवसाय,
पंडे-पुजारी व उपाध्ये ८१
पंड्याकडे सहानुभूतीनें पाहावें ८२
मार्कंडेय तीर्थ. यमुनोत्तरी म्हणजेच
जम्नोत्तरी. बहिरव घाटी ८४
वाफेचे ढग. ८६
बंदरपुच्छ. थंडीचा प्रभाव ८७
यमुनेचा उगम. प्रवाहाचा प्रभाव ८८
हिमोद्भव प्रवाह ८९
धर्मशाळा ९०
यमुना मंदिर. उन्हाळीं ९१
यमुनेचें माहात्म्य ९३
वैदिक-पौराणिक उल्लेख ९५
यमद्वितिया ९६
वरप्रदान ९८
समुद्रगमिनी यमुना. परत मार्गी
पुन्हां सिमली ९९
यमुना कांठचे पहाड
व त्याची घटना १००
यमुना दर्शन-बोध १०१
अनुभवाचें सार १०२
गिर्यारोहणप्रेमी यांस सूचना १०३
दुर्लक्षाचें प्रायश्चित्त,
प्रसादाच्या ओंव्या १०३


## भाग २ रा—गंगोत्तरी पान १०५ ते १६९


सिमली ते उत्तरकाशी १०५
स्त्रियाहि चिलीम ओढतात १०५
जंगलचट्टी व बैरागी १०६
फल्ल.धार घाटी १०७
उत्तरकाशी येथील गंगापात्र १०८
उत्तरकाशी १०९
दक्षिणकाशी. उत्तरकाशी गांव ११०
आत्मानंद स्वामी. विश्वेश्वर व
त्याचा त्रिशूळ. ज्योतिर्मठ व
कोटेश्वर. लक्षेश्वर महादेव १११
दैवयोग म्हणतात तो असाः
शंकराचार्य मठ. डोडीताल ११२
मल्लाचट्टी ११३
भटवाडी. बोजेवाल्यांची नोंद ११४
बोजेवाल्यांचा प्रामाणिकपणा. पांच
वांचविता पंचवीस जातात ११५
गंगणाणी, भागीरथीचे पहाड ११६
गंगेचें चित्रमय स्वरूप ११७
विश्वरंगशाळा. गंगणाणी ११९
ऋषीकुंड-उष्णजलधारा-स्नान १२०
लोहारीनाग १२१
प्रसंग शहाणपण शिकवितो १२२
सुक्खी १२३
मेंढपाळांचा उपधंदा-
मालाची वहातूक १२४
पहाडी कुत्री १२५
चोर तया स्वप्नीं न पुसे १२६
उक्तीपेक्षीं कृति श्रेष्ठ. बोजेवाल्यांचा
विश्वासूपणा-(प्रसंग) १२७
हलवायाची सचोटी १२९
धर्माचारानें तसा स्वभाव बनतो १३०
परप्रांतीं नुसता ओळखीचा माणूस
घरचाच वाटतो. संगत सोबतीची
निवड १३१

पुणेरी जोडा. स्वावलंबनानें आत्म-
विश्वास. सुख्खी ते हरप्रयाग १३२
गंगेचें वाळवंट, तिबेटी
लोकवस्ती १३३
तिबेटी लोक व त्यांची राहाणी
तिबेटी चहा १३४
त्यांचा व्यवसाय
देवद्वार (झाड) १३५
अक्रोड १३६
झब्बू १३७
हरशील म्हणजेच हरप्रयाग,
धराली—श्रीकैलासकडे जाण्याची
सोबत १३८
मुखवा. रास्ता तिब्बतकू. जान्हवी
आणि भागीरथी एक नव्हेत १३९
भागीरथीला जान्हवी नांव पडण्याचें
कारण. भैरव घाटी १४०
भागीरथी—केदारगंगा संगम १४१
कृष्णाश्रम. कृष्णाश्रम स्वामी १४२
भूर्जपत्र. गंगोत्तरी १४३
दशहार उत्सव. गंगाप्रवाह
व तिचें येथील स्वरूप १४४
गंगास्नान १४५
गंगामंदिर देवतार्चन १४६
गंगोत्तरी हें मानीव उगमस्थान
सगरपुत्रांचा उद्धार करणारी,
तीच गंगा १४७
गौरीकुंड वा गोमुख—गंगेचें उगम-
स्थान. गौरीकुंडास जाण्याच्या
अडचणी १४८
निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंची
फळ. प्रतिगौरीकुंड १४९
भागिरथी गंगेचें माहात्म्य, वेदांत
गंगेचा देवतारूपानें उल्लेख.
अंतर्वेदी ही तपोभूमि १५०
प्रयाग त्रिवेणी संगम माहात्म्य
प्रयागस्नान फल—स्वर्गप्राप्ति,
प्रयागांत देहविसर्जन—फल—
मोक्षप्राप्ति १५१
गंगावतरण मृतजीवांचे
उद्धारार्थ १५२
गंगेंत प्रेत वा अस्थि—विसर्जनाच्या
प्रथेची संगती १५४
भागीरथीचें माहात्म्य—पौराणिक
कालीन. गंगाध्यानम्
गंगावतरणम् १५५
भागीरथी गंगेचें दैवी स्वरूप १५६
स्कंद पुराणोक्त गंगोत्पत्ति १५७
भा. गंगेचें आधिभौतिक स्वरूप १५८
गंगामाईचें स्वयंभू पावित्र्य १६०
गंगाजलाचे ठायीं
तीर्थत्वाची भावना १६१
'सगुण हें ध्यान । नाम पाठ
मौन प्रपंचाचें १६२
(माझें) गंगास्नान आणि
त्याची फलश्रुती १६३
स्नानाचें दिव्य १६४
तापाचे ग्लानींत दिव्य—दर्शन १६६
फलश्रुती—हिमालयाविषयीं जिव्हाळा
गंगावंदन करून निरोप घेतला १६७

## भाग ३—बदरीकेदार पान १७१ ते २३३


गंगोत्तरीहून बदरी केदारकडे १७३
माशांचा उपद्रव १७४
उपचारात्प्रतिबंधोहि श्रेय: १७६
बेलख येथें सूर्यास्ताचें
अलौकिक दृश्य १७७
बुढाकेदार. तपोभूमीच्या पावित्र्य
रक्षणाची आवश्यकता १७८
अधिकार लालसेला सूक्तासूक्त दिसत
नाहीं, पावित्र्य रक्षणाचें उरदायित्व
समाजावरच अधिक १८०
इडापिडा टळो म्हणून
भैरोबास नारळ १८१
बुद्धि हतबल झाली म्हणजे
सुशिक्षितहि देवधर्माची काठी
हातीं धरतोच १८२
सुंठीचा काढा. भिलंगना चट्टी,
जळीं मारिता बुडी। तोंडाची
वळे आकडी १८३
गुप्त पोलीसांची माणुसकी.
पवालीचा पायथा. घुत्तु १८४
गौमांडा येथील वनवास १८५
बेलख घाटी १८७
पवाली दांडी. दुफंदा १८८
पवाली चट्टी १८९
पवालींतील दृश्य १९०
मग्गु की मांडा १९२
बर्फावरून जातांना धोका १९३
सावधगिरी व उपाय. १० ते १२
हजार फूट उंचीवर आढळणारीं
फुलें १९४
क्युकला खिड व मग्गुकी मांडा १९५
श्री. चितळे ह्यांचा पवालींतील
अनुभव १९७
मागें पुढें उभा राहे सांभाळीत १९८
त्रिजुगी नारायण गांव व मंदीर १९९
पितृतर्पण व तीर्थोदक कुंड
शंकर—पार्वती विवाह २००
विवाह—स्थळ
लाजा होमाचा अग्नि २०१
ओषधी प्रस्थ व हिमवत्पुर
म्हणजेच त्रिजुगी नारायण २०२
सोनप्रयाग २०३
मुंडकटा गणेश गौरीकुंड २०४
निसर्गरम्य सृष्टि २०५
रामवाडा व बर्फावरील वाट
बर्फातील गुहा २०६
केदारनाथाची धूळ भेट २०७
मंदाकिनी घाट २०८
केदारपुरी २१०
ज्योतिर्लिंग नांवाची उपपत्ति २११
बारा ज्योतिर्लिंग स्थानें २१३
बदरीकेदार ज्योतिर्लिंग २१४
पंच केदार स्थानें २१५
मध्यमहेश्वर २१६
कल्पेश्वर. बदरी केदार मंदिर २१७
पूजन विधि २१९
मंदाकिनीचा उगम. केदार
जवळील तीर्थकुंडे २२०
पंडभोजन व गारांचा वर्षाव. पुजारी
म्हणजेच रावळ. प्रदोष पूजा २२१
केदारनाथाची पूजा. लिंगाऐवजीं
उंबरठ्यावर. उंबरठा पूजनानें
अघटित घटना २२३
काशींतील शृंगारी एकादशी २२४
विश्वेश्वर दर्शन २२५
त्यावरील संतकवी दासगणू व
देशमूख महाराज ह्यांचें भाष्य
निरोप—नमो रुद्रभ्यो... २३३

# भाग ४—बदरी नारायण पान २३५ ते ३४०

मार्ग बदरी नारायणाकडे २३७
मैखंडा पर्वतावर महिषासुर मर्दन २३८
गुप्तकाशी. गुप्तकाशी नांव कां पडलें २३९
विश्वेश्वर मंदिर व मनर्कणिका कुंड २४०
उखीमठ २४१
ओंकारेश्वर देवालय. केदारचें राऊळ व त्यांचें दर्शन २४३
तुंगनाथ. पायथ्यापर्यंतची वनश्री २४५
साहेबाची भेट. साहेबाशीं संवाद २४८
तुमचे गैरसमज व भिन्न दृष्टि आमची दृष्टि २५०
विश्वाचा कल्पनातीत विस्तार. हिमालयाचा जन्म २५१
मानवाचें सामर्थ्य. यात्रेचें हेतू २५२
यात्रा फळ २५३
हीं साक्षात्कारी तीर्थक्षेत्रें महाविद्यालयेच होत, अभ्यास म्हणजे स्वभाव होऊन जाणें, ध्येय निश्चिती, मानवी कलेंत बुद्धिवैभवाचा आविष्कार तर निसर्गीं परमेश्वरी साक्षात्कार २५४
पुरुषार्थ २५५
चतुर्विध पुरुषार्थ २५६
आश्रमव्यवस्थेंत जन्म साफल्य २५७
तुंगनाथ. नैसर्गिक वैभव २५९
१२००० फूट उंचीवरील निवास व अनुभव २६१
श्वासोच्छ्वासास अडचण २६२
तुंगनाथ देवालय २६४
तुंगनाथ ते चमोली—मंडल चट्टी २६५
गोपेश्वर. चमोली—लालसांगा गोहनाताल २६६
मठचट्टी. पिप्पलकोटी २६८
गरुडगंगा. पाताळगंगा २६९
हेलंग. पंचबदरी. चुलूफळ जोशीमठ वा ज्योतिर्मठ २७०
कत्युरी साम्राज्य नृसिहस्थाना—संबंधी आख्यायिका २७१
बदरीक्षेत्राची वेस-जोशीमठ २७२
गप्पागोष्टीचे चव्हाटे २७३
विष्णुप्रयाग. धवलगंगा—अलकनंदा संगम २७४
पांडुकेश्वर २७७
चित्रमय देखावा २७८
पांडुकेश्वर नांव पडण्याचें कारण. पांडवांचें दर्शन २७९
पांडव शिला व योगबदरी २८०
पांडुकेश्वर येथील ताम्रपट २८१
हेमकुंड—लोकपाल, पुष्पवटिकांचें नंदनवन २८२
पांडुकेश्वर ते बदरीनारायण, हनुमानचट्टी—वैखानस तीर्थ अलकनंदेचें थैमान २८३
उद्धाराकरितां अवतार २८४
देवदेखणी २८५
बदरीकाश्रम २८६
बदरी विशालाचें मंदिर देवतायन २८९
नारायणाची मूर्ति परिसाची आहे काय ? २९०
इतर देवळें. देवाला संस्थानचा नैवेद्य २९१

दर्शनेच्छू पेंढार २९२
देवस्थानचें उत्पन्न व वहिवाट.
पंचशिला व पंचतीर्थें,
अग्नि वा तप्तकुंड २९३
अलकनंदेचा उगम. ब्रह्मकपाल २९५
श्रध्दयायत्कृतं तत्श्राध्दं २९६
श्राध्दसंकल्पाची सोय २९७
देवास आमचा नैवेद्य २९८
ध्यानाचे श्लोक, शंकराचार्यकृत
परापूजा २९९
परापूजा मराठी अनुवाद ३००
पिंडदान व पितृतर्पण ३०२
आत्मपिंड, भोट लोकांची
वस्ती व व्यवसाय ३०३
केशवप्रयाग, व्यासाश्रम वा
व्यासगुंफा, ३०४
मुचकुंद गुंफा मातामूर्ती मंदीर ३०५
भीमगोड. हवेची विरलता ३०६
वसुधारा ३०७
नीलकंठ शिखर. चरण पादुका
शेषनेत्र. सतोपथ ३०८
कैलास मानस पथ
अनिच्छेनें परतणें येते ३१३
अखेर दर्शन व निरोप ३१४
हिमालयाचे रुक्ष स्वरूप ३१५
पंचबदरी ३१६
वाटेतील कांहीं अनुभव
आदरातिथ्य ३१८
नंदप्रयाग ३१९
कर्णप्रयाग ३२०
महाराष्ट्रियांच्या आचारांचा
प्रभाव ३२१
गोचर ३२३
रुद्रप्रयाग ३२४
सच्चिदानंदस्वामी. रुद्रप्रयागाचें
विहंगम दृष्य ३२५
श्रीनगर. कमलेश्वर महादेव ३२६
सुदर्शन चक्राची प्राप्ती ३२७
श्री–यंत्र. यंत्र–मंत्र–तंत्रात्मक
उपासना ३२८
बिल्वकेदार वा भिल्लकेदार ३३०
एक बिल्वं शिवार्पणम्‌चे
महात्म्य. देवप्रयाग ३३१
भागिरथी अलकनंदा संगम
म्हणजेच देवप्रयाग
देवप्रयाग महात्म्य ३३३
राघव पर्वत व राममंदीर ३३४
देवप्रयाग–एक उत्कृष्ट
चित्रमय देखावा ३३५
बलवानिंद्रिय ग्रामो
विद्वांसमपिकर्षती ३३६
देव तारी त्याला कोण मारी.
बोजेवाल्यांची संभावना व
त्यांस निरोप ३३७

## उपसंहार पान ३४१ ते ३५४

एकता मासिक–कर्त्यांचे आभार
प्रसाद चिन्हानि पुरःफलानी ३४१
पुस्तक छापण्याची आवश्यकता
थोडे आत्मनिवेदन ३४२
निश्चयाचे बळ तुका म्हणे
तेची फळ ३४३
दैनंदिन कार्यक्रम ३४४
प्रातः स्मरणांत श्रमपरिहार
भोजन एकच वेळ ३४५

प्रत्यही चाल दोन वेळ. यात्रेच्छू बरोबर हितगुज ३४६
तीर्थक्षेत्र महात्म्य. तीर्थयात्रा–यज्ञ, तप–पूजन ३४७
शारीरतप. मानस तप ३४८
एकाग्रतेचा अभ्यास ३४९
अनासक्तियोग ३५०
संस्कारक्षम मनाची सिद्धी ३५१
साक्षात्कारी देवदर्शन ३५२
यात्रेपासून ऐहिक लाभ ३५४

## कृतज्ञता पान ३५६ ते ३६०

## परिशिष्टें १ ते ८ पान ३६३ ते ३९२

परिशिष्ट १—उपयुक्त सूचना ३६३ ते ३६९
परिशिष्ट २—लागणारी सामुग्री ३६९ ते ३७३
परिशिष्ट ३—चट्टयांची यादी ३७४ ते ३७९
परिशिष्ट ४—व्ययाचा अंदाज ३८० ते ३८४
परिशिष्ट ५—गंगोत्री–गीत ३८४ ते ३८८
परिशिष्ट ६—मार्गांचे नकाशे ३८८ ते ३८९
परिशिष्ट ७—गावांच्या उंच्या ३९०
परिशिष्ट ८—यात्रा मार्गांच्या उंचीचा आलेख पान ३९१ व ३९२

# चित्रांची सूची

१ यात्रामार्गावरील श्री. शंकर स. दाते व सौ. पार्वतीबाई दाते. ४
२ कनखल, घाट–नीलधारा ४
३ हरद्वार, गंगेच्या कालव्याचे आडदरवाजे ५
४ हरद्वार, विहंगमदृश्य ५
५ हृषीकेश, त्रिवेणी घाट १२
६ लक्ष्मण झूला समोरून १२
७ गुरुकुल १३
८ ऋषीकुल १३
९ लक्ष्मण झूला बाजूनें ४८
१० दक्ष मंदीर ४९
११ सती कुंड ४९
१२ वाटेवरील किर्र झाडी ६४
१३ चिडवृक्ष उंची ६४
१४ यमुनोत्तरी ६८
१५ यमुनाप्रवाह ६९
१६ गंग्णाणी कुंड ७६
१७ अर्धबिंब ७६
१८ उत्तरकाशी मंदीर ७७
१९ तुंगनाथ वाटेची दाट झाडी ७७
२० उत्तरकाशी धर्मशाळा, मंदीर ११६
२१ देवद्वार राई, हरशील ११६
२२ गंगोत्तरी मंदीर बाजूनें ११७
२३ बाष्प कुंड यमुनोत्तरी ११७
२४ पर्वत उंची पांडुकेश्वर १२४
२५ अलकनंदा उगम १२४
२६ राममंदीर देवप्रयाग १२५
२७ वासुकी गंगा संगम, धबधबा १२५
२८ गंगोत्तरी, गांव, गंगाप्रवाह १४८
२९ गंगामंदीर गंगोत्तरी समोरून १४९

३० रुद्रप्रयाग दोरखंडाचा झूला १५६
३१ माना, अलकनंदेवरील झूला १५६
३२ कृष्णाश्रम, गंगा संगम गंगोत्तरी १५७
३३ केदार प्रथम दर्शन १९२
३४ केदार मंदीर उजवी बाजू १३९
३५ केदार मंदीर समोरून २०८
३६ मंदाकिनी घाट २०९
३७ उखीमठ २१२
३८ उघडा साधू २१३
३९ त्रिजुगी नारायण २१३
४० पवालीतील एक वाट २२०
४१ मेंढया, वर्फावरून वहातूक २२०
४२ केदार मंदीर लांबून २२१
४३ उखीमठ मंदीर २२१
४४ यमुनोत्तरी पंडा कुटुंब २४४
४५ गौरी कुंड २४४
४६ तुंगनाथ २४५
४७ जंगलचट्टी २५२
४८ विष्णुप्रयाग २५३
४९ पांडुकेसर गांव मंदीर २६०
५० विचवाचे झाड २६१
५१ रुद्रप्रयाग २६१
५२ गुप्तकाशी गांव २६८
५३ गंगाप्रवाह २६८
५४ मनकर्णिका कुंड व मंदीर गुप्तकाशी २६९
५५ बदरीकाश्रम २८८
५६ बदरीनारायण देऊळ समोरून २८९
५७ वसुधारा लांबून ३०४
५८ वसुधारा जवळून ३०४
५९ बदरीनारायण विहंगम दृश्य ३०५
६० देवप्रयाग विहंगम दृश्य ३२४
६१ स्वर्गाश्रम ३२५
६२ कमलेश्वर म[illegible] ३२५
६३ हरीची पायरी हरद्वार ३३२
६४ श्रीनगर रस्ता ३३३
६५ श्रीनगर व कीर्तिनगर मधील गंगाप्रवाह ३३३

# प्रास्ताविक

हें प्रवासवृत्त पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा हेतु असा आहे कीं, हिमालयाकडे आणि विशेषतः तेथील तीर्थक्षेत्रांकडे महाराष्ट्रीयांचें लक्ष अधिक वेधावें, त्यांची जिज्ञासा जागृत करून त्यांच्यांत तिकडे जाण्याची आवड उत्पन्न करावी, त्याचबरोबर हेंहि लक्षांत आणून द्यावें कीं, हिमालयांतील यात्रा करण्यांत खरा पुरुषार्थ आहे. गाड्या-घोडीं, आगगाड्या, मोटारी, यांमध्यें ऐषआरामानें प्रवास करून होणाऱ्या ह्या यात्रा नाहींत. ह्या करितांना चढउतार, ऊनतहान, थंडीवारा, पाऊसपाणी ह्या सर्वांशीं सारखें झगडून देहदंड द्यावा लागतो. ह्या झगड्यांत होणारे कष्ट मुकाट्यानें सोसावे लागतात. कच खाऊन मधूनच परत फिरण्याचे भ्याडपणाची पाळी येऊं नये म्हणून चिकाटीहि धरावी लागते. जगतांतील जीवनकलहाच्या हमरी-तुमरींत मानाचें जिणें जगण्यास लागणारें धैर्य, साहस, आत्मविश्वास, कर्तृत्वाची धमक इत्यादि गुणांचा ओनामा शिकण्याची हिमालय ही एक शाळाच आहे. हिमालयांतील प्रवास म्हणजे तें एक खरेंखुरें शारीरतपच आहे. शारीरतपास मानसतपाची साथ नसेल तर तें सिद्ध होणारच नाहीं. तीं दोन्हीं तपें परस्परावलंबी आहेत. मानसिक तपानें मन संस्कारक्षम होऊन प्रभावीहि होतें. कोणत्याहि राष्ट्राचा अभ्युदय हा त्या राष्ट्रांतील लोकांच्या ह्या पौरुषी गुणावरच अवलंबून असतो. या दृष्टीनें हिमालयांतील प्रवासाचें महत्त्व केवढें मोठें आहे हें लोकांच्या दृष्टीस आणणें आवश्यकच आहे.

तिकडे जाण्यानें होणाऱ्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष लाभाची ओळख करून द्यावी, प्रवासाच्या सोयी नि साधनें ह्यांची इत्थंभूत माहिती द्यावी, हिमालयासंबंधींच्या अवास्तव विपरीत कल्पनांचा यथार्थ निदर्शनानें निरास करावा, प्रवासांतील धोके, कष्ट व वेंच ह्यासंबंधींचा अकारणच बाऊ वाटत असतो त्याचें निराकरण करावें, आपणांस आलेले विशेष अनुभव सांगावे, त्यावरून सुचणारे विचार आणि सूचना पुढिलांकरितां पुढें मांडाव्या, आणि अशा तऱ्हेनें जनताजनार्दनाची कृतज्ञतेनें सेवा करावी असे प्रसिद्धीकरणांचे हेतु आहेत.

हजारों वाचकांपैकीं एखाद्यास तरी मला असलेली माहिती ठाऊक आहे किंवा नाहीं, ह्याची वानवाच आहे. ह्या जाणिवेनें ती सांगण्यांत मला विशेषच आनंद वाटत आहे. हें ज्ञान प्रसृत करण्यांत 'दुणावें कीं देतां किमपि न सरे लेशहि कदा'ची आठवण होत आहे. शिवाय ह्या लिखाणामुळें माझी स्मृति जागृत होऊन मला हिमालयांतील प्रवासाचा आनंद आणि ह्याहीपेक्षां श्रेष्ठ तत्तत् तीर्थक्षेत्रांचें आणि देवदेवतांचें दर्शन आणि कीर्तन घडण्याचें अनायासें श्रेय लाभणार आहे.

कोल्हापूर, पंढरपूरसारखी अगदीं जवळची किंवा काशी–रामेश्वरं सारखी दूरची तीर्थयात्रा न करितांच मीं प्रथम हिमालयांतील तीर्थयात्रा केली. ह्यांचीं कारणें अशीं–शिक्षणकालानंतर पोटापाण्याच्या उद्योगास एका नवीन धंद्यानें सुरवात केली. तो धंदा आपल्या प्रांतीं अगदीं अपरिचित, त्यांत मला गुरुमुख नाहीं. स्वतःच्याच संशोधनानें तो उभा केलेला, त्यास लागणारी साधनसामुग्रीहि त्यावेळीं दुर्मिळ, अशा परिस्थितींत प्रथमावस्थेंत धंद्याचा बस बसविण्याकरितां अहोरात्र झगडावें लागलें. मध्यमावस्थेंत तो टिकविण्यासाठीं आणि नांव राखण्यासाठीं रात्रीचेहि दिवस करावे लागले, आणि उत्तरावस्थेंत काम करीत राहण्याचा स्वभावच होऊन गेला असल्यामुळें ह्या अवधींत म्हणजे तीस वर्षांत एका दिवसाचीहि स्वस्थ अशी सवड सांपडली नव्हती.

परमेश्वरकृपेनें धंद्यांत अपेक्षित यश आलें. आणि पूर्वनियोजितकालीं म्हणजे वयाच्या पंचावन्नाव्या वर्षीं धंद्यांतून बाहेर पडण्यास पाय उचलला.

ह्यावेळीं देशभर प्रवास करावा असा विचार आला. तेव्हां ठरविलें कीं, नुसता प्रवास म्हणून प्रवास नको. चैनीकरितां किंवा विलासाकरितांहि नको. तसाच तो आर्थिक लाभाकरितांहि नको. इतकें सगळें नको झाल्यानंतर पाहिजे काय हें ठरविणें ओघानेंच आलें. तेव्हां ठरविलें कीं, ज्यांत ज्ञानप्राप्ति होईल, मनाची उंची वाढेल, चित्तास शांति लाभेल, भाग्य असल्यास ईश्वरी साक्षात्कार प्रत्ययास येईल असल्या ठिकाणीं प्रथम जावें. नंतर पुढचा विचार पुढें.

तीर्थयात्रा ह्या शरीरशुद्धीपेक्षां मनःशुद्धि अधिक करणाऱ्या असतात.

त्या मनास संयम, चिकाटी, सोशिकपणा, धैर्य, निष्ठा, एकाग्रतादि अभ्यासाचे प्रात्यक्षिक पाठ रोजचे रोज नवनव्या भुलावणीनें देणाऱ्या आहेत. अशा ह्या शिक्षणाचा खराखुरा अनायासा होणारा लाभ पदरीं पाडून घ्यावा. ह्या दृष्टीनें तीर्थयात्रा करणें अधिक हिताचें असें दिसून आलें. त्यांत कोणत्या दिशेस प्राथम्य द्यावें असा विचार करितां उत्तर दिशेचा कौल आला. बालपणीं कित्येक वेळां आईबरोबर आजोळीं जाण्याची पाळी येई. तेव्हां म्हणजे सुमारें पासष्ट सहासष्ट वर्षापूर्वीं आमची परमपूज्य आजी कै. श्री. गोपिकाबाई गोखले ह्यांचे तोंडून हिमालयांतील श्रीगंगोत्तरी–बदरीकेदारादि यात्रावर्णनपर असें तें रसाळ आणि भावपूर्ण गाणें 'गंगोत्री' ऐकावयास सापडे. त्या वेळीं यात्रेंतील अनुभवहि आजी सद्गदित होऊन प्रेमळपणें आमचे आईस सांगत असत. दर खेपेस मी त्यांस बजावी कीं, 'आजी, तुम्ही पुन्हां केव्हां तिकड जाल तेव्हां मी तुमच्याबरोबर येणार, बरं का.'

बालमनावर नकळत झालेला या संस्कारामुळें हिमालयाबद्दल त्या वेळीं जो आवड उत्पन्न झाली, तिनें ह्या वेळीं इतकी उचल केली कीं, ती इतर कोणत्याच तीर्थक्षेत्रांचा विचार नांदूं देईना. इतकेंच काय पण गयेस जाऊन विष्णुपदीं पिंडदान केल्याशिवाय बदरी-नारायणास जाऊन ब्रह्मकपाटीं पिंडप्रदान करतां येणार नाहीं असा परंपरागत चालत आलेला दण्डकहि मानण्यास मन तयार होईना.

ह्या आवडीच्या निवडीस व्यवहारी विचाराची जोड मिळाली. पायांत अवसान आहे तोंपर्यंतच हिमालयांतील यात्रांचें स्वारस्य. एकदां कां तें वयपरत्वें ढासळूं लागलें म्हणजे हिमालयाचें नांव सुद्धां घ्यावयास नको. पण देशावरील यात्रांचें तसें नाहीं. कितीहि पर-स्वाधीनता आली तरी द्रव्यबल व इच्छा असेल तर कोठेंहि जाऊन येतां येईल. अशा प्रकारें हिमालयांतच प्रथम जाण्याचा बेत झाला.

एकदां हिमालयांत श्रीबदरीकेदारादि यात्रा करून आल्यानंतर तेथील गोडी प्रत्यक्षानें अनुभवास आली, आणि त्यामुळें पुन्हां तिक-डेच जाण्याची आतुरता वाढली. आणखी तीन वेळ जाऊन आलों तरी अजूनहि तिकडे जावेसें वाटतें. इतकेंच नव्हें तर आतां तिकडे जाऊन कांहीं दिवसांचा निवास करीत जावा असेंहि वाटत आहे.

तसें पाहिलें तर तिकडे खाण्यापिण्याचे हाल, जागेच्या गैरसोई, दरवेळीं चारदोनशें रुपयांचा व्यय आणि शेवटीं घरीं परत येतांना स्वतःच्या वजनांत दर खेपेस पांच दहा रत्तल वजनाची घट, असा हा देहदंड सोसून कष्टाचा प्रसाद मिळत असतांना सुद्धां, मिळणाऱ्या मानसिक आनंदाचा लाभ बहुमोल वाटतो.

हिमालयांत अशीच कांहीं जादू भरून राहिली आहे. ज्या हिमालयानें मनुष्यमात्रावर एवढी मोहिनी टाकली आहे त्याचें ओझरतें तरी दर्शन प्रथमारंभीं देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

## नैसर्गिक तटबंदी

हिमालयाची पूर्व–पश्चिम अशी १५०० मैल लांबीची उत्तर सीमा हिमगिरीच्या उंच उंच दुर्गम पर्वतरांगांनीं आणि खोल दऱ्यांनीं हजारों हजार वर्षें संरक्षित केली आहे. जर्मनीची 'सिगफरीड' किंवा फरान्सची 'मॅजिनो' ह्या अभेद्य समजल्या गेलेल्या तटबंद्या हिमालयाच्या नैसर्गिक किल्लेकोटाच्या पासंगासहि पुरणार नाहींत. हिमगिरीच्या रांगांचा दक्षिणोत्तर विस्तार पाऊणशेंपासून दीडशें मैलांवर होईल. लाखोंहि वर्षें होऊन गेलीं तरी हें बाळ अजून पूर्णपणें जन्मास आलेलेंच नाहीं. त्याची उंची अजूनहि वाढतच आहे.

अशा ह्या पर्वतराजाचा अल्पांशहि आमच्या पाहण्यांत आलेला नाहीं. तरी सुद्धां त्याची मोहिनी बसल्याशिवाय राहिली नाहीं.

हिमालय म्हटला कीं, हिंदु–मनाला एका स्वर्गीय पवित्र भूमीची कल्पना उभी राहते. आणि हीहि गोष्ट खरीच आहे. तें एक अनौपम्य मनोहारी नंदनवनच आहे. तेथील त्या भव्य नि विशाल पर्वतपंक्ति, त्यांचीं उत्तुंग हिमाच्छादित शिखरें, गगनभेदी वृक्ष, निसर्गरम्य वनश्री, अगाध जलप्रवाह, मोठमोठे धबधबे, हिमप्रवाह इत्यादि असंख्य घटना पाहून कोणास अचंबा वाटणार नाहीं ? तेथील अनेक विविध सुगंधी पुष्पें व मधुर फळें, नाना प्रकारच्या वेल–वेली, रंगीबेरंगी पानाफुलांचा झाडझाडोरा, त्यांतूनच मधून मधून मंजुळ आवाज करीत वाहणारे हिमोदकाचे निर्झर, त्याचप्रमाणें पाखरांचा स्वच्छंदी विहार आणि कूजन ह्या गोष्टी पाहून मोहित होणार नाहीं असा अरसिक कोण असणार आहे ? हिमालयाची जादू अशी आहे कीं, तेथें कोणीहि

जावो, तो सनातनी वृत्तीचा भाविक असो, नाहींतर चिकित्सक वृत्तीचा बुद्धिवादी असो, तो हिंदु असो नाहींतर 'स्वेन हेडन', 'यंगहजबंड' असो, तो तेथील दृश्यें पाहून त्या वातावरणानें भारलाच जातो.

तेथील नितांत रमणीय नि तशीच चित्ताकर्षक वनश्री मनास मोह पाडते, तर घनदाट निबिड अरण्यें आणि भव्य नि विशाल पर्वतांचीं एकापेक्षां एक उंच मेघमंडलास जाऊन भिडणारीं हिमाच्छादित शिखरें, त्याचप्रमाणें जलौघाच्या तांडवांत होणारी आदळआपट, त्याच्या घोष–प्रतिघोषानें निनादून गेलेलें वातावरण पाहतांना मनांत सादर भीति उत्पन्न होते. न कळतच हालचाल मंदावते. श्वासाचें निरोधन होऊन शब्दसुद्धां उमटत नाहीं. अशा वेळीं अंतःकरण सद्गदित होऊन जाते. जगन्नियंत्याचें अचिंत्य नि अगाध कर्तृत्व पाहून बुद्धि स्तंभितच होते. आणि कोणाचाहि आदरानें माथा आपोआप नमतो. 'आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः। आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति। श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्' अशी ही दिसून न दिसणारी निर्मिति आहे.

हिमालय हें सृष्टिदेवतेचें माहेरघरच आहे. तेथें असल्या घटना दिसल्या नाहींत तर त्या जगतांत अन्यत्र कोठें दिसणार आहेत? सृष्टिजातांत अशी कोणती निर्मिति आहे कीं जी हिमालयांत सांपडणार नाहीं? ऐहिक दृष्टीनें पाहणारास तो एक विश्ववस्तु–भांडारच दिसेल. पारमार्थिक दृष्टीनें पाहणारास तो पुण्यभूमि, तपोभूमि म्हणूनच दिसतो. शतद्रू, गंडकी, शरयू–गंगायमुनादि सप्तसिंधु, मानसादि पावनतीर्थें, कैलास बदरीकेदारादि ज्योतिर्लिंगें, तशीच बदरीनारायण, मुक्तिनारायणादि वैकुंठधामें, अशा देव–देवतांची तीर्थक्षेत्रें ह्यांच्या सान्निध्यांत आमच्याच पूर्वज ऋषिमुनींनीं, संतमहंतांनीं, साधुपुरुषांनीं व महात्म्यांनीं आपल्या तपःसामर्थ्यानें ती भूमि म्हणजे सर्वच हिमालय भारून ठेवून त्यास पुण्यभूमि वा तपोभूमि करून त्यास 'क्षेत्र' पद प्राप्त करून दिलें आहे.

नेपाळी हिमालय काय किंवा पश्चिम तिबेटी हिमालय काय ह्यांचें त्यांच्या त्यांच्या परीचें वैशिष्ट्य निरनिराळे असलें तरी त्यानें

त्याच्या वैभवांत भरच पडली आहे. नाहींतर तेवेढेंच वैगुण्य राहिलें असतें. नेपाळांत गहन म्हणतां येतील अशी निबिडारण्यें पुष्कळच आहेत. त्यामुळें तेथें सर्व प्रकारचीं श्वापदें आहेत. इतर पशू पक्ष्यांचा तो प्राणिसंग्रहालय आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. तेथील पर्वतांचे नुसते सुळकेच्या सुळके नसून त्यांचे चढउतार सुगम आहेत व त्यावर विमानतळ होण्याएवढाली पठारे मोठाली आहेत. त्यांमधील दऱ्या मोठमोठ्या असून त्या द्रोणाकार व सुपीक आहेत.

तिबेट म्हणजे तें हिमालयाचें पठारच समजावें. मानस सरोवर १५००० फूट उंचीला आहे. ही त्या भागाची सपाटी. अर्थात त्यावरील पर्वत त्यापेक्षां उंचावणारच. उंची व मनस्वी वारा ह्यामुळें तो प्रदेश दिवसेंदिवस वैराण होत चालला आहे. तेथें झाडझूड काय पण हरळीची काडीहि दिसावयाची नाहीं. तथापि तेथील शांत, गंभीर वातावरणामुळें गूढतेचें दडपण मनावर पडते आणि ईश्वरी लीलेचे सादर कौतुक वाटते.

पहिल्या खेपेस आम्ही—मी व सौभाग्यवती—श्रीयमनोत्तरी, गंगोत्तरी, तुंगनाथ, बदरीकेदार, बदरीनारायण व वसुधारा येथें जाऊन आलों. श्रीयमुनोत्तरी, गंगोत्तरी, बदरीकेदार व बदरीनारायण ह्या चारहि स्थानीं जाण्याचे जे मार्ग आहेत ते त्या त्या स्थानीं उगम पावलेल्या नद्यांचे सान्निध्यानें आहेत. त्यामुळें जातां जातां पहाडांची उंची, जलौघांचा कल्लोळ आणि पाण्याची कापसासारखी पिंजण, कांठची उंच उंच ताडमाडालाहि लाजविणारीं चीड झाडें आणि नाना तऱ्हेच्या वनस्पतींचा झाडझाडोरा दृष्टीस पडून मन दंग होऊन जाई.

'ऐशी ही निसर्गरम्य सृष्टी । देखता खिळुनी जाते दृष्टी । मना लाधते समाधान तुष्टी । विसरण्या कष्ट प्रवासाचे ' ।।

पुढें दोन वेळां नेपाळांत व एकदा तिबेटांत 'कैलास—मानस' ला गेलो होतों. ह्या दोन्ही ठिकाणच्या हिमालयाचें सविस्तर वर्णन करण्यास येथें अवकाश नाहीं. तें त्या त्या खंडांत करतां येईल.

# हिमालयदर्शन

भाग १ ला

## यमुनोत्तरी

[library stamp]

# हिमालयदर्शन



## पूर्वतयारी

श्रीयमुनोत्तरी, गंगोत्तरी, बदरी-केदार व बदरी–नारायण ही यात्रा करण्याचा विचार निश्चित झाला व त्या तयारीला लागलों. साधें मुंबईस जाऊन यावयाचें असलें तरीसुद्धा त्याची कांहीं पूर्व-तयारी म्हणून करून घ्यावी लागतेच. मग हा तर अतिशय लांबचा अगदींच अपरिचित मुलुखांतील, दुर्गम पहाड व दरीखोरीं यांतील आणि दोन अडीच महिनें काळ खाणारा प्रवास. ह्याची सर्वतोपरी माहिती उपलब्ध पुस्तकें वाचून आणि जाऊन आलेल्या लोकांच्या समक्ष भेटी घेऊन सहज मिळवितां आली. तदनुसार तयारी केली. त्याचा विस्तार येथें देत नाहीं. तो शेवटीं परिशिष्टरूपानें देईन, म्हणजे तो वाचणें ऐच्छिक राहील आणि शिवाय गरज पडेल तेव्हां तो नेमका पाहावयास सहज सापडेल.

## शुभास्ते पंथानः संतु।

निघण्याचा मुहूर्त ठरविला. तीर्थयात्रेस घरून निघतांना एक घृत-श्राद्ध करावें लागतें तें केलें. त्याचे अगोदर आप्त-इष्टमित्रांनीं पंक्तीस बोलावून 'शुभास्ते पंथानः संतु,' आशीर्वाद दिले. ह्या पाठवणीचा मला दोन प्रकारचा उपयोग झाला. कोठेंहि जावयाचें ठरविलें म्हणजे मला मोठा हुरूप येतो. मी प्रत्यक्ष तयारी करतों, शिदोरीहि बांधून घेतों, पण घरांतून प्रत्यक्ष पाय उचलण्याची वेळ आली कीं, आयत्या वेळीं ह्या ना त्या कारणास्तव बेत फिसकटवून टाकितों. ह्याचें खरें कारण म्हणजे प्रवासाची दगदग नको असते. असाच प्रकार ह्याहि वेळीं होणार होता. पण आप्तेष्टांनीं समारंभानें दिलेल्या निरोपानें मनास टोचणी लागून संकल्प पुरा करणें भागच पडलें. दुसरा उपयोग असा झाला कीं, परप्रांतांत, अनोळखी लोकांत, असहाय्य स्थितींत

असतांना आपल्या पाठीशीं आपुलकीच्या लोकांचा आणि त्यांच्या शुभेच्छांचा इतका आधार असल्याची जाणीव होऊन सुटत चाललेला धीर सावरला आणि अवसान आलें. ते प्रसंग ओघांत पुढें येतीलच.

देवाचें प्रार्थनापूर्वक दर्शन घेतलें, गोठ्यांत जाऊन गाईचे अंगावरून हात फिरविला, वडील–मातोश्रींच्या स्मृतिरूपास अभिवादन केलें, वडिलधाऱ्या मंडळींस नमस्कार केला, जमलेल्या आप्त, इष्ट–मित्रास निरोप दिला, घेतला आणि घरून निघालों.

## वियोग

उंबरठा-गड ओलांडतांना अंतःकरण भरून आल्यानें तोंडून शब्दहि फुटत नव्हता. पुण्याच्या स्थानकावर घरची व छापखान्यांतील सर्व आप्त इष्टमित्र मिळून ३०-३५ मंडळी निरोप देण्यास आली होती. गाडी सुटण्याच्या सूचनेचा ठोका पडला. इष्टमित्रांनीं सपुष्प आदरानें निरोप दिला. बंधु, भगिनी, मेव्हणे व त्यांचा सकुटुंब परिवार आणि आमचीं लहान मोठीं मुलें, सून, नातू यांस यथाधिकार नमस्कार आशीर्वाद ह्यांची देवाण घेवाण झाली. हा वियोग-प्रसंग मोठा हृदयद्रावक होता. लहान मुलांत सगळ्यांत धाकटी मुलगी अडीचच वर्षांची होती. ताटातुटीची कल्पना येऊन त्यांच्यांत चलबिचल होणार असें पाहून जेव्हां त्यांस बुध्या दृष्टिआड नेलें, त्या वेळीं अगोदरच सद्‌गदित होऊन गेलेल्या आमच्या अंतःकरणाचा ठाव सुटून त्यास अधिकच भरतें आलें आणि नेत्राश्रूंनीं सभ्यतेचा शिष्टाचारहि सोडून दिला. ह्या प्रसंगाच्या मनःस्थितीचें वर्णन ज्याचें त्यानें स्वानुभवानें करून घ्यावें. शब्दांनीं तें यथार्थ करणें माझ्यातरी आवांक्याबाहेरचें आहे. पूर्वसंकल्पित आणि स्वेच्छेचा हा वियोग-प्रसंग होता, म्हणून त्याचें पटल फार वेळ टिकलें नाहीं.

## पुणें तें हरद्वार–आगगाडीचा प्रवास

पुणें, मुंबई, हुसंगाबाद, दिल्ली, हरद्वार असा आगगाडी मार्ग ठरविला होता. मुंबई ते दिल्ली अखंड प्रवास ३० तासांत करितां येतो. परंतु एवढा ९५७ मैलांचा दीर्घ काल चालणारा एकटप्पी प्रवास स्वेच्छेनें पत्करलेला असला तरी ती एक शिक्षाच होऊन, ‘ नको हा प्रवास, ’ असें वाटूं लागतें. ही शिक्षा हलकी करण्यासाठीं अर्ध्या

श्री. शंकर स. दाते व सौ. पार्वतीबाई दाते. प्रवासांत पान ४६





कनखल – नीलधारा–भागीरथी संगमावरील घाट पान २४

हरद्वार – गंगेच्या कालव्याचे आडदरवाजे पान १०





हरद्वार विहंगम दृश्य

वाटेवर (४७६ मै.) हुसंगाबाद येथें सकाळीं प्रवास थांबवावा, यथेच्छ नर्मदा–स्नान करून शिणवठा घालवावा, मोकळेपणीं फराळ करावा, उत्तर हिंदुस्थानांतील मे महिन्याच्या ऐन उन्हाळचांत तापून निघालेल्या गाडींत हाय हाय करीत तगमगण्यापेक्षां नर्मदा–तटाकीं शीतळ छायेंत हातपाय तणावून स्वस्थ व पोटभर विश्रांती घ्यावी आणि ताजेतवाने होऊन संध्याकाळीं पुन्हां मार्गस्थ व्हावें अशी योजना आंखली होती.

मुंबईहून पंजाब मेलमध्यें जागा धरून आमचा मुलगा व सून कल्याणास पूर्वसंकेतानुसार आले. तेथें आम्ही दोघे गाडींत स्थानापन्न झालों. जागा सांपडली तेथें सामान कोंबलें. चिरंजीव, सूनबाई, नात व एक स्नेही ह्यांनीं नमस्कार करून आमची पुन्हां पुण्याचीच अवस्था करून सोडली. संध्याकाळीं ७–३० वाजतां गाडी चालू झाली. गाडींत गर्दी मनस्वी होती. अवघडून बसावें लागलें होतें. त्यांत रात्रीची वेळ ! डोळ्यावर अनावर झोप लोंबली होती. पण डोकें खिडकीच्या कडेवर टेकीन म्हटलें तरीसुद्धां वाव नव्हता. मग ताटकळलेल्या हातापायास लांब करण्याची गोष्टच कशाला ? अशा ह्या सतावलेल्या अवस्थेंत 'खुषीच्या सक्तीनें' रात्र काढावी लागली. हुसंगाबाद येथें सकाळीं ६–३० वाजतां उतरलों. स्थानकाच्या बाहेरचे अंगास एका पान–तंबाखूवाल्याच्या दुकानीं सामान ठेवून टांग्यानें चार आणे भाडचांत नर्मदाघाटावर गेलों. तो प्रशस्त असून त्यावर धर्मशाळाहि तशीच आहे. नर्मदेचें पात्र विस्तृत असून तेथें डोह आहे. पाणी स्वच्छ व वहातें आहे. घाटावर झाडांची सावली आहे. येथें प्रवास खंडित केला. त्याचें फळ अपेक्षेप्रमाणें मिळालें. रात्रीचा शिणोठा गेला आणि झोपेकरितां त्रस्त झालेलें डोके शांत झालें. संध्याकाळीं ६–३० वाजतां ग्रँड ट्रंक एक्सप्रेसनें पुढें निघालों. गाडींत आदल्या दिवसापेक्षांही जास्त गर्दी होती. पुढचें स्थानक भोपाळ आलें. तेथें वर्ग बदलून इंटरनें प्रवास केला. पैसे अधिक पडले पण मोबदला योग्य मिळून प्रवास विनायास झाला. सकाळीं सात वाजतां दिल्लीस पोहोंचलों. महाराष्ट्र स्नेह–संवर्धक मंडळांत उतरलों. इतर सोय बरी वाटली, पण पाण्याचें दुर्भिक्ष फारच जाणवण्यासारखें होतें.

दिवसभर टांग्यानें हिंडून कुतुबमिनार, व लाल किल्ल्यासुद्धां दिल्ली शहर पाहिलें. रात्रीं १०-३७ वाजतां डेहराडून पर्यंत न बदलाव्या लागणाऱ्या गाडीनें निघून हरद्वार येथें सकाळीं ७ वाजतां येऊन पोहोंचलों. दिल्लीहून निघतांना ही गाडी इतकी खच्चून भरून गेली होती कीं, तिसऱ्या वर्गाचीं तिकिटें संध्याकाळपासूनच बंद झालीं होतीं. आम्हीं आपलीं इंटरचीं करून घेतलीं. त्याचा लाभ मात्र उलटा झाला. तितक्याच दाटीचा त्रास अधिक पैसे स्वेच्छेनें देऊन मुकाटयानें सोसणें आले. ह्या दाटींत फुकटच्या प्रवाशांची अरेरावी फार!

मुंबई ते दिल्ली प्रवास जसा जी. आय. पी. गाडीनें करितां येतो तसाच तो जवळ जवळ तितक्याच खर्चांत व वेळांत बी. बी. सी. आय. गाडीनेंहि करितां येतो. दिल्ली ते हरद्वार अजमासें १७० मैल आहे. तेथें जाण्यास औंध रोहिलखंड व नॉर्थ वेस्टर्न अशा दोन निरनिराळ्या गाड्या लागतात. वाटेंत सहारणपूर व लक्शर अशा दोन ठिकाणीं गाड्या बदलाव्या लागतात. बदलाव्या लागणाऱ्या गाडीनें जाण्यापेक्षां थेट डेहराडूनपर्यंत जाणाऱ्या गाडीनें जाणें अधिक सोयीचें आहे. त्यांत गाडी बदलण्याचा त्रास नाहीं पण दाटीचा त्रास बारमहा इतका असतो कीं, तो सांगतां येत नाहीं. अलिकडे आपल्याकडील 'स्टेट ट्रन्सपोर्ट सर्व्हिस' प्रमाणें दिल्ली हरद्वार अजमासें १२५ मैलाची मोटार सर्व्हिस चालू आहे. तींतून जाण्यास भाडें अधिक पडतें पण वेळ वांचतो व दाटीचा त्रास चुकतो. तथापि आपणास पाहिजे तेव्हां मोटारचीं तिकिटें मिळतील किंवा नाहीं हें नशिबावरच अवलंबून राहणार!

## हरद्वार

हरद्वार येथें स्थानकावरून गांवांत जाण्यास टांगे, ओझेवाले व ढकलगाड्या मिळतात. गांव अगदीं जवळ आहे. टांग्यापेक्षां ओझेवाल्याकरवीं सामान नेणें सोयीचें आहे. एकतर सर्वच गल्ल्यांत टांगा घरापर्यंत जाऊं शकत नाहीं; आणि दुसरें असें कीं, टांग्यांतील सामान घरांत आणावयाचें किंवा वेळप्रसंगीं माडीवर न्यावयाचें झालें तर त्या वेळीं पुन्हां ओझेवाले शोधावयास कोठें जावयाचें?

गांवांत जाण्यासाठीं आम्हीं ओझेवाले ठरविले. पंड्यांनीं आमचे

भोंवतीं गराडा घालून 'कहांके रहिनेवाले' चा मारा चालविला. आम्हीं त्यांस दाद दिली नाहीं. पण कोठें उतरावयास जावयाचें, ह्या ओझेवाल्यांच्या प्रश्नास आम्हांस कांहींच उत्तर देतां येईना. आम्हांस हरद्वारची माहिती होती कोठें ? आम्हीं त्यास म्हटलें घाटावर चल. त्यानें ढकलगाडींत सामान भरलें. आम्ही निघालों. चालतां चालतां गांवांत धर्मशाळा किती आहेत ? स्वच्छ व सोयीच्या कोणत्या आहेत ? दक्षिणी लोकांची एखादी आहे काय ? ते लोक कोठें उतरतात ? वगैरे प्रश्न विचारून माहिती काढली. त्यांत कळून आलें कीं कुशावर्तावर देवी अहिल्याबाईचा वाडा आहे. व त्याला लागूनच वे. शा. सं. बाबूशास्त्री वाशीमकर ह्यांची संस्कृत पाठशाळा आहे. त्या दोन्ही ठिकाणीं जागा मिळते. दक्षिणी लोक नेहमीं येथेंच उतरतात. एवढ्या वेळांत आम्ही अहिल्याबाईचे वाड्याजवळ येऊन पोहोंचलों. आंत जाऊन पाहिलें तो वाडा चौसोपी असून त्यापुढें उघड्या पडव्या आहेत. मध्यें अंगण असून त्याच्या मधोमध एक लहानसें महादेवाचें खाजगी देऊळ आहे. कांहीं दक्षिणी यात्रेकरु बायका येथें उतरलेल्या दिसल्या. त्या वेळचे तेथील वहिवाटदार श्री. वांबुरकर ह्यांची गांठ घेतली. त्यांनीं आम्हांस एक खोली दिली. तेथें आमची सोय लागली. हा वाडा अगदीं गंगा कांठावर आहे. आंतल्या आंत गंगेवर जातां येते. तेथें ह्यांचाच फरसबंदी घाट आहे. वाड्यांत पाण्याचे नळ व शौचकूपहि आहे. बाबूशास्त्रींची जागा ह्या जागेपेक्षांहि चांगली आहे. पण तेथें उघडे शौचकूप आहेत. त्याची संवय नसल्यामुळें प्रशस्त वाटत नाहीं.

आमच्या पोहोंचण्याच्या दुसऱ्याच दिवशीं पुण्याचे श्री. नानासाहेब खाजगीवाले सहकुटुंब ह्याच वाड्यांत येऊन उतरले. त्यांच्या संगतीचा आम्हांस अनायासें चांगला उपयोग झाला. समानशील स्नेह्यांचा सहवास असल्याशिवाय खरा आनंद उपभोगता येत नाहीं.

हरद्वार हें संयुक्त प्रांतांतील सहारणपूर जिल्ह्यांत एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. एका बाजूस भागीरथी व दुसऱ्या बाजूस 'मनसादेवी' टेकडी, ह्यांच्यामध्यें सुमारें एक मैल लांब व एक फर्लांग रुंद असें तें गंगाकांठीं वसलें आहे. स्थानकापासून तें एक मैलाचे आंतच आहे.

यात्रेकरूंस उतरण्यासाठीं येथें मोठमोठ्या व सोयीस्कर पुष्कळ धर्मशाळा आहेत. त्यांत रहाण्याबद्दल भाडें पडत नाहीं. गांवांत नळ व विजेचे दिवे आहेत. वस्ती स्वच्छ आहे. गांवांत गंगेस समांतर असा एकच एक मोठा रस्ता असून त्याच्या दोनहि बाजूनें आडव्या उभ्या अशा त्यास पूरक गल्लच्या आहेत. त्यांतूनच लोकांचीं घरें व धर्मशाळा आहेत. मोठ्या रस्त्याच्या दोनहि अंगें दुकानें आहेत. हीच येथील मुख्य बाजारपेठ. येथें सर्व तऱ्हेचे जिन्नस पुण्याप्रमाणेंच चांगले व योग्य भावानें मिळतात. दहीं, दूध, तूप, भाजीपाला, फळंफळावळ विपुल. तीं ताजीं व स्वस्तच मिळतात. हें पाहून ह्या बाबतींतलें महाराष्ट्राचे वांटयास आलेलें दुर्भिक्ष चटकन लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. सुती व लोकरी कापड, भांडेकुंडे वगैरे यात्रेस लागणाऱ्या हर जिनसा येथें उत्तम, स्वस्त व सोयीच्या मिळतात. धरून निघतांना प्रवासोपयोगी जिन्नस आपण विकत घेतों ते सर्व येथेंच घ्यावेत, म्हणजे वहातुकीचा अकारण खर्च, संभाळण्याची व बरोबर वागविण्याची उगीचच अडचण, आदळआपटीनें होणारी नासधूस, हे सर्व प्रकार वांचतील आणि शिवाय प्रवासांतील यातायात व जोखीमहि कमी होईल.

श्रीगंगोत्री, बदरीनारायणादिकांच्या महायात्रेच्या वाटेवर हिमालयांत जीं अनेक लहानमोठीं तीर्थक्षेत्रें आहेत त्यांत हरद्वार हेंच पहिलें लागतें. पुढच्या प्रवासाचा प्रारंभ येथूनच होत असतो. हिमालयाची धूळभेट येथेंच होते, आणि त्याच्या चढणीस सुरवातहि येथपासूनच होते. बदरीनारायणास जाऊन ब्रह्मकपाटीं अक्षय्य पिंडदान करण्यापूर्वीं येथें कुशावर्तावर पिंडश्राद्ध करून मगच निघावें लागतें. ह्या सर्व कारणामुळें हरद्वारला अग्रपूजेचा मान प्राप्त झाला आहे. शंकराच्या मस्तकावरून भगीरथ राजऋषीच्या मागोमाग जाण्यासाठीं उड्या घेत, मोठ्या वेगानें धांवत निघालेली गंगा येथेंच हरीच्या पायरीशीं स्थिरावून आबालवृद्ध स्त्रीपुरुष भक्तजनांच्या स्नानपानादि इच्छापूर्तीकरितां संथप्रवाही होऊन राहिली आहे.

## हरद्वार, हरिद्वार, वा गंगाद्वार.

हरद्वारास हरिद्वार व गंगाद्वार अशींहि नांवें आहेत व तीं सार्थ

आहेत. हरद्वारास जें एवढें मोठें क्षेत्र–माहात्म्य प्राप्त झालें आहे तें केवळ भागीरथीमुळेंच होय.

दग्ध होऊन भस्मीभूतावस्थेंत पडलेल्या आपल्या पितरांचा उद्धार स्वर्गंगेच्या स्पर्शानें होणार आहे, म्हणून पितृनिष्ठ भगीरथ राजानें महान् तपश्चर्या करून स्वर्गंगेस प्रसन्न केली आणि पृथ्वीवर अवतरण्यास तिची अनुमति मिळविली. तिच्या अवतरण्याच्या आघातानें पृथ्वी शतशः भंगून जाईल म्हणून त्या दीर्घोद्योगी भगीरथ राजानें पुन्हां महान् तप करून कैलासाधिपति शंकरास प्रसन्न केलें. शंकरांनीं गंगेचा आघात मस्तकीं धारण करण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें गंगा पृथ्वीवर तर आली. पण ती शंकराच्या मस्तकावरील जटाभारांत गडप होऊन गेली. तेव्हां त्या कृतनिश्चयी राजानें पुन्हां शंकराची आराधना करून गंगेची सुटका करून घेतली. ती बाहेर पडली ती सात धारांनीं. त्यांतील एक भगीरथाच्या मागोमाग गेली तीच भागीरथी. (बाकी सहाः—सिंधू, शतद्रू, यमुना, शरयू, गंडकी, ब्रह्मपुत्रा ).

## नांवांची सार्थ उपपत्ति

ह्या स्वर्गंगावतरण कथेचें वास्तविक स्वरूप असें म्हणतां येतें कीं, हिमालय हेंच त्या परमेश शंकराचें अखंड रूप, 'स्थावराणाम् हिमालयः. ' त्यांतील प्रचंड पहाडांत, दीर्घ दऱ्याखोऱ्यांत आणि घनदाट अरण्यांत म्हणजेच शिपिविष्टाच्या जटाजुटांत पाऊस, बर्फ, गारा रूपानें एकवेळ अवतरणारी स्वर्गंगा गडप होऊन जावी हें अगदीं स्वाभाविक आहे. तेथून तिची सुटका होऊन ती बाहेर यावयाची म्हणजे हिमालयाच्या शिखर भागांतून पायथ्याच्या सपाट प्रदेशांत उतरावयाची. हिमालय–पायथ्याच्या भागांतील ज्या डोंगर खिडींतून ती बाहेर पडते ती खिड म्हणजेच द्वार, तें 'गंगाद्वार'. खिडीच्या उजव्या अंगची टेकडी ' मनसादेवी ' आणि डाव्या अंगची टेकडी 'चंडीदेवी'. गंगाप्रवाहानें आपल्या पात्राकरितां ही खिड दोन तीन मैल रुंदावून द्वार प्रशस्त करून तराईच्या सपाटीस आणलें आहे.

हर म्हणजे शंकर, आणि हिमालय हेंच शंकराचें रूप. त्याच्या पायथ्याच्या द्वारांतून बाहेर येते म्हणून ' हरद्वार. '

हिमालयाच्या पायथ्याच्या भागास तराई म्हणतात. हरद्वार तराईंतच गंगाकांठीं आहे. खिंडीतून बाहेर पडणार त्या ठिकाणीं म्हणजे मनसादेवीच्या पायथ्याजवळ पात्रांत एक भलें मोठें, शेंपन्नास माणसें एकाच वेळीं स्नान करतील असें कुंड आहे व त्याचे कांठावर हरीचें मंदिर आहे. ह्यास ' हरीची पायरी ' असें म्हणतात. हरीच्या पायाजवळ उतरून आली म्हणून ' हरिद्वार ' अशी ही तीनहि नांवांची उपपत्ति लागते.

गंगेचा उगम ' गोमुखा ' पासून असतांना तो त्याच्या अलीकडे अठरा मैलावर ' गंगोत्री ' येथेंच मानला जातो. कारण गोमुखापर्यंत जाण्यास अवघड व धोक्याच्या वाटांचे कष्ट अतिशय आहेत. त्याच दृष्टीनें हरद्वार हें सपाट प्रदेशांतील गंगेचें उगमस्थान मानलें जाते.

### विश्वोद्धर्त्री भागिरथी

आपले साठ हजार पुत्र—म्हणजेच प्रजा पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळें मरण पावलेले आहेत, हें पाहून प्रजावत्सल भगीरथ राजानें तें दुर्भिक्ष नाहिंसें करण्यासाठीं महातपानें म्हणजे महाप्रयासानें ती स्वर्गंगा आपणास पाहिजे तेथें आणली. अगदीं त्याचप्रमाणें आधुनिक कट्टर प्रयत्नवादी भगीरथानें अचाट कल्पना लढवून हरद्वार येथें गंगा पात्रांतून बंदिस्थ प्रवाह बाजूस काढून तो ' मनसादेवी ' टेकडीच्या पायथ्यानें गांवसीमेजवळ आणला आहे. तेथें त्यास अडदरवाजे बसवून त्यापुढें त्याचें रूपांतर कालव्यांत केल्यामुळें नरहरी कवि म्हणतात त्याप्रमाणें:— ' कुदेश असतां गंगागमनें सुदेश अवघे झाले । '

ह्या बंदिस्थ प्रवाहाचें पाणी मर्यादेबाहेर वाढलें तर तें पात्रांतून आपोआप बाहेर निघून जाण्यासाठीं बांधलेल्या कमानी ' हरीच्या पायरी ' समोर पलिकडचे कांठीं सहज दिसून येतात. हा प्रवाह मर्यादित असला तरी त्याचें पात्र आपल्याकडील मोठ्या नद्यांच्यापेक्षांहि मोठें व नेहमींच दुथडी भरून चाललेलें असतें. गंगेचा अवशेष प्रवाह तिच्या स्वाभाविक पात्रांतून ' चण्डीदेवी ' टेकडीच्या पायथ्यानें जातो. ह्या प्रवाहाचें पात्र तर फारच मोठें म्हणजे एक मैलापेक्षांहि मोठें येईल. गंगेस पूर नसतो त्या वेळीं त्यांतील प्रवाह अगदींच रोडावलेला असतो आणि त्यामुळें सबंध पात्रभर उघडें वाळवंटच दिसतें.

गंगेस प्रतिवर्षी दोनदा पूर येतात. एक उन्हाळी पूर, बर्फ वितळून झालेल्या पाण्याचा व दुसरा पावसाळी पूर, पावसाचे पाण्याचा. पहिल्यापेक्षां दुसरा मोठा असतो व त्याचें पाणी रेंदाड असतें. पण उगमापासून हरद्वारपर्यंत दीडशें मैलाचा धांवता प्रवाह आणि त्यांतच उगमाच्या चौदा हजार फूट उंचावरून हरद्वारच्या एक हजार फूट सपाटीपर्यंतचें आदळआपटीचें अवतरण होऊनसुद्धां उन्हाळी पुराचें पाणी ऐन उन्हाळ्यांत दांतांत कळा करण्यासारखें गार ठणक आणि स्फटिकासारखें स्वच्छ व पारदर्शक कसें रहातें ह्याचें आश्चर्य वाटतें

## गं गा घा ट

वळवून आणलेल्या प्रवाहाच्या काठानेंच हरद्वार गांव वसलें आहे. गांवास लागूनच गंगेस एक फार मोठा ५००'×१००' घाट बांधलेला आहे. तो दगडाऐवजीं विटांनींच बांधलेला आहे. तिकडील विटा दगडासारख्या कठीण, एकजीवी, रेखीव व न्यहार असतात. त्या झिजलेल्या दिसतील पण कोठेंही चिरटलेल्या किंवा कपरा उडलेल्या आढळणार नाहींत. घाटावर अलिकडे बिर्ला शेटजीनें एक उंच व भव्य मनोरा उभारला आहे. त्यावरील घड्याळाचे पाव तासाचे ठोके घाटभर ऐकूं येतात.

या गंगाघाटास पाण्यांत तीनच पायऱ्या आहेत. पाण्यास इतकी मनस्वी ओढ होती कीं, कांठाशीं बसविलेल्या साखळदंडास घट्ट धरल्याशिवाय गुडघाभर पाण्यांत दुसऱ्याच पायरीवर जाणें म्हणजे गंगास्नानाऐवजीं गंगार्पण होण्याची पाळी ( स. १९३५ ). परंतु अलिकडे पात्रांत गोटे टाकून पाण्याची ओढ सर्वस्वी काढून टाकली असल्यामुळें कमरेइतक्या पाण्यांत निर्धास्त जाऊन बुड्या मारुन यथेच्छ स्नान करण्याची सोय झाली आहे ( स. १९४१ ).

गंगाघाटावर तोंडाशींच सकाळ संध्याकाळ पानाफुलांचा बाजार भरतो. येथें सर्व प्रकारच्या गुलाबाचीं ताजीं टवटवीत फुलें पाट्याच्या पाट्या येतात व तीं अति स्वस्तहि मिळतात. एक हजार फुलें आम्हास सव्वा रुपयांत मिळालीं ( स. १९३९ ).

## ह री ची पा य री


गंगाघाटावर 'हरीची पायरी' आहे. तेथें एक मोठें कुंड आहे.

त्या कुंडांतून गंगेच्या प्रवाहाचा एक ओघ सतत वहात असतो. त्यामुळें कितीहि मंडळींनीं त्यांत स्नानें केलीं तरी पाणी स्वच्छच रहातें. गंगास्नान, तिचें पूजन, अर्चन, काय करावयाचें असेल तें सर्व हरीच्या पायरीवर करतात. कुंडांतील पाण्यास पूर्वींहि ओढ नव्हती. कुंडाच्या कांठीं गंगेचें लहानसें देऊळ आहे. प्रत्यहीं सकाळ संध्याकाळ केव्हांहि पहावें तों सर्व घाट यात्रेकरूंनीं गजबजून गेलेला असतो. संध्याकाळीं तेथें होणाऱ्या आरत्यांचा सोहळा पाहण्यासारखा असतो. गंगाघाटाच्या वरचे बाजूस 'कुशावर्त' आहे. तेथें तीर्थविधि–क्षौर पिंडदान करतात. घाटावरहि क्षौराकरितां वीस पंचवीस हंगामी चौके नापिकांनीं उभारले आहेत.

गंगेचा प्रवाह अत्यंत लहरी असतो. हिमालयांत तिच्या लहरीपणास डोंगरांमुळें आपोआपच आळा बसलेला असतो म्हणून तिचा उपाय चालत नाहीं. पण सपाट प्रदेशांत तिचे लहरी खेळ चांगलेंच प्रत्ययास येतात. अलाहाबाद, कानपूर, ब्रह्मावर्त येथें तिचें पात्र मैल दीड मैलापेक्षांहि अधिक रुंदावलेलें आहे. आणि त्यांत तिचा प्रवाह यंदा या कांठीं तर पुढल्या वर्षीं त्या कांठीं; म्हणजेच मैलभर रेताड वाळू तुडवीत जावें लागतें. ह्या अनिश्चितीमुळें तिच्या कांठीं घाटांचा उपयोग होतच नाहीं. ह्या लहरी प्रवाहाचा ताप हरद्वारास बंदिस्थ प्रवाहाच्या योजनेमुळें कायमचाच चुकला आहे. आणि त्यामुळें गंगाघाटावर बारमहा सारखें पाणी रहातें.

### गंगेचें माहात्म्य

यच्चयावत् हिंदुमात्रास भागीरथी गंगेचें पावित्र्य पराकोटीचें वाटत असतें. आणि म्हणूनच एकदां तरी तिचें स्नान, दर्शन, पूजन घडावें अशी प्रत्येकाची मनापासूनची तीव्र इच्छा असते. जों जों तिच्या उगमाकडे जावें तों तों तिचें पावित्र्य आणि शुद्ध स्वरूप अधिकाधिक वाटावें हें साहजिकच आहे. ह्या दृष्टीनें प्रयाग, काशी येथें भागीरथी असली तरी हरद्वार येथील ती श्रेष्ठच ठरते. शिवाय हरद्वार ही तपोभूमि, योगतीर्थ आहे. अनेक तपस्वी, ऋषि-मुनींच्या वास्तव्यानें हरद्वारचे पावित्र्यांत भर पडली आहे. उगमाशीं जाऊन तिच्या परमोच्च स्वरूपांत स्नान करून पुनीत होण्याचा योग कितीहि




ऋषीकेश – लक्ष्मण झूला समोरून पान ३७



ऋषीकेश – त्रिवेणी घाट पान ३८



हरद्वार – गुरुकुल पान २७



हरद्वार – ऋषीकुल पान २७

इच्छा असली तरी प्रत्येकाच्या आवांक्यांत असतो असें नाहीं. कोणाचें शारीरिक तर कोणाचें मानसिक दौर्बल्य, कोणास सांपत्तिक अननुकूलता, तर कोणास वेळेचा अभाव, कोणास कौटुंबिक अडचण तर कोणास सोबत संगतीची गरज, एवंच ह्या ना त्या कारणानें इच्छा असूनसुद्धां तिला मुरड घालावी लागते. निरुपायानें हिरमुष्ठे झालेले असे लोक स्वस्थ न बसतां तितक्याच आतुरतेनें गंगाभेटीस हरद्वार येथें येऊन मनाचें समाधान करून घेतात.

### धार्मिक पण भेदातीत संमेलन

हरद्वार येथें हिंदुस्थानांतील चारहि दिशांचे निरनिराळ्या प्रांतांतून येणाऱ्या यांत्रिकांत पंजाबी, सिंधी, काश्मिरी, पुरभय्ये, बंगाली, रजपूत, मारवाडी, गुजराथी, दक्षिणी, द्रावीड, तेलंग, मद्रासी, कर्नाटकी, म्हैसुरी वगैरे सर्व अठरा पगड जातीचे व पंथाचे हिंदु-स्त्री व पुरुष मोठ्या निष्ठेनें आलेले असतात. लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, विद्वान्-अविद्वान्, स्पृश्य-अस्पृश्य हा भेद तर येथें दिसत नाहींच, पण उपास्य आणि उपासना भेदामुळें उत्पन्न झालेले व एरव्हीं एकमेकांच्या वाऱ्यासहि न उभे रहाणारे पंथ आणि त्यांचा कट्टरपणा येथें यत्किंचितसुद्धां दिसून येत नाहीं. शैव असो, वैष्णव असो, कृष्णपूजक असो वा शाक्त असो, रामदासी असो वा नाथपंथी असो, ब्रह्मसमाजी, आर्यसमाजी, प्रार्थनासमाजी वा थिऑसफिस्ट असो, ही सर्व मंडळी कोणत्याहि धार्मिक कार्यासाठीं कधींहि एकत्र आलेली दिसावयाचीसुद्धां नाहींत. पण श्रीगंगामाईचें वैभवच असें अलौकिक आहे कीं, ती सर्व मंडळी एकाच हेतूनें प्रेरित होऊन मोठ्या उल्हासानें व निःसंकोच वृत्तीनें येथें घाटावर प्रत्यहीं शेंकड्यांनीं येत असतात. गंगास्नानाच्या पुण्य व पवित्र कर्मांत कसलाहि भेदाभेद आड येऊं नये असा प्रभावी महिमा 'श्रीभागीरथी गंगा' इच्याशिवाय अन्य कोणत्याहि लहान मोठ्या देवतेच्या भाग्यास आलेला दिसत नाहीं. हरद्वार येथें सकृद्दर्शनींच भागीरथी गंगेचें वैभव आणि माहात्म्य दिसून येतें.

### भजन-पूजन सोहळा

दुथड्या भरून चाललेल्या गंगेचें अफाट पात्र, त्यांतील भिंगा-

सारखें निर्मल आणि स्वच्छ पाणी, त्याची निमिषमात्रहि दृष्टि न ठरूं देणारी वेगवती वहाळ पाहून मी तर थक्कच झालों. कांठावरील पात्रास शोभेसा प्रशस्त घाट त्यावर प्रत्यहीं सकाळ संध्याकाळ गंगा-भेटीकरितां लोटणारा जनसंमर्द पाहून तिजविषयींचा पूज्यभाव दुणा-बला. घाटावर नित्य सायंकाळीं चालणारीं कथा–कीर्तनें, पुराण–प्रवचनें, भजन–पूजन, प्रवाहांत सोडलेल्या दीपात्र्या ( एका ओल्या पानाच्या वीतभर औरस चौरस द्रोणांत पत्रें, पुष्पें घालून त्यामध्यें वात लावलेली ) इत्यादि प्रकारांनीं भक्तिभावानें दरवळून सोड-लेल्या वातावरणानें हृदय भरून आलें. ह्या सर्व दृश्यांचा परिणाम असा झाला कीं, दुसऱ्याच दिवशीं पुढें जावयास निघणाऱ्या ओळ-खीच्या लोकांची पूर्वनियोजित सोबत सोडून देऊन आम्हीं चार दिवस येथेंच रहाण्याचें ठरविलें. असें वाटलें कीं, गंगामाईचें स्वरूप येथेंच काय कमी शुद्ध व पवित्र आहे म्हणून उगमाशीं आजच गेलें पाहिजे ? एवढा लाभ तरी आजपर्यंतच्या आयुष्यांत कधीं मिळाला आहे ? चार दिवस तिन्ही त्रिकाळ स्नानसंध्यादि करून मनाचें समा-धान झालें. गेल्या चाळीस वर्षांत माध्यान्ह संध्या सुटली होती. तिची ह्या वातावरणांत पुनरावृत्ती झाली. त्याच चार दिवसांत मनसादेवी, चंडीदेवी, बिल्वकेदार, नीलधारा, हरितालिका, कनखल पाहून आलों. चंडीदेवी व मनसादेवी ज्या टेकड्यावर आहेत त्यांच्याविषयींची माहिती मागें आलीच आहे.

## बिल्वकेदार व हरितालिका

बिल्वकेदार हें एक मैलावर रानांत महादेवाचें लहानसें देऊळ आहे. भोंवतीं बेलाचीं झाडें पुष्कळ आहेत. त्यांत हरितालिकेचे एक देऊळ आहे. तेथें असलेल्या कुंडाच्या कांठीं सखी व पार्वती ह्यांच्या तपश्चर्या करीत बसलेल्या हात उंचीच्या मूर्ति आहेत. हरद्वार येथील सुवासिनी भाद्रपद मासांतील करावयाचें हरितालिका–पूजन येथें येऊन करितात. बिल्वकेदार व हरतालिका हीं दोन्हीं स्थानें हरद्वारपासून जवळ असून निसर्गरम्य व शांत आहेत.

## मौनीबाबांची गुहा

बिल्वकेदार महादेवाचे देवळासमोर वीस पंचवीस पावलांवर एक

टेकडी आहे. तिच्या सरळ उभ्या खडकांत जमिनीपासून सुमारें दोन पुरुष उंचीवर एक गुहा दिसते. वास्तविक तें एक माणसाचें बीळ म्हटलें तर अधिक शोभेल. तेथें जाण्यायेण्यास किंवा चढण्याउतरण्यास वाट नाहीं. पण त्याच्या तोंडाशीं बाहेरचे बाजूस झाडाच्या एका मुळीस खालीं कंबरेपर्यंत पोहोंचेल अशी एक जाड दोरी बांधून ठेवलेली दिसली.

तिबेटांत तकलाकोटचे आसपासचे डोंगरांत उंच दुर्गमस्थानीं अशा बिळासारख्या गुहा दिसल्या होत्या. गुरुजी आपल्या अधिकारी शिष्यास त्यांचा अघोरपंथी योगाभ्यास पुरा होईपर्यंत असल्या गुहांत कोंडून ठेवितो, असें ऐकलें होतें. तसाच कांहीं प्रकार आपल्याकडेहि आहे कीं काय, ह्या जिज्ञासेनें दोरीस धरून वर चढून आंत पाहिलें. वाटलें तितकें सोपें तें काम नव्हतें. तें एक साहसच झालें. हात काचून जाऊन पडण्याची भीति वाटत होती. पण निभावलें.

ही गुहा अजमासें तीन फूट रुंद व तितकीच उंच व पांच सात फूट लांब असून तिच्या तोंडाची रुंदी दोन अडीच फूट आहे. ह्या गुहेंत माझ्यासारख्या माणसास पद्मासन घालून ताठ बसतां सुद्धां आलें नसतें. नेहमीं शवासनींच तपश्चर्या करावी लागली असती. गुहेंत एक चटई पसरलेली होती. आंत एक कांबळा व एक कमंडलू एवढेंच सामान दिसलें. गुहेच्या खालीं जमिनीवर येरझाऱ्या घालीत असलेले मध्यम उंचीचे, वाटोळचा चेहेऱ्याचे, नाक लांब व सरळ, डोळे मध्यम व पाणीदार, मुद्रा शांत व प्रसन्न आणि दाढीमिशा व जटा ह्यामुळें भव्य, निमगोरे, अंगांत पायघोळ कांबळ्याची कफनी, हातांत स्मरणी असलेले एक बोवा दिसले. त्यांचे जवळ जाऊन त्यास नमस्कार केला. त्यांचें नांव गांव विचारलें. त्यांचें लक्ष नव्हतें म्हणून असो, किंवा माझी बोली त्यांस समजली नाहीं म्हणून असो, त्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. चेहेरेपट्टीवरून ते महाराष्ट्रीय असावे असा तर्क होता. उत्तर दिलें नाहीं म्हणून मीं तोच प्रश्न हिंदींत व मग इंग्रजींतहि विचारून पाहिला. त्यांचीच ती गुहा असावी अशा समजुतीनें अनधिकारानें आंत डोकावून पाहिल्याबद्दल खेद प्रगट केला. पण ते बोवाजी कांहींच बोलेनात. म्हणून मीं तो नाद सोडून दिला.

बिल्वकेदारची वृद्ध गुर्वीण देवळांत होती. तिला ह्या बोवाजींची माहिती विचारली. तिनें सांगितलें कीं, " ये बाबाजीका नाम और गांम, कोन देशका रहिनेवाला, और उनकी जात मुझे बिलकूल मालूम नहीं । वो किसकी साथ बातचित नहीं करते। वो क्या बोलनेको असमर्थ है अथवा मौनव्रतधारी है, ये मै नहीं जान सकती । मुझे इतनाही ख्याल है कि, ये किसीकी साथ कभी बातचीत नहीं करते। ये बाबाजी यहां तो बहुत दिन ठैरा हुवे है। ये रोटी, चावल और फलफलावलको स्पर्शही नहीं करते । लेकिन दुग्धपान करके गुजराणा करते है। दुग्ध मंगानेके लिये इधर उधर कोई स्थानपर जातेही नहीं । भगवानकी कृपा है, तुमारे सदृश्य कोई धर्मात्मा यहां आकर उनको दूध देता है । "

अशा स्थितींत रहाण्याचा ह्या बाबाजींचा हेतू काय ? त्यांची साधना कसली व कशाकरितां चालू आहे ? हे कोठले राहाणारे असावे ? वगैरे गोष्टींचा छडा लावण्याची इच्छा झाली. पण दुसरेच दिवशीं पुढें कूच करण्याचा बेत ठरलेला असल्यामुळें सवड राहिली नव्हती. त्यांस देणेसाठीं एक शेर दूध आणून गुर्विणीनें दाखविलेल्या लोटींत ओतून ठेविलें. ह्या मौनीबाबास न मागतां रोज दूध आणून कोण देतो ह्याचें आश्चर्यच वाटलें होतें. पण तसें वाटण्याचें कांहीं कारण आहे असें आतां अनुभवांतीं वाटत नाहीं.

श्रीमुक्तिनारायणाचे यात्रेंत थोडा आडमार्ग करून आमच्यापैकीं आम्ही आठजण गंडकीस्नानाकरितां ' रेडी ' क्षेत्रीं गेलों होतों. तेथें पोहोंचण्यास उशीर झाल्याकारणानें तेथें संध्याकाळची वस्ती करावी लागली. जेवण करण्यासाठीं दुकानदाराकडून शिधा सामान, भांडीं घेतलीं. रात्रीं भांडीं परत द्यावयाचीं व पैसे चुकते करावयाचे. पण दुकान लागलें. सकाळीं निघण्यापूर्वीं भांडीं परत करून पैसे द्यावयास लागलों असतां दुकानदार ते घेईना.

तो म्हणाला:— सवार होकार जो आपका साथी कल शाम यहां आया, उन्हे उसही बखत मेरा दाम पुरापूर दे दिया है ।

आम्हीं त्यास सांगितलें कीं, आमच्यापैकीं कोणीहि घोड्यावर आलेलों नाहीं. आठहि जण हे येथें आहों. आम्हीं कोणीहि पैसे दिलेले

नाहींत, म्हणून आम्ही देतो. ते घेण्यास तुला कांहींच हरकत नाहीं.

तो म्हणाला:— मै दुबार कैसा लेवूं ?

आम्हीं म्हटलें कीं तूं त्याचे त्यास परत दे.

तो म्हणाला:—मैंने उनको कभी देखाही नहीं, तो उनको मुझे जानपछान कैसी होगी ?

आम्ही निरुपाय होऊन परतलों आणि उतरलों होतों त्या धर्मशाळेंत एक बैरागी रहात होता त्यांकडे गेलों. त्यास घोड्यावरून गेलेल्या माणसाची माहिती विचारली.

तो म्हणाला:— बिमार होनेसे मै पंधरा दिनके उपर यहां ठहरा है, फिर मैंने ऐसा अदमी देखाही नहीं ।

त्यास म्हटलें कीं तूं हे पैसे घेऊन ठेव व तो भेटला म्हणजे त्यास दे.

तो म्हणाला:— मुझे वो कभी मिलेगा ? और वह वही आदमी होगा ये बात निश्चित जाननेको मै तो बिलकूल असमर्थ हुं । आपकोही एकदिन वो मिल जायगा । उस बखत आपही उनका पैसा दे सकते है । ऐसी तो भगवान की लीला चलती है ।

आम्ही कोणी विरक्तमार्गी संन्यासी किंवा योगाभ्यासी साधक नव्हतों किंवा दुसऱ्याच्या मदतीवर यात्रा करणारे साधू बैरागी वारकरी नव्हतों. अशा स्थितींत आमच्यावर ही अकारण देणगी कोणी व कां लादली, हें गूढच अजून राहिलें आहे. असा हा जर आमचा गृहस्थाश्रमी यात्रिकांचा अनुभव तर

‘ अनन्याश्चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। ’

ह्या परमेश्वरी आश्वासनामुळें अनन्य उपासकांना योगक्षेमाची काळजी करण्याचें कारणच रहात नाहीं. ह्याच मुक्तिनारायणाचे यात्रेंत आमच्या बोजेवाल्यांनीं आम्हास सहा दिवस गुंगारा दिला. तेव्हां आम्हीं बरोबर घेतलेले खाद्य पदार्थ, सर्व ऊबदार व इतर रोज लागणारे कपडेसुद्धां त्याजबरोबर गेले. अर्थात् आम्हां अकराही जणांस आम्ही बेगमी करून बरोबर घेतलेल्या अन्नआच्छादनाशिवाय त्या अनोळखी प्रदेशांत तितके दिवस कंठण्याची पाळी आली. पण असल्याहि विपन्नावस्थेंत त्याच्या आश्वासनाचा साक्षात् प्रत्यय कसा

आला व पुढेहि येत गेला हें पुढें वेळोवेळीं दिसेलच.

### योगी ईश्वरदास

हरद्वार, हृषिकेश, देवप्रयाग किंवा हिमालयाच्या आणखीहि अंतर्भागांत साधक लोक जाऊन रहातात, हें प्रत्यक्षाप्रत्यक्ष माहीत आहे. ईश्वरदास नांवाचे एक योगाभ्यासी पुढच्या योगाभ्यासाकरितां वाईहून हिमालयांत जाण्यास निघाले. वाटेंत एक दिवस ते पुणें येथें थांबले होते. जातांना त्यांचेजवळ एक फुटकी कपर्दिकाहि नव्हती. व त्यांना तिची आवश्यकताहि वाटत नव्हती. सर्व सोय ईश्वर करितो, असा त्यांचा भरंवसा होता. येथून ते गेले तेव्हां त्यांचा योगाभ्यास किती प्रगत झाला होता ह्याची कल्पना पुढील वर्णनावरून येईल. हे गृहस्थ उंच व इतके हडकुळे होते कीं, कातडीच्या पिशवींत हाडेंच तेवढीं होतीं. गृहस्थ चाळिशीच्या सुमारांतील असावे. त्यांचें वजन तर पुरें पंचवीस शेरहि नसेल. त्यांचा वेळेचा आहार तीन घास व तीन आचमनें गोमूत्र, असें त्यांनीं सांगितलें. ह्या आहारांत अधिकपणा झाला तर रोजचा अभ्यास पुरा होण्यास अडचण येते, वास्तविक घेतों हेंहि अन्नोदक सुटावयास पाहिजे आहे, म्हणजे अभ्यासांत येणारा व्यत्यय दूर होईल, असें त्यांचें म्हणणें होतें. त्यांच्या योगाभ्यासांत अंतराय करणाऱ्या सिद्धींचा मोह दूर करण्यासाठीं आणि पुढील मार्गदर्शन होण्यासाठीं म्हणून इकडील स्नेही मंडळींना अखेरचें भेटून ते हिमालयांत जाण्यास निघाले होते.

तेव्हां (स.१८९७) माझ्या एका स्नेह्यामुळें त्यांच्या सिद्धि पाहाण्यास सांपडल्या. हे एका कोपऱ्यांत बसले होते. आम्ही सात आठ मंडळी जमलों होतों. त्यांत पत्ते वाटून घेतले. प्रत्येकाच्या हातांतील पानें त्यांनीं अचूक सांगितलीं. शंका येऊन माझे बंधू तीं आरशांत दिसताहेत काय म्हणून पाहूं लागले. हे गृहस्थ उठले आणि शंकेस जागा नको म्हणून तळमजल्यांत गेले. आम्ही तिसरे मजल्यावर होतों. तो चौसोपी वाडा व मध्यें अंगण, त्यामुळें तिसरे मजल्यावरूनहि तळमजला दिसे. आम्ही वर ज्या ज्या हालचाली करूं, त्या त्या ते अगदीं बिनचूक खालून सांगत. त्यांच्या अंतर्ज्ञानशक्तीबद्दल खात्रीच झाली. त्यांनीं आपल्या डोळ्यांतील बुब्बुळे व तोंडांतील जिभ नाहींशी केली. हृदय-

क्रिया व नाडी बंद केली. स्वतःचें शरीर (आडव्या स्थितींत) इतकें हलकें केलें कीं, तें आपोआपच अंतराळीं आमच्या डोक्याचे वर हात-भर उंच गेलें. त्यांनीं आम्हांस इच्छा–प्रसाद म्हणून दिला. तो एक सुगंध होता. मी त्यांच्याजवळ बसलेला होतों, म्हणून ते मला म्हणाले कीं, जो सुगंध हवा असेल त्याचें स्मरण मनांत कर. ह्यावेळीं तेथें जवळच असलेल्या एका छडीनें त्यांनीं माझ्या छातीस स्पर्श करून ठेविला होता. मीं स्मरण केल्याचें त्यांस सांगितलें. तेव्हां छडी बाजूस करून ते म्हणाले कीं, आपल्या दोन्ही तळहातांनीं दोन्ही डोळे चोळ. मीं तसें करितांच पारिजातकाचा घमघमाट माडीभर दरवळला.

आम्ही त्यांचा निरोप घेणार हें पाहून ते आम्हास म्हणाले कीं, मी आपणांशीं दोन शब्द बोलूं इच्छितों. माझा अधिकार नाहीं, तथापि तुम्ही सर्व ब्राह्मण तरुण आहांत. तुमचे व्रतबंध होऊन तुम्हांस तुमच्या पितागुरुमुखांतून गायत्री मंत्राचा उपदेश झालेला आहे. त्या मंत्राची शक्ति भगवान् सूर्यनारायणासारखी प्रखर व तेजस्वी आहे. त्या मंत्राचा निष्ठापूर्वक जप व विधीयुक्त प्राणायाम केला तर कसें सामर्थ्य येतें हें तुम्हीं आतांच पाहिलें आहे. ह्या प्रयोगांत जादूटोणा, भूतपिशाच्च साधना, छा, छू, वगैरे कांहीं नाहीं. मात्र यम–नियम पाळावे लागतात. एकदां निश्चय केला म्हणजे अव-घड असें कांहीं रहात नाहीं. सर्व अंगवळणीं पडून सोपेंच वाटावयास लागतें. माझा अभ्यास फार दिवसांचा आहे, असें नाहीं. आतां कोठें एक तप होऊन गेलें आहे. ह्याच्या पुढच्या अभ्यासास ह्या सिद्धींचा मोह आडवा येत आहे. इतका जरी तुम्हीं अभ्यास केलांत तरी सुद्धां तुम्ही शरीरानें आणि मनबुद्धीनें खरे बलसंपन्न व्हाल.

माझ्या बंधूंनीं विचारलें कीं, आपली एवढी प्रगति इकडेच झाली असतांना आतां हिमालयांत कां जातां? पुढचा अभ्यास येथेंच केलांत तर आम्हास अनायासें चांगलें मार्गदर्शन लाभेल.

ते म्हणाले, ह्या पुढच्या अभ्यासास गुरुमुख पाहिजे. तसे अधि-कारी पुरुष क्वचितच इकडे येतात. माझ्याकरितां त्यांनीं इकडे यावें इतका माझा अभ्यास नाहीं किंवा भाग्यहि नाहीं. म्हणून मलाच त्यांचेकडे जाणें भाग आहे. शिवाय सध्यांच माझ्या अभ्यासांत येणारे

विक्षेप फार जाणवतात व ते टाळण्यांतच श्रम व वेळ व्यर्थ जातो.

माझे बंधु म्हणाले, कोणास येऊं देऊं नाहीं म्हणजे झालें.

ते म्हणाले, कांहीं एका पूर्वाभ्यासांत हें चालतें. पण पुढें चालत नाहीं.

बंधूनीं विचारलें, कां?

ते म्हणाले, दार लावून घेऊन बसलें तरी बाहेरचा आवाज कानीं येतो, बाहेरचा वास आंत येतो, अगदीं त्याचप्रमाणें सभोंवतालच्या लोकांच्या बऱ्या वाईट विचारांचीं आंदोलनें आपल्या एकाग्रतेच्या अभ्यासावस्थेंत विक्षेप उत्पन्न करितात. ह्या कामीं आपल्याकडे असें एकहि ठिकाण राहिलेलें नाहीं कीं, जेथें नैसर्गिक शुद्ध वातावरण आणि पूर्ण एकान्त असून दहा पांच मैलांच्या परिसरांत अन्य विचारांचा नुसता वासहि येणार नाहीं. आम्हीं त्यांना नमस्कार करून आशीर्वाद घेतला आणि तेथून निघालों.

## अच्युतानंद स्वामी

हिमालयांत जाऊन तपःसिद्धि प्राप्त करून घेतलेल्या आणखी एका महापुरुषाची माहिती होण्याचा योग माझ्या प्रौढ वयांत आला. वयाच्या बाराव्या वर्षापूर्वीं अजाणतांच मी प्रत्यक्ष ह्यांचें बलोपासनेचें शिष्यत्व पत्करलें होतें. ही गोष्ट मी पार विसरून गेलों होतों. पण दैवयोगानें वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षीं ह्यांच्या संस्थेंत ओढला गेलों. तो मात्र समजून उमजून गेलों. तेथें मिळालेली दीक्षा अजून अव्याहत चालू आहे. त्या सद्गुरूंचे कृपाप्रसादाचें फळ कोणासहि हेवा वाटावा अशा रीतीनें आतां सत्तर वर्षे भरत आलीं तरी उपभोगीत आहें. आणि सांगण्यास अभिमानहि वाटतो कीं, त्यांच्या कृपेचें फळ म्हणूनच उतारवयांत सुद्धां मला श्री 'कैलास-मानस' सारख्या दुर्घट यात्रा सहज होऊं शकल्या.

हे महापुरुष म्हणजे दामोदर गुरु. काशीस ते बाबाजी नांवानें ओळखले जात. ह्यांनीं ब्रह्मचर्याश्रमांतूनच संन्यास घेतला होता. तेव्हां त्यांचें नांव अच्युतानंद स्वामी असें होतें. त्यांनीं गंगाकांठीं काशी येथें व विशेषेंकरून हिमालयांत जाऊन मंत्रसिद्धि प्राप्त करून घेतली होती. बटुक भैरवाचा साक्षात्कार होऊन त्याजवर त्या देवतेचा

अनुग्रहहि झालेला होता. मंत्रसिद्धीचा उपयोग त्यांनीं भोगार्थ कधींच केला नाहीं. त्या दृष्टीनें ते विरक्तच असत. हजारों लोकांना त्यांनीं बलोपासनेस लावलें. त्यांचे हातून शेंपन्नासाचे वर आखाडे स्थापले गेले. ते सर्व अजून चांगल्या स्थितींत आहेत. त्यांची भैरव उपासना जाज्वल्य होती. त्याचीहि ते दीक्षा देत. पण योग्य शिष्या-भावीं ती विद्या मागें पडली. इतकेंच नव्हे तर त्यांच्या पश्चात् त्यांच्या शिष्यांकरवीं तिचा दुरुपयोग होऊं लागून ती निष्प्रभ झाली.

पुण्यांत कै. गणूकाका वझे (वझे मास्तर) ह्यांची जी अच्युतानंद व्यायाम शाळा (हिलाच आरंभीं भटांची तालीम म्हणत) ती सुमारें साठ वर्षांपूर्वी ह्यांनींच येथें स्थापन केलेली आहे. ह्यांच्या मंत्र-सिद्धीचा प्रभाव कै. सिताराम भट गुरु व कै. गणूकाका वझे मास्तर ह्यांस प्रत्यक्षानें झालेला मला माहित आहे. साठ वर्षांपूर्वीची गोष्ट. भटगुरु, त्या वेळचा सिताराम, एल्.एल्. बी. चा अभ्यास करण्या-साठीं हट्टानें मुंबईस गेला. त्या वेळीं त्याला क्षयाची भावना झालेली. गणेश शास्त्री त्याचे वडील, मुलाच्या प्रकृतीबद्दल मोठ्या काळजींत होते. पुण्या–मुंबईंत ज्यांचें नांव आजहि ऐकूं येतें असे नामांकित डॉक्टर, वैद्य त्या काळांत होते. पण कोणाचेंहि औषध लागू पडेना. दैवी उपायहि चालूं होते. वडील मातोश्री काळजीनें अस्वस्थ झाले. त्यांतच मुलाचें लग्न झालेलें. शिवाय सात मुलांत पांच मुली व हाच काय तो नांवारूपास येत चाललेला मुलगा. म्हातारपणच्या आधाराची आशा. अशा स्थितींत दैवयोगानेंच म्हटलें पाहिजे, अच्युतानंद स्वामींची गांठ पडली. त्या वेळीं गणेश शास्त्री फार खिन्न व चिंता-क्रांत स्थितींत होते. कारण समजतांच अच्युतानंदांनीं त्यास अश्वा-सून सांगितलें कीं निर्धास्त रहा. तुमचे उपाय संपले असले तर मी उपाय करतों. पण माझा उपाय दैवी आहे. त्या कामीं तुम्हास खर्च कांहीं नाहीं. पोटांत औषध घ्यावयाचें नाहीं. मात्र तीर्थ घ्यावें लागेल. मूळचेंच सनातनी घराणें. त्यामुळें स्वामींच्या म्हणण्यास त्यांनीं अंतःकरणपूर्वक रुकार तत्क्षणींच दिला. इतकेच नव्हे तर त्यांस नम्रपणें सुचविलें कीं, संकोच वाटूं देऊं नका. मुलासाठीं सांगाल तो खर्चहि करीन. परमेश्वरानें कांहीं तशी स्थिति ठेवली नाहीं.

विक्षेप फार जाणवतात व ते टाळण्यांतच श्रम व वेळ व्यर्थ जातो.

माझे बंधु म्हणाले, कोणास येऊं देऊं नाहीं म्हणजे झालें.

ते म्हणाले, कांहीं एका पूर्वाभ्यासांत हें चालतें. पण पुढें चालत नाहीं.

बंधूनीं विचारलें, कां?

ते म्हणाले, दार लावून घेऊन बसलें तरी बाहेरचा आवाज कानीं येतो, बाहेरचा वास आंत येतो, अगदीं त्याचप्रमाणें सभोंवतालच्या लोकांच्या बऱ्या वाईट विचारांचीं आंदोलनें आपल्या एकाग्रतेच्या अभ्यासावस्थेंत विक्षेप उत्पन्न करितात. ह्या कामीं आपल्याकडे असें एकहि ठिकाण राहिलेलें नाहीं कीं, जेथें नैसर्गिक शुद्ध वातावरण आणि पूर्ण एकान्त असून दहा पांच मैलांच्या परिसरांत अन्य विचारांचा नुसता वासहि येणार नाहीं. आम्हीं त्यांना नमस्कार करून आशीर्वाद घेतला आणि तेथून निघालों.

## अच्युतानंद स्वामी

हिमालयांत जाऊन तप:सिद्धि प्राप्त करून घेतलेल्या आणखी एका महापुरुषाची माहिती होण्याचा योग माझ्या प्रौढ वयांत आला: वयाच्या बाराव्या वर्षापूर्वी अजाणतांच मी प्रत्यक्ष ह्यांचें बलोपासनेचें शिष्यत्व पत्करलें होतें. ही गोष्ट मी पार विसरून गेलों होतों. पण दैवयोगानें वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षीं ह्यांच्या संस्थेंत ओढला गेलों. तो मात्र समजून उमजून गेलों. तेथें मिळालेली दीक्षा अजून अव्याहत चालू आहे. त्या सद्‌गुरूंचे कृपाप्रसादाचें फळ कोणासहि हेवा वाटावा अशा रीतीनें आतां सत्तर वर्षें भरत आलीं तरी उपभोगीत आहें. आणि सांगण्यास अभिमानहि वाटतो कीं, त्यांच्या कृपेचें फळ म्हणूनच उतारवयांत सुद्धां मला श्री 'कैलास‧मानस' सारख्या दुर्घट यात्रा सहज होऊं शकल्या.

हे महापुरुष म्हणजे दामोदर गुरु. काशीस ते बाबाजी नांवानें ओळखले जात. ह्यांनीं ब्रह्मचर्याश्रमांतूनच संन्यास घेतला होता. तेव्हां त्यांचें नांव अच्युतानंद स्वामी असें होतें. त्यांनीं गंगाकांठीं काशी येथें व विशेषेंकरून हिमालयांत जाऊन मंत्रसिद्धि प्राप्त करून घेतली होती. बटुक भैरवाचा साक्षात्कार होऊन त्याजवर त्या देवतेचा

अनुग्रहहि झालेला होता. मंत्रसिद्धीचा उपयोग त्यांनीं भोगार्थ कधींच केला नाहीं. त्या दृष्टीनें ते विरक्तच असत. हजारों लोकांना त्यांनीं बलोपासनेस लावलें. त्यांचे हातून शेंपन्नासाचे वर आखाडे स्थापले गेले. ते सर्व अजून चांगल्या स्थितींत आहेत. त्यांची भैरव उपासना जाज्वल्य होती. त्याचीहि ते दीक्षा देत. पण योग्य शिष्या-भावीं ती विद्या मागें पडली. इतकेंच नव्हे तर त्यांच्या पश्चात् त्यांच्या शिष्यांकरवीं तिचा दुरुपयोग होऊं लागून ती निष्प्रभ झाली.

* पुण्यांत कै. गणूकाका वझे (वझे मास्तर) ह्यांची जी अच्युतानंद व्यायाम शाळा (हिलाच आरंभीं भटांची तालीम म्हणत) ती सुमारें साठ वर्षांपूर्वीं ह्यांनींच येथें स्थापन केलेली आहे. ह्यांच्या मंत्र-सिद्धीचा प्रभाव कै. सिताराम भट गुरु व कै. गणूकाका वझे मास्तर ह्यांस प्रत्यक्षानें झालेला मला माहित आहे. साठ वर्षांपूर्वींची गोष्ट. भटगुरु, त्या वेळचा सिताराम, एल्.एल्. बी. चा अभ्यास करण्या-साठीं हट्टानें मुंबईस गेला. त्या वेळीं त्याला क्षयाची भावना झालेली. गणेश शास्त्री त्याचे वडील, मुलाच्या प्रकृतीबद्दल मोठ्या काळजींत होते. पुण्या–मुंबईंत ज्यांचें नांव आजहि ऐकूं येतें असे नामांकित डॉक्टर, वैद्य त्या काळांत होते. पण कोणाचेंहि औषध लागू पडेना. दैवी उपायहि चालू होते. वडील मातोश्री काळजीनें अस्वस्थ झाले. त्यांतच मुलाचें लग्न झालेलें. शिवाय सात मुलांत पांच मुली व हाच काय तो नांवारूपास येत चाललेला मुलगा. म्हातारपणच्या आधाराची आशा. अशा स्थितींत दैवयोगानेंच म्हटलें पाहिजे, अच्युतानंद स्वामींची गांठ पडली. त्या वेळीं गणेश शास्त्री फार खिन्न व चिंता-क्रांत स्थितींत होते. कारण समजतांच अच्युतानंदांनीं त्यास अश्वा-सून सांगितलें कीं निर्धास्त रहा. तुमचे उपाय संपले असले तर मी उपाय करतों. पण माझा उपाय दैवी आहे. ह्या कामीं तुम्हास खर्च कांहीं नाहीं. पोटांत औषध घ्यावयाचें नाहीं. मात्र तीर्थ घ्यावें लागेल. मूळचेंच सनातनी घराणें. त्यामुळें स्वामींच्या म्हणण्यास त्यांनीं अंतःकरणपूर्वक रुकार तत्क्षणींच दिला. इतकेच नव्हे तर त्यांस नम्रपणें सुचविले कीं, संकोच वाटूं देऊं नका. मुलासाठीं सांगाल तो खर्चहि करीन. परमेश्वरानें कांहीं तशी स्थिति ठेवली नाहीं.

स्वामींनी सितारामास पार्थिव पूजा देऊन मंत्रानुष्ठान नित्य नियमानें विधीपूर्वक करावयास सांगितलें. जेव्हां जेव्हां असले प्रसंग उद्भवत त्या त्या वेळीं अगोदर किंवा मागाहून गुरु बटुकेश्वराचे आराधनेस अज्ञात स्थळीं जाऊन बसत असत. त्याप्रमाणें ह्या वेळीं ते स्वत: थोडकेच दिवस अज्ञात स्थळीं जाऊन बसले. आठ दिवसांनीं परत येऊन चौकशी केली तेव्हां गणेश शास्त्रींनीं सांगितलें कीं, आम्हा घरांतील सर्व माणसांस सितारामाच्या प्रकृतींत सुधारणा दिसते आहेच, पण डॉक्टर वैद्यहि आश्चर्यचकित झाले आहेत. पुढें सिताराम खडखडीत बरा झाला. ह्या वेळपासून भटांच्या घरांत ती उपासना–परंपरा अजूनहि चालू आहे.

स्वामींचें ध्येय असें होतें कीं, आपला हा पार्थिव देह ज्या पंच महाभूतांतून निर्माण झाला त्या महाभूतांत तो ज्याचा त्याला स्वच्छेनें विरवून टाकतां आला पाहिजे. त्या दृष्टीनें त्यांचा अभ्यास चालू होता. त्यांचा मृत्युकाल त्यांस अगाऊ निश्चित समजला होता किंवा ते इच्छामरणी होते, आणि म्हणूनच महाप्रयाणापूर्वीं चार पांच महिने अगोदर सर्वांचा अखेरचा निरोप घेऊन ते हरद्वारास जाऊन गंगाकांठीं आडवाजूस पर्णकुटी बांधून राहिले. त्या वेळीं ते नुसत्या दुधावर होतें. गवळयानें लोटींत दूध घालून ठरल्या ठिकाणीं ठेवावें. पहिलें शिल्लक असल्यास तें टाकून द्यावें व लोटी स्वच्छ करून त्यांत ताजें घालून ठेवावें अशी त्यास सांगी होती. एकदां चार पाच दिवस पहिलें दूध तसेंच रहात असलेलें पाहून, गवळयास शंका येऊन त्यानें बावाजींना हाका मारल्या, फटींतून आंत पाहिलें. पण कांहींच कानोसा लागेना. तेव्हां माणसें जमवून दार उघडलें. पहातात तों आंत काय आहे ? नुसतें आसन. अच्युतानंद स्वामींनीं जलसमाधि घेतली कीं पंचमहाभूतांत देह विरवून टाकिला हें गूढच आहे. तेव्हांपासून गुरु नाहींसे झाले एवढें खरें.

### हिमालयांतील महात्मे

ज्या दोन महापुरुषांची प्रत्यक्षानें माहिती होती ती अनुषंगानें येथें मुद्दाम दिली. कारण असें कीं आपली बहुतेकांची सर्वसाधारण अशी समजूत असते कीं, हिमालयांत महात्मे, योगी, सिद्ध पुरुष आहेत;

आणि तेथें देवदेवतांचा साक्षात्कार होतो. कोणीहि भेटो तो जिज्ञासेनें किंवा कुतूहलानें विचारतोच कीं, तुम्ही इतके वेळां तिकडे जाऊन आलांत तर तुम्हास असे कोणी सत्पुरुष भेटले का ? कधीं देव–देवतादर्शन घडलें का ? हे प्रश्न अगदीं साहजिक आहेत. मलाहि अजून सुद्धां असेंच विचारावेसें वाटतें. पण ह्या प्रश्नांचें उत्तर देणें फार कठीण आहे. महात्मे, योगी वगैरे लोकांचीं निश्चित अशीं लक्षणें मला माहीत नाहींत. त्याचप्रमाणें देव–देवतांच्या स्वरूपाविषयींहि निश्चित अशी कल्पना नाहीं. विचारणाऱ्यांच्या मनांत काय कल्पना असतात त्याचीहि योग्य जाणीव नसते. शिवाय अलीकडे दैनंदिन व्यवहारांत महत्पदास पोहोंचलेल्या पुरुषासहि तपस्वी, महर्षि, महात्मा, वगैरे शब्द आदरार्थी वापरण्याची प्रथा रूढ झाली आहे. त्याचप्रमाणें देव–देवतांचे अवतारहि होऊं लागले आहेत. ह्या कारणांमुळें निश्चित असें उत्तर देतां येत नाहीं. तथापि ईश्वरी साक्षात्कार आणि सिद्ध पुरुष ह्यांविषयीं माझा काय अनुभव आहे, तो स्पष्ट सांगण्यासाठीं वरील दोन उदाहरणें सांगितलीं. परमेश्वर कांहीं कोणाचा नोकर नाहीं कीं, धांवा केल्याबरोबर त्यानें धांवून यावें. पण अनन्यतेच्या भावाप्रमाणें तो कोणाच्या तरी मनांत प्रेरणा करून त्याचे करवीं भक्तांचे मनोरथ पुरवितो, अशी माझी समजूत आहे.

दोन पुरुषांचें प्रत्यक्षाप्रत्यक्ष अंतरंग समजण्याची संधि मिळाल्याकारणानें हिमालयांतील सत्पुरुषांसंबंधीं ज्याची त्यास कांहीं तरी कल्पना करून घेतां येईल असें सांगता आलें.

ज्यांच्याविषयीं अशाच तऱ्हेची कल्पना करितां येईल अशीं तिकडील प्रवासांत चार–दोन माणसें भेटलीं, नाहींत असें नाहीं. परंतु त्यांची प्रगति कितपत झालेली होती ह्याचा प्रत्यक्ष पडताळा पहावयास सांपडलेला नव्हता. तो अनुमानावरून विसंबावा लागतो. तथापि त्यांच्यांतील विशेष गुण, त्यांची निष्ठा, त्यांची तपस्या, तितिक्षा, त्यांच्या डोळ्यांतील तेज पाहून मनावर पगडा बसतो कीं, हे निदान आर्त साधक तरी असावे. अशा तोलाचीं माणसें आम्हास भेटलीं. गंगोत्री, केदारकडे दोन, बदरीनारायणाकडे एक, कैलासकडे दोन व मुक्तिनारायणाकडे दोन. त्यांची जी काय थोडीफार माहिती

झालेली आहे ती त्या त्या स्थळीं येईलच.

पूर्णावस्थेस पोहोंचलेल्या पुरुषांविषयीं कांहींच कल्पना करितां येत नाहीं. थिऑसफिस्टांचे महात्मे तिकडे असल्याविषयीं ऐकू येतें. पण ते काय किंवा अन्य कोणी काय आम्हास आढळले नाहींत. त्यांनीं येऊन आम्हास भेटावें अशी पुण्याई आमच्यांत नाहीं. उलट आमच्यापासून त्यांस विक्षेपच होतो, म्हणून तर ते तिकडे जातात. आणि तिकडे गेल्यानंतर यात्रींच्या वरदळीपासून ते इतके दूर रहातात कीं, तेथें कोणी जाणारच नाहीं. महात्म्यांचें दर्शन हाच हेतु धरून त्या शोधांत तिकडे गेले तर न जणों भाग्यवशांत एखाद्या महात्म्याचें दर्शन होईलहि. आमच्यासारखे यात्री तिकडे जातात त्यांचें ध्येय ठरलेलें, त्यांची वाट ठरलेली, ठिकाणें ठरलेली, प्रवासाचे दिवस ठरलेले. त्यांना इकडे तिकडे पाहण्याची सुद्धां सवड राहिलेली नसते. अशा स्थितींत दुसऱ्या तिसऱ्या प्रतिचे अभ्यासू किंवा मार्गच्युत याशिवाय कोण भेटणार! ह्या तपोभूमींत बोवाबाजीच्या व्यापारास वाव नाहीं, असा हा माझा अनुभवात्मक समज आहे.

## नीलधारा व कनखल तीर्थ

कनखल तीर्थ पुराणप्रसिद्ध आहे. हें हरद्वारचे दक्षिणेस दोन मैलांवर आहे. ह्यास 'माया' क्षेत्र असेंहि नांव आहे. दक्ष प्रजापतीची राजधानी येथेंच होती. कनखलच्या समोरचा तो 'नीलपर्वत', आणि त्या पर्वतावरून येणारी धारा ती 'नीलधारा'. तिचा भागीरथी गंगेशीं संगम होतो तो कनखल येथेंच. वर्षाऋतूशिवाय ही नीलधारा बहुतेक कोरडीच असते. कनखल येथें दक्षेश्वर मंदिर, सतीचें कुंड, नीलधारा व भागीरथी संगम, संगमावर घाट व धर्मशाळा आहे.

## सतीचा अग्निप्रवेश

दक्षप्रजापतीची मुलगी सती, ही रूपगुणांनीं सर्वोत्तम आणि सर्वांत धाकटी होती. ह्यामुळें ती आईबापांची फारच लाडकी होती. तिनें वडिलांच्या इच्छेविरुद्ध महारुद्र जो शंकर त्यास वरिलें. त्यामुळें त्या राजर्षीला फार दुःख झालें व क्रोधहि आला. त्यानें पुढें एक मोठा यज्ञ आरंभिला. त्याकरितां सर्व देव व महर्षि यांना आमंत्रणें होतीं. परंतु शंकरास नव्हतें. आपल्या वडिलांचे घरीं यज्ञ होत आहे, तेथें

आमंत्रण नसलें तरी आपणास जाण्यास संकोच धरण्याचें कांहीं कारण नाहीं, असें समजून सती माहेरीं आली. पण तिला पाहतांच वडिलांचा राग खवळला, आणि त्यानीं शंकराची मुक्तकंठ निंदा चालविली. माझी स्वतःची हवी तेवढी निंदा करा, पण नवऱ्याची निंदा करूं नका, म्हणून सतीनें परोपरीनें वडिलांस विनविलें. परंतु त्याचा कांहींहि उपयोग होत नाहीं हें पाहून आणि नवऱ्याची निंदा ऐकणें असह्य होऊन वडिलांनीं आरंभिलेल्या यज्ञांतील प्रज्वलित कुंडांत तिनें अग्निप्रवेश केला.

### यज्ञविध्वंस व वरप्रदान

ही वार्ता नंदीकेश्वरादि रुद्रगणांनीं शंकराच्या कानीं घालतांच त्यांनीं यज्ञाचा विध्वंस करण्याची आज्ञा दिली. वीरभद्रानें दक्षाचें यज्ञाचा विध्वंस तर केलाच पण त्याचें डोकेंहि उडविलें. हा प्रकार होत आहे तों शंकरहि तेथें आले. त्यांचा तो क्रोधयुक्त आवेश पाहून सर्वच लोक भेदरून गेले. दक्षाची बायको प्रसूती व तेथें जमलेले देव, ऋषि, ब्राह्मण, ऋत्विज ह्यांनीं शंकराची स्तुती करून त्यास शांत केलें. शंकरहि प्रसन्न झाले व त्यांनीं वर दिला. त्यामुळें बकऱ्याचें डोकें दक्षाचे धडास लावून तो जिवंत झाला. दक्षप्रजापतीला पश्चात्ताप झाला आणि त्यानें शंकरास शरण जाऊन त्यांचें मोठ्या भक्तिभावानें स्तवन केलें. शंकरांनीं दक्षास अभय देऊन वर माग म्हटलें. त्यावर दक्षराज म्हणाले कीं, आपण माझ्या सर्व अपराधांची क्षमा करून मजवर प्रसन्नच झाला आहांत तर मी असे वर मागतों कीं, जन्मजन्मांतरीं माझ्या हातून आपलीच भक्ति व्हावी वगैरे.

शंकरांनीं तथास्तु म्हणून ते सर्व वर दिले. ते ( फलश्रुतीसह )—

### कनखलतीर्थ माहात्म्य.

सम्यक् संपादिता दक्ष मद्भक्तिर्विश्वनाशिनी ।
भविष्यत्येवहि तथा यथा वांच्छा कृता त्वया ।।
इदं क्षेत्रं महापुण्यं यावद्वै यज्ञभूमिका ।
यत्र मायानिमित्तं हि जातं सर्वं प्रजापते ।।
तस्मादिदं महाक्षेत्रं माया संज्ञं भविष्यति ।
सकृद्दर्शनमात्रेण यस्य तीर्थस्य मानद ।।

कोटिजन्मकृतेभ्यस्तु पापेभ्यः परिम्युच्यते ।
धन्यास्ते पुरुषा लोके मायाक्षेत्रनिवासिनः ।।
नाम्नादक्षेश्वरेणैव निवसिष्यामि क्षेत्रके ।
यस्य दर्शनमात्रेण सिध्यौऽष्टौ भवन्ति ही ।।
अदृष्ट्वा मानवा ये करिष्यन्त्यल्प बुद्धयः ।
तीर्थाटनां प्रजाधीश तत्सर्वं निष्फलं भवेत् ।।

ह्या वरदानामुळें दक्षप्रजापतीला शंकराचें अक्षय्य सान्निध्य मिळालें. कोठलेंहि शंकराचें देऊळ पाहिलें तर गाभाऱ्याचे उंबरठ्यास बकऱ्याचीं शिगें असलेलें तोंड असतें. तें तोंड म्हणजेच मुख, तें दक्ष-प्रजापतीचें—त्यास कीर्तिमुख असें नांव आहे.

दक्षेश्वर नांवानें शंकराचें अक्षय्य वास्तव्य कनखल येथें झालें त्या स्थानीं 'दक्षेश्वर मंदिर' आहे. त्याचे शेजारीं सतीनें अग्निप्रवेश केला तें कुंड आहे. परमेश्वराच्या मायेनें हा खेळ झाला म्हणून ह्या क्षेत्रास 'माया' हें नांव त्याच्याच वरप्रदानानें प्राप्त झालें. ही सर्व कथा केदारखंडांत आली आहे.

गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते ।
स्नात्वा तु कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ।

ह्या नित्यस्मरणीतील श्लोकांत उल्लेखिलेलीं पांच स्थानें त्र्यंबकेश्वर व हरद्वार या दोन्ही ठिकाणीं असल्याचें दिसून येतें. भागीरथीचेंच नांव थेट वैदिक कालापासून गंगा आहे. (इमं मे गंगे यमुने...) तत्सदृश पावित्र्य दाखविण्यासाठीं गोदावरीस तें नांव दिलें गेलें असावें, म्हणून गोदाउगमास गंगाद्वार असें नांव आलें आहे. परंतु 'गंगाद्वार' हें नांव हरद्वारास कसें आलें आहे हें मागें दाखविलें आहेच. नीलपर्वतावरील नीलधारेचा गंगेशीं कनखल येथें संगम होतो. त्या गंगासान्निध्यामुळें आणि नीलपर्वतावरील नीलधारेच्या संगमामुळें नीलपर्वतास पावित्र्य आलें. गंगेच्या कांठींच बेलवृक्षांच्या वनांत 'बिल्वकेदार' स्थान, हरद्वार येथेंच आहे. कुशावर्त हें हरद्वार येथें गंगाकांठींच आहे. आणि कनखलचें माहात्म्य दक्षप्रजापतीचे कालापासून आहे हें वर आलेंच आहे. त्र्यंबकेश्वर येथील हीं पांचहि स्थानें मागाहून मानीव उत्पन्न झालेलीं आहेत. परंतु तीं मूळचीं

हरद्वाराचींच आहेत.

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिका ।

नित्यस्मरणीच्या श्लोकांत सात मोक्षद पवित्र अशा पुरींचीं म्हणजे नगरींचीं नांवें आलीं आहेत. ह्या सात नगरींत 'माया' कोणती ? तिचें आजचें नांव काय ह्याबद्दल निरनिराळीं मतें दिसून येतात. कोणी गयेला माया नांव दिलें आहे तर कोणी तें नांव मथुरेचेंच म्हणून म्हटले आहे. पण माया हें नांव कनखलास असलेबद्दलचा उल्लेख दक्षप्रजापतीच्या कथेंत वर आलेला आहे. कनखल हें स्थान हरद्वारच्याच सीमेंत असलेमुळें तें नांव हरद्वारास असणें क्रमप्राप्तच आहे. देवी अहिल्याबाई होळकर ह्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं जेथें जेथें दानधर्म केला त्या स्थानांच्या यादींत माया (हरद्वार) असा उल्लेख आहे. माया म्हणजे हरद्वार असा समज पावणे दोनशें वर्षांच्या पूर्वीच्या परंपरेंतील आहे.

हरद्वारचे पंडे हरद्वारास न रहातां कनखल येथें जाऊन रहातात व कामापुरते मात्र सकाळ-संध्याकाळ अष्टौप्रहर तेथें येतात, ह्याचेंहि कारण वरील कथेंतील कनखल माहात्म्यांत दिसून येतें.

## गुरुकुल व ऋषिकुल

कनखलपासून जवळच गुरुकुल व ऋषिकुल ह्या संस्था आहेत. या दोन्ही संस्थांचीं कामें प्राचीन विद्यालय पद्धतीनें चालू आहेत. शहरी वस्तींतील बजबजपुरी, विद्यार्थ्यांच्या मनास मोह पाडून चित्तांत व्यग्रता उत्पन्न करणारीं नाटक, तमाशे, चलच्चित्रपट व ह्यांच्या नित्य नव्या जाहिराती, खाद्यपेय पदार्थांचें आमिष, ह्यांपासून अगदीं दूर आडरानांत हीं विद्यालयें आहेत. तेथील वातावरण शुद्ध, निवांत व विद्यार्जनास योग्य असेंच बनविलें आहे. वसतिगृहें व पाठशाळा अलग अलग सोयीस्कर व साध्या बांधणीच्या असून भोंवतीं विस्तृत मोकळीं मैदानें आहेत. या संस्था आदर्शभूत आहेत. विद्यार्थ्यांची साधी व स्वावलंबी वळणाची रहाणी, बाळसेदार शरीरावरील सतेज कांती आणि तेथें शिकवीत असलेल्या संस्कृत विषयांतील त्यांची पारंगतता पाहून समाधान वाटतें. अशाच नमुन्याची एकमेव संस्था एकेकाळीं

आपल्याकडे कै. अण्णासाहेब विजापूरकर यांची 'समर्थ विद्यालय' ही तळेगांव येथें होती. पण ! दुर्दैव ! आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः।

हृषीकेश

हरद्वारपासून हृषीकेश चौदा मैल आहे. तेथपर्यंतचा रस्ता वनांतून गेलेला आहे. आपण तिकडे जातों त्यावेळीं ऐन उन्हाळ्याचे दिवस असतात. त्या कारणानें ह्या वनांतील झाडांची पालवी झडून जाऊन तें अगदी रूक्ष झालेलें दिसतें. हरद्वारपासून हृषीकेशला मोटारची जा-ये, सर्व दिवसभर चालू असते. घोड्याचे टांगेहि मिळतात. हृषीं-केश रोड हें आगगाडीचें स्थानकहि आहे. पण तेथून गांव सात मैल रहातें. तेथेंहि टांगे मिळतात. हें गांव लहान असलें तरी त्याला फार महत्त्व आलेलें आहे. यात्रेच्या प्रत्यक्ष पायचालीस मोटारी सुरू होण्यापूर्वीं येथूनच सुरवात होई, किंवा अजूनहि ती येथूनच होते. हृषीकेश गांव भागीरथीच्या उजव्या कांठीं डोंगराचे पायथ्याशीं आहे. गंगेच्या दोन्ही कांठीं दाट झाडी आहे. येथील गंगेचें पात्र मोठें असून पाण्याची वहाळ खळाळीची व अतिशय ओढीची आहे. कांठाशीं त्रिवेणी घाट म्हणून एक जागा आहे. तेथें स्नान, पूजन, तीर्थविधि वगैरे करितात. तेथें बांधीव असा घाट नाहीं. गुडघाभरसुद्धां पाण्यांत जाऊन स्नान करण्याची छाती होत नाहीं, अशी पाण्यास ओढ आहे. कांठाशीं तांब्यातांब्यानेंच स्नान करावें लागतें. किंवा मिराशी पंडे लोकांनीं आपआपल्या अड्ड्यासमोर कांठाशीं, पाण्यांत त्याच्या ओढीस प्रतिबंध करण्यासाठीं उभारलेल्या बुरुजाच्या आश्रयानें गुडघाभर पाण्यांत जाऊन स्नान करतां येतें. मात्र ह्या ठिकाणीं स्नान करण्यास पंड्याची दक्षिणा द्यावी लागते. प्रवाहास इतकी ओढ असली तरी त्यांत लहान मोठे मासे पुष्कळ आहेत. गांवापासून अर्धा मैलाचे आंत गंगापात्रांत 'चंद्रेश्वर" महादेवाचें लहानसें देऊळ आहे. लिंग स्वयंभू आहे. ह्यावेळीं गंगेस पाणी नव्हतें म्हणून तेथें जाऊन दर्शन घेतां आलें. श्रीमदाद्यशंकराचार्य ह्यांनीं हृषीकेश येथें बांधिलेलें देवालय हेंच असावें.

गांवांत भरत व प्रभू रामचन्द्र ह्यांचीं स्वतंत्र देवळें आहेत. भरताची मूर्ति चतुर्भुज असून ती कमरेइतक्या उंचीची आहे.

रामचंद्राचे देवळासमोर ऋषिकुंड असून त्यावर रामचंद्राच्या पादुका आहेत. लंकेंत जाऊन रावणाशीं युद्ध करावें लागलें, त्या युद्धांत जे हत्यादि दोष घडून आले त्याच्या परिहारार्थ प्रायश्चित्ताकरितां, राम व लक्ष्मणांनीं येथें येऊन तपश्चर्या केली होती. हृषीकेश येथें टपाल व तारघर आहे. पोलीस चौकीहि आहे.

### बाबा काळी कमळीवाला क्षेत्र.

हृषीकेश येथें बाबा काळी कमळीवाला क्षेत्र आहे. ही एक संस्था आहे. तिजकडून सर्व यात्रेकरूंस सर्व तऱ्हेची मदत विनामूल्य मिळते. हृषीकेश गांव अर्धाअधिक त्यांचाच आहे. तेथील धर्मशाळेंत चारदोन हजार यात्री सहज सामावतील. यात्रेकरूंच्या उपयोगासाठीं भांड्या-कुंड्यांचे ढिगारे लागले आहेत. प्रत्यहीं साधू, बैरागी, संन्यासी अशा सात आठशें गरजू यात्रिकांस एक वेळ पोटभर होईल इतका कोरडा शिधा किंवा अन्न तेथें वाटलें जातें. यात्रेच्या वाटेवर वस्तीच्या ठिकाणीं अशीं सदावर्तें आहेत. ज्यांच्याजवळ निदान पांच तरी रुपये आहेत अशाच गरजू लोकांस शिधा मिळण्याबद्दल चिठ्ठ्या मिळतात. पुढच्या ठिकाणीं ही चिठ्ठी दिली कीं शिधा मिळतो, व पुढची चिठ्ठी मिळते. अशी ही साखळी व्यवस्था आहे.

### बाबा काळी कमळीवाला

सन १८८४ मध्यें स्वामी विशुद्धानन्द, जे आतां बाबा काळी कमळीवाले ह्या नांवानें सुविख्यात आहेत, त्यांनीं श्रीयमुनोत्तरी, गंगोत्तरी, बदरीकेदार, बदरीनारायण ह्या उत्तराखंडांतील यात्रा केल्या. त्या वेळीं ह्या यात्रा करणें खरें अवघड व जीवावरचेंच होतें. पायवाटाच पण त्याहि धड नव्हत्या. वाटेंत हल्लींप्रमाणें वस्तीच्या सोयी—धर्मशाळा व चट्या इतक्या जवळ जवळ नव्हत्या. पांच सात दिवसांची शिधासामुग्री नेहमीं जवळ बाळगावी लागे. कारण तितक्या दिवसांत ती वाटेंत मिळण्याची सोयच नव्हती. चढ-उताराचे कष्ट आणि उन्हाचा मारा ह्यामुळें शोष पडतो. पण वाटेंत आठ आठ, दहा दहा, मैलांत डोळ्यास लावण्यापुरतेंहि पाणी कोठें कोठें नसे. कोणी वाटेंत आजारी पडलें तर त्याचे हाल विचारूंच नयेत. त्यावेळीं यात्रेस निघतांना हा विचार करून, जीवावर

तुळशीपत्र ठेवूनच माणसें निघत. असल्या दुर्दैवी प्रसगाच्या त्यावेळच्या गोष्टी आम्हीं आमच्या आजीच्या तोंडून ऐकलेल्या आहेत आणि समक्ष पाहिलीहि आहे. पण हल्लीं असले प्रसंग क्वचितच. कारण प्रसंग गुदरलाच तर त्यांतून निभावण्याचीं साधनेंहि, बाबा काळी कमळीवाले ह्यांच्या उद्योगानें सुलभ झालेलीं आहेत. कोणी पैसे-वाला म्हणून त्याचे हाल चुकत नसत. गरीबाप्रमाणेंच त्यालाहि गैर-सोयी मुकाटयानें सोसाव्या लागत. अशी ही गैरसोयीमुळें होणाऱ्या हालअपेष्टांची स्थिति प्रत्यक्षानें अनुभवून आणि यात्रेकरूंची पाहून स्वामीजींचें दयार्द्र अंतःकरण विरघळलें. प्रवासांतील अडचणी, धोके व गैरसोयी नाहींशा करण्याचा स्वामीजींनीं तत्काळ निश्चय करून ते त्या उद्योगास लागले. व्याख्यानांचे दौरे काढणें, यात्राक्लेशनिवारक समिति स्थापणें, वर्तमानपत्री गाजावाजा करणें, सभा करून ठराव करणें, सरकारदरबारीं शिष्टमंडळ पाठवून दुखणें वेशीवर टांगणें, असले आधुनिक लोकशाही उपाय त्यांना सुचले नाहींत किंवा फलदायीं वाटलें नाहींत. ते धार्मिक प्रवृत्तीचे होते. लोकांचें दुःख तें आपलेंच दुःख असें समजणारें ते होते. मानापमानाचें गाठोडें त्यांच्या-जवळ नव्हतें. ते खरे विरक्त संन्याशी होते. यात्रेकरूंचे हाल वांच-विणें, हीच जनता–जनार्दनाची सेवा, असा परमेश्वरी आदेश समजून उर्वरित आयुष्य ह्याच कामीं वेंचावयाचें असा स्वामीजींनीं निर्धार केला होता. स्वामीजींना व्यवहारी जग चांगलें माहीत होतें. ह्या कामा-करितां थोडाथोडका पैसा पुरणारा नव्हता. लाखों रुपयेहि कमीच पडणार, हें ते जाणून होते. पै पैशानें भिकेची हुंडी शिक्यास पोहोंचत नाहीं हीहि गोष्ट त्यांच्या दृष्टीपुढें होती. लोकसेवाव्रतधारी आंग्ल-विद्याविभूषित राजमान्य राजश्री यांजकडून ही धार्मिक बाब म्हणूनच कोरडी सहानुभूतीसुद्धां मिळणें कठीण, मग द्रव्य–सहाय्य कोठचें मिळणार ? ही स्थिति त्यांस पूर्ण अवगत होती. धार्मिक वृत्तीचे व धनसंपन्न लोकच ह्या कामीं विशेषानें मदत करूं शकतील असा कयास बांधून स्वामीजींनीं प्रथम कलकत्ता हें आपल्या भिक्षां-देहीचें कार्यक्षेत्र ठरविलें.

भिक्षां देही

संकल्पाप्रमाणें स्वामी कलकत्त्यास आले. त्यांनीं अनेक श्रीमान, लक्ष्मीपुत्र व्यापाऱ्यांच्या विशेषतः मारवाड्यांच्या गाठीभेटी घेतल्या. पण स्वामी झाले म्हणून काय झाले, त्यांस कोणीच ओळखीना. कच्च्या दिलाचा, ध्येयरहीत एखादा माणूस असतां तर हताश होऊन गेला असता. पण स्वामीजी त्यांपैकीं नव्हते. त्यांनीं हें जीवित कार्यच ठरविलें होतें. ही त्यांची परमेश्वर सेवाच होती. तिन्ही त्रिकाळ त्यांच्या दृष्टीपुढें यात्रेकरूंचे हाल उभे रहात होते. निराशेनें स्वस्थ बसणें किंवा ह्या कार्यापासून निवृत्त होणें हा त्यांचा पिंड नव्हता. 'देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत्', 'देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो!' अशा निर्धारी निष्ठेचे ते होते. आत्मक्लेशानें दुसऱ्यांचें लक्ष वेधून घेऊन त्यांच्या हृदयास पाझर फोडावा, यात्रिकांच्या हालअपेष्टांबद्दल त्यांच्यांत सहानुभूति उत्पन्न करावी, म्हणून त्याकाळीं म्हणजे साठपासष्ट वर्षांपूर्वीं स्वामींना प्रायोपवेशनाचा मार्ग सुचला आणि त्यांनीं लगेच सुरवातहि केली. स्वामीजींचें तपोबल व आत्मनिष्ठा अशीच होती कीं, तिचा प्रभाव दोनतीन दिवसांतच दिसून आला. दुर्लक्षित केलेल्या स्वामींकडे लोकांचें लक्ष वेधून फळफळावळ तरी घेण्याचा आग्रह होऊं लागला. स्वामीजींनीं एकदांच निक्षून सांगितलें कीं, "मै तो अकेला व्यक्ति हुं। दया करके मेरे प्राणकी रक्षा करनेंकी यह बात नहीं है। मै तो संन्यासी हू। जनता-जनार्दन की सेवा न करे तो संन्यासी का जीवन मृत समान ही है, ऐसा मै मानता हूं। प्रतिवर्ष सहस्रों यात्री जिसमें कतिपय बूढे तथा औरतें रहती है, अपने प्राणसे प्यारे बालबच्चों का और सब वस्तुओंका मायापाश तोडकर उत्तराखंड तपोभूमीमें देवऋषीके साथ बैठे हुअे भगवान बदरी विशालजीका पुण्यपावन दर्शन लेनेके लिये खुशीसे-ही अत्यंत दुर्घट वनवास स्वीकार करते है। जहाँ खानेकी चीज दुर्मिल है, दस दस, पंधरह पंधरह मीलपर जलका अभाव है, ठहराने के लिये सराई वा खाली पर्णकुटी भी नहीं रहती, पैदल मार्ग भी नहीं, तो खोलेके पार जानेके लिये पूल या झूला होने की बात दूर ही है। इस यात्रा में कष्ट तो बहुत होते है, और हरघडी जानको धोखाही

रहता है, इन सब कष्टोंका और धोखेंका कारण पहिलेही दूर करनेकी आवश्यकता है। इस लिये द्रव्यकी भिक्षा मांगता हुं। वह देनेका अभि-वचन दे दो, फिर मेरा प्रायोपवेशन स्थगित कर अन्नसेवन करूंगा।"

हा निग्रह ऐकून जमलेली मंडळी स्तब्धच झाली. त्यांच्यांत स्वामीजींबद्दल आदर वाढला. कितीहि परोपकार बुद्धि असली तरी व्यापाऱ्यांतील व्यवहारी दृष्टि जागृत असते. त्यास अनुसरून एकानें प्रश्न केला कीं, "स्वामीजी समझ लीजिये कि कोइ आदमी जिम्मेदारी लेकर अंशतः द्रव्य आपको दे दे, तो एक अंदेशा रहता है, कि इस निर्जन पहाडों और जंगलोंमें इमला बनानेके लिये पत्थर, लकडी, चुना, मिट्टी, बढई, राज और मजदूर कहांसे मिलेंगे? उस कामकी जिम्मेदारी अपने सिरपर कोन लेगा? और इमारत तैयार होनेके पश्चात् उसकी देखरेख और दैनंदिन कारोबार कौन करेंगे?"

स्वामीजी म्हणाले कीं, "भगवानकी कृपा हो तो सब कुछ ठीक हो जाता है। जो भगवान धर्मात्मा पुरुषके अंतःकरणमे पैसा देनेकी प्रेरणा करें वही भगवान आदमी, मजदूर और इंजेनेर के अंतःकरणमें प्रेरणा नहीं करेंगे क्या? मै तो एक दिन जानेवाला ही हुँ। परंतु यह कार्य परंपरा अखंडही चालनेवाली है।"

स्त्रीस्वभाव पुरुषांपेक्षीं अधिक भावनावश असतो. त्या दृष्टीनें एक धनाढ्य सुवासिनी भगिनी पुढे येऊन म्हणाली कीं, "पूज्यवर स्वामीजीने इच्छित कार्यसिद्धिके लिये प्राणार्पण करनेका संकल्प किया है। यह देखकर मै सुचित करना चाहती हुँ कि, स्वामीजीके प्राणोंकी रक्षा पहले की जाय। जो कुछ भिक्षा स्वामीजी चहाते है उसका उद्देश यह है कि, बदरी विशाल गोपाल कृष्णका दर्शन लेने-वाले यात्रीओंका कष्ट दूर कर उनका मार्ग सुकर और निर्भय कर दे। इसमें उनका स्वार्थ यत्किंचित् नही है। वस्तुतः यही कन्हया-लालका अच्छे प्रकारका पूजन है। द्रव्य जमाकरनेंका आश्वासन दे कर उनको प्राणोंकी रक्षा करनेके पश्चात् सराइका काम और उसका कारोबार चलानेका विचार हो सकता है। स्वामीजीके इच्छित कार्यसिद्धिके लिये मेरेपास अभी जो कुछ सुवर्णालंकार है ये सब मै अुनको अर्पण करती हुं।"

## शुभारंभ

असें बोलून त्या भगिनीनें आपले अंगावरील पांच हजार रुपये किमतीचे अलंकार काढून स्वामीजींपुढें ठेविले. स्वामीजींनीं ते सर्व साभार परत करून म्हटलें कीं, ' माइजी ! आपका अंतःकरण तो बहुत दयार्द्र और उदार है । आपकी बात सुनतेही कार्यसिद्धि का शुभारंभ मैं मानता हुँ। फिर अपने जो कुछ अल्पस्वल्प भिक्षा जनता-जनार्दन की सेवा के लिये अर्पण की है, वह आपके पूज्य स्वामी की अनुमती के बिना मैं स्वीकार नहीं कर सकता । ''

स्वामीजींचें हें सडेतोड, निस्पृह उत्तर ऐकून त्यांबद्दलचा लोकांचा आदर अधिकच वाढला.

ही वार्ता वणव्यासारखी तेव्हांच गांवभर पसरून सर्वतोंमुखीं झाली. स्वामीजींवर पैशांचा पाऊस पडला. स्वामीजींच्या अंगीकृत कार्याचें बीजारोपण हें असें झालें. त्या बीजाचा मोठा वृक्ष होऊन तो इतके दिवसांत नमुनेदार डवरला आहे.

## कै. बाबा काळी कमळीवाले

स्वामीजींचे अंगावर नेहमीं एक लंगोटी व एक काळ्या कांबळचाची कफनी एवढींच वस्त्रें असत. त्यामुळें विशुद्धानंद-स्वामीजींचे नांव काळी कमळीवाले असें पडलें. आणि त्यांच्या नांवावरूनच त्यांच्या संस्थेचें नांवहि 'बाबा काळी कमळीवाला क्षेत्र' असें पडलें आहें.

ज्यासी आपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।

ही तुकाराममहाराजांची कसोटी वैकुंठवासी बाबा काळी कमळी-वाले ह्यांस अक्षरशः लागू पडते.

'अल्पारंभः क्षेमकरः' ह्या दृष्टीनें बाबा कमळीवाले ह्यांच्या देखत नऊ सदावर्तें चालू झालीं होतीं. बाबांना त्यांच्या ह्या उद्योगांत बाबा रामनाथ ह्यांचें सहाय्य चांगलेंच होत असे. बाबांनीं सन १८९७ चे सुमारास आपला देह ठेविला. तेव्हांपासून त्यांच्या कामाची धुरा बाबा रामनाथ ह्यांच्या खांद्यावर येऊन पडली. त्यांनीं मोठ्या दक्षतेनें आणि चातुर्यानें संस्थेचें काम एकोणतीस वर्षें चालविलें आणि

आपल्या दीर्घोद्योगानें सदावर्ताची संख्या ४८ पर्यंत नेली. वाटेवर शिधासामुग्री मिळण्याचीं दुकानें नव्हतीं तेथें प्रोत्साहन देऊन वा प्रत्यक्ष पैसेहि देऊन तीं काढविलीं.

बाबा रामनाथजीनंतर सन १९२६ मध्यें हें काम बाबा मणीराम ह्यांजकडे आलें. त्यांनींहि ह्या संस्थेचा व्याप खूपच वाढविला आहे. ५७ सदावर्तें, १२ औषधालयें, ६५ धर्मशाळा, ४२ प्याऊ पाणपोया, ५ गोशाळा, ३ पाठशाळा, एक प्रयोगशाळेसह आयुर्वेदिक महाविद्यालय आणि एक सेवासमिति इतक्या शाखा चालू आहेत. हे आंकडे दहा वर्षांपूर्वींचे आहेत. गेल्या दहा वर्षांत ह्या शाखा वाढल्या असणारच. धर्मशाळांचा आंकडा ८५ झाला आहे. बाबा मणीराम ह्यांनीं ह्या संस्थेचा कारभार विश्वस्त मंडळाचे स्वाधीन केला आहे. ५० विश्वस्त असून त्यांत सांगली येथील गजानन वीव्हिंग मिलचे धनी श्री. वि. रा. वेलणकर ह्यांचा नुकताच समावेश झाला आहे. विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष शेठ दीपचंदजी पोतदार आहेत. मुख्य कचेरी कलकत्त्यास असून प्रधान कार्यालय हृषीकेश येथें आहे. येथील संचालक रावबहादूर सेवानिवृत्त पंडित दत्तशर्मा, हे आहेत. त्यांचें काम विनावेतन आहे.

विशुद्धानंद म्हणजेच बाबा काळी कमळीवाले ह्यांचे यात्रा सहाय्याचें काम शिष्यपरंपरेनें चाललेलें नसून तें सच्छील कार्यकर्त्यांच्या परंपरेनें चाललें आहे. म्हणूनच ती संस्था दीर्घायुषी व भरभराटींत आहे.

ही संस्था निघाल्यापासून यात्रेंतील गैरसोयी संपल्या. वाटा, झूले ह्यांचे धोके नाहींसे झाले. वसतीकरितां धर्मशाळा झाल्या. पाणपोयांची सोय झाली. औषधोपचारांची व्यवस्था झाली. गोरगरीबांसहि देवदर्शनाची इच्छा असते. किंबहुना सधनापेक्षां ती त्यांस अधिक तीव्र असते. ह्या दृष्टीनें काळी कमळीवाले बाबांनीं त्यांचीहि सोय उत्तमच केली आहे. वाटेवर जागजागीं सदावर्तें व अन्नछत्रें ठेविलीं आहेत. धर्मशाळेंत दिवाबत्ती व जेथें फार थंडी असते तेथें शीत निवारण्यास कांबळी, चुटके (जाड ब्लँकेटें) मिळण्याचीहि सोय आहे. ह्या संस्थेचा लाभ गरीब, श्रीमंत यांना सारखाच होतो. त्यांत वर्गवारी नाहीं.

हृषीकेश येथून निघतांना प्रत्येक यात्रेकरूस यात्रेंत कसें रहावें,

काय खावें, प्यावें, काय काय वर्ज्य करावें, रोगराईविषयीं सावध असावें, वगैरेबद्दल महत्त्वाच्या उपयुक्त व मोठ्या कळकळीच्या सूचना मिळतात. इतकेंच नव्हे तर संभाव्य रोगराईवर, बद्धकोष्ठ, कॉलरा, अमांश, थंडी, ताप, पाणी बाधू नये म्हणून औषधांची माहिती देतात. कांहीं ठिकाणीं विनामूल्य औषधालये आहेत. संस्थेमार्फत बोजेवाल्यांचें ठरावहि होतात. हृषीकेश येथें संस्थेकडे कोणी पैसे ठेवून त्यांपैकीं अमुक इतका पैका अमुक स्थानीं वाटेंत मिळावा असें सांगितलें तर तशी चोख व्यवस्था होते. ह्या सर्व गोष्टी धर्मार्थ होतात. त्यास कसलेंच मोल पडत नाहीं. वाटल्यास स्वेच्छेनें संस्थेस देणगी द्यावी.

## पंजाब क्षेत्रें व देवी अहिल्याबाईच्या धर्मशाळा

बाबा काळी कमळीवाला ह्यांच्याप्रमाणेंच ह्या यात्रांतील वाटेवर पंजाबी लोकांनीं बांधलेलीं 'पंजाब क्षेत्रें' कोठें कोठें आहेत. धर्ममूर्ति देवी श्री. अहिल्याबाई होळकर ह्यांनीं आपल्या राजवटींतच म्हणजे सन १७६७ ते १७९५ पर्यंत सर्व हिंदुस्थानांत—बदरीकेदार ते रामेश्वर व द्वारका ते जगन्नाथ, येथें जो दानधर्म केला आहे त्यांत हरद्वार येथें गंगेवर कुशावर्त घाट व ओऱ्या आणि धर्मशाळा बांधली आहे. त्याचप्रमाणें बदरीनारायणाचे वाटेवर पांच सहा धर्मशाळा बांधल्या. ह्याशिवाय बदरीकेदार मंदिर, गौरीकुंड, तप्तकुंड, कुंडचट्टी—कुंड, हरी मंदिर, वगैरे ठिकाणें बांधलीं. तीं अजूनहि जाग्यावर पहावयास सांपडतात. गाईना चरण्यासाठीं म्हणून एक मोठें कुरण—गोचर घेतलें. हरद्वार व बदरीकेदार येथें सदावर्तें ठेवलीं.

## मुनीकी रेती

हृषीकेशपासून सुमारें दीड मैलावर मुनीकीरेती म्हणून गांव आहे. तें गंगेच्या उजव्या कांठीं वाटेवरच आहे. ह्या ठिकाणीं पूर्वीं रैभ्य ऋषींनीं मौन धारण करून तपश्चर्या केली होती, म्हणून ह्या स्थानास मुनीकी रेती नांव पडलें आहे. येथें शत्रुघ्नाचें मंदिर आहे. धर्मशाळाहि आहे. सुप्रसिद्ध स्वामी रामतीर्थ हे येथें येऊन कांहीं काळ एकांतांत रहात असत. त्यांच्या स्मरणार्थ एक 'रामाश्रम' नांवाचें संस्कृत वाचनालय येथें चाललें आहे. मुनीकी रेती येथें गढवाल संस्थानची हद्द लागते. येथूनच नरेंद्रनगरला वाट जाते. ती

मोटारनें दहा मैल तर पायीं पांचच मैल आहे. हल्लींच्या महाराजांनीं हें गांव वसविलें. अशींच आणखी गांवें—कीर्तिनगर, प्रतापनगर निरनिराळ्या महाराजांनीं आपआपल्या राजवटींत छांदिष्टपणानें वसविली. गढवाल संस्थानची पूर्वींची राजधानी 'टेहरी' होय. आणि म्हणूनच संस्थानी गढवालास टेहरी गढवाल असें संबोधितात. यमुनोत्तरी व गंगोत्तरी हीं क्षेत्रें टेहरी गढवालमध्येंच आहेत.

हरद्वारपासून हृषीकेशपर्यंत गाडी-घोडा जाण्यासारखीं १४ मैलांची पक्की सडक फारा दिवसांची आहे. मोटारी आल्यासून ती लक्ष्मणझूल्यापर्यंत वाढली. सुमारें १५ वर्षांपूर्वी ती देवप्रयागपर्यंत होऊन आतां ती हरद्वार पासून चमोलीपर्यंत १३९ मैलांची मोटार सडकच झाली आहे.

मोटार होण्यापूर्वी व अजूनहि पुष्कळ यात्रिक पायींच प्रवास करतात. त्यांच्या पायीं प्रवासास आरंभ हृषीकेश येथून होतो. येथें ओझेवाले मिळतात. आपणांस करावयाचा प्रवास केवढा, आपलें ओझें किती, वाटचालीशिवाय आपले टप्पे किती होणार, व त्याचें वेतन किती ह्यांसंबंधीं ओझेवाल्यांबरोबर रीतसर करार करून मगच निघावयाचें असतें. ती सर्व व्यवस्था येथें होऊं शकते.

हरद्वारपासून लक्ष्मणझूल्यापर्यंतची १७ मैल वाट भागीरथीच्या उजव्या म्हणजे अलीकडील कांठानें आहे. लक्ष्मणझूल्यानें भागीरथी ओलांडली म्हणजे पुढील पायदळ वाट देवप्रयागपर्यंत परतीरानें म्हणजे भागीरथीच्या डाव्या कांठानें जाते. मोटार सडक भागीरथीच्या उजव्या कांठानें जाते. म्हणून तिला लक्ष्मणझूला किंवा अन्यत्र भागीरथी ओलांडावी लागत नाहीं.

### झूले अथवा लोंबते पूल

नदी—नाल्यावरून पलीकडे जाण्यासाठीं कमानीचे केलेले पूल आपल्या नेहमींच्या परिचयाचे आहेत. हिमालयांत नद्यांवर अथवा ओढ्यानाल्यांवरसुद्धां कमानी बांधतां येत नाहींत. तेथें पक्का धर लागत नाहीं. पाण्याचा प्रवाह इतका जोराचा असतो कीं, मोठमोठे गोटे सुद्धां त्यांत धडाधड वहात जातात. असल्या आदळआपटीच्या धक्यापुढें कमानींचा टिकाव कसा लागावयाचा? म्हणून प्रवाहाच्या

आटोक्याबाहेर दोन्ही कांठीं उंचवट्यावर चुनेगच्ची बांधकामाचें किंवा गर्डरचे उंच खांबासारखे पक्के ठिय्ये उभारतात. ह्या ठिय्यांचे मागचे बाजूस पहारीसारखे लोखंडी जाड खुंटे कांक्रीटमध्यें पक्के पुरून त्यास तारांच्या दोरखंडांचीं टोकें पक्कीं अडकवितात. हे दोरखंड, अनेक बारीक तारांचे पिळवटून मनगटासारखे जाड केलेले असतात. त्यांचें एक टोक एका बाजूच्या खुंटयास अडकवून, तो दोर दोन्ही खांबावरून नेऊन त्याचें दुसरें टोक दुसऱ्या बाजूच्या खुंटयास ताणून अडकवितात. ते कितीहि ताणले तरी त्यास लांबीच्या मानानें झोळ रहातोच. ह्या रहाणाऱ्या झोळाच्या मानानें ठिय्यांच्यावर खांबाची उंची असते. झोळाचा खालचा बाक वाटेच्या पातळीवर कमरेइतक्या उंचिला आणलेला असतो. वाटेच्या दोन्ही अंगास असे दोर सारख्या झोळाचे बसविलेले असतात. ह्या दोरांच्या झोळास दोन दोन फुटांच्या अंतरानें लोखंडी अर्धा ते एक इंच जाडीच्या शिगांचे आंकडे अडकवितात.

ह्या आंकडयांची लांबी अशी मापांत असते कीं त्यांचें एक एक टोक झोळ आलेल्या दोरखंडास अडकविलें कीं, दुसरीं टोकें एकसारखीं वाटेच्या पातळींत यावीत. ह्या लोंबत्या दोन्ही बाजवांच्या टोकांस पुन्हां तारांचा दोरखंड किंवा जॉइस्ट अडकवून त्यावर कडीपाट, किंवा समोरासमोरचे लोंबत्या टोकास लांकडी अगर लोखंडी कडया बसवून त्यावर फळया बसवितात. कित्येक ठिकाणीं ह्या फळयांवर डांबरी वाटाहि केलेल्या आहेत. अशा तऱ्हेचे हे टांगते पूल केलेले असतात. कित्येक ठिकाणीं दोरखंडांऐवजीं जाड साखळदंड किंवा सहा इंच रुंद अर्धाइंच जाडीचे लोखंडी पाटेहि वापरलेले दिसतात. कर्णप्रयाग येथें असला पाटयांचा झूला आहे. साखळदंडी झूले विशेषत: नेपाळांत आहेत. टांगतापूल म्हणजेच झूला. 'सस्पेंशन-ब्रिज'. झूला म्हणजे पाळणा; झोके घेतां येतात तो. झूल्यावरून चालतांना तो हलत असलेला कळून येतें.

लक्ष्मणझूला तारांच्या दोरखंडांचा असून त्यास एकेका बाजूस चार वर आणि एक खालीं असे पांच पांच दोरखंड आहेत. ह्याची लांबी चारशें फुटावर असून रुंदी चार साडेचार फूट आहे. उन्हाळयांत तो पाण्याच्यावर छप्पन्न फूट होता. त्यावरील वाट डांबरी केलेली

आहे. ५०–६० वर्षांपूर्वी एक सुंभाचा दोरखंड बांधून त्यास सहज सरकेल असें शिंकें अडकवून त्यांत माणसानें बसावयाचें व तें शिंकें एका दोरीनें परतीरास ओढून घ्यावयाचें. असें तें एक दिव्यच असे. आतां तें दिव्य राहिलें नाहीं. तो शिक्याचा प्रकार श्री कैलासचे वाटेवर धारचुला येथें आम्हास पहावयास सांपडला. मात्र त्याचा दिव्य प्रयोग आम्हास करून पहावा लागला नाहीं. रुद्रप्रयागवरून श्री बदरी-केदारास जाण्याचे वाटेवर तेथेंच मंदाकिनी ओलांडून जाण्यासाठीं अजूनहि सुंभाच्या दोरांचा झूला आहे. नेपाळांत सुंभाचाच काय पण तातापाणी येथें गंडकी ओलांडण्यासाठीं बांबूच्या पाठसालींच्या दोरांचा झूला आहे. त्यांची सविस्तर माहिती यथाक्रम पुढें सचित्र येईलच. आमच्या दीड हजार मैलावरील हिमालयांतील प्रवासांत लक्ष्मण-झूल्याएवढा मोठा झूला अन्यत्र कोठेंहि लागला नाहीं.

लक्ष्मणझूल्याजवळ लक्ष्मणाचें देऊळ आहे. त्याचें दर्शन घेऊनच पुढच्या प्रवासास पाय उचलावयाचा. लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, ह्यांचीं स्वतंत्र अशीं देवळें अन्यत्र कोठेंहि आढळत नाहींत. वनवासानंतर त्यांनीं येथें येऊन तपश्चर्या केल्याचे उल्लेख पुराणांतरीं आहेत. येथें दोन तीन धर्मशाळा व सदावर्तेंहि आहेत. हृषीकेशपासून लक्ष्मणझूल्या-पर्यंतची तपोभूमि आहे. पुढें स्वर्गभूमि लागते. ह्या तपोभूमीच्या दोन्ही बाजूस डोंगर असून ते वनश्रीनें सर्वतोपरी आच्छादिलेले आहेत. त्यांच्यामधूनच भागीरथी गंगेचा प्रवाह अखंड चालू आहे. हिमा-लयाच्या वैभवाची चुणूक प्रथम येथेंच दिसते. अशा ह्या तपोभूमींत साधारण मुनीकी रेतीच्या समोर भागीरथीच्या कांठीं एक स्वर्गाश्रम नांवाचें रम्य स्थान आहे. भागीरथीला एक लहानच पण फरसबंदी सुन्दर घाट आहे. त्यावर महादेवाचें देऊळ आहे. देवाची शाळुंका काळी कुळकुळीत असून पिंडी पांढरी शुभ्र आहे. भागीरथीचें पात्र ३०० फुटावर रुंद आहे. पाणी खोल व प्रवाह संथ आहे. येथें ह्या कांठावरून त्या कांठीं जाण्या येण्यास नांव अक्षय्य चालू असते. जाण्या-येण्यास भाडें पडत नाहीं. स्वर्गाश्रमाचे आवतींभोंवती गंगाकांठानें एकमेकापासून दूर दूर अशा खऱ्या पर्णकुट्या आणि साधीं घरें बांधून त्यांत साधू, संन्यासी, बैरागी वगैरे विरक्तीच्या मार्गास लागलेले

साधक रहातात. ह्या लोकांचा आचार नियमित व एकनिष्ठेचा दिसतो. जो तो आपआपल्या कार्यांत गढून गेलेला असतो. कोणाचा कोणास उपद्रव नाहीं. कोणाचें जपानुष्ठान तर कोणाचा रामनाम पाठ, कोणाचें वेदान्ताध्ययन, तर कोणाचीं योगासनें, कोणाचा प्राणायाम तर कोणाची ध्यान–धारणा. एवंच, सर्वच पारमार्थिकमार्गी अभ्यासू. सांसारिक रहाणीचें वारेंसुद्धां येथें नाहीं. येथील वातावरण शांत प्रसन्न व म्हणूनच एकाग्रतेस अनुकूल झालेलें आहे. ह्यामुळें ह्या तपोवनास खरी सार्थकता आली आहे.

स्वर्गाश्रमापासून नावेनें अलिकडे आलों. येतांना नाव मध्य धारेंत आली तेव्हां घरीं पाठवून देण्यासाठीं कळशींत गंगा भरून घेतली. हृषीकेश येथें कळशीचें तोंड बंद करून घेतलें. मोटारनें हरद्वारास परत आलों.

## बोजेवाले

हिमालयांतील यात्रा वा प्रवास करावयाचा म्हणजे तो बोजेवाल्यांच्या जीवावरच होत असतो. त्या पहाडप्रांतीं गाडी तर नाहींच पण घोडा–गाढवही कित्येक ठिकाणीं जाऊं शकत नाहीं. बदरीनारायणाकडे कांहीं भागांत घोड्यावरून वहातूक होत असली तरी ती अखेरपर्यंत होऊं शकत नाहीं. आपल्याबरोबर घ्याव्या लागणाऱ्या सामानसुमानांचीं ओझीं माणसेंच पाठीवर वाहून नेतात. ज्यांना चालण्याची शक्ति नाहीं किंवा ज्यांना संपन्नतेमुळें चैनींत व आरामांत प्रवास करावयाचा असतो अशांकरितां कंडी, दांडी व झंपन अशीं बसून जाण्याचीं वाहनें मिळतात. हीं सुद्धां माणसांनींच वाहून न्यावयाचीं असतात. असली ही सर्व तऱ्हेची वहातूक करणारीं जीं माणसें त्यांसच वर बोजेवाले असें म्हटलें आहे. हे बोजेवाले जर विश्वासू, माणुसकीचे व जोखीम ओळखणारे असले तरच प्रवासाचे कष्टांत आणखी भर पडत नाहीं. नाहींतर सुखाचा जीव दुःखांत घालून नसती उरस्फोड, काळजी व हालअपेष्टा विकत घेतल्यासारखें होतें. मुक्तिनारायणाचे यात्रेंत नेपाळांत आणि कैलासकडे तिबेटांत आम्हास हा चांगला अनुभव आला आहे. त्या अनुभवानें ह्या बोजेवाल्यांची प्रतवारी लावितां येते. अगदीं पहिल्या प्रतीचे म्हणजे

गढवाली. ते हरद्वार, हृषीकेश व वाटेंतहि मिळतात. विश्वासू व माणूसकी ह्याबद्दल त्यांची ख्याती आहे. ते अल्पसंतोषी असल्यामुळे त्यांस चार दोन पैसे 'चबिना' म्हणून रोज दिला तर भांडीं घासणें, पाणी आणणें वगैरे कामें ते आनंदानें करितात. आपण त्यांजविषयीं आत्मियता दाखविली तर तेहि आपणांविषयीं तितकीच आत्मियता दाखवितात.

कैलास–मानस–यात्राप्रसंगीं अल्मोऱ्याहून हिंदुस्थानच्या सीमेजवळील गांव जें गर्ब्यांग तेथपर्यंत दीडशें मैल जाण्याकरितां कुमाउ जिल्ह्यांतील पहाडी बोजेवाले केले होते. तेहि गढवाल्याप्रमाणेंच पहिल्या श्रेणींत बसतील. गढवाली व पहाडी ह्यांची रहाणी स्वच्छ असते. ते रोज अंघोळी करतात. म्हणून त्यांच्या अंगावर उवा कमी असतात.

नेपाळी कुली गैरविश्वासू व केव्हां कोठें फसवतील ह्याचा नेम नाहीं. त्यांच्या विषयीं नेहमीं सावधच राहिले पाहिजे. काम मिळविण्यासाठीं दोन पैसे कमी घेतात. त्यांची रहाणीहि घाणेरडीच असते.

शेवटचा क्रम म्हणजे तिबेटी लोकांचा. त्यांना जबाबदारी कळतच नाहीं. माणुसकी म्हणून कांहीं असते हें त्यांना ठाऊक नाहीं. अतिशय अडदांड व केव्हां एकेरीवर येऊन सुराच काढतील ह्याचा नेम नाहीं. तिबेटच्या प्रवासांत ते आमचे नौकर नव्हते तर त्यांच्या इच्छेप्रमाणें ते आमची परवड करीत होते. जन्मादारभ्य त्यांच्या अंगास एकदांसुद्धां पाणी लागत नसेल.

सर्वच तऱ्हेच्या बोजेवाल्यांच्या बाबतींत एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत बाळगली पाहिजे कीं, त्यांच्या मदतीवरच आपला प्रवास शेवटास न्यावयाचा असतो. त्या पहाडी व अनोळखी प्रदेशांत एखाद्याचें आपणाशीं बिनसून त्यानें काम सोडलें तर दुसरा त्याचे जागीं त्याच्या संमतीशिवाय येणार नाहीं. ह्या दृष्टीनें त्यांच्यांत एकोपा चांगला असतो. म्हणून होतां होईल तों आपल्या स्वाभावाच्या लहरी व धनीपणाची ऐट ह्यास आळा घालून आपण गरजू म्हणून त्यांच्याशीं जमतें घेण्याची प्रवृत्ति सतत राखण्याची काळजी घ्यावी.

## डेहराडून व मसुरी

हरद्वार येथेंच गढवाली बोजेवाले केले. त्यांस पंचवीस रुपये

विसार दिला. गढवाली बोजेवाल्यांपेक्षां नेपाळी दहा दहा रुपयांनीं स्वस्त मिळत होते. पण ते गैरविश्वासू असतात असें समजल्यावरून केले नाहींत. हा समज अगदीं यथार्थ असल्याचा प्रत्यक्षानुभव आम्हास श्रीमुक्तिनारायणाचे यात्रेंत पुरेपूर आला.

नेहमीं लागणाऱ्या कपड्यांशिवाय विशेष थंडीकरितां म्हणून हंतरणें—पांघरणेंकरितां व अंगांत घालण्याकरितां लोकरी कपडे, दोन महिने वास न लागतां टिकतील असे खाद्य पदार्थ आणि प्रसंगीं उपयोगी पडतील अशा औषधी, ह्या जिनसांचीं बेगमी धरून निघतांनाच करून घेतली होती. सर्व प्रवास पायींच करावयाचा असा निर्धार केला होता. म्हणून दांडी कंडीची चौकशीसुद्धां केली नाहीं. चार दिवस राहून दुपारीं तीनचे गाडीनें डेहराडूनला जाण्यास बोजेवाल्यांसह निघालों. त्यांचा भाडेखर्च त्यांनीं केला. माणशीं एक रुपया भाडें होतें.

निघतां निघतां गंगामाईचें दर्शन घेऊन निघावें म्हणून घाटावर गेलों. ऊन कडक पडून पायास चटकेच बसत होते. पाणी दांतांत कळा करील असें गार ठणक होतें. अशा स्थितींत पांच सात यात्री, बहुतकरून ते तत्प्रांतीयच असावेत, गंगास्नान करून ओल्या वस्त्रानेंच घाटावर गंगास्तवनपर दोहे मोठ्या भावभक्तीनें म्हणत होते. ह्या भजनांत ते नादावून इतके दंग होऊन गेले होते कीं, त्यांस त्या भाजून काढणाऱ्या उन्हाची क्षितीच वाटत नव्हती. भावभक्तीच्या उमाळ्यापुढें देहभानसुद्धां कसें विसरून जातें ह्याचें हें प्रात्यक्षिकच दिसून आलें. श्रीगंगामाईचा महिमाच असा आहे कीं, त्यापुढें कोणासहि भक्तिभावाच्या महापुरांत निमग्न होऊन ऐहिक काय किंवा पारलौकिक काय ऐश्वर्य तुच्छच वाटावें. ह्या लोकांची ही तल्लीन अवस्था पाहून जगन्नाथ पंडितांनीं असल्याच अवस्थाप्रसंगास तंतोतंत लागू पडेल असें जें गंगामाईचें वर्णन गंगालहरींत केलें आहे तें डोळ्यांपुढें नाचूं लागलें.

अपि प्राज्यं राज्यं तृणमिव परित्यज्य सहसा ।
विलोलद्वा नीरं तव जननि तीरं श्रितवताम् ।।
सुधातः स्वादीयः सलिलभरमातृप्ति पिबताम् ।
जनानामानंदः परिहसति निर्वाणपदवीम् ।।

अर्थः—हे गंगे! आपलें राजवैभव राज्यसुख, कस्पटाप्रमाणें सहज टाकून देऊन तुझ्या कांठच्या नुसत्या वृक्षछायेंतसुद्धां जो आनंद वाटतो, तुझ्या यथेच्छ जलपानांत अमृतपानाचा जो सुखानंद होत असतो तो मोक्षसुखालाहि लाजविणारा आहे.

गंगेचा शुद्ध निर्मल प्रवाह पाहून ह्या पवित्र वातावरणानें हृदय भरून आलें. आणखी कांहीं वेळ येथें थांबावें असें वाटूं लागलें. पण निघण्याची सर्व तयारी होऊन उभ्या उभ्या म्हणून घाटावर आलों होतों. अशाही स्थितींत एकतरी बुडी मारण्याचा मोह अनावर झाला. भजनी मंडळींचीच लोटी घेऊन स्नान करून घेतलें. घरीं आलों तों आमचे ओझेवाले सामान घेऊन मार्गस्थ झाले होते. लगेच निघून आम्ही त्यांना स्थानकाजवळ गांठलें.

साडेतीन वाजतां गाडी सुटली. डेहराडूनपर्यंत पन्नास मैल अंतर जाण्यास साडेसहा वाजले. डेहराडून हें आगगाडीचें अखेरचें स्थानक आहे. येथें वस्तीस उतरण्याची सोय चांगली आहे. मसुरीचा पायथा येथून सात मैल रहातो. तेथपर्यंत जाण्यास सर्व्हिस-मोटार सकाळीं लवकर मिळणार नाहीं म्हणून आम्ही डेहराडून स्थानकावरून थेट राजपुरी येथें रात्रींच्या वस्तीकरितां आलों. हें गांव म्हणजे एक उतार तळच आहे. येथें एक लहानसें रामाचें देऊळ असून शेजारीं तशीच ओवरी आहे. ह्या जागेशिवाय अन्यत्र उतरण्याची सोय नाहीं. आम्ही येथें पोहोंचण्यापूर्वीच तेथील जागा खेचून भरून गेल्या होत्या. देवळाभोंवतीं जेमतेम दीडहात रुंदीची प्रदक्षिणेची उघडी वाट मोकळी होती. तीवरच परिस्तरण करून आम्हीं आपल्या पथाऱ्या लावल्या. हरद्वाराप्रमाणेंच येथेंहि उकाडा मनस्वी होता. मसूरीहून येथें नळ आणलेले आहेत. त्यामुळें पाणी मात्र बर्फाप्रमाणें गार होतें.

## डेहराडून

आपल्याकडील पायथ्याची हिमालयाची पहिली (पूर्व पश्चिम) रांग आणि तिला समांतर पण तिच्या बरीच अलीकडे (दक्षिणेस) असणारी शिवालिक रांग ह्यांच्यामध्यें नौकाकाराचीं बनलेलीं जीं खोलगट खोरीं आहेत त्यांस डून असें नांव आहे. अशांपैकींच डेहराडून हें एक आहे. हें गांव संयुक्त प्रांतांतील त्याच नांवाचा जिल्हा व

तालुका ह्यांचें मुख्य ठिकाण आहे. जंगलशास्त्र व सैन्याधिकारी–शिक्षणाचीं महाविद्यालयें येथें आहेत. कृषिकर्मशास्त्र व देशाचें मोज-मापन करणारी सरकारीं मुख्य कार्यालयें येथेंच आहेत. जंगलांतील हरवस्तूंचें मोठें संग्रहालय येथें आहे. ह्या आधुनिक संस्थांमुळें हें गांव भारतीय महत्त्वाचें झालें आहे. हा प्रदेश उत्तराखंडांतील तपोभूमी-पैकीं असून त्यांत प्रभु रामचंद्र व पुढें पांडव तपश्चर्येकरितां येऊन राहिले असल्यामुळें त्यास पौराणिक व ऐतिहासिकहि महत्त्व आहे.

## उदासी पंथ व रामराय

शीख पंथांपैकीं एक उदासी नांवाचा पोट पंथ आहे. त्याचा प्रवर्तक रामराय त्यानें डेहराडून हें गांव वसविलें. पंजाबमधून औरस-पणाच्या संशयावरून त्यास घालवून दिलें, तेव्हां तो स्वतःला शिखांचा गुरु म्हणवून घेत होता. त्यांत यश येत नाहींसें पाहून त्यानें येथें येऊन उदासी पंथ चालू केला. त्याची शिष्यशाखा मोठी वाढली. ह्या ठिकाणीं त्याचें गुरुद्वार झालें. हा गुरु वाटेल तेव्हां मृत होई व पुन्हां जिवंत होई. पण एकदां तो नेहमींप्रमाणें मृत झाला असतां पुन्हां उठलाच नाहीं. ज्या बिछान्यावर तो अखेरचा मृत झाला तो बिछाना अद्यापहि पवित्र मानला जातो. अडीचशें वर्षांपूर्वीं त्याचे नांवानें बांधलेल्या देवळाच्या गर्भागारांत तो राखून ठेवला आहे. हें गुरुद्वार मोठें असून प्रसिद्ध आहे. तेथें धर्मशाळा आहे. आवारांत बरींच कुंडें असून त्यांतील एक अजमासें सवादोनशें फूट लांब व पावणेदोनशें फूट रुंदीचें असें एक तळेंच आहे. ह्या गुरुद्वाराची व्यवस्था तेथील महंत लक्ष्मणदास ह्याजकडे आहे. ते महंत खरे सत्पुरुष असून परोपकारी वृत्तीचे आहेत.

## गिरिराज नमस्तुभ्यम्

राजपुरीपासून मसूरी पायवाटेनें सात मैल तर सडकेनें ती दहा मैल आहे. सडकेनें गाडींतून जाणारास माणशीं दीड रुपया कर आहे. हरद्वारपासून राजपुरी बारातेराशें फूट अधिक उंचीवर असली तरी येथपर्यंतचा भाग हिमालयाच्या पायथ्यांतच मोडतो. आमच्या मार्गा-वरील हिमालयाच्या पहिल्या चढणीस येथूनच प्रारंभ होता. घर सोडल्यापासून येथपर्यंत अजमासें बाराशें मैलांचा बैठा प्रवास झाला. पण ह्यापुढील आतां मात्र तो चालता होणारा होता. आमच्या

प्रत्यक्ष पायीं प्रवासाचा खरा प्रारंभ येथूनच होणार होता. गेल्या पांच दिवसांच्या पवित्र वातावरणांतील प्रोत्साहक अनुभवानें पुढील प्रवासाकरितां उतावळी झाली होती.

उन्हापूर्वीं वर जाऊन पोहोंचावयाचें असा संकल्प करून तो निजण्यापूर्वीं बोजेवाल्यांचे कानीं घालून ठेविला होता. पहाटे प्रार्तविधि आटोपून पावणेचाराला 'गिरिराज नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे।' असें त्रिवार म्हटलें आणि चढणीस लागलों. पायवाट म्हटली तरी तो एक पांच ते पंधरा फूट रुंदीचा चांगला पक्का रस्ताच केलेला आहे. तो नागमोडी वळणानें थेटपर्यंत गेलेला असून त्याचा चढ एकसारखा आहे. पांच ते सहा फुटास एक फूट चढ असें प्रमाण बसेल. आम्हांस एका दमांत वरपर्यंत जातां आलें नाहीं. थांबत थांबतच चढावें लागलें. 'दुरून डोंगर साजरे'चा अनुभव आला व पुढचा प्रवास कसा निभणार ह्याविषयीं शंका डोकावून गेली. पहाटेची थंड वेळ होती तरी वाटेंत तीन-चार वेळ पाणी प्यावें लागलें. वाटेवर जागजागीं थेटपर्यंत वस्ती आहे व तेथें तेथें आगेमागेंपासून विजेचे दिवे आहेत. निघालों तेव्हां चांदणें होतें व साडेचार वाजल्यापासून पहाटच्या दिशा फटाटल्या. त्यामुळें वाट दिसण्यास केव्हांच अडचण पडली नाहीं. आपल्याकडीलपेक्षां इकडे ह्या वेळीं निदान पाऊण तास तरी आधीं उजाडलें. साडेपांच वाजतां ऊन्ह चांगलेंच दिसूं लागलें. साडेसात वाजतां मसूरीस पोहोंचलों.

## मसूरी

मसूरी साडेसात हजार फूट उंचीला आहे. तिचे दोन भाग आहेत. एक मसूरी व दुसरी लांडोरी. हे भाग दोन निरनिराळ्या पण एकमेकांस चिकटून असलेल्या डोंगरावर आहेत. पहिला पश्चिमेकडील तर दुसरा पूर्वेकडील डोंगरावर आहे. लांडोरी येथेंच मोठी बाजारपेठ आहे. पुणें येथील लष्करांतील दुकानांप्रमाणें सर्व तऱ्हेच्या मालांचीं दुकानें आहेत. येथें मिळणार नाहीं असा एकहि जिन्नस नाहीं, किंमती मात्र अवाच्या सव्वा. दुप्पट काय नि तिप्पट काय ! मेळच नाहीं. लांडोरींत सर्व वस्ती हिंदूंचीच आणि मसूरींतील सर्व वस्ती निव्वळ गोऱ्यांची.

येथें चार पंथीयांच्या निरनिराळ्या धर्मशाळा आहेत.

( १ ) मंदिर. हिलाच सनातनीहि म्हणतात. मोठी प्रशस्त व भर रस्त्यावर आहे.

( २ ) शिखांची. हींत सोयीस्कर अशा निरनिराळ्या खोल्या आहेत. खाटा व कांबळींहि मिळू शकतात.

( ३ ) आर्य समाजीयांची. ही लहान व आडमार्गावर आहे. बरेंच खालीं उतरून जावें लागतें. ती पूर्ण एकांतवासाला उत्तम आहे.

( ४ ) गढवाली ह्यांची. ही शिखांच्या शेजारीच आहे, पण ती जरा कोंदट व काळोखाची आहे.

प्रत्येक ठिकाणच्या वहिवाटदारानें मोठ्या आस्थेनें जागा देण्याचें मान्य केलें. सनातनी भरून गेली होती म्हणून आम्ही शिखांचे धर्मशाळेंत उतरलों.

अदल्याच दिवशीं येथें बर्फ पडलें होतें. त्यामुळें थंडी अधिकच वाढल्याचें लोक बोलत होते. सकाळच्या डोंगरचढणीनें आमचें घामटेंच निघालें होतें. सपाटीवर चालण्याचा अभ्यास होता पण चढणीवरचा नव्हता. तरी निघण्यापूर्वीं महिनाभर प्रत्यहीं आठदहा मैल पुण्याच्या आसपासच्या टेकड्यांतून चालण्याचा सराव केला होता. त्या सर्व टेकड्या म्हणजे ह्या डोंगरापुढें सपाटीच्या ठरल्या. सात मैलांत पांच हजार फूट उंची चढल्यानें फार थकवा येऊन विश्रांतीकरितां अडवारावेंसें वाटत होतें; पण स्नानसंध्या व्हावयाची होती. नळाचें पाणीहि बंद होण्याची वेळ आली होती. एकेच ठिकाणीं दाटी नको म्हणून रस्त्यावरील सार्वजनिक तोटीवर जाऊन मीं स्नान करून घेतलें. पाणी इतकें गार ठणक होतें कीं, डोक्यांत शिणकाच निघाल्या. आंग पुसून धोतर नेशीपर्यंत दांतखीळ वाजूं लागली. ओलें धोतर धुण्यासाठीं तें आपटूं लागलों तों तें हातांतून निसटूं लागलें. इतके बोटांचे आंकडे वळून गेले होते. त्यांतच ते खादीचें धोतर असल्यामुळें तें कांहीं मला पिळतां येईना. समुद्रसपाटीपासून सरासरी दीड मैल उंचीवर जर ही अवस्था तर आणखी अर्धा मैल उंचीवर बेशुद्धीच येईल कीं काय ह्याची शंका उभीं राहिली. पण त्यामुळें पुढें न जातां येथूनच परतावें असा विचार शिवलासुद्धां नाहीं. कपडे घालून ऊब

आल्यानंतर थकवा कमी झाला. लहानपणीं दांत आंबले तरी अंबटढोण चिंचा वा कैऱ्या खाण्यांत गंमत वाटते तशीच गंमत वाटली. फराळ करून तीन तास विश्रांति घेतली. संध्याकाळीं पेठेंत फेरफटका करून आलों.

येथील बंगले व घरें डोंगर–उतारावर असलेमुळें तीं एकावर एक असल्यासारखीं दिसतात. येथील बाजारपेठ एकाच रस्त्यावर आहे. रस्ते चांगले व स्वच्छ आहेत. त्यांवर विजेचे दिवे असून जागजागीं नळहि आहेत. येथें रस्त्यावरून मोटार, सायकल किंवा घोडागाडी चालविण्यास बंदी आहे. त्याऐवजीं रिक्षा व दांडी वापरतात. रिक्षा म्हणजे लहान मुलांची ढकलगाडी – जिच्यांत समोर तोंड करून एकाशेजारीं एक दोन मुलें बसवितां येतात व जी मागून ढकलून चालवितां येते–अगदीं तशीच पण टांग्याएवढी मोटी व पुढचे बाजूस टांग्यासारख्याच दोन दांडचा. दोन माणसें ढकलण्यास व दोन ओढण्यास अशीं चार माणसें ती पळत पळत ओढून नेतात.

दांडी म्हणजे बसणाऱ्याच्या सुखसोयीच्या दृष्टीनें आणि भोई लोकांच्या वहातुकीच्या सोयीच्या दृष्टीनें सुधारलेली आधुनिक पालखीच म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. हिमालयांतील सिमला, मसूरी, नैनीसारखीं साहेबी वस्तीचीं ठिकाणें सोडून कोठेंहि दुचाकीसुद्धां फिरण्याची सोय नसते. अशा ठिकाणीं व पहाडी गांवांतून उत्सव प्रसंगीं देवतेच्या आणि लग्न कार्यांत माणसांच्या मिरवणुकी दांडींतूनच काढितात.

एका आरामखुर्चीस बसणारास ऊन्ह लागूं नये म्हणून वर व्हिक्टोरिया गाडीप्रमाणें टप लाविलेला असतो. त्या खुर्चीस दोन्ही बाजूंनीं दांडचा बांधून त्यांचीं मागचीं टोकें मागें व पुढचीं पुढें एकत्र जुडतात. हीं एकत्रित टोकें दोन जुवांस टांगतीं अडकविलेलीं असतात. प्रत्येक जुवास दोन दोन भोई खांदा देऊन ती दांडी वाहून नेतात. जुवास दांडीच्या धुऱ्या लोंबत्या असल्यामुळें वाट कितीहि अरुंद असली तरी एकाच जुवाच्या भोई लोकांस मागेंपुढें होऊन चालतां येतें.

मसूरी गांव थंड हवेकरितां म्हणून साहेबानें वसविलेलें आहे. त्यांच्या मागोमाग आपल्याकडील लक्ष्मीपुत्र साहेबी ऐट करण्यासाठीं

तेथें जाऊं लागले. साहेब कोठेंहि जावो तो आपल्या स्वभावाप्रमाणें स्वच्छता, सुखसोयी, व्यवस्थितपणा वगैरे गुण नेल्याशिवाय रहात नाही. पण आम्ही मात्र नेमक्या अनुकरणीय गुणांकडे दुर्लक्ष करून रंगढंग तेवढे बिनचूक उचलतों. मोराच्या मागें लांडोरी नाचतात तसेंच हें आहे. व म्हणूनच हिंदु वस्तीचे ठिकाणास लांडोरी म्हणतात कीं काय न कळे !


## पुढचा मार्ग

पहाटें साडे चार वाजतां मसूरीचें शहरी वातावरण सोडून आम्ही पुढच्या मार्गास लागलों. त्यापुढें हरद्वारला परत येईपर्यंत नैसर्गिक पण ग्रामीण वातावरणांतील जीवनाचा अनुभव मिळावयाचा होता. प्रहर दिवस वर आला. आकाश निरभ्र होतें, तरी हवेंत थंडी इतकी होती कीं, अजून ऊन्ह कवळेंच वाटत होतें. रस्ता डोंगरमाथ्यानें सपाटीचा होता. कल्याणपासून आमचा मुलगा चि. बापू हा मसूरीहून पुढें आम्ही मार्गस्थ होईपर्यंत आम्हांस पोहोंचविण्यास आला होता. चालण्याच्या उत्साहांत त्याला निरोप द्यावयाचें राहून गेलें होते. त्याला निरोप देणेंसाठीं म्हणून थांबलों. बोजेवाल्यांसह त्यानें आमचे छायाचित्र घेतलें. घरून निघतांची स्थिति पुन्हां आज तशीच उत्पन्न झाली. जड अंतःकरणानें तो परतला व आम्हीहि चालूं लागलों. पांच पंचवीस पावलें गेलों व वळून पाहिलें तों बापूहि मागें वळून उभाच. त्यास हांक मारावी असें मनांत आलें पण तोंडांतून शब्दच उमटेना, म्हणून हातानेंच येण्याविषयीं खूण केली. तो आला. पण सर्वच जण गहिंवरून गेलों असल्यामुळें मनांत होतें तरी कोणाच्याहि तोंडून शब्द बाहेर पडेना. माझे तोंडांतल्या तोंडांत एवढेच शब्द निघाले कीं, संभाळा. जमेल तेथून खुशाली कळवीन. तोहि पुटपुटला कीं कसली काळजी करूं नका. नमस्कार करून तो परतला व आशीर्वाद देऊन आम्हीहि मार्गस्थ झालों. दोन तीन वेळ वळून पाहिलें तों तो एका वळणावर उभाच होता. हातानें चालू होण्यास खुणावलें तेव्हां तो चालूं होऊन दृष्टीआड गेला. गहिंवरून गेल्यामुळें वीस पंचवीस मिनिटेंपर्यंत आम्ही मुकाट्यानेंच चालत होतों. पुढें बोलूं लागलों. पण दुपारपर्यंत मनावर याचा पगडा राहिला होता.

सात मैलावर झाळकी गांव लागलें. चारपांच घरें होतीं. पाणी एक मैल खोलीवरून आणावयाचें होतें. तें वर आणण्यापेक्षां आम्हीं त्याचेजवळ जाऊन अंघोळ धुणें करून स्टोव्हवर भात उकडून पोटपुजा केली. विश्रांति न घेतांच पुन्हां मार्गस्थ झालों. डोंगर अगदीं उघडेबोडके होते. त्यावरून गेलेला रस्ता डोंगराच्या वळणावळणानें, सालप्याच्या घाटांतील आगगाडीच्या रस्त्याप्रमाणें आंत बाहेर करीत गेलेला होता. तो पक्का व बहुतेक सपाटीचाच असला तरी त्याचीं वळणें आणि चढउतार बैलगाडीस सुद्धां झेपलीं नसती. एरव्हीं हा प्रवास कंटाळवाणा म्हणतां आला असता. पण पहिलाच दिवस आणि असल्याहि प्रवासाचें तरी नावीन्य होतेंच.

एका दिवसांत तीनहि ऋतु

दुपार उलटेपर्यंत उन्हाचा मारा असह्य होत होता. ती उलटली आणि एकदम झाडी लागली. पण बरें कां वाईट कोण जाणें ! पुढें दैव आडवें उभें राहिलें. सोसाट्याचा वारा सुटला. धूळ उधळून दशदिशा भरून गेल्या. डोळ्यांत धूळ जाऊन ते मिटून बसले. एवढ्यांत आम्ही घाईघाईनें कसे तरी रेनकोट चढविले म्हणून बरें झालें. नाहीं तर येथेंच हुडहुडी भरली असती. मेघांचा कोरडाच गडगडाट आणि त्याचे ध्वनि प्रतिध्वनी ह्यांनीं वातावरण निनादून गेलें. आम्हांस डोळे असून दिसेना, कान असून ऐकूं येईना. अर्थात् बोलण्याचा उपयोगच नव्हता. यक्षिणीनें कांडी फिरवून आम्हांस जागचे जागीं झाडाप्रमाणें स्तंभित करून ठेवलें. अशा स्थितींत पावसाची एकच पण खडेफोड सर येऊन तिनें शैलराजास सचैल स्नान घातलें. आमच्या पायाखालून पाणी वाहूं लागलें. म्हणून कांहीं, जागा सोडण्याची छाती झाली नाहीं. पाऊस उघडला, वारें पडलें. कपाळावरून ओघळत्या पाण्यानें डोळे धुऊन घेता आले म्हणून दृष्टी आली. धुळीनें वस्तुजातास आणलेलें मालिन्य पार धुवून गेले. त्यामुळें भोवतालचे तेच दगडधोंडे व खाचखळगे मोहक व उठावदार स्वरूपांत दिसूं लागले. झाडांचे पानांस टवटवी आली आणि त्यांच्या रंगछटा खुलून दिसूं लागल्या. हवेंतील उष्णता व त्याबरोबर येणारी रूक्षता नाहींशी होऊन जिकडे पहावें तिकडे सौम्य व शांत स्वरूपांत सृष्टि



ऋषीकेश – लक्ष्मण झूला बाजूनें पान ३७


कनखल – दक्षेश्वर मंदिर पान २४


कनखल – सतीचा अग्निप्रवेश कुंड पान २४

दिसूं लागली. ढग वितळले व सूर्यकिरणहि कोमल व आल्हादकारक वाटूं लागले. अशी ही उलटीसुलटी अवस्था क्षणार्धांत उत्पन्न होते कशी व लगेच जाते कशी ह्याचें कोडेंच वाटतें. ज्याला जसें सुचेल तसें उत्तर देऊन ज्यानें त्यानें आपापलें समाधान करून घ्यावें. एक गोष्ट मात्र निश्‍चित कीं, असल्या झटपट अवस्थांतरानें सृष्टीच्या वैचित्र्यपूर्ण घटनांमागील तिचें सामर्थ्य चटकन लक्षांत येतें. सकाळीं दांतखिळी बसेल अशी थंडी, दुपारीं उन्हाचा मारा व संध्याकाळला वॉरा नि पावसाची झोड, ह्यावरून हिमालयांत एकाच दिवसांत तीनहि ऋतूंचा अनुभव येतो असें ऐकलें होतें, त्याची साक्ष पटली.

ग्रामीण लोकांची आपुलकी

वाटेंत खोळंबा झाल्यामुळें धनोल्टी येथें वस्तीस पोहोंचण्यास रात्र झाली. हें गांव मसूरीपासून अठरा मैल आहे. रस्त्यानें कोणी वाटसरूंहि भेटले नाहींत. रस्त्यास कोठेंहि फाटे फुटले नसल्यामुळें न घोटाळतां वाटाड्याशिवाय येथें येतां आलें. धर्मशाळा किंवा गांव कोठें होता हें दिसत नव्हतें व कोणास विचारीन तर माणसाचीहि चाहूल लागेना. एका दिव्याच्या प्रकाशाच्या रोखानें तिकडे चाललों तों तो एक बंगला असून त्यांत एक साहेब खाना खात बसलेला दिसला. मी बंगल्याजवळ जातांच त्याचा गडी धांवतच मजकडे आला. त्यानें सांगितलें कीं साहेब आमच्या महाराजांचे पाहुणे आहेत. त्यानें मज-बरोबर येऊन मला धर्मशाळा दाखवून दिली, इतकेंच नाहीं तर वहिवाटदारास बोलावून आणून माडीवरील एक खोली देववून दिवा व पांघरण्यासाठीं ब्लँकेट व लेपहि आणून देवविला. मला थोडा ताप आला होता. आमचे बोजेवाले आमच्या मागून दोन तासांनीं आले. मी निजलेला पाहून बोजेवाला पुढारी पातेराम ह्यानें आपण होऊन माझें सर्व अंग चेपून काढलें. रात्रीं घाम येऊन ताप निघाला. पहाटे चांदणें होतें. त्या प्रकाशांत लांबचीं हिमशिखरें स्पष्ट दिसत होतीं. ती बंदरपुच्छ किंवा गंगोत्री असावींत. कितीतरी वेळ तीं सारखी पाहात सज्जांत उभा होतों. हवेंत मसूरीसारखीच थंडी होती, तरी तेथून हलावेंसेंच वाटेना. दुसऱ्या बाजूस डेराडून येथील गांवभर असलेले दिवे दिसत होते. मसूरीहून येथें येण्यापेक्षां डेराडूनहून पर-

स्पर येथें येण्यांत निदान दहाबारा मैलांचा फेरा चुकला असता. मसूरीच्या मानानें येथें स्वस्ताई चौथाई होती. तांदूळ ८३ शेर, दूध ८४ शेर, बटाटे २ आणे शेर, तूप १। रु. शेर. येथें चौफेर सुरूच्या झाडांची दाटी होती.

नित्याप्रमाणें पहाटे वाटचालीस लागलों. मसूरीची उंची एका बाजूनें जितकी वर चढून आलों तितकीच ती दुसऱ्या बाजूनें खालीं उतरावयाची होती. उंची दोन्ही अर्थानें समजावयास प्रत्यवाय नाहीं. डोंगर उंची सहज लक्षांत येते. तशीच दुसरी उंचीहि सहज लक्षांत येण्यासारखी आहे. मसूरीसारख्या आडमार्गी उंचच उंच डोंगर-कड्यावर शहरी जीवनाच्या ऐषआरामी सर्व आधुनिक सुखसोयी निर्माण करणें हें मनुष्यकृत सुधारणेचें उच्च शिखर आहे.

त्या दृष्टीनें ती उंची सोडून खालीं यावयाचें म्हणजे सुधारणेकडे पाठ फिरवून ग्रामीण (नैसर्गिक वा अकृत्रिम) जीवनमार्गाकडे वळावयाचें. सुधारलेल्या जीवनमार्गांत माणसाची शोधकबुद्धि व कर्तृत्व पदोपदीं दृष्टीपुढें असतें, तर हिमालयांतील ग्रामीण जीवनांत दिवसाचे चोवीस तासहि निसर्गाशींच सहवास असल्यामुळें निसर्ग-शक्तीच्या आविष्कारांतच तिचें कर्तृत्व–परमेश्वरी गुण दिसत असतात.

चढ चढण्यापेक्षां उतार उतरणें सोपें असतें, पण येथें उलटा अनुभव शिकावयाचा होता. चढाचा रस्ता कृत्रिम तर उताराचा नैसर्गिक होता. जरा कां दुर्लक्ष झालें असतें तर वाकडें पाऊल पडून ठेच, नाहीं तर पाय मुरगळण्याचें प्रायश्चित्त पाठीशीं उभेंच होतें. एक सोय बरी होती कीं वाटबंदी नव्हती, आणि वनशोभेकडे चुकून सुद्धां लक्ष जाऊं नये म्हणूनच कीं काय झाडांची अडगळ नव्हती. सात मैल व तेहि उताराचे, पण पांच घंटे लागले. परंतु धडे उतरलों हेंच दैव.

### अर्धबिंबाचें सबंध कां दिसावें ?

वाटेवर सुरवातीसच एक अलौकिक घटना दृष्टोत्पत्तीस आली. आम्ही पूर्व दिशेकडे उतरत होतों. अर्थात् सूर्योदय होणार तो आमच्या समोर होणार होता. आम्ही निघालों तेव्हां चांदणें स्वच्छ होतें. दिशा उजळून फटाटलें. अरुणोदय झाला आभाळांत प्रभा वाढत चालली. आमच्यासमोर एक मोठा गगनभेदी बोडका पहाड उभा

वा. क्र. ८८८९

होता. अजून सूर्योदय झाला नव्हता. ती वेळ दिनांक २०–५–३५, सोमवार, पहाटें पावणेपांच वाजतांची होती. आमच्या समोरच्या पहाडाच्या वरच्या भागावर ऊन्ह पडून तो प्रकाशित झाला. हा प्रकार दिसतांच आश्चर्यानें थक्कच झालों. वाटलें, हिमालयांत ही काय जादू आहे, कां अद्‌भुत घटना आहे कीं, अजून सूर्योदय झालेला नसतांना समोरच्या डोंगरावर स्वच्छ ऊन्ह दिसूं लागावें ! असें होईल कसें ? आपण दिशा चुकत आहोंत. पूर्व दिशा आपल्या पाठीमागें असून तेथें सूर्योदय होऊन त्याचें ऊन्ह समोरील डोंगरावर पडलेलें असलें पाहिजे. म्हणून मागें वळून आभाळ पाहिलें. तें अगदींच निर्गूण. वाटलें कीं आजूबाजूच्या बर्फशिखरावर ऊन्ह पडून त्याचा कवडसा तर हा नसेल ? म्हणून सभोंवार पाहिलें.

एक तर हिमशिखरें येथून शंभर मैलांच्या पलीकडे, आणि दुसरें असें कीं, वाटेंत ह्या पहाडापेक्षांहि उंच उंच पहाड आडवे आलेले. अशा स्थितींत कवडाशाचा संभव दिसेना. हे सर्व प्रकार पाहून मति कुंठितच झाली. विचार सुचला कीं असा फोटो घेऊन ठेवावा, म्हणून झटदिशीं कॅमेरा उघडून फोटो घेतला. पण एवढ्यांत सूर्याचें अर्धबिंब वर आलें. यात्रेहून घरीं परत आल्यानंतर त्याचें छायाचित्र तयार केलें. तें पाहिल्यानंतर तर आश्चर्य द्विगुणितच झालें. जाग्यावर सूर्योदयापूर्वी डोंगरावर पडलेल्या उन्हाचें छायाचित्र घेत असतांना सूर्याचें अर्धबिंब वर आलेलें होतें. पण तयार चित्रांत तर तें सबंध दिसत आहे. मात्र वरचे अर्धेबिंब स्पष्ट असून खालच्या अर्धबिंबामागें डोंगर दिसत आहे. आणि बिंब मध्यावर डोंगर माथा कड आडवी स्पष्ट दिसत आहे. ह्यावरून अशी शंका येते कीं, 'एक्स रे' प्रमाणें खालचे अर्धबिंबाचे किरण डोंगरामधून आरपार आले कीं काय ? पण 'एक्स रे'ची फोटोची काच स्वतंत्र असते. माझी तर तशी नव्हती. ती साधीच होती. तिच्यावर जर आरपार किरण येऊं शकले तर ते इतर छाया-चित्रांत कां आलें नाहींत ? ह्यावरून आरपारत्वाची कल्पना टिकत नाहीं. गेल्या चौदा वर्षांत अनेक शास्त्री लोकांस (Physisist) ह्या विचित्र घटनेची उपपत्ति विचारली पण अजूनपर्यंत ती मिळाली नाहीं. प्रवासवर्णनाच्या वैशिष्ठ्याकरितांच कीं काय, ही अजूनहि

अद्भुत वाटणारी घटना Phenomenon छापून प्रसिद्ध केली गेली नाहीं. आतां ती छापून प्रसिद्ध होत आहे. संशोधक व कुशाग्र वाचकांकडून सोपपत्तिक विवरण होईल अशी अपेक्षा केली तर ती अनाठायीं ठरणार नाहीं. ह्या घटनेचा संभव कसा झाला असावा ह्याची यथार्थ कल्पना एका शिक्षकांनें एका प्रात्यक्षिकानें आणून दिली आहे. पण त्यांचा तो विषय नसल्यामुळें त्याची उपपत्ति त्यांजकडून कळलेली नाहीं. कोणी तरी संशोधक पुढें येईल अशी आशा करितो (चित्र पाहा).

डोंगर–उतार संपून त्या दरींतून बाहेर पडतांच एकदाचें सुटलों असें झालें. जीव मुठींत धरून उतरावें लागल्यामुळें जी काळजी वाटत होती, जो त्रास झाला नि कष्ट पडले, त्यांना कंटाळून निराश होऊन जाऊं नये म्हणूनच कीं काय येथें समोरील पर्वतश्रेणींच्या दऱ्याखोऱ्यांतून उड्यावर उड्या घेऊन वाट काढीत काढीत आपणा भारतीयांच्या वात्सल्यानें धांवत पळत मोठ्या तांतडीनें आपणाकडे निघालेल्या पतितपावन भागीरथी गंगेचें येथें अनपेक्षित दर्शन झालें. त्याचप्रमाणें येथें गिरिराज हिमालयाचें भव्य नि दिव्य स्वरूप साकल्यानें प्रथमच पुढें उभें राहिलें.

तें पाहतांच मन आनंदानें उचंबळून जाऊन पाय नाचूं लागले. पंख असते तर एक भरारी मारून जवळ गेलों असतों, आणि जवळून दर्शन घेण्याची वाढलेली आतुरता लगेच तृप्त करून घेतली असती. पण येथूनच डोळे भरून यथेच्छ दर्शनसुख घेण्याशिवाय उपाय नव्हता.

एकामागें एक अशा चारपांच डोंगरांच्या रांगा आडव्या पसरल्या होत्या. त्यांच्यांत उंचीची स्पर्धा लागून प्रत्येक मागची रांग पुढचीस ठेंगणी करून टाकीत होती. ह्या सर्वही रांगा वृक्षवेली नि झाड-झाडोरा ह्यांनीं नखशिखांत झाकून गेल्या होत्या. त्या कारणानें त्यांचें उघडें बोडकें आणि म्हणूनच सहज भेसूर, भीषण आणि रूक्ष दिसणारें स्वरूप दृष्टीआड होऊन बसलें होतें, त्यांच्या अंगावर वनश्रीची हिरवी शाल येउन पडली होती. वास्तविक हे उन्हाळ्याचे दिवस; ह्या वेळीं लतापल्लव गळून जाऊन झाडाझुडपांचीं शुष्क काष्ठेंच डोळ्यापुढें दिसावयाचीं. पण तसें न दिसतां पुढच्या दोन रांगांवरील झाडी बरीच स्पष्ट दिसत होती. मधूनमधून झाडांचीं खोडें व फांद्या डोकावत होत्या. खोडें

तुटक तुटक राहून आपलें निराळेंपण राखीत तरी होतीं, पण त्यांचा डंवरून विस्तारलेला परिवार एकमेकांत समरस होऊन इतका एक-जीव झाल्यासारखा मिसळून गेलेला दिसत होता कीं, तेथें निराळेंपण पार अदृश्यच होऊन गेलें होतें. वेलवेलींनीं खोडाला बळेंच कवटाळून त्यांच्या एकाकीपणास बाध आणिला होता. असें होतें तरी ह्या स्नेहपूर्ण संमिश्र लता, पर्ण, पल्लव यांच्या झिंबडींत त्यांनीं आपापले आकार, गुण, चेष्टा इत्यादिकांचें वैशिष्टय सोडून दिलें नव्हतें. आवळा, चिंच ह्यांच्या पानापासून तों वडापिंपळाच्या पानाएवढ्यापर्यंतच्या आकाराचीं पानें आणि त्या सगळ्यांचा तो हिरवा रंग—ह्यांत शतशः रंगीबेरंगी छटांचें नयनमनोहर संमिश्रण झालेलें होतें. ह्या दोनच गुणांत विधात्यानें एवढी कलापूर्ण चमत्कृति सहज निर्माण करून ठेवली होती कीं पाहणाराची दृष्टि खिळूनच जावी. राजा रविवर्म्यासारख्या नामवंत कलानिपुणास तपेंच्या तपें खर्च करूनसुद्धां असें कलाचित्रण कुंचलता आलें असतें किंवा नाहीं ह्याची शंकाच वाटतें.

गतकालांतील गोष्टींवर कालाचा पडदा पडल्यामुळें त्यांतील बारकावा तर स्मृतिनष्ट होतोच, पण त्यांतील स्थूलभागसुद्धां मनश्चक्षूंपुढें स्पष्ट न येतां अस्पष्टच उभे राहातात; अगदीं त्याचप्रमाणें समोर उभ्या असलेल्या दृश्यावर दिक्-अन्तराचा पडदा पडल्यामुळें ते अस्पष्ट व अंधुक दिसूं लागले. ह्याच न्यायानें पुढच्या पर्वतांवरील झाडेंझुडें जशीं स्पष्ट व रेखीव दिसत होतीं, तशीं मागच्या मागच्या पर्वतावरील तीं सुटीं सुटीं न दिसतां सर्व एकजिनसी, हिरव्या रंगाचीं पण अस्पष्ट दिसत होतीं.

ह्या हिरव्या दिसणाऱ्या पर्वतश्रेणींच्या पलीकडे बऱ्याच अन्तरावर एक बर्फाच्छादित विस्तृत अशी पर्वतश्रेणी आडवी पसरलेली होती. पुढच्या पर्वतांच्या उंचीमुळें ती बव्हंशीं दृष्टीआड होऊन गेली होती तरी गंगा उगम पावली ती 'गंगोत्री' श्रेणी हीच असावी असा कयास धांवतो. तींतील एक हिमशिखर डोळ्यांपुढें प्रामुख्यानें उभें राहिलें. त्यावरील बारकावा दिसणें मानवी दृष्टीच्या पलीकडचें होतें. म्हणूनच कीं काय ह्या शिखरांच्या अंगभूत गुणवैशिष्टयामुळें ती उणीव अन्य तऱ्हेनें भरून निघाली होती.

ह्या शिखराचा विस्तार आणि त्याची गगनभेदी उंची पाहून त्याच्या भव्यतेची साक्ष सहज पटण्यासारखी होती. मूळचेंच तें शुभ्र आणि तेजःपुंज शिखर, पुरोभागी वृक्षाच्छादित हिरव्यागार दिसणाऱ्या पर्वतश्रेणी आणि पार्श्वभागाचें ठिकाणीं निरभ्र नील आकाश ह्यांची नैसर्गिक सजावट त्यास आयती मिळाल्याकारणानें तें अधिकच खुलावट व उठावदार दिसून मोठें आकर्षक वाटत होतें. प्रखर उन्हांत असून सुद्धां तें धवल शिखर सौम्य, शांत व आल्हाददायक स्वरूपांत दिसावें हें एक महदाश्चर्यच वाटलें. ह्या दैवी घटनेचें अतुल वैभव पाहून विचारशक्ति एकदम स्तंभितच होऊन गेली. 'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥' ह्या गीतोपदेशाचा रहस्यबोध साक्षात् पुढें उभे असलेल्या 'स्थावराणां हिमालयः' ह्या रूपानें सहज होऊन गेला. त्याचें द्योतकच कीं काय म्हणून दर्शन होतांच श्वासाचें निरोधन होऊन माथा आपोआप नमला आणि हस्तांजली कपाळास भिडली.

भल्डियाना येथें पोहोंचलों तेव्हां नऊच वाजले होते. पण बारा वाजून गेल्याप्रमाणें ऊन्ह रखरखीत वाटत होतें. गांवाभोंवतीं डोंगराचें कडेंच झालेलें आहे, तें सर्व तापून जाऊन हवेंत उष्मा अधिक वाढला होता. वारा तर शपथेला सुद्धां नव्हता. ह्या ठिकाणीं 'उकडणें' ह्याचा खरा बोध झाला. एखादा जिन्नस उकडावयाचा म्हणजे तो पाण्याच्या वाफेवर शिजवावयाचा असतो. येथें पाण्याचें दुर्भिक्ष होतें. म्हणूनच कीं काय नखशिखांत घामाच्या धारा स्रवत होत्या. ताप भरल्याप्रमाणें श्वासहि कढत येत होते. घाम येण्यासाठीं किंवा तो आल्यानंतर त्यावर वारें लागू नये म्हणून तापकऱ्याच्या अंगावर तोंडावरून पांघरूण घालतात. त्या वेळीं जीव गुदमरून जातो त्याप्रमाणें अवस्था होऊन गेली होती.

### गंगा स्नान

स्नान करून गारवा वाटेल म्हणून झऱ्यावर गेलों. ( झरना म्हणजे पाण्याचा लहानसा प्रवाह ). तेथें लहान भांड्यानें पाणी भरून घ्यावें लागत होतें आणि इतकेंहि करून माणसांची बारी लागली होती ती वेगळीच. म्हणून गंगेवर जाण्याचा विचार केला.

येथून ती निदान चार पाचशें फुटांच्यावर खोलीला होती. दरडी-वरील नागमोडी पायवाट पण तीहि जागजागीं ढासळून गेली होती. उन्हाळ्यामुळें तिजवरील गवतकाडी नाहींशी होऊन तिचा मागोवा दिसत होता.

पायवाटेच्या तोंडाशीं यात्रेकरूंनीं देहधर्म करून इतकी घाण करून ठेवली होती कीं तेथून कोणी जाऊंच नये. कशीबशी दुसरीच वाट काढून आम्ही दरड उतरून कांठीं पोहोचलों. अर्धा तास लागला. वरून लहानसें पात्र व अगदीं संथ अशी वहाळ दिसत होती. पण जवळून पात्र पाहिलें तों तें फारच मोठें अफाट होतें. कांठावरून जोरानें दगड फेकून पाहिला तो अष्टमांश पात्रांत सुद्धां पडला नसेल. अजमास काढीत काढीत छातीइतक्या पाण्यांत गेलों, पण पुढें जाण्याचा धीर होईना. पायाखालची रव्यासारखी बारीक वाळू सारखी सरासर निसरून जात होती. प्रवाहाची ओढ वरून दिसत नव्हती तरी ती कांठाशीं आंतून जोराची होती. धारेच्या उलट दोन्ही हातांनीं पाणी लोटीत राहिल्याशिवाय एकाच ठिकाणीं निमिषमात्रहि उभे राहतां येत नव्हतें. बुडी मारली तर तेवढ्या अल्पावधींत चार हात जागा सुटून जाई. पात्राच्यामध्यें व पलीकडील कांठाशीं प्रवाह उचंबळून वहात होता. त्याचा धो, धो, आवाज इतका मोठा होता कीं, कांठावरून मारलेली हाक वीसपंचवीस हातांवर, मी पाण्यांत होतों तेथें ऐकूं येत नव्हती. पाणी हरद्वारप्रमाणेंच गारठणक व निर्मल होतें. चिडचिडून गेलेलें शरीर, उन्हाचा कडकपणा आणि गुदमरून सोडणारी हवा आणि सर्वांत विशेष म्हणजे गंगेंत स्नान करण्याचा उल्हास ह्यामुळें कसलीच क्षिति वाटली नाहीं. यथेच्छ स्नान करून घेतलें; आलेला सर्व थकवा जाऊन नवजीवन आलें.

हरद्वारपासून निघून पुन्हां तेथें परत येईपर्यंत ह्या यात्रेंत जो प्रवास झाला त्यांतील जवळजवळ चारशें मैलाचा प्रवास यमुना, गंगा, मंदाकिनी व अलकनंदा ह्यांपैकीं कोणत्या ना कोणत्या गंगेच्या कांठानेंच झाला. स्नानाशिवाय एकहि दिवस गेलेला नाहीं. त्याचप्रमाणें ऊन पाण्याचीं चार ठिकाणें सोडून बाकीच्या सर्व ठिकाणीं कोणत्या ना कोणत्या तरी गंगेचींच स्नानें घडलीं. हीं सर्व स्नानें तांब्यातांब्यानें

पाणी अंगावर घेऊन कांठावर बसूनच करावीं लागलीं. कारण ह्या सर्वहि नद्यांचा प्रवाह इतका ओढीचा आहे कीं, त्यांत पाऊल टाकणें म्हणजे प्रवाहपतित होऊन मुक्ती घेणेंच होय. पण भल्डियाना येथील गंगापात्रांत जाऊन बुड्या मारून स्नान करण्याचा योग अवचितच लाभला. हा योग एकमेवच झाला ही गोष्ट हा वृत्तांत लिहिण्याच्या अनुषंगानें इतके वर्षांनंतर प्रथमच लक्षांत येत आहे.

बिच्छूका पेड म्हणजेच विंचवाचें झाड

गंगाकांठच्या दरडीवरील वाटेच्या आजूबाजूस आपल्याकडील प्रमाणें काटेरी झाडेंझुडपें नव्हतीं तरी हिमालयांत रानोमाळ आढळणारीं विंचवाचीं झाडें मात्र वारेमाप उगवलेलीं होतीं.

हीं झाडें बहुतेक कमरेपेक्षां अधिक उंच नसतातः तथापि खांद्या-इतक्या उंचीचींहि कोठेंकोठें आढळलीं आहेत. वाळलेलीं झाडें कोठें दिसलीं नाहींत. सर्व झाडभर म्हणजे देठ, फांद्या व पानें ह्यावर कुसळां-सारखे अनंत काटे असतात. पानांच्या दोनहि अंगें ते शिरेवर व कडासहि असतात. देठ, फांदी व पान हीं सर्वच हिरव्या रंगाची आणि कांटयांचाहि रंग हिरवाच असल्यामुळें नवख्या माणसाचें लक्ष सहजा-सहजीं त्याकडे जात नाहीं. त्यामुळें त्या काटयांचा कोठें ना कोठें शरीरास नकळत स्पर्श होतो. वामन पंडितानीं म्हटल्याप्रमाणें 'न कळता पद अग्निवरी पडे । न करी दाह असें न कधीं घडे ।' ह्याचा तत्काळ साक्षात्कार होतो. स्पर्श झाला कीं, लगेच त्या ठिकाणीं विंचू चावल्याप्रमाणें फणफण सुरू होतें, आणि ती दिवसभर होत राहाते. माणूस बेचैन होऊन जातो. यमुनोत्तरी, गंगोत्तरी ह्यांच्या वाटेंत ह्या झाडांचा प्रसाद मिळाला नाहीं असा भाग्यवान एकादाच. इकडे केलेल्या वाटा नाहींतच पण कोठेंकोठें त्यांचे अवशेष दिसतात.

स्नान करून परत येत असतांना एक माणूस दरडीवर विंचवाच्या झाडांच्या फांद्या झोडपीत असतांना दिसला. त्यास विचारतां तो म्हणाला कीं, हा पाला आम्ही जनावरांना घालतों. त्यांना काटयाची बाधा तर होत नाहींच पण तो त्यास चांगला मानवतो. म्हैस अधिक दूध देऊं लागते. पाला गोळा करून घरीं नेतांना काटे लागतात. पण त्याचा उतारा आम्हांस माहीत असतो. ह्या झाडांच्या मुळाशीं

एक वनस्पति उगवते तिचें नांव 'दवणा'. आपल्याकडे दवणा असतो तो चैत्र महिन्यांत हनुमज्जयंती व रामनवमीस उत्सव देवतेस वहा-तात. त्याला उग्र सुवास असतो. तो हा नव्हे. त्याचा पाला हातावर कुसकरून तो रस त्या ठिकाणीं चोळला कीं मंत्र घातल्याप्रमाणें जागची फणफण एकदम इतकी थांबते कीं जणू काटा लागलाच नव्हता. ह्या गोष्टी ऐकून मी आश्चर्यचकितच झालों.

गावंढेकऱ्याचे मननीय बोल

तो म्हणाला, " दादा, ह्यांत एवढें मोठें आश्चर्य करण्यासारखें काय आहे ? तुम्ही शहरचीं माणसें. तुम्ही दूध ज्यास्त देण्यासाठीं जनावरास अंबोण घालतां, तुम्हांस कांहीं झालें तर तुम्ही डाक्तर–वैद्याकडे धांव घेतां, त्यांना ओंजळीनें पैसे देतां. आम्ही जंगली माणसें. आमच्याजवळ कोठला पैसा नि आडका ? आमच्या भाग्यांत कोठें आहे डाक्तर नि वैद्य ! आमची काळजी देवाला. आमची आई गंगामय्या आणि आमचे वडील बदरीविशाल; ते आमचे वाली. त्यांनीं आमच्याकरितां काय कमी ठेवलें आहे ! तुमच्याकडे जी धान्यधुन्य, जी फळ-फळावळ होते ती सर्व आमचेकडे होतातच; पण आमच्याकडची कित्येक तुमच्या ऐकण्यांतसुद्धां नसतील. झाडेंझुडें, वनस्पतीविषयीं म्हणाल तर तो एक समिंदर म्हणावा लागेल. तुम्ही नुसतें एक विंचवाचें झाड पाहिलेंत; आम्हाला पांच पन्नास माहीत आहेत; पण तेवढ्यानेंसुद्धां औषधपाण्यासाठीं आम्हांस डाक्तरच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी येत नाहीं. असें आमचें हें स्वावलंबी स्वतंत्र जीवन असून आम्ही तुमच्यापेक्षां अधिक निरोगी व धट्टेकट्टे आहों, हें तुम्हांला दिसतेंच आहे. आमच्या मदतीशिवाय तुमच्या यात्रा कधींच झाल्या नसत्या." मी म्हटले, "तुमचें म्हणणें अगदीं खरें आहे. तुमच्या वनस्पतींची माहिती आम्हांस सांगाल का ?" तो म्हणाला, " हो, कां नाहीं सांगणार ?" मीं म्हटलें" फुकट विचारीत नाहीं. त्याची किंमत देईन." तो म्हणाला, " बाबूजी, त्या काय माझ्या बाची एकट्याचीच मत्ता आहेत, म्हणून मी पैसे घेऊं ? ह्या गंगामाईचें जल ही हवा, हें ऊन्ह हीं सर्व आपलीं सगळ्यांचींच आहेत. तीं देवांनीं केलीं आहेत. त्याचेजवळ मी, तूं हा भेदभाव कधीं असतो का ? तुम्ही यात्री लोक नुसतें उभ्याउभ्या येतां आणि त्याच

पावलीं परत जातां. त्याची करणी येथें अणूरेणूंत इतकी दुमदुमून भरली आहे कीं, ती आंधळ्यासमुद्धां दिसावी. तुम्ही जर वर्ष सहा महिने येथें येऊन राहाल तर आम्हांस माहीत असलेल्या पांच पन्नासांचेच काय, पण आणखी शेंपन्नास वनस्पतींचे चमत्कार तुम्हास आमचा बदरीविशाल सहज दाखवील. मधूनमधून एकाददुसरा साहेब इकडे येऊन दोनदोन महिनेसुद्धां आमच्या महाराजांचा पाहुणचार खात शिकारीकरितां दऱ्याखोरीं हिंडत असतो. पण परत जातो तेव्हां निरनिराळ्या झाडांचीं रोपटीं, लांकूड, पाला, साल, फळ, मूळ व वेल हीं पोतींच्या पोतीं भरून घेऊन जातो. मागें एकानें तर दगड, धोंडे, माती, वाळू सुद्धां दहावीस खेंचरें भरून नेली. हें सर्व कशासाठीं नेतात ह्याचा विचारिलें तरी सुद्धां थांग लागूं देत नाहींत. ते सोडून इतर सगळ्यां गप्पागोष्टी करतात, पैसेहि चांगले देतात. तुम्ही साहेबासारखे शिकतां, मग तुम्ही कां इकडे येत नाहीं ? येथें वनस्पतींचा महासागर भरला आहे. ज्यावर अजूनपर्यंत माणसाचीं दृष्टीसुद्धां पोहोंचली नसेल अशाहि वनस्पति आहेत. मी म्हणतों त्याप्रमाणें तुम्ही येऊन तर बघा म्हणजे कळेल त्याची प्रचीति."

एका निरक्षर, अक्षय्य पहाडांत राहणाऱ्या खेडुताचे कोणाहि आधुनिक सुशिक्षितास सहज पटण्यासारखे सूक्ष्म व पूर्ण व्यवहारी विचार ऐकून कौतुकच वाटलें. ऊन्ह लागत होतें, भूकहि फार खवखवली होती. म्हणून त्यास 'जय गंगा मैय्या' करून पुढें निघालों. [या यात्रेंत कोणीहि कोणास प्रथम भेटलें म्हणजे ते एकमेकांस नमस्कार करतांना तोंडानें म्हणतात—(यमुनोत्तरीच्या वाटेंत—) 'जय जम्नामैय्याकी जय'; (गंगोत्तरीच्या वाटेंत—) 'जय गंगामैय्याकी जय'; (बदरीकेदारकडे) 'जय केदारस्वामी महाराजकी जय'; (बदरीनारायणाकडे) 'जय बद्रीविशालकी जय';] तो म्हणाला, "बाबूजी, आज उद्यां येथें रहा. मी तुम्हांला वनस्पति दाखवतों व त्यांचा प्रभावहि सांगतों." मी म्हटलें, "आम्हांस एवढी सवड कशी सांपडेल ? प्रवासाचे दिवस ठरून गेलेले आहेत; बोजेवाले थांबण्यास कुरकुर करतील; पुन्हां केव्हांतरी योग येईल तेव्हां पाहूं."

925.963



देवप्रयाग मार्गाची श्रेष्ठता

धर्मशाळेंत परत आलों. शेजारच्या खोलींत एक महाराष्ट्रीय दांपत्य असल्याचें दिसलें. ओळखपाळख नसली तरी परप्रांतांत आपल्याकडील माणूस दिसला तरी एकदम आपलेपणा उत्पन्न होऊन त्याजशीं सलगी करावी असें वाटतें. लागलीच विचारपूस केली. कळून आले कीं, ते नगरकडचे राहणारे शिंपी आहेत. आमच्यासारखीच चार धामाची यात्रा करण्यास ते निघाले होते. ते देवप्रयागकडून येथें आले. त्यांच्याशीं गप्पागोष्टी करितां ध्यानांत आलें कीं, मसूरीकडून येण्यापेक्षां देवप्रयागमार्गें येणें अधिक श्रेयस्कर आहे. दहाबारा मैलांची चाल वाढते खरी पण यात्रेंतील हेतूकडे लक्ष देतां ती विचारांत सुद्धां घेण्याच्या किंमतीची नाहीं. देवप्रयागमार्गें येण्यांत तेथें भागीरथी व अलकानंदा संगमस्नान लाभून पुढें चार पांच दिवस गंगाकांठानें होणाऱ्या प्रवासामुळें तिच्या पवित्र आणि शांत वातावरणांत अहोरात्र कालक्रमणा करण्याचा लाभ अनायासें पदरीं पडतो. गंगाकांठीं राहण्याचें माहात्म्यवर्णन पण्डितद्वयानें मोठें मार्मिक केलें आहे त्यांतील सारः—

निवासाल्लोकानां जनिमरणशोकापहरणम् ।
यदेतत्ते तीरं श्रमशमनधीरं भवतु नः ॥—जगन्नाथ पंडित
निवासे लोकांचे हरि जनिमृतीदुःख मनिचें ।
असें तूझें तीर श्रमपरिहरू सर्व अमुचे ॥ —वामन पंडित

वाटेवरील गांवें व चटया.

इकडील गांवें म्हणजे दहापांच घरांची वस्ती. मोठें गांव म्हणजे पांचपन्नास घरें. उतरण्याचीं ठिकाणें पाण्याच्या सोयीनें वाटेवर असतात. बहुतेक ठिकाणीं तीं गांवापासून मैल अर्धमैल दूर आहेत. तेथें चटया व निदान एक तरी लहान मोठी कमळीवाले ह्यांची धर्मशाळा असते. चट्टी म्हणजे आपल्याकडे जत्रेच्या वेळीं दुकानाकरितां तात्पुरते मांडव घालतात त्याप्रमाणें पानपाचोळ्यानें कुडलेले व आच्छादलेले मांडवच होत. त्यांत उतरण्यास भाडें पडत नाहीं. लागणारें भांडेंकुंडेंहि वापरण्यास फुकटच मिळतें. पण आपणांस तेथें लागणारी शिधासामुग्री चट्टीवाल्याच्या तेथील दुकानांतूनच घेतली पाहिजे.

बदरीनारायण, बदरीकेदारचे वाटेवर सररहा व गंगोत्तरी, यमुनोत्तरीचे वाटेवर कोठें कोठें घरांसारख्या पक्क्या बांधणीच्याहि चट्ट्या आहेत. घरवजा चट्ट्यांतून ऊन्ह, वारा व पाऊस ह्यापासून चांगलें संरक्षण होतें. पण हंगामी चट्ट्यांतून पावसाचा उपद्रव होतो.

## हिमालयांतील डोंगरांची दगड–माती

भल्डियानापर्यंत वाटेवर काचळ, कंकर, कपार दगड असत. पण पुढें वाटेवर अभ्रकमिश्रित माती व त्याचेच बनलेले हलके व ठिसूळ दगड असून जागजागीं सफेत्याप्रमाणें पांढरी शुभ्र व संगजिऱ्याप्रमाणें अगदीं मऊ व बारीक माती आहे. कित्येक ठिकाणीं अभ्रकाचे पापुद्रे एकमेकांस घट्ट चिकटून झालेले खडे, कागदी लिंबाएवढे पण चपटया आकाराचे आढळतात. हे अभ्रकखडे फोडले तर त्याचे पापुद्रे सुटे सुटे होतात. मात्र ते पावलीपेक्षां मोठ्या आकाराचे निघत नाहींत. अगदीं क्वचित रुपयाएवढे हातीं लागतात.

ह्या चारधामांच्या यात्रा–वाटेंत अभ्रकमिश्रित माती फार. हिमालयाच्या ह्या भागांतील डोंगर सह्याद्रीप्रमाणें पक्क्या दगडांचे एकजीवी नाहींत. ते मुरमाड, एकापुढें एक मोठमोठ्या फरशा उभ्या ठेवाव्यात त्याप्रमाणें दगडी उभ्या पापुद्र्यांचे, किंवा वाळू, खडी, गोटे, लहानमोठे दगड, मुरुम, चुना, माती ह्या सर्वांच्या मिश्रणाचा झालेला लगदा ह्यांचे बनलेले दिसतात.

हिमालयांतील नद्या, ओढे, नाले ह्या सर्वांचेच प्रवाह मोठ्या उतारानें खालीं वाहात येत असल्याकारणानें त्यांचा वेग व आघात अतिशय दांडगा असतो. त्यापुढें दगड-धोंड्यांचा सुद्धां चक्काचूर होऊन जातो. मग दरडीची माती सारखी धुपून जात असावी हें सहाजिकच आहे. यमुनेच्या कांठची अभ्रकमिश्रित माती व दगड काळपट रंगाचे आहेत. ती पाण्यांत मिसळून जात असल्याकारणानें यमुनेचें पाणी काळें दिसतें. भागीरथी, अलकनंदा ह्यांचे काठच्या दगडमातीचा रंग पांढुरका असल्यामुळें त्या नद्यांचें पाणी पांढरें दिसतें. ह्या नद्यांचे पाण्यांत धुऊन वाळलेले कपडे नुसते सहज झटकले तर ओलेपणीं त्यांना चिकटलेले पाण्यांतील अभ्रकाचे कण त्यापासून मोकळे सुटून भोंवतालच्या हवेंत भरून जातात आणि तींत सारखे चमचम

करीत तरंगत असतात. पाण्यांत मिसळून गेलेली ही माती अतिशय हलकी असते. पाणी निवळत ठेवलें तर तें आठ आठ दिवस सुद्धां चांगलें निवळत नाहीं

## धरासू

भल्डियानापासून धरासू गांव पंधरा मैल उत्तरेस गंगाकांठींच आहे. भल्डियाना येथें गंगा पांचशें फुटांच्यावर खोलांत होती तर येथें ती सपाटीलाच आहे. येथपर्यंतची वाट सारखी चढउताराची आहे. येथें चार दिशेनें चार रस्ते येऊन मिळतात. हरद्वार–देवप्रयाग मार्गें येथें ब्याण्णव मैल होतात. हा रस्ता आग्नेयी दिशेनें आला आहे, दुसरा मसूरीहून नैऋत्य दिशेनें येऊन मिळतो. तो ४८ मैलांचा आहे. तिसरा सिमली–गंगाणीवरून यमुनोत्तरीस वायव्य दिशेनें जातो. तो पन्नास मैलांचा आहे. आणि चौथा उत्तरकाशीवरून ईशान्य दिशेनें गंगोत्तरीस जातो. तो ५७ मैलांचा आहे. ह्याप्रमाणें धरासू हें चव्हा-ट्याचें नाकें आहे. गंगाकाठ सोडून देऊन पुढचा प्रवास यमुनेच्या कांठानें करावा लागतो. येथून पंचवीस मैलांवर गंगाणी येथें यमुना नदी भेटते. धर्मशाळा, टपालघर, रहदारी बंगला आहे. गंगेचा प्रवाह उडचा घेतल्याप्रमाणें जोरानें वहात चालला आहे. प्रवाह उथळ त्यामुळें खळाळीच्या वहाळींत फवारे उडत असतात. त्यावर ऊन पडून सप्तरंगी तुषारांचा नाच पाहतांना हलूंच नाहीं असें वाटतें.

## चीडवृक्ष

गंगाकांठ सोडून यमुनेच्या जवळजवळ आलों, तों चीड वृक्षाची झाडी दिसूं लागली. सिमलीजवळ ती दाट होती. चीडवृक्ष ही एक देवदाराचीच जात आहे. चीडवृक्षांच्या राईच्या छायाचित्रांत अगदीं पुढेच दोन मोठे वृक्ष दिसत आहेत. त्यांपैकीं डावेहाताचा इतका उंच आहे कीं, त्या जागेवरून चित्र काढतांना तो बुंध्यापासून शेंड्या-पर्यंत काचेवर समावेना. म्हणून त्याचे शेजारचा, जो त्याचे मानानें अजून बच्चाच म्हणावा लागेल, त्याचें सबंध छायाचित्र घेतलें. ह्याचे बुंध्याशीं माणूस उभें आहे. त्याची उंची ५'–२" आहे. त्याच्या वीसपट झाड आहे. ह्यावरून उंचीची कल्पना करावी.

हें झाड ताडामाडाप्रमाणें नीट सरळ शंभर दीडशें फुटांपेक्षांहि

अधिक उंच वाढतें. दोन माणसांच्या कवळींत मावणार नाहींत एवढाले ह्यांचे बुंधे होतात. बुंध्यापासून शेंड्यापर्यंत ह्यांचे खोडावर ताडाचे झाडाप्रमाणें खवले असतात. ह्याच्या उंचीच्या पहिल्या दोन भागांत त्यास क्वचितच फांद्या असतात. वरच्या उंचींत असल्या तरी त्या डवरलेल्या नसतात. सर्व प्रवासांत खालीं फांद्या असलेलें एकच झाड ह्या रहाळांत दृष्टीस पडलें. पुरुषभर उंचीवर त्यास एकाच ठिकाणांतून चारहि बाजूस चार फांद्या फुटून तेथें चौबेळके झालेलें होतें. त्यावर पेंढा सांठविण्याची सोय अनायासें झाली होती. अस्कोटजवळ एक झाड पाहिलें तें जमिनीपासूनच जुळ्यासारखें होतें. ह्या झाडांचीं पानें सूचीपर्णी असतात. तीं म्हणजे टीचभर लांबीच्या बारीक गवताच्या हिरव्या काड्याच समजाव्या. इतर झाडांप्रमाणें ह्यांस सुटीं सुटीं पानें येत नाहींत. देठाच्या शेवटास दहा-वीस काठ्याचा भरघोस झुपका असतो. लहान मुलांच्या टोपीस आधुनिक पद्धतीचें कृत्रिम जाड तंतूंचे एकरंगी तुकतुकीत गोंडे लाव-तात त्याप्रमाणें हे झुपके दिसतात.

हीं पानें (काड्या) वाळून गळलीं म्हणजे त्यावरून फार जपून चालावें लागतें. त्या काड्या सुळसुळीत असल्यामुळें पाय घसरण्याची भीति फार. त्यांत जर कां उतार असला तर उभ्यानें काठीचा अधार घेऊन सुद्धां उतरता येत नाहीं. बसून हाताचा आधार घेऊनच सरकत सरकत उतरावें लागतें. पण जर का चढण्याची पाळी आली तर काम कठिणच. आम्हांस उतरण्याची कसरत करावी लागली पण चढण्याच्या परीक्षेची पाळी दैवयोगानें आली नाहीं. असल्या तऱ्हेच्या परीक्षा म्हणजे तीं दिव्येंच होत. ह्या चार धामांच्या यात्रेंत असलीं दिव्यें आतां राहिलेलीं नाहींत. पण तीं कैलास व मुक्ति-नारायणाचे वाटेंत सत्त्वपरीक्षाच पाहतात.

चीड झाडाची वाढ पांच ते सात हजार फूट उंचीवर विशेष जोरांत झालेली दिसते. ह्याच्या वरच्या उंचीवर ती खुरटी होत जाऊन दहा हजार फुटांचे वरचे उंचीस नामशेष होऊन जातात. घरबांधणीच्या सर्व कामांत भालापासून तो किलच्यापर्यंत ह्यांचे लाकडांचा चांगला उपयोग होतो. ह्यांच्या जाडसर फळ्या पत्र्याऐवजी

घराचे छपरास वापरलेल्या दिसल्या. आगगाडीच्या रुळाखालीं लागणाऱ्या हजारों 'स्लिपर्स' ह्याच लांकडाच्या असतात. तीस चाळीस फुटांपेक्षांहि अधिक रुंदीचे प्रवाह ओलांडण्यासाठीं जे साकव (ह्या कांठावरून त्या कांठावर लांकडें टाकून केलेले तात्पुरते पूल) करतात, त्या कामीं हिमालयांत ह्यांच्या सोटांचा सररहा फार मोठा उपयोग होतो. ह्या लांकडांची सोय नसती तर हिमालयांतील लोकांचें आपसांतील दळणवळण थांबलेंच असतें. ह्या झाडाच्या खोडापासून रांळ व टरपेन तेल निघतें. कमरेइतक्या उंचीवर झाडाचे खोडास टीचभर लांब व दोन बोटें रुंद अशी उभी साल काढून तेथें एक बोळकें वा डबडें त्याचें तोंड साल काढलेल्या शिपल्याच्या खालच्या कडेस घट्ट चिकटेल असें बांधून ठेवितात. त्यांत त्या झाडाचा स्रवलेला चीक भरला म्हणजे तें भांडें बदलतात. ह्या चिकापासून राळ व टरपेन तेल गाळून निघतें. तिकडे ह्याचें कारखाने आहेत.

चीडाच्या ओल्याहि फांद्या दिवटीसारख्या पेटतात. काळोख्या रात्रीं संचाराचे वेळीं उजेडाकरितां तिकडील लोक त्या झाडाची फांदी मशालीसारखी पेटवून बरोबर घेतात.

खोक्यांकरितां लागणाऱ्या जाड पातळ फळ्या, आगकाड्या वगैरे कामाकडे देवद्वार लांकडाचा फार मोठा उपयोग होतो. त्याचप्रमाणें चीडाच्या लांकडाचाहि चांगला उपयोग होण्यासारखा आहे. चीडाची आणि देवदाराची जात एकच आहे. हिमालयांतील खालच्या खालच्या उंचीवर नदीकांठीं वाढणाऱ्या असल्या लाकडांचे ओंडे करून ते नदींत सोडून देतात आणि पायथ्याजवळ ते वहात आले म्हणजे काढून घेतात. पण जेथें अशा प्रकारची नदीची सोय नाहीं तेथील आणि वरच्या वरच्या उंचीवरील असली अमोप उद्भिज संपत्ति जागचेजागीं कुजून वायां जात आहे. कारण परकी सरकारास गरज पडली नाहीं म्हणून त्यांचे आणि वहातुकींची सोय नाहीं म्हणून व्यापाऱ्यांचें काय किंवा लोकांचें काय तिकडे लक्ष गेलेलें नाहीं.

## आरोग्य भुवन

पांच हजार फूट उंचीवरील हवेंत धूलिकण नसतात म्हणून ती जात्याच निरोगी, कोरडी, मोकळी व शुद्ध असते. त्यांतच ती चीड

वृक्षांवरून वहात असल्यामुळें टरपेंटाईन-गंधयुक्त होऊन रोगजंतु प्रतिबंधक व नाशकहि होते. इतकेंच नव्हे तर उत्साहवर्धक व आरोग्य-दायकहि झालेली असते. हीं झाडें कितीहि दाट असलीं तरी खालीं सावट होण्याची भीति नाहीं. अशा ठिकाणीं नैसर्गिक उपचार पद्धतीचीं आरोग्यालयें काढलीं तर गोरगरीबच काय पण लक्ष्मीपुत्र आणि मोटारी व विमानें ह्यातून हिंडणारे साहेबवत् अधिकारी सोडून बाकीचा सर्व मध्यमवर्ग ह्यांची मोठी सोय होईल व ते दुवाच देतील. कोणत्याहि जीर्ण रोगग्रस्तास येथें औषधाशिवाय बरें वाटेलच वाटेल. त्यांतल्या त्यांत दमेकरी व क्षयरोगी ह्यास तर येथें पाऊल ठेवल्या-पासूनच आराम वाटूं लागेल.

कैलासयात्रेंत बेरीनागजवळ आम्हास दोन हजार फूट उंची चढा-वयाची होती. तेथें एकावर एक साधारण सारख्याच उंचीचे तीन पहाड होते. पहिले दोन एकदमी चढून गेलों. दम लागून थकवाहि फार आला. निदान तास अर्धा तास तरी विश्रांति घेतल्याशिवाय तिसरा डोंगर चढून जाणें आवांक्याबाहेरचें वाटत होतें. आम्ही थांबलों तेथें चीड वृक्षांची राई होती. तेथील गार, मोकळ्या व टरपेंनगंधित हवेंत आम्ही पंधरा वीस मिनिटांतच सर्व दम व थकवा जाऊन इतके पुनर्जीवित झालों कीं जणूं आम्ही दमलोंभागलों नव्हतोंच. पहिल्या दमाप्रमाणेंच राहिलेला डोंगर सहज चढून गेलों. ह्या अनुभवानेंच वर लिहिलेली आरोग्यभुवनाची कल्पना तेव्हां तेथेंच सुचलेली आहे. तेव्हां परराज्य होतें, आतां त्याचें रूपांतर स्वराज्यांत झालें आहे. नवनवला-ईचा दम जिरला म्हणजे लोकांचें काय किंवा सरकारचें काय ह्या सूचनेकडे लक्ष गेल्याशिवाय राहाणार नाहीं, असा विश्वास वाटतो.

## सिमली व गंगाणी


देवप्रयाग किंवा मसूरीकडून गंगोत्तरीस जाणारे यात्री धरासूहन त्या मार्गास लागतात. पण ज्यांना यमुनोत्तरी करून मग गंगोत्तरीस जावयाचें असतें ते सिमली मार्गें यमुनोत्तरीस जाऊन त्याच मार्गें सिमलीस परत येतात, व तेथूनच गंगोत्तरीचा मार्ग धरितात. ह्या मार्गास सात मैलावर सिंगोट येथें धरासूहन गंगोत्तरीस गेलेली वाट मिळते. सिमली येथें एकच लहानशी चट्टी आहे, त्यामुळें तेथें उतर-



यमुनोत्तरी वाटेवरील किर्र झाडी पान ८४



धरासू – चीड वृक्षाची उंची पान ६१



हरद्वार – गंगाघाट, हरीची पायरी, क्लॉक टॉवर पान ५५

ण्याची सोय चांगली नाहीं. तेथून दोन मैलांवर गंगाणी गांव आहे. तो यमुनेच्या कांठीं आहे. तेथें धर्मशाळा व चांगल्या चट्ट्या आहेत. भागीरथी कुंड आहे. येथून यमुनोत्तरी पंचवीस मैल राहाते. यमुनोत्तरीस न लागणारें असें जें कांहीं फालतू सामान आपल्याबरोबर असतें तें सिमली अथवा गंगाणी येथें चट्टीवाल्याकडे निःशंक ठेवतां येतें. तो ओझेवाल्यांच्या चांगला ओळखीचा असतो व त्यांच्याच सोयीकरितां तो तें सामान भाडें किंवा संभाळणावळ कांहींहि न घेतां ठेवतो. जातां येतां मिळून पन्नास मैलांच्या चालींत ओझेवाल्यांचे पाठीवरील तेवढेंच ओझें हलकें होतें. आम्ही एका कांबळयांत फालतू सामान बांधून तें गाठोडें गंगाणी येथें गागाभट्ट पंडे यांच्या चट्टीवर ठेविलें. चार दिवसांनीं तें परत घेतलें तेव्हां अगदीं जसेचे तसें मिळालें. कांबळ्याची गाठ सुद्धा सुटलेली नव्हती.

## यमुना भेट

चीड वृक्षांच्या झाडींतून पाय पडेल तीच वाट समजून सिमलीचा पाठ डोंगर उतरत होतों. चीड वृक्षांच्या वाळून गेलेल्या सूचीपर्णांनीं आमच्यासारख्या गतानुगतिक भक्तांच्या स्वाऱ्या येणार म्हणूनच कीं काय उतारावरचे खांचखळगे व खडबड दृष्टीआड करून जिकडे तिकडे गुळगुळीत फरसबंदीसारखे वाटेचें मोहजाल उत्पन्न करून ठेविलें होतें. त्या उतारावरून निभावून जाण्याची मोठी परीक्षाच होती. तेव्हां समोरच्या पहाडांतून नागमोडी वळणानें वाट काढीत काढीत मोठ्या उतारानें धांव घेत आपल्याकडेच येत निघालेल्या यमुनेच्या लांबवरून आलेल्या बाल प्रवाहाचें दर्शन झालें. त्या वेळीं तेथून यमुनेची प्रथमच दृष्टिभेट होणार ही आगाऊ कल्पना नव्हती. ह्या अवचित भेटींत दृष्टादृष्ट होतांच मन तत्क्षणीं सादर नत झालें, व तोंडांतून ' जय जम्नामैय्या कीं जय, ' असे शब्द उमटले, आणि मस्तक वाकवून हातांनीं नमस्कार करण्याकरितां ते उचलले मात्र तों सुळसुळीत जागेवर पायास मिळणारा काठीचा आधार सुटून जाऊन तोल गेला आणि असला हा उभ्या उभ्या होणारा उद्धट नमस्कार जम्नामैय्यास न रुचून कीं काय, पाय निसरला आणि साष्टांगाऐवजीं ' घालीन लोटांगण वंदीन चरण, ' असें अनायासें

घडून आलें. ' सहज पडे नि दंडवत घडे, ' म्हणतात, तें हें असें.

उभ्याउभ्यानेंच कायिक नमस्कार करीत होतों, तो पुरा झाला असता तर उतारावर चालू झालेली आमची अधोगति तशीच पुढें चालू राहून चालतां चालतां सहज होणारें दर्शन तेवढें घडलें असतें. पण उद्बोधक दर्शन मिळण्याच्या सुदैवानें असो नाहींतर मुका मार बसण्याच्या दुर्दैवानें असो तो योग चुकला. निरुपायाच्या संमतीची शरणागती—लोटांगण घडल्यानंतर कांहींतरी विशेष प्रासादिक अनुभव मिळावा ह्या इच्छेनें पोक्त विचार केला कीं, आतां उभ्यानें ताठरपणें नको, किंवा अडवारून हताशपणें नको, तर आपण आपल्या चालू कालाच्या दूरदर्शी शिकवणीचा ' मध्यमक्रम मार्ग ' पत्करणें उचित होईल. म्हणून बसूनच नमस्कार करून दर्शनाचा पोटभर आस्वाद घेतला. ह्या ' सुवर्णमध्य मार्ग '—स्वीकारामुळें हबका खाल्ल्याची झाकली मूठ उघडी होण्याची पाळी आपोआप टळली.

### यमुना चित्रदर्शन

यमुनेचें दर्शन झालें त्या ठिकाणचा देखावा मोठा चित्रमय, तसाच चित्ताकर्षक आणि उद्बोधकहि होता. अर्थात् त्याची घटना नैसर्गिक म्हणजेच दैवी आहे हें सांगणें नकोच. ह्या घटनेंतील देखाव्याच्या सजावटीचें चातुर्य, कल्पकता व कलानैपुण्य अद्वितीयच आहे. ' कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ' अशा श्रेष्ठ कलावंताची ती अद्भूत करणी, ती अलौकिक असणारच. ह्या देखाव्याचें छायाचित्र घ्यावे असा विचार आला मात्र तों त्या वेळचा भकास प्रकाश पाहून निराशाच झाली. तथापि येईल तसें येईल, निघतांना घेऊं, असा विचार करून समोरचें दृश्य आणि त्यानें उठवलेले विचार ह्यांत दंग होऊन बसलों. पुढें जागचा उठून मोठ्या सावधगिरीनें शेंपन्नास पावलें खालीं उतरून गेलों, तेव्हां लक्षांत आलें कीं, छायाचित्र घेण्याचें राहून गेलें. कॅमेरा उघडून पाहूं लागलों तों बसल्या जागेवरून दिसलेलें सौंदर्य येथून कसेंहि पाहिलें तरी दिसेना. चमत्कार वाटला. तेच उघडे बोडके डोंगर, तोच अथपासून इतिपर्यंत एखाद्या पोक्त पुत्रवती सुवासिनीच्या डोक्यांतील फाटलेल्या भांगाप्रमाणें दिसणारा यमुनेचा पाटवजा प्रवाह, तीच नऊ दहा वाजण्याची वेळ, अभ्राच्छादित प्रकाशाची तीच

धूसर प्रभा आणि पाहण्याचा दृष्टिकोनहि तोच, मग इतका फेर एकदम कोठून आला ? मघाशीं काय पुढून उजेड आला होता ? आणि आतां काय तो मागून पडून देखावा निष्प्रभ होऊन गेला ? हें कांहीं ध्यानीं येईना. मग हा काय प्रकार होत आहे अशा गोंधळांत पडलों. कांहींहि असो त्याच जागीं पुन्हां जाऊन तेथून तो देखावा पाहावयाचा असें ठरवून परतलों. तेथें जाऊन पाहूं लागलों तों तें दृश्य पूर्ववत् उठावदार व रम्य होतें तसेंचें तसें दिसलें. तेथून छायाचित्र घेतलें व आश्चर्याची गोष्ट कीं, तेंहि अपेक्षेबाहेर चांगलें आलें आहे. त्यांत तेथील वस्तु–निदर्शन तर यथातथ्य झालें आहेच पण त्याशिवाय दृष्टीस पडणारा वातावरणाचा आविष्कारहि जसाचा तसा उमटला आहे. छायाचित्र पाहिल्यानंतर लक्षांत आलें कीं, स्थानांतरित जाग्या-वरून तोच देखावा अगदीं फिका व अळणी दिसला त्याचें कारण त्या चित्रांत पुरोभागीं जे दोन वृक्ष दिसत आहेत ते दृष्टीआड होऊन गेले होते. खरें पाहिलें तर त्या दोन वृक्षांत मार्दव तें कसलेंच दिसत नाहीं. त्यांत पानाफुलांचा भरगच्चपणा नाहीं किंवा इतर अंगोपांगांचा बारकावाहि स्पष्टपणानें कोठेंच नाहीं. उंचीचें वैभव आहे पण तें विनीत असण्यापेक्षां उग्रच आहे. एखाद्या झाडाची बेढब काळी कुळ-कुळीत सावली पडावी, किंवा संतरजीवर दऊत उपडी होऊन शाईचे ओघोळ जाऊन डाग पडावे, त्याप्रमाणें हीं झाडें दिसत आहेत. असें असूनसुद्धां त्यांनीं त्या चित्रास मोठा उठाव व विलक्षण सौंदर्य आणलें आहे. असल्या त्या शुंभ निशुंभ दैत्यरूपी सडेसोट वृक्षाची काळी कुट्ट बाजू पुढें आल्यामुळें शुद्ध अशा यमुनादेवीच्या धवल प्रवाहास एक-दम उठाव आला आहे. जगदंबा, भगवती म्हटल्यानें महादेवीचे सर्व गुण पुढें उभे राहात असले तरी महिषासुरमर्दिनी म्हटल्याशिवाय तिच्या सामर्थ्याचा गुण–विशेष प्रामुख्यानें पुढें उभा राहात नाही. म्हणजे एकाद्या गुणाचा ठसठशीत उठाव विरोध दर्शनानें चांगला होतो. ह्याच दृष्टीनें यमुनेच्या प्रवाहास उठाव येऊन सबंध देखावा प्रेक्षणीय व मनोरम्य होऊन बसला आहे. यदृच्छा लोटांगणाची पाळी आली नसती तर त्या अलौकिक चित्रदर्शनाच्या लाभास कायमचाच आंचवलों असतों. पण ‘ वाईटांतूनहि चांगलें निघतें,’ म्हणतात तें असें.

## उद्बोधन

हा देखावा पाहात असतां मनांत विचार आले त्यांतील एक असा कीं,—

'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना।'

गीतेंतील त्या श्लोकांत सांगितलेली भूतमात्रांच्या जन्मापूर्वींची, जीवनदशेंतील व मृत्यूनंतरचीं अवस्थांतरें यमुनेच्या त्या प्रवाहानें चांगलीं स्पष्ट होत आहेत. प्रवाहाच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जो भाग प्रत्यक्ष दिसतो तीच तेवढी व्यक्तमध्य म्हणजे अनुभवास येते ती जीवनदशा. प्रवाहाच्या दोनहि दृष्य टोंकांच्या पलीकडील न दिसणारा भाग म्हणजेंच ती ती आदि व अंताची अव्यक्त अवस्था. ह्याचप्रमाणें यमुनेच्या उगमापासून संगमापर्यंत तिचा प्रवाह डोळ्यापुढें आणला तर तो तिची व्यक्त जीवनदशा होईल आणि उगमपूर्व व संगमोत्तर तो प्रवाह कोठून आला होता व तो कोठें गेला हें सर्व पडद्याआड राहून तेथें दृष्टि पोंहचूंच शकत नाहीं म्हणून तो आदि व अंत चर्मचक्षूंला अव्यक्त राहील. परंतु यमुनेचा गंगेशीं संगम व पुढें सागराशीं मीलन. तेथून बाष्पीभवनानें मेघ व त्यापासून जल वा बर्फ रूपानें वर्षाव. कीं, पुन्हां प्रवाह. असें हें रहाटगाडगें अव्याहत चालूं असल्याचें मनश्चक्षूस मात्र गोचर होतें. अवस्थांतरें झालीं, ह्यावरून कितीहि नित्य नवें पाणीं आलें आणि गेलें, तरी यमुना अखंड वहातेच आहे. हा बोध चांगला ठसतो.

## चीडवृक्षाच्या आगीचा डोंब

सिमली येथें पोहोंचलों. स्नानसंध्या फराळ करून तेथेंच ओढ्याकांठीं विश्रांतीकरितां अडवारलों. झोपेची संवय नव्हती व आवश्यकताहि कधीं वाटली नाहीं. ओढ्याची एकसारखी चाललेली खळखळ ऐकूं येत होती व मध्यें फेसाळलेल्या पाण्याची जोराची वहाळ दिसत होती. त्याचबरोबर कांठचे स्वच्छ व संथ पाण्यांत झाडाझुडांची प्रतिछाया व उन्हाचे कवडसेहि दिसत होते. त्यांतच एक लाल गोळ्याचें प्रतिबिंब दिसलें.

तत्क्षणींच हा काय बोवा नवीन चमत्कार दिसतो आहे? म्हणून

सभोवतीं पाहिलें, तों दशदिशा धुक्यानें भरून भोंवतालचें कांहींच स्पष्ट दिसूं नयें अशा मंद झाल्या होत्या. सर्व आकाश सुन्न होऊन मळभ आल्याप्रमाणें निस्तेज झालेलें दिसलें. उन्हाचाहि प्रखरपणा जाऊन तें सौम्य झालेलें वाटलें. म्हणून उठलों आणि इकडे तिकडे पाहूं लागलों. ती बारावर एक वाजण्याची वेळ होती. सूर्य मध्यान्हीं आला होता. सूर्यग्रहणाचे वेळीं काजळ धरलेल्या भिंगांतून तो पाहिला म्हणजे जसा दिसतो त्याप्रमाणें नुसत्या डोळ्यांनी त्यांस दीप न येतां तो तांबडा लाल गोळा दिसत होता. ही विलक्षण घटना पाहून आमचा बोजेवाला पातेराम ह्यांस विचारलें कीं, हा काय प्रकार आहे? तो म्हणाला 'बाबूजी पिछे देखो, जंगलको आग लगा है.' पाहातों तों खरेंच. उभेचे उभे चीडवृक्ष धडाधड पेटून धुराचे लोट उठून दशदिशा धुंद करून टाकीत आहेत. काय, एक झाड पेटलें आहे म्हणावें का दोन पेटलीं आहेत म्हणावें? ह्या खांद्यावरून त्या खांद्यावर मान फिरविली तरी पाठीसहि मुरुड घालून पाहावें लागत होतें. एकाशेजारी एक शेकडों होळ्या पेटल्याप्रमाणे ज्वालांचा कल्लोळ उठला होता. माथ्याकडून पायथ्याकडे आग पसरत चालली होती. झाडें पेट घेत तीं प्रथम शेंड्याकडे घेत व नंतर खालीं खालीं पेटत. फांद्या खोडें अर्धवट जळलीं म्हणजे कडाकड मोडून पडत, तेव्हां खालच्या गवत काड्या व बुंधेहि पेट घेत. डोंगराच्या अडोशाला रान होतें, म्हणून वाऱ्यानें खैर केली. नाहींतर चीडाचीं झाडें म्हणजे दारुखानाच तो. आग भडकावयास काय वेळ ? ती स्वस्थपणें पसरत होती. हीं राखीव कुरणांतील सरकारी झाडें, हीं माळावरील रयताव्याचीं, हीं राजेसाहेबांचीं शेरींचीं, हीं देवस्थानचीं, हीं धष्टपुष्ट, हीं रोडखुरटीं, हीं मोठमोठीं, हीं क्षुल्लक, हीं लहान, हीं भरलेलीं, (राळ व तेल काढून न घेतलेलीं), हीं रिती केलेलीं, असला पक्षपाती भेदभाव त्या सर्वंकश आगींत नव्हता. वास्तविक सर्व जीवनसृष्टींत अग्नि कोणत्या ना कोणत्या रूपानें कमी अधिक प्रमाणांत असतो आणि त्या वेळीं त्यास पूर्ण तातरम्य असतें व तो शांत असतो. तो चेतावून प्रोत्साहित केल्याशिवाय प्रज्वलित होत नाहीं. आणि एकदां प्रज्वलित झाल्यावर तो इतका बुभुक्षित होऊन जातो कीं, निवडानिवड करण्याइतका दम त्याचे

जवळ राहात नाहीं. मग दयामाया दाखविण्याच्या बुद्धीस अवसरच कोठचा! त्याचा लष्करी सोटेशाही कारभार (Martial Law).सरसकट सर्वांचाच स्वाहा. त्यास ओलें वाळलें सर्वच सारखें. ' वाळल्याबरोबर ओलेंहि जळतें,' अशी म्हण आहे व तसा अनुभवहि येतो. परंतु चीड जातींच्या वृक्षांच्या विषयीं ती म्हण उलटी म्हणजे, ओल्याबरोबर वाळलेंहि जळतें, अशी म्हणावयास हवी. ह्या जातीच्या झाडांच्या वाळलेल्या लांकडापेक्षां ओल्यांतच तेल व राळ अधिक असतें.

अग्नीचा आक्रमक स्वभाव तर उभ्दिजांचा अगदीं त्याच्या उलट. त्यांना हर्षविषादि संवेदना असल्याचें सर जगदीशचंद्रांनीं सिद्ध केलें आहे. असें असलें तरी त्यांना स्थानांतर करतां येत नाहीं. त्यामुळें आक्रमण व प्रतिकार करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नाहीं. आणि त्याच कारणांमुळें त्यांस स्वसरंक्षण करतां येत नाहीं. झाडें-झुडें म्हणजे अगदीं निरुपद्रवी. अपकार करणारावरसुद्धां तीं उपकार करितात. पंचमहाभूतासारखा त्यांचा स्वभाव. ज्ञानेश्वरांनीं म्हटल्या-प्रमाणें:–' उत्तमातें धरिजे। अधमातें अव्हेरिजे।; कां रायाचे देह चाळूं। रंका परीते गाळूं।; गाईची तृषा हरूं। व्याघ्रा विष होऊनि मारूं।; कां घरींचिया उजियेड करावा। पारखिया अंधार पाडावा;। नातारी इक्षु–दंडू। पाळि तया गोडु। गाळि तया कडु।; जो खांडा-वया घाव घाली। कां लावणी जयानें केली '। असला आपपर भेद-भाव त्यांच्या स्वभावांतच नाहीं. त्यांच्या जवळ आक्रमणाची आणि प्रतिकाराची शक्ति नाहीं म्हणून तीं ' जो सर्वाभूतांचे ठायीं। द्वेषानें नेणेचि कहीं। आपपरू नाहीं। चैतन्य जैसे!' अशा स्वभावचीं झालीं आहेत, कां त्यांना ह्या शक्ति असतांनासुद्धां त्यांचा हा स्वभाव तसाच राहिला असता, हें जगदीशच सांगूं शकतील.

## आगीचा प्रताप

आगीपूर्वीं मोठमोठे वृक्ष मोठ्या डौलानें आपल्या माना ताठ उंचावून वनश्रीच्या तोऱ्यांत झुलत होते. कोणा आल्यागेल्याची, पापी चांडाळाची दृष्ट लागली म्हणून असो, नाहींतर वनश्रीचें वैभव पाहून साम्यवाद्यांची मस्तकतिडीक उठली म्हणून असो, किंवा कोणा नृपांगणगतखलाच्या सूडबुद्धीनें केलेल्या आगलाव्या चुगल्यामुळें असो,

त्या वृक्षांचा ताठरपणाचा दिमाख उतरण्यासाठींच कीं काय आत्माहुतीची पाळी प्रथम त्यांजवरच येऊन पडली. त्यावेळीं हे वृक्षरूपी महंत आपल्याच ध्येयानंदांत गर्क होते. शेंकडों जातभाईंची आपापल्या कच्चाबच्चासह विनाकारण हत्त्या होऊन राहिली आहे, ह्याची त्यांना दाद घ्यावीशी सुद्धां वाटली नाहीं. ते समजत होतें कीं, 'आम्ही काय कुणाचे खातों श्रीराम आम्हांला देतो,' पण आहाळ लागून जेव्हां का चटके बसूं लागले तेव्हां ध्येयानंदाची समाधि उतरली आणि त्यांनीं धूम्रास्त्र सोडून शत्रूस कांहींहि दिसूं नये इतकेंच नव्हे तर त्यांची प्राणहानि न होतां त्यांचा जीव गुदमरून जावा आणि त्यामुळें त्याला माघार घ्यावी लागावी अशी युक्ति केली. आत्मक्लेशच काय पण आत्मनाश ओढवला तरी तो सहन करावा, पण आपल्या प्राणावरहि उठलेल्या शत्रूचेसुद्धां अकल्याण करूं नये. असें त्यांचें अतिमानुषी व्रत होतें. अन्यायाचा निषेध जगाच्या चावडीवर जावा म्हणून त्यांनीं कडकडाटाचा उच्च घोष करून रान दणाणून सोडलें. ह्यांहि मार्गाचा उपयोग होत नाहीं असें पाहून त्यांनीं एकमतें ठरविलें कीं, काय होईल तें होवो. आपण आपलें व्रत सोडावयाचे नाहीं. होतील ते आत्मक्लेष मुकाट्यानें सोसावयाचे. आत्मशुद्धीकरितां आत्मनाश झाला तरी ध्येयच्युति होऊं द्यावयाचीं नाहीं. 'देह जावो अथवा राहो । आमुचा पांडुरंगीं भावो ।' आत्मक्लेशानें केव्हां ना केव्हां तरी अग्निनारायणाचा हृदयपालट होऊन त्यास दयेचा पाझर फुटेलच फुटेल, नाहींतर आपला दोष जळून जाऊन आपली शुद्धी तरी होईल, असा त्यांनीं निश्चय केला. अग्निनारायणाला वकिली पाचपेच व वैतागाची शरणागती ह्यांकडे लक्ष देण्याचे कारण नव्हते. परमेश्वरी आज्ञापालन हा त्याचा स्वभाव होऊन गेला होता. आपल्या अंतरात्म्याच्या सांगीप्रमाणें त्यानें सर्व झाडेझुडें निरपवाद भस्मसात केलीं. ह्या शुद्धीकरणानें महंतादिकांना कितपत समाधान झालें हें कळण्यास साधन नाहीं.

आग लागण्याचे कारण शेजारी शेजारी असलेल्या दोन झाडांत घर्षण होऊन ठिणगी पडली. आणि त्या सुंदोपसुंदींत ती दोन्हींहि झाडें जळून खाक झाली. उन्हाळ्याचे दिवस, हवा तापून कढत

कढत होऊन गेलेली, त्यामुळें वणवा डोंगरभर पसरला आणि त्यांत तेथील सर्व झाडांचें 'बीजन' झालें. (सन १८५७ चें स्वातंत्र्य युद्धानंतर सूड घेण्यासाठीं टोपीवाल्यानें कानपूर येथें बीजन केलें, म्हणजे निरापराधी असोत वा बालकें असोत पुरुष संतति राहूं द्यायची नाहीं म्हणून सरसकट कत्तल केली.) महंताचें ध्येय व भाऊबंदकीचे परिणाम ह्यापासून उद्भिजांनीं बोध घेतला तरीसुद्धां त्यांना स्वेच्छेनें हालचाल करतां येत नसल्याकारणानें त्याचा त्यांस कांहीं उपयोग नाहीं. पण माणसाचें मात्र तसें नाहीं. त्यानें बोध घेतला तर त्याचें त्यांत कल्याणच आहे. 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' अशी म्हणच आहे. अडचण एवढींच कीं, त्यास समजतें पण उमजत नाहीं. धर्मराजाचा सत्यनिष्ठेचा भोळेपणा आणि त्याचीच संधि साधून त्याच्याच लुच्या भाईंनीं उत्पन्न केलेली भाऊबंदकी ह्यांनीं दोन्ही कुळांचा आणि त्याबरोबर सर्व राष्ट्रांचा सत्यनाश झाला असें महाभारत सांगतें. गेलीं दोन जागतिक महायुद्धें तीच साक्ष देत आहेत. तिसऱ्याची प्राणप्रतिष्ठा होऊं पाहातच आहे. तरी सुद्धा आम्ही निर्गुण निराकारच.

सिमलीपासून यमुनोतरीपर्यंतची वाट यमुनेच्या कांठाकांठानें बहुतेक समोर एकाच दिशेनें चढत गेली आहे. त्यामुळें प्रतिदिवशीं रात्रीं आगीचा डोंबाळा तसाच चालू असल्याचें दिसत असे. सहाव्या दिवशीं सिमलीपर्यंत परत आलों तेव्हां सुद्धां ती पूर्ण विझली नव्हती मात्र येथें एकहि झाड उभें नव्हतें. पूर्ण निपुताशांती होऊन तो रम्य वाटलेला डोंगरउध्वस्त होऊन भयाण दिसूं लागला होता.

## घोर अघोर रूपदर्शन

हरद्वारला आल्यापासून काय योगायोग लाभले होते कीं, त्यामुळें प्रतिदिनीं एखाद्या ना एखाद्या तरी परमेश्वरी स्वरूपाच्या अंगोपांगाचें अद्भुत दर्शन व्हावें. हीं अंगोपांगें म्हणजे भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनास विश्वरूप दर्शन दिलें त्यांपैकींच होत म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. 'नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतींनि च' अशीं तीं रूपें असून गुणांनीं 'अनेकाद्भुतदर्शनम्' अशीं तीं होतीं. विश्वरूपदर्शनाध्यायांतील विषय विश्वस्वरूपदर्शन असा आहे. विश्वरूप-श्रवण असा

नाहीं. तात्त्विक ( Theoretical ) शिक्षणानंतर त्या विषयाचें पूर्ण ज्ञान होण्यास प्रात्यक्षिक वा प्रायोगिक ( Practical ) शिक्षणाची आवश्यकता राहाते. त्याचप्रमाणें त्या अध्यायांतील विषय प्रत्यक्ष दर्शनाचा आहे. त्या अध्यायांत विविध रूपांचें कितीहि रसभरीत हृदयंगम व अद्‌भुत वर्णन केलेलें असलें तरी त्यानें होणारा बोध प्रत्यक्ष दर्शनानें होणाऱ्यापेक्षां बहुतेक अपुराच पडतो. त्या दृष्टीनें गिरिराज हिमालय हा त्या अध्यायांत वर्णन केलेल्या रूपांचें प्रत्यक्ष दर्शन करून देणारा विश्वसंग्रहच आहे. ज्यानें त्यानें आपापल्या अधिकाराप्रमाणें प्रत्यय घेऊन पाहावा. हिमालय हेंच महादेवाचें रूप समजलें तर त्यांत त्याचीं दोन्हींहि रूपें—घोर व अघोर—पाहावयास सांपडतात. त्याच्या अघोर म्हणजे शांत, सौम्य व रम्य स्वरूपाचें मंगल दर्शन प्रथमच दोन वेळ झालें व आगीमुळें महारुद्राच्या घोर व सर्वभक्षक कालस्वरूपी रौद्रावताराचेंहि दर्शन झालें. एवढ्याशा सात आठ दिवसांच्या अल्पावधींत आम्हास त्याच्या दोन्हीहि रूपांचें दर्शन व्हावें हें आमचें महद्‌भाग्यच आम्ही समजतों. त्याच्या अघोर स्वरूपाचें दर्शन इतकें दुर्लभ नाहीं असा आमचा अनुभव आहे. परंतु त्याच्या घोर स्वरूपाचें दर्शन मात्र सहजसुलभ नाहीं. त्याच्या भव्य-तेंत भयानकपणा वाटला तरी घोरपणा नसतो. घोररूपाचें दर्शन म्हणजे सुळावरचीच पोळी आहे. जर का आम्ही आगींत सापडलों असतों आणि त्यांतून धड सुटलों नसतों तर आमची त्रेधा उडून तोंडचें पाणी कसें पळालें होतें वगैरेचा अनुभव वर्णन करून सांगण्यास राहिलोंच नसतो.

पण तो योग नव्हता. आम्ही पुढें निघून आलों होतों म्हणून आम्हांस इतर मागून येणाऱ्या यात्रिकांप्रमाणें परत जाऊन चक्कर घालून येण्यांत एक दिवस मोडावा लागला नाहीं. ह्यापुढें अन्य प्रसंगीं असल्या दैवी प्रक्षोभांत प्रत्यक्ष सांपडण्याचे कठीण व जिवावरचे प्रसंग आमच्याकरितां वाढून ठेवलेले होते. त्याची जाणीव त्या वेळीं आम्हांस नसली तरी त्या त्रिकालज्ञानी नियंत्यास होती आणि म्हणू-नच त्यानें आपलें रौद्रस्वरूप आम्हास पुढच्या तयारीसाठीं ह्यावेळीं दुरून दाखवून ठेविलें असावें असें आतां म्हणतां येतें.

## आग विझविण्याची पद्धत

बोजेवाल्यांनीं आमचे मागें लकडा लावला कीं येथें आतां थांबू नका. झाली एवढी विश्रांति पुरे झाली. पाहिजे असेल तर पुढची चट्टी गंगाणी, येथून दोन मैलांवर आहे तेथें थांबू. गांवकऱ्यांच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या आहेत. यात्रिक व त्यांचे बोजेवाले ह्यांच्याशिवाय कोणीहि व कोठल्याहि गांवचा असो, वाटसरू असला तरीसुद्धां त्यानें स्वेच्छेनें आग विझविण्यास धावलें पाहिजे. अशी इकडील प्रथा आहे. वास्तविक आम्हास गेलें पाहिजे. पण तुम्हास सोडून आम्हास जातां येणार नाहीं. एखादा दिवस येथें राहाण्या-सारखी सोय असती तर आम्ही तुमची परवानगी मिळवून मधाशींच गेलों असतों. आम्ही येथें रिकामे बसलेले दिसलों तर आम्हाविषयीं विनाकारणच संशय उत्पन्न होऊन पुढें आम्हास त्याचें प्रायश्चित्त भोगावें लागेल. आमचे पाठीशीं बोजे असले म्हणजे आम्ही निर्धास्त आहोंत. मीं त्यास विचारलें कीं, हा आगीचा धडाडलेला डोंबाळा तुम्ही कसा विझविणार? तो म्हणाला तुम्ही लवकर बिस्तारे आमचे स्वाधीन करा, ते पाठीशीं घेतों आणि मग चालतां चालतां सांगतों. ओरडाओरडीचा गलबला जवळ ऐकू येऊं लागला आहे. आगीचें छायाचित्रहि घेण्यास तो थांबूं देईना. आम्ही लागलीच मार्गस्थ झालों आणि छायाचित्र घेतलें. गंगाणी येथें फालतु सामान काढून ठेवण्यासाठीं थांबलों असतांना तो म्हणाला, बाबूजी ही आग फार भडकली आहे. तिची वेळींच चाहूल लागली असती तर ती अनावर होऊंच दिली नसती. ती ह्या बाजूनेंच पेटत गेली आहे, म्हणून इकडून विझविण्यास जाण्याचा मार्गच खुंटला आहे. पलीकडून आलें पाहिजे. पण वरलाकडचें गांव फार लांब राहिलें आहे. तेथील माणसांना वर्दी लागलेली दिसत नाहीं. इकडील ह्या माणसांना चार पांच मैलाचें चक्कर घेऊन त्या बाजूस जावें लागेल. तोंपर्यंत ती अशीच पसरत राहाणार. आगीच्या जितक्या जवळ जातां येईल तितक्या जवळ जाऊन भोंवतालचीं न पेटलेलीं झाडें तोडून टाकली म्हणजे आग पसरणें बंद होतें. जमिनीवर पडलेल्या बारीक सारीक फांद्या, काडयाकुडया, गवत वगैरे झाडाझुडपाच्या हिरव्या टहा-

ळ्यांनीं झोडपून विझवितां येतात. जीं झाडें पेटलीं तीं सोडून द्याव-याचीं व न पेटलेलीं वांचवावयाचीं, अशी आमची खटपट असते.

## जुटींचें महत्त्व

सगळा गांवच्या गांव बायकामुलासुद्धां साह्यास धांवतो. गांवांत म्हातारे कोतारे व अगदींच लहान मुलें यांशिवाय चिटपांखरूंहि मागें राहावयाचें नाहीं, असा आमचा हा धर्मच आहे. त्यानें ही माहिती सहज व मोठ्या आत्मविश्वासानें दिली. ती ऐकून प्रसंगाला तोंड देण्याची त्यांची तत्परता, गांवच्या लोकांची एकजूट, आगी विझ-विण्याचे अचूक मार्ग, त्यांतील कल्पकता आणि एकसूत्रीपणा ह्याबद्दल मोठें कौतुक वाटलें. असल्या सामाजिक आपत्तीचें निवारण करण्यास आपले केवढेहि स्वार्थ बाजूस सारून धावणें ही गोष्ट ते खेडूत धर्माप्रमाणें आपलें पवित्र कर्तव्य समजतात हें ऐकून मी स्तिमितच झालों. निरक्षर म्हणून अशिक्षित समजले गेलेल्यांची संस्कृति मोठी कां साक्षर म्हणून सुशिक्षित नांवानें मिरवणाऱ्यांचें शिक्षण मोठें ह्याचें तारतम्य परप्रत्ययनेय बुद्धिवाल्याशिवाय कोणासहि सहज कळेल. इतक्या आडमार्गी दऱ्याखोऱ्यांत हे लोक सुखासमाधानानें निर्धास्त कसें राहातात त्याची गुरुकिल्लीं एकोपा व जूट ह्याशिवाय अन्यत्र कशांत सांपडणार आहे ?

## गंगाणी व जम्ना चट्टी

गंगाणी चट्टी यमुनेच्या अगदीं कांठीं आहे. यमुनाप्रवाह व काठीं दाट झाडी ह्यामुळें स्थानास रमणीयता आली आहे. येथें गंगेचें देऊळ व कुंड आहे. त्यांत रंगीत मासे आहेत. धर्मशाळा व दोन चट्ट्या येथें आहेत. येथें आम्हीं आपलें फालतू सामान गागादत्त पंडे ह्यांचे चट्टीवर ठेवलें. त्यांनीं पुढें न जाण्याचा विशेष आग्रह केला. ते म्हणाले कीं, पुढच्या चट्टीवर आज फार भीड आहे. नुसते उभे राहा-ण्यापुरतीसुद्धां तुम्हांस जागा मिळणार नाहीं. रांचीवाले–कराचीहून आलेली मंडळी–शंभरावर असून त्यांचे बोजेवालेच जवळ जवळ तीनशें आहेत. शिवाय दहा मैल पोहोंचण्यास तुम्हांस रात्र होईल. आमच्या पुढें कोडेंच पडलें. ह्या जथ्याची अडचण आतां शेवटपर्यंत भोवणार. ह्यांतून मार्ग काढावयाचा म्हणजे त्यांच्या मागे किंवा पुढें

निदान तीन दिवसांचे अंतरावर आपण राहिलों तर अडचण होणार नाहीं. आज तर आपण त्यांच्या पाठशिवणीस आहोंत. मागें राहावयाचें तर विनाकारणच दोन दिवस येथें माशा मारीत बसावें लागेल. त्यापेक्षां थोडी अधिक चाल करून ह्यांच्या पुढें निघून जावें हें बरें. ह्या विचारानें पुढें निघालों. जम्नाचट्टीवर पोहोंचण्यास आठ वाजले. व खरोखरीच यमुनेच्या काठीं वाळवंटाशिवायचे जागेंत माणसांची रीघ लागली होती. वर आकाश, खालीं वाळवंट, मनस्वी थंडी, पूर्ण काळोख व सोबतीस यमुनेचा धो धो आवाज अशा परिस्थितींत रात्र काढावी लागलीं. घरून निघतांना येईल त्या प्रसंगास तोंड द्यावयाचेंच अशा संकल्पानें निघालों होतों. म्हणून कुरकुर करण्यास जागा नव्हतीं. निःशंकपणें वाळवंटांत निजलों व झोंपहि स्वस्थ आली. वाटेंत अस्तमानाचे वेळीं संध्यावंदन उरकून घेतलें होतें. त्या दिवशीं संध्याकाळच्या फराळाचा फराळच करावा लागला.

## थोरांच्या घरचें श्वान

सकाळीं लवकर म्हणजे साडेतीन वाजतां चालू होऊन नऊ वाजतां हनुमान चट्टी गांठली. वाटेंत एक लाकडी पूल लागला तो लहान असूनसुद्धां दणकट नव्हता. रांचीवाल्याच्या माणसानें आदल्या दिवशींच पुढें येऊन धर्मशाळेंतील सर्व जागा अडवून ठेवली होती. त्यांचीं माणसें किंवा सामान धर्मशाळेंत कांहीं सुद्धां आलेलें नव्हतें. ती सर्व रिकामीच होती. मीं त्यास म्हटलें, आम्ही दोनच माणसें. जेवण करून लगेच पुढें निघणार आहोंत. ही धर्मशाळा आहे, भाड्याच्या जागेप्रमाणें ती आगाऊ राखून ठेवतां येत नाहीं. आपण सर्वच यात्री, घडीभर तर थांबावयाचें, दाटीवाटीनें घेऊं सामावून. आम्ही सामान तेवढें एका कोपऱ्यांत ठेवतों. स्वयंपाक व जेवण बाहेर करून लगेच येथून निघून जातो. तो म्हणाला, तें कांहीं असलें तरी मी कोणासहि आंत येऊं देणार नाहीं. आमचे दहा पंधरा शेठजी लक्षाधीश आहेत. शिवाय त्यांच्याबरोबर आलेलीं माणसेंच शंभरावर आहेत. बायकाच पाऊणशें आहेत. त्यांना आंतच जागा पाहिजे. पुरुषाला काय उघड्यांतहि चालतें. मीं म्हटलें, हें तुझें तत्त्वज्ञान शेठजीस सांग. माझी बाहेर राहाण्यास तयारी आहे. माझी बायको कांहीं पुरुष नाहीं. तुझ्या

म्हणण्याप्रमाणें तिला आंत जागा मिळालीच पाहिजे. तो हें मान्य करीना. तो म्हणाला, तुम्हीच शेठजीस विचारा. ते अत्तां तासाभरांत येतील. मीं म्हटलें, तुला गरज, तूंच जाऊन विचारून ये. त्यास हें पटेना. वाट अडवून दारांत उभा राहिला. आंत डोकावून सुद्धां देईना.

मीं विचार केला थोडा त्रास होईल, बाहेरच थांबू. यात्रेला येऊन धक्काबुक्की कोठें करीत बसा? म्हणून तेथून फिरलों मात्र तों त्यानें दम दाखविला कीं लवकर उमगलात, नाहीं तर आज कांहीं तुमची धडगत राहिली नसती. तेवढ्यांत त्याचा एक जोडीदार भैय्या होता तोहि गुरगुरूं लागला. मला वाटलें मी चुकतों आहे. ह्याची आपली सांगड शेवटपर्यंत राहिली तर असा ताप कायमचाच पाठीस लागणार; त्यापेक्षां ह्यास एकदा जाणीव करून द्यावी, हें बरें; म्हणून परतलों. त्यास दरडावून सांगितलें कीं, वाट सोड, नाहीं तर तुला बाजूस सारून आंत जाईन. तो दोन्ही हात दारास अडसराप्रमाणें लावून पवित्र्यांत उभा राहिला. भय्यास हाक मारून तोहि आला. मला म्हणाला, पाहातों कसे आंत जातां तें. त्याला वाटलें मी त्यास आंत ढकलीन, म्हणून तो त्या तयारीनें उभा होता. मी त्याची तयारी हेरून आंत रेटण्याऐवजीं त्यास बाहेरच ओढलें. त्यासरशी त्याची तयारी त्याच्याच अंगलट आली. तोल जाऊन तो बाहेर कोलमडलाच. हें पाहून भय्यानें त्यास सांगितलें कीं, "महाराज जाना दे। वोहि यात्री है। उनके साथ औरत हि है। घंटा दो घंटा ठहरने वाला है। झगडा करने का क्या कारण है। तो मला म्हणाला बाबूजी। आपका बोजे एक कोनेमें रख दो। हमारा बडे सेठ उपर ठहरेंगे।" आमचे बोजेवाल्यास सांगून खालच्याच मजल्यांत एका कोपऱ्यांत सामान ठेवलें आणि एका बोजेवाल्यानें तें संभाळण्यास तेथें बसून राहावें असें केलें. नाहीं तर त्या फजीत झालेल्या माणसानें तेथें कोणी नाहीं असें पाहून आमचें सामान बाहेर काढून टाकिलें असतें. त्याचे शेठजीआल्या-नंतर त्यांनीं मला नदीवर बोलावणें पाठविलें. मीं उलट कळविलें कीं माझी स्नानसंध्या आटोपली म्हणजे मी तेथें येईन तेव्हां भेटा. जेवण-खाण आटोपून थोडी विश्रांति घेतली. शेठजींचे कारभारी येऊन भेटले. त्यांस त्यांच्या भय्याकडून झालेला प्रकार यथार्थ कळला असावा.

म्हणून त्यांनीं खेद प्रदर्शित केला. व म्हटलें कीं, तुम्ही दक्षिणी ब्राह्मण आहांत. शेठजी तुम्हास भेटून तुम्हास कांहीं देऊं इच्छितात. चार वाजतां निजून उठतील, तेव्हां येऊन भेटा. मीं सांगितलें, "मी ब्राह्मण आहे पण भिक्षुक नाहीं. शिवाय असल्या मोठ्यांच्या मोठेपणाच्या संगतीचा पुनरपि ताप नको म्हणून, पडतील ते कष्ट पत्करून आतांच पुढें जाण्यास निघणार आहें." तो म्हणाला, तुमच्या शेजारी जे इसम उतरलेले होते त्यांना तुमच्या आचारविचाराबद्दल आदर वाटून त्यांनीं शेठजींच्या कानीं ती गोष्ट घातली. तेव्हां आमच्यांत असें ठरलें आहे कीं, तुम्हीं आमच्या जथ्यापैकींच एक असावें. येथून पुढें तुमची दैनंदिन प्रवासखर्ची वांचेल. मी म्हटलें आपल्या थोर वृत्ती-बद्दल मी आपणांस धन्यवाद देतों. एकच विनंती करावीशी वाटते कीं, आपण सर्वच यात्रीक, एकमेकांस संभाळून घ्यावें. माझी काळजी जम्नामैय्यास. तिच्याच प्रेरणेनें येथपर्यंत निभावून आलों. पुढची तिला काळजी. तिनें सामर्थ्य दिलें आहे. पुढची चट्टी चार मैल आहे, दिवसा उजेडीं पोहोंचलें पाहिजे. तुमचे शेठ अजून उठले नसतील. नाहींतर मीं त्यांची भेट घेतली असती. त्यांना माझा जयगोपाळ सांगा. पुन्हां योग असला तर भेट होईलच. तीन वाजून गेले आहेत, निघण्याचीं सर्व तयारी झाली आहे. नमस्कार, येतों आतां.

### प्रसंगानें शहाणपण शिकविलें.

येथें यमुनेस तिच्या डावे बाजूनें हनुमान गंगा येऊन मिळते. तिचा प्रवाह व पात्र यमुनेपेक्षां मोठें आहे. वहाळ फारच जोराची आहे. सौभाग्यवतीनें धुतांना आपलें पातळ एक पदर हातांत धरून पाण्यांत सोडलें. धारेच्या जोरानें इतकी ओढ बसली कीं तिला आवरेना. म्हणून मी तो पदर दोन्ही हातांनीं धरला, एका दगडास ओणवा होऊन पायाचा नेट लावून ओढूं लागलों, तों तें ओढलें जाण्याऐवजीं मीच ओढला जाऊं लागलों. पातळ सोडून देण्याची पाळी आली. तेव्हां ह्या ओढाओढींत एक युक्ति सहज लक्षांत आली. हात वर उचलला गेल्याबरोबर पातळहि पाण्यावर उचललें जाऊन त्यास बसलेली ओढ कमी झाली. प्रथम कांहीं ही कल्पना सुचली नव्हती. प्रसंग शहाणपण शिकवितो म्हणतात तें असे !

तेथें वारें इतकें जोरानें वाहात होतें कीं भात शिजतांना वर ठेवलेली झाकणी चाळीस पन्नास हातावर उडून गेली.

### जानकी चट्टी, खरसाळी

चारच मैल अंतर पण पोहोंचण्यास चार तास लागले. तीन मैलावर एक वाट फुटते. एक खरसाळी गांवांत व दुसरी जानकी चट्टीवर जाते. दोहोंमध्यें अजमासें मैलभर अंतर येईल. दोहोंपासून यमुनोत्तरी चार मैलावर राहाते. खरसाळी हा गांव यमुनेच्या डोंगरपायथ्याशीं आहे. भोंवतीं बहुतेक सपाटी असून येथें झाडीहि घनदाट आहे. यमुनेच्या वाटेवरील हा शेवटचा वस्तीचा गांव आहे. त्यापुढें वस्ती नाहीं. येथें यमुनेचे पंडे लोकांचीच तेवढी वस्ती आहे. त्या लोकांनीं येथें वस्ती केलेली आहे म्हणूनच यमुनोत्तरीचें दर्शन घेणें सुलभ झालें आहे. नाहींतर हनुमान चट्टीपाशींच यमुनेचा उगम मानावा लागला असता. जाण्यायेण्याची व उतरण्याची सोय नाही म्हणून गंगेचा उगम उगमस्थापासून अठरा एकोणीस मैल अलिकडे गंगोत्तरी येथें मानीत आलोंच आहोंत.

### घरें व राहणी

ह्या गांवांत पांचपंचवीस लाकडी घरें आहेत. तीं दोन मजली म्हणण्यापेक्षां दीड-मजली म्हणणें अधिक शोभेल. दुसऱ्या मजल्यावर ताठ उभें राहाणें तर बाजूलाच राहील पण नीट ओणव्यानें सुद्धां सहज हालचाल करतां येणार नाहीं. घरास खिडक्या झरोकीं क्वचितच. दारहि एकच व तेंहि वडाऱ्याच्या झोपडीसारखें बसून आंत जातां येईल असें असतें. दारें, खिडक्या मोठ्या व अधिक ठेवल्या तर थंडीच्या दिवसांत घरांत ऊब राखतां येत नाहीं. ज्यावेळीं बाहेर बर्फ पडतें, त्या काळांत आंत कोंडून घेऊनच बसण्याची पाळी असते. अगोटीला बर्फाचीं वादळें होतात, तेव्हां तर सर्वच व्यवहार घरांतल्या घरांत केल्यावांचून गत्यंतर नसतें. आश्विन शुद्ध पोर्णिमेला यमुनोत्तरीहून गंगेच्या मूर्ति येथें आणून शनीच्या देवळांत ठेवतात. तेव्हांपासून बर्फ पडण्यास प्रारंभ होतो. सहा महिने देवतांची पूजाअर्चा येथें होते. त्यांच्या घराच्या तळमजल्यांत जनावरांचा गोठा असतो. व खताकरितां शेण, पानपाचोळा, आणि वैरणकाडी व सरपण सांठवण

केलेलें असतें. हिमालयांतील कडक थंडीच्या भागांत सर्वत्र ह्याच नमुन्याची राहाणी आढळते.

शनीचें देऊळ

त्या गांवांत यमुनेचा भाऊ शनि, त्याचें एक तिमजली पण सर्व लाकडी देऊळ आहे. देवळाच्या दरवाज्यास एक साखळदंड अडकवलेला असून त्यास पुष्कळशा घंटा बांधलेल्या आहेत. दरवाजा उघडला कीं, त्या वाजतात आणि त्यामुळें लोक तेथें जमतात. त्या देवाची अर्चा करतात त्यावेळीं आरत्या म्हणतात. तुताऱ्या ढोलकीं वगैरे वाद्यें वाजवीत पालखींतून गांवभर मिरवणूक काढितात. एका बुरडी करंडीस रंगीबेरंगी रेशमी कापडानें मढवून ती पालखींत घालून मिरवितात. त्यांत शनिमहाराज असतात का तेंच त्यांचें प्रतीक हें कळलें नाहीं. मिरवणूक नाचत बागडत होत असते.

ऐन उन्हाळ्यांत सुद्धां येथें थंडी फार असते. आपल्याकडे पौष माघ मासीं अधिकांत अधिक थंडी पडते. त्यापेक्षां वीसपंचवीस अंशानें ती येथें अधिक असते. म्हणून ह्या लोकांस अक्षय्यच लोकरीच्या कपड्यांत गुरफटून राहावें लागतें. सहा हजार फुटांपासून वरचे उंचीवर राहणाऱ्या लोकांची हिमालयांत सगळीकडे सररास हीच पद्धत दिसून येते. तेथें चुकूनसुद्धां उघडे असावयाची सोय नाहीं. ह्या उंचीवर कापूस पिकत नाहीं. सुती कापड आणण्यास वाहतूक मार्ग व सोयीनें परवडेल असें साधन नाहीं. जी काय वाहतूक होते ती मेंढ्यावरून व माणसाचे पाठीवरून होते. घोडा गाढव जाण्याची पंचाईत तेथें गाडीचें नांवसुद्धां नको. सिमला, मसूरी, नैनीतालसारखीं साहेबानें आपल्या सोईकरितां वसविलेलीं चार–दोन श्रीमंती ठिकाणें सोडलीं तर चक्रान्वित वाहन हिमालयांत कोठेंहि चालायाचें नाहीं. अशा स्थितींत सुती कापड पाहावयास सुद्धां मिळणारें नव्हतें. कदाचित् कोणी मुद्दाम नेलेंच तर तेथील बारमाही कडक थंडींत त्याचा उपयोग तत्रस्थांना कितीसा होणार ?

ह्या भागांत ह्यांच्यापैकीं कोणीहि भेटो त्यांत विषेशेंकरून बायका व मुलें ही मागणी करतात, 'माईजी' वा 'बाबूजी धागा सुई दे,' त्याचवेळीं कपाळावर लावावयाच्या टिकल्याहि मागतात. ही चाल

बरीच जुनी दिसते. साठपासष्ट वर्षांपूर्वी आमच्या आजी तिकडे गेल्या होत्या. तेव्हांहि हीच मागणी होती. सुई दोरा या अगदीं साध्या वाटणाऱ्या जिनसा पण त्याच तिकडे दुर्मिळ म्हणून विशेष महत्त्वाच्या वाटतात. तिकडे अशी मागणी असते म्हणून निघतांना दोनशें सुया व एक शेर शिवण्याचा दोरा बरोबर घेतला होता. आमच्या ओझेवाल्यांनीं तो आमचे जवळून मागून घेतलाच. पण कित्येक ठिकाणीं चट्टीवाल्यांनींहि मागून घेतला. जम्नोत्री, गंगोत्रीकडील पंड्यांनींहि बोजेवाल्यांचा वशिला लावून मागून घेतला.

## तत्रस्थ लोकांचे व्यवसाय

येथील लोकांचा व्यवसाय म्हणजे शेती करणें, मेंढ्या पाळणें, लोकर कांतून सूत काढणें आणि त्याच्या घोंगड्या, पट्ट्या विणणें. प्रत्येक घरांत कुटुंबाच्या वार्षिक-बेगमीपुरतें कापड निघून शिवाय अधिक निघतें तें विकतात. ह्यांचे माग रुंद नसतात. एक हातापेक्षां अधिक रुंदीचीं पट्टी निघत नाहींत. घरकाम करून राहिलेल्या वेळांत बायका रानांतून पानपाचोळा गोळा करून आणून आंगणांत सांठवितात. त्यांतच जनावरांचें शेण, मूत पडून तो वर्षभर कुजत असतो. हें खत तेथील बरड जमिनीवर घातलें तरच कांहीं पीक येतें. नांगरटीस बैल फार थोडे. व असतात तेहि अगदीं किरकोळ व ठेंगणे. जमिनीची खणणी बहुतेक कुदळून करितात. हिमालयांतील शेती पायऱ्यापायऱ्याची असते. म्हणजे डोंगरउतारावर सात आठ हात रुंदींचा उतार खणून काढून एक सपाट पट्टी तयार करावयाची. त्याची लांबी सोयीची निघेल तेवढी. रुंदीच्या उतार बाजूस बांध घालतात. ह्याचप्रमाणें खालच्या व वरच्या उतरणीवर सोय बसेल अशा अनुरोधानें गुडघाभर उंचीपासून ते पुरुष दोन पुरुष उंचीपर्यंतहि अशाच पट्ट्या काढतात. ह्यांत भात व गहूं पेंरतात. राजगिराहि पेरतात. भात पेरून किंवा रोपे करून दोन्ही पद्धतींनीं करतात.

## पंडे–पुजारी व उपाध्ये

पुजारी पंडे हे यजुर्वेदी ब्राह्मण आहेत. इकडील लोकांची राहणी, आचार, विचार, ह्यांशीं ते समरस होऊन गेले असल्यामुळें ब्राह्मणाची शुध्द वाणीहि त्यांचेजवळ राहिलेली नाहीं. कोणतेंच अध्ययन नाहीं मग

वेदविद्या किंवा साधें संस्कृत हें तरीं कोठचें असणार ? स्नानविधींचा संकल्प हा सुध्दां त्यांस अवगत नाहीं. ही पंडे मंडळी दहा पांच कुटुंबें आहेत. तीं खरसाळी येथें घरदार शेती करून राहिलेलीं आहेत. यमुनेच्या पूजाअर्चेची वृत्ति आळीपाळीनें ज्याच्यावर येईल, तो सहा महिनें यमुनोत्तरीस राहतो. यात्रींचें यजमानकृत्य मिळविण्यांत आळीपाळी नाहीं. तें ज्याचें त्यानें स्वतःच्या कार्यकौशल्यानें मिळवावें, किंवा दैवानें मिळेल तें मिळेल, ह्यावर संतुष्ट असावें. येथील पंडे छळीक नाहींत, अल्पसंतुष्ट व गोड बोलून यात्रींच्या उपयोगी पडण्याच्या वृत्तीचे आहेत, असा आमचा अनुभव आहे.

### पंड्यांकडे सहानुभूतीनें पाहावें

येथें एक गोष्ट प्रामुख्यानें यात्रेच्छूंच्या लक्षांत आणून द्यावीशी वाटते. देशावरील तीर्थक्षेत्रांतील पुजारी, उपाध्ये, बडवे वगैरे लोकांची गोष्ट आणि पहाडी क्षेत्रस्थ पंड्यांची गोष्ट ह्यांत महदंतर आहे. देशावर त्यांच्या भोंवतीं त्यांच्या जातीगोताचा समाज आहे. वैदिक, याज्ञिक, शास्त्रादि विषयांचें अध्ययन करण्याची साधनसामुग्री---पाठशाला, महाविद्यालयें, गुरुगृह, पोथ्या, पुस्तकें वगैरे उशापायथ्याशीं सहज मिळण्यासारखीं आहेत. त्याचप्रमाणें विद्याभ्यासकालांत निर्वाहाचीं साधनें, परधर्मी परकीय राजवटींतसुद्धां आजपर्यंत उघड उघड सहज सुलभ राहूं शकलीं आहेत. ह्यापुढें निधर्मी लोकशाहींत काय काय स्थित्यंतरें होणार असतील तीं देव जाणें. कोणास शिष्यवृत्त्या, कोणास पूजा करून जेवणाची सोय, कोणास वार लावून, तर कोणास मधुकरी मागून सोय करून घेतां येते. अशीं साधनें उपलब्ध असतांनासुद्धां आपलेकडे ह्या विद्यांचा भिक्षुकवर्गाचा अभ्यास कमी पडत चाललेला लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं. तीस पस्तीस वर्षांपूर्वी पुणें शहरांत प्रत्येक शाखेचे निदान पंचवीस तरी पट्टीचे वैदिक, याज्ञिक व विद्वान् शास्त्री असत. पण ती पिढी संपल्यानंतर आज पाहावें तों हाताच्या बोटावर मोजण्याइतकीसुद्धां येथें मंडळी नाहींत. अशी स्थिति जर साधनसामुग्रीच्या सुकाळांत येथें आहे तर जेथें साधनसामुग्रीचा अक्षय्यच दुष्काळ आहे, जेथें पहाडी वातावरणांतील ओसाड प्रदेशांत कडक थंडीस तोंड देऊन जीवनकलहाचा

झगडा अविरत चालू ठेवावा लागत आहे, जेथें विद्वत्तेचा चहाता वर्षानुवर्षांत एकहि दिसणारसुद्धां नाहीं त्या ठिकाणीं ह्या पंड्यांचे अध्ययनाची दशा होऊन गेली असल्यास नवल नाहीं.

दोनतीनशें वर्षांपूर्वी कांहीं यजु:शाखी ब्राह्मण धाडस करून हिमालयांत जाऊन तेथील कायमचे रहिवाशी झाले. पहिल्या पहिल्या पिढ्यांत इकडचे संबंध राहिले. पण पुढें पुढें महिनोन्महिने खाणारा लांबचा, मोठ्या कष्टाचा, धोक्याचा व खर्चाचा प्रवास इत्यादि कारणांनीं त्यांचे संबंध दुरावत जाऊन संपुष्टांत आले. तीं कुटुंबें आतां संपूर्णतया तद्देशीय होऊन गेलीं आहेत. त्यांचे इकडील संबंध स्मृतिशेषमात्र राहिले आहेत.

पहाडी वस्तींत अक्षर-ओळख करून घेण्याचीहि सोय अजून नाहीं, मग वेदाध्ययनाची सोय कोठली असणार? हे पंडे अधीत नसले तर तो त्यांचा दोष नसून तेथील परिस्थितीचा आहे. आपल्या-सारखी मंडळी तिकडे जाऊन राहिली तर थोड्याच अवधींत आपणहि त्यांच्या सारखेच होऊन जाऊं. आपल्याकडे रोज स्नान करणारे लोक त्या थंड्या हवेंत आठ पंधरा दिवसांच्या अवधींतच रोजच्या स्नानास टाळा देऊं लागतात. पंडे लोकांना सहानुभूतीनें सूचना केल्या तर न ऐकण्याइतके ते हट्टी नाहींत. अज्ञानी राहण्यांत त्यांस कमीपणा वाटतोच, पण त्यांचा निरुपाय झालेला असतो. आमच्या पंड्यानें त्याला येत असलेला स्नानविधि मंत्र मजकडून शुद्ध करून घेतला. आपण यात्रेच्या भाड्यातोड्यांत केवढा तरी खर्च करतो. त्याचाच कांहीं अंश येथील पुजाऱ्याला दिला पाहिजे व आपणास अपेक्षित असतील त्या त्यांच्यांतील उणीवा भरून काढण्यासाठीं त्यास मार्गदर्शन करून सक्रिय मदत केली पाहिजे. हे लोक तेथें आहेत म्हणूनच आपण नि:शंक यमुनोत्तरी गंगोत्तरीपर्यंत जाऊं शकतों. त्यांच्या अभावीं अलिकडूनच परतावें लागलें असतें. सर्व तऱ्हेनें त्यांची मदत उपयोगी पडते. 'परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ' ही जाणीव ठेवून ते आपल्यापैकींच आहेत, त्यांना यथाशक्ति मदत करणें आपलें कर्तव्य आहे हें विसरूं नये.

## मार्कंडेय तीर्थ

खरसाळीपासून एक मैलावर यमुनेच्या पैलतीरीं मार्कंडेय तीर्थ आहे. तेथें एक उष्ण जलधारा अक्षय्य वहात आहे. खरसाळीस पंड्याच्या कोंदट माळयांत उतरण्यापेक्षां जानकी चट्टीवर उतरणें अधिक प्रशस्त व मोकळेपणाचें आहे. तेथें चांगली धर्मशाळा आहे. लहान असली तरी यमुनोत्तरीकडे यात्रींची सहसा दाटी नसतेच. सर्व सोय उत्तम होते.

## यमुनोत्तरी म्हणजेच जम्नोत्तरी

खरसाळी व जानकी चट्टी या दोनहि ठिकाणांतून यमुनेचें उगम-स्थान चार मैल आहे. ह्या चार मैलांत सर्व वाटभर किर्र झाडी आहे. उन्हाच्या किरणांस लपून छपून सुद्धां आंत डोकावतां येणार नाहीं. अशा ह्या दाट वनांत दोन दोन चार चार माणसांच्या वावेंत मावणार नाहींत अशा खोडांचे, गगनभेदी, मोठमोठे डवरलेले वृक्ष आहेत. तशींच लहानसहान पालेदार झुडपें व वेली इतक्या आहेत कीं डोंगरउतारावरील ओहोळ व टेकाडेंसुद्धां दिसत नाहींत. वाट अरुंदच आहे. तिच्या बाजवांस किती खोली आहे त्याचा अज-मास कळत नसल्यामुळें फार जपून चढावें लागतें.

त्या जंगलांत वेळूंचीं बेटें वारेमाप आहेत. हे वेळू हाताच्या अंगठ्या-पेक्षां जाड नसतात. त्यांची लांबी आठ फुटांपर्यंत असते. ते भरीव असतात. आमच्या लहानपणीं वेळूच्या बोरूच्या लेखणीनें आम्ही खरडे गिरवीत असूं, त्या जातीचे हे वेळू असावेत. ह्या वेळूंच्या पाटसालीच्या चटया दाट वा विरळ विणीच्या चांगल्या व टिकाऊ होतात. इकडील बहुतेक चट्ट्यांतून ह्या अंथरलेल्या असतात. त्यामुळें चट्ट्यांतील उकीर जमिनीवर निजण्याबसण्याची खंत वाटत नाहीं. ही चटयाची सोय जम्नोत्तरी व गंगोत्तरीकडेच तेवढी आहे. बदरी-केदार व नारायणाच्या वाटेवर नाहीं.

## वहिरव घाटी

यमुनोत्तरीपर्यंतच्या चार मैलांत दोन चढ अति बिकट आहेत. चार धामांच्या ह्या यात्रेंत इतके अवघड चढ कोठेंहि लागले नाहींत. हे चढ फार लांबीचे आहेत असें नाहीं, पण ते अगदीं उभ्या चढणीचे




यमुनोत्तरी – यमुना उगम, मंदीर – पान ८४



पिपळी – यमुना दर्शन पान ६६

आहेत. काठीचा आधार घेऊनसुद्धां वाटेवर पाऊल पाय धरीत नाहीं. तें सारखें घसरत असतें. ताठ चालण्याचें तर नांवच नको. तोल पुढें ठेवूनच चढावें लागतें. पावलोंपावलीं घसरगुंडी होण्याच्या भीतीनें काळजाचें पाणी पाणी होत असतें. चढतांना चुकवितां आली तरी उतरतांना घसरगुंडीची पाळी चुकवितां आली नाहीं. अनवाणीं चाललें तर इतकें अवघड जाणार नाहीं. पण पायास कंकरी–खडे बोचूं लागले म्हणजे मस्तकांत तिडीक जाऊन वाटेंतच बसण्याची पाळी यावयाची. असल्या दिव्यांतून जातांना जीव रंजीस येतो व वाटूं लागतें कीं, नको ही यात्रा. पण एकदां का ह्या दिव्यांतून नेटानें पार पडलें म्हणजे भ्याडपणांत उठलेले निवृत्तीचे विचार क्षणैक ठरून जागच्या जागींच जिरून जातात. पण तेवढ्यानें आत्मविश्वास वाढतो. हिमालयांतील सर्वच प्रवासांत, तो यात्रानिमित्त असो किंवा अन्य कारणाकरितां असो, देहदंडन व मनोनिग्रह ह्यांचे धडे प्रत्यहीं गिरवावे लागतात. ते अंगवळणीं पडले म्हणजे कैलासची यात्रा असो, नाहींतर गौरीशंकराकडे गिर्यारोहण असो, त्याची क्षिति वाटण्याचें कारणच राहात नाहीं. 'चणें खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्म पदीं नाचें ।' ह्या तुकारामबोवांच्या अनुभवसिद्ध उक्तीचा खरा खरा पडताळा येथें येतो. यमुनोत्तरीच्या अलौकिक व दिव्य भेटीकरितां एवढे कष्ट सोसणें म्हणजे कांहींच नाहीं.

किर्र दाट झाडी, बर्फसान्निध्यांतील कडक थंडी, त्यांतच खडी चढण आणि क्वचित् डुकरांचें भय, ह्या कारणास्तव आमचे बोजेवाले नित्याप्रमाणें पहाटें निघण्यास तयार होईनात. म्हणून सकाळीं पांच वाजतां चांगलें उजाडल्यावर निघालों. चारच मैल अंतर पण वाटेंत कोठेंहि न थांबतां वर पोहोंचण्यास दहा वाजले. ह्या घाटास भैरव–घाट असें नांव आहे.

यमुनोत्तरीचें जवळ जवळ गेलें म्हणजे वाटेंत एका चढावाचे माथ्यावर अगदीं लहानसें एक भैरवाचें देऊळ लागतें. हा देव नवसाला पावतो, नवसानें संकट निवारण होतें, तसेंच त्यानें अंगरोगहि बरें होतात. अशी तेथील लोकांची श्रद्धा आहे.

अंगरोग बरा झाला म्हणजे एक तसेंच लाकडी अंग करून नवस

फेडण्याकरितां तें भैरवास वहाण्याची येथें चाल आहे. आपल्याकडे खंडोबाला असे अवयव वाहतात. वांद्रें येथें समुद्रकांठीं एका टेकडीवर सेंट मेरी नांवाचें रोमन कॅथॉलिक चर्च आहे. तेथील देवता सेंट मेरी. तिलासुद्धां किरस्ताव लोक नवस फेडण्यासाठीं मेणाचे अवयव करून असेंच वहातात हें मीं समक्ष पाहिलें आहे.

वाफेचे ढग

भैरवाचे देवळापुढील वाट साधारण सपाटीची आहे. येथून यमुनोत्तरी फार लांब नाहीं. वाट वळून यमुनोत्तराभिमुखी झाली तेव्हां तेथें सिमलीच्या आगीप्रमाणें पांढरे धुराचे लोटचे लोट उठत असल्याचें दिसून आलें. हा काय नवीन चमत्कार आहे ? म्हणून कुतूहलानें पातेरामास विचारलें. तो म्हणाला, 'जलको आग लग गई है.' मीं म्हटलें, 'अरे पाण्याला कधीं आग का लागते ?' तो म्हणाला, 'बावूजी मै बुरी बात नहीं करते । उधर जाते समय आपहि देख सकते है.' आम्ही यमुनोत्तरीच्या परिसरांत आलों मात्र, तों दिसून आलें कीं ते लोट धुराचे नसून उन्हाळ्यांतून निघणाऱ्या वाफेचे आहेत. ठाणें जिल्ह्यांत भिवंडीजवळ वज्रेश्वरी येथें उन्हाळें पाहिलें होतें. तेथील पाणीहि चटका बसण्याइतकें कढत आहे. पण तेथें असा वाफेचा खेळ नाहीं. थंडीच्या दिवसांत सकाळीं सूर्योदयापूर्वीं नदीच्या पाण्यावर हात दोन हात जाडीचा वाफेचा थर जमून अधांतरी लोंबत असलेला दिसतो. पण त्याची हालचाल कांहींच नसते. उन पडूं लागलें म्हणजे तो हळूहळू वितळूं लागून हवेंत विरून जातो आणि दिसेनासा होतो. पण येथील प्रकार पाहिला तो जगद्विलक्षणच. वाफेचे झोत सारखे बाहेर पडताहेत आणि त्यांचे ढग बनून वर चढताहेत. ही एक ढग बनण्याची नैसर्गिक भट्टीच चालूं आहे. तिच्या व्यापारास खळ म्हणून नाहीं. युगानुयुगें ती चालूंच आहे. एवढ्या प्रदीर्घ कालांत ह्या भट्टीची उष्णता वाढली नाहीं किंवा कमीहि झाली नाहीं. ज्वालामुखीप्रमाणें हिला जागृति सुषुप्ति नाहीं. थंडीनें सहस्ररश्मी सूर्याला प्रतापरहित करून टाकल्यामुळें बाष्पीभवनाचें त्याचें कार्य येथें स्थगितच झालें आहे. विधात्याला त्याची काळजी. म्हणून तर त्यानें ही योजना केली कीं काय न कळे. हिंदी महासागरां-

तील पाण्याच्या वाफेचे ढग भरतखंडाला यथाधिकार यथेच्छ शिंपून उत्तरेस जाऊं पाहतात. पण हिमालयाच्या पहिल्या पांच हजार फूट उंची पर्यंतच्या नाक्यावर निदान अर्धें मुर्धें ओझें गळून जातें व पुढच्या पांच हजार फूट उंचीपर्यंतच्या चौकी पहाऱ्यावर त्यांची झाडाझडती होऊन त्यांना कफल्लक करून घेतल्यानंतर मगच त्यांची सुटका होते. ह्यामुळें त्याच्या वरच्यावरच्या उंचीस पावसाचा शिंतोडाहि मिळत नाहीं. तो मिळावा म्हणून ढगांच्या उत्पादनाची ही स्थानिक योजना झाली असावी. कांहींहि असो, परमेश्वराच्या विराट् स्वरूपांतील घडामोडीचें एक दिव्य व अद्भुत स्वरूप येथें प्रथमदर्शनींच पाहावयास सांपडलें.

## बंदर पुच्छ.

ह्याचबरोबर दुसरें एक अलौकिक दृश्य डोळ्यापुढें एकदम उभें राहिलें. तें म्हणजे ज्यापासून यमुनेचा आद्य उगम झाला आहे तें गगनास जाऊन भिडलेलें हिमाच्छादित 'बंदरपुच्छ' शिखर. त्याचा सबंध माथा बर्फानें झाकला जाऊन पांढरा शुभ्र होऊन गेला होता. उन्हाच्या प्रकाशांत गाढ निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर तें तेजःपुंज धवल शिखर चकाकून दिसत होतें. उतारावर इतस्ततः तुटक तुटक बर्फ होतें. पण यमुनेच्या हिमप्रवाहाचा मागोवा मात्र, अखंड हिमपट्टयांनीं दिग्दर्शित केला होता. आपल्याकडील भीमा, कृष्णा, गोदादि महानद्यांचे उगम पावसाळ्यांत सुद्धां हंगामी ओले असतात. इतर ऋतूंत तर सुप्त गुप्त होऊन नाममात्र राहातात. पण गंगा, यमुना, शतद्रू, शरयू, गंडकी इत्यादि हिमालयीन नद्यांचें तसें नाहीं. ते उगम उन्हाळ्यांत तर अधिक रसभरित होऊन वहातात. हीं अलौकिक व दिव्य दृश्यें पाहून निसर्गदेवतेच्या अगाध लीलांचें कौतुक वाटलें. 'कष्टाच्या मानानें फळ तें अपार' अशा अनुभवानें समाधान तर झालेंच. पण पुढच्या प्रवासाची जिज्ञासा वाढून प्रोत्साहनहि मिळालें.

## थंडीचा प्रभाव

यमुनोत्तरी येथें पोहोंचलों तेव्हां दहा वाजले होते. सूर्य मध्यान्हीं येण्यास दोनच तासांचा अवकाश होता. आकाश निरभ्र होतें. तरीसुद्धां एरवीं प्रखर वाटणारा उन्हाचा प्रभाव येथील कडक थंडीपुढें

हतबल होऊन गेला होता. त्यामुळें थंडी कमी होण्याची आशा मावळली. चढण्याच्या श्रमानें अंगांत चांगलीच उष्णता संचरली होती. घामानें खाका ओलावल्या होत्या. पण यमुनोत्तरीस पोहोंचण्याच्या आंतच ती भाडोत्री आलेली ऊब निघून गेली आणि थंडीचा कडाका जाणवूं लागला. संबंध दिवस तेथें राहण्याच्या बेतानें गेलों होतों. पण थंडीच्या करडेचा प्रभावामुळें तो बेत टिकून राहण्याची डळमळ वाटूं लागली.

### यमुनेचा उगम

वर उल्लेख केलेल्या हिमप्रवाहाच्या तोंडाशीं जलप्रवाह सुरू होऊन तो प्रथम येथेंच दृष्टीस पडतो. ह्या दृष्टीनें यमुनेचें उगमस्थान ज्याला यमुनोत्तरी असें नांव पडलें आहे तें येथेंच मानीत आलें, तें योग्यच आहे. तथापि, तिचें खरें उगमस्थान ज्या शिखरावरून हिमप्रवाह निघून पुढें त्यांतूनच जलप्रवाह बाहेर पडतो त्या शिखरावर आहे. ह्या शिखराचा पहाड दुर्गम आहे. त्यावर कोठूनहि चढता येणार नाहीं. तो सुळक्यासारखा उभा आहे. आणि हिमप्रवाहाला अनेक फाटे आहेत. त्यांतील मुख्य कोणता हें प्रत्यक्ष जाग्यावर जाऊन खात्री करून घेतल्याशिवाय समजणार नाहीं. ह्या अडचणीमुळें यमुनेचें उगमस्थान आज आहे तेथेंच मानणें भाग पडतें. भागीरथी गंगेच्या उगमस्थानाचीहि अशीच स्थिति आहे. यमुनेचें उगमस्थान समुद्रसपाटीपासून ९९०० फूट उंच आहे. बंदरपुच्छ शिखराची उंची स. स. पासून २०७३१ फूट आहे. नकाशांत यमुनोत्तरी ३१° अक्षांश व ७८°–२८° रेखांशावर दाखविलेली असते. रावणवधानंतर हातून घडलेल्या हत्येच्या प्रायश्चित्तार्थ राम व लक्ष्मण हे जसे हिमालयांत येऊन तपश्चर्येकरितां राहिले होते तसेंच त्यांचे एकनिष्ठ सेवक हनुमानजी हेहि तपश्चर्येकरितांच. ह्या शिखरावर येऊन राहिले होते. म्हणून ह्या शिखरास 'बंदरपुच्छ' असें नांव पडलें अशी आख्यायिका आहे.

### प्रवाहाचा प्रभाव

यमुनोत्तरीचा पहाड सुळक्यासारखा उभा असून उंचहि आहे. त्याच्या वरचे पहाड, ज्यावरून तिचे हिमप्रवाह घसरत घसरत खालीं येत आहेत तेहि तसेच खडे आहेत. ह्या पहाडांच्या घळींतून तिचे

ओहळ हजारों हजारच काय पण लाखोंहि वर्षें अव्याहत वहात आले आहेत. त्या ओहळांच्या सततच्या धुपणीमुळें ती घळ झिजून तुटली, फुटली, कोसळली आणि तिचें रूपांतर खिडींत होऊन एका पहाडाचे दोन स्वतंत्र पहाड झालेले आज आपणांस जाग्यावर दिसून येतात. ही झाली उगमांजवळील स्थिति. पण उगमापाशीं उभ्याचा आडवा प्रवाह होऊन वाहूं लागल्यानंतर तो त्या पहाड–माथ्यावरून खालीं खरसाळीच्या सपाटीस उतरला आहे. तेथें त्यानें आपल्या वहाळीच्या जोरानें दरीच उत्पन्न केली आहे. अशा रीतीनें आजूबाजूचे व खालचे खडक फोडून प्रवाहाकरितां वाट रुंदावण्याचे कामीं त्या पहाडांत जी उकळत्या पाण्याचींहि उन्हाळीं आहेत त्यांच्या उष्णतेनें तेथील खडक तडकून फुटण्यास हातभार लागला आहे. ही जोड मिळाली नसती तरी हें कार्य झालेंच असतें. लाख पन्नास हजार वर्षें अधिक लागलीं असतीं इतकेंच. हिमालयांतील सर्वच नदी, नाले ह्यांनीं वाटेंत आलेल्या खडकांचा चक्काचूर करून त्यांची धूळधाण करण्याचें काम अविच्छिन्न चालविलेलें असलें तरी हिमालयाचा विस्तार व उंची कमी झाल्याचें ऐकिवांत नाहीं. उलट त्याची उंची वाढतच असल्याचा शास्त्रज्ञांचा बोभाटा आहे. एका बाजूनें पाण्यासारखा पातळ, प्रवाही, हलका, मृदु, लवचिक पदार्थ दुसऱ्या बाजूच्या अगदीं ठाशिव, घट्ट, स्थाणू, जड, कडक व कठीण अशा पाषाणास धुळीस मिळवून टाकतो, हें केवढें आश्चर्य आहे ? पण आश्चर्य तरी कसलें ? येथें लहान मोठे, सशक्त अशक्त हा प्रश्नच नाहीं. चिकाटीनें केलेल्या अप्रतिबंध उद्योगाचें तें क्रमप्राप्त फलच आहे.

योगवासिष्ठांत महर्षि वसिष्ठांनीं रामास उपदेश करतांना असेंच सांगितलें आहे कीं, " बाबारे ! ' यत्नवद्भिर्दृढाभ्यासैर्मेरवेऽपि निगीर्यन्ते । ' प्रयत्नपूर्वक दृढाभ्यासानें मेरूसारखे महापर्वतहि नामशेष करितां येतात.

## हिमोद्भव प्रवाह

बंदरपुच्छापासून निघून खिडीच्या तोंडापर्यंत हिमप्रवाह घसरत घसरत सावकाश खालीं उतरतो. तेथून पुढें जलप्रवाहास सुरुवात होते. त्यापूर्वीं हिमप्रवाहांतच घसरणाऱ्या बर्फाचें पाणी होत होत तें

बर्फाखालून वाहूं लागलेलें असते; पण ती वहाळ दृष्टिआडून होत असते. जेथून ती दिसावयास लागली तेंच यमुनेच्या उगमाचें स्थान. येथें ह्या प्रवाहाची रुंदी दहा बारा फुटाची असून तो हत्तीच्या अंगापेक्षांहि मोठ्या धारेचा आहे. तो उभ्याचा अडवा एकदमच झाला असल्यामुळें त्याच्या धारेचा ओघ इतक्या वेगाचा आहे कीं, त्यावर दृष्टि ठरत नाहीं. नैसर्गिक बर्फाचें झालेलें पाणी स्फटिकासारखें स्वच्छ, निर्मळ व पारदर्शक आहे हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. त्याचप्रमाणें तें बर्फाखालूनच वहात आलें असल्याकारणानें तें त्याच्यासारखेंच गार ठणक असणार हेंहि उघडच आहे. अडवा झालेला हा प्रवाह मोठ्या उतारानें उड्या घेत खालीं उतरतो. तेथून पुढें त्याची रुंदी उत्तरोत्तर वाढत गेली आहे.

### धर्मशाळा

प्रवाहाच्या उगमापाशीं डाव्या उजव्या कांठचे डोंगरउतारामधील अंतर फारच थोडें आहे. त्याकारणानें तेथें वस्ती करून राहण्यासाठीं चट्ट्या वा धर्मशाळा बांधता येतील एवढीसुद्धा सपाटीची जागा उरत नाहीं. शौचास बसण्याइतकीसुद्धां सपाटी नाहीं. शिवाय झाडझडोऱ्याचा आडोसाहि नाहीं. ही तर मोठीच गैरसोय आहे. सपाटी करावयाचीच म्हटलें तर भलताच खर्च लागेल. शिवाय ती टिकेल किती दिवस ह्याची वानवाच.

यमुनेच्या उगमाजवळच डाव्या कांठीं पंचवीस तीस फूट उंचीवर एक धर्मशाळा आहे. ती सर्व लाकडी फळ्यांची आहे. तिचें एक अंग सर्व मोकळें आहे. त्यामुळें तिच्यांत ऊब राहात नाहीं. तिच्यांत पंचवीस तीस माणसांचा जेमतेम समावेश होईल. हीच काय ती मोठी एकमेव उतरण्याची सोय.

येथें एकहि दुकान किंवा चट्टी नाहीं. कांहींहि जिन्नस लागला तर तेवढ्याचकरितां माणूस पाठवून खालीं चार मैल खरसाळी आहे तेथून तो आणविला पाहिजे. दहा हजार फूट उंची, बर्फाचें निकट सान्निध्य, उतरण्यास बंदिस्थ जागा नाहीं, कांहींहि जिन्नस मिळत नाहीं, शेकशेकुटी करूं म्हटलें तर लाकूड–फाटाहि नाहीं. अशा स्थितींत यात्री आल्यापावलींच स्नान, पूजन, अर्चन उरकून संध्या-

काळचे आंत घाट उतरून वस्तीकरितां खरसाळी गांवात. सहसा येथें कोणी वस्तीकरितां थांबत नाहींत.

यमुना–मंदिर

डाव्या कांठच्या धर्मशाळेजवळ जरा वरच्या अंगास श्रीयमुना–गंगा ह्यांचें देऊळ आहे. तेंहि सर्व लाकडी असून ठेंगणें व अगदीं लहान आहे. गाभाऱ्यांत दोन माणसेंसुद्धां उभीं राहूं शकणार नाहींत. गाभाऱ्याच्या बाहेरचे अंगास वळचणीखालची पडवी आहे. ती इतकी ठेंगणी आहे कीं ओणव्यानें प्रदक्षिणा घातली तरी सुद्धां दोनदां डोकें आपटून प्रसाद मिळालाच.

देवळांत एकाशेजारीं एक, एकेक फूट उंचीच्या अशा दोन मूर्ति आहेत. एक भागीरथी गंगेची आहे, ती संगमरवरी दगडाची आहे. दुसरी मूर्ति यमुनेची आहे, ती काळ्या पाषाणाची आहे. अक्षय्य–तृतीये-पासून आश्विन शुद्ध पौर्णिमा, कोजागिरीपर्यंत ह्या मूर्तींची पूजा–अर्चा येथें होते व बाकी राहिलेल्या महिन्यांत येथील सर्व भाग बर्फांत बुडून जात असल्याकारणानें ह्या मूर्तीच येथून हलवून खरसाळींत नेतात आणि तेथें त्यांचें पूजन–अर्चन करतात.

उन्हाळीं

यमुनोत्तरी येथें चार पांच उन्हाळीं आहेत तीं एकापेक्षां एक अधिक कढत पाण्याचीं आहेत. श्रीयमुनादेवीच्या देवळाजवळ पण वरच्या अंगास दोन उन्हाळीं आहेत. पैकीं एक वावभर लांब–रुंद, व खोल असें आहे. त्यांतील पाणी उकळतें आहे. तांदुळाची सैलशी पुरचुंडी करून आंत सोडली तर पंधरा मिनिटांत भात शिजून ती तरंगूं लागते. आम्ही दोन शेर बटाटे पुरचुंडी करून आंत सोडले, तेहि चांगले उकडून वर आले. शिजून आलेल्या पुरचुंड्या आंत हात घालून काढण्याची सोय नाहीं. वाफ लागून तो होरपळून जाईल. त्यासाठीं तेथें वाव लांबीचा जाडसर लोखंडी चिमटा कोणी उदारधीनें ठेवलेला आहे. यमुनोत्तरीचा प्रसाद म्हणून येथें शिजलेला भात वाळवून कित्येक यात्री तो घेऊन येतात.

त्या उष्ण कुंडाच्या शेजारी एक अडीच तीन फूट व्यासाचा घुमटा-काराचा खडक आहे. त्याच्या माथ्यास बोट जाईल एवढें छिद्र

आहे. त्या वाटे जोरानें हिस्स्....स् आवाज होत वाफ एकसारखी बाहेर पडत असते. त्या छिद्रांत मधून मधून पाण्याचे थेंबटें अडकतात, तेव्हां सट्, सट्, असा आवाज होऊन ते बाहेर फेकले जातात. अधिक पाणी येतें तेव्हां चिळकांड्या उडून फवारेहि उडतात. कुंडाभोंवतींचे व त्याचप्रमाणें बाष्प बाहेर पडणाऱ्या लिंगाभोंवतींचे खडक तप्त असून ते काळे पडलेले आहेत. छिद्राच्या भोंवतालचा पृष्ठभाग शेवाळलेल्या दगडासारखा पिवळट दिसतो. त्यावरून पाणी वाहात नसलें तरी तो भाग ओलसर दिसतो. ह्या उन्हाळयांच्या शेजारीं एक कोनाड्यासारखी कपार आहे. तिचा गुहेसारखा उपयोग होतो.

उकळत्या कुंडांत पाणी सांचून राहात नाहीं. वाढणारें पाणी तेथून उघड्या पाटानें वाहून अदमासें पन्नास फूट खालीं एका कुंडांत येतें, व त्यांतील अधिक होत जाणारें पाणी त्याच्याच जवळ वीस पंचवीस फुटावर असणाऱ्या दुसऱ्या कुंडांत वाहून जातें. दुसऱ्या कुंडांत वाढणारें पाणी यमुनेंत वाहून जातें. हीं सर्वहि कुंडें डोंगरांत बुद्धया खणून केलेलीं असून तीं यमुनेच्या प्रवाहापासून पुरुष दीड पुरुष उंचीवर आहेत. तीं कमरेइतकीं खोल व अदमासें दहा बारा फूट लांबी-रुंदीचीं आहेत. दुसऱ्या कुंडापेक्षां पहिल्या कुंडांतील पाणी अधिक कढत असते. ह्या कुंडांतील पाण्याचें तपमान आम्ही प्रत्यक्ष घेतलें नव्हतें. गणितागत पद्धतीनें तें अजमावणें चुकीचें ठरेल असें भौतिकविज्ञानशास्त्री म्हणतात. कारण पृथ्वीच्या पोटांतील केवढ्या उष्णतेनें तें कढत होऊन वर आलें आहे व तेथें अल्ट्रा व्हायोलेट किरणांचा केवढा प्रभाव आहे, हें कळल्याशिवाय अदमास करणें चुकीचें होईल. पहिलें कुंड स्नानाकरितां व दुसरें धुणें, भांडीं घासणे वगैरेकरितां राखलेलें आहे. धुणें वगैरे केलें तरी पाणी सारखें वाहून जात असल्यामुळें त्यांत घाण राहात नाहीं. शिवाय माणसांचा उपसाराहि म्हणण्यासारखा मोठा नसतो. ह्या कढत पाण्यास कसलाच वास येत नाहीं. पण चवीला मात्र तें वेगळें लागतें. निवाल्यावर सुद्धां तें बेचवच लागतें. कुंडांतील पाणी कढत असण्याचें कारण पंडे ह्यांनीं सांगितलें कीं, पेटवून दिलेली आपली शेपटी लंकादहनानंतर हनुमानजींनीं येथें येऊन ह्या कुंडांत बुडविली. तेव्हांपासून पाणी कढत झालें.

गंगणाणी – भागीरथी कुंड पान ६५





भलड्याना – अर्धबिंब पान ५०



विश्वेश्वर मंदीर – उत्तरकाशी – पान १०९



तुंगनाथ वाटेवरील वनश्री पान २४८

तें अद्याप तसेंच येत आहे. तें कमी अधिक कढत होत नाहीं. बाहेरच्यां कडक थंडीमुळें स्नानाचे वेळीं कुंडांत बसलों तेव्हां प्रथम आराम वाटला. सर्वांगास सारखा शेक मिळून शिणोठा गेला व अंग मोकळें झाल्यासारखें वाटूं लागलें. पण दहा पंधरा मिनिटांतच शेक असह्य झाला. जीव थकून जाऊन घेऱ्या करूं लागल्या. अंग पुसून धोतर नेशीपर्यंत उसनवारीची आलेली उष्णता निघून गेली. धूत उपरणें व दुहेरी शाल गुरफटून घेतली होती तरी यमुनेकांठीं संध्या, आंवर्तन, ब्रह्मयज्ञ, पितृतर्पण करीपर्यंत हुडहुडीच भरली. स्तोत्रें–आरती वगैरे कपडे घालूनच करावी लागली.

यमुनेचें माहात्म्य

कोणत्याहि गोष्टीला महत्त्व येतें तें उगीचच येत नाहीं. तिच्या अंगीं तसें विभूतिमत्व म्हणजेच अलौकिक गुणवैशिष्ट्य असावें लागतें. नाहींतर लोकोत्तर कारणांनीं तिचा पाठपुरावा तरी केलेला असला पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहिलें तर यमुनेचें माहात्म्य भागीरथीएवढें नसलें तरी इतर सर्व नद्यांपेक्षां श्रेष्ठ आहे. तें दोनहि रीतीनें प्रत्ययास येतें. यमुनेचें उगमस्थान कसें अद्‌भुत आणि दैवी आहे हें आपण वर पाहिलेंच आहे. प्रयाग येथें गंगेशी तिचा झालेला संगमहि असाधारणच आहे. एवढा मोठा नद्यांचा संगम निदान भरत–खंडांत तरी अन्यत्र पाहावयास सांपडणार नाहीं. यमुनोत्तरीपासून प्रयागपर्यंत तिची लांबी पाहिली तरी ती नुसत्या पाहाडांतून बाहेर पडेपर्यंत नव्वद मैल व पुढें सपाटीवर सातशें सत्तर मैल होईल. पाण्याचा प्रवाह पाहिला तर हिचे सर्व कालवे व पाट ह्यांची लांबी सत्तावीसशें मैल होऊन त्यांतील पाण्यानें पुणें जिल्ह्यांतील हवेली तालुक्या एवढ्या आकाराचे क्षेत्रफळ भिजत आहे. शिवाय ह्याच्या शतपट तिचें पाणी गंगेंत जात आहे. हिमालयाच्या पायथ्याच्या प्रदेशापैकीं गंगा यमुना ह्या नद्यांमधील प्रदेश ज्याला अंतर्वेदी ( दुआब, यामून ) म्हणतात तो गंगा-यमुना नद्यांच्या गाळानें बनला असल्याचें भूगर्भशास्त्रवेत्ते सांगतात. एक हजार फूट जाडीचा हा गाळ आहे असें उत्खननांत दिसून आलेलें आहे. भागीरथी गंगेशिवाय भारतांत उगम पावलेली अशी एकहि नदी कोणत्याहि दृष्टीनें यमुनेपेक्षां मोठी नाहीं. ( सिंधु,

सतलज व ब्रह्मपुत्रा ह्या नद्या मोठ्या आहेत. पण त्यांचा उगम भारतांत नाहीं. शिवाय त्यांची वहाळ निम्म्याचेवर तिबेटांतच होते.) ह्या अंगभूत गुणांनींच यमुनेचें माहात्म्य विशेष आहे.

अवांतर गोष्टींमुळें तिच्या जल-माहात्म्यांत दैवी प्रसाद-माहात्म्याची भर पडून तें अधिकच वाढलें आहे. वैदिक पौराणिक कालांत त्याचा भर अधिकाधिक वाढून तो त्या पुढील कालांत गोलंकारी बौद्ध, ऐतिहासिक कालांत धर्मविध्वंसक यवन व फिरंगी, धर्मनिरपेक्षतेचा आव दाखवणारा इंग्रज व शेवटीं नुकतेच जन्मास आलेले धर्मनिरपेक्ष म्हणून घेणारे लोकसत्ताक ह्या सर्व राजवटींतसुद्धां तिच्या माहात्म्यास आलेला भर तसाच अबाधित राहिला आहे.

चारहि वेद, त्यांचीं ब्राह्मणें, रामायण, महाभारत, व इतर पुराणें ह्या ग्रंथांतून निरनिराळ्या प्रसंगानें गंगा-यमुना ह्या पुण्यतीर्थ नद्यांचे उल्लेख आलेले असून त्यांच्याविषयीं असलेली पवित्र भावना स्पष्ट दिसून येते. वैदिक काळ म्हणजे त्यांच्या संहितीकरणाचा काल. तो अगदीं अलीकडचा म्हटला तरी पांच सहा हजार वर्षांपूर्वींचा होतो. कित्येकांच्या मतें तो पांच–पन्नास हजारापासून अनादिपर्यंत आहे. कांहींहि असलें तरी ह्या नद्यांचें माहात्म्यहि तसेंच पुराणें आहे. रामायण महाभारतांचा काल वेदांनंतरचा म्हटला तरी तो पंचवीसशेंपासून पांच सहा हजार वर्षांपूर्वींपावेतो नेलेला दिसतो. ह्या पुराणांतून गंगा-यमुनेचें माहात्म्य सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वींपासून दिलेलें आहे.

वैदिक आर्य म्हणजे आपलेच पूर्वज ऋषिमुनी. त्यांना त्या कालांत पंजाबांतील नद्यांप्रमाणेंच गंगा–यमुना ह्या महानद्यांची माहिती होती. इतकेंच नव्हे तर त्यांच्या कांठीं त्यांचीं राज्यें होतीं. यमुनाकांठीं मोठमोठे यज्ञ करून ते तिच्यांत अवभृथ स्नान करीत. तेथें विपुल दानधर्म करीत. त्या नद्यांच्या कांठाकांठानें थेट त्यांच्या उगमापर्यंत यज्ञ व मैत्रावरुणापासून सारस्वतापर्यंतचीं सत्रें करीत जाण्याची त्यांची प्रथा होती. त्या नद्यांचें महत्त्व त्यांनीं चांगलें ओळखलें होतें. त्यांच्यामध्यें देवदेवतांचा वास असतो इतकेंच नव्हें तर त्या स्वतःच अत्यंत पवित्र व शुद्ध देवतारूप असल्याचें त्यांनीं अनुभविलें होतें. त्या महानद्यांच्या अंतर्वेदीमध्यें तपोनिष्ठ योगी महात्मे ऋषी, मुनी

यांचे अक्षय्य वास्तव्य असून ते जनतेचें कल्याण व अभिवृद्धि यांचा सतत अनुग्रह करतात ही जाणीव त्यांस होती. पुढें दिलेल्या उताऱ्या-वरून वैदिक वाङमयांत गंगायमुनांचे उल्लेख व माहात्म्य कसें आहे हें लक्षांत येऊन वरील विधानास पुष्टि मिळेल.

वैदिक उल्लेख ऋ. ५।५२।१७ व ७।१८।९

यमुनायामधि श्रुतमुद्राधो गव्यं मृजे निराधो अश्व्यं मृजे। यमुनेवर राजानें मला (ऋषिताला) शेंकडों गाई, घोडे व विपुल धन दिलें.

आवर्दिद्रं यमुना तृत्सवश्च। दाशराज्ञयुद्धांत तृत्स व यमुनातीरवासी त्यांनीं इंद्राला संतुष्ट केलें.

अष्टासप्तर्ति भरतो द्रौष्यंति यमुनामनु । ऐ. ब्रा. ८–२३ व श. प. ब्रा. दुष्यंतपुत्र भरत यानें यमुनेवर अठ्याहत्तर यज्ञ केले.

कारपचवं प्रति यमुनामवभृथमभ्यवयंति । यमुनेवर जाऊन अवभृथ स्नान करावें.

तुरश्रवसश्च वै पारावतानांच सोमौ संसृतावास्ताम् ।
तत एते तुरश्रवाः सामनी अपश्यत् ताभ्यामस्मा इंद्रः ।
शल्मालना यमुनाया हव्यं निरावहत् ।

यत्तौरश्रवसे भवतो हव्यमेवैषां वृङक्ते । ९।४।१० सामवेदाचे ताण्डच ब्राह्मणांतील हा उतारा आहे. यमुनेच्या कांठीं पुरश्रवा व पारावत ह्यांचे सोमयाग चालू होते. पुरश्रव्याच्या यज्ञांतील सामगान इंद्रास फार आवडल्यामुळें त्यानें पारावतांच्या यज्ञांतील हविर्भाग पुरश्रवाच्या यज्ञांत आणिला.

पौराणिक उल्लेख

श्रीमन्महाभारतादि पुराणांतून आपलीं तीर्थक्षेत्रें व देवदेवता यांविषयीं यथासांग माहितीचीं वर्णनें वाचावयास मिळतात. त्यांत यमुनेसंबंधीं आलेल्या माहितीपैकीं कांहीं येथें दिलीं तर तिच्या माहात्म्याची चांगली ओळख पटेल. श्रीमन्महाभारतांतील वनपर्वा-पैकीं तीर्थयात्रापर्वांत व श्रीमद्भागवतांतील पंचम स्कंधाच्यां सोळाव्या पासूनच पुढील चार अध्यायांत, गंगादि नद्यांची उत्पत्ति, तीर्थक्षेत्रें, त्यांचें माहात्म्य वगैरेंची पुष्कळ माहिती मिळते. सत्यसंध भीष्माचार्य ह्यांस महर्षि पुलस्त्य ह्यांनीं आणि सत्यशील युधिष्ठिरास धौम्य

महामुनींनीं तीर्थक्षेत्रांचीं स्थानें, त्याचें माहात्म्य व फलश्रुती सविस्तर सांगितली आहे. शुकाचार्यांनीं परिक्षिति राजास जगदोत्पत्ति सांगितली आहे. त्या आद्योत्पत्तींत महानद्यांची उत्पत्ति व माहात्म्य कळून येतें.

धौम्यमुनींनीं इतर दिशांचीं तीर्थें सांगितल्यानंतर उत्तर दिशेचीं तीर्थें सांगितली. त्यांतील अगदीं पहिलें सांगितलें तें यमुनेचें आहे. ते म्हणाले– ' मी सांगत असतांना तूं अंतःकरण एकाग्र करून ऐक. कारण सांगितलेली गोष्ट मनांत असली म्हणजे तिच्या योगानें उत्कृष्ट प्रकारची श्रद्धा उत्पन्न होते. हे पांडुपुत्रा ह्या ठिकाणीं समुद्रगामिनी महावेगसंपन्न आणि अत्यंत पुण्यकारक तीर्थांच्या योगानें सुशोभित असलेली अशी यमुना नदी आहे. ह्या ठिकाणीं अत्यंत पवित्र व शुभकारक प्लक्षावतरण नामक तीर्थ आहे. सारस्वत यज्ञ करून ब्राह्मण ह्या तीर्थावर स्नानास जात असतात. ह्या ठिकाणीं पवित्र शुभकारक आणि दिव्य असें अग्निशिर नामक तीर्थ आहे, तेथेंच एका शम्याक्षेपावर ( काठी गरगरा फिरवून फेकली म्हणजे ती जितक्या अंतरावर जाऊन पडेल तें अंतर म्हणजे शम्याक्षेप किंवा शम्यापात ) संजयपुत्र सहदेव यानें यज्ञ केला होता. त्याविषयींच इंद्रानें म्हटलेली एक गाथा त्या लोकांत प्रचारांत असून ब्राह्मण ती म्हणत असतात. सहदेवानें यमुनेच्या तीरीं जे अग्निचयनयुक्त यज्ञ केले त्यांमध्यें त्यानें ब्राह्मणांस लक्ष दक्षिणा वाटल्या, त्याच ठिकाणीं महायशस्वी सम्राट राजा भरत ह्यानें एकशें अठ्ठेचाळीस अश्वमेध यज्ञ केले. ह्या ठिकाणीं द्विजांचे मनोरथ पूर्ण करणारा जो शरभंग त्याचा अत्यंत पवित्र व प्रसिद्ध असा आश्रम आहे. '

श्रीकृष्णावतार हा परब्रह्माचा पूर्णावतार समजला जातो. त्या श्रीकृष्णाचा जन्म यमुनातीरीं मथुरेंत झाला. यमुनातीरींच्या त्याच्या बाललीलांनीं तिच्या पावित्र्यांत भर घालून तिचें माहात्म्य चिरस्थायी करून ठेविलें आहे.

## यमद्वितीया

यमुना ही सूर्याची मुलगी व यमाची बहीण. तिनें एकदां आपल्या भावास जेवावयास बोलाविलें. त्यानें आमंत्रण स्वीकारिलें. एक वर्ष

होऊन गेलें तरी त्यास सवडच झाली नाहीं. यमुनेनें पुन्हां येऊन आमंत्रण दिलें. यमानें सवड काढून निश्चित येण्याचें आश्वासन दिलें. असें तीन चार वेळ झालें. यमुनेला कळून आलें कीं, खरेंच आहे; दादा पडला मुख्य न्यायाधीश. त्याला सवड सांपडणार कशी ? हर-घडी कोणाना कोणास आणून त्याचे दूत त्याजपुढें न्यायाकरितां उभे करीतच असतात. हें काम कधींहि संपावयाचे नाहीं, म्हणून त्याला हेतुपुर:सरच सवड काढली पाहिजे.

त्याला आतां एकच उपाय. त्याचेकडे जाऊन तो येईपर्यंत तेथेंच धरणें धरून बसण्याचा सत्याग्रह करावयाचा. त्याप्रमाणें तिनें लगेच केलेंहि. तिची मात्रा चांगली लागू पडली. यमराजानीं येण्याचें निश्चयात्मक आश्वासन दिलें. तिचें आमंत्रण त्याच्या एकटयापुरतें नव्हतें. त्याचें सर्व दूत व कारभारी मंडळी ह्या सुद्धां तें होतें. एके दिवशीं दादा सर्व परिगणासह बहिणीकडे जेवणास आले. कधीं नवत भाऊ आपल्या येथें आला, यामुळें यमुनेस अत्यानंद झाला. तिनें त्या दिवशीं स्वत: पाकसिद्धि केली. बहिणीचें अत्यादराचें व प्रेमाचें जेवण जेवून भाऊ तृप्त झाला व ताईस म्हणाला, ' मी अतिशय संतुष्ट झालों आहे. तूं मागशील तें तुला द्यावें अशी मनीषा आहे.' ताई म्हणाली, 'दादा, तूं आलास ह्यानें मी कृतार्थ झालें. तुझ्यासारखा भाऊ असल्यावर मला काय कमी आहे. सटीसामाशीं बहिणीची अठवण ठेवून येत जा म्हणजे सर्व कांहीं पोहोंचलें.' दादा म्हणाला, ' ही असली उडवाउडवी चालणार नाहीं. तुला कांहीं कमी आहे म्हणून मी देतों असें नाहीं. तुला जसा आनंद झाला तसा मलाहि पण आनंद झाला आहे. त्या भेटीनिमित्त तुला जें कांहीं आवडेल तें मीं देण्याचें ठरविलें आहे. '

ताई म्हणाली, ' तें मी सांगतें पण तूं मला अगोदर हें सांग कीं, तू जीवांच्या पापपुण्याचा न्यायनिवाडा करून त्यांस गति देतोस. तू दिलेल्या मृत्यूच्या शिक्षेविरुद्ध निषेध व्यक्त करण्यासाठीं कोणी काळी चिंधी तरी बांधतात, कोणी दुखवटयाचे ठराव करितात, तर कोणी दुखवटयाच्या सुट्टया देतात व कामें स्थगित करतात. कोणी उपवास करितात तर कोणी मौन पाळतात, कोणी मोठ्या काकुळतीनें तुझी याचना भाकतात. कोणी कोणी दु:खावेगांत तुला निर्दय, पाषाण-

हृदयी, क्रूर, कर्दनकाळ असें म्हणण्यासहि कमी करीत नाहींत. पूर्वींच्या भोळ्या भाविक पण पतिजीवनाशीं एकरूप होऊन गेलेल्या एकनिष्ठ हिंदु स्त्रिया पतीबरोबर सहगमन करीत. परंतु अलिकडील काळांत ती चाल रानटी वाटून बंद पाडली आहे. आणि सुधारलेल्या नवीन मनूंत आस्वार्थ दिखाऊ प्रायोपवेशनाचा असा कांहीं एक नवीनच मार्ग शोधून काढला आहे. इतके सर्व प्रकार तुझ्या डोळ्यांदेखत होत असतांना तुला दयेचा यत्किंचितसुद्धां पाझर कसा फुटत नाहीं ? '

यमराज म्हणाले, ' ताई ! मला अगदींच का भावना नाहींत ? मीहि तुमच्यासारखाच मुलामाणसांतला आहे. न्यायनिवाड्याच्या कामांत दयामाया, धाकदपटशा, त्रागा, मुत्सद्दीपणा, पक्षपात करणें असल्या गोष्टींस थारा नसतो हें लोक विसरतात, आणि माझी वाटेल तशी संभावना करितात. मुकाट्यानें ऐकून घ्यावें लागतें. हें कामच असें निष्ठुरतेचें दिसणारें आहे. तुझें माझें बहिणभावंडांचें नातें. येथें न्यायाचा प्रश्न नाहीं, येथें प्रेमाचा ओलावा आहे. आणि म्हणून तर तुझ्या सत्याग्रहास मान द्यावा लागला. तो ओलावा नसेल तर त्याचीहि गत उपेक्षणीयच. असो तुझ्या शंकांचीं उत्तरें दिलीं. आतां तुला काय देऊं तें सांग. '

## वरप्रदान

ती म्हणाली, ' मला खरंच कांहीं नको आहे, पण तुझा आग्रहच आहे म्हणून मागतें कीं, " प्रतिवर्षं समागच्छ भोजनार्थं तु मद्‌गृहे । अद्य सर्वे मोचनियाः पापिनो नरकाद्यम । यद्येव भगिनीहस्तात्करिष्यन्ति च भोजनम् । तेषां सौख्यं प्रदेहित्वं एतदेव वृणोम्यहम् । " '
तिच्या मागणीचा भावार्थ असा कीं, आज कार्तिक शुध्द द्वितिया हा दिवस तुझ्या भेटीची आठवण म्हणून 'यमद्वितिया' म्हणजेच 'भाऊबीज' नांवानें प्रसिध्द राहील. त्या दिवशीं जे कोणी आपल्या बहिणीकडे जाऊन तिच्या हातचें भोजन करतील त्यांना सर्व प्रकारें सौख्य लाभ होईल. जे कोणी महत्पापी दुर्दैवामुळें यमयातना भोगीत असतील त्यांनाहि बहिणीच्या घरीं जातां यावें म्हणून तूं या दिवसापुरतें तरी त्यांना बंधमुक्त करशील, ह्याप्रमाणें यमुनेनें वर मागितला व यम. राजानीं ' तथास्तु ' म्हटलें.

यमुनेच्या माहात्म्याची थोरवी ही अशी आहे. सच्छील सद्वर्तनी लोकांस तिच्या दर्शनपूजन स्नानपानादि पासून ऐहिक व पारमार्थिक कल्याण आहेच. पण पापी चांडालांनाहि तोच लाभ करून घेण्याची सवड आहे.

शिक्षेच्या भयापेक्षां सहानुभूतीच्या प्रेमानें पापी मनाचें परिवर्तन सुलभ व सहज होऊं शकतें; शिक्षा ही जीवास जीव घेण्याच्या सूड बुद्धीसाठीं नसून ती पश्चात्तापपूर्वक प्रायश्चित्ताकरितां असते. त्या गोष्टी यमधर्माच्या चांगल्या परिचयाच्या होत्या म्हणून त्यानें मोठ्या संतोषानें वरप्रदान केलें. आपल्या भगिनीनें भोग्य वस्तूंची स्वार्थाकरितां क्षुल्लक मागणी न मागतां परोपकार बुद्धीनें लोकोद्धारार्थ वर मागितला या तिच्या थोर व उदार अंतःकरणाबद्दल त्यास कौतुक वाटलें आणि त्यानें तिला धन्यवाद दिले.

## समुद्रगामिनी यमुना

यमुनेला महाभारतांत समुद्रगामिनी म्हटलें असल्याचा उल्लेख वर आलाच आहे. ती तर प्रयाग येथें भागीरथीस मिळते. त्या विरोधाचा उलगडा भूस्तरशास्त्राच्या आधारें होण्यासारखा आहे. यमुना नदी कालांतरांत हजारों हजार वर्षांपूर्वीं सिंधूप्रमाणेंच खंबायतच्या आखाताजवळ समुद्रास मिळत असली पाहिजे. भूस्तराच्या स्थित्यंतरामुळें सिंधु पश्चिमेस हटत गेली त्याचप्रमाणें यमुनेसहि गंगेस मिळेपर्यंत हटावें लागलें आहे.

## आल्या वाटेनें पुन्हां सिमली

जानकी चट्टीपासून गंगाणीपर्यंत सारखा यमुनेच्या कांठाकांठानें येतां जातां प्रवास झाला. दोन्ही कांठीं उंच उंच डोंगर आहेत व प्रवाहास उतारहि फार आहे. पात्रभर वाळू, दगड, धोंडे, गोटे इतके आहेत कीं, आदळआपट केल्याशिवाय प्रवाहास गतिच नाहीं. प्रवाहांत गडगडून आलेले मोठे मोठे गोटे अडखळून पडलेले दिसतात. त्यांच्या माथ्यास माझा हात पोहोंचत नसे. ह्यावरून त्यांच्या मोठेपणाची कल्पना येईल. घागरीएवढाले दगड तर वहातांना दिसतात. अशा ह्या वहाळींत बारक्याबुरक्या दगडांचा चक्काचूर होऊन पीठ होऊन जातें. तें इतकें बारीक होऊन पाण्याशीं मिसळून जातें कीं, पाणी

निवळत ठेवल्यास चार चार दिवस लागतात. असा हा दगडाचा पिठ्ठा करण्याचें कार्य हिमालयांतील सर्वच नद्या सहस्रों वर्षें अव्याहत करीत आल्या आहेत. त्यांच्या ह्या श्रमाचें चीज म्हणजेच त्या नद्यांच्या कांठचे प्रदेश–बिहार उत्तर प्रदेश वगैरे सुपीक होऊन राहिले आहेत.

## यमुनाकाठचे पहाड व त्यांची घटना

वर म्हटल्याप्रमाणें यमुनेच्या प्रवाहाचा जो धिंगाणा अविरत चालू आहे त्याचा घोष, प्रतिघोष, ह्यांनीं वातावरण अक्षय्यचें निनादून गेलेलें असतें. घो घो आवाज कानांत सारखा घुमत असतो. त्याला क्षणभरसुद्धां खळ नाहीं. रात्रीं तो जास्तच वाटतो. नेहमींच्या पद्धतीनें एकमेकांशीं बोललें तर स्पष्ट ऐकूं येत नाहीं. बहिरट माणसाशीं बोलतांना जसा स्वर उंचवावा लागतो तसें बोलावें लागतें. सिमली सोडल्यानंतर ह्या गर्जून गेलेल्या वातावरणांतून दोन दिवस मुक्त झालों होतो. आगगाडींतून उतरल्यानंतर तिची एक सारखी ऐकावी लागणारी खडखड, घर्‌घर्‌ बंद होऊन शांत वाटतें, तद्वत् आराम वाटला.

यमुनेच्या कांठचे डोंगर उंच उंच व विस्तीर्ण लांबीरुंदीचे तर खरेच, पण ते कांहीं आपल्या सह्याद्रीसारखे एकजीवी काळ्या कणखर पाषाणाचे बनलेले नाहींत. सह्याद्रीसारखे सुळके व उभेच्या उभे तुटलेले कडे ह्यांत दिसत नाहींत. ह्यांचा दगड ढिसूळ दिसतो व तसाच तो आहेहि. हे डोंगर भयानक व भेसूर न दिसतां भव्यच वाटतात, म्हणूनच एकट्या दुकट्यानें वेळीं अवेळीं प्रवास करण्यास कसलीच भयभीति वाटत नाहीं. ह्या डोंगरांची घटना पाहिली म्हणजे आश्चर्यच वाटतें. कोठें कोठें नुसती माती व लहान-मोठे गोटे ह्यांच्या मिश्रणांचे हे ढिगारेच आहेत. कोठें कोठें दगडां-चेहि हे बनले आहेत. त्यांत शहाबाद, कडपा, संगमरवरी, पोरबंदरी काशीकडच्याप्रमाणें तांबूस फरशांच्या पापुद्र्यांचे हे झालेलें दिसतात. त्यांत चुनखडी, शिरगोळा, गारगोटीमिश्रितहि आहेत. कांहीं ठिकाणीं तर ते जळकट राखुंडीप्रमाणें आहेत. अभ्रक मिश्रण तर सर्वत्रच दिसून येतें. इतक्या निरनिराळ्या प्रकारचे व एवढ्याशा स्थला-

७०८५४ दा. क्र.



वकाशांत हे कसे बनले असावेत? वाळूचे खडे, बारीक गारगोट्या व गोटे मातींत मिसळून हे अवाढव्य पर्वतप्राय ढिगारे कसे उत्पन्न झाले असतील? प्रतिवर्षी वारा नि पाऊस यांनीं धुपून जात असतांना सुद्धां अजून ते सपाट कसे होत नाहींत? इत्यादि कोडचांचें आश्चर्यच वाटतें. एका ठिकाणीं सबंध डोंगर 'व्हर्डून' प्रमाणें उध्वस्त करून टाकण्यासाठींच कीं काय जिकडे तिकडे सुरुंग पेरून त्यांनीं खडक फोडावे आणि दगड, धोंडे, कपाऱ्या रानोमाळ उडाव्या असा विलक्षण व भेसूर देखावा दृष्टीस पडतो. हे सारे प्रकार पाहिले म्हणजे माणूस हतप्रज्ञ होऊन जातो.

ह्या डोंगरांपैकीं आज निरनिराळे दिसणारे, कालांतरांत तसे नव्हते. तेथून वहाणाऱ्या प्रवाहांनीं आपला मार्ग करून घेतांना त्याठिकाणीं मोठमोठ्या दऱ्या होत गेल्या आणि अंतर पडून एकाचेच दोन डोंगर झाले. आज यमुना ज्या पातळीवरून वहात आहे त्यापेक्षां उंच म्हणजे डोंगरमाथ्याच्या पातळीवरून ती एके काळीं वहात होती. तिनें त्या वेळची दरी गाळानें भरून काढली. तेव्हां तिचा प्रवाह एका अंगास सरून त्या अंगास नवीन दरी उत्पन्न झाली व पहिल्या दरीची दुसरी बाजू वर म्हटल्याप्रमाणें वाळू, गोटे, माती मिश्रित तशीच राहिली. त्याचेच ते डोंगर दिसत आहेत किंवा तिच्या गाळानें भरलेल्या सरोवराचा तळ भूगर्भांतील खळबळीच्या दाबानें वर उचलून हे डोंगर झाले असावेत. अशा प्रकारच्या कल्पना सुचतात.

### यमुनादर्शन – बोध

पण तेवढ्यानें समाधान होत नाहीं. प्रश्न उरतोच कीं, हा सर्व खटाटोप कशासाठीं व ह्याचा नियंता कोण? प्रचंड डोंगरांपुढें साडे-तीन हाताचा आपला देह एरवीं मोठा वाटत असला तरी येथें तो अगदींच क्षुद्र कस्पटासमान दिसूं लागतो. पण आपण बुद्धिबलाच्या जोरावर त्या प्रचंडाच्या डोक्यावर जाऊन उभे राहूं, त्याचप्रमाणें त्याच्या बुडासहि हात घालूं ह्या विचारांनीं आपली चिमुकली छाती फुगते. परंतु ज्या अनंत अश्वशक्तीच्या अगाध लीलांनीं येथील भौतिक घटनांच्या घडामोडी चालू आहेत तिचा चाबुकस्वार कोण? त्याचें सामर्थ्य केवढें? व हा सर्व उपद्व्याप कशाकरितां? असले

विचार उभे राहिले म्हणजे छातीचा फुगोटा आपोआप उतरतो आणि बुद्धीस नमावें लागून शरणागति पत्करावी लागते. हा पाठ यमुनोत्तरीच्या दर्शनांतून मिळतो.

## अनुभवाचें सार

हिमालयांतील चार धामांच्या यात्रा कठीण, आणि त्यांतली यमुनोत्तरीची तर फारच कठीण, असा त्या यात्रा करून आलेल्या लोकांनीं ग्रह उत्पन्न करून ठेविलेला होता. इतर तीन धामांच्या मानानें यमुनोत्तरीकडे वाटा चांगल्या नाहींत, चट्टचाहि जवळ जवळ व पुरेशा नाहींत ही स्थिति कांहीं अंशीं खरी आहे. पण ह्या गोष्टीचा एवढा मोठा बाऊ वाटण्याचें कारण नाहीं. घर सोडून आठचार दिवसांपेक्षां अधिक काळ बाहेर राहाण्याचा योग कधीं अनुभवला नव्हता, किवा अर्ध्या, पाऊण दिवसापेक्षां अधिक लांबचा प्रवासहि कधीं केला नव्हता. ह्या कारणांची भर पडून ही यात्रा म्हणजे एक साहसच आहे असें निघतांना वाटत होतें. आपल्या हातून ही यात्रा कशी काय पार पडणार ह्याची मनाला सारखी धागधुगी वाटत असे. अशाहि स्थितींत पायचालीस सुरवात केल्या-पासून नऊ दिवसांत यमुनोत्तरी गांठतां आली. प्रत्यहीं सरासरी बारा मैलांची चाल करावी लागली. ह्या अंतरांत अगदीं थकून गेलों, असा एकहि दिवस उजाडला नाहीं. नाहीं म्हणावयास चढ लागला म्हणजे मात्र पाय थकून जाऊन इतक्या मेटाकुटीस येत कीं, वाटेंतच बसावें लागणार असें वाटे. पण एकदा चढ का संपला म्हणजे पायांचें हें दमणें हें शुद्ध ढोंग होतें, असें कोणासहि वाटलें असतें. कारण पुढें सपाटी किंवा उतार असला म्हणजे तेच पाय विनाकष्ट झपाझप उचलत. पाय दमून अंबून गेले, दुसऱ्या दिवशीं चाल बंद ठेवून विश्रांति घेण्याची पाळी आली, असें कधींहि झालें नाहीं. अशा रीतीनें यमुनोत्तरीची यात्रा आणि तीहि फारच कठीण म्हणून गाजलेली, निर्विघ्न व बहुतेक सुखरूप पदरांत पडली. बहुतेक म्हणण्याचें कारण इकडील पहाडी प्रवासांत गैरसोयी आणि दगदग सोसलीच पाहिजे. त्याशिवाय ह्या यात्रा कोणासच करितां येणार नाहींत. म्हणून ते कष्ट व गैरसोयी स्वेच्छेनें पत्करलेल्या असल्यामुळें त्या सुखरूपच

समजावयाच्या. नाहींतरी सुखदुःख मानण्यावरच असतें.

गिर्यारोहणप्रेमीयास सूचना

गिर्यारोहणप्रेमी पौरुषीगुणाच्या धाडशी प्रवाशांकरितां येथें एक सूचना करून ठेवावीशी वाटते. कांचनगंगा २८०००, गौरीशंकर ( एव्हरेस्ट ) २९०००, हीं लोकोत्तर उंचीचीं शिखरें चढणें अति-कष्टाचें, खर्चाचें व इतरांच्या साहाय्याशिवाय न होणारें कार्य आहे. तीं चढण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी बंदरपुच्छ शिखर चढून पाहावें, म्हणजे सराव होईल व आपलें सामर्थ्यहि आपोआप अजमावलें जाईल. आठपंधरा दिवस यमुनोत्तरीस जाऊन राहाणें कठीण नाहीं. वरचेवर लागणारी शिधा–सामुग्री थोड्या आयासांत व वेळांत तेथून जवळच मिळणारी आहे. शिखर गांठीपर्यंत यमुनोत्तरीचा मुख्य तळ दृष्टीच्या कक्षेबाहेर फारसा पडणार नाहीं अशी समजूत आहे. हा प्रयत्न यशस्वी झाला म्हणजे ह्याच्यासारख्याच सोयीचीं पण उत्तरोत्तर अधिक उंचीचीं शिखरें—केदार, २१०००′ गुर्लामांधाता २५३००′ धवलगिरी २६७००′, आवांक्यांत येऊन मग वरच्या उंचीच्या शिखरा-रोहणास हात घालणें युक्त होईल. पण उत्साहाच्या भरांत पुरा विचार केल्याशिवाय जर का अतिरेकी साहस करून वेडावांकडा प्रसंग ओढवला तर नसतें अपयश पदरीं येऊन पुढल्यांच्या मार्गांतहि एक विनाकारण बूझ उत्पन्न करून ठेवल्यासारखें होईल.

मला एवढाच पूर्वानुभव असतां तरी ह्या संधीचा उपयोग करून घेऊन मी येथें चार आठ दिवस राहण्याच्या तयारीनें येऊन बंदरपुच्छ पहाड चढून पाहाण्याचा प्रयत्न केला असता. पण तो योग त्यावेळीं माझ्या भाग्यांत नव्हता. कोणी सांगावें; अजूनहि तो योग येईल. निदान कोणा सहधर्मीयास प्रेरणा होईल.

२६।५।३५ सकाळीं स्नानसंध्यातर्पणादि यमुनेवर करून गंगेची पूजाअर्चा केली. नैवेद्यास शिरा केला होता. पंडे व बोजेवाले ह्यांस पोटभर प्रसाद दिला. यमुनोत्तरीहून निघण्यास दोन वाजले. निघण्या-पूर्वीं पंड्यांची संभावना केली. गंगायमुनांचें दर्शन घेऊन निरोप घेतला. यमुनाजलानें आचमन करून मार्जन केलें आणि सद्गदित अंतःकरणानें परत मार्गीं निघालों.

## दुर्लक्षाचें प्रायश्चित्त

यमुनोत्तरीहून सिमलीपर्यंत पंचवीस मैल आल्या मार्गानेंच परतावयाचें होतें. जातांना जो चढ तोंच आतां उतार झाला. बेताचा उतार असतो तेव्हां चालण्यास सोपें जातें व वेळहि कमी लागतो. पण भैरवघाटीसारखा तो असला म्हणजे उतरण्यापेक्षां चढणेंच बरें असें वाटतें. ती घाटी अगदीं जपून सावकाश उतरत होतों तरी घसरून तोल गेला आणि दंडवत घडलें. भैरवाकडे दुर्लक्ष झाल्याचें प्रायश्चित्त मिळालें.

## प्रसादाच्या ओंब्या

डटोडीचट्टी बारा मैल आहे. तेथें पोहोंचण्यास रात्रींचे आठ वाजले. चट्टीसमोरच उतारावर गव्हाचें शेत होतें. शेतकऱ्याची बायको ओंब्या भाजून पाखडीत होती. त्यांतील विकत मिळतील का म्हणून दुकानदारास विचारतां त्यानें नकार दर्शविला. आम्ही वळकटया सोडून निजण्याच्या बेतांत होतों, तों शेतकऱ्यानें एका थाळींत दोन तीन पसे ओंब्या घालून मजपुढें ठेवल्या व म्हणाला, "बाबूजी, हमारा देशका यहि मेवा है। खुषीसे आपको सादर करता हूं। स्वीकार करे।" मीं म्हटलें, "तुम्ही रात्रंदिवस एवढे काबाडकष्ट करतां त्याचें फळ मीं फुकट घेणें हें पाप होईल. ह्याची किमत सांग." तो म्हणाला, "मैं दाम नहीं ले सकता।" मीं म्हटलें, "हे चार आणे घे." तो म्हणाला, "नहीं, नहीं, मैंने एकदफे आपको कहदिया है कि दाम नहीं ले सकता। यह हमारा खेतमें पैदा हुवा है।" तो खनपटीस बसला आणि म्हणाला, "यह जम्नामय्याजीका प्रसाद है।" मीं चार ओंब्या घेतल्या. तो आग्रह धरूनच बसला कीं सबहि लेना चाहिये। मीं म्हटलें, "माझे हे पैसे तुझ्या मुलांना खाऊं म्हणून घे." त्याची समजूत पटेना. तेव्हां दुकानदारानें त्याची समजूत काढली. तरी त्यानें दोनच आणे घेण्याचें कबूल केलें. त्या खेडुतांचें औदार्य व भाव पाहून मन गहिंवरून आलें. शहरी राहणींत असला प्रेमळ भाव औषधापुरता तरी दिसेल का ?

दुसरे दिवशीं सोळा मैल चाल करून सिमली पाठीशीं घालून गंगोत्तरीच्या वाटेस लागलों.

# हिमालयदर्शन

भाग २ रा

## गंगोत्तरी

२.५.९६३

# हिमालयदर्शन



## सिमली तें उत्तरकाशी

करांचीवाल्यांच्या जथ्यापासून होणारी गैरसोय टाळण्यासाठीं त्यांच्या आमच्यामध्यें निदान दोनतीन दिवसांच्या चालीचें अंतर राखणें आवश्यक होतें. त्याकरितां म्हणून आम्हांला आमची दैनिक चाल वाढवावी लागली. कोणता मुहूर्त लागला, माहीत नाहीं. पण ती चाल वाढतां वाढतां प्रतिदिनीं एकवीस मैलांपर्यंत वाढली. त्यापासून त्रास झाला नाहीं, पण प्रवास फारच धांवपळीचा झाला.

## तिकडे स्त्रियाहि चिलीम ओढतात

सिमलीपासून चढण लागली पण ती बेताचीच होती. झाडी मात्र दाट होती. वाटेंत आमच्यासारखेच यात्रेस निघालेलें एक तत्प्रांतीय जोडपें भेटलें. त्यांनीं आमची विचारपूस केली. आम्हांस त्यांनीं यमुनोत्तरीस फोटो घेत असतांना पाहिल्याचें सांगून, फोटोची एक प्रतहि पोस्टानें पाठविण्यास सांगितलें. आपण आतां संगतीनें प्रवास करूं, बायकांना एकमेकांची सोबत अनायासें होईल, असें ते म्हणाले. त्यांच्या बायकोस शौच्यास जावयाचें होतें म्हणून आम्ही वाटेवर थांबलों. त्या बाई लोटीबिटी घेतल्याशिवायच गेल्या व अर्धवट दृष्टिआड होऊन तेथें बसल्या व लहान मुलीप्रमाणें पाण्याकडे गेल्या. आम्हांस हें किळसवाणें वाटल्याचें त्या माणसाच्या लक्षांत आलेलें दिसलें. त्यानें देशाचार निरनिराळे असतात असें म्हणून आपली चिलीम शिलगाविली व मोठ्या आग्रहानें आम्हां दोघांपुढें ती केली. मी ओढीत नाहीं असें मानेनें खुणविलें. बायकोनेंहि तसेंच खुणावलें. त्यानें थोड्याच वेळांत तेथें धूम्रावरण उत्पन्न करून सोडलें. त्याची बायको परत आली. तिनेंहि चिलमीचे दोन दम मारले. हिंदु बायका तंबाखू खातात, तपकीर ओढतात हें खानदेशांत पाहिलें होतें, पण

त्या चिलीमहि पितात, हें प्रथमच येथें दृष्टीस पडलें. चमत्कारिक वाटलें.

आडरानांतील चट्टी व बैरागी

ही संगती आपणांस मानवणार नाहीं म्हणून आम्हीं म्हटलें कीं, आम्ही हळूहळू पुढें होतों. तुम्हीहि लवकरच निघा. त्यांनींहि नकार दर्शविला नाहीं. आमचे बोजेवाले त्याच्या चिलमीचा पाहुणचार घेत थांबले होते. दोन मैलांवर एक नवीनच चट्टी तयार होत होती. संध्याकाळ होऊन अंधार पडूं लागला. होता. आमचे बोजेवालेहि येऊन पोहोंचले होते. तेथेंच वस्ती करावयाची असें ठरवलें. एक अगदींच लहान छपरी दुकानाशेजारीं उभारली होती. तिचें नांव विचारतां बोजेवाल्यांनीं 'जंगल चट्टी' म्हणून दिलें सांगून! माहीत नसलेल्या झाडाचें नांव 'विलायती झाड', म्हणून सांगण्याची प्रथा नेहमींचीच असते. त्यांतलाच हा प्रकार होता! पण हें नांव मात्र अगदीं सार्थ होतें. ती झाडी घनदाट होती. आभाळांत इतक्या थोरल्या चांदण्या चमकत होत्या पण एकीची सुध्दां लुकलुक दिसत नव्हती. वद्य दशमीची काळोखी रात्र. अवशीसच जिकडे तिकडे, डोळ्यांत बोट घातलें तर दिसणार नाहीं, असा अंधकार भरून गेला होता. दुकानदाराकडील मिणमिण दिव्याच्या अंधुक उजेडानें काळ्याकुट्ट अंधाराची स्पष्ट कल्पना आणून दिली. दुकानाच्या पुढील पडवींत बोजेवाल्यांनीं आपला तळ ठोकला. छपरींत आम्ही दोघे व एक अंगास राख फासलेला जटाधारी बोवाजी, एवढीच वस्ती. तो गांजा पिऊन त्याच्या निशेंत सुन्न असल्याची शंका आली. त्यास कांहींहि विचारलें तरी तो नुसतें हूँऽऽऽ करी. वाटेवरून चिटपाखरूंहि जाणारें येणारें नव्हतें. किड्यांचा किर्रर असा एकसुरी आवाज आमच्या बिचकलेल्या मनास ताप देत होता. वाळलेल्या पानांचा सळसळ आवाज मधून मधून ऐकूं येई, तेव्हां एखादें साप किरडूं तर येणार नाहींना म्हणून अधिकच दचका बसे. दिवसभराच्या चालीच्या श्रमानें पाठ जमिनीस लागण्याचा अवकाश कीं, झोंपेचें राज्य चालूंच, असा प्रतिदिनींचा अनुभव. पण आज तर अधिक चाल झालेली असून सुद्धां अस्वस्थपणा जाईना व झोंप येईना. कारण काय तर बैरागी. एका यात्री बाईची ट्रंक, (त्यांत तिचे दोनशें रुपये होते) एका

बैराग्यानें पाळत राखून रात्रीं मंडळी झोंपी गेल्यावर लांबविल्याचा बोभाटा ऐकला होता. आमचे पैसे आम्ही आपल्या कमरेस नेहमीं बांधून ठेवीत असू. म्हणून त्याची काळजी वाटत नव्हती. तथापि रात्रभर स्वस्थपणा वाटला नाहीं हें खरें. दुसरे दिवशीं निघतांना आमची रात्रीची अवस्था चट्टीवाल्यास सांगतां, तो म्हणाला, " बाबूजी ! यह पवित्र तपोभूमि है। किसी प्रकारकी डर यहा रहती नहीं । बोवाजीको मैं बहोत जानता हूँ। वो भला साधुपुरुष, अवलिया है । कोई अमली पदार्थ सेवन नहीं करता। किन्तु निशाबाजके माफक ईश्वर चिंतनमें हमेश दंग होकर रहता है। किसीके पास एकहि छदाम मंगता नहीं । और किसीने खुषीसे दे दिया तो उनको स्पर्शहि करता नहीं। चट्टीमें कोई यात्री न हो, तो वह यहाँ ठहरता है। परंतु कोई आने लगा तो एकदम निकल जाता है । आप भाग्यवान हो। आपको कल रातमें उनकी संगत मिली। यह भूमीमें और एक दोन सत्पुरुष ऐसेहि घूम रहे हैं। भाग्य हो तो आपको वो एक दिन मिलजाएंगे। " हें वृत्त ऐकून मनांतली धास्ती गेली व त्या बोवाजी-बद्दल आदर वाटून प्रसन्नचित्त झालों. त्याच्याजवळ जाऊन त्यास नमस्कार करून निघालों. त्यानें मानेनें नमस्कार स्वीकारला व हातानें आशीर्वाद दिला. हा अनुभव व ही दृष्टि अगोदर असती तर अस-ल्यांच्या संगतीचा खरा लाभ घेतां आला असता.

### फल्लाधार घाटी

सिंगोट पांच मैल, पण पोहोंचण्यास साडेतीन तास लागले. दोन मैलांचा खडा चढ चढून गेलें म्हणजे फल्लाधार घाटाचा माथा येतो. त्याची उंची सहा हजार फूट आहे. वाटेवर घनदाट झाडी आहे. सकाळची प्रशांत व आल्हादकारक वेळ, चढण्याच्या श्रमाचा ताप परिहार करून उत्साह वाढविणारी थंड हवा, चित्तवेधक वनश्रीचें वैभव, रानफुलांचा सौम्य गंध व मनाची प्रसन्नता अशा ह्या संवादी साधनसामुग्रीच्या मेळांत श्रोत्रेंद्रियेंच काय तीं उपाशीं राहात होतीं. पण जसजसें वर चढूं लागलों तसतसा एक अति कर्णमधुर शिळेचा आवाज ऐकूं येऊं लागला. प्रथम ही शीळ उच्च स्वरांत गेली म्हण-जेच तेवढी ऐकूं येई. कोणता पक्षी गातो आहे ही कल्पना होईना.

कान टवकारून सारखें तिकडे लागून राहिले होते. कांहीं वेळानें मधले स्वर ऐकूं येऊं लागले. तेव्हां आश्चर्य वाटलें कीं, पक्ष्यांना सुद्धां माणसासारख्या शिळा घालता येतात. हिमालयांत काय काय अज्ञात चिजा भरल्या आहेत, देव जाणें, अशी भावना झाली. आणखी कांहीं वेळानें संशय येऊं लागला कीं, हा कांहीं पक्षी नाहीं. कोणी तरी माणूस अलगूज किंवा तोंडानें शीळ वाजवीत असावा. पण शंका आली कीं, एवढ्या लौकर, थंडीचा व ह्या किर्र अरण्यांत माणूस कशाला येतो आहे ! माथा गांठीपर्यंत मधून मधून शीळ ऐकूं येई, पण माथा दृष्टीं समोर आला आणि ती कायमचीच बंद झाली. ह्या अनुकूल वातावरणांत आज प्रातःस्मरण, भूपाळ्या, गंगालहरी, महिम्न, अभंग वगैरे नित्यपाठ म्हणण्यास मोठा रंग आला. एवढा मोठा चढ चढलों पण श्रम वाटले नाहींत. चढतांना जितका आनंद वाटला तितकेंच दुःख उतरतांना झालें. वाटेवर खडे व कंकर इतके होते कीं, पावलागणिक मस्तकांत शिणीक निघे. शिवाय झाडीहि विरळ होऊन ऊन लागूं लागलें. सिंगोट येथें धर्मशाळा मोठी आहे. पाण्याची फारच गैरसोय. एकच बोटासारखी धार व तेथें सर्व चिखल व घाण. माशांचा उपद्रवहि मनस्वी. एकादशी होती. अल्पशी पोटपूजा करून लगेच पुढें निघालों. विशेष लक्षांत राहण्यासारखी गोष्ट म्हणजे येथें गाईचें उत्कृष्ट साजूक तूप बारा आणे शेरानें मिळालें.

### उत्तरकाशी येथील गंगापात्र

तिसरे प्रहरीं नाकोरी व रात्रीं आठचे सुमारास उत्तरकाशी येथें पोहोंचलों. नाकोरी येथें देवप्रयाग टेहरी धरासूकडून आलेला रस्ता मिळाला. येथें पुन्हां गंगाकांठीं आलों. डोंबारी रस्त्यावर खेळ करतांना बांबूच्या कैचीवर दोर ताणतात, त्याप्रमाणें गंगापार होण्यास केलेला येथें एक झूला दिसला. त्याला टांगून जाणें म्हणजे प्राणपणाच्या दिव्यांतूनच जाणें आहे. यात्रेकरूंस त्या कसोटीस लागण्याचें कारण नव्हतें. ती वाट इतरत्र गेली आहे. नाकोरीपासून गंगेचें पात्र मोठें, विस्तीर्ण व सपाटीचें आहे. एवढी मोठी सपाटी व पात्राचा विस्तार गंगेचाच काय पण शरयू, गंडकी, यमुना, काली, गोमती वगैरे हिमालयीन नद्यांचा कोठेंहि दिसला नाहीं. फल्लाधारपासून नाकोरीपर्यंत

सर्व उतारच आहे. उत्तरकाशीची उंची तीन हजार फूट असल्यामुळें एकदम उन्हाळा भासूं लागला. गंगाप्रवाह सपाटीवर असून संथ दिसतो. तरी पाण्यांत जाऊन स्नान करण्याची छाती होत नाहीं. ओढ आहेच. उत्तरकाशी नांव कानावर आलें म्हणजे सहजच वाटूं लागतें कीं, दक्षिणकाशी म्हणून आणखी एखादी काशी असली पाहिजे. हें वाटणें निरर्थक नाहीं. निदान चार काशी क्षेत्रें मीं प्रत्यक्ष पाहिलीं आहेत. तीं चार क्षेत्रें अशीः–(१) काशी बनारस, वाराणसी (२) उत्तरकाशी वर उल्लेख करीत असलेली हिमालयांत गंगोत्तरीचे वाटेवरील (३) गुप्तकाशी हिमालयांतच बदरीकेदारचे वाटेवर (४) दक्षिणकाशी कोल्हापूर, पैठण व पंढरपूर; हीं तिन्ही ठिकाणें दक्षिणकाशी म्हणून समजलीं जातात. ह्या चारींपैकीं मुख्य किंवा मूळची काशी जिला वाराणसी अथवा बनारस आपण समजतों तीच होय. वैदिक, पौराणिक, ऐतिहासिक कालाची तशीच साक्ष आहे. ह्या वाराणशी काशीचें माहात्म्य पुढील गोष्टींत दिसून येतें. हिचें धार्मिक अधिष्ठान, प्रदीर्घ आयुष्य, येथील श्रीविश्वेश्वराचा निवास, गंगा, वरुणा, असी ह्या नद्यांचा संगम, ( वरुणा आणि असी ह्यांच्या संगमावरूनच वाराणसी नांव पडलें आहे.) येथें गंगा उत्तरवाहिनी, म्हणजे स्वर्लोकाभिमुखी वहाणारी आहे. ती जणूं आपल्या माहेराकडे निघाली आहे. म्हणून ह्या माहेरवाशिणीचें विशेष माहात्म्य त्या ठिकाणीं मानलें गेलें आहे. अनेक ऋषि, मुनि, पुण्यात्मे ह्यांनीं आपल्या तपःसामर्थ्याचीं भर तिच्या पावित्र्यांत घातली आहे. ह्या सर्व कारणां-मुळें काशी ही पावित्र्याची साक्षात् मूर्तिच आहे, असें यच्चयावत् हिंदुमात्राच्या हाडीमांसीं खिळून बसलें आहे.

## उत्तरकाशी

उत्तरकाशीलाहि दैवयोगानें अशीच प्रभावळ लाभली आहे. आग्नेय दिशेनें उत्तराभिमुखी गंगा वहात आहे, उत्तरेकडून डोडीतालांतून निघणारी असीगंगा जवळच दोन तीन मैलावर गंगोरी येथें भागी-रथीस मिळते. पश्चिमेकडील वरुणावत पर्वतावरून निघालेली वरुण नदी येथें येऊन भागीरथीस मिळत आहे. हिच्या पंचक्रोशीस त्रिवेणी संगमाचें माहात्म्य लाभलें आहे. येथें विश्वेश्वराचें वास्तव्यहि आहे.

ह्या काशीला उत्तर उपपद लागून ही मूळची नव्हे असें दिसलें तरी ती हिमालयांतील तपोभूमींत आहे. तपोधन ऋषीमुनींच्या वास्तव्यानें ह्या क्षेत्राच्या पावित्र्यांत अधिकच भर पडली आहे. आजच्या स्थितींत वाराणसी काशीच्या बकाली अवस्थेंत गुरफटून गेलेल्या पावित्र्यापेक्षां उत्तर काशीच्या तपोभूमींत शुद्ध पावित्र्य निःसंशय अधिक आहे.

## दक्षिण काशी

एके काळीं आपण गंगा–यमुना–कांठीं होतों, तेव्हां काशी जवळ होती. पण दक्षिणेंत आल्यानंतर अंतर, खर्च, कष्ट, प्रवासाची गैरसोय व वाटेंतील असुरक्षितता ह्या कारणांनीं काशीचें दर्शन दुर्लभ होऊन गेलें. पण तिकडून इकडे येतांना बरोबर आणलेला तिजविषयींचा पवित्र भाव स्वस्थपणा वाटूं देईना. अशा स्थितींत इकडील जें पवित्र व प्रसिद्ध देवस्थान कोल्हापूर तेंच काशीच्या ठिकाणीं मानून त्यास दक्षिणकाशी समजूं लागलों. वाराणसी काशी हें विद्येचें माहेरघर समजलें जाई. त्याचप्रमाणें दक्षिणेंत पैठण समजलें जाई, म्हणून विद्येच्या दृष्टीनें पैठण हेंहि दक्षिण काशी झालें. काशीइतकेंच काय पण अधिकच माहात्म्य पंढरपूरचें झालें आहे. म्हणून पंढरपुरासच दक्षिणकाशी समजूं लागलों आहोत.

## उत्तरकाशी–गांव

उत्तरकाशीला सौम्य वाराणसी व बाडाहाट अशीं स्थानिक नांवेंहि आहेत. हा गांव डोंगरी वस्तीच्या मानानें मोठाच म्हणावा लागेल. तो भागीरथीच्या कांठीं वसला आहे. पन्नास पाऊणशें घरठाव आहे. दहा पंधरा दुकानांचा बाजार आहे. तालुक्याच्या गांवाप्रमाणें पोलीस, पटवारी, चौकी, दवाखाना, शाळागृह, जंगल खात्याची कचेरी, रहदारी बंगला वगैरे आहे. पण टपालगृह मात्र नाहीं. एका दुकानदाराकडे पत्राची पेटी आहे व त्याचेकडेच पत्रांचा बटवडा करण्याचें काम सोपविलें आहे. टेहरी संस्थानांतील कमळीवाल्यांच्या धर्मशाळांचें हें केंद्र आहे. त्यांच्या पांच सहा धर्मशाळा येथें आहेत. एक तर चारपांचशें माणसें मावतील एवढी मोठी आहे. ती चौसोपी असून त्यांत खोल्याहि आहेत. सदावर्त, औषधालयहि आहे. एकंदरींत गांव लहान दिसला तरी टुमदार व स्वच्छ आहे.

### आत्मानंद स्वामी

आजच्या काळींहि सर्वसंगपरित्याग करून उर्वरित आयुष्य तपाचरणांत किंवा ईश्वरसेवेंत घालविण्यासाठीं लोक तेथें जाऊन राहतात. ग्वाल्हेरचे एक नामांकित डॉक्टर अशा रीतीनें स्वामी होऊन तेथें राहिले होते. त्यांनीं आत्मानंद नांव घेतलें होतें. त्यांचा आम्हास जो अल्पस्वल्प सहवास घडला त्यावरून त्यांनीं घेतलेलें नांव यथार्थ होतें असें आढळून आलें. त्यांच्या सहवासांत राहिले तर निश्चित चांगलें मार्गदर्शन होईल अशी कल्पना होऊन त्यांस विचारलेंहि. त्यांची अडकाठी दिसली नाहीं. पण प्रवासाचा काळ बांधला गेला असल्यामुळें सवड काढणें स्वाधीन राहिलें नव्हतें.

### विश्वेश्वर व त्याचा त्रिशूळ

येथील मुख्य देवता म्हणजे विश्वनाथ. त्याचें दगडी देऊळ मोठें, जुनें पण चांगल्या स्थितींत आहे. शिखराची धाटणी बौद्ध पद्धतीची आहे. शिवलिंग हातभर घेराचें व तितक्याच उंचीचें काळ्या पाषाणाचें आहे. तें थोडें तिरकस बसलेलें आहे. गाभाऱ्यांत पांच दहा माणसें मावतील. चार दगडी खांबावर एक भलें मोठें चार घागरीचें अभिषेकपात्र कायमचेंच ठेवलेलें दिसलें. देवळासमोरच शक्तिदेवीचें मंदिर आहे व तेथेंच जवळ एक अजमासें दोन हात घेराचा व चौदा हात उंचीचा सुळका आहे. त्याच्या शेवटास तलवारीच्या आकाराचे दोन शूल आहेत. देव–दानव युद्धांतील हा शंकराचा त्रिशुळ असल्याची आख्यायिका सांगतात.

### ज्योतिर्मठ व कोटेश्वर मंदिर

ज्योतिर्मठ व कोटेश्वर असें एक जोड स्थान आहे. डावे हातास शंकराचार्यांचा जोतिर्मठ व उजवे हातास कोटेश्वर महादेव मंदिर आहे. मठांत संन्यासी राहण्याची सोय आहे. येथें संस्कृत पोथ्या, पुस्तकें व अध्ययनाची सोय दिसली.

### लक्षेश्वर महादेव

ह्याशिवाय दत्त, परशुराम, कालभैरव, गोपेश्वर, अन्नपूर्णा, एकादशरुद्र अशीं देवळें आहेत. एकादशरुद्र देऊळ जयपूरचे महाराजांनीं आपल्या लौकिकास साजेल असें प्रशस्त, सुंदर व यात्रीस उतरण्याच्या

सोयीचें बांधलें आहे. देवाच्या पूजेअर्चेची विशेष सोय केली आहे. येथून जवळच लक्षेश्वर महादेवाचें स्थान आहे. कौरवांनीं पांडवांना लाक्षागृहांत जाळून टाकण्याचा प्रयत्न केला तो येथेंच, अशी दंतकथा आहे.

### दैवयोग म्हणतात तो हा असा

कराचीवाल्यांचा त्रास चुकविण्यासाठीं अधिक चाल करण्याचे कष्ट सोसावे लागले खरें, पण त्यामुळें उत्तर काशीस लवकर पोहोंचून प्रदोषास उत्तरवाहिनी भागीरथी गंगेचें स्नान आणि विश्वनाथाची प्रदोषपूजा करण्याचा लाभ अनायासें व अकल्पित झाला. हाच दैवयोग.

### शंकराचार्य मठ

श्रीविश्वेश्वराचें दर्शन करून पहाटे पांच वाजतां उत्तरकाशीहून निघालों. तीन फर्लांगावर श्रीमत् आद्य शंकराचार्यांचें देऊळ लागलें. मूर्ति एक हात उंचीची, संगमरवरी, पद्मासनस्थ आहे. संन्याशांकरितां पंचवीस तरी खोल्या आहेत. हें स्थान डोंगर–पायथ्याशीं आहे. तेथें झऱ्याचें पाणी अक्षय्य वहात आहे. भोंवतींचीं झाडेंझुडें हिरवींगार आहेत. समोरून भागीरथी वहात आहे. दर्शन घेऊन संन्यासाश्रम पाहिला. तेथें बऱ्याच स्वामींचें वास्तव्य दिसलें. ते उदरंभरी वृत्तीचे नसून वैराग्य वृत्तीचे अभ्यासू दिसले. त्यांनीं आम्हांस आश्रम दाखविला पण आम्ही कोण, कोठले, ही चौकशीसुद्धां केली नाहीं, किंवा आश्रमाचे साहाय्यास्तव विनंतिपत्र, उद्देशपत्रक पुढें केलें नाहीं.

### डोडीताल

निघाल्यापासून तीन मैलावर गंगोरी चट्टी आहे. येथून उत्तरेस सोळा सतरा मैलावर दहा हजार फूट उंचीला एक डोडीताल नांवाचें सरोवर आहे. तें बर्फाच्छादित डोंगरामध्यें असून त्याचा घेर दोन मैल येईल. गंगोरीपासून सरोवरापर्यंत वाट चांगली आहे. निसर्गाच्या घटनेंत सहज उत्पन्न झालेलीं असलीं अगणित स्थानें हिमालयांत जागजागीं विखुरलेलीं आढळतात. तीं स्वभावतःच रम्य, आणि म्हणूनच प्रेक्षणीय आहेत. हिमालयाच्या भव्यपणांत असल्या रम्य घटनांनीं भर घालून त्याचें वैभव अधिकच वाढविलें आहे.

ह्या वैभवांतच परमेश्वराच्या अनंतगुणांचें यथार्थ दर्शन होत

असतें. देवाच्या द्वारींच्या वाटेवरील असल्या उद्बोधक निर्मिति पाहिल्याशिवाय यात्रेंतील इष्ट देवतेचें खरें दर्शन घडत नाहीं. असल्या प्रत्यक्ष गुणदर्शनानेंच अंधश्रद्धा नाहींशी होऊन निष्ठा वाढते. हिमालयांतील यात्रा करतांना हा हेतू दृष्टीआड केल्यास यात्राफल-प्राप्तींत मोठेंच वैगुण्य राहील. ह्या दृष्टीनें डोळे उघडे ठेवून संधि मिळेल तेथें डोकावून त्याच्या विभूतिमत्वाचें दर्शन घेत घेत इष्ट स्थळीं पोहोंचावें. ह्या सरोवरासारखींच आणखी दोन सरोवरें वाटेंत पुढें लागणारीं आहेत. ह्यांपैकीं एखादें तरी अवश्यमेव पाहिल्या-शिवाय राहूं नये.

गंगोरी येथें डोडीतालांतून निघालेली असिगंगा भागीरथीस येऊन मिळते. गंगोरीपासून तीन मैलांवर नैताला व पुढें चार मैलांवर मणेरी चट्टी आहे. मणेरीची उंची ४३८० फूट आहे. उत्तरकाशी-पासून येथपर्यंतच्या दहा मैलांत चढ असला तरी तो एकदम असा कोठेंच नाहीं. चालतांना तो कळूनहि येत नाहीं. ह्यापैकीं पाऊण वाट एखाद्या उद्यानास शोभा आणील अशीच आहे. चांगला रस्ता, सभोंवती हिरवीगार झाडी, डोक्यावर तिचीच दाट छाया आणि एका बाजूनें खळाळून वाहणारा भागीरथीचा अफाट प्रवाह अशा परिस्थितींत प्रवासाचे कष्ट लक्षांत सुद्धां आले नाहींत. पण अवशेष मार्ग मात्र उन्हाचा मारा खात करावा लागला. उत्तरकाशीस असलेलें गंगेचें संथ स्वरूप जाऊन येथें तें उग्र झालें. येथें उतरण्याची सोय चांगली आहे. स्नान–संध्या–भोजनादि उरकून संध्याकाळचे वस्तीकरितां सात मैलावर मल्लाचट्टीवर आलों.

## मल्लाचट्टी

मल्लाचट्टी तिकांड्यावर आहे. उत्तर काशीहून आलेल्या रस्त्यास येथें दोन फाटे फुटतात. पैकीं एक उत्तरेकडील गंगोत्तरीस व दुसरा आग्नेय दिशेनें बुढ्ढा केदार, पवाली, त्रिजुगीनारायणावरून बदरी केदारास जातो. येथून गंगोत्तरी चाळीस व बदरी केदार ऐंशी मैल आहे. गंगोत्तरी करून बदरी केदारास जावयाचें असेल त्यांस येथें परत येऊन मग बदरी केदारचे वाटेस लागावें लागतें. सिमली, गंगाणीप्रमाणेंच अनावश्यक सामान येथें फुकट व बिनघोर ठेवतां येतें.

मल्लाचट्टी भागीरथीच्या अगदीं कांठावर पण पात्रापासून तीस चाळीस फूट उंचावर आहे. पाण्यापाशीं जाण्यास पायऱ्या आहेत. त्या लोखंडी चक्री जिन्यासारख्या अगदींच अरुंद असून टीचभरसुद्धां उंचीच्या नाहींत. त्यावरून उतरणें फारच धोक्याचें वाटतें. मल्लाचट्टीस पोहोंचण्यास आम्हांस तिनीसांजा होऊन गेल्या होत्या. संध्येकरितां म्हणून भीत भीत पायऱ्या उतरून पाण्यापासून हात सव्वाहात उंचीला बसलों. पण लाटा एवढ्या मोठ्या येत कीं, माझ्या पायाशीं पाणी येई. प्रवाहाचा आवाजहि गर्जून चालला होता. त्यामुळें बिचकून गेलों व वर येऊन संध्या पुरी केली.

भटवाडी

नेहमींप्रमाणें लौकर निघून उजाडावयास दोन मैल भटवाडीस आलों. हें गांव टेहरी संस्थानांतील आहे. वस्ती थोडीच आहे. धर्मशाळा चांगली पण पाणी जवळ नाहीं. शिवाय भोंवतीं घाण फार. ह्यांस गांवकऱ्यांबरोबर यात्रीहि तितकेच दोषी आहेत. आरोग्याकडे बघण्याची संस्थानची वहिवाटच नसावी असें दिसतें. यमुनोत्तरीच्या वाटेवर एक गाढव मरून कुजत पडलेलें असें आम्हांस जातांना दिसलें होतें. तें परत येतांनाहि तेथें तसेंच कुजत पडलेलें होतें ! पण कोल्ह्याकुत्र्यांनीं व कावळ्यांनीं त्याचें विच्छेदन करून लचके तोडण्याचें काम चालविलेले होते, एवढाच पालट. ब्रिटिश राज्यांतील चट्ट्यांवर पाणी व शौच्याच्या जागा ह्याविषयीं खरोखरीच वाखाणण्यासारखी स्वच्छता राखण्याची दक्षता बाळगलेली अनुभवास येते.

बोजेवाले यांची नोंद

भटवाडीस बोजेवाल्यांची नोंद करण्याचा अड्डा—कचेरी आहे. अशा तऱ्हेचा नोंदणीचा अड्डा 'मुनीकी रेती' येथेंहि आहे. पण जे यात्री त्या वाटेनें जात नाहींत त्यांच्या बोजेवाल्यांची नोंद येथें होते. त्यांत त्यांचे नांव, पत्ता, कराराच्या अटीस मान्यता अशी नोंद असते. बहुतेक बोजेवाले—गढवाली संस्थानचे रहिवाशी असतात. यमुनोत्तरी व गंगोत्तरी हीं दोन्हीं स्थानें संस्थानचे सीमेंतच आहेत, म्हणून ही नोंद होऊं शकते. बदरी केदार व बदरी नारायण हीं देवस्थानें ब्रिटिशांचे राज्यांत होतीं तेव्हां तेथें अशी नोंदणी पध्दति नव्हती. त्या

नोंदणीपासून यात्रीला एक अप्रत्यक्ष लाभ होतो. बोजेवाल्याचा ठावठिकाणा, ओळखपाळख नोंदली गेल्यामुळें वाटेंत जर कांहीं अडवाआडवी, फसवाफसवी, चोरीमारी करून तो पळून गेला तर त्याचा शोध लागण्याचे कामीं नोंदणी हें एक चांगलें साधन आहे. त्या नोंदणीचें दडपण बोजेवाल्यांचे मनावर सदैव असतें आणि त्यामुळें ते चांगलेच वचकून असतात. असें असलें तरी प्रत्यक्ष प्रसंगांत यात्रीला त्याचा कितीसा उपयोग होईल ह्याची शंकाच वाटते. त्यांची ही नोंदणी यात्रींच्या सोयीपेक्षां संस्थानच्या उत्पन्नाकरितांच झालेली आहे. रुपयास एक आणा याप्रमाणें बोजेवाल्यांशीं ठरलेल्या हमालींतून संस्थान कर वसूल करून घेते. तो कर यात्रीवर पडत नाहीं.

### गढवाली बोजेवाल्यांचा प्रामाणिकपणा

वास्तविक गढवाली बोजेवाल्यांबद्दल अप्रामाणिक, गैरविश्वासू, लबाड अशी नुसती शंका घेणें हें सुद्धां पापच समजलें पाहिजे. त्यांनीं आपल्या विश्वासू बाण्याची परंपरा अखंड राखली आहे. सुमारें पासष्ट वर्षांपूर्वीं माझ्या आजी ह्या यात्रेस जाऊन आल्या, पंचेचाळीस वर्षांपूर्वीं माझे चुलते जाऊन आले व पंधरा वर्षांपूर्वींचा माझा अनुभव ह्या सर्वांचा एकच निर्वाळा कीं, हे बोजेवाले निरक्षर आहेत, दरिद्री आहेत, त्यांना कायदेबाजपणा माहीत नाहीं, हे भोळे आहेत, अल्पसंतोषी आहेत, त्यांच्यांत महत्त्वाकांक्षा जागृत झालेली नाहीं, वगैरे आधुनिकांस वाटणारे सगळे दोष त्यांच्यांत आहेत, असें मानलें तरी ते निरपवाद विश्वासू, जिवास जीव देणारे, एकनिष्ठ सेवक आहेत. त्यांच्या जीवावरच ह्या दुर्गम यात्रा पार पडतात. त्यांचे श्रम पाहिले म्हणजे आपण त्यांना जें कांहीं देतों तें त्यांच्या श्रमाच्या मानानें कांहींच नाहीं, असें आपणांस कळून चुकतें. प्रत्येक यात्री आपल्या सामर्थ्याप्रमाणें त्यास बक्षिशी देतो व तेहि मिळेल तेवढ्यांत संतोष मानतात.

### पाच वाचवितां पंचवीस जातात

गंगोत्तरीस जाऊन आम्ही भटवाडीस परत आलों, तेव्हां तेथें आम्हांस रांचीवाल्यांचा जथा भेटला. तो तीन दिवस तेथें अडकून पडला होता. कारण काय तर त्यांनीं स्वस्ताईचे नेपाळी बोजेवाले केले होते.

नोंदणीचा कर देण्याचें बोजेवाल्यांनीं नाकारलें व रांचीवालेहि कबूल होईनात. विसार पदरांत पडला होता तेवढ्यावर समाधान मानून कांहीं बोजेवाले काम सोडून निघून गेले. तेथें नवीन गढवाली बोजेवाले त्यांना मिळाले, पण त्यांना सरकारानें ठरविलेल्या भावाप्रमाणें पैसे देण्याचें कबूल करावें लागलें. पुन्हां अडचण उत्पन्न झाली. जे हरद्वारपासून आले त्यांना कमी भावानें व जे येथून नवीन घेतले त्यांना अधिक भावानें ही विसंगती व जे सोडून गेले होते त्यांपैकींच कांहीं सरकारच्या वतीनें पण चढ्या भावानें घेतले गेले, ह्या कारणांनीं बाकीच्यांनींहि काम सोडलें. एवंच पांचांत भागलें असतें तेथें पंचवीस अधिक द्यावे लागले. शिवाय चारपांच दिवस पदरचें खाऊन, न देवाय, न धर्माय, माशा मारीत दिवस काढावे लागले ते वेगळेच. ह्या जथ्यांतील जे यात्री चाणाक्ष होते त्यांनीं कर भरून आपला रस्ता त्याच दिवशीं सुधारला. त्यामुळें रांचीवाल्यांचा जथा फुटला आणि इतर यात्रींस होणारा त्रास आपोआप चुकला.

### भटवाडी ते गंग्णाणी


भटवाडीहून गंग्णाणी नऊ मैल आहे. वाट बरी आहे. पोहोंचण्यास साडेचार तास लागले. वाटेंत सहा मैलांवर भुक्की चट्टी लागली. येथेंच थांबण्याचा बेत होता. पण आज आभाळांत मळभ होतें, हवाहि चालू होती, उन्हाचा ताप मुळींच वाटत नव्हता किंवा चढहि जाणवत नव्हते. पुढची चट्टी गंग्णाणी. तीहि अवघी तीन मैलावर होती. पोहोंचण्याइतका दिवसहि पाठीवर राहिला होता. बोजेवाले मागेंच राहिलेले असावयाचे, पण तेहि येथें येऊन पोहोंचले होते. शिवाय वाटेचें स्वरूप मोठें रम्य व प्रेक्षणीय दिसत होतें. नाटकांच्या पडद्यावर किंवा दिनदर्शिकांच्या मथळ्यावर डोंगर, पर्वत वा प्रवाहयुक्त वनश्रींचीं काल्पनिक चित्रें काढितात अगदीं त्याप्रमाणें रेखीव, विविध रंगांत शोभून दिसणारे आकर्षक देखावे, ते कल्पनाजन्य नव्हेत, तर सत्यसृष्टींतील देखावे पुढें उभे होते. ह्या मोहानें बेत बदलला. बोजेवाल्यांनींहि नकार दाखविला नाहीं, म्हणून न थांबतां झूला पार होऊन मार्गस्थ झालों.

### भागीरथीचे पहाड

भुक्कीपासून गंग्णाणीपर्यंतच काय पण पुढेंहि लोहारीनाग चार



देवद्वार राई हरशिल पान १३२



उत्तरकाशी मंदिर, धर्मशाळा पान १०९



वाष्प कुंड यमुनोत्तरी पान ९२



गंगोत्तरी मंदीर पान १४६

मैल, सुक्खी पांच मैल, झाला तीन मैल व हर्शील अडीच मैल, येथपर्यंत ही सर्व वाट गंगेच्या अगदीं कांठाकांठानें गेलेली आहे. दोन्ही कांठीं पहाड इतके उंचच उंच आहेत कीं सकाळीं नऊ दहा वाजेपर्यंत उन्हाचा एकहि किरण आंत येत नाहीं. दोन्हीं कांठच्या पहाडांतील अंतर पायथ्याशीं गंगाप्रवाहांपेक्षां अधिक नाहीं. त्यामुळें प्रवाहपात्राचा फार मोठा संकोच होऊन गेला आहे. ह्या अंतरावरील पहाडांचे प्रकार विविध आहेत. त्यांत मातीगोटे मिश्रित आहेत, पाटांस पाट टेकून ओळ लावावी त्याप्रमाणें दोन दोन तीन तीन पुरुष उंचीच्या फरशांच्या ओळींचे थरावर थर लागलेले आहेत, ठिसूळ, मुरमी अथवा बादड दगडाचे आहेत. त्याचप्रमाणें कानेकोपरे असलेले एकजीवी कडक दगडाचेहि आहेत. अभ्रक मिश्रण तर यथास्थित आहेच. कांहीं ठिकाणीं पायथ्यापासून माथ्यापर्यंत चढून जाता येईल असे उताराचे तर बऱ्याच ठिकाणीं तुटलेल्या कड्याप्रमाणें आहेत. ह्या डोंगराच्या कडेवरून गेलेली वाट ही कांहीं पायथ्यानें गेलेली नाहीं किंवा माथ्यावरून गेलेली नाहीं. ती अधून मधूनच चढउतार करीत करीत वळणावळणानें गेलेली आहे. वाटेची रुंदी दोन हातापेक्षां अधिक कोठेंच नाहीं. पण कित्येक ठिकाणीं ती पुरी हातभरसुद्धां नाहीं. ह्याच कारणामुळें यमुनोत्तरी गंगोत्तरीकडे घोडा, गाढव, खेचर ह्यावरून वाहतूक होऊं शकत नाहीं. अशा ठिकाणीं दाण्डी, कंडी, झंपानमधून जाणारांना खालीं उतरून पायींच चालावें लागतें. अन्य गतिच नसते. खालीं पाहावें तों खोल गंगाप्रवाह व वर पाहावें तों गगनास जाऊन भिडलेले डोंगर. अशा स्थितींत वाट भयप्रद वाटली तर आश्चर्य कसले ? पण वाटेवरून घसरून किंवा तोल जाऊन पडल्याची बोलवा कानीं नाहीं. एक दोन वेळ असल्या वाटेवरून जाण्याचा प्रसंग आला म्हणजे दृष्टि मरते; आणि भयभीति मावळून जाते. शिवाय हे पहाड नखशिखांत लहान मोठ्या झाडाझुडांनीं गच्च भरून गेलेले आहेत. त्यामुळें त्यांचें उग्र व भेसूर स्वरूप झाकलें जाऊन त्यांस मार्दव आले आहे. म्हणून वाटेवरून चालतांना डोळे फिरत नाहींत.

### गंगेचें चित्रमय स्वरूप

ठिसूळ किंवा मातीमिश्रित डोंगरावर झाडेंझुडें उगवलेलीं असलीं

तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. पण ती जेव्हां खडकांत आणि ती सुद्धां वारेमाप व ताडामाडापेक्षांहि उंचच उंच उगवलेलीं पाहावीं तेव्हां मोठाच विस्मय वाटतो. हीं झाडें बहुतेक देवद्वार जातीचीं, सुरूच्या झाडासारखीं दिसणारीं किंवा चीड वृक्षाच्या जातीचीं असतात. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे तीं डोंगरकडेच्या उभ्या भिंतीतून सुद्धां उगवलेलीं आहेत. ह्या चार धामांच्या मार्गांत आम्हांस कोठेंहि वट, पिंपळ वा तत्सम जातीचीं, व इतर कवठ, चिंच, बाभूळ, सागवान, बोर असली आपल्याकडे नेहमीं आढळणाऱ्या जातीची झाडें दिसलीं नाहींत. निवडुंगहि दिसला नाहीं.

प्रवाहाचें स्वरूप प्रत्येक दृष्टीटप्प्यास बदललेलें दिसत असें. कोठें संथ गंभीर दिसें, तर कोठें तो खळाळीनें वहात आलेला दृष्टीस पडे. तसेंच कोठें कोठें भरतीच्या लाटांप्रमाणें उचंबळून व अतिशय वेगानें वाहणारा प्रवाह पाहावयास सांपडे. हाच उचंबळलेला प्रवाह गंग्णाणी व सुक्खी ह्यांचे आसपास, सांगितलें तर खरेंहि वाटणार नाहीं इतका कालव्यासारखा अरुंद झाला आहे. तेथील कांठच्या गगनभेदी पर्वत-उंचीमुळें तो तसा अधिकच दिसतो हें खरें असलें तरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, एखादा काळवीट ह्या कांठावरून त्या कांठावर सहजीं उडी मारून जाईल. काळवीट २५–३० फूट लांब उडी मारतो असें वाचलें आहे. हर्शीलजवळ तेंच पात्र अफाट झालें आहे. तेथें तें उत्तरकाशीपेक्षां रुंदीस अधिक, पण लांबीस तोकडें भरेल. प्रवाह केवढाहि व कसाहि असो त्याची जोराची वहाळ आणि ओघांत आडवे आलेले व दोन्ही कांठांवरील खडक ह्यावर होणारी त्याची आदळ-आपट ह्यामुळें कल्लोळ माजून त्याचा घोष प्रतिघोष सारखा चालू असतो. त्यांनीं तेथील वातावरण अक्षयीचेंच दुमदुमून भरलेलें असते. पाण्याच्या आदळआपटींत उडालेल्या तुषारांवर दोन प्रहरचें ऊन पडून सप्तरंग नाचत असलेले दिसतात. हें दृश्य मोठें रमणीय वाटतें. चांगलें ऊन असेपर्यंत हा देखावा टिकतो.

गंगा प्रवाहाला मधून मधून कोठें डावीकडून तर कोठें उजवीकडून लहान मोठे प्रवाह येऊन मिळालेले आहेत. त्यांपैकीं नजरेंत भरण्या-सारखे दोन प्रवाह आहेत. पैकीं एक भुक्खी पासून जवळच दीना

नदीचा व दुसरा पुढें एक मैलावर ' कुला ' नदीचा. ह्या दोन्ही नद्या जवळच उगम पावून वाटेंत आडव्या येऊन गंगेस मिळतात. नद्यांच्या मानानें त्यांवरील हंगामी पूल–साकव, धोक्याचे वाटतात. गंगामाईच्या प्रवाहास नीट समोर धोपट मार्ग मिळाला नाहीं. पहाडांनीं जागजागीं तिचा मार्ग रोखून धरल्याकारणानें विस्तार आवरून घेऊन वळणें घेत घेत तिला आपला मार्ग काढून घ्यावा लागला आहे. परंतु माणुसकी सोडून धटिंगणासारखें वाटेंत आडवे आलेल्या पत्थरांच्या पाठीवर मात्र तडाखे मारमारून तिला आपली वाट मोकळी करून घ्यावी लागली आहे.

## विश्व – रंगशाळा

अशा प्रकारच्या नैसर्गिक साहित्य संभारांत यदृच्छा उत्पन्न झालेले सृष्टिशोभेचे रम्य व चित्रमय देखावे ह्या दहा पंधरा मैलांत ओतप्रोत भरून राहिले आहेत. येथील गंगेच्या वैभवाचें ऐश्वर्य येणाऱ्या जाणाऱ्या साध्यासुध्या यात्रींच्या सुद्धां लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं. कोणी कलावंत चितारी ह्या परिसरांतील विविध दृश्यें पाहील तर तो आपली गंगोत्तरी येथेंच समजून तळ ठोकील. निर-निराळ्या दृष्टिकोनानें हे देखावे पाहतांना त्याच्या प्रतिभेला भरती येऊन तो प्रेक्षणीय असे एकाचे एकवीस विश्वामित्री देखावे चिता-रून आपल्यापुढें ठेवील. चित्रणाकरितां विविध प्रकारच्या नैसर्गिक देखाव्यांचे असंख्य नमुने येथें त्यास आयते मिळतील. अशी ही विश्वरंगशाळा आहे.

आम्ही ह्या वाटेनें गेलों तेव्हां संध्याकाळचा निस्तेज प्रकाश होता व परत आलों तेव्हां पहाटेचा झुंजूमुंजू प्रकाश होता. ह्यामुळें दोनहि वेळां सुप्रकाशाभावीं छायाचित्रें चांगलीं घेतां आलीं नाहींत. सर्वच यात्राप्रवासांत अनेक वेळां अशा प्रकारचे .निराशा पत्करण्याचे प्रसंग आले.

## गंगणाणी

येथपर्यंत गंगेच्या डाव्या कांठानें आलेली वाट डोंगरकडेनें तशीच पुढें गेली आहे. गंगणाणी येथें डाव्याकांठीं एखादी चट्टी उभारता येईल एवढीसुद्धां सपाटी नाहीं. उजव्याकांठीं दोन चट्ट्यांपुरती

सपाटी आहे. तेथें त्या कांठीं जाण्याकरितां पक्का झुला आहे. चट्टी-शेजारीं उंच डोंगरकड्यावरून एक धबधबा सरळ खालीं पडत आहे. त्याचें बर्फाचें पाणी गार ठणक व भिंगासारखें स्वच्छ आहे. उत्तर-काशीपासून गंगेचें पाणी अगदी गढूळ व राखट रंगाचें झालेलें होतें. येथील उंची सव्वा सहा हजार फुटाजवळ आहे. उंचीमुळें हवेंत चांगलाच गारवा आहे. आणि त्यांत धबधब्याच्या तुषारांची भर पडून गारठा वाढला आहे. कोरडी थंडी अर्थात् पाच ते सात हजार उंचीपर्यंतची उत्साहवर्धक वाटते. पण तीच जर आर्द्र असेल तर ती अंगास झोंबू लागून असह्य होते.

ऋषिकुंड व गंगामाईच्या माहेरवाशीणी

गंग्णाणी चट्टीचे अलीकडे अर्धा मैल, वाटेवरच एक पाण्याची मनगटाएवढी धारा डोंगरांतून दोन पुरुष उंचीवरून अक्षय्य पडत आहे. तिचें पाणी थंडीच्या दिवसांत आंघोळीस घेववेल इतकें कढत असतें. वरच्या बाजूस डोंगरांत ऋषिकुंड, म्हणून एक तप्तकुंड आहे. त्याला तीर्थमाहात्म्य आहे. सर्व यात्री तेथें जाऊन स्नान करितात. ह्या यात्रेंतील चारहि धामांच्या वाटेवर किंवा ठिकाणीं उष्णोदक कुंडें आहेत. त्यांचा उपयोग सर्वच सुवासिनींना चांगला होतो. त्यांतलें त्यांत महाराष्ट्रीय सुवासिनींना विशेष होतो. इतर प्रांतीय बायका तीर्थाच्या ठिकाणीं तरी डोक्यावरून स्नान करितात. पण महाराष्ट्रीय बायका करीत नाहींत. न्हाण्याच्या वेळेस तेवढें त्या डोकीवरून स्नान करितात व तेंहि ऊन पाण्यानें. प्रवासांत ऊन पाणी मिळण्याची सोय जमत नाहीं. त्यामुळें चार धामांचा ठिकाणच्या उष्णोदकानें दहा पंधरा दिवसांचे अंतरानें तरी त्यांची डोकीवरून स्नान करण्याची सोय अनायासें होते. सर्वच स्त्रिया त्या गंगामाईच्या लेकी आहेत. स्वर्गांतून शंकर-स्वरूपी हिमालयाच्या माथ्यावर अवतरलेली गंगा तेथून सात धारांनीं पुढें वहाते. त्यांपैकीं चार धारा चार धामाहून निघाल्या आहेत. त्या दृष्टीनें कोणत्याहि धामीं गेलें तरी बायकांचें तें माहेरच होतें. माहेरी आईचा जिव्हाळा. न्हाऊ माखू घालण्यास मनसोक्त ऊन पाणी मिळावयाचेंच !

ऋषिकुंडाजवळ वस्तीची सोय नाहीं. गंग्णाणीहूनच तेथें जाऊन

यावें लागतें. कुंडांतील वाहून जाणारें पाणी धारेनें वाटेचे कडेस व तेथून तें खालीं गंगापात्रांत पडतें. येथें पोहोंचलों तेव्हां संध्याकाळ झाली म्हणून आणि पुढें निघालों तेव्हां उजाडलें नव्हतें म्हणून दोन्ही वेळां ऋषिकुंडांतून पडणाऱ्या धारेवरच स्नानसंध्यादि करावें लागलें. ऋषिकुंडावर जातां आलें नाहीं ह्या स्थानाची माहिती अगोदर असती तर योग साधता आला असता.

उष्ण–जल–धारा–स्नान

गंग्णाणीहून पूर्व संकेतानुसार नित्याच्या वेळेपेक्षां तासभर आधीं निघून अर्धा मैल परत मार्गीं ऋषिकुंड–उष्णोदक–धारा पडत आहे तेथें स्नानाकरितां आलों. बोजेवाल्यास त्यांची वेळ झाली म्हणजे पुढें जाण्यास आधींच सांगून ठेविलें होतें. पहाटेची वेळ, मसूरीच्या थंडीचा भास होत होता. शिवाय हवेंतील गारठाहि अंगास झोंबत होता. तरी बरें, वारा सुटण्यास अवकाश होता. नाहीं तर अंघोळीचा बेत सोडूनच द्यावा लागला असता. अशा वेळीं कढत पाण्यानें शेकत शेकत केलेल्या स्नानाचा आल्हाद स्वानुभवानेंच कळणारा आहे. लिहिण्यानें त्याची खरीखुरी गोडी आणून देतां येत नाहीं. सौभाग्यवतीनें न्हाऊन घेतलें. दिवाळींत नर्कचतुर्दशीच्या दिवशीं पहाटेस अभ्यंग स्नान करावें तसें वाटलें, मात्र त्यांत अभ्यंग नव्हतें. तरी ऊन पाणी मनसोक्त होतें. घरीं त्या दिवशीं पाणी हवें तेवढें असलें तरी तपेल्या भरभरून अंगावर घेतांना हात दुखून येऊन स्नान आटोपतें घ्यावें लागतें. धारेखालीं स्नान असल्यामुळें तसें येथें झालें नाहीं. ऊन पाण्याची धारा सारखी अंगावर पडत होती. धारेखालीं हात, पाय, पाठ, पाहिजे तशी सरकवून यथेच्छ शेकून घेतलें. धारेच्या सुखावह माऱ्यानें चेपून घेतल्याप्रमाणें सर्व अंग मोकळें होऊन हलकें झालें. हिमालयांतील यात्रांत आम्हांस निदान आठ निरनिराळ्या ठिकाणीं ऊन पाणी भेटलें. पण त्यांत येथल्याप्रमाणें उष्ण–जल–धारा–स्नान लाभण्याची सोय कोठेंहि नव्हती. प्रत्येक ठिकाणचें वैशिष्ठ्य कांहीं तरी वेगळें असतेंच.

लोहारी नाग व सुक्खी

गंग्णाणीपासून सुक्खी नऊ मैल आहे. वाटेंत चार मैलावर लोहारी-नाग लागतें. गंग्णाणीस झूला ओलांडून डावे कांठानें चाललें म्हणजे

सपाटी आहे. तेथें त्या कांठीं जाण्याकरितां पक्का झुला आहे. चट्टी-शेजारीं उंच डोंगरकड्यावरून एक धबधबा सरळ खालीं पडत आहे. त्याचें बर्फाचें पाणी गार ठणक व भिंगासारखें स्वच्छ आहे. उत्तर-काशीपासून गंगेचें पाणी अगदी गढूळ व राखट रंगाचें झालेलें होतें. येथील उंची सव्वा सहा हजार फुटाजवळ आहे. उंचीमुळें हवेंत चांगलाच गारवा आहे. आणि त्यांत धबधब्याच्या तुषारांची भर पडून गारठा वाढला आहे. कोरडी थंडी अर्थात् पाच ते सात हजार उंचीपर्यंतची उत्साहवर्धक वाटते. पण तीच जर आर्द्र असेल तर ती अंगास झोंबू लागून असह्य होते.

### ऋषिकुंड व गंगामाईच्या माहेरवाशीणी

गंग्णाणी चट्टीचे अलीकडे अर्धा मैल, वाटेवरच एक पाण्याची मनगटाएवढी धारा डोंगरांतून दोन पुरुष उंचीवरून अक्षय्य पडत आहे. तिचें पाणी थंडीच्या दिवसांत आंघोळीस घेववेल इतकें कढत असतें. वरच्या बाजूस डोंगरांत ऋषिकुंड, म्हणून एक तप्तकुंड आहे. त्याला तीर्थमाहात्म्य आहे. सर्व यात्री तेथें जाऊन स्नान करितात. ह्या यात्रेंतील चारहि धामांच्या वाटेवर किंवा ठिकाणीं उष्णोदक कुंडें आहेत. त्यांचा उपयोग सर्वच सुवासिनींना चांगला होतो. त्यांतलें त्यांत महाराष्ट्रीय सुवासिनींना विशेष होतो. इतर प्रांतीय बायका तीर्थाच्या ठिकाणीं तरी डोक्यावरून स्नान करितात. पण महाराष्ट्रीय बायका करीत नाहींत. न्हाण्याच्या वेळेस तेवढें त्या डोकीवरून स्नान करितात व तेंहि ऊन पाण्यानें. प्रवासांत ऊन पाणी मिळण्याची सोय जमत नाहीं. त्यामुळें चार धामांचा ठिकाणच्या उष्णोदकानें दहा पंधरा दिवसांचे अंतरानें तरी त्यांची डोकीवरून स्नान करण्याची सोय अनायासें होते. सर्वच स्त्रिया त्या गंगामाईच्या लेकी आहेत. स्वर्गांतून शंकर-स्वरूपी हिमालयाच्या माथ्यावर अवतरलेली गंगा तेथून सात धारांनीं पुढें वहाते. त्यांपैकीं चार धारा चार धामाहून निघाल्या आहेत. त्या दृष्टीनें कोणत्याहि धामीं गेलें तरी बायकांचें तें माहेरच होतें. माहेरी आईचा जिव्हाळा. न्हाऊ माखू घालण्यास मनसोक्त ऊन पाणी मिळावयाचेंच !

ऋषिकुंडाजवळ वस्तीची सोय नाहीं. गंग्णाणीहूनच तेथें जाऊन

यावें लागतें. कुंडांतील वाहून जाणारें पाणी धारेनें वाटेचे कडेस व तेथून तें खालीं गंगापात्रांत पडतें. येथें पोहोंचलों तेव्हां संध्याकाळ झाली म्हणून आणि पुढें निघालों तेव्हां उजाडलें नव्हतें म्हणून दोन्ही वेळां ऋषिकुंडांतून पडणाऱ्या धारेवरच स्नानसंध्यादि करावें लागलें. ऋषिकुंडावर जातां आलें नाहीं ह्या स्थानाची माहिती अगोदर असती तर योग साधता आला असता.

## उष्ण–जल–धारा–स्नान

गंग्णाणीहून पूर्व संकेतानुसार नित्याच्या वेळेपेक्षां तासभर आधीं निघून अर्धा मैल परत मार्गीं ऋषिकुंड–उष्णोदक–धारा पडत आहे तेथें स्नानाकरितां आलों. बोजेवाल्यास त्यांची वेळ झाली म्हणजे पुढें जाण्यास आधींच सांगून ठेविलें होतें. पहाटेची वेळ, मसूरीच्या थंडीचा भास होत होता. शिवाय हवेंतील गारठाहि अंगास झोंबत होता. तरी बरें, वारा सुटण्यास अवकाश होता. नाहीं तर अंघोळीचा बेत सोडूनच द्यावा लागला असता. अशा वेळीं कढत पाण्यानें शेकत शेकत केलेल्या स्नानाचा आल्हाद स्वानुभवानेंच कळणारा आहे. लिहिण्यानें त्याची खरीखुरी गोडी आणून देतां येत नाहीं. सौभाग्यवतीनें न्हाऊन घेतलें. दिवाळींत नर्कचतुर्दशीच्या दिवशीं पहाटेस अभ्यंग स्नान करावें तसें वाटलें, मात्र त्यांत अभ्यंग नव्हतें. तरी ऊन पाणी मनसोक्त होतें. घरीं त्या दिवशीं पाणी हवें तेवढें असलें तरी तपेल्या भरभरून अंगावर घेतांना हात दुखून येऊन स्नान आटोपतें घ्यावें लागतें. धारेखालीं स्नान असल्यामुळें तसें येथें झालें नाहीं. ऊन पाण्याची धारा सारखी अंगावर पडत होती. धारेखालीं हात, पाय, पाठ, पाहिजे तशी सरकवून यथेच्छ शेकून घेतलें. धारेच्या सुखावह माऱ्यानें चेपून घेतल्याप्रमाणें सर्व अंग मोकळें होऊन हलकें झालें. हिमालयांतील यात्रांत आम्हांस निदान आठ निरनिराळ्या ठिकाणीं ऊन पाणी भेटलें. पण त्यांत येथल्याप्रमाणें उष्ण–जल–धारा–स्नान लाभण्याची सोय कोठेंहि नव्हती. प्रत्येक ठिकाणचें वैशिष्ठ्य कांहीं तरी वेगळें असतेंच.

## लोहारी नाग व सुक्खी

गंग्णाणीपासून सुक्खी नऊ मैल आहे. वाटेंत चार मैलावर लोहारी-नाग लागतें. गंग्णाणीस झूला ओलांडून डावे कांठानें चाललें म्हणजे

दोन मैलांवर पुन्हां पूल ओलांडून एक मैल रस्ता उजव्या कांठानें जातो. लोहारीनागपर्यंतची वाट साधारण बरी आहे म्हटलें तरी तींत चढउतार हे आहेतच. शिवाय वाटेवर दगडधोंडेहि पुष्कळ आहेत. लोहारीनाग चट्टी फारच लहान आहे. जातांना येथें थांबावयाचें नव्हतें म्हणून अडचण भासली नाहीं. पण येतांना येथें दुपारची वस्ती करावी लागली. तेव्हां प्रवासांतील गैरसोयी कशा तापदायक असतात, त्या मुकाट्यानें कशा सोसाव्या लागतात, त्यांतून निभवून निघण्यास आयत्या वेळीं मार्ग कसे सुचतात ह्यांचा नवा पाठ येथें प्रथमच मिळाला. हर्शील पासून लोहारीनाग नऊ मैल होतें. तेथें येण्यास अकरा वाजण्याचा सुमार आला. ऊन मनस्वी लागलें. बहुतेक वाट उताराची होती तरी चालण्याच्या श्रमानें मी अगदीं थकून गेलों होतों. कारण गंगोत्री येथें तापानें एकच दिवस पण खोड मोडून टाकली होती. लोहरीनाग येथें उतरण्यास जागा तर नव्हतीच, पण उभे राहण्यास कोठें सावलीहि नव्हती. चट्टी भागीरथीच्या कांठीं वाळवंटांत आहे. ती अगदीं लहान आहे. जेमतेम दहा पांचच माणसे आंत मावतील. ती इतकी गच्च भरून गेली होती कीं, आंत पाऊल ठेवण्यासहि वाव नव्हता. जवळपास कोठें एखादें झाडझूड किंवा कडाकपार अशी नव्हती कीं जेथें घटकाभर सावलीस तरी उभे राहता येईल. नाहीं म्हणावयास चट्टीच्या पाठ भिंतीशीं तिच्या वळचणीची सावली होती. पण तिची रुंदी पुरे उभे राहण्याइतकीहि नव्हती. ऐन मध्यान्हीचे उन्हाचा ताप होत नव्हता इतका तो तापून गेलेल्या वाळवंटाचा होत होता. असल्या ह्या रसरसलेल्या भट्टींत थांबण्यापेक्षां मैल, दोन मैलावरच एखादी चट्टी असती तर तसेंच कष्टानें का होईना पुढें जाऊन भाजून काढणारा ताप चुकविता आला असता. पण पुढची चट्टी पडली पांच मैलांवर. निरुपाय होऊन येथेंच थांबणें भाग झालें.

### प्रसंग शहाणपण शिकवितो

आसमंतभाग उन्हानें तापून धगधगत होता. उभे राहण्याइतकीहि सावली कोठें नव्हती. बारा वाजण्याची वेळ. भुका लागून गेलेल्या. डोळ्यापुढें काजवे चमकूं लागले होते. आजन्मांत असा प्रसंग अनुभवला नव्हता. ती उणीव राहूं नये म्हणूनच कीं काय हा योग वाढून

आला. ' आलिया भोगासी असावें सादर, ' ह्या विचारानें सभोंवतीं पाहूं लागलों. समदुःखी कोणीच दिसेनात. माझ्या उंचीचे मोठ मोठे गोटे इतस्ततः पडलेले दिसले. त्यांच्या आश्रयानें सावली करून घेण्याची कल्पना सुचली. कांबळ्याच्या चारहि टोंकांस तांब्या एवढाले दगड घट्ट बांधून ते कांबळे एकमेकांपासून सात आठ फूट अंतरावर असलेल्या दोन गोटयांवर पसरलें. दगडांच्या वजनामुळें तें कांबळें पाल बांधल्याप्रमाणें ताणून बसलें. पण वाऱ्यानें खालींवर हलून हलून ते सरकें म्हणून दोन पातळास साधारण पीळ घालून तीं दोन्हीं दोरीवजा कांबळ्याचे वरचे बाजूस फुलीसारखीं टाकून त्यांच्या टोकावर दगड ठेवले. सरकणें थांबलें. सुचलेली कल्पना सफल होऊन अडचण निभावली व आनंद वाटला. सावली मिळाल्यामुळे स्टोव्हवर तांदूळ करतां आले. भागीरथीवर जाऊन स्नानसंध्यादि करून येई-पर्यंत जागाहि थोडी निवली होती. फराळ करून थोडी विश्रांति घेऊन पुढें निघालों.

सुक्खी

लोहारीनागपासून सुक्खी पांच मैल आहे. बहुतेक वाट चढावाची आहे. त्यांतील शेवटचा मैल अति बिकट आहे. मातीच्या ढिगाऱ्या-वर चढण्याप्रमाणें वाटतें. एकंदर ढिगारा आवळून घट्ट झालेला असला तरी पायाखालची माती भुसभुशीत होऊन पाय मागें घसर-तात. हा चढ जिन्यासारखा चढावा लागतो. पण तेथें पायऱ्या तर नाहींतच. पाऊल ठेवण्यास जो कांहीं आधार मिळतो तो गुडघाभर उंचीवरहि असतो. ह्याचा शेवटचा भाग चढतांना काळजाचें पाणी पाणी होऊन जीव रंजीस येतो.

सुक्खी चट्टी घाटमाथ्यावर नसून ती डोंगरावर मध्येंच आहे. येथून गांवची वस्ती पाऊण मैल दूर आहे. गेथील धर्मशाळा मोठी असून ती रस्त्यावरच आहे. पाण्याची सोय चांगली व जवळ आहे. ह्या ठिकाणची उंची सुमारें सात हजार फूट आहे. येथें बटाटे मिळाले. पण ते चवीला आपल्याकडील बटाटयांप्रमाणें लागत नाहींत. रताळ्याप्रमाणें पिठूळ लागतात. गांवांत कांहीं पंडे लोकांची वस्ती आहे. गंगेची मूर्ति आहे. यमुनोत्तरीची जशी खरसाळी तशी गंगो-

त्तरीची सुक्खी. हिंवाळ्यांत गंगोत्तरीच्या गंगेच्या मूर्ति येथें आणून त्या वेळीं त्यांची पूजाअर्चा येथें होते. खरसाळीपासून सुक्खीपर्यंत परस्पर येण्यास एक मधली वाट आहे. पण ती बिकट पहाडांतून असल्यामुळें यात्रेस अगदींच गैरसोईची व अधिक त्रासाची आहे. पहाडी लोकांनासुद्धां ती कठीणच वाटते. शिवाय उत्तरकाशीपासून मिळणारा गंगातीरवासाचा लाभ अंतरावा लागतो तें वेगळेंच.

## मालाची वाहतुक हा मेंढपाळांचा उपधंदा

गंग्णाणी ते सुक्खीच्या वाटेंत आम्हांस एक अपूर्व गोष्ट दृष्टीस पडली. डोंगरावरील, एका साधारण उंचवट्यावर दोन तीन वाव लांबी रुंदीची व पुरुषभर उंचीची एक गोण्यांची थप्पी एका झाडा-खालीं लावून ठेवलेली दिसली. त्या थप्पीवर कसलेंच आच्छादन घातलेलें नव्हतें, व तेथें राखणहि नव्हती, किंवा आसपास वस्तीहि नव्हती. आडरानांत असुरक्षित स्थितींत ठेवलेल्या त्या गोण्यांतून कोणी कांहीं लांबविणार नाहीं का? त्या तेथें कशासाठीं व कोणीं ठेवल्या असाव्यात? वगैरे प्रश्न डोळ्यापुढें उभे राहिले. पण विचारावयास तेथें माणूस होताच कोठें? आम्हीं एक बोजेवाला असा केला होता कीं त्यानें नेहमीं आमचे बरोबरच चाललें पाहिजे. त्याचेजवळ वीस शेरापेक्षा अधिक वजनाचा बोजा दिलेला नसे. त्याचें नांव शंकर दत्त. त्यास विचारतां तो म्हणाला कीं, यमुनोत्तरी गंगोत्तरीकडे ज्या कांहीं चट्ट्या व पहाडी वस्ती आहे त्यांस लागणारें धान्य वगैरे वस्तु मिळण्यास जवळपास सोय नाहीं. वेळेनुसार चाळीस पन्नास मैलांतसुद्धां सोय नसते. इतकेंहि असून घोडा, गाढव, बैल ह्यावर घालून ते जिन्नस आणूं म्हटलें तर हीं जनावरें जातील अशा वाटाहि इकडे नाहींत. त्या किती कठीण असतात ह्याची आतां-पर्यंतच्या अनुभवावरून आपणास थोडीशी तरी कल्पना आली आहेच. अशा स्थितींत मेंढ्या पाळणाऱ्या लोकांस हे जिन्नस वाहून आणण्याचा एक उपधंदा झाला आहे. देवप्रयाग, टेहरी, उत्तरकाशी अशा ठिकाणचें व्यापारी मेंढापाळांकरवीं धान्यादि जिनसा पहाडांतील व्यापाऱ्यांस पोंचवितात, किंवा मेंढपाळ स्वतःच हा धंदा करितात. मेंढपाळांचा मुख्य धंदा म्हणजे मेंढ्या पाळन लोकरीचें उत्पादन करणें. ह्या धंद्यांत



पर्वत उंची पांडुकेसर पान २७७



अलकनंदा उगम पान ३११



राम मंदीर देवप्रयाग पान २३४



वासुकी गंगा पान २०३

त्यांस कांहींहि व्यय नसतो. मेंढ्यास चरावयास गवत व कसलाहि झाडपाला चालतो. हिमालयांत त्याची उणीव मुळींच नाहीं व त्यांस किंमतहि द्यावी लागत नाही. सोयीस्कर चारणी करतां येत आहे तोंपर्यंत तो तेथेंच पाल ठोकून वस्ती करून राहतो व चारा संपला कीं पुढें जातों. आपल्याकडील वडार, गारुडी, वैदू लोकांप्रमाणें त्याचें बिऱ्हाडबाजलें त्याचे पाठीवरच असतें.

मेंढी मेली किंवा मारली म्हणजे तिच्या कोथळ्याच्या कातडीची एकसंधी चांगली गोणी बनवतात. तींत सुमारें पायलीभर धान्य मावतें. ही गोणी तिच्या पाठीवर आडवी बांधून मागेंपुढें सरूं नये म्हणून गळ्यास व शेपटीस दोन बंद पक्के बांधलेले असतात. चराऊ ठिकाणें, सपाटीचीं किंवा चढउतारीं पण चार दोन दिवसच पुरणारीं असलीं तर दिवसानुदिवस अष्टौ प्रहर त्यांच्या पाठच्या गोण्या सुटावयाच्याच नाहींत. त्या म्हणजे त्यांच्या शरिराचा जणू कांहीं एक जन्मजात अवयवच; पण जेव्हां चराऊ ठिकाण उभ्या डोंगर लगत्यास असतें व तेथें आठपंधरा दिवस निभण्याइतका चारा असतो तेव्हां, किंवा त्यांपैकीं कांहीं माल पोहोंचविण्यास वाकडी वाट करावी लागते तेव्हां, मेंढ्यांच्या पाठीवरील गोण्या सोडून ठेवणें भाग पडतें व सोयीचेंहि होतें. नाहींतर पाठीवरील गोणीचें ओझें व त्याचा बोंगा ह्यामुळें मेंढी उंचावरून खाली घसरून हातची गमावून बसण्याचा धोका असतो. मेंढी चरत चरत तिचे जेमतेम पाय मावतील इतक्या अवघड जागीं जाते. तेथें माणसास कांहीं जातां यावयाचें नाहीं. शिवाय जो माल पुढें न्यावयाचा असतो त्याचा बोजा उगीचच वाहावा लागतो. ह्याकरितां वाटेवर सोयीस्कर ठिकाणीं गोण्या उतरून त्यांची थप्पी लावून ठेवतात.

## पहाडी कुत्रीं

मेंढ्यांच्या कळपाबरोबर कुत्रें हें असावयाचेंच. त्यांची जात येथें पहावयास सांपडली. हीं कुत्रीं साधारणपणें मेंढ्यांसारखींच मोठाड व केसाळलेलीं अततात. दिसण्यांत भीतिच वाटावी अशी तीं क्रूर दिसतात. आपल्या कळपापैकीं एखादीं मेंढी चुकून दुसऱ्या कळपांत गेली किंवा आडरानांत मागें राहिली तर तिचा नेमका माग

काढून तिला परत घेऊन येण्याचें ज्ञान त्यास विशेषत्वानें असतें. तीं इमानी असतात हें सांगावयासच नको. ह्या कुत्र्यांचें भुकणें किंकाळी नसून ते गर्जून भरीव आवाजाचें असतें. कुत्रा गुर्गुरूं लागला कीं, काटाच उभा राहतो. तिबेटमधील कुत्रा तर ह्याहिपेक्षां मोठाड व क्रूर दिसतो. चिऊ गुंफेजवळ तो साखळीनें बांधून ठेविला होता तरी पंधरा वीस हातावरूनसुद्धां त्याच्या पुढून जाण्यास धीर होत नव्हता.

मेंढपाळाबरोबर त्यांचीं एक दोन कुत्रीं असतात. तीं माणसांप्रमाणें विश्वासू, एकनिष्ठ असून आपल्या मेंढ्या नेमक्या ओळखून संध्या-काळच्या वस्तीस आणतात. सोय असली तर मेंढपाळ एखादें कुत्रें रक्षणार्थ थप्पीपाशीं ठेवतो. तें नसलें तर त्याची आवश्यकताहि नसते. इतर कोणीहि त्या मालास हातसुद्धां लावीत नाहीं. असलें पाप केलें तर नरकयातना भोगाव्या लागतील अशी तेथील लोकांची दृढ समजूत असते.

### चोर तया स्वप्नीं न पुसे

येथील लोकांची ही वृत्ति पाहून थक्कच झालों. परंपरागत हिंदु-धर्माच्या शिकवणुकीनें अशीच संस्कृति निर्माण करून ठेवली आहे कीं, कोणीहि दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करूं नये. पहाडी लोकांच्या अंगीं ही वृत्ति जन्मजात इतकी बाणून गेली आहे कीं, त्यांच्या घरास कडीकुलूपहि नसतें. ही प्रथा त्यांच्यांत कधींपासून चालत आलेली आहे हें माहीत नाहीं. पण ती पाऊणशेंशंभर वर्षांपूर्वींपासून चालत आलेली असल्याचा उल्लेख आहे. साठपासष्ठ वर्षांपूर्वीं माझ्या आजी ह्या यात्रा करून आल्या होत्या. त्या यात्रेचें त्या वेळीं प्रचलित असलेलें एक कवन त्यांच्या म्हणण्यांत येई. त्या कवनांत ह्या चारहि धामांच्या यात्रामार्गांचें, चट्टयांचें, क्षेत्रांचें, हिमालयाचें व तेथील परिस्थितीचें वर्णन आहे. त्या कवनांत एके ठिकाणीं परिस्थितीचे थोडेसें वर्णन आलें आहें तें असें:—

सर्प व्याघ्र आणि वृश्चिक श्वापद यांची भीति लवही नसे ।
वस्तु कुणाची कुठें पडो, पण चोर तया स्वप्नीं न पुसे ।

सत्य, अहिंसा, आस्तेय इत्यादि गुणांचा सकाळसंध्याकाळ वैयक्तिक वा सामुदायिकरीत्या कोरडा लौकिकी जप करण्यापेक्षां ह्या पहाडी

निरक्षर पण जन्मजात गुणवान् व क्रियाशील लोकांचा कित्ता गिरवला तर केवढें काम होईल. काळाबाजार बंद होईल व सर्वोदयापायीं चाललेला अनाठायी खर्च व श्रम वांचतील.

### उक्तिपेक्षां कृती श्रेष्ठ

तेन त्यक्तेन भुंजिथाः । मा गृधः कस्यस्विद्धनम् ।

हा ईशावास्योपनिषदांतील पहिल्याच मंत्राचा उत्तरार्ध आहे. त्या मंत्राचा अर्थ आजपर्यंत अनेक विद्वानांनीं करून ठेविला आहे व आजहि आधुनिक आचार्य प्राचार्य त्यावर प्रवचनांची झोड उठवीत असतात. पण.... !!! त्याची शिकवण प्रत्यक्ष आचारांत कोठें दिसेल तर शपथ. खरेंच आहे. प्रवक्त्याच्या आडांत असेल तरच श्रोत्यांच्या पोहोऱ्यांत येणार? पहाडी लोकांना मंत्रच माहित नाहीं, मग त्याच्या अर्थाची उठाठेव ते करतात कशाला ? त्यांना जन्मादारभ्य दिसत आलें त्याप्रमाणें ते वागताहेत. खरी शिकवण तीच कीं, जिच्या योगें तें शिक्षण अंगीं बाणून तसा स्वभावच होऊन जाईल, आणि तें आचारांत उतरेल.

### बोजेवाल्यांचा विश्वासूपणा

चारहि धामांच्या वाटेवर यात्री आपलें फालतू सामान त्यास अनोळखी असलेल्या चट्टीवाल्याकडे आठ आठ दिवस फुकट ठेवितो. त्याबद्दल लिखापढी कांहींहि नसते. तरी त्या सामानापैकीं, कधीं कांहीं गेलें असा संशयसुद्धां घेण्यास जागा नाहीं. आम्ही आपलें सामान साधें गाठोडेंच बांधून ठेवीत होतों. पण त्याची गांठसुद्धां सुटलेली कधीं दिसली नाहीं. बोजेवाल्यांच्या विश्वासूपणाबद्दलचा निर्वाळा मागें सांगितलाच आहे. प्रवासांतील ह्याच सुमारास त्यांच्या विश्वासूपणाची व आपसांतील एकत्वभावाची एक गोष्ट लक्षांत राहण्यासारखी दिसून आली.

आमच्या सावकाश चालीमुळें चट्टीवर पोहोंचण्यास आम्हांस बारा वाजून जात. तोंपर्यंत पुढें आलेले यात्री जेवणखाण उरकून विश्रांतीकरितां अडवारलेले असत. आमचें जेवणखाण आटपेपर्यंत ती मंडळी निघून जात असत. आम्ही निघत असूं, तेव्हां चट्टी ओस पडे. सकाळीं मात्र आम्ही सर्वांच्या अगोदर मार्गस्थ होत असूं.

दुपारचे वेळीं आम्ही चट्टींतून बाहेर पडलों; तोंच पातेरामानें विचारलें कीं, चट्टीके कोनेमें एक कपडा दिखता है वह किस्का है? मीं सांगितलें कीं, आपले कपडे कांहींहि बाहेर राहिलेले नाहींत. सर्व बांधून घेतले आहेत. त्यानें तो कपडा उचलून पाहिला व ठरविलें कीं, त्याच्या माहितीच्या बोजेवाल्याच्या मालकाचा तो असावा. त्यांनीं आमचा बोजा तिघांत होता तो दोघांत वांटून घेऊन एकजण मोकळा झाला. तो त्या यात्रीचा कपडा घेऊन त्यास देण्यासाठीं पुढें झटकला. त्या यात्रीस गाठून त्यानें तो कपडा त्यास दिला. त्या कपडयांत त्या यात्रीचें घडयाळ व दोन तीन रुपये होते. कपडा आणून दिल्याबद्दल यात्रीनें त्यास सबंध चार आणे (!) बक्षिस दिले. बोजेवाल्यानें कांहीं तक्रार केल्याचे कानावर नाहीं. ती बक्षिशी तिघांनीं वाटून घेतली. यात्रीची व आमची गांठ गंगोत्तरीस पडली तेव्हां त्यानें आमच्या बोजेवाल्याची फारच प्रशंसा केली.

आम्हीहि आमची शाल व तीस आतून जोडलेलें दुहेरी धोतर गंग्णाणीहून पहाटे निघतांना विसरलों होतो. त्याची आठवण संध्याकाळीं हरप्रयाग येथें झाली. बोजेवाल्यास कपडे मागें राहिल्याचें सांगितलें. तेव्हां आमच्या तिघां बोजेवाल्यांनीं तेथें कोण कोण इतर बोजेवाले भेटले होते त्याची चर्चा केली, व शेवटीं निष्कर्ष सांगितला कीं, आपले कपडे आपण पुन्हां ह्या ठिकाणीं परत येऊं, त्या सुमाराचे आंत आपणांस मिळतील. काळजी नको. त्या दिवशीं भेटलेले बोजेवाले आमचेच गांवचे आहेत. सांगण्याचें आश्चर्य कीं, आम्ही गंगोत्तरीहून परतून भैरवघाटापाशीं आलों, तेथें आम्हांस एक बोजेवाला येऊन भेटला आणि त्यानें आमचें कांहीं सामान गहाळ झालें आहे काय म्हणून विचारलें. आमची किरमिजी शाल व तीस जोडलेलें एक दुहेरी धोतर आम्ही गंग्णाणीस विसरल्याचें सांगतांच तो हसला आणि म्हणाला जरा थांबा, मी ते कपडे आणून देतों. थोडयाच वेळांत त्यानें दोन्ही कपडे जसेचे तसें आणून दिले. बक्षीस काय देऊं म्हणून विचारतां तो म्हणाला तुम्हांला काय वाटेल तें द्या नाहींतर देऊंहि नका. मीं त्यास दोन रुपये दिले. तो म्हणाला इतके कशाला? मीं म्हटलें दिले ते घे. तो घेईना. शेवटीं एक रुपया घ्यावयास लावला.

ह्या अठराविश्वे दरिद्री लोकांतील अस्तेय, विश्वासूपणा, प्रामाणिकपणा, ह्यांचें वर्तन पाहून त्यांचे विषयीं कोणास आदर वाटणार नाहीं ?

ह्या लोकांच्या सचोटीविषयीं शंका घेत आहोंत असें त्यांस दिसलें तर त्यांना अपमानास्पद वाटतें. शिवी दिल्याप्रमाणें राग येतो व मग ते आपल्याशीं बोलण्यासहि तयार नसतात.

### हलवायाची सचोटी

आम्ही गंगोत्तरीहून परत मार्गांत घरालीजवळ आलों. तेथें वाटेवरच एक पहाडी हलवाई पेढे विकण्यास बसला होता. त्यास भाव विचारतां त्यानें बारा आणे शेर सांगितला. एक शेर देण्यास त्यास सांगितलें. त्यानें सोळा पेढे – मुटकुळींच तीं – मोजून दिले. मीं त्यास म्हटलें, 'वजन बरोबर आहे का ?' तो म्हणाला, 'विश्वास रखो। कुछ कमती होगा तो आपको सब मेवा मुफत दुंगा।' मीं म्हटलें, 'समक्ष वजन करून देण्यास काय अडचण आहे ?' तो म्हणाला, 'एक शेरसे जादाहि तोल होगा। विश्वाससे ले लेव।' मीं म्हटले, 'वजन करून घेतलेलें बरें. त्यास काय वेळ लागणार आहे ?' तो म्हणाला, 'मेवा दे देव।' मी ते त्याचे हातीं देतांच त्यानें ते आपल्या ताटांत पूर्ववत् नीट लावून ठेविले व म्हणाला, 'आपने रखा हुवा है वह दाम उठा लेव। मैं आपको मेवा नहि बेचता।' मजवर तो रागवला. त्याची चर्या वर्णन करून लिहितां येणें शक्य नाहीं. तिरस्कारयुक्त रागानें ती लाल झाली होती. मीं त्याचेशीं अनेक प्रकारें बोलून पाहिलें. पण तो बोलण्याकडे लक्ष देण्यास सुद्धां तयार नव्हता. मीं म्हटलें, 'दे ते तसेच. नको वजन करूं.' तरीहि तो स्तब्धच. आमचा बोजेवाला शंकर दत्त त्याचाच जातवाला होता. त्यानें कशी तरी त्याची समजूत घातली. तेव्हां त्यानें पेढे दिले. त्याच्यापुढें ठेवलेले पैसे त्यानें घेऊन आपल्या बटव्यांत ठेवले. नंतर मला दिलेले पेढे मागून घेऊन त्यानें त्यांतील एकेक वजन करून दाखविला. प्रत्येक पेढा छटाक वजनास कांकणभर जास्तच भरला. त्यांतील एकहि कमी भरला नाहीं. तो म्हणाला, 'बाबूजी हम लोग अपनी जान गयी तो झूट बात कभी नहीं करेंगे। भगवान साक्षी है।' हा सर्व प्रकार पाहून मी मनांतल्या मनांत विरमून गेलों.

## धर्माचारानें तसा स्वभाव बनतो

परंपरागत आचारधर्माची शिकवण हाडीमाशीं किती भिनून गेलेली असते, ह्याचें प्रत्यंतर आलें. ब्राह्मण म्हणजे तो कांहींहि झालें तरी खरेंच बोलणार व क्षत्रिय प्राणपणानें आपलें ब्रीद पाळणार अशी स्थिति होती. सत्यकाम जाबालीच्या निःशंक बोलण्यावरून ऋषींनीं त्याला ब्राह्मण ठरविलें. ' ब्राह्मणोऽसि न सत्यादगाः ' असें बृहदारण्यकोपनिषदांत वाक्य आहे. नंदिनीला वांचविण्यासाठीं राजा दिलीप आपलें स्वतःचें शरीर तिला खावयास आलेल्या सिंहास देण्यास तयार झाला. शिबीराजानें अभयार्थी आपल्या मांडीवर येऊन बसलेल्या कपोतास वांचविण्यासाठीं श्येन पक्षास स्वतःचें सबंध शरीरच दिलें. महारथी कर्ण यानें आपण ब्राह्मण असल्याची बतावणी करून परशुरामाचें शिष्यत्व पत्करलें, व त्याजकडून ब्रह्मास्त्र विद्या प्राप्त करून घेतली. त्या वेळीं एक प्रसंग असा आला कीं, एकदा दमून-भागून आलेले परशुराम कर्णाच्या मांडीवर डोकें ठेवून झोपीं गेले. कर्णाच्या मांडीस कीटक—हा कीटक म्हणजे जळू असावी कारण जळूचा दंश असा असतो कीं तो मुळीच कळत नाहीं. तिचें रक्त शोषणानें पोट भरलें म्हणजे ती आपोआप सुटते, पण रक्तस्राव मात्र उपचाराशिवाय थांबत नाहीं. इतर दंशानें इतका स्राव होत नाहीं—दंश होऊन भळभळा रक्त वाहूं लागलें तरी गुरुजींची झोंप मोडेल म्हणून हुं कीं चू न करितां त्यानें वेदना सहन केल्या. रक्तस्पर्शानें परशुराम जागे झाले तेव्हां रक्ताचें थारोळें पाहून त्यांना संशय आला कीं, हा ब्राह्मण नसून क्षत्रियच असला पाहिजे. इतक्या तीव्र वेदना मुकाटयानें सहन करणें, व एवढा थोरला रक्तस्राव बेडरवृत्तीनें पाहाणें हें कर्म क्षत्रियाशिवाय इतराकडून होणें शक्यच नाहीं. त्यांचा संशय खरा ठरला. कर्णानें आपण ब्राह्मण नसल्याचें प्रांजलपणें कबूल केलें. ह्या उदाहरणावरून वर्ण आणि गुण ह्यांची समव्याप्ति धर्माचारानें माणसांत कशी बाणून गेली होती हें स्पष्ट दिसतें. हिंदुधर्मी लोकांपुढें हाच आदर्श सहस्रावधी वर्षें असल्यामुळें खेडवळ अशिक्षित समजल्या जाणाऱ्या ग्रामीण लोकांत निदान ह्या भागांत तरी गुणवान् व आचारशील माणसें सररहा आजहि पाहावयास सांपडतात. रस्त्यावर ठेवलेलीं

वर्तमानपत्रें शेजारी ठेवलेल्या पेटींत त्याच्या किंमतीचे पैसे टाकून तीं घेतात अशा अमेरिकेंतील उदाहरणाचा गाजावाजा करण्यापेक्षां वरील उदाहरणें निःसंशय अधिक बोधक व राष्ट्राभिमानपोषक आहेत.

## परप्रांतीं नुसता ओळखीचा माणूस घरचाच वाटतो

हरद्वार येथून ज्या पुणेंकर मंडळीच्या मेळाव्याबरोबर आम्ही निघणार होतों त्यांपैकीं एक श्री. सावळारामपंत जोशी यांचें कुटुंब व त्यांचे सोबतीनें आलेल्या श्रीमती बयाताई ह्यांची आमची गंगणाणीस गांठ पडली. बारा तेरा दिवसांत ओळखीचें असें कोणीं भेटलें नव्हतें. प्रत्यहीं कोणीतरी यात्री भेटून त्यावेळपुरती ओळख होई, पण परकेपणा आणि हिंदी भाषा सहज बोलण्याची आणि बोललेलें नीट समजण्याची अडचण, ह्यामुळें मनमोकळें बोलल्याचें समाधान होत नसें. जोशीबोवांची गांठ पडल्यामुळें आम्हास घरचींच माणसें भेटल्याप्रमाणें आनंद झाला. मनसोक्त गप्पागोष्टी झाल्या. त्यांत गंगायमुनांचें दिव्य दर्शन, यमुनोत्तरीच्या अलौकिक घटना, प्रवासांत आलेले विविध अनुभव, इकडील लोकांची साधी राहाणी व त्यांची सचोटी, बोजेवाल्यांचा प्रामाणिक व विश्वासूपणा आणि गंगा–यमुना स्वर्नद्यांच्या स्नानपानानें वाटणारें पावित्र्य इत्यादि गोष्टींची उजळणी झाली.

## संगत–सोबतीची निवड

त्यांच्या मेळ्यांतून ही मंडळी मागें कशी पडली, कोणी आजारी झालें काय म्हणून चवकशी करतां कळून आलें कीं, ही मंडळी कै. केशवराव महाराज देशमुखांचे ज्ञानेश्वरीस एकत्र येणारी असली तरी आगाऊ ठरून त्यांचा मेळावा झालेला नव्हता. तुम्ही जातां आम्हीहि येतो, इतक्यापुरताच ह्यांचा मेळावा होता. एकमेकांस संभाळून घेण्यास लागणारा एकोपा त्यांच्यांत नव्हता, ज्यांच्या सोबतीनें जावयाचें त्यांचा स्वभाव, खातखोडी, इतरांशीं जमवून घेण्याची वृत्ति इत्यादींची विचारपूस आरंभींच करावी हें उत्तम. ह्या यात्रा आतां पूर्वींसारख्या मेळाव्यानेंच केल्या पाहिजेत अशा राहिल्या नाहींत. एकटयादुकटयानेंहि त्या करतां येतील, अशा सोयीच्या व निर्भय झालेल्या आहेत. तरी सुद्धां सोबतीसंगतीची आवश्यकता कशी उत्पन्न होते ह्याचा प्रत्याक्षानुभव गंगोत्रीस आला. तो पुढें येईलच. श्री. जोशी

हे पडले गृहस्थाश्रमी. त्यांना बायकोच्या चालीनें चालणें प्राप्तच होतें. बाकीची मंडळी होती विधुर किंवा ब्रह्मचारी. त्यांना मागचा पाश कांहींच नव्हता किंवा त्यांनीं तो मानावा असें बंधनहि त्यांचेवर नव्हतें.

पादत्राण—पुणेरी जोडा

श्री. सावळारामपंत हे आगगाडीकडे 'गार्ड' होते. आयुष्यांतील बराच मोठा काल नोकरीनिमित्त त्यांना 'सुटाबुटांत' काढावा लागला होता. तरी इतर घरगुती वेळांत ते कधींहि चुकूनसुद्धां ते कपडे वापरतांना दिसले नाहींत. इतकेंच नव्हें तर ह्या चारहि धामांच्या यात्रेंतील सर्व प्रवास, बिकट चढउतारसुद्धां, त्यांनीं पुणेरी जोडा घालूनच केला हें विशेष आश्चर्य होय. आपल्याच्यानें कांहीं तसा जोडा घालून ह्या रहाळांत एक मैलहि प्रवास करवला नसता.

स्वावलंबनानें आत्मविश्वास

श्रीमती बयाताई ह्यांच्यावर दुर्दैवानें स्वावलंबी जीवनाची पाळी आली होती. त्यांना मूलबाळ कांहींहि नव्हतें. वेळ प्रसंगीं पोटास चिमटा घेऊन त्यांनीं आपल्या जीवाभावास आयत्या वेळीं उपयोगीं पडावे म्हणून शेंपन्नास रुपयांची माया जवळ केली होती. त्यांची यात्रेची ओढ इतकी प्रबळ कीं, त्यांनीं ह्या यात्रेप्रीत्यर्थ ते सर्व पैसे खर्च करून टाकलें. त्यांचा बलवत्तर विश्वास कीं, ज्यानें आजपर्यंतच्या प्रसंगांतून निभावण्याचें सामर्थ्य दिलें तो तें पुढें देईलच देईल.

सुख्खी तें हरप्रयाग

सुख्खीहून आम्ही सर्व मंडळी बरोबरच निघालों. एक मैलाचा सारखा चढ पण बोलण्याचे नादांत तो केव्हांच संपून गेला, तें कळलें सुद्धां नाहीं. पुढें दोन मैल सारखा उतार. तो संपतांच 'झाला' चट्टी आली. जोशीबोवा वस्तीकरितां येथें थांबले. आम्हीं हरप्रयाग येथें थांबण्याचें ठरविलें होतें म्हणून पुढें गेलों. झाल्यापासून अर्ध्या मैलावर श्यामप्रयाग आहे. येथें श्यामगंगा भागीरथीस मिळते. येथील उंची सात हजार फूट आहे. येथून श्रीकंठ पर्वताचें हिमाच्छादित धवल शिखर दिसतें. येथेंच भगीरथ राजानें गंगेच्या प्राप्तीकरितां तपश्चर्या केली होती. पुरोभागीं दाट झाडीमधून वाहणारा गंगाप्रवाह व संगम आणि पार्श्वभागीं नीलवर्ण आकाशांत शुभ्र श्रीकंठ शिखर हा देखावा

मोठा चित्रमय व मनोहर दिसतो. श्यामप्रयागपासून पावणे दोन मैलांवर गुप्तप्रयाग व पुढें अर्ध्याच मैलावर हरप्रयाग आहे. श्याम-प्रयागपासून हरप्रयागला दोन वाटा जातात. एक गंगेच्या पात्रांतून जाते. ती जवळची असली तरी तिनें वाळवंट तुडवीत जावें लागतें. दुसरी डोंगरपायथ्यानें जरा लांबची आहे, पण तींत दगडवाळूंत अड-खळत चालण्याचा त्रास नाहीं. ह्या वाटेवर एके ठिकाणीं आम्हास बर्फावरून चालत जावें लागलें. हा बर्फ वरून कोसळून सांठलेला असावा. आमच्या सर्व यात्रांत इतक्या खालच्या उंचीला आम्हांस कोठेंच बर्फ आढळला नाहीं. तो दहा हजार फूट उंचीच्यावर असतो, व तो मे महिन्यापर्यंत विरघळूनहि गेलेला असतो. त्यांतून अवशेष राहिलाच तर ओलांडण्याची पाळी येते.

## गंगेचें वाळवंट

गंगेचें पात्र प्रयाग काशीप्रमाणें फारच विस्तृत आहे. तेथें पात्रांत सर्व रेतीच रेती असते. तींत एखादा खडा औषधालासुध्दां सांपडा-वयाचा नाहीं. पण येथें अगदीं त्याच्या उलड स्थिति. वाळवंटभर जाड वाळू व लहान लहान गोटे. रेतीचा अंशसुद्धां नाहीं. प्रवाह संथ व उथळ दिसला तरी घोष चालू असतोच. तृतीय सवनांत नाहीं एवढेंच ! गंगेचें पाणी राखट रंगाचें गढूळ; पण मिळणाऱ्या उपगंगांचें भिंगासारखें स्वच्छ. मात्र सर्वच गंगांचें पाणी कळा उत्पन्न करील असें गारठणक असतें. गंगेचें पात्र फारच रुंदावलेलें असल्याकारणानें तिच्या प्रवाहास अनेक फाटे फुटून जागजागीं वाळूचीं बेटें झाल्या-सारखीं दिसतात. सुक्खीपाशीं गंगापात्राची कालव्याएवढी रुंदी तर हर्शीलजवळ अर्ध्या मैलावर गेलेली ! हीं परस्परविरोधी रूपें पाहून विष्णुसहस्रनामांत वर्णन केलेल्या विष्णूच्या नांवांची 'अणुर्बृहत्कृश-स्थूलो गुणभृन्निर्गुणो महान्' आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं.

## तिबेटी लोकवस्ती

हर्शील व हरप्रयाग हीं दोन्हीं नांवें एकाच गांवास आहेत. तरी त्यांनीं ओळखले जाणारे टापू निरनिराळे आहेत. जशा कांहीं एकाच गांवाच्या अर्धा मैल अंतरावरील दोन टोंकाच्या त्या दोन पेठा आहेत. हर्शील भागांत तिबेटी लोकांची वस्ती आहे. शेंपन्नास फूट लांबीच्या

एका चिंचोळ्या रस्त्याच्या दोन्ही अंगांस त्यांचीं घरें आहेत. तीं बहुतेक दुमजली असून वरचा मजला पुढून उघडाच असतो. घराच्या भिंती, दगडी फरशांच्या कोरड्या रचाईच्या आहेत. घरांचीं कौलारें फळ्यांचीं आहेत. प्रत्येक घराचे बाहेर दरवाजाचे दोन्ही बाजूंस ओटे असतात. ते म्हणजे त्या घरांच्या जणूं ओसऱ्याच. घरांतील म्हातारीं-कोतारीं माणसें रिकामपणचा वेळ ओटयावर बसून चिलीम फुंकीत फुंकीत गप्पागोष्टी करीत काढतात.

## तिबेटी लोक व त्यांची राहाणी

तिबेटी लोक मंगोली वंशाचे आहेत. त्यांचा बांधा मध्यम उंचीचा व हाडापेरानें ते तसेच आहेत. त्यांचा रंग काळसर तांबूस, ओठ जाड, नाक चपटें, डोळे बारीक, केस राठ असतात. पुरुषांच्या तोंडावर दाढीमिशा येतच नाहींत. डोकीचे केस मात्र बायकांप्रमाणें लांब सडक असतात. पुरुषहि बायकाप्रमाणें तीन पेडी वेणी घालून इकडील आधुनिक मुलींप्रमाणें वेणीच्या अग्रास रंगीबेरंगी चिंध्या किंवा गंगा-वनाचा काळा गोंडा बांधून शेपटा पाठीवर सोडतात. त्यांच्या बाय-कांचे वेणीचे प्रकार निरनिराळे आहेत. करंगळीएवढ्या जाडीच्या केसांच्या बटांच्या होतील तितक्या वेण्या घालून भांगाच्या दोन्ही बाजूस त्या शेजेनें गुंफतात व त्याच पद्धतीनें अग्रवेण्यांचा अंबाडा वीतभर वाटोळा बांधतात. केशभूषांचें कौशल्य विशेषत्वानें त्यांच्यांत दिसून येतें. तिबेटी लोक अहिंसाधर्मी बुद्धानुयायी असले तरी मद्यमांस यथेच्छ खातात. कच्चें मांसहि ते खातात. त्यांच्यांत चहा पिण्याचें व सिगारेट्स ओढण्याचें फार मोठें व्यसन आहे.

## तिबेटी चहा

त्यांचा चहा आपल्याकडील प्रमाणें दूध व साखर घालून केलेला नसतो. त्यांच्या चहाची रीत अशीः– पाण्यांत चहा व मीठ घालून तें उकळावयाचें. नंतर तो काढा सुमारे हातभर उंचीच्या व मूठभर रुंदीच्या एका बांबूच्या नळकांड्यांत ओतून त्यांत मखन (लोणी) घालून एका लाकडी दटयानें (पिस्टन) खालींवर हलवून तें मिश्रण एकजीवी करतात. हें करीपर्यंत तो काढा कढतच राहिलेला असतो. असा हा त्यांचा चहा तयार होतो.

## त्यांचा व्यवसाय

ह्यांचा मुख्य व्यवसाय मेंढ्या पाळून लोकर उत्पन्न करणें. त्याच्या अनुषंगानें ते अनेक उपधंदे करितात. लोकर कातून सूत काढणें, त्यांचीं पट्टीं विणणें, जाड व राठ लोकरीच्या काढण्या वळणें, तिबेट, नेपाळ व हिंदुस्थान ह्यांत मेंढ्यावरून मालाची वाहतूक करणें, मेंढ्यांच्या दुधाचें लोणी व दह्याच्या वाळलेल्या वड्या करून विकणें इत्यादि धंद्यांचे प्रकार दृष्टीस पडले. हिमकाळांत तेवढे ते घरीं वस्तीस येतात. बाकीचा काळ घर सोडून मेंढ्या चारणीस शेंपन्नास मैल दूरहि ते जातात. हिंदुस्थानांत येऊन राहिलेल्या तिबेटी लोकांच्या राहणींत आपल्याकडील भोटिया लोकांच्या सहवासानें पुष्कळच माणुसकी आलेली दिसते. 'कैलास – मानस' कडील पश्चिम तिबेटांतील लोकांत तिचा गंधसुद्धां नाहीं. तेथील लोक आडदांड, उर्मट, मनस्वी गलिच्छ आहेत. त्यांच्यांतील धर्मदीक्षित भिक्षु किंवा लामा हे सुसंस्कृत असून व्यापारहि करितात. येथील तिबेटी लोकांचा तिबेटशीं निलंग खिंडीनें व्यापार चालतो. तिकडून लोकरी कापड, कांबळीं व लोकर इकडे आणून विकतात व इकडून तिकडे धान्य, सुती कापड वगैरे नेऊन विकतात.

## देवद्वार

हर्शीलचे आसपास व पुढेंहि गंगोत्तरीपर्यंत दाट झाडी लागते. तिच्यांतील बहुतेक झाडें देवद्वार म्हणजेच ज्यास आपण देवदार म्हणतों त्याचीं आहेत. हर्शीलजवळ तर निव्वळ देवद्वाराचें एक मोठें रान आहे. देवद्वार वृक्षाच्या अनेक जाती आहेत. हे वृक्ष शें-दीडशें फुटांपेक्षांहि अधिक उंच वाढतात. त्याचप्रमाणें त्यांचा बुंधाहि वडा पिंपळाप्रमाणें प्रशस्त मोठा होतो. ह्या झाडांचीं पानें सुरूच्या पानांसारखीं असून ह्यांच्या फांद्याहि त्याच्याच प्रमाणें बुंध्यापासून शेंड्यापर्यंत चौफेर व उतारबंद फुटलेल्या असतात. हीं झाडें सुरु-सारखींच हिरवीगार शोभिवंत दिसतात. बुंध्याजवळील घेराच्या फांद्यांची लांबी फार तर वावभर आणि शेंड्याकडील फांदी हातभर असते. सुरु आणि देवद्वार ह्यांतील वेगळेंपण असें कीं, सुरूच्या फांद्या लांबीस कमी असून त्या जवळ जवळ उभ्याच असतात. पण देवद्वा-राच्या फांद्या आपण आपले दोन्ही हात डावी उजवीकडे ताठ पस-

रावे त्याप्रमाणें खोडाशीं काटकोनांत चौफेर असतात. हिमालयांत पांच सहा हजार फुटावरच्या उंचीस हीं झाडें चांगलीं वाढलेलीं आहेत. पण नऊ दहा हजार फुटावरील उंचीस हीं खुरटीं होत गेलेलीं आढळतात. त्रिजुगी नारायण, गंगोत्तरी, अल्मोड्याजवळ जागीश्वर ह्या ठिकाणीं देवद्वाराचे मोठमोठे वृक्ष पाहवयास सांपडले. त्रिजुगी नारायणाजवळ एक वृक्ष एवढा मोठा होता कीं, त्याचा शेंडा उताणे होऊन पाहिल्याशिवाय दिसत नव्हता. त्याचें खोड एवढें मोठें होतें कीं, त्यास एक आरपार ढोल पडलें होतें. त्या ढोलांतून इकडून तिकडे मला कांहींहि अंग चोरावयास न लागतां गुडघ्यावर चालून जातां आलें. त्या ढोलांत डोक्यावर हात पसरून आडवारलों तरी हात व पाय ढोलाच्या बाहेर आले नाहींत. ह्या झाडांच्या लाकडांत राळ व टर्पेण तेल असतें. इमारती, आगगाडींच्या रुळाखालीं आडवीं तुळवटें ( Slippers ) घालतात तीं, खोक्यांकरिता लागणाऱ्या जाड पातळ फळ्या, आगकाड्या वगैरेकडे देवद्वारी लाकडाचा अतोनात उपयोग आहे. हिमालयांतील खालच्या खालच्या उंचीवर नदीकांठीं वाढणाऱ्या असल्या लाकडांचे ओंडे करून ते नदीच्या प्रवाहांत सोडून देतात, आणि पायथ्याजवळ वहात आले म्हणजे ते काढून घेतात. पण जेथें अशा प्रकारची नदीच्या प्रवाहाची वाहतुकीकरितां सोय नाहीं तेथील असली वारेमाप उद्भिज संपत्ति ती खालच्या उंचीवरील असो नाहींतर वरच्या उंचीवरील असो, जागचे जागीं कुजून वाया जात आहे. जवळच आसपास वस्ती असली तर तेथील लोक आपल्या झोपडीवजा घराकरितां व जळणाकरितां असल्या मौल्यवान मोठमोठ्या लाकडाचा उपयोग करितात. पहाडांतील हे वृक्ष तोडण्याचें काम बिकटच असतें. ते लोक झाडाच्या बुंध्याशीं सर्पण गोळा करून तें पेटवून देतात. त्यामुळें बुंधा पेट घेऊन जळला म्हणजे तें झाड आपोआपच आडवें पडतें. मग तो सोट कुऱ्हाडून पाहिजे असेल तसा उपयोगांत आणतात.

### अक्रोड

गंग्णाणीपासून हर्शीलपर्यंत अक्रोडाचीं झाडें वाटेवर पुष्कळ लागतात. तीं कांहीं हेतुपुरस्सर लावलेलीं नव्हतीं. पांच ते आठ हजार

फूट उंचीवर हीं कोठेंकोठें आढळलीं. ह्या झाडांचीं पानें रामफळीच्या पानासारखीं लांबट व कडक असून त्यास सुगंध येतो. कैलास मार्गीं आल्मोडा जिल्ह्यांत 'पंगू' येथें अक्रोडच्या झाडाचा विस्तार पाहिला. तो इतका मोठा होता कीं, त्याचा बुंधा दहा पंधरा माणसांच्या वावेंत मावला नसता. पण त्या मानानें त्याची उंची वडपिंपळाएवढी नव्हती. ह्या झाडाचीं लाकडें इमारतीस तर चालतातच पण त्याचा हीर ठाशीव असल्यामुळें त्यावर नक्षीकाम फारच चांगले करितां येतें. बंदुकीचे दस्ते ह्या लाकडाचेच केलेले असतात. ह्या झाडाचा कातडीं कमावणें, रंग तयार करणेंकडे उपयोग होई. वाग्भट व चरक संहितेंत ह्याचा औषधी उपयोग दिलेला आहे.

ह्यावेळीं ( ज्येष्ठ मासीं ) ह्यास फळें धरलेलीं होतीं. तीं अश्विना-पर्यंत पक्व होतात. अक्रोडाचे मगजांत इतकें पुष्कळ तेल असतें कीं, घासभर मगज चावला तर तोंडांत तेलाची चूळच तयार होईल. चावण्यास अगदीं ठिसूळ व गुळचट लागतो. पण फार तेलामुळें तेव्हांच वीट येतो. सुक्खी येथें बारा आणे शेरानें आम्हांस अक्रोडाचा मगज मिळाला. अक्रोडाचे झाडास साठ वर्षांनीं फळें येतात असा आपल्याकडे समज आहे. तो कसा उत्पन्न झाला असेल हें माहीत नाहीं. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. झाड लावल्यापासून (कलम नव्हे) सहाव्या वर्षीं त्यास फळें धरल्याचें कैलासचे यात्रेंत जिप्ती येथें आम्हीं समक्ष पाहिलें आहे.

### झब्बू

हर्शील येथें आम्हांस प्रथमच झब्बू पाहावयास सांपडला. झब्बू म्हणजे वनगायीचा बैल. ह्या जातीच्या बैलांचें वैशिष्ठ्य म्हणजे त्यांना वशिंड नसतें आणि त्यांच्या शेपट्या घोड्याच्या शेपट्या-प्रमाणें मुळापासूनच लांबलांब केस आलेल्या असतात. अर्थात् त्यांच्या शेपटीस आपल्याकडील बैलाप्रमाणें निराळा गोंडा नसतो. ह्यांच्या अंगावरहि वीतवीत लांबीचे राठ केस असतात. ह्या केसाच्या विणून काढण्या करितात. शेपटीचे केसाचा उपयोग गंगावन व चवऱ्या-कडे होतो.

वास्तविक ह्या उंचीवरील गाई, बैल अगदीं खुजटलेले असतात.

म्हणजे त्यांची उंची गाढवापेक्षां अधिक नसते. असें असतां येथील झब्बू मोठा व धिप्पाड दिसला. ह्या जातीचीं जनावरें आम्हांस इकडे इतरत्र आढळलीं नाहींत. तीं तिबेटांत पुष्कळ आहेत. तीं मोठाडच आहेत. ह्या जनावरांचे डोळे उथळ, मोठाले व गरगरीत वाटोळे असतात. त्यामुळें तीं बटबटीत डोळ्याचीं उग्र दिसतात. बैल पहिल्या प्रतीचा लहरी व हेकट प्राणी असल्यामुळें वेसणीलाहि दाद देत नाहीं. ओझ्यास बळकट पण अती मंद व बेभरवशाचा. तिबेटांतील प्रवासांत आम्हास एकदा असा अनुभव आला कीं, झब्बूचे पाठीवर ओझें लादलेलें, असतांनासुद्धां वाटेंत एके ठिकाणीं नदी ओलांडतांना तो जो पाण्यांत बसला तो मारता मारताहि जागचा हलेचना. सर्व चिरगुट पांघरुणें भिजून गेलीं व खाद्य पदार्थांची नासाडी झाली.

## हरशील म्हणजेच हरप्रयाग

हर्शीलची उंची आठ हजार फूट आहे. हर्शीलपासून हरप्रयाग पर्यंत अर्ध्या मैलाचेंच अंतर पण तेवढ्यांत चार पांच वेळ पाटवजा प्रवाह ओलांडीत जावें लागतें. हरप्रयाग येथें लक्ष्मीनारायणाचें लहानसें मंदिर आहे. भोवतीं उतरण्यासारख्या प्रशस्त खोल्या आहेत. जमीन पाणथळ असल्यामुळें खोल्यांत तक्तपोशी आहे. हरप्रयाग येथें टेहरीचे महाराजांचा एक शेवचा (सफरचंदाचा) मोठा बाग आहे.

## धराली श्री कैलासकडे जाण्याची सोबत.

हरप्रयाग पासून पुढें धराली अडीच तीन मैल आहे. हें गांव भागीरथीच्या डाव्या कांठीं आहे. श्रीकंठ शिखरापासून निघालेली दूधगंगा येथें येऊन भागीरथीस मिळते. संगमावर महादेवाचें देऊळ आहे. ह्या गांवांत विशेषत: धराली लोकांची वस्ती आहे. हे लोक नेलंग खिडीनें पश्चिम तिबेटशीं व्यापार करतात. गंगोत्तरीकडून कैलास मानस सरोवराकडे जाणाऱ्या यात्रींना ह्या व्यापाऱ्यांच्या सोबतीनें जाण्याची चांगली सोय होते.

ह्याच यात्रेंतील बदरीनारायणाचे वाटेवरील जोशी मठ आणि प्रत्यक्ष बदरीनारायण येथूनहि कैलास मानस सरोवराकडे 'नीती' व 'माना' खिडींनीं जातां येतें. पण हे तीनहि मार्ग 'दर्मा' किंवा लिपुलेख खिडींनीं जाणाऱ्या मार्गापेक्षां अधिक लांबीचे, कष्टाचे,

धोक्याचे व खर्चाचे म्हणूनच गैरसोयीचे आहेत. त्यांची सविस्तर माहिती कैलास-मानस यात्रा प्रकरणीं येणारच आहे.

### मुखवा

धरालीसमोर भागीरथीच्या पलीकडील कांठावर मुखवा गांव आहे. तेथें गंगोत्तरीच्या पंडे लोकांची वस्ती आहे. तेथून एक मैलावर मार्कंडेयाचें देऊळ आहे. आगोटीच्या वेळची वादळी हवा आणि पुढें गंगोत्तरी बर्फांत बुडून जाते म्हणून तेथें जाणें अशक्य होऊन बसलेलें असतें. अशावेळीं गंगोत्तरीस बर्फ पडूं लागून तें सर्व वितळून जाई-पर्यंत म्हणजे कोजागिरीपासून अक्षय्यतृतियेपर्यंत गंगेच्या मूर्ति मार्कंडे-याच्या देवळांत आणून ठेवितात; आणि त्यांची नित्याची पूजा अर्चा तेथें करतात. महर्षि मार्कंडेय मुनींनीं घोर तपश्चर्या केली तेव्हां भगवान् नरनारायण ऋषींना तेथें येऊन त्यांस दर्शन द्यावें लागलें होतें. तो आश्रम गंगोत्तरीच्या वाटेवर पुष्पभद्रा नदीचे कांठीं येथेंच होता.

### 'रास्ता तिब्बतकू'

धरालीपासून चार मैलावर 'जंगला'चट्टी आहे. येथें जन्हु राजाचा आश्रम आहे. भागीरथीच्या कांठीं टेहरी संस्थानचा नुसत्या फळ्यांचा एक उतारू बंगला आहे. जंगला-चट्टीपासून दीड मैलावर डावे हातास एक वाट फुटते तेथें 'रास्ता तिब्बतकू' अशी पाटी लागलेली आहे. त्यावरून हीच ती नेलंग खिडींतून कैलासकडे जाणारी वाट असें लक्षांत येतें. 'रास्ता' म्हटला असला, तरी तो कांहीं हेतुपुरःसर केलेला नाहीं. ती एक आडरानांतील मळून झालेली डोंगरी पाय-वाट आहे.

### जान्हवी आणि भागीरथी एक नव्हेत.

नेलंग खिडीजवळ उगम पावलेली एक नदी पश्चिमेकडून येथें येऊन दक्षिणाभिमुखी वाहणाऱ्या भागीरथीस भैरवघाटी येथें मिळते. हिला जाडगंगा अथवा जान्हवी नांव आहे. भागीरथीला जान्हवी मिळाली म्हणण्यापेक्षां भागीरथीच जान्हवीला मिळाली आहे, हें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल; कारण जान्हवीचा प्रवाह भागीरथी-पेक्षां दुप्पट माठा आहे. तो मोठ्या उतारानें वहात येत असल्या-कारणानें त्याचा वेगहि फार जोराचा आहे. इतका कीं, पात्रांतील व

कांठावरील खडकाशीं होणाऱ्या आदळआपटीमुळें सबंध प्रवाह लाटामय व फेसमयच दिसतो. भागीरथीचा उगम गंगोत्तरीच्या पुढें गोमुखापासून धरला तरी तो येथून सव्वीसच मैल होईल. पण जान्हवीचें उगमस्थान नेलंग खिंडीजवळ आहे तें येथून चाळीस मैलांपेक्षांहि अधिक होईल. ह्या दोनहि नद्या चौदा हजार फुटावरील हिम प्रवाहांतून निघालेल्या आहेत. उगमाची लांबी, आणि प्रवाहाच्या पाण्याचें आधिक्य विचारांत घेतलें तर जान्हवीच श्रेष्ठ ठरते. पण भागीरथी गंगा अधिक खोलीवरून वहात येत असल्याकारणानें ती जान्हवीपेक्षां पुरातन ठरते. शिवाय तिचें दैवी पावित्र्य आणि इतिहास-पुराणांतरी तिला प्राप्त झालेलें माहात्म्य पाहून तिचें श्रेष्ठत्व स्वयमेव सिद्धच ठरतें. कसेंहि असलें तरी वस्तुस्थितीवरून जान्हवी म्हणजे भागीरथी नव्हे. त्या दोन स्वतंत्र नद्या आहेत हें स्पष्ट आहे. गंगेच्या प्रवाहाची विविधता अवर्णनीयच म्हटली पाहिजे. बहिरवघाटीचे पायथ्याजवळ जान्हवीचा संगम होतो. तेथें गंगेचें पात्र अतिशय संकुचित, खोल व तेथील प्रवाह संथ असल्यासारखा दिसतो.

### भागीरथीलाहि जान्हवी नांव पडण्याचें कारण

भागीरथीला जान्हवी नांव मिळालें आहे, त्याचें कारण असें कीं, भगीरथानें गंगा पृथ्वीवर आणिली. ती त्याच्या मागोमाग जात असतां वाटेंत जन्हु राजाचा यज्ञ चालू होता. ती यज्ञभूमि गंगेच्या प्रवाहानें जलमय होऊन गेली तेव्हां जन्हूनें ती सर्व गंगा पिऊन टाकली. भगीरथानें गंगेच्या सुटकेकरितां त्यांची प्रार्थना केली. तेव्हां त्यानें आपल्या कानावाटें तिची सुटका केली. अशा रीतीनें जन्हूपासून उत्पन्न झाली म्हणून तिला जान्हवी नांव प्राप्त झालें आहे.

### भैरवघाटी

हर्शीलपासून थेट गंगोत्रीपर्यंत वाट चांगली आहे. देवद्वारची झाडीहि जागजागीं दाट आहे. ह्या झाडांच्या विशिष्ट आकारामुळें त्यांची झाडी कितीहि दाट असली तरी ती मोकळी, खुलावट व चित्ताकर्षक वाटते. बहिरवघाटीचा पहाड वाटेंत आडवा आल्याकारणानें गंगेचा प्रवाह एकेकाळीं रोधला गेला होता. आपल्या प्रवाहानें व चिकाटीच्या रेटयानें पहाड फोडून तिनें आपली वाट एवढी मोकळी

करून घेतली आहे कीं, आतां यत्किंचितहि अडथळा राहिला नाहीं. आतां तिचा प्रवाह संथपणें अक्षय्य वाहूं शकतो.

संगमाशीं लोखंडी पुलानें जान्हवी ओलांडून पुढें गेलें म्हणजे भैरवघाटीचा चढ लागतो. यमुनोत्तरी जवळील भैरवघाटी प्रमाणेंच हाहि चढ खडाच आहे. गंगोत्तरीचे मार्गांत एवढा कठीण चढ दुसरा नाहीं. ह्याहि डोंगरांत झाडी भरपूर आहे. एक मैलाचाच चढ पण चढतां चढतां जीव रंजीस येतो. भैरवघाटी येथें धर्मशाळा आहे, चट्ट्या आहेत, पण पाण्याचें अति दुर्भिक्ष आहे. मैल दोन मैलावरून लाकडी पन्हाळांनीं पाणी आणून तें एका टाक्यांत सांठविलें जातें पण तें फारच अपुरें पडतें. स्नानास पाणी मिळण्याची पंचाईत मग धुण्यास कोठचें मिळणार? येथें भैरवाचें देऊळ व दाट झाडी आहे. ह्या पहाडांत गंधक आहे, त्यामुळें तो नेहमीं ऊबदार असतो असें म्हणतात. पण ही गोष्ट आमच्या लक्षांत आली नाहीं, व कोठें गंधकाचा वासहि आला नाहीं.

भैरवघाटी पासून गंगोत्तरी साडेसहा मैल आहे. वाट चांगली असून तींत जाणवण्यासारखे विशेष मोठे चढ नाहींत. डोंगरावर झाडी व पाणी यथेच्छ असल्यामुळें वाट कंटाळवाणी न होतां रम्य वाटते. वाटेवर एक ठिकाणीं आग लागून तेथील झाडीझुडी जळून राख झाली होती. जागजागीं आगीची थोडथोडी धुगधुगी राहिली होती. आगीमुळें त्या उतारावरचे दगडधोंडे सारखे घरंगळून वाटेवर येत होते. यात्रेकरूंचे सुदैवानें एक माणूस परोपकारबुद्धीनें जाणाऱ्या-येणारास सावधगिरीनें जाण्याची सूचना देत असलेला भेटला.

### भागीरथी—केदारगंगा संगम

गंगोत्तरीचें अलिकडे सुमारे अर्ध्या मैलावर पलीकडील बाजूनें येऊन केदारगंगा भागीरथीस मिळते. गंगोत्तरीच्या पुण्यपावन परिसरांत भागीरथी—केदारगंगा संगमस्थान अधिक पवित्र वाटावें हें अगदीं साहजिक आहे. ह्या स्थानास निसर्गशोभेची जोड मिळून ऋष्याश्रमयोग्य असें तें एक तपोवन झालें आहे. तपोवनाच्या पार्श्वभागीं एक गगनभेदी डोंगर असून तो उतारबंद, रेखीव व डौलदार दिसणाऱ्या शोभिवंत सुरूंच्या झाडाप्रमाणें भासणाऱ्या

देवद्वार वृक्षांनीं आपादमस्तक झाकून टाकिला आहे. तपोवनाच्या पुढून भागीरथीगंगा मोठ्या लगबगीनें बाल स्वरूपांत नाचत बागडत वहात आहे. उजव्या बाजूनें केदारगंगेनें तपोवनांत शिरण्यास बंदी केली आहे.

### कृष्णाश्रम

गंगेच्या पलीकडील काठीं, दरडीवर डोंगराच्या पायथ्याशीं दारुकावनांत दोन चिमुकल्या बंगलेवजा कुटचा डोकावलेल्या दिसतात. हा देखावा मोठा आकर्षक, चित्रमय व रम्य दिसतो. ह्या आकर्षणांतून कांहीं केल्या मन निघेना, म्हणून तेथेंच थांबून संध्यावंदन करून घेतलें. तरीहि तेथून हलावेसें वाटेना. त्या कुटींतच जाऊन राहावें असें मनांत आलें. पण तेथें जाण्यास वाट कोठून आहे, हें कांहीं कळेना. शिवाय त्या कोणाच्या आहेत ? ते आपणास तेथें वस्तीला येऊं देतील का ? वगैरे शंकांनीं निराश होऊन मार्गस्थ झालों. वाटेंतच एका पंड्यानें गांठलें. त्याचेकडून त्या तपोवनांतील आश्रमाची माहिती कळली.

### कृष्णाश्रम स्वामी

तेथें कृष्णाश्रमस्वामी नांवाचे एक स्वामी राहातात. ते कोठचे राहाणारे वगैरे कांहीं माहीत नाहीं. पण ते ब्राह्मण आहेत. येथें येऊन अदमासें वीस बावीस वर्षें होऊन गेलीं. त्यांचें मौनव्रत आहे. ते कोणाशींहि बोलत नाहींत. लहर लागली तर लिहून उत्तर देतात. यदृच्छा जें मिळेल त्यावर ते उपजीविका करितात. चिरगुट पांघरूण ते वापरीत नाहींत. सदैव विवस्त्र स्थितींत असतात. त्यांनीं आपल्याजवळ तत्प्रांतातील एक प्रौढ मुलगी बाळगिली आहे. ती त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवते. टेहरीच्या महाराजांनीं त्यांच्या करितां एक व त्या मुलीकरितां एक अशा दोन कुटचा बांधून दिल्या आहेत. स्वामी चांगले संस्कृत पंडित असून वेदान्त, उपनिषदें त्यांना मुखोद्गत आहेत. त्या मुलीसहि त्यांनीं संस्कृत शिकविलें असून स्वामीस विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरेंहि त्यांचेकरितां ती संस्कृतमध्यें देते. त्यांनीं तिला इतकी पंडिता बनविली आहे. तिच्या उत्तरांत कांहीं कमी अधिक करावेसें वाटलें तर स्वामी लिहून दाखवितात. स्वामी सहसा

कोणाची गांठ घेत नाहींत. त्यांचा ध्यानधारणा योगाचा अभ्यास चांगला आहे. ते समाधीहि लावून बसतात असें ऐकण्यांत आहे.

ही माहिती कळल्यानंतर त्या संगमस्थानावरील तपोवनाविषयीं इतकी ओढ वाटावी हे साहजिकच आहे. त्या स्वामींचे सहवासांत चार दिवस काढावे, निदान सांपडेल तेवढा सहवास करावा, असा बेत केला. पण 'मनसा चिंतितं कार्यं दैवोऽन्यत्र चिंतयेत्' असा दुसरेच दिवशीं अनुभव आला.

### भूर्ज–पत्र

डोंगरांत देवद्वार वृक्षांचौ दाटी आहे. गंगेच्या डाव्या कांठींहि अशीच दाट झाडी आहे. त्यांत भूर्जपत्राचे वृक्षहि पुष्कळ आहेत. भूर्जपत्रवृक्ष पन्नास फुटापर्यंत उंच वाढतात. त्यांच्या लाकडाची अंतर साल म्हणजे भूर्जपत्राचीं वेष्टणें. ह्या झाडाच्या लाकडाचे हीर दाट व घट्ट असल्यामुळें पडगे लोटयासारख्या आकाराचीं कातून केलेलीं भांडीं येथें मिळतात. भूर्जपत्र कागदासारखें पातळ पण चिवट असतें. त्याचा उपयोग कागदासारखाच लिहिण्यास, पुडे बांधण्यास व केळीचे पानाप्रमाणें जेवणासहि करितात. जंतुनाशक गुणहि त्याच्या अंगीं आहेत. पंधरा वर्षें होऊन गेली. आम्ही येतांना तेथून एक भूर्जपत्र आणिलें आहे. इतके दिवसांत त्यास कीड लागली नाहीं किंवा जीर्ण होऊन तुकडे पडतात तसेंहि झालेलें नाहीं. तें राखून ठेवण्याकरितां कसली विशेष काळजीहि घेतलेली नाहीं.

### गंगोत्तरी

गंगोत्तरीस पोहोंचण्यास सहा वाजले. हवा स्वच्छ होती. काळी-कमळीवाल्यांचे धर्मशाळेचे व्यवस्थापक एक संन्यासी होते. त्यांनीं दुसरे मजल्यावरील एक स्वतंत्र खोली आम्हांस देऊन कांहीं जिन्नस लागल्यास त्यांजकडे कळविण्यास सांगितलें. एक कुलूप–किल्लीहि त्यांनीं आम्हांस देऊन ठेविली. खोलींत सामान ठेवून आम्ही शेजारींच खालीं असलेल्या गंगेच्या देवालयांत जाऊन त्रिमूर्ति गंगांचें दर्शन घेतलें. दरड उतरून भागीरथीचे कांठीं जाऊन हातपाय धुतले. आचमन–मार्जनानें शुचिर्भूत होऊन सायंसंध्या केली व गंगामाईचें पूजन करून आरती केली. येथें घाट किंवा विशेष पाणवठा असें कांहीं

नाहीं. पाण्याचा गारवा हातापायांत कळा येऊनच जाणवला.

यमुनोत्तरीपासून साडेअठ्ठ्याण्णव मैल गंगोत्तरी आहे. आम्ही येथें सात दिवसांत येऊन पोहोंचलों. यमुनोत्तरीपेक्षां हें स्थान मोठे व मोकळें आहे. यमुनोत्तरीच्या मानानें येथें यात्राहि दसपट आहे. गंगोत्तरीची उंची ९९५० फूट, जवळजवळ यमुनोत्तरी इतकीच आहे. येथें तीन चार मोठमोठ्या धर्मशाळा असून खोल्याहि चारचार पांचपांच माणसें मोकळेपणीं राहतील अशा प्रशस्त आहेत. दहा पंधरा पंड्यांचीं घरेंहि आहेत. हीं सर्व डोंगर पायथ्यास भागीरथीच्या उजव्या कांठीं दरडीवर आहेत.

## दशाहार उत्सव

आम्ही गंगोत्तरीस पोहोंचलों तो दशाहाराचा दुसरा दिवस होता. दशाहारांत गंगेचा उत्सव असतो. सकाळ संध्याकाळ हरद्वारप्रमाणेंच गंगेची मोठी आरती होते. आसपासच्या गांवांतून लोक गंगेच्या पालख्या घेऊन येथें आले होते. पालखी-प्रदक्षिणा करून पुरुष मंडळींनीं फेर धरला आणि ढोलाच्या तालावर नाचत नाचत तीन प्रदक्षिणा केल्या. बायकांनीं पायांत पैंजण बांधून देवळापुढें नाचून गाणीं म्हटलीं. संध्याकाळीं गंगेची आरती होऊन पालखी निघाली. तीर्थ वाटलें. हा नित्य नैमित्तिक सोहळा बघण्यासारखा होता.

नित्याप्रमाणें आम्हीं सकाळीं उठलों पण आज मार्गक्रमण नव्हतें. हवेंत गारठून आकडी वळण्याची थंडी होती. त्याकारणानें खोलींतून तोंड सुद्धां बाहेर काढण्याची पंचाईत पडली. तथापि उजाडण्यापूर्वींच मुखमार्जनादि विधि उरकून घेतले. गंगेवर जाऊन स्नान करण्याची इच्छा होती, पण धीर झाला नाहीं. चांगलें ऊन पडल्यावर देवळाभोंवतीं व वाळवंटांत जाऊन फेरफटका करून आलों.

## गंगा प्रवाह व तिचें येथील स्वरूप

गंगोत्तरी येथें गंगेचें पात्र तिच्या नांवाला शोभेसें मोठें नाहीं. देवळापासून तें तीस चाळीस फूट खोलीवर आहे. पात्रांतील प्रवाह ओढ्यासारखा अगदींच चिमकुला व उथळ असला तरी त्याची वहाळ जोरदार आहे. सकाळपेक्षां दोनप्रहरीं गंगेसारख्या हिमोद्भव नद्यांचें पाणी उगमाजवळचें व कांठचें बर्फ वितळल्यामुळें चार दोन फुटांनीं

वाढतें. बर्फाचे पाण्याचा पूर असतो तेव्हां प्रवाह भिंगासारखा अगदीं स्वच्छ असतो, पण त्यांत जेव्हां पावसाच्या पाण्याची भर पडते तेव्हां मात्र त्या रेंदाड पाण्याकडे बघवतसुद्धां नाहीं. आम्ही येथें पोहोंचण्या-पूर्वीं पाऊस पडून गेलेला होता. त्या कारणानें पाण्याचें गढूळ आणि तोकडें रूप पाहून हरद्वार येथें उत्पन्न झालेल्या प्रसन्नतेवर विरजण पडलें. पहाडांतील सर्व प्रकारचे धोके पत्करून व इतक्या लांबच्या प्रवासाचा देहदंड सोसून येथें आलों पण तिच्या दिव्य स्वरूपाचें दर्शन, तिच्या शुद्धोदकाचें स्नान आणि आचमन आमच्या भाग्यांत नव्हतें. येथून निघतांना आपल्याबरोबर न्यावयाचें गंगोदकहि गढूळ झाले-लेंच नेण्याची पाळी आहे, ह्या विचारानें मन थोडेंसे खिन्न झालें.

गंगा स्नान

आभाळांत मळभ नसतांनासुद्धां उन्हांत उनपण नव्हतें. थंडीनें तें हतप्रभ होऊन गेलें होतें. गंगास्नानांकरितां यात्री वाळवंटांत जमू लागले असले तरी स्नान करण्याचा हिय्या कोणाचाच होत नव्हता. मात्र संकल्प सांगण्यास धोंडभट्टी करून पंडे सिद्ध होऊन आले होतें. आम्हीं आपला पोक्त विचार केला आणि बेताचाच असलेला उजेड पाहून निरनिराळ्या बाजूनें देवळाचें, मूर्तीचे व आजूबाजूचे फोटो घेण्यांत दहा वाजेपर्यंत काळ काढला. तरीसुद्धा उन्हाचें कोवळेपण मोडण्याचा रंग दिसेना. कित्येक लोक स्नानें उरकून अंगाभोंवती ऊबदार पांघरुणें लेपाटून हुडहुडत बसलेली दिसली. येथील स्नानाचा प्रकार म्हणजे एक स्नानाचें सोंगच वाटलें. ओलें लावून घेऊन जेम-तेम दोन–तीन तांबे पाण्यांत स्नान पूर्ण ! हा कांहीं कोणाचा दोष नाहीं. चाळीस अंशाचें सुमाराची थंडी आणि काल्यासारखें गार ठणक बर्फाचे पाणी. पाण्यांत पाय पडतांच चटका बसून मस्तकांत तिडिक जाते आणि कळा येऊन बोटांचे आकडे वळतात. गंगोत्तरीचें स्नान म्हणजे तें एक खरोखरीचेंच प्राणपणाचें दिव्य आहे. कित्ये-कांचे अंग बधीर होऊन त्यास बेशुद्धीहि येते. आमच्या आजींच्या तोंडून त्या वेळच्या अशा लोकांकरितां काय उपाय योजना करत ती ऐकली होती. तो प्रकार असा. पांच सहा माणसे अडवारून ठेवता येतील एवढ्या जागेसभोंवती वाळवंटांत पण गंगेच्या अगदी कांठाशीं

आगट्या पेटवून ठेवीत. माणसाला स्नान घातलें कीं दोघे त्यास तसेंच उचलून आगट्याच्या कड्यांत ठेवीत. तेथें शेक लागून तेव्हांच थंडी जाई आणि तरतरी येई. पण आमच्या वेळीं असा प्रकार दिसला नाहीं. प्रत्येकजण जिवाच्या करारावर स्नान करीत होता. पण येथवर येऊन स्नान न करतां परतला असा कोणीहि दिसला नाहीं.

### गंगा मंदिर

गंगामंदिर गंगेच्या कांठींच पण उंच दरडीवर आहे. तें सर्व दगडी बांधणीचें असून गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत बांधलेलें असल्याकारणानें त्या बांधणींतील बौद्धी थाट समूळ नाहींसा होऊन त्यांत आधुनिक पद्धति स्पष्ट दिसते. देवळाची मांडणी चौकोनी असून त्यांत दोन भाग आहेत, एक गाभारा व दुसरा सभामंडप. पर्वतीस देवदेवेश्वराच्या देवळाच्या चार कोंपऱ्यावर चार उपदेवळें आहेत, त्याचप्रमाणें पण देवळाच्या वरच्या चारहि कोंपऱ्यांवर चार उपदेवळांसारखी बांधणी आहे. मुख्य कळसाच्या अष्टदिशांस त्यास चिकटलेले आठ कळस आहेत. सर्वच कळस शिखरवजा नसून घुमटाप्रमाणें बसकट पण चौकोनी आहेत. देऊळ पूर्वाभिमुखी असून गंगा दक्षिण दिशेस पूर्वेकडून पश्चिमेस वहात आहे. गाभाऱ्यांत एकाच वेळीं आठ दहा आणि सभामंडपांत पन्नास साठचेवर माणसें सहज मावतील

### देवतार्चन

गाभाऱ्यांत मधोमध कमरेएवढ्या उंचीचें लांकडी सिंहासन असून त्यावर एक हात उंचीच्या, संगमरवरी दगडाच्या तीन मूर्ति आहेत. मधली मूर्ति गंगेची. तिच्या डाव्या हातास यमुना व उजव्या हातास सरस्वती. गंगा व यमुना ह्या दोन्ही मूर्तींस सोन्याचे मुखवटे घातलेले असतात. ह्या मूर्तींच्या पायांशीं पण खालच्या पायरीवर आणखी दोन लहान मूर्ती आहेत. गंगेच्या डावीकडे भगीरथ व उजवीकडे अन्नपूर्णा. देवळांत देव्हारा नाहीं. आपलेकडे वासंतिक गौरीचें हळदीकुंकवाकरितां गौर मांडून भोंवतीं सजावट करितों त्याप्रमाणें सिंहासनाभोंवतीं मखर करून तें नक्षीदार रंगीबेरंगी रेशमी कापडांनीं लपेटलें होतें. पडदे, छत, झालरी सर्वच चित्रविचित्र रंगाच्या झगझगीत रेशमी कापडांचें होतें. मेघडंबरीचे ऐवजीं छताखालीं गजनीच्या कापडाचें

एक मोठें थोरलें गोंडे लावलेलें छत्र मूर्तीच्या वर टांगलें होतें. पहाडी राहणीचे लोक असले तरी त्यांनीं उपलब्ध साधनसामुग्रींत करतां येईल तेवढी आपल्या आवडीनें सजावट करून देवळांत शोभा आणली होती. गंगेच्या देवळाजवळच बाहेरचें अंगास एक लहानसें भैरवाचें देऊळ आहे.

गंगोत्तरी हे मानीव उगमस्थान

गंगोत्तरी येथें गंगेचें उगमस्थान कोठेंच दिसेना. पंडेजींस विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, येथील गंगेचें उगमस्थान पुरातन काळापासून मानलें गेलेलें आहे; प्रत्यक्ष तें येथें नाहीं. गंगेचा उगम येथून पुढें पूर्वेस अठरा मैलांवर साडेतेरा, चौदा हजार फूट उंचीला 'गोमुख' आहे त्यांतून होतो.

सगरपुत्रांचा उद्धार करणारी, तीच गंगा

श्रीमुख म्हणजेच श्रीकंठ पर्वत. त्यावर आपल्या शापदग्ध पितरांचा उद्धार व्हावा म्हणून राजा भगीरथानें गंगाप्राप्तीकरितां महान् तपश्चर्या केली; तेव्हां प्रसन्न होऊन गंगेनें पृथ्वीवर अवतरण्याचें मान्य केलें. पण स्वर्गांतून खालीं पृथ्वीवर तिची धारा आदळली तर पृथ्वी दुभंगून तिचे शतशः तुकडे होतील अशी शंका तिनें प्रदर्शित केली. तो आघात एकटे शंकरच सहन करूं शकतील, ह्या विचारानें त्या दीर्घोद्योगी राजानें सुमेरूचा जो सतोपथ भाग आहे तेथें जाऊन शंकराच्या कृपेसाठीं ( हा पर्वत भाग बदरीनारायणाजवळ आहे ) पुन्हां दीर्घ तप केलें. शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं गंगा–अवतरणाचा भार आपल्या मस्तकीं लीलेनें धारण केला. पण तेथें त्यांच्या जटाभारांत गंगा जी गडप होऊन गेली तिचा थांगच लागेना. तेव्हां भगीरथास पुन्हां शंकराची आराधना करावी लागली. मोठ्या चिकाटीनें प्रयत्नाची शिकस्त करणें ह्यासच भगीरथ प्रयत्न म्हणतात तो हा असा. शंकरांनीं प्रसन्न होऊन आपल्या जटाजुटांत अडकून पडलेल्या गंगेची मुक्तता केली. एका धारेनें मस्तकावर अवतरलेल्या गंगेस एकाच्या एकवीस धारा होऊन बाहेर पडावें लागलें. ह्या धारांपैकीं भगीरथाच्या मागोमाग जी आली तीच मुख्य मोक्ष–धारा. तिनेंच भगीरथाच्या साठ हजार पितरांचा उद्धार केला. इतर अलकनंदा,


मंदाकिन्यादि धारा देवप्रयाग पर्यंत मुख्य धारेस येऊन मिळल्या आहेत. त्यांच्यापैकीं कांहींचीं संगमस्थानें—प्रयाग, वाटेवरच लागत असल्यामुळें प्रसिद्ध आहेत: विष्णु, नंद, रुद्र, कर्ण, प्रयाग, वगैरे. भगीरथाच्या मागोमाग गंगा निघाल्यानंतर गंगेच्या त्या एकनिष्ठ उपासकानें गंगोत्तरी येथें एक दिवस वास्तव्य करून कृतज्ञतेनें गंगेची षोडशोपचारें पूजा केली. ह्याकारणानें गंगोत्तरीस क्षेत्रत्व येऊन तिचें माहात्म्य वृद्धिगत झालें आहे. ज्या दिवशीं शंकरांनीं गंगेस मुक्त केलें तो दिवस ज्येष्ठ शुक्ल सप्तमी होता, म्हणून तो दिवस गंगेच्या जन्मावताराचा असें समजतात व ह्या तिथीस दशहरासप्तमी म्हणतात. दहा दिवस गंगेचा उत्सव असतो.

### गौरीकुंड वा गोमुख—गंगेचें उगमस्थान

गोमुखाजवळचा प्रदेश कसा काय आहे ? तेथें वस्ती आहे काय ? वाटेंत उतरण्याची सोय चट्टया, धर्मशाळा आहेत का ? आम्हांस तेथें जातां येईल का ? वगैरे माहिती पंडेजीस विचारली. ते म्हणाले सुमेरु म्हणजे मेरु नांवाचा जो श्रेष्ठ पर्वत आहे त्याच्या चारहि दिशास रुद्र, हिमालय, वसू व स्वर्गारोहणादि बर्फाच्छादित अनेक शिखरें आहेत. ह्यांपैकीं स्वर्गारोहण शिखर हेंच तें पांडवांचें स्वर्गारोहणस्थान अशी समजूत आहे. सुमेरु पर्वताचा श्रीमुख म्हणजेच श्रीकंठ पर्वताचा जो भाग आहे तेथपर्यंत जवळ जवळ वीस मैल हिमप्रवाह ओहोळांतून सरकत आला आहे. तेथें त्याच्या तोंडाशीं जी एक गोमुखसदृश बर्फमय कपार आहे त्यांतून गंगा नदी अवतीर्ण झालेली प्रत्यक्ष दिसते. ह्याच स्थानाला गौरीकुंड असें म्हणतात. गौरीकुंडाच्या कांठचा प्रदेश उत्तरोत्तर उंच होत गेलेला आहे. गोमुखांतून पडणारी धारा तीन चार पुरुष उंचीवरून खालीं पडते, ती नेमकी शिवलिंगावर पडते. तेथून पुढें वाहणारा हा गंगेचा प्रवाह रुंदीला दहा पंधरा फूट व खोलीस गुडघाभरसुद्धां असेल नसेल, तथापि तो प्रवाह गोमुखांतून निघल्यापासून पुढें, मोठ्या जोरानें वहात आहे.

### गौरीकुंडास जाण्याच्या अडचणी

गोमुखास जाण्यास वाट चांगली नाहीं. वाटेंत चट्टया धर्मशाळा नाहींत. इतकेंच काय पण कोठेंहि वस्ती नाहीं. जाण्यायेण्यांत जे काय



गंगोत्तरी – गंगाप्रवाह व गगोत्तरी पान १८८



श्रीगंगोत्तरी मंदीर व मूर्ति- यमुना, गंगा, सरस्वती.
ज्येष्ठ शुद्ध २ सोमवार शके १८५७ (ता. ३।६।१९३५)

गंगोत्तरी – गंगामंदीर पान १४६

दोन–चार दिवस लागतील त्याकरितां शिधासामुग्री वा टिकतील व पुरतील अशा खाद्य पदार्थांची बेगमी आपली व बोजेवाल्यांची येथूनच करून बरोबर घेतली पाहिजे. निवाऱ्याकरितां तंबू, राहुटी घेतली पाहिजे. नाहींतर उघडयावरच दिवसरात्र काढण्याची पाळी. तुम्हीं केलेले बोजेवाले ह्या वाटेचे माहितगार असले तर ठीकच. पण तसे नसतील तर दुसरे केले पाहिजेत. निघतांनाच चौकशी करून बोजेवाले ठरविले असते तर बेतांत मिळाले असते. आतां आयत्या-वेळीं चार पैसे अधिक मागणारच. ह्या दिवसांत तिकडे जाणें सोयीचें नसतें. कित्येक ठिकाणीं बर्फ विरघळून जाऊन वाटाहि मोकळ्या व निर्धोक झाल्या नसतील. ह्यापेक्षां श्रावण अखेर किंवा भाद्रपद मासीं जाणें सोयीस्कर. तेव्हां दैववशात् एखादी सोबतहि मिळण्याचा संभव असतो. प्रत्येक वर्षीं हजारांतून एखादाहि गोमुखास जात नाहीं.

निश्चयाचे बळ तुका म्हणे तेंची फळ

ह्या यात्रेस निघण्याचे वेळीं ही माहिती आम्हांस नव्हती. नाहींतर गोमुखापर्यंत आम्ही जाऊन आलों असतों. वस्ती नाहीं, रस्ता नाहीं, उतरण्यास निवाऱ्याकरितां झाडझूड, डोंगरकपार वा गुहा नाहीं, कांहींहि वस्तु मिळणार नाहीं अशा स्थितींत आम्ही कैलासकडे महिना-भर व तेहि एकोणीस हजार फूट उंचीपर्यंतचा प्रवास करून अनुभविक झालों आहों. त्यावरून निःशंकपणें वाटतें कीं, ज्यानें गंगोत्तरीपर्यंतचा प्रवास पायीं केला आहे तो तीन चार दिवसांचा अशा स्थितींतील प्रवास व तोहि चौदा हजार फूट उंचीपर्यंतचा सहज करूं शकेल. त्यांत धोका किंवा भिऊन जाण्यासारखें अधिक कष्ट कांहीं नाहींत. निष्ठा, निग्रह आणि दृढ इच्छा मात्र असली पाहिजे. अवघड वाटणारी गंगोत्तरी सुलभ झाली तर गौरीकुंड कां होणार नाहीं ?

प्रति गौरीकुंड

गंगोत्तरी येथें गंगेच्या पलिकडील काठीं पाव मैलावर केदारेश्वराचें देवालय आहे. भोंवतीं दाट झाडी आहे. त्यांत विशेषेंकरून देवद्वार व भूर्जपत्राचे वृक्ष आहेत. तेथें गौरीकुंड स्थान आहे, तें म्हणजे गोमुखा-जवळील गौरीकुंडाचीच प्रतिमा. एका निमुळत्या खडकाच्या चारपांच फूट रुंदीच्या जागेंतून वीस पंचवीस फूट खोलीवर गंगानदी एकदम

उडी घेत आहे. धारेच्या खालीं डोहांत शंकराची पिंडी आहे असें सांगतात. ह्याहि स्थानास गौरीकुंड असें नांव ठेविलें आहे. उगमापासून येथपर्यंतच गंगा भरून घ्यावयाची. ह्याच्या पुढें नाहीं—असा प्रघात असल्याचें सांगतात. गौरीकुंडाजवळील नैसर्गिक सृष्टिशोभा शांतिप्रद व रमणीय आहे.

## भागीरथी गंगेचें माहात्म्य

यच्चयावत आर्य हिंदूला भागीरथी गंगेचें माहात्म्य पराकोटीचें पवित्र वाटत आलें आहे. ही जी आमची एकांतिक निष्ठेची तिजविषयींची पूज्य भावना ती कांहीं आजकाल उत्पन्न झालेली नाहीं. तिचीं पाळेंमुळें अतिप्राचीन काळांत रुजून गेलेलीं दिसतात. वैदिक मंत्रांतून गंगा—यमुनादि महानद्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाइलेलीं आहेत. ज्या अर्थी संहिता मंत्रांतून त्यांचा उल्लेख झालेला आहे त्या अर्थी संहिता कालापूर्वींच म्हणजे निदान दहा पांच हजार वर्षांमागें भागीरथी गंगेच्या माहात्म्यानें आर्यांच्या अंतःकरणांत खोल ठाव घेतलेला होता. त्याच वेळीं तिला देवतारूप प्राप्त झालें होतें.

## वेदांत गंगेचा देवता रुपानें उल्लेख

' इमं मे गंगे यमुने सरस्वति शुतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या ।
असिक्न्या मरुद्वृधे वितस्तया ऽऽ र्जीकीये शृणुह्या सुषोमया। '

हा मंत्र ऋग्वेद व तैत्तिरीय आरण्यक ह्यांत आलेला आहे. ह्या मंत्रांतील सात नांवें गंगा प्रमुख नद्यांचीं आहेत तीः—गंगा, यमुना, सरस्वती, शुतुद्रि, परुष्णी, असिक्न्या व मरुद्वृधा व तीन त्यांच्या उपनद्यांचीं आहेत. तीः— वितस्तया, आर्जीकीया व सुषोमया. ह्या नदीरूप देवतांची प्रार्थना केली आहे कीं, हे नद्यांनों आम्ही तुमचीं स्तुतिस्तोत्रें गातों तीं ऐका आणि त्यांचा स्वीकार करून आम्हांवर प्रसन्न व्हा. ( म्हणजे तुमच्या वात्सल्यानें आमच्या धारणपोषणादि वस्तूंची समृद्धि होईल. )

## अंतर्वेदी ही तपोभूमी

तैतीर्य उपनिषदांतील मंत्र, हिरण्यकेशीयांच्या संध्योपासनेंत नित्य सकाळ संध्याकाळ म्हटला जातोः—

' नमो गंगायमुनयोर्मध्ये ये वसन्ति ते मे प्रसन्नात्मानश्चिरंजीवितं वर्धयन्ति। नमो गंगायमुनयोर्मुनिभ्यश्च नमो गंगायमुनयोर्मुनिभ्यश्च

नमः ।' ह्याचा भावार्थ असा कीं, जे ऋषी, मुनी, महात्मे, गंगा-यमुनांच्या मध्यें असणारा प्रदेश-ज्यास आपण अंतर्वेदी समजतों, त्या प्रदेशांत वास्तव्य करून राहिले आहेत आणि जे प्रसन्न मनानें आमच्यावर अनुग्रह करून आम्हांस आयुरारोग्य व तुष्टीपुष्टी देऊन आमचें संवर्धन करितात त्या महात्म्यांना (नित्य सकाळ संध्याकाळ) आम्ही त्रिवार म्हणजे काया-वाचा-मनें नमस्कार करितो.

शतपथ ब्राह्मण ३-४-५-११ ह्यामध्यें दौष्यंत भरतानें केलेल्या अश्वमेधादि यज्ञसंबंधांत गंगायमुनांचे उल्लेख आलेले आहेत.

### प्रयाग-त्रिवेणी संगम महात्म्य

ऋग्वेदाच्या बाविसाव्या परिशिष्टांत गंगायमुना संगमस्थान-ज्यास आपण प्रयाग येथील त्रिवेणी संगम म्हणतों, त्यातील स्नान-माहात्म्याविषयीं उल्लेख आलेला आहे तो असाः—

'सिता सिते सरिते यत्र संगथे तत्राप्लुतासो दिवमुत्पतन्ति ।
ये वै तन्वं विसृजन्ति धीरास्ते जनासो अमृतत्वं भजन्ते '

### प्रयागस्नानफल-स्वर्गप्राप्ति

ह्या मंत्रांचा भावार्थ असा कीः-गंगायमुनांचें संगमस्थान जें प्रयाग तेथें त्रिवेणी संगमांत बुडया मारून जे स्नान करितात त्यांना स्वर्ग प्राप्ती होते,

### प्रयागांत देह विसर्जनफल-मोक्षप्राप्ति

आणि जे महात्मे आपला देह तेथें विसर्जन करितात म्हणजे तेथें जलसमाधि घेतात किंवा नित्य स्नानाकरितां आमरण तेथें राहून अंतीं आपला देह तेथेंच ठेवितात त्यांचा जन्ममरणाचा फेरा चुकून ते ब्रह्मपदास पोहोंचतात.

ह्या मंत्रावरून वैदिक कालांत गंगास्नानाचें महत्त्व केवढें वाढलें होतें हें चांगलें दिसून येतें. देह नाहीं तर देहपातानंतर सोय असेल तेथें तो मृत देहच-प्रेत, आणि इतरत्र, देहास ताठरपणानें आधार भूत असलेला, व त्यांतलें त्यांत न नासतां कुजतां अधिक काळ टिकणारा, असा जो देहाचा घटक भाग, अग्निसंस्कारानंतरहि जो अवशेष राहतो, तो म्हणजे अस्थि, ह्यांचें विसर्जन प्रयाग येथें त्रिवेणी संगमांत म्हणजेच ' सितासितेसरिते 'यत्र संगथे ' करण्याची प्रथा

कशी उत्पन्न झाली आहे ह्याची चांगली संगति लागते. धर्मवचनावर एकांतिक श्रद्धा त्याचप्रमाणें ध्येयावर अढळ दुर्दम्य निष्ठा असल्याशिवाय सहज लीलेनें प्राणत्याग करण्याचा धीर होणें, ही गोष्ट इतकी साधीसुधी नाहीं. सहस्रा सहस्रांतसुद्धां एखादा इतक्या तीव्र निष्ठेचा सांपडेल किंवा नाहीं ह्याची वानवाच आहे.

प्रयाग येथें देह–विसर्जनाची फलश्रुति मोक्षप्रद असल्याचें वेदवाक्यावरून कळल्यामुळें वैदिक आर्यांच्या अंतःकरणांत प्रयागाविषयीं निस्सीम पूज्यभाव उत्पन्न होणारच. वेदवाक्य म्हणजे साक्षात् परमेश्वराचाच तो शब्द. 'यस्य निश्वसितं वेदाः'

वाल्मिकी महामुनींनींहि गंगाष्टकांत अशाच प्रकारचें गंगामाहात्म्य वर्णन केलें आहे. 'त्वत्तीरे वसतस्त्वदंबु पिबतस्त्वद्वीचिषु प्रेंखतः। त्वन्नामस्मरतस्त्वदर्पित दृशःस्यान्मे शरीरव्ययः।'

ते म्हणतात, 'हे गंगे तुझ्या कांठीं राहात असतांना,तहान भागविण्यासाठीं तुझेंच जलपान करीत असतांना, तुझ्या लाटांबरोबर हेलकावे खातांना, तुझ्याच नामजपाच्या निदिध्यासांत असतांना आणि तुझ्याकडे दृष्टि लागली असतांना म्हणजे तुझ्याच ध्यानांत निमग्न असतांना माझा देह पडावा. तुझे कारणीं देह माझा पडावा.

### गंगा अवतरण मृतजीवांचे उद्धारार्थ

गंगा ही पुण्यपावन असल्याचा असाच निर्वाळा आणखी एका कथेवरून मिळण्यासारखा आहे. वास्तविक तिचें अवतरणच ह्याच कार्यासाठीं झालेलें आहे. सगर राजानें अश्वमेधाची दीक्षा घेतली तेव्हां त्याचा घोडा पृथ्वीवर अनिर्बंध संचार करूं लागला. त्याचे संरक्षणास सगराचे साठ हजार पुत्र त्याचे मागें होते. एका निपाणी ओसाड प्रदेशांत तो अश्व गुप्त झाला. तें पाहून सर्व पुत्र भयभीत झाले. त्यांनीं दशदिशांस शोध केला, पण तो अश्व कोणी चोरून नेला, तो कोठें आहे ह्याचा शोध लागेना. हें वृत्त पित्यास कळविलें तेव्हां तो संतप्त झाला आणि त्यानें मुलांना आज्ञा केली कीं, तो यज्ञीय अश्व आणल्याशिवाय मला तोंड दाखवूं नका. अशी पित्याची आज्ञा होतांच त्या पितृभक्त मुलांनीं प्राणपणानें शोध चालविला. ईशान्य दिशेचे बाजूस त्यांना एक अत्यंत दुर्गम अशी घळ दिसली. त्यांनीं तींतून जातां येईल

अशी एक वाट खणून केली. तींतून बाहेर निघतांच त्या प्रदेशांत त्यांना आपला अश्व चरत असतांना दिसला. तेथें जवळच कपिल महामुनींचा आश्रम होता. ह्यांनींच आपला अश्व पळविला असावा ह्या समजुतीनें त्या पुत्रांनीं कपिल समाधींत असतां त्यांवर शस्त्राघात केले. तेव्हां कपिलांनीं क्रोधयुक्त दृष्टीनें त्यांजकडे पाहून त्यांचें भस्म करून टाकलें.

हें वृत्त सगरास समजलें. त्याचा असमंज नांवाचा पुत्र होता. त्याच्या दुर्गुणांमुळें त्यास राज्याबाहेर घालवून दिलेलें होतें. त्याचा मुलगा म्हणजे सगराचा पौत्र अंशुमान, ह्यास सगरानीं आपला हृद्रोग सांगितला कीं, तुझ्या वडिलास घालवून द्यावें लागलें, साठ हजार पुत्र अश्वशोधाचे पायीं दग्ध होऊन गेले व यज्ञहि थांबवून ठेवावा लागला आहे. अशा स्थितींत मला तुझाच तेवढा आधार आहे. यज्ञ पुरा झाला नाहीं तर मला नरकप्राप्तीच आहे. तूंच जाऊन अश्व घेऊन आलास तर तरणोपाय आंहे.

पितृभक्त अंशुमानानें आजोबांची आज्ञा शिरसावंद्य मानून लगेच तो कपिलाश्रमीं गेला. तेथें तो अश्व होताच. त्यानें कपिलास सर्व वृत्तांत सांगितला. तेहि प्रसन्न होऊन अंशुमानास म्हणाले 'तूं जें जें मागशील तें तें मी तुला देतों.' असें म्हणून त्यानें तो अश्व त्याचे स्वाधीन केला. अंशुमानानें विनंती केली कीं हे माझे सर्व चुलते आपल्या क्रोधाग्नीनें दग्ध होऊन पडले आहेत त्यांचा उद्धार व्हावा.

कपिलांनीं सांगितलें कीं त्यांचा उद्धार होईल. त्याकरितां स्वर्गांतून गंगा पृथ्वीवर आणिली पाहिजे. त्याकरितां तिची व शंकराची आराधना करून त्यांस संतुष्ट केलें म्हणजे त्यांच्या वरप्रदानानें स्वर्गंगा येथें येऊन ह्या सगरपुत्रांचा उद्धार होईल. शंकरास प्रसन्न करून घेण्याचें काम त्याचा पुत्र दिलीप ह्यानें केलें, पण त्यास त्यांत यश आलें नाहीं. त्याचा पुत्र भगीरथ ह्यानें तें काम शेवटास नेऊन स्वर्गंगा पृथ्वीवर आणिली. त्यामुळें कपिलांच्या आशीर्वादाप्रमाणें त्या सर्व साठ हजार सगरपुत्रांचा उद्धार झाला. ( भगीरथाच्या प्रयत्नाचें वृत्त पृष्ठ ९ वर आलेलें आहे.) ह्या कथेचें सार असें म्हणता येईल कीं मृत देहाच्या अस्थींनाच काय पण रक्षेला सुद्धां गंगाजलाचें स्नान घडलें तरी मृतात्म्याचा उद्धार होतो.

## गंगेत प्रेत वा अस्थि विसर्जनाच्या प्रथेचीं संगती

ह्या विचारपरंपरेचा पगडा तो स्वतःला हिंदु म्हणवून घेण्यास मुरकत असला तरी त्याच्याहि मनावर पक्का डांबून बसला आहे. ह्याचें अगदीं कालचें उदाहरण आपणा सर्वांच्या डोळ्यांसमोर घडलेलें आहे. निधर्मी राज्याचा उठल्यासुटल्या टाहो फोडणाऱ्या गांधीभक्तांनीं महात्माजींची रक्षा गंगेंतच विसर्जित केली. इतकेच नव्हे तर ह्या देशांतील बहुतेक नद्यांत ती चिमूट चिमूट तरी विसर्जित केली आहे. हाच ह्या संस्कृतीचा विशेष आहे.

असल्याच विचार–प्रभवानें गंगेंत देह विसर्जन करण्यासाठीं तिच्या कांठच्या दहापांच मैलावरील गांवांतून प्रेतें खांद्यावरून वाहून आणतात. एवढ्या लांब तीं वाहून नेणें, हें काम सोपें नसतें. त्यांत कष्टसायास तर आहेतच पण मनुष्यबळहि लागत असतें. असें असलें तरी श्रद्धेपुढें असल्या अडचणींना थारा मिळत नसतो.

आपल्या अंत्य संस्कारांत प्रेतदहन करावयाचें असतें. गंगाकांठीं प्रत्यक्ष काशींत सुद्धां प्रेतास नांवापुरताच अग्निसंस्कार करितात. त्याची रक्षा होण्यापूर्वींच म्हणजे तें अहाळून कावेजलें कीं त्याच स्थितींत तें प्रेत गंगेच्या प्रवाहांत सोडून देतात. ह्या चालीची संगति गंगेंत देह अर्पण केल्यानें जी फलप्राप्ति होते त्या विचारसरणीनें चांगली ध्यानांत येतें.

भागीरथी गंगेविषयींची पूज्य भावना आजच्या कालांतहि तितकीच आपणांत जागृत आहे, किंबहुना सुलभ मार्ग आणि सुरक्षित प्रवास होऊं लागल्यामुळें ती वाढली आहे असें समजण्यास अडचण नाहीं. प्रत्येक माणूस ती स्त्री असो वा पुरुष असो त्याची प्रबल महत्त्वाकांक्षा असते कीं, उभ्या आयुष्यांत निदान एकदा तरी गंगास्नान करीन. ही तीर्थयात्रा घडणें हा आयुष्यांतील एक महद्भाग्याचा अपूर्व योग आहे असें तो समजत असतो. आयुष्यांत यशस्वितेनें कामधंदा नौकरीचाकरी केलीं, घरदार-शेतवाडी केली, मुलांचा विद्याभ्यास लग्नकार्यें केलीं, पैसाअडका गांठीं ठेवला तर कृतकृत्यता वाटते. नाहीं असें नाहीं, पण महायात्रा म्हणजेच काशीयात्रा ( ह्या यात्रेंत प्रयाग व गया ह्यांचा अंतर्भाव झालेला असतो, काशी, प्रयाग व गया

* ओं. मं. ...

ह्या तीन क्षेत्रांच्या यात्रेस त्रिस्थळी असेंहि नांव आहे. ) करून भागीरथीचें स्नान घडलें, म्हणजे हिंदु अंतःकरणाला जी कृतकृत्यता व समाधान वाटत असतें त्याची सर इतर कोणत्याहि गोष्टीस नाहीं. तें समाधान चिरस्थायी असतें. अंतकाळीं सुद्धां मनाला शांती देणारी ती भावना आहे. मुलेंबाळें, पैसाअडका हा कांहीं आपल्याबरोबर येणार नाहीं, पण गंगास्नानाचें सुकृत मात्र जन्मोजन्मीं आपल्या बरोबर राहणारें असतें ही दृढ भावना हिंदु प्राणिमात्राची हाडीं-मांसीं खिळून बसलेली आहे. अशी ही पारमार्थिक पावित्र्याची परंपरागत अतएव अनुभवसिद्ध भावना गंगास्नानांत ओथंबून भरलेली आहे.

### भागीरथीचें माहात्म्य—पौराणिक कालीन

वैदिक कालांतील आचारविचारपरंपराच पौराणिक कालांत अखंड राहिलेली दिसून येते. हा काल अगदीं अलिकडचा म्हटला तरी तो इसापूर्व दोन हजार वर्षांवर जातो. ह्या कालांत तिच्या मूर्तिरूपांत तिची पूजाअर्चा होऊं लागली. भविष्यपुराणांत गंगेचें ध्यान वर्णिलें आहे तें असें:—

### गंगाध्यानम्

‘ चतुर्भुजां त्रिनेत्राञ्च सर्वावयवभूषिताम् ।
रत्नकुंभां सिताम्भोजां वरदाभयप्रदाम् ।
श्वेतवस्त्रपरिधानां मुक्तामणीविभूषिताम् ।
ततो ध्यायेत्सुरूपाञ्च चंद्रायुतसमप्रभाम् । ’
‘ चामरैर्वीज्यमानाञ्च श्वेतच्छत्रोपशोभिताभ् ।
सुप्रसन्नां सुवदनां करुणार्द्रं निजान्तराम् ।
सुधाप्लावित भूपृष्ठामार्द्रगंधानुलेमनाम् ।
त्रैलोक्यनमितां गंगां देवादिभिरभिष्ठुताम् । ’

### गंगावतरण

आदित्यपुराणांत गंगावतरण पृथ्वीवर झाल्याचा काल दिला आहे, युधिष्ठर शक वैशाख शु. ३.

‘ यवानुत्पादयामास युगच्चारब्धवान् कृतम् ।
ब्रह्मलोकात् त्रिपथगां पृथिव्यामवतारयत् । ’

त्याचप्रमाणें हिमाचलांतून ती बाहेर निघण्याचा काल स्मृतींत दिला आहे.

‘ ज्येष्ठे मासि क्षितिसुतदिने शुक्लपक्षे दशम्याम् ।
हस्तशैलान्निरगमदियम् जान्हवी मर्त्यलोकम् ।
पापान्यस्यां हरति च तिथौ सा दशेत्याराहुरार्याः ।
पुण्यं दद्यादपि शतगुणं वाजिमेधायुतस्य । ’

भविष्यपुराणांत गंगामाहत्म्य दिलें असून त्याचें श्रवण, पठण, स्मरण, दर्शन, स्नान, दानादि कर्मांचीं फलें सांगितलीं आहेत.

ब्रह्मांडपुराणांत पूजन जलपानादि गुणमाहात्म्य वर्णिलें आहे.

कूर्मपुराणांत गंगासन्निध मरण-फल सांगितलें आहे.

ब्रह्मपुराणांत नारायणक्षेत्रलक्षणांतर्गत गंगामाहात्म्य वर्णन आलें आहे.

स्कंदपुराणांतर्गत काशीखंडांत गंगासहस्त्र नामावलि आली आहे.

गंगेची विशेष उल्लेखनीय सार्थ नांवें आहेत त्यांपैकीं:—विष्णुपदी, जन्हुतनया, भागीरथी, त्रिपथगा, तीर्थराज, हैमवती, हरशेखरा, सुधा, नंदिनी, स्वर्नदी, अलकनंदा, मंदाकिनी, समुद्रसुभगा वियद्गंगा, भीष्मजननी, जान्हवी त्रिस्त्रोता वगैरे. ह्या सर्व नांवाला इतिहास आहे.

भागीरथी नांव पडण्याचें कारण आणि गंगेच्या अवतरणाचा वृत्तांत श्रीमद्भारत-भागवत ह्या पुराणांतून आलेला आहे.


### भागीरथी गंगेचें दैवी स्वरूप

गंगेची उत्पत्ति—बलि राजाच्या यज्ञांत भगवान् महाविष्णूंनीं वामन रूपानें आपल्या उजव्या पायानें सर्व भूमंडल आक्रमून डाव्या पायानें स्वर्गादि सर्व लोक व्यापून टाकिले. तेव्हां ब्रह्मकटहाची कवची फुटून भोंवतीं असलेल्या जलाची धारा त्या विवरानें आंत शिरली. ब्रह्मांडांत प्रवेश करते समयीं त्या धारेस भगवंतांच्या पदकमलाचा स्पर्श झाला म्हणून तिला भगवत्पदी हें नामाभिधान प्राप्त झालें. ह्यापूर्वीं स्वर्नदी, वियद्गंगा, गंगा, जान्हवी वगैरे कोणतींच नांवें ह्या जलास नव्हतीं.

ब्रह्मांडांत प्रवेश झाल्यानंतर भगवत्पदी स्वर्गाच्या मस्तकावर —ह्यालाच विष्णुपद असें नांव आहे, व येथेंच उत्तानपादपुत्र ध्रुव

रुद्रप्रयाग – मंदाकिनीवरील सुंभाच्या दोराचा झूला पान ३२८





माना – अलकनंदेवरील सुंभाच्या दोराचा झूला




गंगोत्तरीजवळ–कृष्णाश्रम व भागीरथी आणि केदारगंगा संगम पान १४२

राहातो–उतरण्यास सहस्त्रो, लाखो वर्षे लागलीं. तेथून पुढें सप्तर्षि, चंद्रमंडल, ब्रह्मपुरीपर्यंत अवतरण्यास असाच अनंत काल लागला. ब्रह्मपुरींत मेरुपर्वत–मस्तकावर आल्यानंतर तेथें तिला गंगा नांव प्राप्त झालें. मेरु पर्वतावरून पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा चार दिशांनीं तिच्या चार धारा होऊन त्या समुद्रास जाऊन मिळाल्या. त्या चार धारांची नांवें अनुक्रमें–सीता, चक्षु, भद्रा आणि अलकनंदा. ह्यांपैकीं अलकनंदा ब्रह्मपुरीच्या दक्षिणेकडून निघून अनेक पर्वत ओलांडीत हेमकूट पर्वतावर व तेथून पुढें सुवर्णशृंग पर्वतावरून खालीं उतरून भरतवर्षांत येते आणि दक्षिणेकडे जाऊन समुद्रास मिळते. अशी गंगोत्पत्ति भागवतांत ५–१७ मध्यें आहे.

आपल्या पितरांचा उध्दार होण्याकरितां भगीरथानें महत्प्रयासानें गंगेस पृथ्वीवर आणिलें हा भारतांतील कथा भाग पूर्वी 'हरद्वार, हरिद्वार, गंगाद्वार' प्रकरणांत पान ९ वर येऊन गेलेला आहे. पृथ्वीवर गंगावतरण झालें त्याचा कथाभाग वाल्मीकि रामायणांत भारतांतील कथेपेक्षां थोडा निराळा आहे. तो:–

गंगाप्राप्तीकरितां भगीरथानें तप केलें. त्यामुळें ब्रह्मदेव संतुष्ट होऊन त्यानें वर दिला. गंगेचा आघात धारण करण्यासाठीं शंकराची आराधना करण्यास त्यास सांगितलें. त्यानें शंकरास तोषविलें. शिव हिमालयांत गेले आणि तेथें त्यांनीं आपल्या जटा पसरल्या. ते गंगेला म्हणाले कीं, 'पड.' तीं जटांवर अवतरली. ती तेथेंच एक वर्षभर राहिली. भगीरथाच्या प्रार्थनेवरून शंकरांनीं आपली एक जटा उपटून टाकून तिची वाट मोकळी करून दिली. तेथून ती अतिवेगानें पृथ्वीवर येऊन भगीरथाच्या मागोमाग गेली. सगरपुत्रांनीं खणलेल्या रसातळास तिला आणून भगीरथानें तेथें त्यांचें तर्पण केलें. त्यामुळें ते पितर पावन होऊन स्वर्गास गेले.

स्कंद पुराणांतील केदारखंडांत दिलेली गंगेची उत्पत्ति

पार्वतीच्या प्रश्नावरून श्रीशंकर तिला गंगोत्पत्तीचें वर्णन करून सांगतात कीं, हे महामती, अनंत कोटी ब्रह्मांड तरंगाचे स्फोटापासून गंगा दृष्टिगत होईल. त्या वेळीं देवाधिदेव जो मी तो सुध्दा जलरूप धारण करील. पुढें ह्या जलामधूनच ब्रह्मजनीत ब्रह्मधारा प्रादुर्भूत

होईल व हीच धारा भूमंडलावर अवतीर्ण होईल. ह्या धारेचें स्मरण-मात्रें करून मोक्षप्राप्ति होईल. ह्या ब्रह्मधारेंतूनच माझी जी धारा जमिनीवरून वाहात जाईल तिलाच गंगा हें नांव प्राप्त होईल. दुसरी धारा स्वर्गलोकीं जाईल व तिसरी धारा भोगावती या नांवानें पाताळांत जाईल. ह्याप्रमाणें तीन लोकांतून तीन धारा वाहातील, आणि म्हणूनच ह्या माझ्या प्रवाहांला 'त्रिपथगमिनी' हें नांव प्राप्त झालेलें आहे.

सगराच्या साठ हजार पुत्रांच्या उध्दाराकरितां कपिल महामुनिनीं सांगितल्याप्रमाणें गंगोदक भूतलीं आणण्याचें काम अंशुमान, दिलीप ह्यास साधलें नाहीं तें भगीरथानें पुरें केलें आणि पितरोध्दार केला.

भागीरथी गंगेचें आधिभौतिक स्वरूप

हिमालयाचे पायथ्याशीं कालांतरांत एकदां समुद्र होता. त्या ठिकाणीं भागीरथी गंगेनें उगमापासून हरद्वार येथें सपाटीवर येईपर्यंतच्या दीडशें मैलाच्या आपल्या हिमालयीन प्रवाहांत इतका गाळ अव्याहत वाहून आणून टाकिला कीं, तेथील समुद्र बुजून गेला आणि तेथें वस्ती-योग्य मोठा सुपीक प्रदेश निर्माण झाला. लखनौजवळ ह्या गाळाच्या थराची जाडी एक हजार फूट तरी आहे. भारतीयांच्या वात्सल्यानें गंगामाईनें जी ही जमीन उत्पन्न करून दिली ती म्हणजे संयुक्त प्रांताचा पाऊण भाग आणि बिहार व बंगालचा अर्धा अधिक भाग होय. एवढ्या विस्तारांत मुंबईसारखे सव्वादोन इलाखे सहज मावतील. ह्या जमिनींत पिकणारें अन्नधान्य तत्रस्थ आठ कोटी लोकांना पुरून इतरत्रस्थांनाहि त्यांतील बराच भाग मिळतो. अर्ध्या हिंदुस्थानला पोटभर पुरेल इतकी साखर–निर्मिति तेथें होते.

भागीरथी गंगा आपल्या पुत्रांना नुसती जमीन देऊन थांबली नाहीं. वास्तविक आईचेंच वात्सल्य तें कीं, जें अपत्य – जन्माबरोबरच तिला पान्हा फोडतें. त्यांच्या धारणपोषणाकरितां लागणारें अन्न-धान्य उत्पन्न करण्याची एवढी काळजी तिच्याशिवाय अन्य कोणास असणार आहे ? म्हणूनच हरद्वारपासून सागराला मिळेपर्यंत वाटें-तील तीनहि प्रांतांतील तिच्या दोन्ही कांठच्या जमिनींना ती अक्षय्य यथेच्छ आपलें पय पाजून राहिली आहे. एवढेच नव्हें तर त्यांच्या

बरोबर, पिकें काढल्यानें जमिनी निकस होऊं नयेत म्हणून ती दरवर्षी तेथें अमूप नवा नवा केवटा वाहून आणून रिचवीत असते.

गंगेच्या कालव्यांची त्यांच्या शाखांसह लांबी पाहिली तर ती तिच्या सपाट प्रदेशांतील लांबीच्या साडे पांच पट म्हणजे ७६५० मैल आहे. त्यांतून पंचवीस लक्ष एकर जमीन भिजत आहे. म्हणजे सहज कल्पना येण्यासाठीं असें म्हणतां येईल कीं पुणें जिल्ह्याच्या तीन चतुर्थांशाइतकें क्षेत्रफळ बाराहि महिने भिजत आहे. गंगाप्रवाहाला पूर आले म्हणजे ( पूर उन्हाळी व पावसाळी असे दोन वेळां प्रतिवर्षी असतात. ) त्याचें पाणी कांठच्या जमिनीवर पांच पांच सहा सहा मैल दूरवर पसरत असतें. ह्या सर्व कारणांमुळेंच अजमासें चौदाशें मैल लांबीच्या तिच्या कांठच्या जमिनी अतिशय सुपीक होऊन त्यांतून दोन दोन पिकें बारमाहा निघूं शकतात. त्या त्या प्रांतांची समृद्धि होऊन त्यांची भरभराट होण्यांत भागीरथी गंगेचा केवढा हात आहे हें ह्या माहितीवरून चांगलें लक्षांत येतें.

मातेप्रमाणें निरपेक्षबुद्धीनें आपल्या लेकरांच्या धारणपोषणाची उत्तम सोय करून देणाऱ्या गंगामाईविषयीं भारतीयांस कृतज्ञतेनें जिव्हाळा आणि आदर वाटावा हें अगदी सहाजिक आहे. त्या बरोबरच तिच्यांतील दैवी गुणांचें दर्शन झालें म्हणजे ती जीव कीं प्राण होऊन देवतेसम पूज्य वाटूं लागावी, नव्हे देवताच होऊन बसावी हेंहि त्यांच्या स्वभावधर्मानुसार योग्यच आहे. गंगाकांठच्या ह्या पवित्र भूमींत कोसल, मिथिला (विदेह), पांचाल, मगध वगैरे पुराणप्रसिद्ध देश उदयास आले. कौरवपांडवांच्या रणकंदनाचें जें कुरुक्षेत्र तेंच कृष्णार्जुनसंवाद रूपानें प्रकट झालेल्या गीतोपदेशामृताचें धर्मक्षेत्र, तेंहि ह्याच भूमींत गाजून राहिले आहे. गंगानिर्मित ह्या भूमीची संपन्नता एवढी मोठी आहे कीं कोणासहि तिचा अभिलाष वाटावा. पण सारासार विचार न करितां भलत्याच महत्त्वाकांक्षेस बळी पडून ज्यांनीं शस्त्रास्त्रांच्या बळावर आपली स्वैरसत्ता येथें गाजविली त्यांतील प्रमुख – तघ्लख, लोदी, मोगल वगैरे यवन घराणीं आणि धूर्त फिरंगी इंग्रज ह्या सर्वांना शह बसवून येथून पळ काढावयास लावले असा हा ह्या दैवी भूमीचा अघटित प्रभाव आहे.

## गंगामाईचें स्वयंभू पावित्र्य

गंगा शब्दच पावित्र्यसूचक आहे. त्याची व्युत्पत्ती 'शब्दकल्पद्रुम' सांगतो कीं, गमयति, प्रापयति, ज्ञापयति वा भगवत्पदं या शक्तिः। यद्वा गम्यति, प्राप्यति, ज्ञाप्यति मोक्षार्थिभिर्या । स्वनामख्यात नदी तदाधिष्ठात्री देवताच तत्पर्य्यायः ।

गंगाजलाचें पावित्र्य व गुणहि असेंच पूर्वापार दैवी आहेत. राजनिघंटूमध्यें त्याविषयीं फोड आहे ती अशी:– अस्या जलस्य गुणा:– शीतत्वं, स्वादुत्वम्, स्वच्छत्वम्, अत्यंतरुच्यत्वम्, पथ्यत्वम्, पावनत्वम्, पापहारित्वम्, तृष्णामोहध्वंसत्वम्, दीपनत्वम्, प्रज्ञाधारित्वम्' ह्या गुणांची स्वानुभवी परीक्षा कोणासहि करून घेता येणारी आहे.

गंगाजलाचा पवित्रपणा भावनेचा भाग म्हणून क्षणभर दृष्टीआड केला तरी त्या जलाचा एक गुण आपणांस पिढ्यानपिढ्यांच्या अनुभवावरून प्रत्ययास आलेला आहे. तो गुण म्हणजे तें जल कितीहि दिवस ठेवलें तरी बिघडत नाहीं. ( अर्थात् त्याजशीं कृमी, कीटक, नासक्या, कुजक्या वा अन्य घाणेरड्या पदार्थांचा संपर्क न होऊं देतां तें ठेवलेलें आहे अशा समजुतीनें हें विधान आहे. ) म्हणजे त्या जलांत इतर सांठलेल्या पाण्याप्रमाणें शेवाळ, फंगस वगैरेंची निर्मिति होत नाहीं किंवा त्या जलांत किडेहि पडत नाहींत.

सन १९३५ चे सुमारास 'टाईम्स' वर्तमानपत्रांत एक पत्रव्यवहार आला होता. त्यांत गंगेच्या पाण्यासंबंधानें अशी माहिती दिली होती कीं, विलायतेहून कलकत्त्यास यावयास निघालेल्या आगबोटीवर घेतलेलें पिण्याचें पाणीं वाटेंत दोनदां बदलावें लागतें. कारण त्यांत किडे पडतात. पण कलकत्त्याहून परत जातांना भरून घेतलेलें पाणी वाटेंत बदलावें लागत नाहीं, कारण तें बिघडत नाहीं.

आम्ही सन १९३५ या वर्षीं हृषिकेश व गंगोत्री येथून आणलेली गंगा अजून जशीच्या तशी निर्मल, पारदर्शक आहे. त्या जलास वासहि पण लागलेला नाहीं.

सन १९४०–४१ ह्या वर्षीं मानस सरोवर, कैलासाचें गौरीकुंड आणि श्रीमुक्ति नारायण येथें उगम पावलेली श्वेत गण्डकी ह्यांचें आणलेलेंहि गंगोदक जसेचें तसें शुद्ध स्वरूपांत आहे.

ह्यावरून कोणाचीहि खात्री होईल कीं, गंगाजलाचें शुद्ध पवित्र आणि पापहारक स्वरूप त्यांत अंतर्बाह्य मलशोधन आलेंच, हे संशयातीत स्वयंभू आहे.

आणि म्हणूनच आपण प्रत्यहीं आपल्या आंघोळीचे पाण्यांत गंगोदकाची भावना करीत असतो. कोठल्याहि जल-प्रवाहांत कोणीहि बुडी मारो-अर्थात् हिंदु संस्कृतीचा माणूस, बुडी मारतांना त्याचे तोंडून 'हर, गंगे,' 'गंगाबाई, भागीरथी,' असे शब्द कळत वा न कळत निघतातच. गंगाजलाचे ठायीं आपली तीर्थत्वाची भावना असते. विशेष पुण्य व पर्वणीचे दिवशीं लोक गंगोदक घेतात. जावयाचे हातावर कन्यादानाचे उदक गंगाजलानें सोडतात. 'औषधं जान्हवीतोयं वैद्यो नारायणो हरिः' अशी म्हणच पडली आहे. अंतकालीं गंगोदक घालतात. राज्याभिषेकांत गंगाजलाचें मांगल्य स्नान असतें. ज्यांनीं महायात्रा केली आहे त्यांनीं आपल्याबरोबर 'गंगा'—गंगाजल आणलेलें असतें. ती गंगाजलाची लोटी पूज्य, पवित्र अशा देवदेवतार्चनाच्या देव्हाऱ्यांत ठेवतात. इंग्रजशाहीपूर्वीं काशीयात्रा करणें बैलगाड्यांनीं करावी लागे. त्यावेळीं ती करण्यांत धोके,कष्ट, खर्च फार असे. दिवसगतहि फार लागत. त्यावेळीं काशीयात्रेस निघतांना निरवानिरव करूनच माणूस निघत असे. काशीयात्रा करणें ही गोष्ट सर्वांनाच सहजसुलभ नव्हती. वयस्क माणसांना तर ती गोष्ट दुष्प्राप्यच होती. ज्यांना सामर्थ्य असे, असे लोक ब्राह्मण सेवेकऱ्याकडून गंगेची कावड आणून त्या जलानें स्नान करून कृतकृत्य होत.

आमचें घराणें अग्निहोत्री. घरची गरिबीच. माझे आजोबा वयस्क होऊन थकलेले. त्यांना काशीयात्रा घडलेली नव्हती. ह्याविषयीं त्यांनीं मनाला खंती घेतली होती. त्यांचा पांचवा मुलगा कै. हरि दामोदर दाते—मांडववाले दाते पुणें ह्यांचे वडील—ह्यांनीं काशीस जाऊन कावड आणावी असें त्या साही भावांत ठरलें. त्याप्रमाणें त्यांनीं कावड आणून आजोबा व आजीस गंगास्नान घातलें. ही गोष्ट सुमारें नव्वद वर्षांपूर्वींची आहे. त्यावेळीं त्या माझ्या चुलत्यांचें वय पंचविशीच्या आंत होतें. वडीलमातोश्रीं याविषयींची आदर बुद्धि आणि कर्तव्यनिष्ठा आणि त्याचबरोबर गंगामाईच्या माहात्म्याचा पगडा समाजावर

केवढा होता ह्याचें हें एक उदाहरण आहे.

आपल्या हातून हीं यात्रा होऊं शकली ह्याबद्दल कृतकृत्यतेचें समाधान तर झालेंच, शिवाय मिळालेल्या अनुभवानें आत्मविश्वास दृढावला, भेडसावणारी धागधुगी पार मावळून गेली आणि जिज्ञासा तीव्र होऊन पुढच्या प्रवासास प्रोत्साहन मिळालें.

निसर्गरम्य,सहजशुद्ध, सुधारणेच्या मोहजालापासून सर्वस्वीं अलिप्त, जीवनकलहाच्या बाजारांतील गोंगाटापासून अति दूर, अगदीं साधी, अकृत्रिम व स्वेच्छेनें पत्करलेली तपस्व्यांची राहणी, अष्टौप्रहर डोंगर–पर्वत, नद्यानाले, झाडेंझुडें, व पक्ष्यांचा स्वच्छंद विहार व कूजन, त्यांतच नित्य नवनव्या देखाव्यांचें अलौकिक दर्शन ह्या कारणांनीं मन इतकें वेधून जाई कीं, त्यास नेहमींप्रमाणें उगीचच इतस्ततः भटकण्यास सवड मिळत नसे. एकाग्रता नसली तरी श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें 'मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् । कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च । अशा प्रकारची तल्लीनतेचीं अवस्था होऊन आनंदांत मन रंगून जाई. ह्या अननुभूत आनंदाची प्रथम ओळख येथें झाली. पारमार्थिक दृष्टीनें ह्या पवित्र यात्रा आपण करीत आहोंत ही जाणीव अक्षय्य जागृत असल्यामुळें स्वार्थी क्षुद्र विचार उत्पन्नच होत नसत. नवनवलाईच्या भुलभुलावणीचा पगडा इतका बसून जाई कीं, प्रवासाचे कष्ट तर वाटूंच नयेत, पण तहानभुकेचीहि शुद्ध राहूं नये. ह्या नादांत इतके दिवसांत घरादाराची वा मुलाबाळांची आठवण चुकून एकदासुद्धां झाली नाहीं. तशी आठवण झाली असती तरी उपयोग कांहींच नव्हता. कारण घरचें पत्र आम्हास येण्यास किंवा आमचें त्यांस पाठविण्यास टपालाची सोय कोठेंच नव्हती. एका अर्थीं ह्या यात्रांचा मुख्य हेतू जो ईश्वराचें यथार्थ दर्शन, साक्षात्कार व त्यामुळेंच होणारा कृपाप्रसाद, तो साधण्याच्या दृष्टीनें असल्या मायामोह पसाऱ्याच्या व लाभहानीच्या ऐहिक गैरसोयी ह्या इष्टापत्तीच समजल्या पाहिजेत. म्हणूनच ज्ञानेश्वरांनीं स्वानुभवानें हरिपाठांत असेंच सांगितलें आहे कीं, 'ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचें' ।

## गंगास्नान आणि त्याची फलश्रुति

दहा वाजावयास आले तरी उन्हाचा कोवळेपणा मोडून थंडी कमी होण्याचें लक्षण दिसेना. पंड्यानेंहि स्नानास चलण्याविषयीं मागें सारखा लकडा लावला होता, म्हणून गंगाकांठीं गेलों. इतर यात्रींप्रमाणें बुट-कुल्यानें पाणी घेऊन आपण कांहीं, कसें तरी स्नान उरकून टाकणार नाहीं, असा मनाशीं बेत चालविला होता. सर्व प्रकारचा देहदंड सोसून येथपर्यंत तर आलों, मग ह्या यात्रेंतील प्रधान गोष्ट जें गंगास्नान त्यांत हेळसांड कशासाठीं ? तें कांहीं कोणी मनाविरुद्ध लादलेलें ओझें नव्हतें. तें स्वेच्छेनें व आवडीनें अंगिकारलेलें कार्य होतें. हरद्वार, हृषिकेश येथें यथेच्छ गंगास्नान घडतच होतें. मग जवळ जवळ दोनशें मैलांचा पहाडांतील कष्टमय पायीं प्रवास करून येथपर्यंत येण्याचें प्रयोजनच काय होतें ? अशा विचारानें निश्चय झाला कीं, यथासांग स्नानविधि करावयाचाच. एकदम बुडी मारण्याइतकें खोल पाणी असतें तर स्नान करणें इतकें अवघड वाटलें नसतें. पण पात्रांत हात-भरसुद्धां खोली दिसत नव्हती. शिवाय ओढहि मनस्वी होती. तपेली-तपेलीनें चुळका चुळका पाणी अंगावर घेऊन गारठण्यापेक्षां घागर भरून एकदम डोक्यावर ओतली तर त्रास कमी, ह्या विचारानें पंड्यास एक घागर आणून देण्यास सांगितलें.

घागरीऐवजीं तेवढाच एक कासंडीवजा रुंद तोंडाचा पितळी घडा त्यानें आणून मजपुढें ठेविला आणि मला विचारलें कीं, हा कशासाठीं पाहिजे ? मीं म्हटलें स्नानाकरितां. हें ऐकतांच तो घाबरून म्हणाला कीं, ह्यानें स्नान करूं नका. सोसणार नाहीं. अंग गारठून बेशुद्धीच येईल. आमचें ऐका. चार तपेल्या घेऊन स्नान उरकून टाका. त्याचें म्हणणें अगदीं बरोबर होतें. पण माझे विचारावर फार धुंदी चढली होती. मला तेव्हां त्याचें म्हणणें पटलें नाहीं, आणि त्याचा बरावाईट परिणाम लगेंच भोगावा लागला.

मी कांठावर जाऊन बसलों. वाकडा करून घडा भरला. पंड्यानें संकल्प सांगण्यास सुरुवात केली. त्याचा अशुद्ध संकल्प ऐकवेना. मीं त्यास म्हटलें कीं, मला संकल्प येतो. मीच तो म्हणतों. तुम्ही नुसतें ऐका. तुम्हास तुमची दक्षिणा देईन. काळजी नको.

प्रत्यहीं घंगाळांत नळाचें पाणी घेऊन तें गंगाभागीरथीचें समजून स्नान करीत आलों. पण आज दशाहार जेष्ठ शुद्ध २ सोमवार ( ३–६–१९३५ ) आयुष्यांतील चिरस्मरणीय भाग्याचा दिवस म्हणून गंगोत्तरीस गंगेच्या प्रत्यक्ष उगमाजवळ तिच्या शुध्द स्वर्गीय तीर्थोदकांत स्नान करण्याचा अलभ्य लाभ दैववशात् पदरीं पडत आहे, ह्या प्रोत्साहक विचारानें मन उल्हसित होऊन गेलें होतें. आचमन करून मार्जन करूं लागलों मात्र, तो पाण्याचा चटका बसून बोटें वांकडींच झालीं. स्नानाचा कायिक, वाचिक, मानसिक संकल्प करून भागीरथी गंगेची आणि जलाधिपति वरुणाची वैदिक मंत्रानें प्रार्थना केली. कुंभक करून भरलेला घडा एकदम डोक्यावर ओतला. त्या गार ठणक पाण्याचा स्पर्श होतांच सर्वांगभर कळाच कळा उठल्या. अंगावर पाणी पडण्याचें संपतांच सर्व अंगांत एकदम उष्णता संचरून सर्व शरीरभर सुखसंवेदक स्पंदन होऊं लागलें. अशा प्रकारचा सुखास्वाद दैनंदिन काय किंवा विशेष प्रसंगांतून सुध्दां काय त्या वेळपर्यंत अनुभवावयास सांपडलेला नव्हता.

अगदीं असाच नसला तरी असल्या जातीचा अनुभव दोन प्रसंगांत व तोहि कधीं कधीं भोगावयास सांपडे. पंधरा वीस मिनिटेंपर्यंत एक सारखी जोरानें भस्त्रिका ( प्राणायामाचा एक प्रकार ) करून ती थांबविली आणि त्याच स्थितींत स्वस्थ बसून राहिलें म्हणजे पृष्ठवंशाचें दोन्ही अंगें सुखावह स्पंदन होऊन सर्व शरीरभर ते पसरे. त्याचप्रमाणें दोन तासांत बाराशें साष्टांग नमस्कार घातल्यानंतर स्वस्थ बसलों म्हणजे अंग अगदीं हलकें होऊन त्यांतून ज्वाला बाहेर पडत आहेत असा भास होई, आणि त्याच वेळीं सर्व शरिरांत सुखावह लहरीरूप संवेदना होत असत.

गारठणक पाण्याच्या स्पर्शानें शारीरिक उष्णता प्रोत्साहित होऊन शरीर व मन तरतरीत झालें आणि राहिलेला स्नानविधि उरकण्यास धीर आला. अघमर्षण व मार्जन करून गंगेस अर्घ्यप्रदान केलें.

ह्या अवधींत क्षणैक आलेली उष्णता निघून जाऊन थंडीचा प्रभाव दुप्पट भासूं लागला. अशांतच दुसरा घडा डोक्यावर ओतला. मग काय हुडहुडी भरून दांतखिळी वाजूं लागली. तरीहि तिसरा

घडा डोक्यावर ओतलाच. ह्या साहसाकडे भोंवतालच्या यात्रींचें लक्ष आपोआपच वेधलें गेलें होतें. त्यांत एक पुण्याचेच सावळारामपंत जोशी नांवाचे गृहस्थ होते. त्यांनीं मला हांक मारून दटावून विचारलें कीं, 'पुण्यास परत जावयाचें आहे कीं नाहीं? आलों! घडाच ओढून घेतों'. माझें स्नानहि संपलेंच होतें. वस्त्रें बदलून शाल-घाबळींनीं सर्वांग लपेटून घेऊन वाळवंटांतच बसलों. संध्या ब्रह्म-यज्ञादि नित्यकर्म आटोपून गंगेस एकादशणी केली. दोन तास उन्हांत बसलों होतों तरी थंडी गेली नाहीं. देवळांत जाऊन पूजा-अर्चा कली. सौभाग्यवतीनें गंगेची ओटी भरली. स्वयंपाक तयार होता पण अंग कसकसूं लागल्याकारणानें अन्नावरची वांच्छाच उडून गेली होती. वळकटी पसरून निजलों. होतीं नव्हतीं तेवढीं सर्व पांघरुणें घेतलीं, तरी थंडी म्हणून राहीना. ताप भरत चालला तो इतका चढत गेला कीं, भ्रमण होऊं लागून विचूक शब्द येऊं लागले. ताप १०५° अंशा-जवळ गेला होता. अस्वस्थ स्थितींत सर्वांगाची उलघाल चालू होती. डोळे लाल होऊन अंग भाजत होतें. स्वकीय माणूस जवळ कोणीच नाहीं. ताप कसला, कधीं निघणार ह्याची कल्पना नाहीं. तार करून कोणास बोलवावें तर टपालघरच नाहीं, मग तार करण्याची सोय कोठची? व कदाचित् तशी सोय असती तरी तिचा उपयोगहि नव्हता. कोणीहि तांतडीनें यावयास निघालें तरी येथपर्यंत येऊन पोहोंचण्यासच पंधरा दिवस लागावयाचे. अशा कोसळलेल्या प्रसंगांत एकाकी सांपडलेल्या सौभाग्यवतीच्या मनाची अवस्था काय झाली असेल ती केवळ सनातनी संस्कृतीच्या आर्य स्त्रीसच कळेल. चार वाजण्याचे सुमारास थकवा येऊन असो, बेशुद्धीनें असो, तंद्री लागली म्हणून असो, नाहीं तर घाम येणार म्हणून असो, अर्धा पाऊण तासाच्यावर अगदीं निश्चेष्ट पडून होतों. सर्वांगास दरदरून घाम आला आणि ताप निःशेष निघाला.

ताप चढून घाम येईपर्यंतच्या अवस्थेची सर्व जाणीव मला नव्हती. ती माहिती परोक्ष आहे. संध्याकाळीं सहा वाजण्याचे सुमारास जसें कांहीं, कांहींच झालें नव्हते, असें होऊन पूर्ववत् तरतरी वाटूं लागली. केशवाश्रम, गौरीकुंड पाहून येण्यांत दीड दोन मैलाचें चक्कर झालें.

गंगेवर जाऊन संध्या आरती करून परत आलों. हरद्वार येथील प्रत्यहीं केलेल्या दोन दोन स्नानांचे वेळीं उन्ह लागल्यामुळें ताप येणारसें वाटत होतें. दैनंदिन गारठणक पाण्याचें स्नान, उन्हांतून चाल, वेळींअवेळीं जेवण व हरघडी हवापाण्यांतील बदल ह्या कारणांमुळें बारीक तापानें ठाण मांडलेंच होतें. त्यांतच आजच्या स्नानाची भर पडून कडेलोट झाला. थोडक्यांतच निभावलें म्हणून ठीक. नाहीं तर काय झालें असतें-वाटेल तसतशी कल्पना करावी.

ताप निघण्याचे आधीं ग्लानींत असतांना मला एक विलक्षण प्रसंगाचें दृश्य दिसलें. तें दृश्य असें. एक पोक्त सुवासिनी माझ्या अंथरुणाजवळ येऊन उभ्या राहिल्या. त्यांनीं माझे अंगावरील पांघरूण बाजूस सारून डोक्यावर हात ठेविला. नंतर माझें मनगट धरून मला म्हणाल्या, 'ऊठ', 'चल'. मी उठून बसलों आणि ह्या कोण म्हणून त्यांजकडे पाहिलें. त्या उंच बांध्याच्या सडपातळ शुभ्र वस्त्र नेसलेल्या होत्या. तोंडवळा लांबट, हंसतमुखी व सतेज होता. चर्या शांत, अभंयकर, आदरणीय अशी भारदस्त वाटली. शब्दांत मार्दव व प्रेमळपणा होता. आवाजावरून त्या चांगल्या ओळखीच्या असाव्यात असें वाटलें. पण त्यांचें नांव गांव वगैरेसंबंधीं कांहीं केल्या ध्यानीं येईना. त्यांच्या बोलण्याचालण्यावरून आपुलकीचा विश्वास उत्पन्न झाला होता; म्हणून जरा सलगीनें एकदम उत्तर दिलें कीं, चलण्यास माझी तयारी आहे. सर्व निरवानिरव करूनच आलेलों आहे. मागची काळजी कांहीं नाहीं, किंवा कोठेंहि जीव गुंतलेला नाहीं. मात्र अर्धाच आणि तोहि मागील दारानें घेऊन जाऊं नका. मला विचारतां आहांत म्हणून सांगतों कीं, सबंध म्हणजे आम्हां दोघांस न्या. पण असें नेणें स्वप्नांत काय म्हणून ; चांगले राजरोस जागेपणीं न्या कीं. हा आम्ही आपला प्रसादच समजूं. (मला विचारीत आहांत म्हणून) जें वाटलें तें स्पष्ट सांगितलें. आपली आज्ञाच असेल तर तिच्या आड कोण येऊं शकेल ? आपण हात पकडलाच आहे. म्हणाल तिकडे मुकाट्यानें येतो. तेंहि भाग्याचें आहे. इतकें बोलून उठणार तों तेथें कोणी बाईहि नव्हत्या आणि माझा हातहि कोणी धरलेला नव्हता किंवा मी उठूनहि बसलेला नव्हतो. सर्वांगास घाम येऊन सदरा भिजल्यासारखा चिंब होऊन

गेलेला होता हें लक्षांत आलें. हें जें कांहीं दृश्य प्रत्यक्ष घडलें, अर्थात् जागृतावस्थेंतील नव्हे. तें कां, 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' चा प्रकार होता? कां, तापानें संतप्त झालेल्या मेंदूचा विकार होता? कां कांहीं पूर्वग्रहजनित संस्कार होता? कां कांहीं भुतेंखेतें, मंत्रतंत्र, जादूटोणा ह्यांनीं पछाडून टाकल्याचा आविष्कार होता? कां ज्याला साक्षात्कार म्हणतात तसला दैवी चमत्कार होता? हें कांहींच सांगतां येत नाहीं. पण तें कांहींहि असलें तरी ह्या घटनेंत विचारांची संगति खंडित होऊन विकृत झालेली दिसत नाहीं. 'ऊठ', 'चल', ह्या म्हणण्याचा बोध एकदम निर्वाणीचा कां घेतला हें कोडेंच वाटतें! झाला प्रकार हा असा आहे. त्यावरील भाष्य करण्याचें काम स्वानुभवी अधिकाऱ्यांचेंच आहे.

ह्या घटनेचा माझ्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं असें नाहीं. त्याची चांगली पकड बसून भारला गलों आहे. निष्ठा दृढावून आत्मविश्वास आणि निर्भयता उत्पन्न झाली आहे. हिमालयाचा आणि आपला जन्मजन्मांतरींचा कांहींतरी जवळचा संबंध आहे, आपलें म्हणतां येईल असें कांहींतरी जिव्हाळ्याचें तिकडे आहे असें वाटतें आणि भीमाशंकर, त्र्यंबकेश्वरसारखीं तत्सम स्थानें जवळ असतांनासुद्धा पुन्हां पुन्हां तिकडेच जाण्याची ओढ लागते. तिकडे जातांना मथुरा, काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रें वाटेंत लागलीं, म्हणून त्यांचें दर्शन सहज घडलें. नाहीतर हेतुपुरस्सर अगदीं जवळचें पंढरपूर, पण तेथेंहि अजून जाऊन आलों नाहीं. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, इकडील तीर्थक्षेत्रांविषयीं मला पूज्यभाव नाहीं. तीर्थक्षेत्रें म्हटलीं म्हणजे येथून तेथून सगळीं सारखींच. पण स्थानिक परिस्थिति आणि यात्रिकांच्या मनाची बैठक ह्यामुळें तरतम भाव राहतो. हिमालयांतील तीर्थक्षेत्रांचें माहात्म्य उमगल्यामुळें त्यांचा माझे मनावर पगडा बसला आहे. हें खरें असलें तरी तिकडील नैसर्गिक वातावरणांत साक्षात् ईश्वरी गुणांचें सहज दर्शन होऊं शकतें. इकडे मानवी गुणोत्कर्षाच्या पडद्याआडून तें घ्यावें लागतें एवढाच भेद.

॥ ९ ॥ गंगावंदन करून निरोप घेतला.

सकाळीं लवकरच परत मार्गी निघणार म्हणून पंडेजीस सूचना

देऊन ठेविली. कालच्या तापामुळें थकवा आला असेल ! एक दोन दिवस विश्रांती घ्या; काय लागेल तें सहाय्य करूं; संकोच करूं नका, वगैरे बोलून पंडेजींनीं बराच आग्रह केला. तसें कांहीं मला वाटत नाहीं. उन्ह वारे लागून ताप आला होता. मला ऊन सोसत नाहीं. त्याची योग्य काळजी घेईनच, असें सांगून त्यांचें देणें चुकतें केलें आणि दक्षिणा देऊन संभावना केली. पुन्हां एकदां त्यांस आठवण दिली कीं बरोबर नेण्याकरितां देवळांत भरून ठेवलेली गंगा निघतांना मिळण्यास उशीर होऊं नये.

सकाळीं मुखमार्जनादि आटोपून गंगेवर गेलों. थंडी मनस्वी होती. नाकांतून वाफाच बाहेर पडत होत्या. आचमन, मार्जन करतांना बोटें बधीर होऊन वांकडीं झालीं. गंगेचा निरोप घेतांना अंतःकरण भरून आलें, डोळे स्त्रवूं लागले. तोंडांतून शब्द फुटेना, अशा अवस्थेंत मनोमय प्रार्थना केली. गंगाष्टक म्हटलें. तेव्हां मनश्चक्षूंपुढें तिचें रूप उभें होतें, त्याची थोडीशी कल्पना गंगालहरींतील दोन श्लोकांत येण्यासारखी आहे.

समुत्पत्तिः पद्मारमणपदपद्मामलनखात् ।
निवासः कंदर्पप्रतिभटजटाजूटभवने ।
अथायं व्यासंगो हतपतितनिस्तारणविधौ ।
न कस्मादुत्कर्षस्तव जननि जागर्तु जगतः ।। १ ।।
अनाथः स्नेहार्द्राम् विगलित गतिः पुण्य गतिदाम् ।
पतन्विश्वोद्धर्त्री गदविगलितः सिद्धभिषजम्
सुधासिंधुं तृष्णाकुलितहृदयो मातरमयम् ।
शिशुः संप्राप्तस्त्वामहमिह विदध्याः समुचितम् ।। २ ।।

वामन पंडिताच्या खालील समश्लोकीवरून अर्थ सहज समजण्यासारखा आहे.

बरी उत्पत्ती, श्रीरमणचरणाच्या नखिहुनी ।
असावें शंभूच्या निशिदिनीं जटाजूट भवनीं ।
जपावें सर्वस्वें सतत पतितोद्धार करणीं ।
नसावें का माते ! तरि मग तुझें गौरव जनीं ।। १ ।।

अनाथ स्नेहाळे ! गति-विहिन मी, तूं सुगतिदा ।
जगोद्धारा तूं, मी पतित, गद मीं, तूं अरिगदा ।
सुधाब्धी तूं, मी जो तृषित अयि तूझा शिशु असा ।
तशा तूतें आलों शरण, पथ योजी उचितसा ॥ २ ॥

देवळांत जाऊन दर्शन घेतलें, आणि घरीं आणण्यासाठीं आदल्या-दिवशीं गंगोदक भरून देवळांत ठेवून दिलेला तांब्या तेथून घेऊन ओझेवाल्यांचे स्वाधीन केला आणि मार्गस्थ झालों. आल्या वाटेनेंच मल्ला चट्टीपर्यंत परतून तेथून पुढें बदरीकेदारची वाट धरावयाची होती.

# हिमालयदर्शन

भाग ३ रा

## बदरीकेदार

# हिमालयदर्शन



## गंगोत्तरीहून बदरी केदारकडे

गंगोत्तरीपासून मल्ला चट्टीपर्यंत ४० मैलांचा प्रवास पावणे तीन दिवसांत करून त्या दिवशीं पुढें राहिलेल्या वेळांत तीन मैलांवरील सौराकीगाड चट्टी गांठली आणि तेथें रात्रीं वस्ती केली.

मल्लाचट्टीपासून मधल्या वाटेनें म्हणजे पवाली दांडा ओलांडून बदरी केदार ऐंशी मैल आहे. पण ह्या वाटेंतील पवालीचा मार्ग अवघड व तापदायकहि आहे. त्यांत एकाच दिवसांत पंधरा मैलांचा टप्पा व तोहि अकरा हजार फूट उंचीपर्यंत चढ उतार करीत करावा लागतो. कोठें बर्फावरून तर कोठें वेळप्रसंगीं बर्फाच्या वादळांतून जाण्याचा प्रसंग येतो. ही वाट चुकवून राजमार्गानें म्हणजे ह्यापेक्षां कमी धोक्याच्या मार्गानें जावयाचें म्हणजे मल्लाचट्टीपासून उत्तर-क़ाशी, देवप्रयाग, रुद्रप्रयागवरून केदारनाथ १८६ मैल होतात. मधल्या रस्त्यानें शंभर मैलावरचें चक्कर वांचतें. पुष्कळ यात्री धोका पत्करून ह्याच मार्गानें जातात. क्वचित् दुर्दैव ओढवतें. पहिल्या जागतिक युद्धाच्या वेळीं समुद्रांतील प्रवासांत आगबोटी बुडण्याचा धोका जारी असतांना विलायतेस जातेवेळीं त्यांच्या जाण्यास विरोध करणाऱ्या स्नेह्यास लोकमान्य टिळकांनीं प्रश्न टाकला कीं, 'घरीं राहूनसुद्धां असले धोके येतातच कीं नाहीं ?' कार्यनिष्ठा असली म्हणजे असल्या भेडसावळींची क्षिति वाटत नाहीं.

सौरागड ते बुढाकेदारपर्यंतचें अंतर चोवीस मैल आहे. मध्यें चार–पांच चट्ट्या आहेत. ह्या अंतरांत झाडी दाट आहे. त्यांतले त्यांत छूणा ते बेलखपर्यंत निबिड अरण्यच आहे. तेथें देवदारसारखे सहा फूट व्यासाचे व शंभर फुटांवरील उंचीचें पल्लवान्वित डहाळ्या फांद्यांनीं डवारलेलें रीस नांवाचे वृक्षांचीं इतकी खेंचाखेच कीं, आहे भर दिवसा

माध्यान्हींहि सूर्यकिरणांस आंत रिघाव मिळणें कठिणच आहे.

आजच्या दहा मैलांचे प्रवासांत नऊ मैल वाट चढाची, पण त्यांतली शेवटची चार मैलांची कसोटीच पाहणारी होती. वाट जेमतेम एक माणसास जातां येईल एवढीच रुंद, त्यांतहि दगडधोंडे असून ती भिजल्यामुळें घसरडें झालेली. आणि इतकेंहि असून वाटेचा चढ अगदीं उभा उरावर आलेला होता. तेथून धड पार होणें म्हणजे एक दिव्यच होतें. भरींत भर म्हणूनच कीं काय काळ्याकुट्ट ढगांनीं आकाश भरून आल्यामुळें दुपारींच संध्याकाळ झाल्यासारखें वाटत होतें. पाऊस कोसळला नाहीं हें महद्भाग्यच. छुणा चट्टीवर दूध, दहीं व साजूक गाईचें तूप, पाहिजे तेवढें व स्वस्त मिळत होतें. दूध व दहीं तीन आणे शेर व तूप एक रुपया शेर होतें. इतकें स्वस्त व विपुल दूध दहीं तूप यात्रेंत कोठेंहि मिळालें नव्हतें. येथें पाण्याचें मात्र अतिदुर्भिक्ष होतें.

## माशांचा उपद्रव

येथें माशांचा उपद्रव इतका अतिरिक्त होतो कीं, त्यामुळें किळस यावी. साधारणपणें दिल्लीपासूनच इकडे माशांचे आधिक्य जाणवूं लागतें. हरद्वारपासून त्यांचा त्रास वाटूं लागतो व पुढें चारहि धामांच्या मार्गांत त्यांच्या त्रासामुळें जीव रंजीस येतो आणि वाटूं लागतें कीं, नको ही यात्रा. चालतांनासुद्धां त्या आपला पिच्छा सोडीत नाहींत. त्यांना हाकलतां हाकलतां दोन्ही हात थकून जातात. कितीहि हाकलल्या तरी त्यांचा थवाच्या थवा आपला पाठलाग करीतच असतो. आपल्याला आपल्यापुढील अंगावर, त्यावर कपडा असला तरी, बसलेल्या माशा दिसतात. म्हणून त्यांस आपण हाकलूं शकतों. पण पाठीकडे बसलेल्या माशा दिसत नाहींत. अंगांत कपडा असल्याकारणानें त्यांचा त्रासहि जाणवत नाहीं. पण हाच प्रकार पुढें चालणारांच्या पाठीवर दिसला म्हणजे शिसारीच येते. दांडी, कंडी, झंपनमध्यें सुखासीन बसून जाणाऱ्यांचें दुर्दैव तर पादचाऱ्यांपेक्षां फारच मोठें. माशा हाकलतां हाकलतां तो कंटाळून हताश होतो आणि तोंडावर रुमालबिमाल टाकतो. पण हवेची बाहेरची उष्णता आणि रुमालानें होणारा गुदमारा ह्यानें त्याची हालचाल होते. त्यामुळें ओझेवाल्यास

तोल संभाळण्यास त्रास होऊन तो दरडावूं लागतो. एवंच एवढासा क्षुल्लक दिसणारा प्राणी पण माणसास सतावून कसा रंजीस आणूं शकतो, हा वाईटांतूनहि चांगला बोध घेण्यासारखा धडा आहे.

माशांचा उपद्रव इकडे सर्वत्र आहे, असें वर म्हटलें आहे तरी त्यांतलें त्यांत यमुनोत्तरी गंगोत्तरीकडे तो जास्त आहे. धरासू येथें पान वाढून ठेवून त्यावर माशा बसूं नयेत म्हणून थाळीवजा परात–ती अल्युमिनमची होती, त्यावर पालथी घालून ठेवली होती. माशांचा त्रास होऊं नये म्हणून दार लोटून घेऊन अंधार केला होता. तरीसुद्धा त्या पालथ्या थाळीवर माशांचा एवढा थवा बसला होता कीं, थाळी दिसेना. मला वाटलें हा तवा येथें कोठून आला? तेव्हां सौभाग्यवतीनें माशा हाकलून देऊन भ्रमनिरास केला. आपण थोडीशी हालचाल केली तरी माशांना जागा सोडाविशी वाटत नाहीं, इतक्या त्या लोचट झालेल्या असतात. बुढाकेदार येथें मी पत्र लिहीत होतों. माझ्या लिहित्या हातावर इतक्या माशा बसून तो झाकला गेला कीं सबंध मनगट, सर्वहि आंतून बाहेरून बसतां येईल ती बोटांवरील जागा, इतकेंच काय पण फाउंटनपेनचे टोंकसुद्धां दिसेनासें झालें. माझें लिहिणें चालूच होतें. शिसारी येऊन मी हात झाडूं लागलों तेव्हां त्या सर्व उठल्या. मच्छरदाणींत बसून तें पत्र पुरें केलें; तरीसुद्धां त्यांनीं आंत प्रवेश केलाच. ही त्यांची खरी चिकाटी बोध घेण्यासारखी आहे.

फोटो घेण्यासाठीं त्यावेळीं मी 'फिल्म' न घेतां 'फोटो प्लेटस'-कांचाच बरोबर घेतल्या होत्या. फोटो घेतलेल्या कांचा काढून ठेवून त्याठिकाणीं नवीन घालून ठेवणें हे काम कुट्ट अंधारांत करावें लागतें. म्हणून तें मी रात्रीं एक झोंप झाल्यावर करून ठेवी. अंधारांत कांहींच दिसावयाचें नाहीं म्हणून गरज पडली तर उजेड असावा म्हणून टार्चच्या तोंडावर घनदाट तांबड्या रंगाचा कागद बांधून तो उजेड जवळ ठेवी. फोटो कांचांना तांबड्या उजेडानें अपाय होत नाहीं. सांगावयाचें आश्चर्य असें कीं, अपरात्रीं दोन वाजतां सुद्धां माशा येऊन त्या कागदावर इतक्या बसत कीं काळा पडदा लावून जणू तो सर्व उजेड बंदच करून टाकला आहे.

उपचारात्प्रतिबन्धो हि श्रेयः

यमुनोत्तरी गंगोत्तरीकडे विशेषतः यमुनोत्तरीकडे ह्या माशांतच एक प्रकारची अशी जात आहे कीं, ती ह्या घरगुती माशांप्रमाणेंच असून ती निराळी ओळखतां येत नाहीं. ती जरा लहान असते. ती ओल्या किंवा ओलसर अंगावर बसून चावते. चावल्या जागीं फोड येऊन पुढें तो वाहूं लागून अतिशय त्रास होतो. फोड चिघळतात, लवकर बरे होत नाहींत. ह्या माशांचे दंश बहुत करून गुडघ्या-खालींच झालेले दिसले. एक कारण असें दिसतें कीं तिला जमिनी-पासून फार उंच उडतां येत नसावें, आणि दुसरें असें कीं, गुडघ्या-वरील सर्व अंग नेहमीं झाकलेलें असतें. चावल्या जागीं जर लागो-लाग टिंक्चर आयोडीन लावलें तर फोड उद्भवतच नाहीं. न जाणों चुकून उद्भवला तर पुन्हां लावलें असतां जिरून जातो. चावल्यानंतर उपाय करण्यापेक्षां न चावूं देण्याचा उपाय करणें अधिक श्रेयस्कर आहे. ह्यासाठीं पायांत नेहमीं पायमोजे ठेवावे. चुकून सुध्दां ते उघडे राहूं देऊं नयेत. ओल्या किंवा ओलसर पायावर त्या बसतात म्हणून स्नानानंतर किंवा पाय धुतल्यानंतर ते प्रथम कोरडे करून कपडे बदलीपर्यंत पायावर माशी न बसूं देण्यासाठीं पाय सारखे हलते ठेवावे, म्हणजे एक प्रकारें तो भजनी नाचच होईल.

चारहि धामांच्या वाटेवर शेळया–मेंढयाच्या लेंडया, मूत, कुजलेल्या पानपाचोळयाची कुजकट घाण इतकी सांठलेली आहे कीं डोकें उठून जावें. यमुनोत्तरी, गंगोत्तरी, पवालीकडे वाटतें कीं हे डोंगर ह्या खतवडयाचेच झालेले आहेत. अशा ठिकाणांतून माशांची उत्पत्ति व वाढ अव्याहत चालूंच आहे.

माशांचा हा उपद्रव इतर यात्रेंत म्हणजे कैलासकडे जातांना अल्मोडयाचे डोंगरांत, पशुपति व मुक्ति नारायणाचे वाटेंवर नेपाळांत यत्किंचितहि नाहीं. चारधामांच्या यात्रेंत–सुध्दां सात आठ हजार फूट उंचीवर माशांचा मागमूसहि राहात नाहीं, म्हणूनच यात्रेचीं मुख्य ठिकाणें निरामय राहिलीं आहेत. बदरीकेदार व बदरीनारायण ह्या बाजूस चावक्या माशा जवळ जवळ नाहींतच. कैलास–मानस व नेपा-ळातील यात्रांत चावक्याच काय पण साध्या माशांचाहि त्रास नव्हता.

बेलाक चट्टीवर पोहोंचलों तेव्हां दोन अडीच तास दिवस पाठीवर होता. गुरांच्या दावणीप्रमाणें लांबचे लांब, ठेंगणी, छपरबंदी एकच एक चट्टी तेथें होती. तींत पन्नास साठ यात्रींची सोय दाटीवाटीनें झाली होती. यात्रींत चिलीमबाज बोवाजींचाच भरणा मोठा होता. त्यांच्या चिलमींतील धुरानें माझ्यासारख्या आळणी माणसास आंत मिनिटभर सुद्धां थांबणें अशक्य झालें. म्हणून बाहेर पडून इकडे तिकडे दृष्टि टाकली. ही चट्टी अगदीं डोंगरमाथ्यावरील पठारावर होती. ह्याची उंची ९००० फुटांवर आहे. एका बाजूस बालेकिल्ल्याप्रमाणें एक टेकाड होतें. ह्या पठारावर तांबडी केवटा माती होती तरी झाडी फार थोडी होती. त्यामुळें हवा खेळत होती. हा डोंगर पूर्व पश्चिम पसरलेला असल्यामुळें त्याच्या दक्षिणोत्तर दोनहि बाजूंचे वृक्षाच्छादित उतार आणि पायथ्याजवळील सखल भाग मनोवेधक दिसत होता. येथें पोहोचेपर्यंत ढग वितळून आकाश निरभ्र होऊन संध्याकाळचें कोवळें उन आल्हादकारक वाटत होतें. पश्चिमेकडे मावळत्या सूर्यानें ‘ असौ यस्ताम्रो अरुण उत बभ्रुः सुमंगलः ’ अशा विविध रंगाच्या छटांनीं पश्चिम दिशा कुंचलून मनोहर चित्रण केलें होतें. त्यांत काळ्या ढगांवर रुपेरी तर पांढऱ्यावर सोनेरी किनार लकाकत होती. गुलाबीपासून तांबड्यालाल रंगापर्यंतचा गुलाल उधळून पश्चिम दिशा रंगून जाऊन खुलली होती. ह्या चित्ताकर्षक देखाव्याकडे अडाणी माणसाचें सुद्धां लक्ष वेधलें गेलें होतें. जो तो चट्टीबाहेर येऊन मोठ्या कौतुकानें ही निसर्ग शोभा पहात तटस्थ उभा होता. गाईवासरेंहि जणू त्यांना कांहीं त्यांत आकर्षक वाटत होतें म्हणून टवकारून पाहात होतीं. भगवान सूर्यनारायणाचा उदय व अस्त असाच चमत्कृतिपूर्ण रंगीबेरंगी छटांनीं युक्त आणि नाना स्वरूपांत आजपर्यंत दिसत आला आहे. त्यानें कोणाचें चित्त वेंधून घेतलें नसेल असें नाहीं. “ असौ योवसर्पति नीलग्रीवो विलोहितः । उतैनं गोपा अदृशन्नदृशन्नुदहार्यः । उतैनंविश्वाभूतानि स दृष्टो मृडयाति नः । ’

अशा प्रकारची वस्तुस्थितिनिदर्शक तंतोतंत वर्णनें वैदिक कालांतीलहि वरील प्रमाणें पाहावयास सांपडतात. बोवांच्या चिलमींतील

धुरानें हें एक अलौकिक दृश्य पाहण्याचा योग आणून दिला.

रात्रौ रानांत आग लागल्याचे दिसून आले. आमचे व इतर बोजेवाले तिकडे धावले. काळजी वाटूं लागली कीं, पुढील वाट बंद होऊन जाते काय ? पण गेलेली मंडळी परत आल्यावर कळलें कीं आग फार दूर आहे.

एक परी अवघड चढ चढणें सोपें पण तोच उतार उतरणें अतीव कठीण. तें काम जीवावरचेंच असतें. बेलक पासून पंगराणा पांचच मैल. पण घसरडा उतार व किर्र झाडी. त्यापुढील वाट पावलापुढें पाऊल ठेवूनच उतरावी लागली. तरी बरें येथें झाडी कमी होती आणि वाट कोरडी होती. सोरागड–येथें गंगाघाट सोडला तो झाला येथें पुन्हां तिच्या कांठीं उतरलों. झाला येथेंहि छूणाप्रमाणें दूधदुभतें विपुल व स्वस्त होतें. झाला चट्टीपासून बुढाकेदार गांव पांच मैल आहे. वाटहि गंगाकाठानें डोंगरांच्या वळणावळणानें आंतबाहेर करीत सपाटीचीच लागली. तेव्हां दोन दिवसांतील त्या चढउतारी वाटांच्या दिव्यांतून एकदाचे जीवानिशीं सुटून बाहेर पडल्यानें हायसें वाटलें.

## बुढाकेदार

बुढाकेदार गांव इकडच्या मानानें बराच मोठा आहे. शंभर दीडशें उंबरठा आहे. धर्मगंगा व बालगंगा ह्या नद्यांचा येथें संगम झालेला आहे. संगमावरच गांव वसला आहे. नद्यांचें पाणी अतिशय स्वच्छ असून तें फार गार नाहीं. बुढा केदार मंदिर लहानच आहे. देवळांत स्वयंभू पिंडी आहे. तिचा आकार पर्वतशिखरासारखा पांच फूट लांब, पांच फूट रुंद व साडेतीन फूट उंचीचा आहे. त्यावरच सभोंवतीं शंकर (केदारेश्वर), भवानी, गणपती, विष्णु वगैरे देवतांच्या अडीच तीन फूट उंचीच्या सबंध मूर्ति, त्यांच्या पाठी पिंडीस चिकटलेल्या अशा अर्ध उठावदार खोदलेल्या आहेत. इतर ठिकाणाप्रमाणें येथील पंडेहि नांवाचेच ब्राह्मण आहेत. जानवीं घालतात पण तीं मंतरता येत नाहींत. येथें नाचकरी बायका व पोरी साजिंद्यासह यात्रीपुढें येऊन हावभाव करीत रस्त्यावर नाचतात. हेतु पैसे मिळविण्याचा!

## तपोभूमीचें पावित्र्य–रक्षणाची आवश्यकता

हिमालयातील यात्रा करण्यांत असा मुख्य हेतु असतो कीं, तेथील

निसर्गशुद्ध वातावरणांत, दैवी शक्तींच्या आविष्कारांचा साक्षात्कार पहावा, ऋषीमुनींच्या तपाचरणाच्या पुण्याईनें भारावून राहिलेल्या पवित्र अशा तीर्थक्षेत्रांचें दर्शन घ्यावें. त्याच्याच अनुषंगानें जगाकडे काय किंवा व्यवहाराकडे काय पाहाण्याची 'दिव्य दृष्टि'– ( जी भगवंतांनीं अर्जुनास उत्पन्न करून दिली होती, जी चर्म–चक्षूंची नसून अंतःचक्षूंची असते ) उत्पन्न करून घेऊन जी सद्बुद्धि उत्पन्न होईल, जे सद्विचार सुचतील, जे सदाचार पटतील, तीच पुण्यप्राप्ति पदरीं जोडावयाची असते. दुसरा हेतु असा असतो कीं, सुखोपभोग, त्यांची अभिलाषा आणि संमोहक विषय ह्यांतून कांहीं काळ तरी लक्ष आपोआप निघून वर म्हटल्याप्रमाणें व्यापक दृष्टीनें अवलोकन आणि ईशचिंतन ह्यांचे अभ्यासास निर्वेध सवड मिळावी, आणि तो एकाग्रतेनें करता यावा. लालचावलेलें मन आणि विषयांचें मोहाकर्षण हीं दोन्हीं सागेलागे दृष्टीआड झालेले असले तर तितका विक्षेप कमी. म्हणून तर हिमालयांतील यात्रांची एवढी महती. पण तेथेंहि व्यामोह माणसाच्या पाठीशीं उभे असतातच. हें त्या नाच्या बाईनें दाखवून दिलें. वैताग आला पण उपाय काय !

आपल्याकडील अचकट विचकट तमाशे आणि येथील नायकिणींचे हावभावयुक्त केलेले नाच सारखेच गर्ह्य. अंतर एवढेंच कीं तमाशे पाठीस लागून येत नाहींत. माणूस आपण होऊन त्यांच्या पाठीस लागतो. पण नाचिद्या हाकालल्या तरी पाठपुरावा सोडीत नाहींत. अशा स्थितींत नेहमीप्रमाणें दुर्लक्ष करणें एवढेंच स्वाधीनचें असतें. आमच्या चारहि यात्राप्रसंगांत ह्याच एका ठिकाणीं असला अनिष्ट प्रकार दृष्टीस पडला. इतरत्र कोठेंहि नाहीं.

ज्या तपोभूमीनें विश्वामित्रासारखा आपल्या सामर्थ्यानें प्रतिसृष्टि निर्माण करणारा महर्षि उत्पन्न केला किंवा जिनें शुकासारखा पूर्ण विरागी ब्रह्मचारी निर्माण केला आणि ज्यांच्या तपःसामर्थ्यामुळें इंद्राला आपलें इंद्रपद जाण्याची भीति उत्पन्न होऊन त्याकरितां त्याला त्या महर्षींचें तपःसामर्थ्य निर्बळ करण्यासाठीं मेनकारंभादि देवांगना त्यांच्यावर सोडाव्या लागल्या, त्या तपोभूमीचें पावित्र्य अक्षयींचेंच नष्ट करून टाकिलें म्हणजे असली भयभीतीची काळजी करावयास

नको, ह्या हेतूनें त्या अप्सरांच्या वंशज येथें अक्षय्यच नांदाव्यात म्हणून ही त्याचीच योजना असावी कीं काय न कळे ! अधिकारलालसा इंद्रादि देवांनाहि सुटत नाहीं. संभाव्य होणारा प्रतिस्पर्धी असला तरी सुद्धां त्याला हतबल करून उठवून लावण्यासाठीं सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब करण्यास धर्मराज्य असतांना देवाधिदेवसुद्धां भीडमुरवत राखित नाहीं.

निसर्गशुद्ध अशा हिमालयांतील पवित्र वातावरणांत तपोनिष्ठ ऋषीमुनींनीं सहस्त्राणि सहस्त्रो वर्षांपूर्वींच इकडील तीर्थक्षेत्रें निर्माण केलीं; म्हणजेच त्यांच्या तेथील वास्तव्यानें तीं तीं स्थानें पुनीत होऊन भारलीं गेलीं आणि त्यांना तीर्थक्षेत्रत्व प्राप्त झालें. वास्तविक हिमालय म्हणजे भूलोकींचा स्वर्गच आहे. आणि म्हणूनच स्वर्गीय देवदेवतांचे वास्तव्यांचें तो प्रतीक आहे. त्याच्याइतकें अनुरूप स्थान जगांत अन्यत्र सांपडणार नाहीं. थोडक्यांत म्हणजे तो भरतखंडाचें देवघर आहे. ह्या देवळाचें पावित्र्य आणि शुद्धता ह्यांचें रक्षण राजानें व चालू मनूंत राजशासन संस्थेनें आणि त्याहिपेक्षां अधिक काळजीकाटद्यानें व उत्तरदायित्वाच्या जाणिवेनें समाजानेंहि केलें पाहिजे. आज विसाव्या शतकांत सुधारलेल्या जगांतील धर्मातीत समजल्या गेलेल्या राज्य-शासन संस्थासुद्धां वन्य पशूंकरितां रानेंवनें राखून ठेवण्याची काळजी घेतात. शिक्षणालयें तशींच न्यायालयें ह्यांचें वातावरण शांत, शुद्ध व पवित्र राहील अशी दक्षता घेतात. खाण्याचे पदार्थ व पिण्याचें पाणी निर्मळ व शुद्ध राखण्याविषयीं जागरूकतेनें पहात असतात. ही तपो-भूमी ही एक प्रायोगिक मानसोन्नति शिक्षणाची शाळाच आहे. ह्याच दृष्टीनें हिमालयाच्या तपोभूमीचें पावित्र्य व शुद्धता राखण्याची काळजी घेणें हेंहि राज्यशासन संस्थेचें काम ठरतें. यात्रींशिवाय अन-धिकाऱ्यांस तेथें प्रवेशबंदी असावी. लोकशाही असली म्हणजे पावि-त्र्याचें विडंबन होऊन स्वैराचारास वाव मिळालाच पाहिजे असें कोण म्हणेल !

सुधारणेच्या आघाडीस असलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतील विवेचक विचारवंतांसहि ह्या तीर्थक्षेत्रांतील पवित्र वातावरणाचें महत्त्व पटूं लागलें आहे. हिंदु लोकांच्या यात्रा करण्यांतील हेतूंचा आणि त्या-

पासून होणाऱ्या फलनिष्पत्तीचा ठाव लागून आणि तो मानस-शास्त्राच्या चिकित्सेमें पटून त्यांस असें वाटूं लागलें आहे कीं, आपणहि आपल्या आवडीनिवडीचीं पवित्र स्थानें शोधून काढून तेथें जमेल तितके वेळां, निदान आयुष्यांत एकदां तरी जाऊन त्या यात्रींप्रमाणें पारमार्थिक दृष्टि उत्पन्न करून घेऊन परमोच्च सुखासमाधानाचें यथेच्छ अमृतपान करून घ्यावें. ह्यावरून एवढें समजून चालावयास अडचण नाहीं कीं, हीं तीर्थक्षेत्रें आणि त्यांच्या यात्रा करणें हें कांहीं निवळ अंधश्रद्धेचें, गतानुगतिक अज्ञान परंपरेचें काम नाहीं. त्यांत अध्यात्म जागृति, मानसिक उन्नति आणि सुखशांतीचा अभ्यास आहे.

### इडा पिडा टळो म्हणून भैरोबास नारळ

बुढाकेदारहून निघालों ते दिवसाउजेडीच. सहा मैलांवर हतकून वा भैरवचट्टीवर येऊन राहिलों. ही चट्टी डोंगरावर मध्येंच आहे. डोंगरमाथा बराच उंच आहे. झाडीहि दाट आहे. चट्टीभोंवतीं सपाटी आहे. पाण्याचें दुर्भिक्षच आहे. भैरव व हनुमानजीचें लहानसें देऊळ आहे. आमचे बोजेवाल्यांनीं आग्रह धरिला कीं, येथें भैरवास नारळ फोडला पाहिजे. इकडे गोटचासच नारळ समजतात. त्यास पैसे दिले. त्यांनीं भैरवापुढें नारळ फोडून प्रसादाचें खोबरें आणून दिलें. तो म्हणाला 'पवाली-दांडीची सीमा येथून लागते. भैरवजी येथें बसून द्वारपाळाचें काम करितात. त्यांचा प्रसाद घेऊन गेलें म्हणजे सर्व इडा-पिडा टळून, पवालीमधून सुखरूप बाहेर पडूं.'

सौभाग्यवतीनें विचारलें कीं, आपल्या येथें देवाला कधीं नवस केला आहे, कां कधीं सत्यनारायण केला आहे, हें मला कधीं चुकून सुद्धा दिसलेले नाहीं. असें असतांना पातेरामाच्या म्हणण्यावर तुमचा विश्वास कसा बसतो ? मी म्हटलें तूं म्हणतेस त्या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत. वास्तविक पाहतां माझा भूताखेतावर किंवा जोखाई. तुकाई सारख्या तत्सम देवतांवर तितका विश्वास नाहीं. तथापि माझ्या अल्प स्वल्प अनुभवानें मी असें समजतों कीं, त्या शक्ति असतीलहि वा नसतीलहि. मनस्वी माणसांपुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं एवढें खरें. त्यांचें सामर्थ्य आणि क्रियाशक्ति ही जिवंत माणसापेक्षां अधिक नसते.

मी आहे ब्राह्मण, प्रत्यहि गायत्री–मंत्राची उपासना करणारा. माझे भोंवतीं ह्या मंत्रसामर्थ्याचें अक्षय्य कवच असल्याची माझी दृढ श्रद्धा आहे. त्यामुळें समर्थ रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें – समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे ? – असल्या क्षुद्र देवतांची मजकडे नुसतें पाहाण्याची छाती होणार नाहीं मग माझें अनिष्ट करण्याची त्यांची काय प्राज्ञा आहे ? अशी माझी स्वतःपुरती समजूत असली तरी इतरांचा त्याजवर विश्वास असला तर त्यांत वावगें कांहीं आहे असें मला वाटत नाहीं. त्या श्रद्धेच्या बलावर त्यांचा आत्मविश्वास वाढत असेल, त्यांना धीर येऊन ते कार्यप्रवृत्त होत असतील तर ती इष्टापत्तीच आहे. प्रसंगाप्रसंगानुरोधानें देव, देवता, लहान असो वा मोठी असो, अधिकारपरत्वें त्याची करुणा भाकणें, त्याच्या कृपेकरितां त्याची आळवणी करणें, त्याला प्रसन्न करून घेणें, हा मानवी स्वभावच आहे. गेल्या दोन जागतिक महायुद्धांत दोन्ही बाजूंकडील राष्ट्रें आपली बाजू सत्याची आहे, आपणास जय मिळालाच पाहिजे, म्हणून देवाची कृपा मागणेसाठीं 'चर्च' मधून घंटा वाजवीत होतेच कीं ! ह्या दृष्टीनें बोजेवाल्यांना श्रद्धेनें नारळ फोडून जें समाधान झालें तें एखाद्या शंकेखोरास कशानेंहि झालें नसतें. वाटेंत एखादा दुर्दैवी प्रकार ओढवला व त्यास त्याचें कार्य-कारण समजलें, अथवा तो अपघातच ठरला, किंवा ती दैवयोगाची गोष्ट मानावी लागली, तर त्या योगें बोजेवाल्यांना झालेल्या समाधानापेक्षां त्यास अधिक समाधान झालें असें कसें ठरणार दोघांनाहि समाधान मानूनच घ्यावें लागतें. पद्धति वेगळचा इतकेंच. अनुभवानें येणारें शहाणपण दोघेहि संग्रहित करितात. त्यांत मात्र तरतम भाव राहतो. बुध्दीची किंवा विचाराची झेप स्थगित झाली म्हणजे सुशिक्षित असो नाहींतर खेडवळ असो देवाची, धर्माची वा दैवाची काठी आधारास घेतोच. आगें मागें एवढाच प्रश्न.

आपल्याकडेहि घाटांतील प्रवास मार्गांत बिकट चढाच्या माथ्यावर एखाद्या जोखाई, डाकाई, तुकाईचें लहानसें देऊळ असतें. तें दरी-कपारींतच असतें. तेथीलच स्वयंभू टेंगळाला किंवा आणून ठेवलेल्या गोटचाला शेंदूर माखून ठेवला म्हणजे ती देवता तेथें उत्पन्न होऊन

बसते. तेथून येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या तेथें थांबून त्या देवतेस नारळ फोडून अर्धा तेथें पुढें ठेवतात व अर्धा प्रसाद म्हणून वाटतात. हेतू असा असतो कीं, तिच्या कृपेनेंच आपण हा बिकट चढ निर्विघ्न चढून आलों. किंवा तिच्याच कृपाप्रसादेनें तो उतरूनहि तसेंच जाऊं. बैलगाड्यांच्या प्रवासांत हा प्रचार निरपवाद होत असे. मोटार प्रवासांतहि हा प्रचार अगदींच बंद झाला आहे असें नाहीं.

ह्या अडाणी दिसणाऱ्या चालीरीतीवर ज्यांचा भाव असतो त्यांना त्यापासून एवढा आत्मविश्वास उत्पन्न होऊन त्यांच्यांत धैर्य संचरते कीं ते बेडर वृत्तीनें एकाकी सुद्धां त्या बिकट मार्गांतून पार होतात. त्यांना त्याची किंमत मोठीच आहे.

## सुंठीचा काढा

येथें पोहोंचल्यापासून गारठा जाणवूं लागला. म्हणून येथून पुढें प्रत्यहीं संध्याकाळीं गूळ घालून सुंठीचा काढा घेण्याचा परिपाठ ठेवला. ह्याचा उपयोग फारच चांगला झाला. अनायासें येथें दूध मिळाल्यामुळें त्यांत घालतां आलें.

## भिलंगना चट्टी

सकाळी तीन मैलांवर भौंटा चट्टी लागली. येथें उत्तम खवा व पेढे मिळाले. पुढें सात मैलांवर ( भिलंगना ) भृगुगंगेच्या कांठीं एका नवीनच झालेल्या छोट्या चट्टीवर उतरलों. उतरतांना वाट अशी नव्हतीच. सोयीचें दिसेल तेथून उतरावें. उतारावर चीडवृक्षांचें वाळून गळलेलें सूचिपर्ण ( वीत लांबीच्या वाळलेल्या गवताच्या काड्याच त्या ) दाट पडलें होतें. उभा उतार आणि त्यावर त्या सुळसुळीत काड्या. मग काठीचा आधार घेऊनसुद्धां पावलांस धर मिळणार कसा ? अडचणींत सांपडलों होतो. उपायच नव्हता. अवसान धरून खालीं बसलों, आणि हळूहळू जपून सरकत सरकत तळ गांठला. बोजेवालेहि असेच उतरले. पण बोजा घेऊन उतरण्यांत त्यांचें खरें धाडस व कौशल्य आहे.

## जळीं मारितां बुडी तोंडाची वळे आंकडी.

भृगुगंगेवर जाऊंन स्नान केलें. पाणी छातीइतकेंच खोल होतें. ओढ नव्हती. पण अतिशय गारठणक होतें. संथ आणि बुडी मारण्या-

इतकें खोल पाणी त्यावेळपर्यंत कोठें सांपडलें नव्हतें. जागा निवाऱ्याची व ऊनहि चांगलें होतें. हें पाहून पाण्यांत जाऊन बुडी मारली. वर येतों तों तोंड जें वांकडें होऊन बसलें तें नीट होईच ना ! बोलतां येईना. शिवाय आसपास कोणी नव्हतेंहि. मोठी पंचाईत झाली. हनुवटीच्या दोन्ही बाजवा खसाखसा चोळल्या तेव्हां ती हलावयास लागून तोंड समोर झालें. एवढ्या अवकाशांत पायांत वांब येऊन कळा करूं लागल्या. पुन्हां बुडी मारण्याचा धीर झाला नाहीं.

### इकडील गुप्त पोलिसांची माणुसकी

जेवण करीत असतां एक गढवाली शिपाई—तो गुप्त खात्यांतील होता—चट्टींत येऊन आमच्या नांवगांवाविषयीं चौकशी करूं लागला. त्यानें आमच्या बोजेवाल्याविषयीं सर्व चौकशी केली. तो जाऊं लागला, तेव्हां त्यास विचारलें कीं, ही चौकशी कशासाठीं ? तो आपल्याइकडील शिपायांप्रमाणें अधिकारमत्त नव्हता. त्याच्यांत माणुसकी होती. तो म्हणाला, एका यात्रेकरू बाईची ट्रंक घेऊन तिचा बोजेवाला पळून गेला आहे. तींत तिचा रोकड व सोनें मिळून पांचशें रुपयांचा ऐवज आहे. मी विचारलें आमचे बोजेवाल्यास तुमच्यापैकीं कोणी वाटेंत अडविणार तर नाहींना ? तो म्हणाला ही गोष्ट गेल्या आठ दिवसांतील आहे. तुमचे बोजेवाले तुमच्या बरोबर आलेले. ह्या गोष्टीस तीन आठवडे होत आले आहेत. त्यांचा वहीम कोणासच येणार नाहीं. तुम्हीहि लक्ष ठेवा आणि कोणाचा संशय आल्यास ठाण्यावर वर्दी देण्याची कृपा करा !

### पवालीचा पायथा—घुत्तु

जेवण झाल्याबरोबर पुढें निघालों. संध्याकाळचे वस्तीस गौमांडा गांठावयाचा होता. सकाळीं दहा मैल प्रवास होऊन अजून सहा मैल अंतर तोडावयाचें होतें. दोन मैलांवर घुत्तु चट्टी होती व तेथूनच पवालीच्या चढास खरा आरंभ होतो. पुढील तेरा मैलांचा कठीण चढ एका दिवसांतच काय, पण दोन दिवसांतहि झेंपणार नाहीं, म्हणून त्यापैकीं पहिले चार मैल त्याचदिवशीं चढून जावयाचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें वाटेंत मैला दोन मैलावर लागलेल्या घुत्तू, गोपाळ व गवाना चट्ट्या सोडून दिल्या. घुत्तू भिलंगनेच्या कांठीं असून तेथें १० – १५

घरांची वस्ती आहे. धर्मशाळा चट्टया चांगल्या आहेत. रघुनाथाचें मंदिर आहे. नदीचे कांठीं डोंगरावर शिवालय आहे. गौमांडा गांठ-ण्यास अंधार झाला. वाटेंत दोन ठिकाणीं पाऊस लागला. हवेंत थंडी फार होती. उघडया हातांनीं कांठी धरतां येत नव्हती. तिच्या आधारा-शिवाय पाऊल उचलण्याची सोय नव्हती. झाडी दाट, ढग आलेले, वाट होती म्हणण्यापेक्षां ती नव्हतीच म्हणणें अधिक निदर्शक ठरेल. खांचखळगे व सुटे दगडधोंडे न लक्ष ठेवतांहि पावलागणिक आपली जाणीव करून देत. ओबडधोबड पायरीसारख्या लहानमोठया उंच-वटयांनीं वाट अडवून चकरा घेण्यास लावलें. पावसानें डोंगर ओला झाला होता. त्यामुळें घसरडें होऊन दंडवत घडल्याशिवाय पुढें जाणारा भाग्याचाच समजला पाहिजे. इतक्या सर्व आपत्तींत वाढत्या अंधेराची भर पडूं लागली होती. पण सुदैवानें इतक्याहि अडचणींतून आम्ही सुधे बाहेर पडलों.

हिमालयांतील पांच सहा हजार फूट उंचीवरच्या हवेचा लहरी-पणा मोठाच विलक्षण असतो. एका दिवसांतच तीनहि ऋतूंतील हवेचा अनुभव घ्यावयास सांपडतो. आम्हांस तर पाव दिवसांत हा अनुभव मिळाला. भृगुगंगेवरील चट्टीहून निघालों तेव्हां दोन वाजले होते. कडक ऊन होतें. म्हणून अंगांत नुसता सद्राच घालून चालत होतों. पण एका तासाभरांत आभाळ फिरलें आणि पावसास सुरवात-तच झाली, म्हणून पावसाळी कोट चढविले. ते पाण्याला दाद न देणारे ( वाटरप्रूफ ) होते. तरी त्यावरून पाणी वाहिल्यानें इतके गार पडले कीं, आंतून लोकरी सदरा घालावा लागला. पाऊस थांबला तों ह्या कपडयांनीं अंगास घामाच्या धारा लागल्या म्हणून ते काढावे लागले. पण अस्तमानाच्या सुमारास वारे सुटून एकदम थंडी वाजूं लागली. त्याकरितां पुन्हां लोकरी सदरा घालण्याची पाळी आली. हा सगळा प्रकार चारच तासांत करावा लागला.

### गौमांडा–तेथील वन–वास

गौमांडाचट्टी डोंगरमाथ्यावर नाहीं, ती मध्येंच आहे. भोंवतीं सपाटी नाहीं कीं मोकळी जागाहि नाहीं. मात्र किर्र दाट झाडी अमोप आहे. इतक्या उंचीवर मनस्वी थंडी व झोंबणारें गार वारें नेहमीं

असतेंच. तेथें एकच एक चट्टी व तीहि बेलख घाटीवरील चट्टीप्रमाणें ठेंगणी, कोंदट व गोठेवजा होती. नमूनच ओणव्यानें आंत जातां येईल अशी एकच वाट चट्टीच्या एका टोंकास होती. बोजेवाल्यांच्या मागोमाग होतों म्हणून कसेंतरी आंत शिरतां आलें. पाऊलहि ठेवण्यास जागा नव्हती, इतकी यात्रींची आंत खेंचाखेंच झालेली होती. ही दाटी पाहून आमचा जीव तर दडपूनच गेला ! आमचे बोजेवाल्यांनीं रेटारेटी आणि आरडा–ओरड करून, आम्हां दोघांस दाटीवाटीनें बसतां येईल एवढी जागा करून घेतली. लोकांच्या बोलण्या चालण्याचा गोंगाट इतका चालला होता कीं डोकें पिकूनच जावें ! आमचे बोजेवाले मला कांहीं सांगत होते, पण तें स्पष्ट ऐकूंच येईना. आंत केलेल्या शेकोटयांचा धूर आणि साधू बैराग्यांनीं शिलगावलेल्या चिलमींवर यथेच्छ दम मारून सोडलेलें धूमास्त्र, ह्यांनीं हवा कोंदाटून धुंद करून सोडली होती. डोळे खुपू लागले आणि आग होऊन त्यांतून पाणी गळूं लागलें. गुदमरून जाण्याची पाळी आली. हा सर्व प्रकार पाहून वीट आला. सतावून गेलों आणि रेटारेटी करून वाट काढतांना लोकांचीं बोलणीं व धक्के खात एकदाचे बाहेर निघालों. मोकळी हवा लागली आणि एकदांचे सुटलों असें झालें. इकडील प्रवासांत अगोदर पोहोंचेल त्याची चांगली सोय होते. चांगली जागा निवडून घेतां येतें, दूध दहीं मिळूं शकतें व पाहिजे असतील अशीं भांडींकुंडींहि मिळतात. पण उशिरां पोहोंचणारांची अशीच दशा होते. बोजेवाल्यांस म्हटलें कीं नुकतेंच पंधरा दिवसांपूर्वीं जम्नाचट्टीवर यमुनेच्या कांठीं आपण उघडयावरच रात्र काढली होती. तो अनुभव अजून विसरलेला नाहीं. त्याप्रमाणें येथेंहि उघडयावर पडूं. पाऊस आला तर मग पाहूं. आसपास त्यांतलें त्यांत सपाट व कोरडी जागा पाहून तेथें तळ दिला. आमच्याभोंवतीं चारहि बाजूस बोजेवाल्यांनीं आपल्या पथाऱ्या पसरल्या. रात्र झालेली, जिकडे तिकडे अंधारच अंधार. आमचाच काय तो एक मिणमिण करणारा कंदील. पाणी कोठें होतें त्याचा पत्ता नव्हता. त्या दिवशीं वळकटीवर बसूनच पाण्याशिवाय संध्या करावी लागली. आमच्याभोंवतीं दोन तीन गुराखी पोरें जमलीं. त्यांतील एकास विचारलें कीं, आपण येथें शेकोटी करूं. लांकडें

मिळतील का ? तुला चार पैसे देईन. तो चटदिशीं धांवलाच. तें पाहून दुसरे दोघे विचारूं लागलें कीं त्याला काय काम सांगितलें ? लांकडें आणावयास सांगितलें. हे शब्द ऐकतांच तीं छातीवर हात मारून म्हणालीं, त्याच्यापेक्षां मोठीं, सुकीं, सकाळपर्यंत जळत राहतील अशीं आम्ही आणून देतों. तीं पाहून तुम्हांस वाटतील तेवढेच पैसे आम्हांस द्या. तींहि मुलें पहिल्याच्या पाठोपाठ धांवलीं. तिघांनींहि सकाळपर्यंत दोन आगटयास पुरतील एवढया जाडजूड फांद्या ओढीत आणल्या. त्यांच्या हातावर चार आणे ठेवले. तीं म्हणूं लागलीं दोनच आणे आणखी द्या. ह्यापेक्षां मोठीं घेऊन येतों. बरे म्हणतांच त्यांनीं जाऊन म्हटल्याप्रमाणें आणलींहि. उशागती पायगती दोन धुन्या पेटविल्या. त्यानें थोडासा तरी उबारा आला. त्यामुळें आमच्यापेक्षां बोजेवाल्यांची सोय चांगली झाली. गरम पायमोजे, कानटोपी ( माकड टोपी ) व जर्सी ( लोकरीचा सबंध बाह्याचा लांब सदरा ) अंगांत घालून निजलों. अंथरण्यास होल्डॉल, दुहेरी कांबळें, व त्यावर दुहेरी धोतर व पांघरण्यास धूत उपरणें, वर शाल व त्यांवर पासोडी सारखी दुहेरी जाड मारवाडी धाबळी. एवढया पांघरुणावर आठनऊ हजार फूट उंचीवरील कडक थंडी–वाऱ्याचा यत्किंचितसुद्धां त्रास झाला नाहीं. स्वस्थ झोंप आली. बोजेवाले झोंपी गेल्यानंतर थंडीनें काकडून गेलेले यात्री, यांत साधू बैरागीच अधिक होते, त्यांनीं धुन्या जागृत ठेवण्याचें काम सकाळपर्यंत चालू ठेवलें होतें. ह्या लोकांच्या जागत्या बैठकीमुळें आम्हांभोंवतीं आयती रखवाली झाली. विंचू, साप, किरडू ह्यांचें भय राहिलें नाहीं आणि भोंवतीं उबाराहि राखला गेला. सहा आणेच खर्च आला. आंतल्यापेक्षां बाहेर अधिक स्वच्छ व मोकळें वाटलें आणि गोरगरीबांना अनायासें रात्र कांकडत काढावी लागली नाहीं.

## बेलख घाटी

गंगोत्तरीहून मल्ला ते त्रिजुगी नारायण ह्या जवळच्या वाटेनें केदारला जातांना वाटेंत आडव्या आलेल्या दोन पर्वतरांगा ओलांडून जावें लागतें. ह्यांपैकीं पहिली रांग लागते ती ‘ बेलख ’ पर्वताची. हिच्या चढणीस सारागड येथें आरंभ होऊन दहा मैलावर ‘ बेलख ’ येथें ९७३० फूट उंचीला तिचा माथा येतो. तेथून नऊ मैल, खालीं

उतरून धर्मगंगेच्या कांठीं झाला येथें ५७४० फूट उंचीला उतार संपतो. अशी ही एकोणीस मैलांची पहिली 'बेलख घाटी' आहे.

पवाली दांडी

दुसरी रांग लागते ती, 'पवाली पर्वताची.' घुत्तू–पासून दुफंदा-पर्यंत सात मैल खडी चढण आहे, पुढें धार किंवा दांडी म्हणजे माथा. ह्यावरील वाट पवालीच्या आगें मागें तीन तीन मैल आहे. येथें उंची १२००० फुटाचे वर जाते. चारहि धामांपैकीं एकाचीहि उंची इतकी नाहीं. तथापि तुंगनाथ व वसुधारा या उपतीर्थांची उंची एवढाली आहे. 'पवाली धार' संपली म्हणजे जो उतार लागतो तो मुग्गुकी मांडापर्यंत सहा मैल, पुढें त्रिजुगी–नारायण पांच मैल व त्याच्याहि पुढें सोनप्रयाग तीन मैल. असा हा सत्तावीस मैलांचा 'पवाली दांडीचा' व्याप आहे.

पहिल्या घाटींत खडे चढउतार व वेडीवांकडी वाट आहे. तेथेंच तेवढें घसरून पडण्याचे धोके आहेत, पण दुसऱ्या घाटींत पहिलींतील सर्व धोके द्विगुणित झालेले असून शिवाय भयंकर वादळें, हिमवर्षाव, गारा व पाऊस यांच्या आकस्मिक माऱ्यापासून प्राणांतिक धोके असतात. ह्या सर्व गोष्टी नीट लक्षांत ठेवून पवालींतील प्रवासाचें वेळापत्रक, हवामानाकडे दृष्टि नीट ठेवून, तत्तस्थानिकांचा व बोजे-वाल्यांचा विचार घेऊन ठरविणें अत्यंत महत्त्वाचें आहे. अजाणतां, वेळ वांचविण्यासाठीं किंवा भलत्याच ईर्षेस बळी पडून चूक झाली तर प्राणाशींच खेळ आहे, हें विसरूं नये. अशा संकटांत बेपत्ता झाले-ल्यांची अवस्था काय होत असेल ती देव जाणें. पण जे त्यांत सांपडून सुदैवानें निभावून बाहेर पडले, त्यांच्या अनुभवावरून 'पुढच्यास ठेंच मागचा शहाणा' ह्या न्यायानें बोध घेणें, उपयुक्त आहे. आमचे एक स्नेही श्री. वि. य. तथा अप्पासाहेब चितळे नुकतेच तिकडे जाऊन आले. त्यांचा अनुभव लक्षांत ठेवण्यासारखा आहे. तो शेवटीं देत आहे.

दुफंदा

गौमांड्याहून नेहमींपेक्षां उशिरा, म्हणजे सहा वाजतां उजाडल्या-वर निघालों. तीन मैलांवर दुफंदा चट्टी लागली. ह्या चट्टीवर निवाऱ्या-

पेक्षां दुसरी कोणतीच सोय नाहीं. मुख्य लागणारा जिन्नस म्हणजे प्रथम पाणी, पण तेंच येथें नव्हतें. जातां जातां वाटेंत घडी अर्ध घडी थांबून विसांवा घेतां यावा इतकाच हिचा उपयोग होतो. येथून पुढें नेहमीं अकल्पित वादळी हवा सुटून बर्फ व गारा इतक्या पडतात कीं दहा पांच मिनिटांत गुडघागुडघा त्यांचा खच होतो. अशा वेळीं त्यांत सांपडणाऱ्या माणसास मृत्यूचेंच बोलावणें होऊन बसतें. दुर्दैवानें असल्या आपत्तींत सांपडणाऱ्यांना दुफंदा काय, फन काय, किंवा पवाली काय ह्या चट्टयांचा आसरा घेऊन वादळी संकटांतून निभावण्याची सोय होते. दुफंदापासून पवाली तीन मैलांवर आहे. दोन मैलांवर अशीच एक लहान चट्टी लागते. तेथपर्यंत दाट झाडीतून सारखी चढण आहे. वाटेबद्दल पुन्हां पुन्हां तेंच रडगाणें काय सांगावें ? आरंभापासून चुकूनसुद्धां बरी म्हणतां येईल अशी वाट कोठेंहि लागली नाहीं, तर येथें तरी ती निराळी कशी असणार ? आडरानींच वाट ती. सहाच मैल अंतर, पण तेवढें तोडण्यास पांच तास लागले.

## पवाली चट्टी

पवाली चट्टी एका डोंगरमाथ्यावर आहे तरी अजून पुढें दुसरी चढण आहेच. चट्टीभोंवतीं मोठी सपाटी आहे. येथें झाडे नाहींत म्हटलें तर एक का होईना झाड आहे. एखाद्या ओसाड माळावरील बाभळीच्या झाडाप्रमाणें तें ह्या पठारावर एकाकीच ताठ मानेनें उभें राहून सुचवीत आहे कीं लोक हो, या. येथें कसलीहि भीति नाहीं. माझ्याप्रमाणें प्रावरण घेऊन तुम्हीहि येथील थंडीच्या कडाक्यास आणि वादळाच्या माऱ्यास तोंड देऊन राहूं शकतां. त्या झाडाचें खोड आणि सर्व लहानमोठ्या फांद्या दाट शेवाळांनीं झांकून गेल्या होत्या. त्याच्या फांद्यावरून वाव वाव लांबीचें शेवाळ लोंबत होतें. मूळच्या त्या रोडक्या झाडांस शेवाळी आवरणाचें गुबगुबीत पांघरूण मिळाल्यामुळें त्यास ऊब तर मिळालीच, पण त्याचें बाळसें वाढून तें डौलदार दिसूं लागलें. अशा थाटाचें हें एकच एक झाड तेथें होतें, तरी त्यानें तेथील त्या उघडया बोडक्या, ओसाड पठाराचें रुक्ष व भकास दिसणारें स्वरूप पालटलें आणि त्यांत विविधता उत्पन्न करून त्यास उठाव आणि आकर्षक शोभा आणली.

तेथील उंची अकरा हजार फूट आहे. सबंध दिवसभर अंगांतून थंडी गेली नाहीं. वारेंहि सारखें जोरानें वहातच होतें. जिवाचे करारावरच आंघोळ केली. पाणीहि थोडेंच होतें. मल्लाचट्टी सोडल्यानंतर तोला, हतकून, गौमांडा, दुफंदा, पवाली ह्या सर्व ठिकाणीं पाणी अगदीं कमी व तेंहि सांचवणीचें होतें, चांगलें नव्हतें. येथें चार पांच चट्ट्या आहेत व त्या चांगल्या निवाऱ्याच्या आहेत. एखाददुसरी दोन मजलीहि आहे. दुपारीं वादळी हवा चालून गारांचा वर्षाव झाला. ह्या गारा जोंधळ्याच्या लाह्याएवढ्या व तशाच हलक्या, दुध्या रंगाच्या व कोरड्या असतात. अंगावर पडल्या तर लागत नाहींत. आपल्याकडील गारा टणक व पारदर्शक असतात. त्या लागल्या तर टेंगूळच आणतात. वादळामुळें थंडी आणखीच वाढली. हीं वादळें ह्या टापूंत नेहमींच होतात. पण तास अर्ध्या तासापेक्षां अगोदर तीं होण्याचा अंदाज लागत नाहीं. अघोटीस तीं बहुतेक प्रत्यहीं असतात व पुढें पुढें कमी होत जातात. ह्याच्यावरच्या उंचीवर सूर्योदयानंतर दोन तीन तासांनीं तीं चालू होऊन अस्तमानानंतर थोड्या वेळांनीं थांबतात. तसा प्रकार सहसा ह्या उंचीला नसतो. येथें वादळें झालीं किंवा गारा—बर्फ पडलें तर दुपारींच. सकाळचें क्वचितच.

येथें पोहोंचल्यापासून थंडी, ऊन, नागडा—उघडा पाऊस, गारा, वारा, सर्व कांहीं हवेचे श्रीमंती चोचल्यांचे स्वैर प्रकार पाहावयास सांपडले. रात्रीं आभाळ निवळून अगदीं निरभ्र झालें होतें. तो ज्येष्ठ शुद्ध दशमीचा दिवस होता. पूर्व रात्रीलाच पिठासारखें पांढरें स्वच्छ टिपूर चांदणें पडलें होतें. वारा निश्चेष्ट होता. चिटपांखरांचा आवाज नव्हता किंवा रात्रीच्या किड्यांचा किर्र आवाज सुद्धां नव्हता. भयभीतीचेंहि कांहीं कारण नव्हतें. थंडी होती, पण चट्टींतील धुनी आणि गरम पांघरुणें ह्यांनीं तिचा प्रभाव जाणवत नव्हता. सुंठीचा काढा होत होता तेवढ्या वेळांत एकदां बाहेरचा देखावा न्याहाळावा म्हणून चट्टीबाहेर आलों.

### पवालीतील दृश्य

जिकडे तिकडे शांत गंभीर वातावरण पसरलेलें होतें, कसलीहि चाहूल लागत नव्हती कीं हालचाल दिसत नव्हती. ह्याचें कारण असें

नव्हे कीं, तेथें काळ्याकुट्ट अंधकारांत सृष्टि लोपून बसली होती किंवा झगझगीत प्रकाशानें डोळ्यांस दीप येऊन कांहींच दिसेंनासें झालें होतें. तेथें खरोखरीचीच गाढ स्तब्धता नांदत होती. आसपास शें-पन्नास मैलांत असें शहर किंवा गांव नव्हतें कीं, जेथील मोटारींच्या भोंग्यांनीं, आगगाडीच्या किंकाळ्यांनीं, कुत्र्यांच्या भंकण्यांनीं किंवा कोल्हेकुईनें येथील शांतता भंग पावावी. अशा ह्या अपरिचित गूढ स्तब्धतेचें खरें स्वरूप प्रथम येथेंच पुढें उभें राहिलें. मनावर कसलें दडपण बसलें म्हणून भारावून गेलों, कां त्यावरील कसलें दडपण निघून गेलें म्हणून अधांतरीं टांगल्यासारखें वाटूं लागलें, हें कांहींच सांगतां येत नाहीं. श्वासोच्छ्वासहि आपोआप आंखडून जाऊन अगदीं हळू होऊं लागलें. हालचाल तर थांबलीच होती पण एरव्हीं क्षणभरहि मनोव्यापार थांबावयाचे नाहींत ते सर्व स्थगित होऊन मन भारून गेलें होतें. एवंच मीहि निश्चेष्ट उभा होतों. 'आपणांसारिखें करिती तात्काळ' ह्या वातावरणाच्या प्रभावामुळें हा प्रकार घडून आला, कां एखाद्या फार मोठ्या विद्वान् अधिकारी माणसाच्या जवळ गेलें, म्हणजे आपल्या लघुत्वाच्या जाणिवेनें त्याजविषयीं आदर व भीति अशी संमिश्र भावना उत्पन्न होते, तत्सम मजवर परिणाम झाला, सांगता येत नाहीं.

अशा ह्या एकांतिक अवस्थेनें भारला गेलों असतांना भोंवतींच्या हिमाच्छादित शिखरांनीं माझें लक्ष आपल्याकडे खेंचून घेतलें. चांदण्यांत तेजाळेलल्या त्या पांढऱ्या शुभ्र हिम-शिखरांची शोभा अवर्णनीय होती. चांदणें पिठासारखें पांढरें स्वच्छ, असें म्हणतों खरें, पण हिमशिखरें पाहिल्यानंतर आतां असें वाटतें कीं, चांदण्यापेक्षां हिमाच्छादित शिखरेंच तशीं म्हणणें अधिक सार्थ आहे ! इतक्या जवळून एवढीं हिमशिखरें-त्यांची मालाच ती, दिसण्याचा हा प्रथम योग होता.

दिवसा उन्हांत तीं प्रखर दिसतात पण चांदण्यांत तींच तेजोमय दिसलीं तरी, त्यांच्यांत मोहक मार्दव आलेलें दिसतें. दिवसा त्यांचें रूप पृथकत्वानें डोळ्यांपुढें येतें. तर रात्रीं चांदण्यांत तीं एकजिनसी एकरूपी एकमेकांशीं संलग्न होऊन राहिलेलीं दिसतात. दोन्ही वेळीं त्यांच्यांत भव्यपणा सारखाच असतो. पण रात्रींचा तितका कडक न वाटतां सौम्य व आकर्षक वाटतो. एकच मोतीं निरनिराळ्या पहाडांत

( निरनिराळ्या वेळच्या उजेडांत ) निरनिराळ्या रंगा पाण्याचें–दिसत असतें, तद्वत्च हिमशिखरांचें आहे. ह्यांची अजस्र उंची, त्यांचा जगड्व्याळ विस्तार पाहून आपली मतिच गुंग होऊन गेली. त्यांच्या लांबी, रुंदी, उंचीचीं नुसतीं मोजमापें समजल्यानें त्यांजविषयीं थोडीहि कल्पना येणार नाहीं. तशी आणून द्यावयाची म्हटलें तर तत्सदृश एखाद्या वस्तूच्या तुलनेनें ती आणून देतां येईल. पण आपल्या परिचयांत असें काय आहे, कीं ज्यांच्याशीं ह्या हिमशिखरांच्या केवळ बहिरंगाची तरी सार्थकतेनें तुलना करितां येईल ? आमचें ज्ञानक्षेत्र घर, गांव, शहर ह्यांत कोंदटलेलें. तेथें वांगीभाताच्या मुदीवरील खोबरें, बाबांच्या डोक्यावरील गांधी टोपी, महादजींच्या डोक्यावरील पांढरें पागोटें किंवा ताजमहालचा घुमट ह्यापलीकडे सुचणारच काय ? सृष्टींत तरी अन्य असें काय आहे कीं, ज्याच्या अपेक्षेनें हिमशिखरांचीं अल्पशी तरी यथार्थ कल्पना आणून देता येईल ? 'सागरस्सागरोपमा' किंवा 'रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव,' असाच प्रकार त्या हिमशिखरांविषयीं म्हटला पाहिजे.


अशी ही आहे बहिरंग–चित्रणाची स्थिति. मग त्यांच्या अंतरंग–परिचयासंबंधीं शब्दच काढावयास नको. भोंवतीं पसरलेल्या निःशब्द, गंभीर, भारलेल्या वातावरणांत आपल्या वैभवानें अक्षय्य तळपणारीं, भव्य, निष्कलंक, युगानुयुगें निर्विकार, निश्चल समाधियोगांत ध्यानस्थ बसल्यासारखीं तीं गगनभेदी हिमशिखरें पाहिलीं, तेव्हां माझे मनावर जे ठसे कोरले गेले आहेत, त्यांचें शब्द–चित्र रेखाटणें माझ्या आंवाक्याबाहेरचें आहे. तथापि एवढें म्हणतां येतें कीं,

'चातुर्य रचना–कल्पकतेचें। कला–कौशल्य–पूर्ण निर्मितीचें। नियमबद्ध विधिघटनेचें। पाहतां वाटें कौतुक देवाचें ॥ विचारबुद्धी स्तंभिते होता। तर्कपद्धती मूग गिळता। कर्तृत्वशक्ती मागें सरतां। कुंठितबुद्धीतें पटें अस्तिक्य ॥

## मग्गु की मांडा

पवालीपासून मग्गु की मांडा नऊ मैल आहे. पहिले तीन मैल चढ व पुढचे सहा मैल उतार आहे. चारहि धामांच्या वाटेंत पवालींतील वाटांसारखे कमी अधिक बिकट मार्ग आहेत, पण येथील प्रमाणें


केदारपुरीचें प्रथम दर्शन पान २०८



केदारनाथाचे मंदीर — उजवी बाजू पान २१७

वादळी धोक्यांचे प्रसंग कोठेंहि नाहींत. यात्रींच्या दैवाची परीक्षा होऊन त्यांचा सोशिकपणा आणि त्यांची चिकाटी येथें कसास लागते. न डगमगतां धैर्यानें जो येथील परीक्षेंत उतीर्ण झाला ( दांडी, कंडींत बसून प्रवास करणारा नव्हे ) तो कैलास–मानसची अवघड वाटणारी यात्रा बेधडक करील असा आमचा अनुभव सांगतो.

पवालीच्या पटांगणांत झाडी नव्हती तरी पुढच्या चढणींत ती होती. चढण खडी व थंडी बोलूं देत नव्हती, त्यामुळें आम्ही लवकर न निघतां सूर्योदयानंतर निघालों. सहा वाजतां नाकपुड्या व डोळे, उपाय नव्हता म्हणून उघडे ठेवावे लागले होते. बाकी सर्व अंग गरम कपड्यांनीं झांकलें होतें. हातमोजे नसल्यामुळें जर्सीची बाही बोटां-वरून ओढून मुठींत धरावी लागे. हातांत काठी असे, त्यामुळें बाही वरचेवर सुटून त्रास होई. काळजीकाट्यानें अंग झांकून घेतलें होतें तरी नाक वाहूं लागलेंच. इतक्या थंड हवेंत श्वासोच्छ्वास करतांना चांगला जाणवतो. शिवाय एवढ्या उंचीवर तो आपोआप जोरानें होऊं लागलेला असतो. चढ संपल्यानंतर तीन मैल डोंगराच्या धारे-वरून वाट आहे. तेथें डोंगर मात्र अगदीं बोडका आहे. धारेवरून चालतांना दोन्ही बाजूंचे उतार व भयंकर खोल दऱ्या पाहतांना डोळे फिरतात, व धसका बसतो कीं, जर का घसरलों तर ठिकरी-सुद्धां हातीं लागावयाची नाहीं.

### बर्फावरून जातांना धोका

ह्या दांड्यावरील सर्व बर्फ पाघळून गेलेलें नव्हतें. पांच सहा ठिकाणीं तें ओलांडून जावें लागलें. हें बर्फ आपल्याकडील बर्फाप्रमाणें पारदर्शक व एकजीवी खडा झालेला असें नसतें. तें साखऱ्याप्रमाणें दाणेदार व दुध्या रंगाचें असतें. त्यावरून चालतांना पायाखालीं किंचित् दबल्या-सारखें होऊन चुरचुर असा आवाज निघतो. त्यावरून जातांना अति-शय जपून जावें लागतें. कित्येक वेळां त्याच्या खालीं पाण्याचा खड्डा असतो. अशा ठिकाणीं जर का आपल्या वजनानें बर्फाच्या थरांतून आपला पाय भुस्दिशीं आंत गेला तर तो बाहेर काढण्याच्या खटपटींत दुसऱ्या पायावर सर्व भार येऊन तोहि आंत रुतू लागतो. अशा वेळीं आधार देण्याकरितां स्वतःच्या जिवाच्या भीतीनें कोणीहि जवळ

येण्यास धजावत नाहीं. बाहेर निघण्यास कसलेंच साधन हाताशीं नसतें. अशा रीतीनें एक बाई सन १९३३ ह्या वर्षीं धोक्यांत सांपडल्याचें 'चक्षुर्वै सत्यं' वृत्त आमचे स्नेही कै. प्रा. ल. ग. साठे ह्यांचेकडून ऐकिलें होतें.

## सावधगिरी व उपाय

ह्या संकटांतून सुटण्यास एक उपाय सुचतो. अशा वेळीं आडवें पडून सुटका करून घेतां येईलसें वाटतें. आडव्या स्थितींत शरिराचा भार एकाच ठिकाणीं न पडल्याकारणानें पाय अधिक खचणार नाहींच, पण रुतलेला बाहेर काढण्यास अवसर सांपडेल. सोलापूर जिल्ह्यांत एका नदीकांठच्या दलदलींत माझा पाय गुडघ्या इतका चिखलांत रुतला. तो काढावा तर दुसरा रुते. तेथील गुराखी पोरांनीं मला ही युक्ति सांगितली. कपडे चिखलानें भरले, जोड्याची आशा सोडून द्यावी लागली, पण मला लवकरच त्यांतून सुटतां आलें.

बर्फावरून जातांना काठी जोरानें टोचून थराची जाडी अजमावीत गेलें म्हणजे भीतीचा संभव कमी. बोजेवाले बरोबर असले म्हणजे धोक्याच्या जागा ते नेमक्या सांगतात. अनुभवानें त्यांची दृष्टि चांगली बसलेली असते. ह्या धारेवरून जात असतांना कांहीं ठिकाणीं वाटा इतक्या अरुंद होत्या कीं, बोजेवाल्यांच्या हातांचा आधार घेतल्याशिवाय पाऊल उचलून पुढें टाकणें जिवावरचें वाटे. बोजेवाले इतके सराईत झालेले असतात कीं, मणा–सव्वामणाचा बोजा पाठीवर घेऊन ते बिनघोर सरासर जातात इतकेंच नव्हें, तर उतार बाजूकडे आपण स्वतः उभें राहून यात्रीस आपल्या दोन्ही हातांनीं उचलण्याइतका आधार देतात. अशा प्रसंगांत बोजेवाल्यांच्या जिवावर आपल्या यात्रा पार पडत असतात ही जाणीव चांगली होते. पण त्यांना निरोप देतांना मात्र ती टिकत नाहीं.

## १० ते १२ हजार फूट उंचीवरच आढळणारीं फुलें

धारेस लागलों तेथपासून आसपास एक प्रकारची फुलांचीं रोपटीं रानोमाळ दाट उगवलेलीं दिसलीं. त्यांची उंची जमिनीपासून टिचभरापेक्षां अधिक नव्हती. त्यांचीं पानें अरुंद–लांबट झेंडूसारखीं होतीं. त्यांचीं फुलें पांच पाकळ्यांचीं, सपाट, वाटोळीं व एका देठास एक

ह्याप्रमाणें होतीं. त्या फुलांचे इतके विविध रंग होते कीं, त्यांत कोणता रंग नाहीं असें नव्हतेंच. पिवळीं, पांढरीं, निळीं, जांभळीं, पारवीं, तांबडीं, गुलबाक्षी इत्यादि. जमिनीवर फुलोऱ्याचा रेशमी तकतकीत गालिचा अंथरल्याप्रमाणें हे जागोजागचे वाफे मनोहर दिसत. अशा प्रकारच्या फुलांचे ताटवे डुफंडा चट्टीजवळहि लागले होते. त्या फुलांच्या वासानें भोंवळ करते, डोकें फिरून घेऱ्या येतात, मळमळ सुटते, वगैरे प्रकारचा मजकूर ह्या यात्रांच्या प्रवास–वर्णनांत वाचलेला होता. त्यावरून अमोनियाची बाटली, सुंठ, लवंग, खडीसाखर वगैरे जिन्नस बरोबर घेतलें होतें. पण त्या फुलोऱ्यांतून जातांना त्यांच्या दर्पानें डोकें फिरण्याच्या कोणत्याच भावना झाल्या नाहींत. म्हणून बोजेवाल्यांस विचारलें. तो म्हणाला, 'यंदा बरसात कमी झाल्यामुळें त्या फुलांचा दर्पहि कमी झाला आहे.' मीं एक फूल तोडून भीतभीतच पण सावधगिरीनें नाकाशीं नेलें. दर्प राहिला, पण कसला सुद्धां वास आला नाहीं. मग मूठभर तोडून नाकाशीं नेलीं तरी निर्गंधच ! नाद सोडून दिला.

### क्यूकला खिड व मग्गूकी मांडा

धारेवरील वाट संपून उतरणीस लागलों. खरें पाहिलें तर ही उतरणी नसून उतरंडीच म्हटली पाहिजे. अशी ही उभीच्या उभी आहे. समोरच्यासमोर खालीं उतरतां येणें शक्य नाहीं. म्हणून नागमोडी वळणावळणानें उतरावें लागतें. डोंगराच्या एकाच बाजूच्या उतरणीवरील असल्या नागमोडी वाटेसच इकडे खिड किंवा घाट समजतात. या खिडीचें नांव 'क्यूकला' असें आहे. त्या उतरणीचे पायथ्याशीं घळ झाली असून तींत बर्फ सांचलेलें असतें. पुढें सरासरी एक मैलावर मग्गूकी मांडा चट्टी आहे. तेथपर्यंत वाट साधारण चढ आहे. येथें थोडा पाऊस लागला, पण धर्मशाळेंत पोहोंचल्यावर जोराच्या सरीस प्रारंभ झाला. बारा वाजल्यापासून चार वाजेपर्यंत वारा, पाऊस, विजांचा कडकडाट आणि गारा ह्यांच्या वर्षावानें जागचे हलूं दिलें नाहीं. धर्मशाळा लहानच माडीची आहे, पण यात्रींची दाटी नव्हती. एकादशीचा दिवस पण दुपारपर्यंत आमचीं स्नानें झालीं नव्हतीं. वाटेंत कोठें पाणीच लागलें नव्हतें. तेथें पाणी होतें. परंतु तें

ठिकाण अर्धा मैल खोल होतें. व तेथें पाण्याची जी धार होती त्यावर एक तपेली भरण्यास कमींत कमी दोन तीन मिनिटें लागावयाचीं. अगोदरच थंडी, त्यांत वाऱ्या–पावसाचा गारठा, त्यामुळें स्नान करण्यास उत्साहच वाटेना. स्नानाशिवाय ‘ पोटपूजा ’ नाहीं ! ती पत्करली आणि स्वस्थ अडवारून राहिलों. माडीवरच्या खिडकींतून ढगांची चाललेली धांवपळ पाहण्यांत गंमत वाटत होती. तो म्हणजे शिवाशिवीचाच खेळ चालला होता. स्वप्नांत दिसणाऱ्या नाना आकृतींना जसें कांहींच ताळतंत्र नसतो, तसेंच ढगांत दिसणाऱ्या आकृतीचें. मनोराज्यांतील स्वैर कल्पनांचीच ती सृष्टि ! ह्या देखाव्यांचे फोटो घ्यावेसें मनांत आलें. पण सेकंदाचा शतांश वेळहि बापडे माझ्या हौसेकरितां सुद्धां थांबेनात. कंटाळून मींहि त्यांचा नाद सोडून दिला. काळोखी मोडून उघडीप झाली तेव्हां फोटो घेण्याची सोय झाली. पण ती पहिली हातघाईच्या धांवपळीची गंमत राहिली नव्हती.

चार वाजतां उन्हाची तिरीप येऊन हवाहि मोकळी झाली. विचार केला उपाशीं दिवस काढण्यापेक्षां येथून हलावें. पांचच मैल जावयाचें होतें; पण इतर यात्री व आमचें बोजेवालेसुद्धां सम्मति देईनात. त्यांचें ठीक होतें. त्यांनीं जठराग्नी ‘ शांत ’ केला होता. ह्या पुढील खालच्या उंचीला वादळें, बर्फ ह्यांचा संभव नसतो. पाऊस उघडून आभाळहि निवळलेलें होते, त्यांतच ऊनहि पडलें. म्हणून धीर येऊन पोटाच्या पाठी लागण्यासाठीं उठून चालूं लागलों. मग काय बोजेवाले, इतर यात्री चट् सारे निघाले. दाट झाडीतून वाट होती. पाऊस पडून पाणी वाहिल्यामुळें ती स्वच्छ होऊन दगड वर आलें होते. दगड, धोंडे गोटे, खडक, ह्यांचाच सुकाळ ! सोयीस्कर वाटेल तेथून उतरावयाचे. घसरडयाची भीति नव्हती, पण अडखळण्याची होती. ह्या रानांत फार मोठे जाडीजुडीचे वृक्ष आहेत. एवढालीं धुडे आडवी पाडावयाची युक्ति सहज दिसून आली. झाडाच्या बुंध्याशीं सभोंवर सर्पण रचून तें पेटवून देतात. त्याबरोबर बुंधाहि जळून झाड कोसळतें. दाट छायेमुळें आणि पानांवरील ठिबकणाऱ्या थेंबांमुळें पाऊस येण्याचा सारखा धाक वाटे. पण तसें कांहीं झालें नाहीं. संध्याकाळीं साडेसहा वाजतां ऊन असतांनाच त्रिजुगी नारायण येथें पोहोंचलों.

घुत्तूपासून मग्गुकी मांड्यापर्यंतच्या १९ मैलांत हिमवर्षाव व वादळ ह्यांच्या कडक माऱ्यांत सापडून अंत पाहणारी परीक्षा देण्याची पाळी सुदैवानें आली नाहीं. तसें प्रसंग आले ते नेमके वस्तीस असतांनाच आले. ह्या गोष्टींकरितां श्री केदारनाथाविषयीं कितीहि कृतज्ञता वाटली तरी ती अल्पच ! येथील प्राणांतिक संकटांतून जे कोणी बचावले त्यांचें भाग्य आमच्यापेक्षां सर्वतोपरी श्रेष्ठ.

### श्री. चितळे ह्यांचा पवालीतील अनुभव

श्री. आप्पासाहेब चितळे ह्यांनीं आपल्यावर पवालीमध्यें आलेल्या प्रसंगाची माहिती लिहून कळविली. त्यांतील महत्त्वाचा भाग येणें प्रमाणें .... "घुत्तु येथें केदारचे पंडे भेटले. त्यांनीं सावधानतेची सूचना देतांना सांगितलें कीं, 'पवालीची चढाई व जर्मन लढाई' अशी इकडे म्हण पडली आहे. येथील प्रवास अवघड व धोक्याचा हें वाचनांत होतेंच; त्याकरितां सर्व तयारी केली होती. वेळापत्रक व वसतीकरितां थांबण्याची ठिकाणें निश्चित केली होती. जर्मन लढाई कशी आहे, तें एकदां बघूंच, म्हणून सर्वांआधीं निघून पवाली येथें दुपारी अडीच वाजतां पोहोंचलों. नऊ मैलांची चढण, पण दहा तास लागले. अवघड वाट संपली व लढाई जिंकली. पण खरा अवघड भाग तर पुढेंच होता, हें अनुभवानें मागाहून कळलें."

दुसरें दिवशीं (दि. २८–५–४९) पुढें निघावें न निघावें ह्याविषयीं भवती न भवती झाली. ( कारण आदल्या दिवशीं तिसरें प्रहरीं पाऊस पडला होता. ) पुढें निघावें असें ठरलें. वादळ झालें तर दुपारीं होईल असें म्हणून गड्यांनींहि दुजोरा दिला. पहांटे साडेचाराला निघालों. दोन मैलांवर एक गोठा लागला. दूध व चहा घेऊन पुढें निघालों, तों थेंब येऊं लागले. वारें सुटलें पावसाचा जोर चढला ! पश्चिमेकडील आभाळ पूर्व बाजूस सरकूं लागलें. ह्या निर्जन व निर्वृक्ष पठारावर मैल दीड मैल वादळांतून चालत होतों. पाऊस थांबून साबुदाण्याच्या आकाराचें बर्फ पडण्यास सुरुवात झाली. उपायच नव्हता म्हणून आसरा मिळेपर्यंत पुढें चालत जाणें भागच होतें. आमच्या पुढच्या गड्यानें वाट सोडली व मागोमाग येण्याविषयीं खुणावलें. आम्हास त्याचा बोध होईना, त्याच्या मागें जाण्यांत

पाय घसरला तर एकदम खोल दरीच ! वादळ वाढूं लागलें. डोक्या–खांद्यावर बर्फ सांचलें, हातां–पायांत वांब येऊन कळा निघूं लागल्या. मागचा गडी मागून घाईघाईनें आला. त्यानें आम्हांस एका कपारीकडे नेलें. अंगावरील रबरी तुकडा अंथरून त्याचें कांबळें आम्ही चौघांनीं डोकीवरून घेतलें. अशा स्थितींत वीस मिनिटें होतों. तेवढ्यांत तीन फूट बर्फाचा थर जमला. वादळाची दिशा पालटली, बर्फ पडण्याचें थांबलें, पण वारें चालूंच होतें. पुढें जाणें शक्यच नव्हतें. दुसरा गडी आला तेव्हां त्याच्याजवळील गरम कपडे, ब्लँकेटें काढून घेतलीं. पुढें निघणें आवश्यकच होतें. पुढें एक मैलावर एक झोंपडी दिसली, तेथें हिय्या करून लळत लोंबत गेलों. एक दोन दिवसांपूर्वींच दोन इसमानीं येथें झोंपडी घालून व ३ – ४ म्हशी आणून दुधाची व शेकाची सोय केली होती.

## ‘मागें पुढें उभा राहे सांभाळीत’

ही झोंपडी येथें नसती तर सहा मैलांवरील मग्गु का मांडा गांठता आला असता कां नाहीं हें त्या एका परमेश्वरासच माहीत ! आमच्या बरोबरच्या पुढें आलेल्या सात आठ बायका जेमतेम झोंपडीपर्यंत आल्या पण गारठ्यानें काकडून जाऊन जमिनीस लोळल्याच, त्या दोन इसमांनीं एकेकीस गरम दूध पाजून त्यांचे ओले कपडे बदलून जरा वेळानें त्यांस शेकाजवळ आणून ठेवल्या. ह्या दोन माणसांनीं त्या आपद्ग्रस्तांची योग्य ती काळजी घेऊन सेवा केली आणि जीव वांचविले. त्यांस परमेश्वरासमान मानण्यास काय हरकत आहे ? ‘मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघाता निवाराया ।।’ ह्या अभंगाची सत्यता बरोबर पटते.

## ‘वेळ आली होती पण काळ आला नव्हता’

येथून पुढें उतार असून फार सावकाश उतरलों. घसरलें तर गच्छंतीच ! मग्गु की मांड्यास साडेचार वाजतां पोहोंचलों. वादळांत सांपडलेले कांहीं यात्रेकरूं रात्रीं नवाच्या पुढें आले. तेव्हां कळलें कीं, आम्ही खिड उतरलों तेव्हां पुन्हां जोराचें वादळ व गारांचा वर्षाव झाला. त्यांत बरेच लोक गारठून गेले. पवालीच्या धर्मशाळेंत आम्ही पाहिलेली एक बाई आपल्या दोन्ही मुलांसह मृत्युमुखीं पडल्याचें

समजलें. आमचीहि वेळ आली होती पण 'काळ' आला नव्हता; म्हणून हा अनुभव पुढच्याकरितां सांगतां येत आहे ! "

### त्रिजुगी नारायण–गांव

त्रिजुगी नारायण गांव एका बाजूनें एका डोंगरमाथ्यावर आहे, तर दुसऱ्या बाजूनें एका डोंगर पायथ्यास आहे. त्याची उंची ७५४० फूट आहे. गांवांत पांच–पन्नास उंबरठा असून तो त्रिजुगी नारायणाचे देवळास लागून आहे. खालीं दुकानें व आंत जाण्याची वाट आणि माडी-वर राहणी, अशा सोईचीं घरें आहेत. देवळाशेजारींच बाजारहाट असून त्यांत दहा पांच दुकानें आहेत; त्यांत हलवायांचींहि आहेत; दूधदुभतें भरपूर व स्वस्तहि मिळतें. घरें पक्क्या बांधणीचीं आहेत. त्यांतून यात्रींची उतरण्याची सोय चांगली होते. येथें धर्मशाळा आहे. पाण्याची मात्र टंचाई आहे. बोटासारखी एक पाण्याची धार; तीवरच सर्व गांवचा व यात्रींचा निर्वाह व्हावयाचा ! गांवापासून एक मैलावर वहातें पाणी आहे. गांवाभोंवतीं बर्फाच्छादित शिखरांचें कडेंच आहे. चांदण्यांत त्याची शोभा अवर्णनीय दिसली. तेथें थंडी आहे पण सोसेशी आहे, कडाका नाहीं.

### त्रिजुगी नारायण मंदिर

त्रिजुगी नारायणाचें मंदिर दगडी बांधणीचें आहे. गाभारा दहा बारा चौरस फूट लांबी–रुंदीचा असून त्यावरील शिखर ब्रह्मी धाटणीचें असून तें फार उंच नाहीं; देवळापुढील सभा मंडप त्यास साजेसा नाहीं; छपरीवजा आहे. गाभाऱ्यांत वीत दीड वीत उंचीच्या तीन मूर्ति एकाशेजारीं एक आहेत. त्या सोन्याच्या आहेत असें सांगतात, पण तशा दिसत नाहींत. पंच–धातूंच्या आहेत अशीहि बोलवा ऐकली, पण त्या नुसत्या पाहूनच ओळखण्याची माझी शक्ति नव्हती. कांहींहि असो त्या धातूच्या आहेत एवढें खरें.

मधली मूर्ति महाविष्णूची चतुर्भुज असून डावी उजवीकडे देव्यांच्या दोन मूर्ति आहेत. महाविष्णूची लक्ष्मी ही एकच बायको, असें नेहमीं दिसून येतें. मग येथें दोन देव्या कशा ? शोधाअंतीं असें कळतें कीं, विष्णूच्या दोन बायका आहेत. एक भू व दुसरी लक्ष्मी. असें हें त्रिदळी दांपत्य इतर कोठें आढळत नाहीं. माझे पाहण्यांत

तें आणखी दोन ठिकाणीं आलें आहे. ह्या भरत भूमींत भगवान् महाविष्णूची आठ स्वयंभू क्षेत्रें प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं दोन उत्तरेस हिमालयांत आहेत. त्यांतील एक नेपाळांत आहे, त्याचें नांव श्रीमुक्तिनारायण किंवा श्रीमुक्तिनाथ. तेथें महाविष्णूच्या डावेउजवे अंगांस दोन देव्या आहेत. दुसरें ठिकाण म्हणजे पुण्यांत रामेश्वराचे देवळांत दक्षिण अंगास एक विष्णूचें देऊळ आहे. तेथेंहि महाविष्णूचे दोन्हीं अंगें दोन देव्या आहेत!

## पितृतर्पण व तीर्थोदक कुंड

त्रिजुगी नारायणाचे देवळाचे बाहेरचे अंगास अन्नपूर्णा, गणपति आणि शिवलिंग अशा मूर्ति आहेत. समोरचे बाजूस वहात्या पाण्याचीं चार कुंडें आहेत. त्यांचीं नांवें ब्रह्मा, विष्णु, महेश व सरस्वती. ह्या कुंडांतून छातीइतकें पाणी असतें. पहिल्या दोन कुंडांत स्नान, सरस्वती कुंडावर देव-ऋषि-पितृ-तर्पण व महेश.कुंडांतून तीर्थोदक–प्राशन. कुंडांतील पाणी गारठणक असतें. पाण्याला स्पर्श केला कीं, बोटास चटकाच बसतो. त्यांत स्नान करावयाचें म्हणजे विचारच पडतो. पण आंत उतरून बुडी मारावयाची सोय असल्यामुळें तेवढेंच सोपें वाटतें.

## शंकर–पार्वती विवाह

दक्ष प्रजापतीचे यज्ञांत त्याची मुलगी सती हिनें अग्निप्रवेश केला आणि तिनें पुढें हिमालयाच्या पोटीं जन्म घेतला. तिचेंच नांव गिरिजा–पार्वती. त्रिभुवनाधिपति जो शंकर तो हिचें पाणिग्रहण करणार, हिच्या पोटीं षडानन म्हणजेच कार्तिकस्वामी जन्म घेणार, तो देवांचें सेनाधिपत्य पत्करून उन्मत्त झालेल्या तारकासुराला मारणार आणि त्याच्या अनन्वित छळांतून देवादिकांची 'मुक्तता' करणार असें पार्वतीचें 'विधिलिखित' होतें, तें मुनिश्रेष्ठ नारदास अवगत होतें.

नारदांनीं एकदां आपल्या संचारांत हिमालयाधिपतीच्या कानांवर त्याची मुलगी पार्वती हिचें भाग्य कसें उच्च आहे, हें घालून ठेविलें होतें. त्यामुळें राजा निष्काळजी व आनंदित होता. राजकन्या पार्वती हिनें कृत-संकल्प केला होता कीं, भणंग भिकारी वेषांत असो, स्मशान-

वासी असो, नाहींतर जोग्यांप्रमाणें अक्षय्य तंद्रावस्थेंत असो, आपण त्या जटाजूटधारी शंकरासच वरणार! आपला निश्चय कृतींत आणण्यासाठीं तिनें आपल्या वडील-मातोश्रींच्या संमतीनें राजैश्वर्य व तदनुकूल सहज-प्राप्त सर्व सुखोपभोग, ह्या सर्वांस फांटा देऊन तापसी वृत्तीनें राहण्याचें व्रत अंगीकारलें होतें. हें व्रत म्हणजेच 'हरितालिका' व्रत. येथून जवळच मैखंडा पर्वत आहे. त्यावर आपल्या सखींसह पार्वती हें व्रत आचरून राहिली होती.

### विवाह–स्थळ

इंद्रादि प्रमुख देवांचें एक ' शिष्ट–मंडळ ' शंकर–पार्वती–विवाह घडून येण्यासंबंधीं शिष्टाई करण्यासाठीं शंकराच्या भेटीस येऊन गेलें होतें. तरी त्यांना काळजी वाटत होती कीं, ऊर्ध्वरेता शंकर ज्यानें प्रत्यक्ष मदनालाच जाळून टाकिलें, तो आपला ब्रह्मचर्याश्रम सोडून देऊन गृहस्थाश्रमाचा स्वीकार कसा करील! पण विधिघटना तशी ठरलेलीच होती! देवांच्या काकुळतीच्या प्रार्थनेनें तसेंच पार्वतीच्या लावण्यानें आणि तिनें आपल्या प्राप्तीकरितां हाडांचीं काडें करून निष्ठेनें चालविलेल्या खडतर तपाचरणानें भोळे शंकर मनांतून थोडे-तरी द्रवलेच होते. त्यांतच वसिष्ठ–अरुंधतीचें दांपत्य पाहून त्यांनाहि ' चतुर्णामाश्रमाणां हि गार्हस्थ्यश्रेष्ठमुत्तमम्! ' गार्हपत्याश्रमाची थोरवी पटली असली पाहिजे, आणि म्हणूनच त्यांनीं पार्वतीस मागणी घालून तिचें यथाविधि पाणिग्रहण केलें. शंकर–पार्वती विवाह–सोहळा झाला, तो अर्थात् हिमालयाच्या घरीं म्हणजेच त्याच्या ओषधीप्रस्थ वा हिमवत्पुर राजधानीमध्यें झाला. तें स्थान परंपरागत माहितीनें आजहि त्रिजुगी नारायण येथें पाहावयास मिळतें.

### लाजा होमाचा अग्नि

त्रिजुगी नारायण देवळाचे सभामंडपांत चार हात औरस–चौरस लांबी–रुंदीचें व दोन हात खोलीचें एक अग्नि–कुंड आहे व शेजारींच धर्मशिला आहे. शंकर–पार्वती विवाह–प्रसंगीं सिद्ध केलेल्या गार्हपत्याग्नीचें हें कुंड आहे, आणि 'आरोहेमाश्मानमश्मेव त्वं स्थिरा भव!' ह्या शिळेवर, ' हे पार्वती, तूं आरोहण कर आणि तिच्या प्रमाणें तूं आपले संबंध निश्चल कर ' अशा प्रकारें शंकरांनीं तिला उपदेशिलें.

ती धर्मशिला कुंडाजवळच आहे. लग्नाचे लाजादि होम ह्याच अग्नीवर होऊन त्या वधूवरांनीं तीन प्रदक्षिणा ह्याच अग्नीस घातलेल्या आहेत.

असा हा सत्ययुगारंभीं जगज्जनक–जननी–विवाह मंगल समयीं सिद्ध केलेला अग्नि, तीन युगें होऊन गेलीं तरी अजून तसाच जागृत राहिला, म्हणून त्या गांवास त्रिजुगी नारायण हें नांव पडलें. ह्या कुंडांतील अग्नि जागृत ठेवण्याकरितां आला गेला यात्री कुंडांत इंधनें टाकतो. अगदीं अल्प किमतींत म्हणजे एका पैशापासूनसुद्धां जागच्या-जागीं इंधन मिळण्याची सोय अग्यारीप्रमाणें येथील पंड्यांनीं केली आहे !

### ओषधीप्रस्थ व हिमवत्पुर म्हणजेच त्रिजुगी नारायण

शंकर–पार्वती विवाह ज्या नगरींत झाला तिच्या नांवासह तिच्या परिसराचें वर्णन कुमारसंभवांत आलेलें आहे. ओषधीप्रस्थ व हिम-वत्पुर हीं दोन्हीं त्या नगरीचीं नांवें आजहि त्रिजुगी नारायण गांवाला सर्वतोपरी जुळणारीं अशींच आहेत. त्याचप्रमाणें परिसरांतील महा-कोशीचा प्रपात आणि संगम ह्यांचें वर्णन, वासुकी किंवा सोनगंगा हिचा प्रपात आणि तिचाच मंदाकिनीशीं होत असलेला संगम, ह्या नैसर्गिक घटनांशीं तंतोतंत जुळतो. ह्यावरून शंकर–पार्वती–विवाहाचें त्रिजुगी नारायण हेंच स्थळ असल्याचें परंपरागत माहितीनें पंडे लोक सांगतात त्यांत तथ्य आहे ! 'उदरनिमित्तं बहुकृतवेषः' पैकीं प्रकार नाहीं. त्याचप्रमाणें विवाहप्रसंगीं सिद्ध केलेला अग्नि अजून जागृत राखला आहे असें जें ते सांगतात, त्यांतहि अवास्तव व अविश्वसनीय असें कांहींच नाहीं. आमचे सर्वच वैदिक संस्कार अग्नि–साक्षित्वानें होत असतात. विवाह हा त्यांतलाच संस्कार आहे ! हा जो साक्षीभूत अग्नि ती देवता आहे ! तिचें प्रतीक इतर देवतेप्रमाणें दगड–धातूंचें नसून तें सिद्ध केलेल्या प्रत्यक्ष जळणाऱ्या अग्नीचेंच (विस्तव, ज्वालांचें) असतें.

त्रिजुगी नारायण येथील अग्नि–कुंडांत यात्रींकडून इंधनें घाल-ण्यांत पंड्यांचा स्वार्थ आहे, त्यापेक्षां संस्कृतिदर्शन व रक्षण ह्यांचा अर्थ मोठा व महत्त्वाचा आहे! इतक्या प्रदीर्घ पूर्वकालापासून आमच्या संस्कृतींत विवाहसंस्था आहे. म्हणजेच तींत स्वैराचार नाहीं,

करार नाहीं, भुलवाभुलव नाहीं कीं पळवा–पळवीचे प्रकार नाहींत, किंवा सहवासोत्तरी विवाहाच्या प्रेमलीला नाहींत. त्यांत मातापिता, वडीलधाऱ्यांच्या अनुमतीनें स्वयंवरास वाव होता. हे विवाह अग्निदेवतेच्या साक्षित्वानें चिरायु आणि अपरिवर्तनीय असत. शंकर–पार्वती दांपत्य अजर–अमर आहे. त्यांचा गार्हपत्याग्नीहि तसाच असणार हें उघड आहे. मोठ्या लोकांच्या दगडा–धोंड्याच्या मनुष्यकृत जड स्मारकापेक्षां ही अग्निरूप नैसर्गिक जागृति अधिक परिणामकारक व सार्थ आहे!

## सोनप्रयाग

त्रिजुगी नारायणापासून सोनप्रयाग फार लांब नाहीं. तेथपर्यंत सारखा तीन मैल खडा उतार आहे. वाटेवर झाडीहि दाट आहे. रुद्रप्रयागाहून आलेली केदारला जाणारी वाट येथें मिळते. वाटेंत सोनगंगा व वासुकीतालांतून निघालेली वासुकीगंगा ह्यांचा संगम लागतो. ही वासुकी अथवा सोनगंगा मंदाकिनीस मिळते, त्या स्थानास सोनप्रयाग म्हणतात. संगमस्थानीं मंदाकिनी एकदम खालीं कोसळून थैमान घालीत आहे. वासुकीसारख्या क्षुद्र नदीनें आपणांस येऊन भेटण्याचें सोडून आपणांसच तिचे भेटीस खालीं उतरण्याचा प्रसंग यावा ह्यामुळें मंदाकिनीस वैषम्य वाटून अनावर राग आला. आणि ती उचंबळून धिगाणा घालीत निघाली आहे. म्हणून तर तिचें पाणी अगदीं गढूळ झालेलें आहे. पण वासुकिचे मात्र शांत व स्वच्छ राहिलेलें आहे.

सोनप्रयाग येथे उतरण्याची सोय नाहीं व तशी गरजहि पडण्यासारखी नाहीं. एक दोन झोपड्यांत दुकानें आहेत. फालतू बोजे येथें ठेवतां येतात. मंदाकिनीवर आठ लोखंडी दोरांनीं झेलून धरलेला १७० फूट लांबीचा गर्डरचा झूला आहे. पवाली दांडीपासून सुरवात झालेला उतार झुल्यापाशीं संपतो. तेथील उंची ६६०० फूट आहे. झूला पार होऊन केदारचे मार्गास लागले म्हणजे चढणीस सुरवात होते. ही चढण थेट केदारपर्यंत आहे. रामवाड्यापर्यंतची वाट गंगाकांठानें आहे. झूल्यावर पाय टाकतांच आपोआप लक्षांत येतें कीं, वाट फारच चांगली आहे. ह्याच्यापुढें आतां वाट बरी नाहीं, असें गाऱ्हाणें गाण्यास

अवसरच नाहीं. कारण पुढचा सर्व प्रवास पूर्वींच्या ब्रिटिश राज्यांतील होता. त्यांचीं राज्यतंत्रांतील अठराहि खातीं देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत गेलेलीं होती. येथून पुढें रहदारी बंगले, जंगल खात्याचे बंगले, टपालघर, पोलीस चौक्या, दवाखाने, शाळागृह, पाण्याची सोय, आरोग्य खातें वगैरे वगैरे ठराविक व्यवस्था जागजागीं दृष्टीस असे.

## मुंडकटा गणेश

सोनप्रयागपासून एक मैलावर मुंडकटा गणेश स्थान आहे. तेथपर्यंत खडी चढण आहे. वाटेच्या कडेसच एक लहानसें देऊळ म्हणावें, नाहींतर मोठासा कोनाडा म्हणावा. त्यांत गणेशाची स्थापना आहे. त्या मूर्तीस डोकें नाहीं म्हणून ती कोणाची आहे हें सांगितल्याशिवाय ओळखतां येणार नाहीं.

येथून पुढें दोन मैलांवर गौरीकुंड आहे. त्यांतील पाणी अक्षय्य कढत असतें. एकदां जगज्जननी पार्वतीदेवी त्या कुंडावर न्हावयास बसल्या होत्या. तेथें त्यावेळीं कोणी येऊं नये म्हणून त्यांनीं आपल्या अंगावरील उटण्याची मूर्ति केली, आणि तिची प्राणप्रतिष्ठा करून द्वाररक्षकाचे कामीं तिची नियुक्ति केली. जगदीश शंकर तेथें आले. त्यांस पुढें जाण्यास माईजींच्या आज्ञेप्रमाणें गणेशानें प्रतिरोध केला. तेव्हां दोघांची झटापट झाली; त्यांत शंकरांनीं गणेशाचें डोकें उडविलें, आणि ते पार्वतीकडे गेले. तेव्हां तिनें गणेश भेटला नाहीं कां, म्हणून विचारलें. त्यांनीं घडलेला वृत्तांत तिला सांगितला. तो ऐकतांच माईजींस दुःख झालें. त्या म्हणाल्या गणेश माझा वरद–पुत्र होता. हें समजतांच शंकरानीं इंद्राच्या एका गजाचें तोंड तोडून आणलें व तें त्यास बसवून जिवंत केलें. जेथें हा गणेश गजाननाचा वृत्तांत घडला तें हें स्थान आहे. हा कथाभाग पद्म, स्कंध, मत्स्य, पुराणांतरीं आहे.

## गौरीकुंड

गौरीकुंड हें गांव नऊ हजार फूट उंचीवर आहे. तेथें दहावीस घरांची वस्ती आहे. गौरीमाईचें मंदिर, गौरीकुंड व अमृतकुंड ह्यामुळें ह्या स्थानाचें इतकें माहात्म्य आहे. गौरीकुंडांत कढत पाण्याची मनगटाएवढी एक धारा अक्षय्य पडत आहे. गोमुखांतून पाण्याची धार कुंडांत पडतांना पाण्यास उकळी फुटल्याइतकें तें कडकडीत असतें. कुंडांत तें

थोडेसें निवतें. तरीसुद्धां आंत उतरून स्नान करवत नाहीं. कुंडांत कंबरभर पाणी असतें. दहा पांच माणसांना एकाच वेळीं आडवे उभे होऊन आंत स्नान करतां येईल एवढें मोठें तें आहे. पार्वतीमाईजींचें हें स्नानाचें कुंड म्हणून त्यास गौरीकुंड नांव पडलें. कुंडांतील अधिक होणारें पाणी वाहून जातच असतें. शिवाय प्रत्यही एकदां सांठलेलें सर्वच पाणी सोडून देऊन नवीन धरतात. त्यामुळें पाण्यांत घाण किंवा मळ सांचत नाहीं. कुंडाजवळूनच मंदाकिनी उसळून वहात आहे. अमृतकुंड येथून एक फर्लांगावर आहे. तें गार पाण्याचें आहे. प्रथम तेथें स्नान करून नंतर गौरीकुंडांत करावयाचें, अशी येथील वहिवाट असल्याचें पंडे सांगतात. सर्व सुवासिनी बायका पार्वतीमाईंचा प्रसाद म्हणून येथें न्हाल्याशिवाय पुढें जात नाहींत. आम्ही येथें दुपारचे वेळीं होतों तरीसुद्धां थंडी चांगलीच जाणवत होती. पाण्यास हात लावण्याची सोय नव्हती. चटका बसून आग होई. येथील पंड्यां-तील एकजण संस्कृतमध्यें आमच्याशीं बोलूं लागला. त्याचें मोठें कौतुक वाटलें. येथील चट्टयांतून शिलाजित, कस्तुरी, चवऱ्या, वन-गायीचे पांढरे, काळे केस (गंगावन), केदारनाथाचे तांब्याचे टाक व कांहीं वनस्पति विक्रीस ठेवलेल्या दिसल्या.

## निसर्गरम्य सृष्टी

गौरीकुंडाहून दोन मैलांवर जंगलचट्टी आहे. सर्व वाट चढाचीच आहे. उजव्या हाताचे पहाडावर पायथ्यापासून पहाडमाथ्यापर्यंत घनदाट झाडी आहे. सर्व डोंगर हिरवागार दिसत असला तरी मधून मधून पोपटी, पिवळट, तांबूस रंगांच्या शेंड्यांनीं एकच एक रंगानें येणारें मांद्य घालवून त्यांत वैचित्र्य उत्पन्न केलें होतें. त्यामुळें तो देखावा उठावदार व मनोहर होऊन पादचाऱ्यांचें लक्ष वेधून घेई. ‘ऐशी ही निसर्ग–रम्यसृष्टी । देखतां खिळुनी जाते दृष्टी । मना लाधते समाधान तुष्टी । विसरण्या कष्ट प्रवासाचें ।’

येथें भैरवाचें स्थान आहे. त्यास वस्त्र वाहण्याची चाल आहे. कोणींहि वाहिलेलें एखादें वस्त्र तेथें दिसलें नाहीं; पण वस्त्राच्या टांगलेल्या चित्रविचित्र रंगाच्या कांहीं चिंध्या फडफडत असलेल्या मात्र दिसल्या. चिंध्या वाहण्याचा प्रकार नेपाळांत व तिबेटांत आढळतो.

## रामवाडा व बर्फावरील वाट

येथून पुढें असेच दोन मैल चढून गेलें म्हणजे केदारच्या वाटेवरील शेवटची, केदार पहाडाच्या पायथ्याशीं असलेली रामवाडा-चट्टी लागते. हिची उंची दहा हजार फूट आहे. वाटेंत दोन ठिकाणीं दीडशें दोनशें फूट लांबीचें बर्फ तुडवीत जावें लागलें. दोन्ही ठिकाणची वाट घळीच्या तोंडावरून गेलेली होती. जातांना डाव्या बाजूस वर पाहिलें तर टोपी पडेल अशी उंची, आणि उजवीकडे खालीं पाहिलें तर ठावच नाहीं अशी खोली. अशा ठिकाणीं खालीं पाहण्याचें धाडस करतोच कोण म्हणा ! पण पाहिलेंच तर डोळे फिरून मागेंच फिरावें लागेल. नाहीं तर कांहींच दिसत नाहीं म्हणून सांगावें लागेल. बर्फावरून चालत जाण्याची गंमत वाटली. बर्फ घट्ट बसलेलें होतें तरी पायाखालीं दबल्यासारखें होऊन चुरचुर आवाज निघे; त्यावरून गेल्यानें बुटांचे तळवे भिजल्यासारखे दिसले नाहींत. दोन्ही घळी वरपासून बर्फानें गच्च भरून गेल्या होत्या व तें दरीअंगासहि तसेंच होतें. जर का कोणी दुर्दैवानें त्या बर्फावरून घसरलें तर जीविताची आशा संपलीच.

## बर्फातील गुहा

वाटेच्या टोंकास त्या बर्फाच्या थराखालीं पोकळी दिसली म्हणून जवळ गेलों; पोकळीच्या माथ्यावरील बर्फाच्या थराची जाडी दहा बारा फुटाची दिसली. पोकळीची उंची सहा फुटापेक्षां अधिक होती. मी उभ्यानेंच आंत जाऊं शकलों. मला ती गुहेसारखी वाटली. आंत खोल दिसत होती. रुंदी ८–१० फूट, खोली (लांबी) १५–२० फूट होती. आंतपर्यंत जाण्याचें धाडस होईना. वाटलें जर कां वरचें बर्फ कोसळलें तर गारठून बेशुद्धी आणि मोक्ष बरोबरच ! आंत जिकडे तिकडे पांढरें स्वच्छ. जमीन बर्फाची, उभ्या भिंती बर्फाच्या व छतहि बर्फाचेंच. एक गोष्ट आश्चर्याची कीं इतर बाजू वाकडयातिकडया खांचखळग्याच्या असल्या तरी वरील छत मात्र कांक्रीटसारखें एका पातळींत ! त्यांतून मधून मधून पाणी ठिबकत होतें. बाहेरच्या हवेपेक्षां आंतले बाजूस थोडीतरी थंडी कमी असावी असें प्रथम वाटलें पण मागाहून गारठा भासूं लागला. तसा बाहेरील मोकळ्या हवेंत मात्र भासत नव्हता.

## रामवाडा

रामवाड्यास पोहोंचेपर्यंत संध्याकाळ होत आली. पाऊस नसला तरी त्याच्या ढगांनीं संध्याकाळच्या काळोखांत भर घातली होती. थंडी तर मनस्वीच होती. जवळूनच मंदाकिनी उड्या घेत चालली होती. तिच्या प्रवाहघोषानें वातावरण दुमदुमून गेलें होतें. भोंवताlच्या डोंगरावर जागजागीं बर्फ दिसत होतें. झाड्झूड दृष्टीच्या टप्प्यांत औषधालाहि दिसलें नाहीं. एका हांकेवर चट्टी राहिली असेल नसेल तों एक आकस्मिक व मनाला धक्का देणारा अपघात झालेला दृष्टीस पडला.

आमच्यापुढेंच शेंदोनशें पावलावर एक म्हातारे यात्री चालले होते. चालतां चालतां ते एकदम वाटेंत पडले ते गतप्राण झाले! चौकशीअंतीं असें समजलें कीं, त्यांना अफू खाण्याची संवय होती व ती मिळाली नव्हती, म्हणून मृत्यु ओढवला!

रामवाडा येथें बऱ्याच चट्ट्या आहेत. त्या डोंगरउतरणीवर असून त्यांतील जमिनींतून पाणी पाझरत होतें. येथें माडीच्याहि चट्ट्या आहेत. ओसरी माजघरांच्या चट्ट्यापेक्षां माडीवर उबारा अधिक असतो. हवेतील थंडी आणि गारठा, म्हाताऱ्याचे अपघाताचें दृश्य, चढणीवरील चालीनें आलेला थकवा आणि ह्या सर्वांस भरच म्हणून कीं काय, येथें महामारीची सांथ असल्याची वार्ता, ह्या सर्वांच्यामुळें नेहमीं वाटणारा उत्साह पार मावळून गेला. मन उदास होऊन खिन्न झालें. शरीरालाहि गळाठा वाटूं लागला, पण उपाय नव्हता. अस्वस्थ मनानेंच झोंपी गेलों, तरी स्वस्थ झोंपा झाल्या. सकाळीं उठल्यावर रात्रीचा निरुत्साहकारी सर्व पगडा नाहींसा होऊन पूर्ववत् तरतरी वाटूं लागली. निजण्यापूर्वीं बोजेवाल्यास कॉलराप्रतिबंधक औषधाच्या गोळ्या दिल्या होत्या. आम्हीं घरून निघतांनाच प्रतिबंधक औषधाच्या गोळ्या सेवन केलेल्या होत्या.

## केदारनाथाची धूळभेट


रामवाड्यापासून बदरीकेदार तीनच मैल आहे, वाटहि चांगली असून वावभर रुंदीची आहे. पण सुरवातीपासून अगदीं शेवटपर्यंत सारखा चढ आहे. वाट संपतां संपत नाहीं. पाय मेटाकुटीस येऊन

गेलेले असतात. चढतांचढतां नाकीं नऊ आले. बस, उठ, करीत करीतच माथा गांठावा लागला. हजार पंधराशे मैलांच्या इकडील पायीं प्रवासांत वाटेंत दमलों म्हणून कोठेंहि बसण्याची पाळी आलेली नव्हती, पण ती येथें मात्र आली. हा पहाड अगदीं बोडका आहे. वर जागजागीं पाणी पाझरत आहे. तरीसुद्धा त्यावर एकहि झाडझूड नाहीं. त्याच्याच शेजारचा पहाड, तोहि त्याच्या इतकाच उंच आहे, पण त्याच्यावर दाट झाडी आहे. ती इतकी कीं एक टीचभरसुद्धां जागा उघडी दिसत नाहीं. निसर्गाचें असें हें वैचित्र्य पावलागणीक दिसतें. रामवाडचास मंदाकिनीचा कांठ सुटतो तो पुन्हां दोन मैल चढून गेलें म्हणजे उजव्या बाजूस लागतो. कित्येक ठिकाणीं तिचा प्रवाह बर्फाखालून वहात असल्यामुळें अदृश्य असतो. पण जेथें तो प्रगट असतो तेथें तो तांडव करीत चाललेला दिसतो.

मैल सव्वा मैल अंतरावरून केदारपुरी दिसूं लागते व तेथूनच बदरीकेदार मंदिराच्या शिखराचें प्रथम दर्शन होतें. पुरीच्या पाठीशीं असलेले पहाड आणि त्यांचीं हिमाच्छादित उत्तुंग शिखरें अगोदरपासूनच दिसूं लागलेलीं असतात. एखाद्या लहानशा कलिकेस तिची शोभा असतेच; पण अनेक फुलांच्या गुच्छांत तिची शोभा अनेकशः गुणाकारानें वाढलेली दिसतें. त्याप्रमाणें एकामागें एक वाढत्या श्रेणीनें उंचावत गेलेल्या विशाल पर्वतांतील गगनभेदी हिमशिखरांच्या पुंजांत त्रैलोक्याधिपति केदारनाथाच्या मंदिराच्या शिखराची शोभा उठून दिसत होती. निसर्गानें आपल्या भव्य आणि उदात्त ऐश्वर्याचें गिरीशाच्या दैवी वैभवास साजेसें जणू प्रदर्शनच मांडलें होतें. ‘ उत्तुंग शिखरें नभा शिवती । भोंवती मेघ स्वच्छंदें नाचती । हिमाच्छादान शिरा भूषविती । शिवलिंगा शुभ्र पुष्पें जैशी ॥ ’ योगारूढ शंकराच्या शुद्ध, बुद्ध, नित्य मुक्त ध्यानावस्थेला यापेक्षां अनुरूप असें कैलासाशिवाय अन्य स्थान कोठें सांपडणार आहे ?

### मंदाकिनी घाट

केदारपुरीचे सीमेवर मंदाकिनीनें वाट अडविली आहे. तिच्या दर्शनानें वा स्पर्शनानें शुद्ध झाल्याशिवाय केदारपुरींत जाण्यास जणू प्रवेशबंदीच आहे ! साकववजा लहानशा लाकडी पुलावरून गंगा



केदारनाथ लिंगदर्शन पान २१८



केदारनाथ जवळ मंदाकिनी घाट पान २०८

ओलांडून गेलें म्हणजे पुरींत गेलेल्या मुख्य वाटेस एक फांटा फुटून तो मंदाकिनी घाटाकडे फिरून मागें आला आहे.

हा घाट खडकांत खोदून केलेला आहे. तो लहानसाच असला तरी त्यामुळें कांठाशींच पायरीवर बसून स्नान करण्याची उत्तम सोय झाली आहे. नाहींतर मोठी पंचाइतच होती. घाटावर पात्राची रुंदी वीस फुटांपेक्षां अधिक नाहीं व खोलीहि कमरेपेक्षां अधिक नाहीं. प्रवाहाचा वेग इतका आहे कीं त्यावर दृष्टि ठरत नाहीं. पाण्याला ओढ इतकी मनस्वी आहे कीं त्याचा प्रवाह म्हणण्यापेक्षां त्याचा लोंढाच म्हणणें अधिक शोभेल. मंदाकिनीचा उगम येथून जवळच दोन तीन मैलांत झालेला आहे. केदारपुरीच्या पाठीशीं असलेल्या डोंगरावरील हिमराशीपासून तो होत असल्याचें दिसून येतें. तिच्या पाण्यांत बर्फाचे खडे वाहून येतात. मातीसारखें अभ्रकमिश्रित दगडाचें बारीक वस्त्रगाळ पीठ पाण्यांत इतकें मिसळून गेलेलें असतें कीं पाणी कितीहि वेळां गाळलें तरी स्वच्छ होत नाहीं. भागीरथी, मंदाकिनी किंवा अलकनंदा ( बदरीनारायणापाशीं उगम पावणारी ) ह्या सर्व नद्यांचें पाणी असेंच रेताड असतें. गंगेचें पाणी अठरा वेळां कापसांतून गाळावें लागलें होतें तेव्हां तें अगदीं निर्मल झालें. थंडीमुळें, बर्फामुळें वा गढूळ पाण्यामुळें असो, घाटावर अंघोळ करतांना पाणी दाट वाटत होतें. वापरांतील नित्याचें धूतवस्त्र ह्या पाण्यांत दाबदाबून बुडविलें तरी भिजलें नाहीं. ऊबदार कपड्यांनीं सर्व अंग गुरफटून घेतलें असतांना सुद्धां थंडीच्या कडाक्यानें दांतखिळी वाजत होती. पाण्याचा गारपणा बर्फाच्या इतकाच असतो असें म्हणण्यानें तेथें वाटणाऱ्या गारव्याची खरी कल्पना येणार नाहीं. आपल्याकडे एखादवेळ पावसाळ्यांत गार वारे सुटून अंगास झोंबतात, त्यावेळीं उष्णतामान पन्नासच्या जवळ गेलेलें असतें; तेव्हां बर्फाचा गारवा काय असतो तो पाहावा म्हणजे मंदाकिनीच्या तेथील पाण्याची कांहींशी कल्पना येईल.

अशा परिस्थितींत अंघोळच करूं नये असें वाटलें. प्रवाहाच्या झोताकडे पाहतांच अंगावर कांटा उभा राहिला, आणि भीति वाटूं लागली कीं स्नान करतांना जर का घसरून आंत ओढला गेलों तर निमिषार्धांत वाहून जाऊन कोठें गडप होऊं ह्याचा मागमूसहि लाग-

णार नाहीं. दैनंदिन स्नानाभ्यासानें स्नानाशिवाय राहणें हें अपवित्र व अमंगल वाटतें. प्रतिदिनीं स्नान हा स्वभावच झाला आहे. गेला महिनाभर असल्या कमीअधिक गार पाण्यांत स्नान करण्याचा अजमासहि आलेला होता, आणि यात्रेंतील निष्ठेची हीच कसोटी असते, ह्या जाणिवेनें क्षणैक उत्पन्न झालेलें शैथिल्य पार मावळून गेलें.

स्नान करतांना बोटें आंखडून गेलीं, वांकड्या बोटांनींच अंगावरून हात फिरविला. तपेली भरून अंगावर ओततांना ती हातांतून निसटणार अशी सारखी भीति वाटे. सर्वांगास हुडहुडी भरली होती. एकदाचें स्नान उरकलें. अंग पुसतांना थंडी कमी वाटेल असें वाटलें, पण ती अधिकच वाटूं लागली. ओल्या अंगावर वारें लागून ती वाढली. वाऱ्यापुढें अंगपुसणेंहि फडफडूं लागून त्रास झाला. पण कपडे बदलल्यानंतर ऊब आली. पाण्याच्या गारव्यानें बोटांत कळा येऊं लागल्या आणि तीं आंखडून गेलीं. ओलें धोतर पिळतांसुद्धां येईना! पुढें एक अनुभव लक्षांत ठेवण्यासारखा आला कीं, अंग पुशीत न बसतां बायकांप्रमाणें अंगाभोंवतीं एकदम धोतर गुंडाळून घ्यावें. म्हणजे वारें न लागतां तें टिपून कोरडें होतें आणि थंडी न वाजतां ऊबहि झटदिशी येते.

## केदारपुरी

मंदाकिनी ओलांडून पुरींत जातांना सरस्वती व मंदाकिनी यांचा संगम आहे व तेथेंच दोन लहानशीं देवळें आहेत. एक संगमेश्वर महादेवाचें आणि दुसरें गंगामाईचें.

केदारपुरीच्या सभोंवतीं हिमाच्छादित पर्वतांचें नालाकार कडें असून मध्यें बरीच मोठी सपाटी आहे; सपाटी म्हटली तरी ती डोंगरावरील असल्यामुळें तिच्यांत चढउतार असावयाचेच. शेंपन्नास फूट लांबीच्या रस्त्याच्या दोन्हीकडेस घरें व धर्मशाळा आहेत. एकंदर पन्नास साठ उंबरठा आहे. त्यांत माड्यांची घरेंहि आहेत. रस्त्याच्या तोंडासच टपाल व तार घर आहे व दुसऱ्या टोकास केदारनाथाचें देऊळ आहे. रस्ता चांगला आहे. डोंगरावर असल्यामुळें चिखल व्हावयाचा नाहीं कीं डबकीं सांचावयाचीं नाहींत. पुरीच्या उत्तर अंगानें मंदाकिनी वाहाते. पात्रांत प्रवाहापेक्षां दलदलीचा भाग अधिक

दिसतो. केदारपुरी म्हणजे एक रस्ता, त्यावरील वस्ती, आणि केदारेश्वराचें मंदिर. ह्या रस्त्यावर हलवाई म्हणजे पुऱ्या, भाजी, भजीं, शेव वगैरे विकणारे ह्यांचीं दुकानें आहेत. विशेष आचारविचाराचे लोक सोडले तर बहुतेक यात्री भात उकडणें किंवा रोटया भाजणें ह्या भानगडींत पडत नाहींत. आयता मिळणारा जिन्नस घेऊन भागवितात, आणि त्यामुळेंच अनेकविध व्याधीस आमंत्रण देतात. येथें तांदूळ, आटा, सर्पण, दूध, वगैरे मिळतें, पण तें फार महाग असतें. चारहि धामांत येथें थंडीचा कडाका अधिक असतो. येथें सहाच महिने वस्ती असते. साधारणपणें अक्षय्यतृतिया–वैशाख शुद्ध ३ चे सुमारास कपाटें–दरवाजे उघडतात. तोंपर्यंत दहा दहा वीस वीस फूट जाडीच्या बर्फाच्या थरांत घरेंदारें सर्व कांहीं गडप होऊन राहिलेलें असतें. बलिप्रतिपदेला येथें शेवटची पूजा होते; आणि येथील चलत मूर्ति उखीमठास नेऊन तेथें त्यांची पूजाअर्चा पुन्हां त्या येथें आणीपर्यंत चालू असते. म्हणजे सहाच महिने येथे वस्ती नसते. देवळाचीं कपाटें बंद करून निघतांना नंदादीपास सहा महिने पुरेल अशीं तूप वात यांची काळजीकाटयानें व्यवस्था करून ठेवलेली असते. सहा महिन्यांनीं कपाटें उघडते वेळीं नंदादीप तसाच तेवत राहिलेला असतो. त्या ज्योतीचें दर्शन घेण्याकरितां साधू, बैरागी व इतरहि भाविक लोक अक्षय्य तृतीयेस तेथें जातात अशी दाट वंदता ऐकूं येते. अशी ही तेवत राहिलेली ज्योति प्रत्यक्ष पाहून आलेला कोणी माणूस भेटलेला नाहीं.

### ज्योतिर्लिंग नांवाची उपपत्ति

ज्योतिर्लिंग हें रुद्रदेवतेचें प्रतीक आहे. लिंग म्हणजे चिन्ह, खूण, लक्षण; व ज्योतिः म्हणजे तेजोमय, प्रज्वलित. रुद्रदेवतेच्या तेजोमय रूपाचें प्रतीक तेंच ज्योतिर्लिंग. चयनयज्ञामध्यें विधीपूर्वक केलेल्या वेदीवर जो अग्नि सिद्ध होतो त्यालाच रुद्र म्हटलें आहे. चयनवेदीचा आकार महादेवाच्या पिंडीसारखा असतो. पिंडीलाच बाण, शिवलिंग अशीं नांवें आहेत. वैदिक काळांतील यज्ञकर्मांत वेदीवर प्रकट होणारा अग्नि हें त्या महारुद्राचें रूप होतें. तेंच यज्ञोत्तरकाळीं म्हणजे पौराणिक काळांत शाळुंकापिंडी रूपानें रूढ झालें आहे.

वास्तविक शिवाचें लक्षण निर्गुण, निराकार, ध्रुव आणि म्हणूनच

'अलिंगी' आहे. सांख्यांच्या प्रक्रियेंत अव्यक्त, प्रधान किंवा प्रकृति ह्यास 'लिंग' अशी संज्ञा आहे. गुणयुक्त जगताचें स्थूल व सूक्ष्म शरीर हेंच लिंगाचें 'लक्षण' आहे. अलिंगापासूनच लिंगाचा संभव झालेला आहे. ह्या उत्पत्तींत त्यांनीं लिंगाचे २६ प्रकार सांगितले. त्यांत शिवात्मक असे तीन प्रधान देव झाले. म्हणजे एका परमात्म्यालाच कार्यभेदानें तीन नांवें आलीं. ते प्रधानदेव म्हणजे ब्रह्मा, विष्णु व महेश. ह्याप्रमाणें जगताची उत्पत्ति, स्थिति व लय करणारा जो परमात्मा शिव त्यानें केलेल्या विश्वोत्पत्तीला ब्रह्मांड असें नांव आहे. विश्व हें अंडयाचे आकाराचें आहे; हा जो परमात्मा महेश तो हें सारें ब्रह्मांड आंतून-बाहेरून सर्वतोपरि व्यापून 'अंतर्बहिश्च तत्सर्वं व्याप्यनारायणः स्थितः।' शिल्लकहि राहिलेलाच आहे. 'अत्यतिष्ठद्दशांगुलम्।' अशा ह्या विश्वव्यापी-विश्वधारक परमेश्वराची ओळख करून घेण्यास ब्रह्मांडाकार लिंग-प्रतीक हेंच योग्य व अनुरूप ठरतें.


बहुतेक ज्योतिर्लिंगस्थानमाहात्म्यांच्या कथांत एकेकाळीं तेथें तेथें अग्निज्वाला असल्याचा उल्लेख येतो. शिवलिंग हें अग्नीचेंच प्रतीक कसें आहे हें वर पाहिलेंच आहे. ह्यांवरून त्या त्या शिवलिंगास ज्योतिर्लिंग नांव प्राप्त होणें साहजिक आहे. निसर्गनिर्मितींत कैलासाचा आकार साक्षात् शाळुंकापिंडीसारखा तंतोतंत असावा हें आश्चर्य आहे.

'शिवलिंग ब्रह्मांडाकार। शाळुंकापिंडी त्याचें रूपांतर। कैलास रूपें होता गोचर। घरोघरीं विस्तरलें पूजनार्थ।'

परधर्मीयांनीं विशेषतः पाश्चात्य ख्रिस्ती पाद्र्यांनीं सत्तेच्या पक्षपाती पाठिंब्यांत, संशोधनाच्या नांवानें, हेतुपूर्वक विपर्यस्त कल्पना करून घेऊन 'इसा'च्या धर्माचा श्रेष्ठपणा प्रस्थापित करण्यासाठीं शाळुंका पिंडीची पूजा ही जननेंद्रियाची पूजा आहे असा आमच्या देवदेवतांविषयीं बदलौकिक करणारा प्रचार चालविला होता. शिवाय रुद्र ही आमची देवताच नव्हे, ती आम्हीं अनार्यांपासून घेतली आहे, असाहि डांगोरा पिटूं आगले. आमच्यांतील कांहीं परप्रत्ययनेयबुद्धि, स्वाभिमानशून्य, इंग्रजी शिक्षणाच्या अर्ध्या हळकुंडांत पिवळे होऊन हुरळून गेलेले इसम वरील प्रचारास बळी पडून त्यांचीच 'री' ओढूं लागले.




उखीमठ विहंगमदृश्य – ॐकारेश्वर मंदीर व गांव पान २४१



त्रिजुगी नारायण मंदीर पान १९९



पवालीतील एक चढण पान १८८

रुद्र ही वैदिक देवता आहे, एवढें म्हटल्यानेंच ती आर्यांनीं इतरां कोणाकडून घेतलेली नसून ती स्वयमेव वैदिक आर्यांचीच आहे हें स्वयंसिद्ध आहे. शतरुद्री म्हणजे ज्याला आपण रुद्र म्हणतों आणि ज्या मंत्रांनीं महादेवास अभिषेक करतों त्या मंत्रांकडे वरवर पाहिलें तरीसुद्धां शिवाचें भव्यत्व, उदात्तत्व, सर्वेश्वरत्व, सर्वात्मकत्व आणि सर्वांतर्यामित्व लक्षांत येतें. रुद्रदेवता म्हटली तरी त्याचा एक संघात आहे. म्हणूनच 'नमो रुद्रेभ्यो ये पृथिव्यां येऽन्तरिक्षे ये दिवी...'! अशा प्रकारें बहुवचनी प्रयोग रुद्रमंत्रांत आहेत.

शिवलिंग—पूजनाचे विधि ठरलेले आहेत. त्यांत मानसपूजेपासून पार्थिव पूजेपर्यंतचे सर्व प्रकार अधिकारभेदानें उपासकांकरितां सांगितलें आहेत. ज्ञान व योग ह्यांच्या बलानें हृद्कमलाच्या ठायीं महेश्वराची व त्याच्या सर्व देवतांची भावना करून तेथें त्याचें ध्यान करण्यास सांगितलें आहे. पार्थिवादि शिवलिंगाची पूजा सामान्यांकरितांहि सांगितली आहे. त्यांत स्कंद, देवी, नंदी कित्येक वेळीं ब्रह्मा विष्णु ह्यांचीहि स्थापना लिंग म्हणजे पिंडीवर करावी लागते. बुढाकेदार, पशुपति येथील पिंडीवर अशा प्रकारच्या देवतामूर्ति आहेत. महेशाचें ध्यान करतांना त्यास 'पंचवक्त्रं त्रिनेत्रम्' असें म्हटलें आहे. त्यावरून वर उल्लेखिलेले आक्षेप निराधार व कुत्सित बुद्धीनें केलेले आहेत ही खात्री पटेल. ज्योतिर्लिंग हे साक्षात् अग्नीचें रुद्ररूपी प्रतीक आहे.

### बारा ज्योतिर्लिंग स्थानें

आपल्या भारतभूमींत किती तरी ज्योतिर्लिंगस्थानें आहेत. त्यांतील बारा स्थानें फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध असून त्यांचें माहात्म्यहि अबाधित राहिलें आहे; इतकेंच नव्हे तर तें वाढतहि आहे. तीं स्थानें:—

'सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरम् ॥ १ ॥
परल्यां वैजनाथंच डाकिन्यां भीमशंकरम् ।
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥ २ ॥
वाराणस्यांतु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ।
हिमालये तु केदारं घुसृणेशम् शिवालये ॥ ३ ॥

वरील श्लोकांत द्वादश ज्योतिर्लिंगांचीं नांवें व तीं कोठें कोठें आहेत त्या ठिकाणांचा उल्लेख आलेला आहे. वरील नांवांत केदारचें नांव आलें आहे. त्यावरून तें एक स्वतंत्र ज्योतिर्लिंग असल्याचें कळून येतें. पण लोकसमज असा आहे कीं, केदार आणि पशुपति हीं दोन्ही मिळून एक ज्योतिर्लिंग होतें. पशुपति हें ज्योतिर्लिंग नेपाळांत कटमंडूजवळ आहे. त्याची सविस्तर माहिती पशुपति यात्रा वर्णनांत येईल.

## बदरीकेदार ज्योतिर्लिंग

एका नंदीची कल्पना केली तर केदार हा त्याचा पार्श्वभाग आणि पशुपति हा त्याचा मुखाचा भाग आहे. अशी कल्पना करून घेण्यास तरी आधार काय हें माहीत नाहीं. ऐकीव कथा अशी आहे कीं, राज्यत्याग केल्यानंतर पांडव हिमालयांत तपश्चर्येकरितां गेले. तेव्हां केदारनाथांच्या दर्शनाकरितां ते केदारास आले. भ्रातृहत्या, कुलहत्या करणारांचा वारासुद्धां नको म्हणून केदारनाथ रेड्याचें रूप धारण करून पातळांत दडी मारण्यासाठीं पृथ्वीच्या पोटांत घुसूं लागले.

ही अघटित घटना पांडवांच्या तेव्हांच लक्षांत आली. विद्युद्वेगानें धांवत जाऊन भीमानें मुंडी खुपसून चाललेल्या रेड्याचें शेपूट पकडून त्यास अडवून धरलें. पांडवांची निष्ठा पाहून शंकर प्रसन्न झाले. त्यांनीं पांडवांना दर्शन देऊन भ्रातृहत्यादि पापांपासून मुक्त केलें. महिषाचें जमिनीच्या पोटांत घुसलेलें मुख नेपाळांत प्रकट झालें. त्याचेंच नांव पशुपति. तेव्हांपासून दोनहि ठिकाणीं लिंगरूपानें शंकरांचें वास्तव्य आहे. अशा ह्या समजुतीनें नुसतें केदार किंवा नुसतें पशुपति ह्यांचें दर्शन घेतलें असतां त्या लिंगाचें पूर्ण दर्शन झालें असें होत नाहीं. राहिलेल्या अवशिष्ट किंवा पूरक लिंगाचें दर्शन झालें म्हणजे मगच तें पूर्ण होतें.

ह्या कथेवरून एवढा बोध घ्यावयास अडचण नाहीं कीं, सर्वच हिमालय हा शिवस्वरूप आहे. त्यांतील केदार ते पशुपति हा साडेतीनशें मैलांचा पूर्व–पश्चिम पसरलेला भाग, ह्यांत वीस पंचवीस हजार फूट उंचीचीं अनेक शिखरें आहेत, हाच पशु म्हणजे रुद्राचें वाहन जो नंदी त्याचें रूप. ह्या नंदीचें तोंड पूर्वेकडेसच आहे. एवढ्या मोठ्या प्रचंड नंदीची कल्पना केली म्हणजे त्याच्यापुढें तसेंच जगड्व्याळ

शिवलिंग नसेल तर ती कल्पना फुकटच आहे. पण कर्मधर्मसंयोगानें नंदिकेश्वरास सर्वतोपरी साजेल असें एक विशाल, भव्य व दैदीप्यमान स्वयंभू शिवलिंग त्याच्या पुढें अनादि अनंतकाल उभें आहे. आणि म्हणूनच ही नुसती कल्पना नसून वस्तुस्थिति आहे. ह्या शिवलिंगाचें नांव गौरीशंकर. ह्या शिखररूपी लिंगाची उंची एकोणतीस हजार फूट आहे. ह्याच्याएवढें उंच शिखर जगतितलावर अन्य नाहीं. तें एकमेव अद्वितीयच आहे ! त्याची नुसती गगनभेदी उंचीच काय पण त्याचा अमर्याद विस्तार, त्याच्या तेजस्वी प्रकाशाची दीप्ति, त्याचा भव्यपणा, त्याची गहनता आणि तशीच अद्भुतरम्यता हीं सर्व कांहीं अपूर्वच आहेत. विशाल हिमालयाच्या चौथऱ्यावरील हें प्रचंड व अद्भुत गिरीशाचें प्रतीक विश्वव्यापी महादेवाच्या घोर, अघोर तनूचें यथार्थ दर्शन करून देणारें आहे !

केदार व पशुपति ह्या दोन स्वयंभू ज्योतिर्लिंगांच्या संयोगांत गौरीशंकराचें महाविभू ज्योतिर्लिंग पुढें उभें राहिलें. ह्या विचार-परपरंनेंच कीं काय प्रत्यक्ष बदरीकेदारचा विस्तार पंच केदारांत पूर्वी-पासूनच होऊन बसलेला आहे. पंचकेदार स्थानें वाटेवरच पण जरा आडमार्गी आहेत. केदारमहापुरुषाचीं पंच अंगें येणेप्रमाणें:-( १ ) बदरीकेदार हें स्थान नाभीचा खालचा भाग; ( २ ) मध्यमेहेश्वर हे स्थान नाभीच्या ठिकाणीं; ( ३ ) तुंगनाथ येथें बाहू; (४) रुद्रनाथ येथें मुख व (५) कल्पेश्वरास जटा असा हा पुरुषविशेष सात आठशें चौरस मैलांचा विस्तार व्यापून राहिला आहे.

एकाद्या देवतेचें पूजन जसें अंगोपांगांनीं करावें लागतें तसेंच केदार नाथाचें दर्शन पंचकेदारांगोपांगांनीं केल्याशिवाय पूर्ण होत नाहीं. सर्वच यात्री पंचकेदार व पंचबदरी करितात असें नाहीं. सहस्रांत एखाद-दुसराच त्या यात्रा करितो. आम्हीं त्या यात्रा केल्या तेव्हां आम्हास पंचकेदाराची कल्पनाहि नव्हती. त्या पंचकेदार यात्रेची माहिती मिळविलेली आहे ती खालीं दिली आहे.

### पंचकेदार–स्थानें

एका विराट केदार पुरुषाचें रूप पुढें उभें केलें तर ‘ बदरी केदार ’ हें स्थान त्या पुरुषाचा नाभीपर्यंतचा भाग होईल; ‘मध्यमहेश्वर’ हें

स्थान नाभीपासून वरचा भाग होईल; 'तुंगनाथ' हें स्थान त्याच्या बाहूंच्या ठिकाणीं होईल; 'रुद्रनाथ' हें स्थान त्याचें मुख होईल; आणि 'कल्पेश्वर' हें स्थान त्याचें जटान्वित मस्तक होईल.

ह्या पंचकेदारांपैकीं बदरीकेदारची संपूर्ण माहिती वर येऊन गेलेली आहे. तुंगनाथाची माहिती चवथ्या भागांत उखी मठाच्या पुढें दिलेली आहे. राहिलेलीं तीन स्थानें यात्रामार्गापासून थोडीं बाजूला आहेत. त्यांची माहिती अशी:––

### मध्यमहेश्वर

केदारनाथाहून बदरीनारायणाकडे जातांना अजमासें एकवीस मैल किंवा गुप्तकाशीच्या अलिकडे पांच मैल व्योंगमल्ला चट्टी आहे. तेथून पुढें अजमासें एक मैलावर यात्रेचा रस्ता सोडून एका मधल्या वाटेनें एक मैल उतरून गेलें म्हणजे काली नदीवरील पूल लागतो. तेथून पुढें अर्ध्या मैलाचा चढ व अर्धा मैल सपाटीची वाट गेलें म्हणजे कालीच्या कांठीं कालीमठ गांव लागतो. त्यालाच 'कालीक्षेत्र' असें पुराणांतरी म्हटलें आहे. सत्ययुगांत रक्तबीज नांवाच्या दैत्यानें देवांनासुद्धां सतावून सोडलें. तेव्हां इंद्रादिदेवांनीं महामाया देवीची आराधना केली. देवीनें प्रसन्न होऊन वर दिला. तेव्हांपासून या स्थानास कालीक्षेत्र नांव पडलें. येथें कालीचें देऊळ व एक भुयार आहे; देवळांत शववाहिनी कालीची मूर्ति आहे. गुहा नेहमीं बंद असते. वसंत व शरद् ऋतूंच्या नवरात्रांत कालरात्रीं–सप्तमीचे रात्रीं कुंडीचें तोंड उघडून बलीपूजा होत असते.

कालीमठ हा भगवती कालिका देवीचें सिद्ध पीठ आहे. केदारखंडांत हें माहात्म्य वर्णन आहे.

कालीमठाहून मध्यमहेश्वर पंधरा मैल आहे. सात मैलांवर रांसी गांव आहे. तेथें राकेश्वरी देवीचें मंदिर आहे. व साधारण धर्मशाळा आहे. तेथून चार मैलांवर गोंडार गांव व पुढें चार मैलांवर मध्य-महेश्वर स्थान आहे. कालीमठाहून गोंडारपर्यंत मधली वाट आहे, पण ती फारच कठीण आहे. चट्ट्यांची सोय पाहून जाणेंच श्रेयस्कर आहे. मध्यमहेश्वराचें देवालय सुंदर आहे. तेथील शिवलिंग स्वयंभू आहे.

## रुद्रनाथ

तुंगनाथाहून तीन मैल भीमद्वार चट्टी व पुढें एक मैलावर पांगावासा चट्टी लागते. तिच्यापुढें चार मैलांवर मंडल चट्टी आहे. तेथून यात्रामार्ग सोडून देऊन एक दुसरी वाट रुद्रनाथास जाते. ह्या वाटेंस सारखा चढ आहे. मंडलपासून दोन मैलांवर एका दाट वनांत भगवती अनुसया देवीचें सुंदर देवालय आहे. तेथून पुढें दहा मैलांवर एका उंच पर्वतावर बिकट मार्गानें जावें लागतें. तेंथें रुद्रनाथ महादेवाची गुंफा आहे. त्यांत रुद्रनाथाचें स्वयंभू लिंग आहे. जवळ वैतरणी नदी उगम पावली आहे. तिच्यावर पिण्डश्राद्ध व तर्पण करण्याचें माहात्म्य आहे. रुद्रनाथाहून परत येण्याचा मार्ग निराळा आहे. त्यानें सहा मैल उतरून आलें कीं, गोपेश्वर येथें मुख्य यात्रामार्ग मिळतो. गोपेश्वर ही रुद्रनाथाची हिमकाळांतील गद्दी आहे.

## कल्पेश्वर

चमेलीहून बदरीनारायणाकडे जातांना अजमासें बावीस मैलांवर किंवा जोशी मठाहून अलिकडे सात मैलावर हेलंगचट्टी आहे. तेथून कल्पेश्वर स्थान अजमासें पांच सहा मैल आहे. यात्रा—वाट अलकनंदेच्या उजव्या कांठानें गेली आहे. पण हेलंगचट्टीच्या समोर अलकनंदेच्या डाव्या काठानें कल्पेश्वराची वाट जाते. दीड मैल खडा उतार उतरून गेलें म्हणजे एक पूल लागतो. त्यावरून पुढें चार मैल खडा चढ चढून गेले म्हणजे उर्गम गांव येतें. तेथेंच घनदाट झाडीमध्यें कल्पेश्वर महादेवाचें देऊळ आहे. तेथें कर्मनाशा नदी असून उर्गम बदरीशाचेंहि देऊळ आहे. हें स्थान मोठें शांत व रम्य आहे.

## बदरी केदार मंदिर

केदारनाथाचें देऊळ गांवाच्या अगदीं टोंकास आहे. तें रस्त्यापासून दोन अडीच पुरुष उंचीवर आहे. वर जाण्यास पायऱ्या आहेत. देवळापुढें चार—पांचशें माणसें मावतील असें एक प्रशस्त फरसबंदी पटांगण आहे. महाद्वारापुढें चौथऱ्यावर मोठा नंदी आहे. नंदीच्या मागें पण पटांगणाच्या कडेस लोखंडी खांबाच्या चौकटीस एक पांच सात मणांची मोठी थोरली घंटा टांगली आहे. पटांगणापासून गुडघाभर उंच देवळाचा चौथरा आहे. सर्व देऊळ माठीव चिरेबंदी बांधलेलें आहे. देवळाचे

बांधणीच्या बहिरंगावरून शिखर व सभामंडप एकाच वेळीं बांधलेलें नसावें. त्याची रचना विसदृश दिसते. सभासंडप मागाहून जोडल्यासारखा दिसतो. शिखर काय किंवा सभामंडप काय गेल्या शेंपन्नास वर्षांतील बांधणीचे दिसतात. रचनेची कलाकुसरी ही संमिश्र ठेवणीची आहे. सभामंडप दोनदालनी असला तरी तो योजनापूर्वक एकाच वेळीं बांधला गेलेला आहे. गाभारा व सभामंडपाचीं दोन मिळून देवळांत तीन दालनें आहेत. शिखर ब्रह्मी धाटणीचें आहे. तें उंच असलें तरी औरस–चौरस रुंदीमुळें ठेंगणें वाटतें. महाद्वार देवळास साजेसें प्रशस्त आहे. त्याच्या दोन्ही बाजूंस मोठाल्या द्वारपाळांच्या मूर्ति आहेत. देवळाच्या डाव्या उजव्या अंगासहि मोठाले दरवाजे असून त्यांजपुढें पायऱ्या असलेले चौथरे आहेत. दरवाजांच्या दोन्ही बाजूंस देवड्या आहेत. दरवाजावर महिरपदार कमानी आणि देवड्या व चौथरे ह्यांजवर कंगणी, कंगोरे, जाळ्या ह्यांनीं सुशोभित केलेले सज्जे आहेत. एकंदरींत जेथें दगडाशिवाय इमारतीस लागणारा एकहि जिन्नस मिळणार नाहीं अशा साडेअकरा हजार फूट उंचीवरील निर्जनगिरीकुहरांत अवघड जागीं इतकें घाटबंद कलाकृतिपूर्ण देऊळ बांधलें गेलें आहे, ह्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. तें आम्हां हिंदूंच्या श्रद्धेची, निष्ठेची आणि एकत्व धर्मभावनेची साक्ष आहे. देऊळ प्रशस्त, भव्य व रम्य आहे. चारहि धामांच्या देवळांत हेंच मोठें आहे.

देवळांतील गाभारा पुण्यांतील ओंकारेश्वराचे गाभाऱ्याएवढा आहे. शिवलिंग शाळुंकापिंडी आकाराचें नसून तें कैलासशिखराप्रमाणें किंवा धान्याच्या शिगेप्रमाणें घुमटाकार असून त्याचा माथा थोडा बसकट आहे. हें लिंग स्वयंभू आहे. तळाचा घेर दहा बारा हातांचा व लिंगाची उंची कमरेइतकी आहे. गाभाऱ्यांत अंधेर आहे. तुपाचे नंदादीप अहोरात्र असतात. सभामंडपांतील चौफेर भिंतींत कमरेइतक्या उंचीवर पांच पांडव, द्रौपदी, कुंती, पार्वती, लक्ष्मी इत्यादि देवतांच्या पाषाणमूर्ति बसविलेल्या आहेत. सभामंडपांत बाजूच्या दोन दारांनीं उजेड येतो पण तो अपुराच वाटतो. देवालयांत व बाहेर स्वच्छता चांगली राखलेली दिसते. प्रदक्षिणेची वाट मात्र तीन बाजूस खडबळ आहे.

## पूजनविधि

तेथील पूजनविधि अगदीं निराळा आहे. देवास अभिषेक नाहीं किंवा लिंगावर पाणीहि घालावयाचें नाहीं. त्याऐवजीं लिंगावर यथाशक्ति तूप थापावयाचें. बाकीचे उपचार सारखेच. इकडे बेलाचें नांवच घ्याव-यास नको; आणि फुलेंहि पण मिळत नाहींत. इतर साहित्य थोडेंफार मिळतें. नैवेद्याकरितां नारळ ( गोटा ), पंचमेवा ( सुकीं फळें, बदाम ), मिठाई वगैरे. धूप, दीप, नैवेद्य, वस्त्र, फल, दक्षिणा, गंधाक्षता, आणि विशेष भेट ह्यांनीं पूजा होते. लिंगाचे शेजारीं उभें राहून कितीहि ओणवें होऊन हात लांब केला, तरी तो कांहीं माथ्यास पोहोंचत नाहीं. म्हणून पंडे देवाच्या अंगावर बसून यजमानाची पूजा चढवि-तात. आपला पाय देवाला लागतो हें त्यांच्या गांवींहि नसतें. ते बेधडक सांगतात कीं, येथील रिवाज असाच आहे. मीं पंडेजीस समजाविले कीं, तुमचा रिवाज काय वाटेल तो असो, देवाच्या अंगावर बसून पूजा करणें आम्हांस पसंत नाहीं व आम्ही तशी करणार नाहीं व आमची पूजा तुम्हासहि तशी करूं देणार नाहीं. देवास काय वहावयाचें तें त्याच्या पायाशीं वाहूं. तुमची दक्षिणा तुम्हांस देऊं.

सर्व पूजा झाली म्हणजे लिंगावर तूप घालून त्यास छातीचा स्पर्श करून भेट द्यावयाची. लिंगास आंतल्या आंत प्रदक्षिणा घालता येते. पण भोंवतीं असलेले खांब दिसत नाहींत, त्यांच्याशीं टक्कर होण्याची भीति; आणि इकडे तिकडे चाचपडावें तों जिकडे तिकडे खांब, भिंती आणि सर्वच तुपानें माखलेल्या, ओशटच ओशट. अशी ही प्रदक्षिणेची कसरत आहे.

कोणास महापूजा करावयाची असेल तर संस्थानकडून ती व्यवस्था केली जाते. त्यांत पंच पक्वान्नी नैवेद्य असतो. साधी पूजा असेल तर तीहि व्यवस्था आहे. पहिलीस १२१ रुपये व दुसरीस ११ रुपये घेतात. त्याची पावती मिळते. येथें सोंवळ्या–ओंवळ्याचा विधीनिषेध नाहीं, आणि तो नेहमीं चालविणेंहि शक्य नाहीं. कोणी एखाद्या यात्रीनें तो आचार पाळला तर तें त्याच्या करारी स्वभावाचें व एकांतिक निष्ठेचेंच द्योतक ठरेल. सर्वच यात्री व पंडे राजरोसपणें पूजा–अर्चा, जेवणखाण कपडे घालूनच करतात.

## मंदाकिनीचा उगम

मंदाकिनीच्या कडेकडेनें जवळच दिसणाऱ्या पर्वतावर थोडें गेलें म्हणजे तेथें एक सरोवर लागतें. त्याच सरोवरास 'कैलास' असें म्हणतात. त्यावरील सरोवरापासूनच मंदाकिनीचा उगम झालेला आहे.

श्रावण भाद्रपद महिन्यापर्यंत बर्फ वितळून जाऊन हें सरोवर दिसूं लागतें. ह्या सरोवराचा विशेष हाच कीं त्यांत नीलकमळें होतात. तीं केदारनाथास वाहाण्यासाठीं पंडे आणून देतात. वाहिलेलीं कमळें वाळवून ठेवून पंडे लोक तीं यात्रींस केदारनाथाचा प्रसाद म्हणून देतात.

## केदार जवळील तीर्थ कुंडें

केदारनाथाच्या देवळाबाहेरील प्रदक्षिणेचे वाटेवर अष्ट दिशेस आठ कुंडें आहेत. त्यांतील कांहीं जवळ आहेत व कांहीं लांब पहाडांत आहेत. अमृतकुंड, रेतकुंड, उदककुंड, रुद्रकुंड ऋषीकुंड, हंसकुंड, स्वर्गद्वार वगैरे जवळ आहेत. ह्यांतील उदककुंड, सोडून बाकीच्यावर आचमन–मार्जन विहीत आहे.

येथें जवळच भैरवझाप वा भृगुपतन म्हणून एका उंच पर्वतशृंगावर स्थान आहे. तेथून खालच्या दरींत उडी घेऊन देहार्पण केलें म्हणजे आत्महत्येचा दोष तर लागत नाहींच पण अतृप्त वासनांचा पुढील जन्मीं फलभोग मिळतो, असें क्षेत्रमाहात्म्य आहे. पूर्वीं ध्येयप्रेरित निष्ठेचे साधू वगैरे असें देहविसर्जन करीत. इंग्रजी राजवटींत असल्या प्रकारास बंदी घातली असली तरी ध्येयनिष्ठांना त्याची काय अडकाठी व भीति होऊ शकते ?


केदार तीर्थमाहात्म्यांत समावेश होणारीं तीर्थे म्हणजे तीं कांहीं केदारस्थानाचे आसपास असणारीं तेवढींच नाहींत. केदारला येणाऱ्या जाणाऱ्या वाटेवर असणारीं बहुतेक तीर्थस्थानें व देवस्थानें हीं सर्व केदारतीर्थांतच अंतर्भूत झालेलीं असल्याचें माहात्म्यवर्णनांत दिसून येतें. उदाहरणार्थः–पोवयाचा पर्वत, (पवाली), रुद्रकुंड, ( रुद्रप्रयाग, मंदाकिनी–अलकनंदा संगम ) वासुकी गंगा, (सोनप्रयाग), गौरीकुंड, उष्णकुंड, गौरीदेवी, उदक कुंड, रेतोदक कुंड, भृगुपतन पर्वत, स्वर्गारोहण, महापथ (कैलास मार्ग) इत्यादि.



बर्फावरून चाललेली मेंढ्यांवरची वाहतूक पान १९३



उघडा साधू केदार वाटेवर



बद्रीकेदार मंदीर व हिमशिखरे पान २४३



उखीमठ — ॐकारेश्वर मंदीर पान २९१

पंडे भोजन व गारांचा खच

श्रीमंत यात्री येथें ब्राह्मणभोजनाप्रमाणें मुक्तद्वार पंडेभोजन घालतात. ही पंगत रस्त्यावरच बसवितात. केळीचें पान वा पत्रावळ ह्यांऐवजीं भूर्जपत्र असतें. जेवणांतील मुख्य पदार्थ म्हणजे पुरी व भाजी. ही भाजी आलू म्हणजे बटाटा, ह्याची असते. हे बटाटे रताळ्यासारखे पिठूळ लागतात. उघड्यावर पंगत बसून अर्धी अधिक जेवणें होत आलीं होतीं, तेव्हां चांगलें खडखडीत ऊन पडलें होतें. आभाळ निरभ्र होतें. तों एकदम गारांचा वर्षाव झाला. पांच मिनिटांत वीतभर गारांचा खच झाला. त्या गारा हरबऱ्यापासून सागरगोट्या एवढाल्या होत्या. त्या जोंधळ्याच्या लाह्यांप्रमाणें अगदीं हलक्या व कोरड्या होत्या. त्यांच्याबरोबर किंवा आगें मागें पाण्याचा एक थेंबटाहि पडला नाहीं किंवा ऊनहि गेलें नाहीं. जिकडे पाहावें तिकडे पांढरेच पांढरे होऊन चमकूं लागलें. आम्हांस ही एक विचित्र घटना पाहून गंमत वाटली, पण जेवणारांना अर्धपोटीं उठावें लागलें आणि भोजन घालणाराचा येवढा खर्च व श्रम करूनच्या करून विरस झाला. ह्या उंचीवरील हवा अगदीं बेभरंवशाची व लहरी असते ती ही अशी!

पुजारी म्हणजेच रावळ

केदारचे मुख्य पुजारी यास रावळ म्हणतात. ते म्हणजे एक संस्थानिक वा जहागिरदारच होऊन बसलेले आहेत. ते स्वतः पूजा करीत नाहींत. शिष्याकरवीं तें काम चालवितात. ते म्हैसूरकडील नंबुद्री ब्राह्मण असावेत. ते नेहमीं उखीमठ येथें राहातात. थंडीच्या दिवसांत बर्फ पडतें तेव्हां सहा महिने केदारची गद्दी तेथें असते. गढवाल, अल्मोरा व नैनीताल जिल्ह्यांत दोन हजार रुपये साऱ्याचे गांव केदार संस्थानच्या मालकीचे आहेत. दरवर्षी यात्रेचें उत्पन्न दहा पंधरा हजार रुपयांच्या वर असतें.

प्रदोष पूजा

केदार येथें पोहोंचण्याचा दिवस योजनापूर्वक आगाऊ ठरविलेला नव्हता. योगायोगानें त्या दिवशीं एकादशी होती; आणि सुदैव हेंच कीं, दुसऱ्याच दिवशीं प्रदोष आला होता.

एकादशीस पंड्यांच्या पुरस्काराशिवाय केदारलिंगाची पूजा केली.

पंड्यांचा हात सोडल्यामुळें एका बाजूस बसून पूजा करावी लागली. पण त्यांत स्वस्थपणा मिळाला. आवर्तनपूर्वक पण अभिषेकाशिवाय पूजाअर्चा, आरती, देवे मंत्रपुष्प स्तोत्रें वगैरे करण्यास सव्वा दीडतास लागला. पुढून पूजा करावयाची म्हटलें तर एका पाठीं एक 'क्यू'– बारी लागलेली असते.

दुसरे दिवशीं अनायासें प्रदोषाचा योग साधत असल्याकारणानें एक दिवसाचा निवास वाढविला. प्रदोष–पूजा नेहमींच्या पद्धतीनें सोवळ्यानेंच करण्यासाठीं जर्सी, शालसुद्धां धुवून वाळवली. प्रदोषाचे दिवशीं उपोषण असतें. प्रदोषपूजा होईपर्यंत संबंध दिवस तेव्हां मी मौन पाळीत असें. ह्यामुळें त्या दिवशींचा कार्यक्रम आदले दिवशीं निश्चित करून ठेविला होता.

शुक्रवार ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी श्रीकेदारनाथाचे पूजेकरितां प्रदोष-काळीं देवळांत गेलों. पाहातों तों महाद्वारच बंद. आश्चर्य वाटलें. संध्याकाळची वेळ, थंडी मी म्हणत होती, आसपास कोणी माणूसहि फिरकत नव्हते. माझें मौन. जाऊन कोणाजवळ विचारपूस करीन तर स्वतःच तोंडास कुलूप अडकवून तेंहि बंद करून ठेविलेलें होतें. सौभाग्यवतीनें आपल्याकडून चौकशी करण्याची खटपट करून पाहिली. पण तिचें म्हणणें कोण ऐकणार. एका पंड्यानें सांगितलें कीं दरवाजे दिवेलागणीनंतर उघडतील. इकडची अशीच चाल आहे.

बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एका स्थानीं, प्रदोषपूजेची अनायासें वाढून आलेली संधि हातची गमावणार म्हणून अतिशय वाईट वाटलें. जों जों वेळ जाऊं लागला तों तों तळमळ वाढून अस्वस्थ होऊ लागलों. प्रदोषपूजेची वेळ चुकणार. उपाय तर कांहीं सुचेना. दोष तरी कोणास देणार ! हातातोंडाशीं आलेला घास आयत्या वेळीं हातांतून गळून पडण्याच्या भीतीनें गहिंवरून गेलों. पण रडून काय होणार ! म्हणून मनोमय शरणागती पत्करली. त्यायोगें केदारनाथास करुणा येऊन त्यानें रावळास प्रेरणा करून दरवाजे उघडण्याची बुद्धि द्यावी इतकी पुण्याई आपल्या गांठीं कोठें आहे ! ही जाणीव मनाला बोचत होतीच. हताश होऊन गेलोंच होतों. इतक्यांत कल्पना सुचली कीं, अडचणीच्या प्रसंगीं देवळाचें शिखर-दर्शन घेणें, तसेंच उंबरठ्या-

वरच पूजा करणें ह्या गोष्टीहि प्रत्यक्ष देवाचें दर्शन घेणें व त्याचें पूजन करणें ह्याच योग्यतेच्या आहेत. आपला तसा भाव असला म्हणजे झालें.

श्री केदारनाथाची पूजा लिंगा ऐवजी उंबरठ्यावर

ह्या विचारानें उदासीनतेचें पटल निघून गेलें आणि पूर्ववत् उत्साह वाटूं लागला. महाद्वारापुढेंच पायरीवर आसन ठोकलें. उंबरठा स्वच्छ धुऊन पुसून कोरडा केला. त्यावर केदारनाथाचें आवाहन करून अभिषेकपूर्वक षोडशोपचार पूजा केली. स्तोत्रें म्हटलीं, आरती केली. नेहमींप्रमाणें प्रसन्नता वाटली. आम्हीं आरती करीत असलेलें पाहून इतर कांहीं यात्रींनींहि आपआपले काकडे तेथेंच पेटविले.

हा उंबरठापूजनाचा प्रसंग किरकोळ म्हणून विसरूनहि गेलों होतों. त्यांत कांहीं विशेष होतें ही कल्पना मनाला शिवलीसुद्धां नव्हती. चार वर्षांनंतर नेपाळांत जाऊन श्रीपशुपतीचें दर्शन घडण्याचा योग लाभला. त्यामुळें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक जें केदारलिंग त्याची अपूर्ण राहिलेली यात्रा श्रीपशुपतिदर्शनानें पूर्ण झाली.

उंबरठा पूजनानें अघटित घटना

नेपाळांतून परततांना काशीस येऊन श्रीविश्वेश्वराचे दर्शनाची संधि अनायासें साधून घेतां आली. नेपाळांत जातांना काशींतूनच गेलों होतों, परंतु तेथें थांबण्यास वेळ नव्हता, म्हणून श्रीविश्वेश्वराचें उभ्याउभ्याच दर्शन घेऊन पुढें जावें लागलें होतें. परंतु ह्यावेळीं स्वस्थपणानें चार दिवस राहून त्रिस्थळीहि करण्याचा विचार होता. परंतु 'कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें' अशी स्थिति झाली. मोहरम पार पडला आणि शिमग्याच्या सणास खो घालण्यासाठीं मुसलमानांनीं दंगे उपस्थित केले. गोळीबार झाले. संचारबंदी झाली, आणि आम्ही स्वस्थपणें त्रिस्थळी करण्याऐवजीं अस्वस्थपणें एकाच स्थळीं अडकून पडलों. अशाहि स्थितींत एक अघटित व म्हणूनच चिरस्मरणीय प्रसंग घडून आला. त्याचा संबंध उंबरठ्याशीं येतो म्हणून तो येथें उल्लेखनीय वाटतो.

शके १८६१ च्या फाल्गुन शुद्ध एकादशीस हा प्रसंग घडून आला. ह्या एकादशीस काशींत श्रृंगारी एकादशी म्हणतात. त्या दिवसाचें

वैशिष्टय म्हणजे आपलेकडे त्रिपुरी पौर्णिमेस देवळोंदेवळीं पूजन-अर्चन होऊन जसा दीपोत्सव होतो त्याप्रमाणें तो काशींत होत असतो. त्या दिवशीं रात्रभर श्रीविश्वेश्वराचे व इतर अन्नपूर्णा–भैरवादि देवांचें दर्शन घेण्यासाठीं बायका, मुलें, पुरुष ह्यांनीं रस्ते गजबजून गेलेले असतात. काशींतील एकहि माणूस विश्वेश्वराचें दर्शन त्या रात्रीं अगदीं उजाडेपर्यंत तरी घेतल्याशिवाय राहात नाहीं.

शिवरात्रीचे दिवशीं अहोरात्र विश्वेश्वरास केव्हांहि येऊन पाणी घालावें, त्यास बंदी नाहीं. त्या दिवशीं महापूजा नाहीं. ती अंतरलेली पूजा शृंगारी एकादशीस होते. काशीराजे स्वत: येऊन ती महापूजा दुपारीं दोन वाजण्याचे सुमारास करितात. मोठाच समारंभ असतो, थाटमाट एकदां पाहण्यासारखा असतो. हा समारंभ जवळून पाहण्यासाठीं तुम्ही दोन वाजण्याचे अगोदरच देवळांत येऊन जागा धरून बसा. अनायासें आज तुम्ही येथें आहांत. चांगला योग आहे. येथील उत्सवाचा थाट तुम्हांस दिसेल. असें एक काशीकर महाराष्ट्रीय भटजी मी ब्रह्माघाटावर स्नानास गेलों असतां मला मोठ्या आपुलकीनें म्हणाले.

त्यांची आस्था, अगत्य पाहून मी 'बरें आहे, येईन' म्हटलें. वास्तविक रेटारेटी करीत दाटीमध्यें जाऊन दर्शनाचा लाभ होण्याऐवजीं धक्काबुक्कीचा प्रसाद मात्र मिळतो, आणि देवापुढून जातां जातां काय धावतें पळतें दर्शन होईल तेवढ्यावर समाधान मानून घ्यावें लागतें. दुसरें असें कीं पूजेचा थाटमाट, सुवर्णाचे मुखवटे, चांदीचें सिंहासन, देव्हारा, हिरे–माणके–पाच जडीत सुवर्णालंकार, मोत्याचे हार व कंठे पाहून दिपून जावें आणि त्यामुळें देवतेविषयीं भावभक्ति अधिक वाढावी किंवा ती तेथें स्थिर व्हावी असा माझा काळ कधींच निघून गेलेला होता. अलंकारादि उपचारांनीं ऐश्वर्याच्या शोभेची भर पडून प्रसन्नता वाढते हें खरें असलें तरी देवतेकडचें लक्ष उडून थाटमाटाकडेच वेधलें जातें. चर्मचक्षूंनीं दर्शन घेतांना तें अंतश्चक्षूंनाहि घडेल असें मनस्वास्थ्यहि असावें लागतें. अशा तऱ्हेची माझी समजूत असल्याकारणानें मीं येण्याविषयीं दिलेला रुकार मनापासूनचा नव्हता. त्यांनाहि शंका आलीच असावी म्हणून त्यांनीं पुन्हां

बजावून सांगितलें कीं 'याच बरें का ! संधि घालवूं नका.'

आम्ही नेपाळहून परत आलों ते वेळीं एक पटवर्धन शास्त्री, हे नेहमीं गाणगापुरीं सेवा करीत असतात, आमचे आधारानें काशीस आले होते. त्यांना काशीची चांगली माहिती होती. काशी पाहण्यास त्यांचा चांगला उपयोग होईल म्हणून आमचा तेथें वास असेपर्यंत त्यांस प्रत्यहीं दोन्ही वेळ आमचेकडे जेवणास ठेवून घेतलें होतें. ते जेवणास बहुतेक एकच वेळ दुपारचे येत. गरज भासली तर संध्या-काळीं येत, किंवा आम्हांस कोठें जावयाचें असेल तर माहीतगार वाटाडे म्हणूनहि येत.

गंगेवरून घरीं परत आल्यानंतर त्यांची गांठ पडली तेव्हां घाटा-वर समजलेली उत्सवाची वार्ता त्यांस सांगितली. त्यांनीं तीस दुजोरा देऊन म्हटलें कीं आज आखी रात्र काशी शहर जागें असलेलें आढळेल. उजाडेपर्यंत रस्ते फुललेले असतात. विश्वेश्वराचें दर्शन घेतल्याशिवाय चिटपाखरूंहि राहात नाहीं.

मीं त्यांस म्हटलें कीं, त्या भटजींनीं मला दुपारींच देवळांत जाऊन बसण्यास सांगितलें आहे. पण मला तो विचार मानवत नाहीं. ते म्हणाले, 'कां ?' मीं सांगितलें, विश्वेश्वराचें देऊळ म्हणजे अजमासें औरस चौरस दोन खणापेक्षां थोडें मोठें. त्यांत माणसें मावणार तीं किती ? तेथें काशीचा राजा येणार, म्हणजे त्याचे बरोबर त्याचे कारभारी, कारकून, पुजारी, बायकामुलें आणि तेथील मानकरी पंडे वगैरेंचा परिवार येणारच. तेथें आमची हो काय डाळ शिजणार ? तेथें गेल्यानें तो आल्या गेल्याची स्वारी दिसेल. म्हणून कांहीं पूजेचा सोहळा दिसणार नाहीं. तेथें जाऊन दाटींत भर घालण्याइतकी माझी आतुरता नाहीं. म्हणून मी म्हणतों आपण उत्तर रात्रीं दर्शनास जाऊं. तेव्हां माणसांची रीघहि पातळ होईल आणि स्वस्थपणें दर्शन तरी घडेल. शास्त्रीबोवांनीं इतक्या उशीरां येण्यास थोडे आढेवेढे घेतले. माझी अडचण मीं त्यांस सांगितली कीं काशींतील ह्या गल्ल्या, बोळ मला दिवसासुद्धां अजून माहित झालेल्या नाहींत. त्यांतून रात्रभर चकरा घातल्या तरी आपलें बिऱ्हाड मला सांपडणार नाहीं. म्हणून आमच्याकरितां तुम्हास थोडी तोशीस घ्यावी लागणार आहे. त्यांनीं

वैशिष्टय म्हणजे आपलेकडे त्रिपुरी पौर्णिमेस देवळोंदेवळीं पूजन-अर्चन होऊन जसा दीपोत्सव होतो त्याप्रमाणें तो काशींत होत असतो. त्या दिवशीं रात्रभर श्रीविश्वेश्वराचे व इतर अन्नपूर्णा—भैरवादि देवांचें दर्शन घेण्यासाठीं बायका, मुलें, पुरुष ह्यांनीं रस्ते गजबजून गेलेले असतात. काशींतील एकहि माणूस विश्वेश्वराचें दर्शन त्या रात्रीं अगदीं उजाडेपर्यंत तरी घेतल्याशिवाय राहात नाहीं.

शिवरात्रीचे दिवशीं अहोरात्र विश्वेश्वरास केव्हांहि येऊन पाणी घालावें, त्यास बंदी नाहीं. त्या दिवशीं महापूजा नाहीं. ती अंतरलेली पूजा शृंगारी एकादशीस होते. काशीराजे स्वतः येऊन ती महापूजा दुपारीं दोन वाजण्याचे सुमारास करितात. मोठाच समारंभ असतो, थाटमाट एकदां पाहण्यासारखा असतो. हा समारंभ जवळून पाहण्या-साठीं तुम्ही दोन वाजण्याचे अगोदरच देवळांत येऊन जागा धरून बसा. अनायासें आज तुम्ही येथें आहांत. चांगला योग आहे. येथील उत्सवाचा थाट तुम्हांस दिसेल. असें एक काशीकर महाराष्ट्रीय भटजी मी ब्रह्माघाटावर स्नानास गेलों असतां मला मोठ्या आपु-लकीनें म्हणाले.

त्यांची आस्था, अगत्य पाहून मी 'बरें आहे, येईन' म्हटलें. वास्तविक रेटारेटी करीत दाटीमध्यें जाऊन दर्शनाचा लाभ होण्या-ऐवजीं धक्काबुक्कीचा प्रसाद मात्र मिळतो, आणि देवापुढून जातां जातां काय धावतें पळतें दर्शन होईल तेवढ्यावर समाधान मानून घ्यावें लागतें. दुसरें असें कीं पूजेचा थाटमाट, सुवर्णाचे मुखवटे, चांदीचें सिंहासन, देव्हारा, हिरे—माणके—पाच जडीत सुवर्णालंकार, मोत्याचे हार व कंठे पाहून दिपून जावें आणि त्यामुळें देवतेविषयीं भावभक्ति अधिक वाढावी किंवा ती तेथें स्थिर व्हावी असा माझा काळ कधींच निघून गेलेला होता. अलंकारादि उपचारांनीं ऐश्वर्याच्या शोभेची भर पडून प्रसन्नता वाढते हें खरें असलें तरी देवतेकडचें लक्ष उडून थाटमाटाकडेच वेधलें जातें. चर्मचक्षूंनीं दर्शन घेतांना तें अंतश्चक्षूंनाहि घडेल असें मनस्वास्थ्यहि असावें लागतें. अशा तऱ्हेची माझी समजूत असल्याकारणानें मीं येण्याविषयीं दिलेला रुकार मना-पासूनचा नव्हता. त्यांनाहि शंका आलीच असावी म्हणून त्यांनीं पुन्हां

बजावून सांगितलें कीं ' याच बरें का ! संधि घालवूं नका. '

आम्ही नेपाळहून परत आलों ते वेळीं एक पटवर्धन शास्त्री, हे नेहमीं गाणगापुरीं सेवा करीत असतात, आमचे आधारानें काशीस आले होते. त्यांना काशीची चांगली माहिती होती. काशी पाहण्यास त्यांचा चांगला उपयोग होईल म्हणून आमचा तेथें वास असेपर्यंत त्यांस प्रत्यहीं दोन्ही वेळ आमचेकडे जेवणास ठेवून घेतलें होतें. ते जेवणास बहुतेक एकच वेळ दुपारचे येत. गरज भासली तर संध्याकाळीं येत, किंवा आम्हांस कोठें जावयाचें असेल तर माहीतगार वाटाडे म्हणूनहि येत.

गंगेवरून घरीं परत आल्यानंतर त्यांची गांठ पडली तेव्हां घाटावर समजलेली उत्सवाची वार्ता त्यांस सांगितली. त्यांनीं तीस दुजोरा देऊन म्हटलें कीं आज आखी रात्र काशी शहर जागें असलेलें आढळेल. उजाडेपर्यंत रस्ते फुललेले असतात. विश्वेश्वराचें दर्शन घेतल्याशिवाय चिटपाखरुंहि राहात नाहीं.

मीं त्यांस म्हटलें कीं, त्या भटजींनीं मला दुपारींच देवळांत जाऊन बसण्यास सांगितलें आहे. पण मला तो विचार मानवत नाहीं. ते म्हणाले, 'कां ?' मीं सांगितलें, विश्वेश्वराचें देऊळ म्हणजे अजमासें औरस चौरस दोन खणापेक्षां थोडें मोठें. त्यांत माणसें मावणार तीं किती ? तेथें काशीचा राजा येणार, म्हणजे त्याचे बरोबर त्याचे कारभारी, कारकून, पुजारी, बायकामुलें आणि तेथील मानकरी पंडे वगैरेंचा परिवार येणारच. तेथें आमची हो काय डाळ शिजणार ? तेथें गेल्यानें तो आल्या गेल्याची स्वारी दिसेल. म्हणून कांहीं पूजेचा सोहळा दिसणार नाहीं. तेथें जाऊन दाटींत भर घालण्याइतकी माझी आतुरता नाहीं. म्हणून मी म्हणतों आपण उत्तर रात्रीं दर्शनास जाऊं. तेव्हां माणसांची रीघहि पातळ होईल आणि स्वस्थपणें दर्शन तरी घडेल. शास्त्रीबोवांनीं इतक्या उशीरां येण्यास थोडे आढेवेढे घेतले. माझी अडचण मीं त्यांस सांगितली कीं काशींतील ह्या गल्ल्या, बोळ मला दिवसासुद्धां अजून माहित झालेल्या नाहींत. त्यांतून रात्रभर चकरा घातल्या तरी आपलें बिऱ्हाड मला सांपडणार नाहीं. म्हणून आमच्याकरितां तुम्हास थोडी तोशीस घ्यावी लागणार आहे. त्यांनीं

किती दूर आहे. त्यानें सांगितलें कीं जवळ आहे. डावे हातास वाट फुटेल तेथें वळून पुढें पायऱ्या उतरून गेलांत म्हणजे मशिदीपुढें जाल. तेथेंच शेजारीं देऊळ आहे. त्यानें विचारलें कीं तुम्ही तेथें कशा- करितां जात आहांत. मीं म्हटलें 'दर्शना करितां'. तो म्हणाला, 'दर- वाजे बंद झाले. आम्ही तेथेंच पहाऱ्यावर होतों. दंग्याधोप्याच्या भीतीमुळें यंदा यात्रा लवकर बंद करावी लागली आहे आणि म्हणून तर आमची कामावरून सुटका झाली आहे. आतां तेथें जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. परत फिरा व उद्यां दर्शन घ्या.' मीं म्हटलें येथपर्यंत त्या हेतूनें आलोंच आहोंत तर शिखराचें दर्शन घेऊन परतूं.

त्यानें सांगितल्याप्रमाणें आम्ही पायऱ्या उतरून गेलों तों तेथें शुकशुकाट. तीन चार तासांपूर्वी केवढा जनसंमर्द लोटून कल्लोळ माजला होता तेथें आतां अगदीं सामसूम. नंदीपाशी गेलों तों हातांत डोक्याच्या उंचीच्या काठ्या, अंगांत पांढरे स्वच्छ कोरेकरकरीत सद्रे, डोक्यांस त्या पातळ काशीच्या लांबट टोप्या, कपाळीं गुलाल फास- लेला आणि गळ्यांत फुलांच्या माळा असलेले असे चार पांच पुरभय्ये आम्हास आडवे आले. आणि म्हणाले कीं, 'कोठें चालला?' मीं सांगितलें कीं, विश्वनाथाचें दर्शन घेण्यास जातों. ते म्हणाले टाळा लागला आहे. परत फिरा. तुम्ही परस्थ दिसतां. आमचे बरोबर चला. आम्हां- सहि टाळा लागला म्हणून दर्शनाशिवाय परत जावें लागत आहे. मीं म्हटलें शिखरदर्शन घेऊन परततों. त्यांना आमचे विषयीं कांहीं तरी शंका आली असावी म्हणून आमची टिंगल करून ते हसत हसत निघून गेले.

नंदीचे पुढें गेल्यावर उजवे हातास ज्ञानवापी मंडप व त्याला लागूनच अलिकडे मंदिरांत जाण्याचा दरवाजा. त्यावर व आसपास वृक्षाची सावली आलेली होती. तेथून शिखर–दर्शन झालें नाहीं म्हणून दरवाजापाशीं•उंबरठ्यास नमस्कार करण्यासाठीं गेलों. फटी- तून आंत उजेड दिसतो कां, कांहीं आवाज ऐकूं येतो कां, म्हणून बारकाईनें कानोसा घेऊन पाहिलें. पण कसलीच चाहूल लागेना. दरवाजा जाडजूड असून त्यास फटबिट कांहीं नव्हती. तो घट्ट लागला होता. हलतसुद्धां नव्हता. तेथें आसपास कोणीहि माणूस नव्हतें.

आम्ही दोघेच होतों. तरी मनास भयभिती किंवा शंकाकुशंका कशी ती शिवली सुद्धां नाहीं. आल्यासारखे देऊळ सांपडलें आणि विश्वेश्वराचें नाहीं तर त्याच्या देवळाचें व उंबरठ्याचें तरी दर्शन घडत आहे, ह्या समाधानांत होतों.

आम्हीं दोघेहि उंबरठ्यापुढें हात जोडून उभें राहिलों आणि विश्वेश्वराला नमस्कार करण्यापूर्वीं त्याचें ध्यान मनांत आणण्यासाठीं 'ध्याये नित्यं महेशं' हा श्लोक म्हटला, आणि उंबरठ्याला हात लावून नमस्कार करणार इतक्यांत एक अपरिचित आवाज वरून ऐकूं आला कीं, 'क्यं दर्शन लेना चहाता है,' मी वाकलेला होतों त्या स्थितींतच मान उजवीकडे वळवून वर पाहिलें. मला एक माणूस दिसला. तो काळा, दाढीमिशा बोटभर वाढलेल्या, डोक्यावरील केसांच्या झिपऱ्या असलेल्या, अंगांत एक फाटका, विटकर काळा कोट घातलेला, भडभुंज्यासारखें मळकट पंचेवजा धोतर नेसलेला, धोतर गुडघ्यापर्यंतच आलेलें होतें, पुरापुर उंचीचा, म्हणजे त्याची उंची साडेसहा फूट तरी असावी, कारण माझी उंची पांच फूट दहा इंच आहे. मी ओणवा असतांना तो माझ्यावर ओणवून बोलला, तेव्हां आमच्यांत हातभर तरी अंतर होतें. शिवाय तो माझ्या पाठीशीं उभा होता तोहि वीत दीड वीत अंतर टाकून माझ्या मागें उभा होता. त्याचें डोकें माझ्या डोक्यावर पण तितकेंच पुढे आलेलें होतें. माणूस काटकिळाच होता. त्याचें तोंड दिसतांच मीं त्यास म्हटलें कीं, 'हां, जी । दर्शन लेना चहाता हूं ।' त्यावर तो लगेच म्हणाला, 'चलो मेरे साथ ।' हे शब्द कांनीं पडतांच मीं म्हटलें, 'अच्छा है, चलो ।' तो पुढें आणि त्याचे मागें मी व माझे मागें सौभाग्यवती. त्या दरवाजाचे डावे बाजूस पांच पन्नास पावलें जाऊन वळलों. ती एक वावभर रुंदीची गल्लीच होती. दोन्ही कडेचे घरांत दुकानें असावींत. त्यांच्यापुढें दुकानांच्या पुढें अडव्या वीत दीडवीत रुंदीच्या फळ्या असतात त्याप्रमाणें होत्या. शिवाय काढत्या घालत्या फळ्या लावून दुकानें बंद करतात त्याप्रमाणें फळ्या लावून त्यास आडवे गज घालून कुलपें लावलेलीं होतीं. हें पाहून जातां जातां मी सौभाग्यवतीस म्हटलें कीं ही बाजारपेठ आहे बरे कां ? किती अरुंद रस्ता आहे! आम्ही पांचसात मिनिटांत त्या गल्लींतून बाहेर

पडलों असूं. उजवीकडे वळून थोडे पुढें गेलों तों विश्वेश्वराच्या देवळाचा पुढील दरवाजा सताड उघडा होता. त्या माणसाच्या मागोमाग आम्ही आंत गेलों. देवळाशीं येईपर्यंत किंवा घरीं परत पोहोचेपर्यंत आम्हास वाटेंत कोणीहि भेटलें नव्हते. देवळांत आरती करणाराशिवाय अन्य कोणीहि नव्हते. दिपोत्सवानिमित्त शेंकडो विजेचे दिवे व त्यांच्या माळा लावल्या होत्या. जिकडे तिकडे दिव्यांचा लखलखाट दिसत होता. चांदणें लख्ख पडलेलें होतें, पण दिव्यांच्या झगझगीत प्रकाशा-पुढे तें लोपून गेलें होतें. विश्वेश्वराच्या गाभाऱ्यास चारहि बाजूस दरवाजे आहेत. गाभाऱ्याच्या उजवे हाताच्या दरवाजापाशीं एक तद्देशीय पेहरावाची सुवासिनी उभी होती. सौभाग्यवतीस तिचे जवळ जाऊन उभें राहाण्यास सांगितलें आणि मी सभामंडपांत देवाकडे तोंड करून उभा राहिलों. तेथें गाभाऱ्याच्या दरवाजावर एक मोठें घडचाळ होतें, त्यांत बरोबर दोन वाजले होते. देवघरांत विश्वेश्वराच्या लिंगाचे वर एक घडवंचीवजा उंच पायाचें चांदीचें सिंहासन ठेवून त्यावर दोन सोन्याचे मुखवटे मांडलेले होते. वस्त्रालंकार पुष्पमाळांची सजावट यथेच्छ होती. गाभाऱ्यांत एकटा पुजारीच होता. त्याचे हातांत मोठें थोरलें पंचारतीपात्र होतें व तें तो आरतीच्या दर पालुपदाचे वेळीं देवावरून तीनदां ओवाळी. गाभाऱ्याबाहेर सभामंडपांत दरवाजाचे दोन्ही बाजूस एका बाजूंस पांच व दुसऱ्या बाजूस सहा अशी अकरा मंडळी समोरासमोर तोंडें करून आरती म्हणत होती. कोणाचे हातांत चिपळ्या, कोणाचे हातांत टाळ, कोणाचे हातांत ढोल, एकाच्या गळ्यांत पखवाज, इतरांच्या नुसत्या टाळयाच अशा साथीनें ठेक्यांत आरती चालली होती. स्वर चांगलाच उंचावलेला होता व म्हणणारांचा लय लागला होता. पखवाजवाला म्हातारा दाढीवाला होता. तो उघडाच होता. आरती म्हणून वाजवतांना रंगांत येऊन हातांबरोबर त्याचें मानेचे, खांद्याचे, 'कंबरेचे व पायांचेहि विक्षेप ठेक्यांत होत होते. तो घामाघूम होऊन निथळत होता. आमचे अगोदर आरती किती वेळ होत होती हें माहित नाहीं. पण ती अडीच वाजेपर्यंत चालू होती. इतर मंडळहि अशीच रंगून गेलेली दिसली. आरतीचें पालुपद थोडेसें आठवतें. तें असें:—'शिवहरा ओंकारा.'

आरती संपली, धुप्यानें मंत्रपुष्पाकरितां फुलें गुलाल आणून दिला. सर्वांनीं एका मागे एक आंत जाऊन देवास पुष्पांजली वाहिली. त्यांत मलाहि संधि मिळाली. त्यानें देवावरचीं फुलें व त्यांतच साखरफुटाणे होते असा ओंझळ ओंझळ प्रसाद दिला. त्यानंतर ती सर्व मंडळी बाहेर पडली. त्यांचे बरोबर आम्हीहि बाहेर पडलों आणि आमचे मागोमाग दरवाजा बंद झाला.

आम्ही उजवीकडे वळून पुढें जात असतांना वाटेचे डावे अंगास एक दरवाजा उघडला. त्यांतून डोक्यावर एक पेटी घेतलेला इसम व त्याचे बरोबर दोन पहारेकरी शिपाई बाहेर पडले. आंत झगझगीत उजेड होता व तें एक देऊळ आहे असें पाहून आम्ही आंत शिरलों. तें देवीचें देऊळ होतें. सर्व वस्त्रालंकार उतरलेली निर्वाण मूर्ति होती. पुढें हळदीकुंकवाचा सडा पडला होता. दर्शन घेऊन बाहेर पडलों मात्र तों दरवाजें लावले.

आम्ही न चुकतां बिऱ्हाडीं परत आलों. दुसऱ्याच दिवसापासून काशींत दंगा उसळला. संचारबंदी झाली. पांच सहा दिवस तेथें अडकून पडलों. कशी तरी सुटका करून घेऊन तेथून निघालों. गया, प्रयाग, अयोध्या, हरद्वार, मथुरा, वृंदावन, दिल्ली, आग्रा करीत करीत परत आलों.

तेव्हां पुण्याची सकाळची गाडी मिळण्याकरितां कल्याण येथें दोन तास थांबावें लागलें होतें. त्या अवधींत गांवांत बहिणीकडे जाऊन स्नानादि विधि उरकून स्थानकावर आलों. तेथें स्थानकावर पुण्याच्या गाडीची वाट पाहात, मीं ज्यांना पूज्य समजतों असें माझे एक अकारण झालेले स्नेही, रा. ब. अण्णासाहेब वैद्य येरझाऱ्या घालीत होते. आम्ही पुलावरून येत असतांना त्यांना दिसलों. म्हणून ते जिन्यापाशीं येऊन उभे होते. आमची गांठ पडतांच त्यांनीं मला मिठीच मारली. केव्हां आलां, कशी काय यात्रा झाली वगैरे विचारपूस होत आहे, तों गाडी आलीच. आम्ही एकत्रच बसून निघालों. एकंदर सर्व दोन महिन्यांतील निघाल्यापासूनचें प्रवासवृत्त सांगितलें. त्यांत काशीचा झालेला प्रकार येऊन गेलाच होता.

त्यांनीं मला प्रश्न केला कीं, त्या इसमाचे मागोमाग तुम्ही विश्वे-

श्वरांचे देवळांत जाऊन देवापुढें उभें राहिलांत. त्यानंतर तो तुम्हांस पुन्हां केव्हां दिसला? मला कांहींच आठवेना. त्याच्या मागोमाग देवळांत गेलों येथपर्यंतची आठवण चांगली होती. पुढची आठवण होणारच कशी? तो इसम पुन्हां आम्हांस दिसलाच नव्हता आणि त्याची नुसत्या शिष्टाचाराकरितां तरी गांठ घ्यावी ही बुद्धि तेव्हां झाली नव्हती. दर्शन घेण्याचें एकच ध्येय डोळचांपुढें होतें. तें काम साधलें आणि 'गरज सरो आणि वैद्य मरो' असा दोष येण्यास अजाणता, अनिच्छेनें कां होईना जागा झाली आहे. वास्तविक काशीसारख्या परस्थ ठिकाणीं तेथील पंडचांच्या अडवाअडवी, कोंडमारा करून पैसे उकळण्याच्या क्लृप्त्या माहीत असतांना, अपरात्रीं, मी एकटा नव्हें तर बरोबर सौभाग्यवती असतांना, एका अनोळखी, गबाळग्रंथी माणसाबरोबर, आणि तोहि एकदम तितका विश्वासार्ह न दिसणारा, अशा माणसाच्या शब्दावर विश्वासून त्याचे मागें मी चुकून सुद्धां जावयाचा नाहीं. असा मी गेलों असेन असें माझ्या स्वभावाची माहिती असलेला कोणीहि खरें मानणार नाहीं. मी साखर सोलण्याइतकी चिकित्सा करतों असा माझ्यावर माझ्या आप्तस्नेहीमंडळींचा आरोप आहे. त्यांच्या आरोपांत सत्यांश नाहीं असें मी म्हणत नाहीं. पण त्यावेळीं मीं भारला गेलों, अंधळा झालों, वेडा बनलों, काय वाटेल ते म्हणा! मी पाठोपाठ मुकाटचानें गेलों ही गोष्ट खरी आहे.

मला तो इसम पुन्हां भेटल्याचेंच काय पण पुन्हां देवळांत सुद्धां पाहिल्याचें लक्षांत येईना. माझ्या दृष्टीस पडला नसेल म्हणून सौभाग्यवतीस विचारलें. ती म्हणाली मला त्याचें तोंड सुद्धां दिसलेलें नाहीं. तुमच्या पुढें तो होता आणि तुमच्या मागें मीं होतें. मला दिसणार कसा?

अण्णासाहेब म्हणाले, 'काय हो संधि घालविलीत. तेथेंच पाय धरावयाचे.' त्यानीं असे उद्गार काढल्यावर माझ्या मनांत प्रकाश पडला कीं, ही गोष्ट दिसली इतकी साधीसुधी काकतालीयन्यायाची नाहीं. तिच्यांत सहज न पटणारें वैशिष्टच आहे. अण्णासाहेबांस म्हटलें कीं, तुम्ही विचारीपर्यंत ह्या घटनेचें रहस्य कळलें नव्हतें. त्यावर तुम्ही प्रकाश पाडला आहे.

ह्यानंतर संतकवि दास गणू महाराज व ज्ञानेश्वरीचे एकनिष्ठ

उपासक ह. भ. प. कै. केशवराव देशमुख ह्यांनीं अशाच प्रकारचें रहस्य-दर्शन केलें. त्यामुळें विचार सुचतो कीं ज्या निष्ठेनें प्रदोषकालीं श्रीकेदारनाथाचा उंबरठा पुजला त्या निष्ठेनेंच विश्वनाथ दर्शनाचें फल त्याच्या उंबरठ्यावरच प्रतीत झाले. ह्या वृत्तांतांतील घडलेल्या गोष्टी यथातथ्य दिल्या आहेत. त्यावर हवीं तेवढीं भाष्यें करावींत.

बदरीकेदारच्या कर्कश थंडीची असह्य तीव्रता वाटून परत मार्गीं लागण्यास पाय उचलण्याचा विचार केला खरा, पण तेथील त्या दिव्य नि भव्य गिरीवरील एकांतपूर्ण व रमणीय कैवल्यधामांतून तो पुढें पडेचना. मागील दोन्ही धामांच्या ठिकाणींहि असाच प्रकार घडला होता. पण येथें मात्र मन फार घोटाळलें. तासभर ओढाताण करतां करतां एकदाचा निर्णय ठरविला कीं, येथें थांबता येणार नाहीं. घरचीं क्षेमकुशलाचीं पत्रें मिळून चित्त स्वस्थ झालें होतें. मागें कसली काळजी किंवा निकड राहिलेली नव्हती. त्यामुळें चार आठ दिवस तरी येथून हलूं नये असें वाटत होतें. पण पावसाळा डोक्यावर उभा राहिलेला आणि बोजेवाल्यास पावसाळारंभापूर्वीं सोडण्याचा करार, ह्या कारणांनीं येथून हलण्याचा बेत करणें भागच झालें. मग मनाचें समाधान करून घेतां आलें कीं, तीन धामांच्या यात्रा निर्विघ्नपणें पदरांत पडल्या आहेत, हा काय थोडा लाभ झाला आहे ? शिवाय खरीच तितकी तळमळ असेल तर पुन्हां योग येईल.

पहाटेसच शिखरदर्शन घेतलें. निघतांना मनोमय निरोप घेऊन त्रिवार नमनपूर्वक प्रार्थना केली:– ‘नमो रुद्रेभ्यो ये पृथिव्यां येऽतरिक्षे ये दिवि येषामन्नं वातो वर्षमिषवस्तेभ्यो दश प्राचीर्दश दक्षिणा दशप्रतीचीर्दशोदीची र्दशोर्ध्वास्तेभ्यो नमस्ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तं वो जम्भे दधामि । ’

# हिमालयदर्शन

भाग ४ था

## बदरीनारायण

# हिमालयदर्शन



## मार्ग बदरी नारायणाकडे

बदरी केदार येथें येऊन राहण्यास तपश्चर्येची केवढी पुण्याई पाठीशीं असावी लागते ह्याची कल्पना पटली. कारण दोन दिवसांच्या निवासांतच " क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति " ची पाळी आली. जें अंतर चढून येण्यास दोन दिवस लागून अति प्रयास पडले होते, तेंच अंतर तेथून निघाल्यानंतर वरून सुटलेल्या धोंड्याप्रमाणें घरंगळत अवघ्या पांच तासांतच सहज उतरलों. ह्याच अवधींत गौरीकुंडावर स्नान-संध्यादि नित्यकर्म उरकून घेतलें होतें. सोनप्रयाग येथें मागें ठेवलेलें सामान पाहून घेतलें.

गौरीकुंडाहून एक मोठा थोरला कुत्रा आमच्याबरोबर निघाला. तो दोन दिवस आमच्याबरोबर होता. तेव्हां फार दिवसांचा आमच्या संवयीचा झालेला अशा लाडीगोडीनें तो आमच्याशीं वागत होता. रात्रीं झोंपतांना मनांत आलें कीं, हा कुत्रा हरद्वारपर्यंत आपल्याबरोबर आला तर ह्यास पुण्यापर्यंत नेण्यास माणसाप्रमाणें भाडेखर्च करावा लागेल. सकाळीं उठून पाहिलें तों कुत्र्याचा पत्ता नाहीं. बरोबर कां आला, व गेला कोठें, हें देव जाणें ! एवढाच त्याचा आमचा ऋणानुबंध होता. दुपारच्या शिदोरीस रामपूर आणि रात्रीच्या वसतीस फाटाचट्टी गांठली. सतरा मैलांची झेंप झाली.

आतां तेथून पुढें बदरी नारायण करून थेट हरद्वारला पोहोंचेपर्यंत पहाडांतील पायीं प्रवासाच्या दृष्टीनें सर्वतोपरी सुखसोईंचा राज-मार्गच आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. डोंगरांतील वाटा चढ-उताराच्या असावयाच्याच, पण ते चढउतार सोपे करून वाटा पक्क्या व पांच सहा फूट रुंदीच्या केलेल्या आहेत. वाटेंत जागजागीं मैला दोन मैलांवर हव्या तेवढ्या चट्ट्या आहेत. त्या स्वच्छ व मोकळ्या-

ढाकळच्या आहेत. शिवाय जागजागीं मोठमोठ्या धर्मशाळाहि आहेत. वास्तविक पुढें पुढें पाण्याचें दुर्भिक्षच आहे. बहुतेक वाट कोणत्या ना कोणत्या गंगेच्या कांठाकांठानें गेलेली आहे. तेथून पाणी दिसत असतें पण तेथपर्यंत उतरून जातां येत नाहीं, असा खडा उतार असतो. अशा ठिकाणीं वेळेनुसार शेकडोशे फूट लांबीचे नळ घालून चट्टयांवर पाणी आणून तें अक्षय्य सोडून ठेवलेलें आहे. एका मर्यादित जागेंतच शौचविधीस जाण्याचें नियंत्रण ठेवून तेथील घाण लागोलाग काढून टाकण्याची उत्तम व्यवस्था आहे. ह्या सुमारें तीनशें मैल वाटेंत जागजागीं पाटील पटवारी, टपालघरें, दवाखाने, पोलीस चौक्या, शाळा, जंगल व एंजिनीअर खात्याचे उतारू बंगले, वगैरे इंग्रजाच्या अंगवळणीं पडलेल्या सर्व प्रकारच्या दैनंदिन व्यवहाराच्या सोयी आणि टापटीप उत्तमच आहेत. ह्या वाटेनें प्रतिवर्षीं तीस चाळीस सहस्र यात्रा जाते येते. पण त्याकरितां आळंदी, पंढरपूरप्रमाणें कोठेंहि डोईपट्टी नाहीं.

### मैखंडा पर्वतावर महिषासुर मर्दन

फाटाचट्टीहून दोन मैलांवर मैखंडा पहाड लागतो. येथील पहाडाची उंची सहा हजार फुटाजवळ आहे. पूर्वयुगांत शंकरप्राप्तीकरितां पार्वतीदेवी ह्या डोंगरावर तपश्चर्येकरितां जाऊन राहिली होती. उन्मत्त झालेला महिषासुर तेथें येऊन उद्धटपणानें देवीशीं लगट करूं लागला. तेव्हां त्या भगवतीनें अष्टाभुजधारी अवतार घेऊन त्या उन्मत्त राक्षसाच्या खांडोळ्या खांडोळ्या करून फेंकून दिल्या ! म्हणून त्या पहाडास मैखंडा नांव पडलें. ह्या गांवांत महिषासुरमर्दिनीचें मंदिर आहे.

पुढें दोन मैलांवर एक चट्टी लागते. तेथें लांकडी पडगे, कटोरे, तुंबे, बरण्या वगैरे मिळतात. पुढें दोन मैलांवर वाटेंत मातादेवी व इतर चारदोन देवळें लागून पुढें एक मैलावर नालाचट्टी येते. तेथें अलीकडेच नलदमयंती मंदिर आहे. नालाचट्टी तिकांड्यावर आहे. एक फाटा बदरी केदारकडे २२ मैल. दुसरा उखीमठ चमोलीहून बदरी नारायण ७७ मैल. तिसरा गुप्त काशीवरून रुद्रप्रयाग २५ मैल. नाला येथें ललिता देवीचें मंदिर आहे. नलराजानें देवीची उपासना केली ती येथेंच असें सांगतात. येथून गुप्तकाशी दीड मैल व सरळ उखीमठ तीन मैल आहे.

## गुप्तकाशी

गुप्त म्हटली गेली असली तरी मैल अर्ध्या मैलावरून सुद्धां ती काशी चांगली दिसूं लागते. हा गांव एका मोठ्या थोरल्या डोंगराच्या उतरणीवर त्याच्या मध्याच्या सुमारास असलेल्या कंगोऱ्यावर आहे. गांवाची उंची पांच हजार फुटावर आहे. पायथ्यापासून माथ्यापर्यंत हा सबंध डोंगर झाडाझुडांनीं भरून गेलेला असून शिवाय त्याचे उतारावर गांवाचे वर व खालीं पायऱ्यापायऱ्यांनीं केलेली शेतीहि पुष्कळ आहे. एवढ्या उंचीवर गांव वसला असला तरी पाटानें शेतीला व बागांना पाणी देतां येईल इतकें विपुल पाणी तेथें आहे. गांवाचे खालचे अंगास केळीचे बाग आहेत. येथपर्यंतच्या प्रवासांत कोठें एकाद दुसराहि केळीचा खुंट आढळांत आला नाहीं.

गुप्तकाशी हा पांचपन्नास घरांचा लहानसा गांव आहे. त्यांतील घरें माडयावर माडयांची असून तीं शहरी थाटास साजेशीं दिसतात. कोंकणांतील घरांप्रमाणें शेतानुरोधानें वस्ती विखुरलेली नसून ती देशावरील घरांप्रमाणें अन्योन्याश्रयी एकत्र आहे. गांव उतारावर असल्याकारणानें सांडपाणी सांठून डासांचा उपद्रव व मलेरियाची भीति नाहीं. तेथें लागणारी शिधा–सामुग्री मिळण्यासारखीं चारदोन चांगलींच दुकानें गांवांत आहेत. हरद्वार येथें निवडक सुकामेवा, खिसमिस मिळावें अगदीं तसें येथें मिळत होतें.

## गुप्तकाशी नांव कां पडलें

गुप्तकाशी नांव प्रथम कानांवर आलें तेव्हां अशी कल्पना झाली कीं, हें गांव इतक्या अज्ञातस्थळीं असावें कीं, कोणी माहीतगारानें दाखविल्याशिवाय तें सांपडूं नये; किंवा एखाद्या दरींत, किर्र झाडींत तें इतकें दडून बसलें असावें कीं, गांवचे अगदीं तोंडाशीं जाईपर्यंत त्याचा कांहींहि मागमूस लागूं नये. पण प्रत्यक्ष पाहतां त्या कल्पना चुकीच्या ठरल्या.गांव गुप्त असा कांहीं नाहीं.तो उघडा आहे ! विश्वेश्वर गुप्तरूपानें येथें येऊन वास करीत आहेत, म्हणून त्या गांवास गुप्तकाशी असें नांव पडलें आहे. पुराणांतरीं त्यास गुप्तवाराणसी असें नांव आहे. गुप्तकाशी असें नांव असल्यामुळें येथें मनकर्णिका कुंडावर जो कांहीं दानधर्म करणें असेल तें गुप्तदान असावें असें पंडे सांगतात.

असें यात्रेकरूंना सांगण्यांत त्यांचे दोन हेतू असण्याचा संभव आहे.

'दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥'

म्हणजेच 'दे दान गुप्त उपकार करीं न बोले!' असा यात्रींच्या सात्त्विक भावनेचा हेतु असेल किंवा ज्या कोणास जी काय प्राप्ती होईल ती इतर भाऊबंदास समजून येऊं नये. नाहींतर वांटचाकरितां भाऊबंदकी माजेल म्हणून पंडे लोकांची ही युक्ति असावी! कुंडांत स्नान करण्यास किंवा देवदर्शन घेण्यास मुक्तद्वार आहे. दक्षिणा वा कर नाहीं.

### विश्वेश्वर मंदिर व मनकर्णिका कुंड

गुप्तकाशीचें माहात्म्य तेथील विश्वेश्वराचें स्थान व मनकर्णिका कुंड ह्यामुळें आहे. तेथें विश्वेश्वराचें मंदिर असून त्यांत आपलेकडील घाटाची शाळुंकापिंडी आहे. देऊळ पूर्वाभिमुखी दगडी बांधणीचें असून त्यावरील कळस सोन्याचा आहे. पिंडीजवळ अष्टधातूंची गौरीची मूर्ति आहे. ह्या देवळाचे उत्तर अंगास लागूनच एक लहानसें मंदिर आहे. त्यांत अर्धनारीनटेश्वराची नंदीवर आरूढ झालेली संगमरवरी, पांढरीशुभ्र, सुंदर मूर्ति आहे.

विश्वेश्वर मंदिरापुढें एक चिरेबंदी, अजमासे पंधरा फूट लांबी रुंदीचें चौरस व छातीइतकें खोल मनकर्णिका कुंड आहे. त्यांत डावे हातचे गोमुखांतून यमुनेची व उजवे हातचे सिंहमुखांतून भागीरथीची अशा दोन मनगटासारख्या जलधारा अक्षय्य पडत आहेत. दोन्ही धारांचें पाणी भिंगासारखें स्वच्छ व गार आहे. धारेखालीं चांगलें उभें राहून स्नान करतां येतें. देवळाचे आवारांत चांगली प्रशस्त धर्मशाळा आहे.

गुप्तकाशी गांव सहजसुंदर आहे. त्याचें दर्शन होतांच त्याजकडे एकदम मन आकर्षिलें जातें. एखादें बाळसेदार खेळकर मूल पाहिलें म्हणजे तें कोणाचें आहे, काय आहे, हा विचार न येतां त्याजविषयीं सहज आत्मीयता उत्पन्न होऊन त्यास उचलून घ्यावेसें वाटतें. अगदीं त्याप्रमाणें तें गांव पाहून तेथेंच जाऊन राहावें असें वाटूं लागतें. गांवाला लाभलेलें पार्श्वभूमीचें, पुरोभागाचें, आणि अवांतरहि नैसर्गिक बैठकीचें ऐश्वर्य भव्य आणि मनोरम्य तर आहेच, पण अतुलनीयच

म्हटलें पाहिजे ! तेथपर्यंत कितीतरी पहाडी गांवें लागलीं; पण त्यांतील एकाच्याहि वांट्यास गुप्तकाशीच्या बैठकीचा अल्पांशसुद्धां लाभलेला नाहीं. एवढी मोठी प्रसिद्ध मसूरी पण तीसुद्धां त्याच्यापुढें फिक्कीच आहे. ह्या गांवाचा देखावा चित्रास शोभण्यासारखा, प्रमाणबद्ध, रेखीव, उठावदार व स्पष्ट असून अत्यंत आकर्षकहि आहे. अशा प्रकारचे दोन गांव शिरका व बुधी, कैलासयात्रा वाटेंत लागले होते; पण अधिक उंचीमुळें हवेचा कडाका आणि तेथील लोकांची घाणेरडी राहाणी ह्यामुळें तीं गावें नुसतीं चित्रांतच पाहाण्यायोग्य. पण गुप्तकाशीचें तसें नाहीं. तिचा अंतरंग बहिरंग दोन्ही उत्तमच आहेत. हवा पांच हजार फूट उंचीवरची; म्हणजे महाबळेश्वरासारखी. पाणी उत्तम, बर्फाचेंच तें. निसर्गशोभा तर अवर्णनीयच आहे. डोंगर पायथ्यास मंदाकिनीचा अफाट प्रवाह आणि माथ्यास शुभ्र बर्फावलेपन. ह्या डोंगरामागें एकापेक्षां एक उंचावत गेलेल्या गगनभेदी पर्वतपंक्ति, नभोमंडलांत मेघांचा स्वच्छंद विहार आणि वनश्रीच्या शृंगाराचा थाट, साधाच असला तरी 'चित्ता वेधुनी गुंगवी.' अशा त्या शुद्ध, साध्या व रम्य परिसरास दैवी पावित्र्याची उणीव राहूं नये म्हणूनच कीं काय गिरिजापति विश्वेश्वर येथें येऊन गुप्तरूपानें राहिले आहेत. एवंगुणविशिष्ट गुप्तकाशी हें स्थान ऐहिक दृष्टीनें विश्रामधाम आणि पारमार्थिक दृष्टीनें तपोभूमि होऊन राहिलें आहे. हवा, पाणी, उंची, ह्या दृष्टीनें हें स्थान सर्वतोंपरी आरोग्योपचाराकरितां जाऊन राहण्यायोग्य आहे. विलासी रंगेल लक्ष्मीपुत्रांची दृष्टि त्या काशीकडे वळून महागाई उत्पन्न झालेली नाहीं तोंपर्यंत गोरगरिबांससुद्धां तेथें जाऊन चार दिवस रहाणें परवडणारें आहे. ह्याच यात्रेतील 'देवप्रयाग' गांवहि असेंच चित्रमय आहे. पण त्याला हिमशिखरांची पार्श्वभूमी नाहीं. शिवाय हवा, उंची व पाणी नसल्यामुळें ते राहण्यायोग्यहि नाहीं.

### उखीमठ

नालाचट्टीपासून परस्पर उखीमठास एक वाट जाते, तशीच दुसरी गुप्तकाशींतून जाते. दुसऱ्या वाटेनें उखीमठास जाण्यास मैल दीड मैलाचें चक्कर पडतें हें खरें; पण तेवढ्यानें गुप्तकाशीचें ऐश्वर्य सहजासहजीं पाहावयास सांपडतें. गुप्तकाशी आणि उखीमठ हीं एकमेकां-

समोरील दोन डोंगरावरचीं दोन गांवें आहेत. एका डोंगराचा उतार संपला कीं लगेच दुसऱ्याचा चढ सुरू होतो. दोहोंच्या पायथ्यामधून मंदाकिनीचा प्रवाह वाहात आहे. तेथें पात्राची रुंदी सव्वाशें फूट आहे आणि त्यावर तेथेंच तितक्या लांबीचा लोखंडी तारांच्या दोरखंडाचा पक्का झूला आहे. गुप्तकाशी डोंगराच्या उतारावरील दीड मैलाचीं वाट नागमोडी असून खडी आहे. डोंगरावर झाडी असल्यामुळें उन्हाचा त्रास होत नाहीं. उखीमठ डोंगरास झाडी नाहीं. त्यामुळें ऊन लागून चढतांना नाकीं नऊ येतात. एवढासा चढउतार पण त्यानें पुरे दोन तास खाल्ले. दोन्ही डोंगराच्या पायथ्याशीं त्याच्यामध्यें १२५ फूट अंतर पण तेंच १०००–१२००फूट माथ्याचे उंचीवर एक मैलाचें झालें. उखीमठ गांव गुप्तकाशीपेक्षां मोठा आहे. अर्थात् वस्ती अधिक तसा बाजारहाटहि अधिकच. गांवठाणाला डोंगरमाथ्यासारखी सपाटी लाभली आहे. तशी ती गुप्तकाशीला नव्हती. डोंगरास पाणी कमी व झाडीहि कमी. शिवाय ह्याची उंची पांच–सातशें फुटांनीं कमीच आहे. त्यामुळें हा गांव गुप्तकाशीप्रमाणें आकर्षक न वाटला तरी रम्य आहे. जवळच एक सुंदर सरोवर आहे.

उषामठाचें उखीमठ हें अपभ्रष्ट रूप आहे. प्रल्हादपुत्र बाणासूर ह्याची येथें राजधानी होती. बाणासुराला एकुलतें एक अपत्य होते. ते म्हणजे उषा. तिनें श्रीकृष्णाचा मुलगा जो प्रद्युम्न, त्याचा मुलगा अनिरुद्ध याच्याशीं गांधर्व विवाह केला होता. तें जोडपें तेथें राहात होतें. मुलीचें हें कृत्य बाणासुरास माहित झालें, तेव्हां त्याला अनिरुद्धाशीं युद्ध करावें लागलें. श्रीकृष्णांनीं बाणासुराचा पराजय केला. तेव्हां बाणानें उषेचें अनिरुद्धाशीं लग्न करून दिलें. बापाची वारस उषा. तिजकडे सर्वच राज्याचा वारसा आलेला होता. म्हणून ह्या नगरीस उषामठ–उखामठ–उखीमठ असें नांव पडलें.

उखीमठ ही केदारची गद्दी आहे. म्हणजे केदारनाथाचें हिंवाळ्यांतील वसतिस्थान होय. बर्फ पडावयास लागून बदरीकेदार व आसपासचा सर्व भाग बर्फांत गडप होऊन जातो आणि उन्हाळ्याच्या तोंडीं बर्फ वितळून जाऊन तो मोकळा होतो. ह्या अवधींत–कार्तिक शुद्ध प्रतिपदा ते वैशाख शुद्ध तृतिया–म्हणजे सहा महिने तेथें वस्ती अशक्य

होते. तेव्हां केदारनाथाची दैनंदिन पूजा–अर्चा उखीमठ येथें होते.

## ओंकारेश्वर–देवालय

उखीमठास एका प्रशस्त प्राकारांत ओंकारेश्वर–महादेवाचें भव्य देवालय आहे. देवळांत शाळुंका-पिंडी आहे, पण शाळुंका नेहमींच्या उलटी आहे. देवाचे मागचे बाजूस महापराक्रमी व तपोनिष्ठ राजऋषि मांधाता ह्याची पाषाणमूर्ति आहे. त्याच्या पराक्रमाविषयीं असें म्हटलें आहे कीं, 'यावत्सूर्य उदेति स्म यावच्च प्रतितिष्ठति। सर्वं तद्यौवनाश्वस्य मांधातुः क्षेत्रमुच्यते।' ( वि. पु. ) राजऋषीच्या बैठकीच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे शाळुंका उलटी होत नाहीं. सभामंडपांत आदिबदरी, कार्तिकस्वामी–सुब्रह्मण्य, वगैरे मूर्ति आहेत. देवळाचे शिखर ब्रह्मी धाटणीचें असून वर सोन्याचा कळस आहे. देवळाचे मागें एक जुनें लांकडी देऊळ असून त्यांत उषा व अनिरुद्ध ह्यांच्या मूर्ति आहेत. देवळाच्या प्राकारांतच पण चौफेर मोठें आवार असून त्यांत धर्मशाळा, सदावर्त, राउळांचा वाडा वगैरे माड्यांच्या इमारती आहेत.

## केदारचें राऊळ व त्यांचें दर्शन

राऊळ म्हणजे महंत, केदारनाथाची पूजा-अर्चा वगैरे सर्व व्यवस्था राउळांच्या सत्तेची आहे. राऊळ हे वीरशैव पंथी लिंगायत असून काषाय वस्त्र परिधान करीत नाहींत. ते मूळचे म्हैसूरकडील असावेत. पण आतां मुळचे रीतिरिवाज सुटून जाऊन पहाडी लागलेले आहेत. तेथें गेल्यानंतर राऊळजींचें दर्शन घेणें ही एक आवश्यक गोष्ट समजली जाते. लोकहि त्यास राजाप्रमाणें मान देतात.

केदारनाथचे होणारे यात्रेकडील उत्पन्न दरवर्षी तेव्हां दहा सहस्रांचे वर असे. शिवाय देवाच्या स्वामित्वाचे शंभराच्या वर गांव आहेत. त्याबद्दल सरकार साराच वार्षिक दोन सहस्रांवर भरावा लागतो. ह्याशिवाय राउळांची स्वतःची म्हणून स्थावर–जंगम मिळकत निराळी आहेच.

राऊळजी बहुतेक कोणाची स्वतः भेट घेत नाहींतच. त्यांच्याऐवजीं त्यांचे कारभारी भेट घेतात. ह्या कारभाऱ्यांचेंहि प्रस्थच आहे. त्यांचेहि उपकारभारी आहेत. आमची व राऊळजींची भेट झाली नाहीं, पण

कारभाऱ्यांची झाली. ते मध्यम उंचीचे, काळे, वाटोळ्या तोंडाचे, दाढी व केस राखलेले, अपऱ्या नाकाचे, असे आहेत. अंगांत शर्टवजा पांढरा कुडता व आपल्याप्रमाणें धोतर नेसलेले असे ते आम्ही बसलों होतों तेथें आले.


भेट घेण्याची जागा ठरलेली आहे. ती तीन खणांची खोली असून तेथें गौर मांडल्यासारखी सजावट करून ठेवलेली असते. पहिल्या खणांत कमरेइतक्या उंच चांदीच्या सिंहासनावर सोन्याच्या मुखवटयाची केदा-रेश्वराची मूर्ति ठेवलेली असून भोंवतीं छत्रचामर आहेत. पुढें डाव्या अंगास मारवाडी लोकांच्या पेढीवर गाद्यांची बैठक असते त्याप्रमाणें बैठक असून त्यांवर मुख्य कारभारी बसतात. यात्रींनीं त्यांच्यापुढें सतरंजीवर बसावयाचें. मूर्तीजवळ मोठा थोरला आरसा आहे.

आम्ही दर्शन घेऊन निघणार इतक्यांत कारभारी म्हणाले, 'आम्ही आरती करतों, काय इच्छेस येईल तें देवापुढें ठेवा.' त्यांच्या आश्रि-तांनीं लागलीच एका चांदीच्या ताटलींत कापूर लावून आणला. त्यांची ती आम्हास न समजणारी कुडमुडी आरती ऐकण्यापेक्षां आम्हीं म्हटलें कीं, आम्हीच आपल्या पद्धतीनें आरती करतों. त्यांना आरतीचें प्रेम नव्हतें. पण त्यामुळें होणाऱ्या प्राप्तीचें होतें. त्यांनीं रुकार दिला. आम्हीं आरती केली, स्तोत्रहि म्हटलें. तें होतें संस्कृत. तें ऐकून ते म्हणाले, 'आप तो दख्खन का बडा पंडित हो। आप गद्दीपर आइये' म्हणून त्यांनीं मला गादीवर ओढलेंच.

केदार येथें प्रदोषकालीं देवाचे दरवाजे बंद होते. त्यावेळचें शंकराचें पूजन महत्त्वाचें गणलेलें आहे. असें असतां प्रदोषकालीं दरवाजे बंद असतां कामा नयेत म्हणून माझी तक्रार मीं त्यांचे कानीं घातली. त्यानीं सांगितलें कीं इकडील रिवाज असाच आहे. पुन्हां श्रीकेदारला जाऊन प्रदोष–पूजेचा योग येईल असा संभव डोळ्यांपुढें दिसत नसल्याकारणानें अधिक वाटाघाटी केल्या नाहींत. नाहींतर निदान आमच्यापुरती तरी तशी सोय करून घेतां आली असती.

त्या विराट केदारेश्वराच्या नाभीस्थानीं असलेलें पंचकेदारपैकीं मध्यमहेश्वर हें स्थान उखीमठाहून बारा मैल आहे.

गागाभट्ट पंड – त्यांचा मुलगा व त्याच्या दोन बायका पान ७९





गौरीकुंड पान २०९




तुंगनाथ उंची १२००० पान २८०

## तुंगनाथ पायथ्यापर्यंतची वनश्री

दोन मैलांवर तुंगनाथच्या पायथ्याशीं चोपता चट्टी आहे. मध्यंतरीं दैडा, वनियाकुंड, दोगडभिटा ह्या चट्ट्या लागतात. चोपता चट्टीपर्यंत घनदाट झाडीची परिसीमाच झाली आहे असें म्हणावयास अडचण नाहीं. येथपर्यंतची वाटहि उभ्या चढाची आहे. पाय मेटाकुटीस आले तरी ती संपतां संपत नाहीं. तासभर वाट रेटीत असावें तेव्हां एखादा मैल पदरांत पडतो. पण पायांचा कांगावीपणा, जरा जरी सपाटी लागली कीं लगेच कळून येतो. पावलें झपाझप उचलूं लागतात. जणूं कांहीं त्यांस चाल पडलीच नव्हती. येथील उंची दहा बारा हजार फुटाच्या घरास जाऊन भिडली आहे. ह्यापुढील वरच्या वरच्या उंचीस हवेची विरलता आणि थंडीचा कडाका ह्या कारणांनीं माणसाचेंच काय पण वनस्पतीचेंहि जीवन कठीण होऊन बसतें. झाडेंझुडें वाढत नाहींत, तीं खुरटीं होत जाऊन बारा हजार फुटाचे वरचे उंचीस नामशेष होऊन जातात. गवतासारख्या भुईसपाट उगवणाऱ्या वनस्पतींचीहि अशीच दशा आहे.

घनदाट झाडीचा नमुना पाहावयाचा असल्यास पोथीवासा ते चोपता हा दोन मैलांचा टापू पाहावा. वाटेच्या बाजूस एका डोंगराचा चढ व दुसऱ्या बाजूस त्याचा उतार आहे. पण सबंध वाटभर ह्या दोन्ही वाजवा झाडेंझुडपें, वेलवेली, गवतकाडी ह्यांनीं इतक्या झाकून टाकल्या आहेत कीं, तेथील जमीन खांचखळग्याची आहे का उंचवटयाची आहे, का सपाटीची आहे, हें कांहीं दिसूंच नये. दहावीस पावलें मागें किंवा पुढें वाट कोठून आली किंवा कोणीकडे चालली ह्याचा झाडांच्या दाटीमुळें थांग लागत नाहीं. अर्थात् आपल्या बरोबरचा माणूस मागें किती राहिला किंवा पुढें किती गेला हें कांहींच दिसत नाहीं.

ह्या जंगलांतील वृक्षांची उंची चुकूनसुद्धां पाऊणशें फुटांपेक्षां कमी भरावयाची नाहीं; ती शंभर फुटांपेक्षां किती अधिक गेली असेल ह्याची कल्पना करतां येत नाहीं. झाडांचे शेंडे शपथेलासुद्धां दिसत नाहींत. त्यांचीं खोडें त्यांच्या उंचीस साजेशीं जाडजूड आहेत. आपल्याकडील मोठ्यांत मोठें खोड आंबा, चिंच ह्यांचें असतें. त्यापेक्षां दुपटीनें तरी जाडजूड ह्या वृक्षांचीं खोडें असतात. वाटेंत एके ठिकाणीं

उतारावर एका झाडाचें प्रचंड धूड वाट आडवून पडलें होतें. तें ओलांडून जाणें शक्यच नव्हतें. कितीहि पाय उचलला तरी अर्ध्या उंचीपर्यंतसुद्धां पोंहचत नव्हता. दुसऱ्याच्या साह्यानेंच त्यावर चढून पलिकडे उडी घेऊन उतरावें लागलें.

झाडांचीं खोडें व फांद्या ह्यांच्या मातट लतापत्राच्या रंगानें हिरव्यागार मांडवाच्या शोभेंत वैगुण्य येऊं नये म्हणून पोपटी रंगाच्या दाट शेवाळांनीं तीं नखशिखांत मढवून टाकिलीं होतीं. ह्या शेवाळाचा थर चांगला बोट दीडबोट जाडीचा असतो. पांढरे–तांबडे व मिश्रित रंगाचे छिटे असलेल्या पानांचे अळू, 'क्रीपर व फर' ह्या जातींचीं सुकुमार व गोंडस लतापत्तींचीं लहान झाडे बुद्धया लावलेलीं असावीत, अशाप्रकारें खोडावरील शेवाळी आवरणांतून उगवलेलीं होतीं. फांद्यावरून जागजागीं वाव वाव लांबीचें हिरवट–पिवळें शेवाळ, कमानींतून गोंडे लावून सोडलेल्या रेशमी दोऱ्यांप्रमाणें लोंबत होतें. खोडास विळखून वर चढलेल्या वेलवेलींनीं, त्याचप्रमाणें त्यांच्या बहरलेल्या चित्रविचित्र रंगाच्या पानाफुलांच्या घोसांनीं त्या लतामंडपास मोठी शोभा आणली होती; ह्यामुळें एकरंगी दिसणारा मंदपणा मोडून त्यांत आकर्षक उठाव उत्पन्न केला होता. शंकर–पार्वती–विवाहसमयीं सृष्टिदेवीनें केलेल्या नैसर्गिक मंडप–शोभेचा हा लतामंडप, अवशेष भाग राहिलेला असावा अशी कल्पना होते. डोक्यावर व चहूबाजूंनीं अशी मंडपशोभा पाहिल्यानंतर जमिनीवर कांहींच बैठक कशी नाहीं म्हणून पाहूं लागलों तों, तीहि आढळली. कोंवळ्या लुसलुशीत नाजुक पानाफुलांच्या रंगीबेरंगी वेली मऊ गालिच्या अंथरल्याप्रमाणें भुईसपाट पसरलेल्या होत्या. त्यांची किती कोमल व तेजस्वी पानेंफुलें होतीं तीं! कीं त्यावर पाय देऊन तुडवित जातांना संकोच वाटावा. त्यावर पाय पडतांच तीं चिरडून जात. वास्तविक तीं माणसांच्या विहाराकरितां नव्हतीच. पार्वती–विवाहप्रसंगीं देवदेवता जमलेल्या होत्या. त्या सर्व जड देहधारी नसून दिव्य देहधारी तेजोरूपी असल्याकारणानें त्यांच्या स्पर्शानें ती सुकुमार हिरवळ चुरडून जाण्याऐवजीं त्यांची कांति अधिकच खुलली असेल. माणसांकरितां निसर्गानें घडोतीच्या हिरवळी उत्पन्न करून ठेवल्याच आहेत. हिरवळीवर पाय

ठवला कीं, मऊ, रुंदार बैठकीवरून चालल्याप्रमाणें वाटावें; आणि पाय उचलला कीं पायाखालीं दवलेली हिरवळ पुन्हां ताठची ताठ उभी राहावी. अशा प्रकारची हिरवळ म्हणजे आपल्याकडील हरळी किंवा लखनौ कानपूरकडील "लॉन' गवत.

ह्या जंगलांत पूर्ण शांतता अविरत नांदत आहे. येथें झाडाझुडपांची एवढी उफाड्याची वाढ असतांना पाण्याचें दुर्भिक्ष कां असावें ह्याचें नवल वाटतें. कोठें नदी नाहीं कीं ओढा नाहीं, झरा नाहीं कीं डबकें सुद्धां नाहीं. त्या कारणानें नदीचा धो धो, ओढ्याची खळबळ, झऱ्याची किनरी आणि डबक्यांतील डासांची गुणगुण वा बेडकांचा डराव डराव शब्द मुळींच नाहीं. वाऱ्याला ह्या जंगलांत शिरण्यास वावच नाहीं. म्हणून झाडांच्या पानाची फडफड नाहीं कीं, पानपाचोळ्याची खळखळ नाहीं, पक्षी नाहींत म्हणून त्यांचें कूजन नाहीं किंवा किलकिलाटहि नाहीं. एकूण सर्वच बाजूनें निःशब्द वातावरण. सूर्यकिरणास चुकूनसुद्धां आंत रिघाव मिळण्याची आशा नाहीं. नेहमींच संध्याकाळ झाल्याप्रमाणें येथें मंदप्रकाश असतो. दिवस किती वर आला किंवा अजून किती बाकी राहिला आहे त्याचा अजमास लागणें दुरापास्तच. त्यांतच जर कां अभाळांत काळेकुट्ट मेघ जमून बसले किंवा कोसळूं लागले तर वाटेनें दिवे लावूनच जावें लागावयाचें. ह्या जंगलांतून जात असतांना दुर्दैवानें जर कां धुक्यांत सांपडण्याची पाळी आली तर तें निवळेपर्यंत जागचें हलावयास नको. ह्या उंचीवर धुकीं इतकीं दाट असतात कीं, शेजारचा माणूस देखील ओळखतां येत नाहीं. सावलीच्या आकारावरून कल्पना करावयाची. पावलाखालची वाट कांहीं स्पष्ट दिसत नाहीं. हा प्रसंग किंवा अनुभव आम्हास ह्या यात्रेंत आला नाहीं, पण दुसऱ्या यात्रांत तो आलेला असून तो मोठा मनोरंजक व उद्‌बोधकहि आहे. तो येथें देऊन त्याची रया घालवीत नाहीं.

येथून जात असतांना पावसाचे शितोंडे येण्यास सुरवात झाली. पण त्याची जाणीव झाली ती पावसाचे थेंबटे आमच्या अंगावर पडून नव्हे, तर झाडांच्या पानांवर पडणाऱ्या थेंबट्यांच्या टप, टप, आवाजानें ती झाली. एवढ्या मोठ्या किर्रदाट जंगलांतून निर्धास्त प्रवास होतो, ह्याचें कारण तेथें श्वापदांची भीति मुळींच नाहीं, किंवा तेथें

सर्प जळवाहि नाहींत. जर का ह्या वाटेंत तशा भीतीचा संभव असता तर उखीमठाकडून बदरीनारायणास जाणाऱ्या जवळच्या वाटेस राम-राम ठोकून गुप्तकाशी, रुद्रप्रयाग, चमोली असा चाळीस मैलांचा फेरा पडणारी लांबीची वाट घेणें भागच झालें असतें. पण बदरीनारायणास काळजी !

हिमालयाच्या भांडारांतील निरनिराळया पुडांतून अशा अमोलिक नि दैवी किती अपार निर्मिती असतील हें त्याचें तोच जाणें. त्या वेळेपर्यंत चारपांच ठिकाणीं नुसत्या वनश्रीचेंच ऐश्वर्य दृष्टीस पडलें, पण त्यांत एकाची सर दुसऱ्यास नव्हती. प्रत्येकीचें वैशिष्टय नवनवेंच. यात्रेच्या वाटेवर हा भाग आला म्हणून त्याच्याकडे लक्ष वेधलें गेलें. नाहींतर येथील ओलसर वाट, दमट व कोंदट हवा, उबट दर्प, पाण्याचा अभाव अशा निरुत्साहकारक अरण्याकडे तें कितीहि उत्तमोत्तम चित्र-मय असलें तरी सुखासुखी बघणार कोण ? हिमालयांत त्याचा तीन-चतुर्थांश भाग अजून तरी असा राहिलेला आहे कीं, ज्यावर अजून-पर्यंत तरी माणसाची दृष्टीसुद्धां पोंहचलेली नाहीं. मग पाय लागण्याची गोष्टच कशाला ?

### ह्या जंगलांत साहेबाची भेट

ह्या जंगलांत श्वापदें असतीं तरी इतक्या खोलांत शिरून समोरा-समोर तर राहिलेंच पण माचा बांधूनहि एखाद्या पटाईत शिकाऱ्यास-सुद्धां शिकार साधली नसती. उलट त्याचीच शिकार होऊन तो आयता श्वापदाच्या भक्ष्यस्थानीं मात्र पडला असता, असा विचार एका गोऱ्या शिकारी टोपीवाल्यानें प्रकट केला. आम्हास तो वाटेंत भेटला होता. तो आमच्या उलट दिशेनें येत होता; गळयांत एक मोठी थोरली खाकी पिशवी, पाठीशीं बंदूक, हातांत भाल्याच्याप्रमाणें काठी होती. बरोबर बोजेवाला असलेला आढळला नाहीं; असा एकटाच चालला होता. त्यास हिंदी बोलतां येत होतें.

### साहेबाशीं संवाद

त्यानें आमचें नांवगांव विचारून घेतलें. मोठा चौकस माणूस होता. त्यानें विचारलें कीं, तुम्ही किती शिखर उंचीपर्यंत बर्फांतून गेलां आहांत? मीं म्हटलें, केदारनाथ पर्यंत. त्यानें आश्चर्यानें विचारलें

कीं, इतकें जवळ येऊन शेजारच्या वीस बावीस हजार फूट उंचीच्या शिखरांकडे नाहीं गेलात? मीं म्हटलें नाहीं. तो म्हणाला मग तुम्हीं हिमालयाचें पाहिलेंतच काय ! तुम्ही शिकलेले आहांत. येथपर्यंत तुमच्यांतील म्हाताऱ्या बायकासुद्धां शेंकडोशेंनीं येतात. न जाण्यांत तुमचा पुरुषार्थच काय? मी थोडासा गांगरून गेलों. साहेब म्हणजे कोणी तरी मोठे विद्वान, कर्तबगार असावयाचेच, असा आपला माझा पहिल्यापासूनचा समजच. कां कोणास ठाऊक? साहेबांशीं इतकें जवळून इतकें पुष्कळ बोलण्याचा हा जन्मादारभ्य पहिलाच प्रसंग; आपलें वाचन काय, आपलें शिक्षण काय, आपलें अवलोकन किती हें सर्व चित्र डोळ्यांपुढें उभें राहून न्यूनगंडाची जाणीव वाटूं लागली. आणि म्हणून लवकर पोहोंचलें पाहिजे, थांबण्यास वेळ नाहीं अशी सबब सांगून पळ काढण्याचा विचार आला मात्र, तोंच आपल्या भेकडपणाची लाज वाटून खंतच आली. मनाचा धडा केला आणि आपणास जमेल तसें उत्तर दिलेंच पाहिजे; असा निर्धार करून त्यास म्हटलें कीं, 'आमच्याविषयीं तुम्ही गोऱ्या लोकांनीं आपल्या गैरसमजुती करून घेतल्या आहेत, किंवा तुमच्याच जातभाईंतील मिशनऱ्यांनीं त्या तशा बुद्धिपुरःसर करून दिल्या आहेत. हें तुमच्या बोलण्यावरून तेव्हांच लक्षांत येतें.'

साहेब म्हणाला, 'माझें विचारणें तुम्हांस लागलें असेल तर मी तुमची क्षमा मागतों; तुमचा माझा पूर्वपरिचय नसतांना मीं एकदम तुम्हांस असें म्हणावयास नको होतें, पण प्रत्यक्ष माहिती करून घेण्याच्या जिज्ञासेनें तें मीं विचारलें.'

मीं म्हटलें, 'तुमच्या विचारण्यानें मला लागलें बिगलें कांहीं नाहीं. नसताच आणखी एखादा गैरसमज करून घेऊं नका. बोलण्यांत तुमची खिलाडूवृत्ति नि मोकळा स्वभाव लगेंच प्रत्ययास येतो. तुम्ही आपला शंकारूपी प्रश्न समक्षच विचारीत आहांत, ह्याकरितां खरोखर मींच तुमचे आभार मानले पाहिजेत. समक्षासमक्ष बोलण्यानें गैरसमज असतील तर ते नाहींसे होतील आणि कोणी खोडसाळपणानें पेरलेले असतील तर त्यांचें निराकारण तुम्ही आपोआपच कराल, असा मी विश्वास धरतों.'

### तुमचे गैरसमज व भिन्न दृष्टि

मीं म्हटलें कीं, 'तुमच्या विचारसरणीप्रमाणें तुम्ही अशी शंका घेणें अगदीं साहजिक आहे. पण आमच्या आचारविचारांची ओळख तुम्हास मुळींच नाहीं असें मीं म्हटलें तर तुम्ही रागावणार नाहीं.' ते मधेंच म्हणाले, 'नाहीं, नाहीं, मनांत पुनरपि अशी शंकाहि आणूं नका.' मी पुढें म्हटलें कीं, हिमालयांत येण्याच्या तुमच्या आमच्या हेतूंतच दोन ध्रुवाइतकें परस्परविरोधी अंतर आहे. जगतितलावरील उंच उंच शिखरें पायाखालीं तुडविलीं किंवा खोलांतील खोल अशा प्रशांत (पॅसिफिक) महासागराच्या तळास पाय लावला म्हणजेच काय तो माणूस कृतार्थ होतो अशी आमची समजूत नाहीं. त्यांत पुरुषार्थ नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं. तो त्याचा पराक्रम आहे, विक्रम आहे. त्याला द्यावयाची ती किंमत आम्ही देतच असतों. त्यापासून घटकाभर आनंद वाटतो. सुखहि होतें. पण मनुष्यजन्माची इतिकर्तव्यता येथेंच संपली असें मात्र आम्ही समजत नाहीं.

### आमची दृष्टि

आमच्या डोळ्यांपुढें एक प्रश्न प्रामुख्यानें येऊन उभा राहातो. वास्तविक तो अनुभवजन्यच असल्यामुळें कोणाहि विचारवंतास तो सहज सुचावा असाच आहे. तो प्रश्न असा कीं, हा पराक्रम, ही कीर्ति, ही सत्ता, ही संतति, ही संपत्ति, हें सर्व ऐश्वर्य, हीं सर्व प्रत्येकास आपापल्या इच्छेप्रमाणें प्राप्त होतात कां ? यदा कदाचित् एखाद्याच्या भाग्यानें प्राप्त झालीच तर त्यापासून होणारा आनंद, सुख, हें किती काळ टिकणारें असतें? शिवाय त्यास त्या आनंदानें त्या वेळेपुरतें समाधान वाटलें तरी त्याच गोडीची चटक लागून त्यास त्याबद्दलची हांव अधिकाधिक वाढत जाऊन त्याचें मनःस्वास्थ्य नाहींसें होतेंच ना? एवढे जीवापाड श्रम करून शेवटीं पदरीं काय पडलें म्हणून पाहावें तों 'सुख पाहतां जवापाडें दुःख पर्वताएवढें', हाच सर्वांस अनुभव. एक अत्यंत आवडीचा म्हणून छंद धरावा, त्याच्यापासून होणाऱ्या सुखानंदाचें आतृप्ति पान करावें, त्याचा वीट आला म्हणून किंवा त्याचें स्वारस्य कळलें म्हणून तो छंद सोडून दुसराच धरावा. अशी ही धरसोड जन्मभर केली तरी जें काय हवें असतें तें मिळाल्याचें

समाधान होऊन मागें लागलेला हव्यास कधीं काळीं तरी संपतो का? अशा शंका येतात.

दहा हजार फूट चढलों, पराक्रम वाटला. वीस हजार फूट उंची गांठली, विक्रम झाला. एकोणतीस हजार फूट उंचीचें गौरीशंकर शिखर आज नाहीं तर उद्यां चढून जाऊं. आणि मग नुसता विक्रमच काय पण महाविक्रमहि होईल. आतां त्यापेक्षां उंचीचें एखादें शिखरच चढावयास राहिलें नाहीं म्हणून, किंवा आपणांस चढण्याचें सामर्थ्य नाहीं म्हणून, शेवटीं निराशा आणि असमाधानच राहाणार. जिंकावयासच कांहीं राहिलें नाहीं म्हणून, जगज्जेता शिकंदर ह्याची अशीच स्थिति नाहीं का झाली ? आपणास होणारा आनंद, वाटणारें सुख हें सर्व विषयाधीन म्हणजे परावलंबी असतें. तसेंच तें क्षणभंगुरहि असतें. हा रोजचा अनुभव सर्वत्रांसच आहे ! म्हणून सुख, शांतीचे हे मार्ग नव्हेत असें आमचें वेदान्तशास्त्र सांगतें.

### विश्वाचा कल्पनातीत विस्तार

हिमालयांतील जगड्व्याळ दगडाधोंड्याच्या राशीयुक्त पर्वतापुढें आपला साडेतीन हाताचा देह कस्पटाप्रमाणें 'कोटश्च कीटायते' आहे. केदारपर्वत–शिखराची उंची २१००० फूट व माणसाची सहा फूट धरली तर तें शिखर माणसाच्या साडेतीन हजारपट मोठें ठरतें. पृथ्वीच्या गोलाची जाडी अठरा हजार मैल आहे. म्हणजे ती शिखराच्या दोन हजारपटीनें मोठी आहे, आणि माणसाच्या सत्तर लाख पटीनें मोठी होईल. पृथ्वीपासून सूर्याचें जें अंतर आहे तें माणसाच्या जवळजवळ एक्याऐंशीं अब्ज (८१०००००००००) पटीबरोबर भरेल. ह्या मानानें अनंताशीं तुलना करावयाची मनांत आणलें तर जन्मभर कल्पना करीत बसलें तरी त्याचें अंशमात्र तरी यथार्थ आकलन होईल किंवा नाहीं त्याची बानवाच आहे. येवढें मोठें एकोणतीस हजार फूट उंचीचें व अजूनपर्यंत तरी दुर्गम, दुर्लंघ्य राहिलेलें गौरीशंकर शिखर, पण पृथ्वीच्या मानानें पाहूं जातां आपल्या हातावरील शंख, चक्र रेषांच्या जाडीइतकेंहि तें भरणार नाहीं.

### हिमालयाचा जन्म

भूगर्भशास्त्री आपणांस असें सांगतात कीं, पृथ्वीच्या उत्पत्तींत हा

हिमालय वालकच आहे. किंबहुना त्याचा पुरा जन्म अजून झालेलाच नाहीं. पृथ्वीच्या पोटांतून वर येण्याची त्याची क्रिया चालूंच आहे. त्याची उंची वाढत आहे. त्याचा जन्म पृथ्वीच्या मानानें नुकता कालच म्हणजे ( ३०००००००० ) तीस कोटी वर्षांपूर्वीं होऊं लागला आहे. आज तो आहे त्या ठिकाणीं पूर्वीं हिंदी महासागर होता. ज्या ठिकाणीं आज जगांतील मोठ्यांतील मोठा व खोल असा प्रशांत महासागर आहे त्याठिकाणीं पूर्वीं भूभाग होता. ह्या महासागराच्या घडामोडींत अजूनहि नवीं नवीं बेटें जन्मास येत आहेत तर जुनीं त्याच्या पोटांत गडप होऊन जात आहेत. ह्या दृष्टीनें पाहतां हिमालयच काय पण अखिल ब्रह्मांडच कितीक वेळां जन्मास आलें. ' धाता यथापूर्वकमकल्पयत् ' आणि सर्वंकष कालाच्या उदरांत प्रलय पावलें ' कालः सर्वंकषोह्ययम् । ' ह्यांचा अंत कोठें लागणार ? ' पुनरपि जननं पुनरपि मरणम् ' हा तर सृष्टीचा क्रम अव्याहत चालूंच राहणार आहे.

## मानवाचें सामर्थ्य

मनुष्याच्या पार्थिव देहाची वाढ पूर्णतेस पोहोंचलेली आहे असें आपण समजतों. असा हा देहधारी माणूस तेथील जगड्व्याळ पर्वतांपुढें अगदीं क्षुद्र, पुंगडा दिसावा हें साहजिकच आहे. हाच पुंगव जेव्हां त्या प्रचंड पर्वतांचा माथा पायांखालीं घालतो तेव्हां त्याच्याहि सामर्थ्याची डोळ्यांत भरण्यासारखी थोरवी लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं. हें त्याचें सामर्थ्य त्याच्या मनबुद्धींत असतें ही गोष्ट खरी असली तरी हिमालयाचा विस्तार, त्याचें प्रचंडत्व, त्याची अद्‌भुत घटना, त्याचें ऐश्वर्य वगैरे पाहून हें त्याचें सामर्थ्य किती अत्यल्प आहे ह्याचीहि जाणीव त्याला तेथें चांगली प्रत्ययास येते.

## यात्रेचे हेतू

येथील नैसर्गिक घटना म्हणजेच अत्युच्च डोंगर, पर्वत व उत्तुंग हिमशिखरें, त्यांतील घोर–दऱ्या खोरीं, महान नद–नद्या, प्रक्षुब्ध नाले–ओढे, अफाट व गंभीर तळीं व सरोवरें, निबिड अरण्यें, झाडें–झुडें, वेल–वेली, दगड–धोंडे, झंझावात, मुसळधार पाऊस, बर्फ, गारा व हिम ह्यांचा वर्षाव, पांचपासून पांचशें इंच पाऊस, पाणी उकळून आपोआप बाष्पीभवन व्हावें अशीं उन्हाळीं, ज्वालामुखी, अक्षय्य



तुंगनाथ उतारावर जंगल चट्टी पान २६९



विष्णुप्रयाग व मंदीर पान २७४

तेवत राहावी अशी त्यांची उष्णता, जिवंत माणसाचें रक्त गोठून जावें अशी थंडी इत्यादि चमत्कृतिपूर्ण व अतर्क्य उत्पत्तीचे प्रकार पाहून ह्या घटनेच्या बुडाशीं केवढी अगाध शक्ति आहे, निर्मितीचा तिचा हेतु काय असेल, तिजशीं आपला संबंध काय वगैरे प्रश्न कोड्यासारखे वाटतात. त्यांचा उलगडा होऊन कोणी अधिकारी पुरुष भेटला तर त्याजकडून जन्मसाफल्याकरितां मार्गदर्शन करून घ्यावें, परमार्थिक दृष्टीनें ह्या दैवी वातावरणांत आचारविचारांचा निश्चित मनानें अभ्यास करावा, एकाग्रतेनें मनन व निदिध्यासाची संवय लावून घ्यावी, ह्या हेतूनें आम्ही हिमालयांतील यात्रा करितों.

## यात्रा फळ

हिमालयांतील यात्रा करण्यांत सहजासहजीं अगदीं न कळत अनेक लाभ होत असतात. त्यांपैकीं एक असा आहे कीं, दैनंदिन अष्टौप्रहर पाठीं लागलेल्या जीवन–कलहाच्या धक्काबुकी झगड्यांतून चार दिवस तरी सर्वस्वीं लक्ष निघतें म्हणजे ज्यांत आपला जीव गुंतेल, आपलें म्हणूं असें घरदार, शेतवाडी, व्यापारधंदा, नोकरी–चाकरी, मुलेंबाळें, आप्तइष्ट, स्नेहीसोबती, करमणुकीचीं साधनें, नाटकें, चित्रपट, खाण्यापिण्याची चैन व सुखविलास वगैरे कांहींहि उपलब्ध नसतें. तें इतकें कीं, तळमळून इच्छा झाली तरी त्यांतील एकहि मिळण्याची नुसती आशा करण्याससुद्धां जागा नसते. मनाची बालंबाल खात्रीच होऊन गेलेली असते कीं, आतां प्राण कंठीं आला तरीसुद्धां त्या गोष्टी मिळण्याची आशा नको. अशा स्थितींत मनाला लागणारी हुरहुर, काळजी किंवा ध्यास आपोआपच जिरून गेलेला असतो.

मनाची अशी ही निश्चित वा स्वस्थचित्त अवस्था प्रापंचिक गोष्टींनीं दुमदुमून सोडलेल्या कोंदट वातावरणांत म्हणजे घरींदारीं प्राप्त होत नाहीं. हिमालयांतील निसर्गशुद्ध आणि दैवी ऐश्वर्ययुक्त वातावरणांत मन किती सहज प्रसन्न होऊन स्वस्थ चित्त होऊन जातें हें कोणीहि स्वानुभवानें सांगूं शकेल. ह्याचवेळीं स्वार्थी किंवा संकुचित दृष्टि आणि तिच्या अनुषंगानें हृदयाशीं घट्ट धरून ठेवलेलीं व्यावहारिक मूल्यें सुटूं लागून त्यांची जागा व्यापक दृष्टि आणि तिला अनुकूल उदात्त म्हणजेच पारमार्थिक मूल्यें येऊन बसतात.

हीं साक्षात्कारी तीर्थक्षेत्रें महाविद्यालयेंच होत

भौतिक शास्त्रांच्या अभ्यासाकरितां निदान आजतरी तुमच्या महाविद्यालयांत तुमच्या पायांशीं बसूनच आम्हांस अभ्यास केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण ' अध्यात्मविद्या विद्यानाम् ' म्हणजे वेदान्ताचें साक्षात्कारी ज्ञान घ्यावयास आमचीं हीं तीर्थक्षेत्रें सर्व समर्थ स्वयंपूर्ण महाविद्यालयेंच आहेत. त्यांना हजारों हजार वर्षांचा इतिहास आहे. विद्युल्लहरींनीं केंद्राभोंवतीचा प्रांत भारून ठवावा तद्वत् ऋषीमुनींच्या तपश्चर्यांनीं, देवदेवतांच्या सान्निध्यांनीं आणि स्वर्गीय पुण्यपावन व पवित्र अशा नदनद्यांच्या अवतरणांनीं हीं तीर्थक्षेत्रेंच काय पण सबंध हिमालयच भारून जाऊन तो युगानुयुगें पुण्यभूमि, तपोभूमि होऊन बसला आहे. तुम्ही समजता त्याप्रमाणें हिमालय ही कांहीं भोग–भूमि आहे असें आम्ही समजत नाहीं.

अभ्यास म्हणजे स्वभाव होऊन जाणें

एखादी गोष्ट समजली, पटली एवढ्यानें ती अंगीं बाणली म्हणजे न कळतसुद्धां आचारांत उतरली असें होत नाहीं. त्याकरितां एकनिष्ठेनें इतका अभ्यास व्हावा लागतो कीं तसा स्वभावच होऊन जावा. हा जो अभ्यास म्हणजेच आचारमार्गाचें सतत सेवन, त्याचीच गणना, आम्ही तपाचरण, देवपूजन, भक्ति, योगसाधन ह्यांत करतों.

ध्येयनिश्चिती

आपल्या भोंवतींचा विश्वपसारा, आपलें शारीरिक, मानसिक व बौद्धिक दौर्बल्य, जीवन–कलहांत अविरत पाठीं लागलेला झगडा आणि तज्जन्य असमाधान, इत्यादींनीं हतबुद्ध होऊन गुलामाप्रमाणें परस्वाधीन म्हणजे विषयाधीन होऊन आपण राहाणार आणि अक्षय्य झगडा करीत जीवनदशा संपविणार, का अध्यात्माची कांस धरून मन–बुद्धिचा विकास करणार आणि ज्ञानबलानें नराचा नारायण– ' सुपरमॅन ' होणार आणि जगाचा स्वामी होऊन शाश्वत सुखी व अमर होणार, हें ज्याचें त्यानेंच ठरवावयाचें असतें.

मानवीकलेंत बुद्धिवैभवाचा आविष्कार तर
निसर्गांत परमेश्वरी साक्षात्कार!

इजिप्तमधील पिरॅमिड्स, बुद्धाचे स्तूप, आम्हा हिंदूंचीं उंच उंच

गोपुरांचीं दक्षिणेकडील भव्य देवळें, वेरूळचीं कैलास सारखीं लेणीं, दिल्ली, आग्रा, विजापूर कडील ताजमहाल, गोलघुमट, ह्यासारख्या जगविख्यात मशिदी किंवा तुमचीं विलायतेंतील वेस्ट मिन्स्टिर सारखीं प्रार्थनामंदिरें, हीं सारीं तीर्थक्षेत्रांसारखीं पवित्रस्थानें आहेत. तेथील कलाकुसरींचें सौन्दर्य, भव्यपणाची अद्‌भुतता आणि देवस्थानचें ऐश्वर्य पाहून डोळे दिपून जातात आणि आश्चर्यानें मति गुंग होते. असें असलें तरी थोडचाच वेळांत डोळ्यांवर आलेली दीप्ती बाजूस सरून ही सर्व मानवी सामर्थ्याची व कलाकौशल्याची महती असल्याची जाणीव येते.

पण निसर्गनिर्मितीतील अलौकिक रत्नभांडार असा जो हिमालय तो म्हणजे जगतितलावर आढळणाऱ्या यच्च्यावत् वस्तुजाताचें– कृमीकीटक, पशुपक्षी, मानवजाती, झाडेंझुडें, डोंगरपर्वत, नद्या, हिमशिखरें इत्यादींचा अपूर्व व अद्‌भुत विश्वसंग्रहच आहे. अशा ठिकाणीं परमेश्वरी गुणांचा, त्याच्या सामर्थ्याचा, रचनाचातुर्याचा, सौन्दर्याचा आविष्कार पदोपदीं अनुभवास येतो. आमच्यासारख्या प्रापंचिक माणसास परमेश्वराचें दर्शन त्याच्या गुणांतच व्हावयाचें. तेथें तो आपल्या दैवी गुण–सामर्थ्यानें नटलेला आबालवृद्धांस सहज दिसून येतो. 'उतैनं गोपा अदृशन्नदृशन्नुदहार्यः । उतैनं विश्वाभूतानि स दृष्टो मृडयातिनः । तै. सं. मात्र ह्या दृष्टीनें पाहाण्याची जागरूकता पाहिजे. इकडील यात्रा ह्या दृष्टीनें आम्ही करीत असतों.

## पुरुषार्थ

पुरुषार्थासंबंधीं आमच्या कल्पना अशा आहेत कीं, मनुष्यानें आपल्या जन्माचें सार्थक चतुर्विध पुरुषार्थ साधून करावें. त्यासाठीं आमच्या धर्माचा नुसता उपदेशच नव्हे तर तशा त्याच्या आज्ञा आहेत. हे चतुर्विध पुरुषार्थ म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष होत. ह्या चारांपैकीं पहिले दोन साधनीभूत आहेत. अर्थ म्हणजे साधनच. मग ते द्रव्यरूप असो नाहींतर वस्तुरूप असो वा हेतुरूप असो. धर्म म्हणजे सदाचार सत्प्रवृत्ति सांगून त्याचबरोबर असत्प्रवृत्तिपासून परावृत्त करणारें शास्त्र. धर्म एका दृष्टीनें प्रेरक असतो तर दुसऱ्या दृष्टीनें प्रतिरोधक बंध असतो. कांहींहि म्हटलें तरी धर्म व अर्थ हे कांहीं

स्वतंत्र पुरुषार्थ जे काम आणि मोक्ष त्यांच्या तोडीचे स्वतंत्र पुरुषार्थ होत नाहींत.

तिसरा पुरुषार्थ काम. काम म्हणजे इच्छा, वासना, भोग, लालसा, हेतू वगैरे. ह्यानें सर्व एषणांचे भोग मिळून सुखप्राप्ती होते. पण ती क्षणैक असून अधिकाधिक हांव, महत्त्वाकांक्षा उत्पन्न करण्यास कारणीभूत होते. कामाच्या यथेच्छ सेवनानें तृप्ती तर कधीं होत नाहींच पण नेहमींच असमाधान वाटून मनाची शांति नाहींशी होते. हा पुरुषार्थ केवळ ऐहिक सुखप्राप्त्यर्थ म्हणजेच इंद्रियसंतर्पणार्थ असला तरी तोच धर्माचें बंधन पाळून संपादन केला म्हणजे मात्रास्पर्शजनित सुखांतील अपुरेपणा लक्षांत आणून देतो व विचारक्रांति करून संयमाचा मार्ग दाखवितो. म्हणूनच 'धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ' असें श्रीमद्भवद्गीता सांगते. ह्या दृष्टीनें हा पुरुषार्थ स्वतंत्रहि आहे आणि चौथा पुरुषार्थ जो मोक्ष त्याला तो साधनीभूतहि आहे. काम हा स्वभावतः जरी प्रवृत्तिलक्षण असला तरी धर्मबंधनांच्या योगें तो यथार्थ दर्शन करवून निवृत्तिमार्गासहि लावणारा असा होऊं शकतो.

मोक्षानें ज्ञान, विज्ञान अंगीं बाणून माणसाच्या अहोरात्र पाठीस लागलेलें भवचक्रच काय पण 'पुनरपि जननं पुनरपि मरणम्' चें चक्रहि अक्षय्य सुटतें. मोक्ष हा आत्म्याला सांसारिक बंधनांतून मुक्त करून शाश्वत व निरतिशय सुख देणारा आहे. काम हा आचारप्रभव तर मोक्ष हा ज्ञानप्रभव आहे. मोक्षांत जिवाशिवाचें ऐक्य होऊन गेलेलें असतें. डूम्सडेच्या दिवशीं येशू ख्रिस्ताच्या कृपेनें त्याचा भक्त प्रायश्चित्त घेऊन शुद्ध झाला तरी देव आणि भक्त हा सेव्यसेवकभाव चिरंतन टिकणाराच राहतो. केवढाहि मोठा निष्ठावान भक्त झाला तरी त्याच्या प्रगतीला तुमच्या धर्मांत पुढें वाव नाहीं. आमच्या धर्मांत असें नाहीं. मोक्षांत नराचा नारायणच होऊन जात असल्यामुळें सेव्यसेवकभाव राहण्यास जागाच राहात नाहीं. ही अवस्था प्राप्त करून घेणें हाच आमचा परमार्थ विचार, आणि तोच आमचा परमपुरुषार्थ.

त्या परमपुरुषार्थाची महती कळल्यानंतर ऐहिक पुरुषार्थाकडे साहजिकच गौणत्व कां येतें हें आतां तुमच्या लक्षांत येईल. मोक्षाची

एवढी मोठी महती कळली म्हणजे तो लगेंच प्राप्त करून घेतां येतो असें नाहीं. ती अवस्था प्राप्त करून घेणें अति दुर्घट आहे. त्याकरितां जन्मोजन्मींची तपश्चर्या असावी लागते. तेव्हां कोठें ती विरक्ति उत्पन्न होऊन अधिकारप्राप्ती होणार. तेथपर्यंत मघा म्हटल्याप्रमाणें पुरुषार्थ साधन केलेंच पाहिजे.

## आश्रम व्यवस्थेंत जन्मसाफल्य

त्या ध्येयास पोंहचण्याचीं साधनेंहि आमच्या धर्मानें अधिकार-परत्वें सांगून ठेवलेलीं आहेत. जन्मापासून अखेरपर्यंत आचरण्या-साठीं चार आश्रम सांगितले. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यास किंवा चतुर्थाश्रम.

ब्रह्मचर्याश्रमांत शरीर आणि मन–बुद्धीची कमावणी करणें म्हणजे बल, तेज, ओज, विद्या, प्राप्त करून घेऊन शम-दमादि तपस्सामर्थ्या-चीहि जोपासना करणें. हा आश्रम म्हणजे पुढच्या आश्रमांची पूर्व-तयारी आहे. गृहस्थाश्रमांत अर्थ–कामाची आराधना आणि यज्ञ-दानांत त्यांचे फलभोग आहेत. हे दोन्ही आश्रम कर्तव्यबुद्धीनें पाळले जावेत म्हणून प्रत्येक वैदिक धर्मानुयायास त्याच्या जन्माबरोबर ऋषि, देव आणि पितर ह्यांचीं तीन ऋणें येत असतात, असें वेदांनीं सांगितलें आहे. ब्रह्मचर्य आणि गार्हस्थ्य योग्य प्रकारें पाळले म्हणजे हें ऋणविमोचन होतें. ‘ब्रह्मचर्येण ऋषिभ्यो यज्ञेन देवेभ्यो प्रजया पितृभ्यः’ अशी श्रुति आहे. ह्यांत समाजाविषयीचे ऋणहि फिटत असतेच.

वानप्रस्थाश्रम हा संन्यासाश्रमाच्या पूर्वतयारीकरितां आहे. त्यांत गृहस्थाश्रमांतील विषयासक्ति सुटण्याचा आणि चतुर्थाश्रमांतील विरक्ति अंगीं बाणण्याचा अभ्यास होतो. ज्याच्या लोकेषणा, वित्ते-षणा, पुत्रेषणा हट्टानें मारून टाकिल्या आहेत, असा नव्हे, तर ज्याच्या त्या ज्ञानाग्नीनें आपोआपच दग्ध होऊन गेल्या आहेत, जो जीवन्मुक्त अवस्थेस पोहोंचला आहे, अशा विरक्त पुरुषालाच संन्यासाश्रम झेपण्यासारखा असतो. तें कांहीं पंडितगिरीचें वा हटयोगाचें काम नाहीं. त्या आश्रमाच्या पूर्वतयारीस वानप्रस्थाश्रम फार मोठा उपयोगी पडणारा आहे. घरदार, मुलेंमाणसें, व्यापारधंदा ह्यांतून मन काढून

यात्रांनिमित्त दूर जाणें, विशेषत: हिमालयांतील अवघड, गैरसोयीच्या, जिवावरील धोक्याच्या, निर्जन प्रदेशांतील कष्टाच्या यात्रा आवडीनें करणें हाहि एक वानप्रस्थाश्रमांतील अभ्यासाचा पाठ आहे.

वानप्रस्थाश्रमानंतरचा संन्यासाश्रम, ह्या आश्रमासंबंधींचा विचार वर आलाच आहे.

मीं साहेबास म्हटलें कीं, आमच्या धर्माची शिकवण, त्याचे आमच्या आचार–विचारांवर झालेले परिणाम, आणि त्याचमुळें ह्या यात्रेंतील आमचे हेतु, उद्देश व आमची इतिकर्तव्यता ह्या गोष्टींची ओझरती तरी तोंडओळख आतां आपणांस झाली असेल. आतां आमची भूमिका लक्षांत घेऊन तुमचा मघाचा प्रश्न तुम्ही मला पुन्हां विचारा.

साहेब म्हणाले, 'मि. डाटे, माफ करा. मीं तुमचा वेळ घेतला. तुमचे विचार ऐकून तीच शंका मी पुन्हां कशी विचारीन? तुम्हीं तिचेंचसें काय पण आणखी कित्येक शंकांवर प्रकाश पाडला आहे. प्रथम तुमच्याकडून कांहीं कांहीं अधिक स्पष्टीकरण करून घ्यावें अशी इच्छा आहे. मग विचार करून राहिल्या असल्या तर शंका विचारीन. हें काम उभ्या उभ्या वाटेंत होण्यासारखें नाहीं. तुम्ही आलेल्या वाटेंत तीन मैलांवर डोबलभिटा पडाव तुम्हांस लागला होता; तेथें पी. डब्ल्यू. डी. च्या बंगल्यांत मी राहिलों आहे. तुम्ही एकाद दुसरा दिवस तेथें राहावयास येत असाल तर आमच्यावर कृपा होईल. माझी बायको व मुलगी तेथें आहेत. आम्ही तुमची सर्व व्यवस्था ठेवूं. आम्हांस तुमच्यासारख्यांच्या संगतीचा लाभ मिळेल; आणि आपल्याला स्वस्थपणें अधिक विचार करावयास वेळ मिळेल.'

मीं म्हटलें कीं, 'माझे स्नेही-सोबती पुढे गेले आहेत. ते वाट पाहातील आणि त्यांस काळजी लागेल. माझे बोजेवालेहि पुढें गेले आहेत. त्यामुळें इच्छा केली तरी उपाय नाहीं हे म्हणण्यास संकोच वाटतो.' त्यांनीं पुन्हां विनंती करून पाहिलीं. पण थांबणें शक्य नव्हतें. परस्परांनीं शिष्टाचारपूर्वक निरोप दिला व घेतला. त्यांनीं पुन्हां एकदां समाधान व्यक्त करून आभार मानले आणि आम्ही विरुद्ध दिशेनें मार्गस्थ झालों.

हें आमचें बोलणें हिंदीस इंग्रजीची जोड घेऊन अर्धापाऊण तास

झालें. त्यांतील बरेंचसें प्रश्नोत्तररूपांत होतें. येथें दिलेला हा भाग त्या बोलण्याचा आशय आहे.

### तुंगनाथ

चोपता येथें जुनी व नवी असे चट्यांचे दोन ठाव झालेले आहेत. जुन्यावर पाणी मुळींच नाहीं आणि नव्यावर असलें तरी नाहीं म्हणण्यासारखेंच आहे. दोन्ही ठावांत फर्लांग दोन फर्लांग अंतर आहे. येथून पाव मैलावर दोन वाटा फुटतात. डावीकडील तुंगनाथास चढून जाते, व उजवीकडील तीन मैलांवर असलेल्या भीमद्वार चट्टीवर उतरून जाते.

तुंगनाथाच्या डोंगराला झाडीचा स्पर्शहि नाहीं; मात्र हिरवळ आणि मधूनमधून खुरटलेलीं झुडपें आहेत. डोकें फिरवून भोवळ करण्याविषयीं माहीत झालेलीं टीचभर उंचीच्या रोपट्यांची नाना रंगांचीं पंचदली फुलें येथें आहेत. हिरवळीच्या सतरंजीवर जागजागीं त्यांचे ताटवे गालिचे पसरल्याप्रमाणें दिसतात. ह्या फुलांच्या वासानें डोकें फिरणें, भोंवळ येणें वगैरे विकृति होते कीं काय म्हणून पवालींत पाहिल्याप्रमाणें येथेंहि फुलांची परीक्षा पाहिली. पण अनुभव तोच. भोंवळ आली नाहीं कीं मळमळ सुटली नाहीं. तुंगनाथ पहाडाची तीन मैलांची चढण; वाट चांगली पण चढतां चढतां नाकीं नऊ आले. पक्के तीन तास लागले. चढण्याच्या श्रमांत संचरलेली उसनी ऊब वाढत्या उंचीवरील वाढत्या गारव्यानें जिरवून तर टाकलीच, पण कुडकुडण्याची पाळी आली. मोकळ्या व थंड हवेनें अवसान टिकवून धरलें आणि वाढत्या उंचीबरोबर फैलावत जाणाऱ्या क्षितिजावर काय काय दिव्य निर्मिति दिसणार आहेत ह्या जिज्ञासेनें मन आतुर होऊन गेलें. चढण्याचे श्रम होताहेत हें लक्षांतसुद्धां आलें नाहीं. एकदांचा माथा गांठला. वर पोहोंचलों म्हणजे तेथेंच पाय लांब करून थोडीतरी विश्रांती घेऊं हा विचार केव्हांच सुटून गेला होता.


### नैसर्गिक वैभव

सभोंवार दृष्टि जातांच ती तेथें खिळूनच बसली. वरवर चढत होतों तेव्हां तुरळक तुरळक गगनस्पर्शी दिव्य हिमशिखरें तेवढीं ढगांतून डोकावल्याप्रमाणें दिसत. पण वर पोंहोचल्यावर दृष्टीआड आलेला ढगांचा पडदा खालीं राहिल्याकारणानें विश्वदर्शन मोकळें झालें.

त्यावेळीं ढग खालीं राहून आम्ही त्यांच्याहि वर अंतरिक्षांत उभें राहून सभोंवतीं निरीक्षण करीत होतों. प्रथम लक्षांत आलें कीं आम्ही उभें होतों त्यापेक्षां एकहि उंच पर्वत जवळपास दहावीस मैलांच्या फेऱ्यांत दिसत नव्हता. तेथपासून तों दृष्टि पोहोंचते आहे तेथपर्यंत एकामागें एक, अशा उत्तरोत्तर वाढत्या उंचीच्या व दक्षिणोत्तर सीमेस जाऊन भिडलेल्या चारपांच विस्तृत आणि विशाल पर्वतरांगा पसरलेल्या असून क्षितिजावरील शेवटची रांग तर गगनभेदीच आहे. आणि तिनें तुंगनाथाभोंवतीं आपल्या हिमशिखरांचें कडेंच उभें केलें आहेसें दिसलें. पूर्व क्षितिजाकडील धवल शिखरांवर अस्ताचलाआड चाललेल्या सूर्य-नारायणाचें तांबुस, पिंगल असें तेज:पुंज कोंवळें ऊन पडून त्याची प्रभा सोन्याच्या तप्तरसाप्रमाणें देदीप्यमान दिसत होती. त्याचीं त्यावेळची दीप्ति डोळे दिपवून टाकणारी नव्हती; उलट ती आल्हादकारक शिखरदर्शन करून देणारी होती. पैलूदार भिगांतून सप्तरंग झळकावे त्याप्रमाणें हिमशिखरांवरून परावर्तित झालेल्या प्रकाशांत जागजागीं तांबड्या, केशरी, हिरव्या, निळ्या रंगांच्या लकेरी मारीत होत्या. इतक्या लांब असलेलीं शिखरें पण त्यावरच तेवढें चांगलें ऊन होतें म्हणून तीं चक्क दिसलीं. नाहींतर ज्या पर्वतमाथ्यांवरून तीं उंचा-वलीं होतीं त्या माथ्यांवर बर्फ असूनसुध्दां त्यावर तितका प्रकाश नव्हता म्हणून ते स्पष्ट दिसूं शकलें नाहींत. अशी स्थिति झाली असती.

आमच्या समोरील दरी मेघांच्या धूसर आवरणाखालीं लपून गेली होती. त्यामुळें तेथें पाहावयास होतेंच काय? चुकूनसुद्धां कोठेंहि उन्हाचा लवलेश नव्हता. नाहींतर न जाणों उन्हाच्या कवडशानें तळाशीं पडलेला पदार्थ पाण्यांतून अस्पष्ट दिसतो, त्याप्रमाणें ढगां-खालीं दडून गेलेल्या वृक्षांचे शेंडे अंधुकअंधुक तरी दिसले असते.

मागें अनंत–नील–आकाश व पुढें मंद प्रकाश, स्पष्ट दिसणाऱ्या सिंहासनपायऱ्यारूपी पर्वतरांगा आणि मध्यें केदारनाथाचें 'ज्वललिंग' रूपी भव्य, दिव्य नि विराट धवलशिखर अशी ही नैसर्गिक सजावट पाहून आमच्यासारख्या यात्रीस परम समाधान होऊन कृतकृत्यता वाटली तर आश्चर्य नाहीं! पण श्रद्धाविहीन, भक्तिशून्य पण रसिक-कलोपासक असले देखावे पाहण्यासाठीं तासानुतास तिष्ठत बसून



पांडुकेसर – योगबदरी – गांव – अलकनंदा प्रवाह पान २७७



विंचवाचे झाड पान ९६



रुद्रप्रयाग संगम पान ३२४

कृतार्थ होतात हेंहि खरें आहे. परमेश्वरी स्वरूपाच्या नैसर्गिक वैभवाचा हा महिमा असाच असतो !

छाया व प्रकाश ह्यांच्या प्रमाणबद्ध विरोधानें चित्रास ठसठशीत उठाव येतो व त्यांच्या योग्य संमिश्रणांत मार्दव येऊन तें चित्ताकर्षक होतें. तसा दुर्मिळ योग येथें सहजासहजीं साधला होता. म्हणून छायाचित्र घेण्यासाठीं पुष्कळ धांवपळ केली पण 'परस्वाधीन जिणें नि पुस्तकी विद्या' याप्रमाणें झालें. गड्याजवळचा कॅमेरा जाऊन आणण्यांत वेळ गेला आणि तेवढ्यांत ऊन जाऊन चित्र निस्तेज होऊन बसलें. दुर्दैव ! !

बारा सहस्र फूट उंचीवरील निवास व अनुभव

चोपता येथें रात्रीपुरतें अंथरूण पांघरूण व दुसऱ्या दिवशीचें धोतर-पातर वगैरे दोन बोजेवाल्यांजवळ देऊन त्यांस बरोबर घेतलें आणि राहिलेलें सामान दुसऱ्या बोजेवाल्यांजवळ देऊन त्यांना परस्पर भीम-द्वार चट्टीवर जाऊन थांबण्यास सांगितलें. निघतांना आमच्याबरोबर एक पोरवयाचा पंड्या आमचे मागें लागून आला. मला त्याची आवश्यकता होतीच. रात्रीं तेथें राहून सकाळीं तुंगनाथास एकादशनी करून लवकर निघण्याचा बेत केला होता. त्या कामीं मला पहांटेसच देऊळ उघडून मिळण्याची सोय, अंघोळीकरितां पाण्याची सोय, देवळांत उजेडाची सोय करून घेण्यास सहानुभूत सहाय्यक मिळण्याची अपेक्षा होतीच. तो होतकरू व चाणाक्ष बटो होता. माथा गांठण्याच्या सुमारास तो पुढें झटकला. आम्हा चार माणसांकरितां एक स्वच्छ व निवाऱ्याची खोली ठरवून त्यांत उबेसाठीं एक धुनी करण्याकरितां 'फांटे' लांकडेहि त्यानें आणून ठेविलीं होतीं. इतर पंड्यांस परस्पर वाटेस लावून त्यानें आम्हास वरील खोलींत नेलें.

आम्ही अतिशय दमून गेलों होतों. थंडीहि मनस्वी होती; म्हणून तेथें पोहोंचतांच कांबळी पसरली आणि पांघरूण गुरफटून घेऊन अडवारलोंच. थकव्यामुळें दहापांच मिनिटांच्या आंतच डोळा लागूं लागला. पण त्याचवेळीं श्वासोच्छ्वासास अडचण पडूं लागली. डोळ्यांवर झोंप लोंबलेली आणि त्यांतच डुलकी लागली कीं, गुद्मरल्यासारखें होऊन जाग यावयाची. असें पांचसात वेळ झालें;

तेव्हां काहून गेलों. काय बिघडलें आहे कांहींच लक्षांत येईना. जागेपणीं तितका त्रास होत नव्हता, पण डोळा लागला कीं, श्वास कोंडल्यासारखा व्हायचा. आपणास कांहींतरी छातींतील विकार झाला आहे अशी समजूत करून घेतली. घालमेल होऊं लागली. वाटलें कीं, चार माणसें व शिवाय धुनी त्याकारणांनीं खोलींतील हवा दूषित झाली असेल. म्हणून पांघरूण अंगाभोंवतीं घेऊन बाहेर मोकळ्या हवेंत आलों. जरा बरें वाटलें. संध्या करावयाचीच होती व तुंगनाथदर्शनहि घ्यावयाचें होतें, म्हणून देवळांत गेलों. बरोबर सौभाग्यवती पाठोपाठ उठून आलीच. संध्या, मानसपूजा, आरति, देवे, स्तोत्रें देवापुढें बसून म्हटलीं. जवळजवळ एक तास लागला. म्हणतांना एक गोष्ट लक्षांत आली कीं, नेहमींच्या मानानें दम टिकत नाहीं. म्हाताऱ्या माणसांप्रमाणें अखूड अखूड वाक्यें म्हणून वरच्यावर दम घ्यावा लागतो. त्या अवधींत काल्यासारख्या गारफरशीवर एकाच स्थितींत सारखें बसून राहिल्यामुळें आमचे पाय आंखडून बसले. त्यांचें स्पर्शज्ञान नाहींसें होऊन चिमटा घेतलेलाहि कळेनासा झाला. झालेली अवस्था एकमेकांस सांगतों आहोंत, पण जागचे हालतां मात्र येत नाहीं, ह्याचें वाईट वाटण्याऐवजीं हसूंच येऊं लागलें. एका प्रसंगांतून सुटलों तर दुसऱ्यांत अडकून पडलों. वाटूं लागलें कीं, अरेबिअन नाईट्समधील गोष्टींप्रमाणें चेटकिणीच्या कांडीमुळें अर्धांग दगड झालें, किंवा देवाच्या पायरीस पाय लागून शाप झाल्यामुळें पाय गेले. कोणास कांहीं विचारावें तर तेथें चिटपाखरूंहि नव्हतें. प्रसंग आला कीं उपाय सुचतो. हातांनीं धरून एकएक पाय उचलला आणि लांब केला व दोन्ही पाय दहापंधरा मिनिटें चोळून काढले. तेव्हां त्यास स्पर्श कळूं लागून त्यांची बधिरता जाऊन हालचाल पूर्ववत् होऊं लागली. सावकाश आकरा प्रदक्षिणा घालून चट्टींत आलों आणि निजलों. डोळा लागतो न लागतो तो पुन्हां श्वास गुदमरण्याची तीच अवस्था. उपाय काय करावा ह्याची विवंचना पडली. दोघा पंड्यांस होत असलेली व्यथा सांगितली. ते म्हणाले, 'कांहीं नाहीं, आपोआप थांबेल.' मला अधिकच अस्वस्थता वाटूं लागली. पुन्हां निजून पाहिलें. पण दर वेळचा तोच अनुभव. रात्र कशी काढणार ह्याची काळजी पडली. जागूनच काढीन

म्हटलें तर बसल्याबसल्याच डुलक्या येऊन श्वासोच्छ्वास अडखळे. रात्रींचे आठ वाजून गेले असतील. असें खितपण्यापेक्षां खालीं उतरून जावें असें ठरविलें. बोजेवाले उशागतीं पायागतीं पांघरूण दुमडून घेऊन ढाणाढोर झोंपी गेले होते. त्यांच्या कुंभकर्णी झोंपेंतून ते उठतां उठेनात. पंड्यास विचार सांगितला. ते म्हणाले, 'रात्रीं घाट उतरून जाणें धोक्याचें आहे. असलें साहस करूं नका. वाटेनें किर्र झाडी आहे. श्वापदांचें भय नाहीं, पण डोंगरावरून लहानमोठे दगड सारखे कोसळत असतात. दिवसाढवळ्यासुद्धां लक्ष नसलें तर आपघात होतात. शहाणपणा करा व आमचें ऐका.' आमच्या बोजेवाल्यांनींहि त्यांचीच री ओढली. मला किती त्रास होत होता ह्याची त्यांस कल्पना नव्हती. अमोनिया हुंगून हुंगून नाक हुळहुळें होऊन उपयोग नाहीं तो नाहींच. वळकटी बांधली. पंड्याची संभावना केली आणि चट्टीबाहेर पडलों. तेव्हां बोजेवाल्यांना निघणेंच आलें. तेव्हां ते उद्गारले कीं, 'बाबूजी, आपके लिये जान देनेको तय्यार हैं। कुच आंदेशा न करे। भगवान की कृपा हो तो सब ठीक होएँगे।' कंदील लावून घेतला. टॉर्चहि घेतला आणि तुंगनाथाला नमस्कार करून पाय उचलला. पंडेजींनीं काळजी व्यक्त करून पुन्हां म्हटलें, 'विचार करा, भलतेंच साहस करितां आहांत; जपून उतरा.' मीं त्यांस म्हटलें, 'नारायणाच्या दर्शनास निघालों आहोंत. वेडावाकडा प्रसंग आलाच तर त्याचेंच स्मरण करीत येईल. पुन्हां जन्मास येतांना तेंच स्मरण करीत करीत जन्मास येईन. तेव्हां हेतु सिद्धीस जाईल. 'अंते मतिः सा गतिः।' त्यांत बिघडणार काय ?' दीडतास लागला असेल, कंदील व टॉर्च ह्यांच्या उजेडांत निर्विघ्नपणें खालीं उतरलों. मधून मधून दगड कोसळून पडल्याची चाहूल लागे; पण आम्हांस त्रास झाला नाहीं. भीमद्वार येथें स्वस्थ झोंप आली. श्वासोच्छ्वासाची यत्किंचितहि अडचण वाटली नाहीं. मनाला एक हूरहूर जन्माचीच लागून राहिली आहे कीं, केदार आणि तुंगनाथ या दोन्ही ठिकाणीं शिवलिंगावर अभिषेक करण्याची इच्छा व तयारी असतांना योगायोगच असे उत्पन्न झाले कीं कांहींना कांहीं अडचणी उत्पन्न होऊन ते बेत निकामी ठरले. ह्याचा अर्थ निष्ठा नव्हती असें म्हणवत नाहीं. बदरीकेदार

येथें एक दिवस अधिक राहतां आलें असतें व तुंगनाथासही दुसरे दिवशीं सकाळीं वर जाऊन अभिषेक करून येतां आलें असतें, पण हा विचार ही माहिती लिहितांना प्रथमच सुचत आहे. त्यावेळीं तारतम्य चुकलें आणि पुणेंकर मंडळींच्या संगतीची अपेक्षा अधिक धरली. न जाणो ह्या चुकींतच पुन्हां तेथें जाण्याचा योग असेल.

### तुंगनाथ देवालय

तुंगनाथ पर्वताएवढी उंची चारहि धामांपैकीं एकाचीहि नाहीं. ती बारा हजार फुटांवर आहे. बदरीकेदारला जाणाऱ्या यात्रींपैकीं सहस्त्रांत दहाबारा तरी तुंगनाथाला जात असतील किंवा नाहीं ह्याची शंकाच आहे. चोपता चट्टीपासून पगदंडीनें ( मधली वाट—शॉर्ट कट ) गेलें म्हणजे दीड मैलावर तुंगनाथाची भोगमूर्ति आहे. ती एका सुळक्यावर आहे. वरपर्यंत जाणें झेपत नाहीं अशांनीं नाथांची पूजा येथेंच करावी म्हणजे ती त्यास पावते, असें पंडे सांगतात. तुंगनाथाचें देऊळ मोठें आहे. आवार प्रशस्त आहे, शिखर उंच पॅगोडा धाटणीचें आहे; देवळांत लिंग लहानच आहे; त्यास छत्र, चामर, पंचमुखी चांदीचा मुखवटा वगैरे उपकरणें आहेत. पंचकेदारपैकीं हें तिसरें स्थान असून तें बाहूंच्या ठिकाणीं कल्पिलेलें आहे. उखीमठापासून हें साडेएकवीस मैल आहे. आम्ही देवळांत गेलों तेव्हां पुजारी सांजवात करून धूपारती फिरवीत होता. आम्ही निघालों तेव्हां तो प्रदक्षिणा घालीत महिम्न—पाठ म्हणत होता. त्यास रुद्राभिषेक येतो कां म्हणून विचारतां तो म्हणाला, 'तोच तर मी म्हणतों आहें.' महिम्न अतिशय अशुद्ध म्हणत होता. रुद्रमंत्र निराळे आहेत हें त्यास माहीतहि नव्हतें. तो पुजारी पोस्टाकडील सेवानिवृत्त रनर होता. आम्ही तेथें होतों तेव्हां रात्रीं तेथें गडावर अवघी दहाबारा माणसांचीच वस्ती होती. तेथें पाण्याचें फारच मोठें दुर्भिक्ष होतें. करंगळीएवढीहि पाण्याची धार नव्हती. सकाळीं अंघोळीकरितां लागेल म्हणून एक रॉकेलचा डबाभर पाणी मीं पंड्याकडून आणवून ठेवलें होतें. तो डबा भरण्यास अर्धातास लागला होता.

तुंगनाथच्या पहाडावरून यमुनोत्तरी, गंगोत्तरीकडील पर्वतशिखरें केदारशिखर—तें जवळच आहे—आणि बदरी नारायणाचीं नीलकंठ

वगैरे शिखरें दिसतात, असें पंड्याच्या तोंडून ऐकलें व आमचा एक बोजेवाला म्हणाला कीं, येथून कैलासदर्शनहि होतें. पण संध्याकाळची वेळ; त्यांतील एकहि शिखर पाहिल्याबरोबर ओळखूं अशी प्रचीति नाहीं किंवा पडताळा पाहण्याचें साधन नाहीं; अशा स्थितींत खऱ्या-खोट्याची चिकित्सा न करितां येथें नुसती नोंद करून तें काम पुढील यात्रीवर सोंपवितों.

### तुंगनाथ ते चमोली–मंडलचट्टी

गणेश वा ब्रह्मचट्टीपासून तुंगनाथपर्यंत जसा घनदाट झाडींतून नऊ मैलांचा खडा चढ होता, त्याचप्रमाणें तुंगनाथपासून घनदाट अरण्यांतून खडा नऊ मैलांचा मंडल वा मंगलाचट्टीपर्यंत उतार होता. उतारावरील वनांत मोठमोठ्या लांबलचक व जाडजूड कळकाचीं बनें आहेत. उखीमठ सोडल्यानंतर मोठी व सोईस्कर अशी मंडलचट्टीच प्रथम लागली. ती तुंगनाथ पहाडाच्या पायथ्याशीं आहे. तेथील उंची ४३०० ते ४४०० फुटापर्यंत आहे. वस्तीच्या शेवटीं आपल्या नांवास शोभणारी वालखिल्या नांवाची नदी आहे. येथून पुढें वनश्री संपुष्टांत आली; डोंगर उघडे पडलेले व पाणीहि आटलेलें, अशी स्थिति अढळली. तेथें नळानें पाणी आणलेलें आहे. नदीच्या कांठानें शेती आहे. अर्थात् ती डोंगर उतारावर पायऱ्या पायऱ्याप्रमाणें करून घेतलेल्या पट्ट्यावरील आहे. इकडे दोन दोन पिकें काढण्याची पद्धत आहे. पाटाचे पाण्याचा उपयोग करितात. नदीचे प्रवाहांतूनच पाट काढिलेला असतो. धरण किंवा बंधारा असा नाहीं. शेतांत गहूं व भात तयार होत आले होते. भात, पेरणी व लावणी दोन्ही पद्धतीनें करितात. एका चट्टीवाल्यानें – त्याची चट्टी पुलाजवळ होती – चट्टीशेजारीं एका वाडग्यांत भाजीपाला लावला होता. तो पाहूनच समाधान झालें. अजून कोंवळा होता. एक महिना होऊन गेला होता. तसा कुठेंहि नुसता दृष्टीससुद्धां पडला नव्हता. पानकोबी तयार झालेली होती. किंमत विचारतां समजली कीं एकएका देठाची (चार ते सहा पानें आलेला एक देठ) बारा आणे. जेमतेम दोन माणसांस भाजी पुरली असती. मंगल चट्टीपासून अकरा बारा मैलांवर केदारनाथाच्या विराट स्वरूपाचें मुखस्थान जें रुद्रनाथ तें आहे. पंचकेदारपैकीं हें चौथें स्थान आहे.

## गोपेश्वर

मंडलचट्टीपासून साडेचार मैलांवर गोपेश्वर आहे. येथें सर्व चांगलें आहे, पण पाणी नाहीं. आहे तें फार दूर आहे. महादेवाचें मोठें देऊळ आहे. देवळासमोर महादेवाचा एक मोठा अष्टधातूचा त्रिशूळ आहे. येथें महादेवांनीं कामदेवाला जाळून भस्म केलें, अशी स्कंदपुराणांत कथा आहे. येथील पुजारी वीरशैव असून त्यास रावळ म्हणतात. उखीमठाप्रमाणें तेथील रावळांचें दर्शनमाहात्म्य असल्याचें ऐकिलें. गोपेश्वर ही रुद्रनाथाची गद्दी आहे. हिमकालांत रुद्रनाथाची पूजा येथें होते.

## चमोली – लालसांगा

गोपेश्वराहून तीन मैल चमोली आहे. मंडलपासून येथपर्यंत साधारण उतारच आहे. वाटेंत उन्हाचा चटका लागू लागला; व रात्रींहि पुण्यांतील उन्हाळ्याप्रमाणें उकडूं लागलें. चमोली गांव अलकनंदेच्या डाव्या कांठीं उंचावर आहे. वस्ती फारशी नसली तरी तालुक्याचे ठिकाणाप्रमाणें कचेऱ्या, टपाल, तार वगैरे व्यवस्था आहे. सर्व जिन्नस- टॉर्च, बॅटरीज, कॅनव्हस बूट, कंदील, सावण, शिधासामुग्री, खिसमिस वगैरे मिळण्याची सोय आहे. किंमतीहि वाजवी आहेत. हरद्वारपासून बदरीनारायण १८३ मैल आहे. त्या वाटेंत १३६ मैलांवर चमोली आहे. येथून ४७ मैल बदरीनारायण राहातें. केदारकडून आलेली वाट येथें अलकनंदेच्या उजव्याकांठीं मिळते. गांवांत धर्मशाळा चट्ट्या आहेत. पण उजव्याकांठीं ती सोय नाहीं. गांवांत जाण्यास अलकनंदेवर सव्वादोनशें फुटांवर लांबीचा तारांच्या दोरखंडांचा झूला असून त्यावरील डांबरी वाट चार पांच फूट रुंदीची आहे. गांवांत पाण्याची गैरसोय आहे. नदी असली तरी फार खालीं राहते. येथें वस्ती करण्यापेक्षां पुढें वाटेंत दोन मैलांवर मठचट्टी आहे तेथें थांबणें अधिक सोयीस्कर. बदरीनारायणास जाऊन त्याच वाटेनें तेथपर्यंत परत यावें लागतें म्हणून फालतू सामान तेथें ठेवतात. तेथें एक पैशाला पांचप्रमाणें कैऱ्या मिळाल्या. मोठें मिष्टान्नच वाटलें!

## 'गोहनाताल'

पृथ्वीच्या पोटांतील रसरसलेल्या उष्णतेनें पृष्ठभागावर जगड-

व्याळ घडामोडी युगानुयुगें झाल्या आणि अजूनहि होत आहेत. हें आसाममध्यें झालेल्या भूकंपानें नुकतेच प्रत्ययास आलेलें आहे. हिमालयाचा जन्मच असल्या अघटित घटनांतून झालेला आहे.

एका ठिकाणचा डोंगर उडून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन बसतो, म्हणूनच इंद्रानें त्यांचे पंख छेदून टाकिले. त्यानें वृत्रासुराला मारून पाण्याचे मार्ग मोकळे केले. मंजुश्रीनें आपल्या खड्गानें एका घावांत डोंगरांचा चक्काचूर करून टाकिला, आणि तेथील सांठलेलें पाणी वाहून जाऊन तेथें जमीन वर आली...वगैरे प्रकारचीं वर्णनें आपल्या व बौद्ध पुराणांतून केलेलीं पुष्कळ आढळतात. तीं रूपकात्मक व काव्यमय असतात इकडे दुर्लक्ष झाल्याकारणानें तीं अतिशयोक्तीचीं किंवा असंभाव्यतेचीं वाटतात. पण मूळ घटनेकडे लक्ष दिलें तर हीं वर्णनें अतिरंजित नाहींत व निव्वळ कल्पितहि नाहींत अशी 'गोहनाताल'च्या निर्मितीवरून खात्री पटेल.

चमोलीपासून पंचवीस मैल पूर्वेस त्रिशूल नांवाचें २५६६० फूट उंचीचें हिमशिखर आहे. त्यापासून निघालेली विरही गंगा चमोलीपासून चार मैलांवर अलकनंदेस छिनका चट्टीजवळ यात्रा वाटेच्या पलीकडील कांठीं येऊन मिळते. सत्तावन वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. विरहीच्या संगमापासून सातआठ मैल वरचें अंगास तिच्या कांठचा एक डोंगरकडा पात्रांत कोसळून प्रवाह अडवून बसला. ह्या बांधाची लांबी दोन मैल, रुंदी तळाशीं ११००० फूट व माथ्यावरची २००० फूट आणि ह्या बांधाची उंची ९०० फूट होती. एवढा अवाढव्य भराव म्हणजे तो एक प्रति डोंगरच झाला. एका जागचा डोंगर उचलून दुसऱ्या जागीं फेकला गेला, किंवा तो एका ठिकाणावरून उडून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन बसला. आणि हेंच वृत्त सहज लक्षांत यावें म्हणून रूपक करून सांगितलें कीं, देवांचा हितशत्रु जो असुर तो विरहीच्या पात्रांत देवांना पाणी मिळूं नये म्हणून अडवारून पडला, तर ह्या वर्णनावरून ही गोष्ट अतिशयोक्तिपूर्ण वा कल्पित आहे असें वाटण्याचें कारण नाहीं.

दुसऱ्याच वर्षीं पाणी ९०० फूट चढून बांधावरून वाहूं लागलें. तेव्हां तीनशें नव्वद फूट बांध कोसळला आणि दहा अब्ज घन फूट

पाणी सहा तासांत वाहून गेलें. त्यामुळें गोहना, चमोली, नंदप्रयाग, कर्णप्रयाग, श्रीनगर व देवप्रयाग येथील वस्ती वाहून गेली. अवशेष राहिलेल्या बांधानें तेथें एक सुंदर तलाव झाला आहे. त्याची लांबी दोन मैल, रुंदी अर्धा मैल व खोली पांचशें फूट आहे. हा गोहनाताल नैनीतालच्या तिप्पट मोठा आहे. शेजारींच गोहना गांव आहे, त्यावरूनच त्याचें नांव गोहनाताल पडलें. त्या तलावांत नौकाविहाराची सोय आहे. नावाडी तेथेंच विरही गावांत राहातो. चमोलीपासून गोहनाताल बारा मैल आहे. तेथें जावयास चांगली वाट आहे.


## मठ चट्टी

चमोलीपासून दोन मैलांवर मठ चट्टी आहे. चमोलीपेक्षां येथें थांबणें सर्वच दृष्टीनें सोयीस्कर. चट्टया पुष्कळ आहेत. दुकानें आहेत. पाणी विपुल आहे. भोवतीं केळीचे बाग आहेत, झाडी आहे. त्यामुळें हवेंत थोडा गारवा असतो. मंडल चट्टीपासून तों गुलाबकोटीपर्यंत चांगलाच उन्हाळा भासतो, व त्या वाटेवर चट्टीशिवाय पाणी मिळण्याची सोय नाहीं. तेथें जवळच शेंसव्वाशें फूट उंचीवरून पडणाऱ्या पाण्याच्या धारेची तुषारवृष्टि होत आहे. त्याखालीं बसून तुषारवृष्टींत स्नान करण्याची मोठी मौज आहे.

## पिप्पल कोटी

मठचट्टीपासून मैला दोन मैलावर असणाऱ्या दोन तीन चट्टया सोडून साडेपांच मैलांवर हाट चट्टी आहे. तेथें झुल्यावरून अलकनंदा ओलांडून तिच्या डाव्या कांठानें वाट पुढें जाते. तेथून दोन मैलांत बाराशें फूट चढून गेलें म्हणजे पिप्पल कोटी चट्टी येते; तिची उंची पावणेपांच हजार फुटापर्यंत आहे.


तो गांव मोठाच म्हटला पाहिजे. पांचपंचवीस घरें असून सर्व बाजारहाट मिळतो. त्यांत डोंगरी जिनसा—शिलाजित, गंगावन, कस्तुरी, कांहीं वनस्पती वगैरे मिळतात. ज्या घ्यावयाच्या असतील त्यांची जातांना पाहणी व चवकशी करून त्या येतांना विकत घ्याव्या. येथें पाणी आहे; पण पुढें चार मैलांत त्याचा थेंबहि दिसावयाचा नाहीं. वाट सपाटीचीच आहे, पण सांवली नाहीं व उन्हाचा मारा चांगलाच जाणवतो.



गुप्तकाशी गांव पान २३९



गंगा प्रवाह पान २७९



गुप्तकाशी - मनकार्णिका कुंड व विश्वेश्वर मंदीर. पान २४०

## गरुड गंगा

पिप्पलकोटीपासून चार मैलांवर गरुड गंगा चट्टी आहे. येथें एक लहानशी गरुड गंगा नांवाची नदी व गरुड भगवानाचें लहानसें देऊळ आहे. गरुड गंगेचें पाणी वाहतें पण संथ असून छाती इतकें खोल आहे. तळाशीं गाळ यत्किंचितसुद्धां नाहीं. आंतील निरनिराळ्या रंगाचे वाळूचे खडे रत्नांसारखे चमकून दिसतात. काय घटना किंवा दृष्टिभेद होत असेल तें सांगतां येत नाहीं. तेथें दिसणारे तेजःपुंज दगड, वाळूचे खडे, आपल्याकडे आणून पाहिलें म्हणजे ते तेजोहीन रुखे दिसतात. हा कां हवेचा गुण ! कां पाण्याचा ! कां दृष्टीचा ! कां आणखी इतर कशाचा ! हें वास्तव शास्त्रज्ञांनीं सांगावें. येथें उकाडा चांगलाच वाटत होता. पण गरुड गंगेचें पाणी गारठणक व स्वच्छ असलेमुळें त्यांत स्नानाची मौज आहे. हवें तेवढें डुंबावें.

गरुड गंगेंत डोळे मिटून बुडी मारावी आणि हातास येईल तो दगड घेऊन त्याचा गरुडास स्पर्श करावा. हा दगड जवळ बाळगिला म्हणजे सर्पाचें भय राहात नाहीं. ह्या दगडाच्या स्पर्शानें सर्पदंश तत्काळ उतरतो, अशी येथील लोकांची श्रद्धा आहे.

आपणांस महाविष्णुची अखंड सेवा घडावी, आपण त्याचें वाहन व्हावें म्हणून गरुडांनीं येथें तपश्चर्या केली होती.

पिप्पलकोटीपासून गरुड गंगेच्या वाटेवर एके ठिकाणीं सफेता नव्हे, पण तशीच पांढरी स्वच्छ, वस्त्रगाळ केल्यासारखी मऊ, कोरडी व जड अशी माती डोंगर लगत्यास दिसून आली. ती उघड्यावरच हवापाणी खात असतांना तिच्या रंगरूपांत फेर पडलेला दिसला नाहीं. ती संगजिऱ्याची नव्हती ही निश्चिती करून घेतली. हबकचा रंग करण्यास हिचा चांगला उपयोग होईल अशी कल्पना आली. गरुड गंगेजवळ काळ्या पातळ पापुद्र्याचे फरशीवजा दगड आहेत. हें जवळून पाहातां आले नाहींत. तरी ते स्लेट पाटीचे नाहींत.

## पाताळ गंगा

गरुड गंगेपासून पाताळगंगा साडेतीन मैल आहे. तेथें पाताळगंगेचें पात्र विस्तृत असलें तरी प्रवाह लहानच आहे. तेथील विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे येथील डोंगर अतिशय ठिसूळ आहे. तो

म्हणजे माती, वाळू व खडी ह्यांची केलेली एक रास आहे. ह्यांच्या कडेनें केलेल्या वाटांस धर नसल्याकारणानें त्या नेहमीं ढांसळत असतात. हा सबंध डोंगर असाच आहे. तेथून सावधानतेनेंच गेलें पाहिजे.

## हेलंग

पाताळ गंगेपासून चार मैलांवर हेलंग गांव आहे. केदारनाथाच्या विराट पुरुषाच्या मस्तकावरील जटास्थानीं जें कल्पेश्वर स्थान आहे त्यास तेथून जावें लागतें. तेथून अलकनंदेच्या पैलतीरावरून साडेपांच मैल उर्गम गांव आहे. तेथें कल्पेश्वर महादेवाचें पंचकेदारांपैकीं पांचवें स्थान आहे.

## पंचबदरी

हेलंगपासून जोशी मठ सात मैल आहे. वाटेंत एक मैलावर खनोल्टी चट्टी लागते. तेथून अर्ध्याच मैलावर वृद्धबदरी किंवा आदिबदरी स्थान आहे.

पंचकेदारप्रमाणें पंचबदरीहि आहेत. त्या पंचबदरी येणेंप्रमाणें— १ आदिबदरी, २ विशालबदरी, ३ भविष्यबदरी, ४ योगबदरी व ५ ध्नानबदरी.

## चुलू फळ

जोशी मठापासून एक मैल अलीकडे संघधारा वा सिंहधारा नांवाची चट्टी आहे. तेथें चुलू नांवाची साधारण पोफळाएवढालीं ओलीं फळें पैशास सहाप्रमाणें मिळालीं. हीं पिकलेलीं पिवळ्या रंगाचीं असतात. कच्च्यांचा रंग हिरवा असतो व तीं आंबट असतात. हीं दळदार असून त्यांत रेषा नसते. पिकलेल्या फळांची चव पोपईसारखी व गाभुळलेल्यांची चव आंबुसगोड असते. हिरवीं फळें वाळवून त्यांचा उपयोग चिंचेसारखा करितात. ही जर्दाळूची जात असावी असें वाटतें. ह्या फळांत एकच बी असतें. व ती फोडली म्हणजे त्यांत जर्दाळूंतील बदामाएवढा बदाम निघतो. ह्यांत कडू बदाम निघणाऱ्याहि जाती आहेत. तेथील उंची साडेपांच हजार फुटांवर आहे.

## जोशीमठ वा ज्योतिर्मठ

जोशी मठ हें गांव तालुक्याचे गांवाप्रमाणें आहे म्हटलें म्हणजे तेथें सरकारी सर्व व्यवस्था आलीच. गांवांत दोनशें उंबरठा आहे.

बाजारहाटहि मोठा आहे. भाज्या, विडचांचीं पानेंहि येथें मिळतात. श्रावण घेवडा व तोहि अगदीं निबर बारा आणे शेर भावानें तेव्हां होता.

श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं आपल्या अद्वैत तत्त्वज्ञानानें बौद्धमताचें खंडन करून त्या धर्माचा प्रसार थोपवून धरिला; इतकेंच नव्हे तर पुन्हां वैदिक धर्म जागृत करून बौद्ध धर्माचें उन्मूलन करून टाकिलें. ही बाराशें वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. तेव्हां त्यांनीं भारतवर्षाच्या चारहि दिशेस धर्मरक्षणार्थ चार मठ स्थापन केले. त्यांपैकीं उत्तरेकडे मठ स्थापन केला तो बदरिकाश्रमीं. त्याची गद्दी येथें आहे. शंकराचार्यांनीं स्थापन केलेल्या मठाधिपतीची शिष्यपरंपरा खंडित होऊन तो अधिकार रावळांच्या हातीं गेला आहे.

जोशी मठ येथें मुख्य देवळे आहेत तीं:—शारदंबा—दुर्गादेवी. तेथें दंडधारा नांवाचें तीर्थ आहे. दोन जलधारा अक्षय्य वहात आहेत. त्यांसच दंडधारा नांव आहे.

## कत्युरी साम्राज्य

बदरीदत्त पांडेजी कहतें हैं कि ' जोशी मठ में वासुदेव का प्राचीन मंदीर है । कहा जाता है कि यह कत्युरियोंके मूल पुरुष वासुदेव का बनवाया है । इससे प्राचीन मंदीर कुमाऊं में कोई नहीं । कत्युरी सम्राट का नाम इस मंदीर में इस प्रकार खुद्दा है—"श्रीवासुदेव गिरिराज चक्रचूडामणी । " यह सम्राट जोशी मठ में रहते । ( कत्यूरी साम्राज्याचा काल इसापूर्व २५०० वर्षे ते सन ७०० पर्यंत. त्यावेळीं कत्यूरी साम्राज्याचा विस्तार उत्तरेस अफगाणिस्थान ते सिकीम दोन्ही धरून, दक्षिणेस बिजनौर, दिल्ली, रोहिलखंड वगैरे प्रांतासुद्धां एवढा होत.)

## नृसिंह स्थानासंबंधीं आख्यायिका

वासुदेवस्थानाचें माहात्म्य चारसाडेचार हजार वर्षांपासून म्हणजे पुराण कालापासून असल्याचा ऐतिहासिक पुरावा हा आहे. त्याचप्रमाणें नृसिंहस्थानासंबंधीं अशी आख्यायिका ऐकू येते कीं, वासुदेव सम्राटाचा पौत्र वा प्रपौत्र शिकारीस गेला असतां भगवान् विष्णु अतिथीरूपानें राजवाडचांत आले. अतिथीधर्माप्रमाणें राणीनें त्यांचा यथायोग्य सत्कार केला. भोजन झाल्यावर हे राजश्री बेधडक राजमहालांत जाऊन पलंगावर निजले. राजगृहांतील राणीसुद्धां सर्व

मंडळी भिऊन गेली. राजा शिकारीहून परत आल्यानंतर त्यास हें वर्तमान समजलें, तेव्हां संतापून जाऊन त्यानें त्याच्यावर तरवारीनें वार केला.

शस्त्राघातानें रक्ताऐवजीं दुधाच्या धारा वाहूं लागल्या. राजा चकित झाला आणि त्यानें राणीस विचारलें कीं हा कोण पुरुष आहे ? तिनें सांगितले कीं, हा देवतारूपी अतिथि असावा. राजा दचकला व हात जोडून आपली चूक झाल्याचें पश्चात्तापपूर्वक कबूल करून क्षमा मागूं लागला. अतिथिनें सांगितलें कीं, मी नृसिंह आहें. तुझ्या प्रजापालनाच्या दक्षतेवर मी संतुष्ट होऊन तुझ्या घरीं आलों. ह्या दुष्कृत्याबद्दल तुला दंड केलाच पाहिजे. तुला बजावून ठेवतों कीं, तूं आपली राजधानी–तेथून जोशी मठाहून हलवून–कत्यूरींत कर; माझ्या हातावर बसलेला हा घाव देवळांतील माझ्या मूर्तीवर स्पष्ट दिसेल असें कर, आणि जर का ही मूर्ति फुटून तुटून नाहींशी होईल तर तुझ्या वंशाचाहि लोप होईल. एवढें बोलून अतिथि अंतर्धान पावला. देवळांतील नारसिंह मूर्तीचा एक हात अतिशय कृश असल्याचें लक्षांत येतें. ह्याचसंबंधीं अशीहि समजूत प्रचलित आहे कीं, हा कृश हात जेव्हां गळून पडेल तेव्हां नरनारायण पर्वत बुडून जाऊन बदरीनारायणास जाण्याकरितां वाटच राहाणार नाहीं. त्यावेळीं बदरी विशालाचें पूजन–अर्चन येथूनच सात मैलांवर असलेल्या पंचबदरीपैकीं तिसरी जी भविष्यबदरी तेथें होईल.

### बदरीक्षेत्रांची वेस–जोशी मठ

जोशी मठाची उंची ६१०० फूट आहे. येथून बदरीनारायण वीस मैल आहे. जोशी मठ हें बदरीनारायणाचें नाक आहे. हें कां बंद झालें कीं बदरीनारायणाची वाट आटोपलीच म्हणून समजावें आणि कुमारसंहितेंत म्हटलें आहे कीं, जोंपर्यंत ज्योतिर्मठ येथें विष्णूचा वास आहे तोंपर्यंतच बदरीचें दर्शन सुलभ आहे, नाहींतर आशासुद्धां करावयास नको. बदरीनारायणाच्या पुण्य तपोभूमीस येथूनच प्रारंभ होतो असें मानिलें जातें. येथूनच कैलास मानस सरोवरास एक मार्ग नीती घाटानें गेला आहे. त्याची माहिती कैलास यात्रा प्रकरणीं येईल.

## गप्पागोष्टींचे चव्हाटे

पुण्यांत सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं अशीं कांहीं दुकानें होतीं, कीं जेथें संध्याकाळीं पांचदहा सभ्य गृहस्थ जमून घटका दोन घटका गप्पागोष्टी करतांना प्रचलित विषयांचा ऊहापोह करीत. हिमालयांतील जरा मोठ्याशा गांवांतून अशा तऱ्हेनें गांवकरी जमण्याचा प्रघात असल्याचें दिसून आलें. गांवांतील एकोपा, संघटन ह्या दृष्टीनें ही प्रथा अनुसरणीयच आहे.

जोशी मठ येथें अशा प्रकारें जमण्याचें एक कैलासकीर्ति आश्रम नांवाचें दुकान आहे. त्यांत औषधी मिळतात, पुस्तकें मिळतात, सर्व कांहीं मिळतें. तेथें बाबा सिद्ध सुंदरनाथजी ह्यांचें छायाचित्र पाहिलें. तेव्हां दुकानदाराकडून माहिती मिळाली ती येथें हेतुपुरःसर देत आहे. अनेक लोक प्रश्न विचारतात कीं, तुम्हास हिमालयांत कोणीं सिद्धपुरुष भेटले कां ? त्यांच्या प्रश्नाचा भाव इतकाच समजून चालतों कीं, हिमालयांत असे पुरुष आहेत कां ? त्यादृष्टीनें हा वृत्तांत देत आहें.

बाबा सुंदरनाथजी हे एक सिद्ध योगी आहेत. त्यांचें शरीर भव्य असून डोकीवर जटाभार आहे. ते कोठले राहणारे, त्यांची जातपातगोत ह्याचा कांहीं पत्ता नाहीं. ते कोणाशीं बोलतहि नाहींत. त्यांच्या लहरीस येईल तिकडे ते जातात. ते नेहमीं उघडेच असतात. हिंडतांफिरतांना ते कोणासहि आढळलेले नाहींत. आडवाटेला रानावनांत कोठेंतरी ध्यानावस्थेंत बसलेले असतात. बर्फांत छातीपर्यंत बुडून गेलेले, असेहि ते आढळले आहेत. ते नेहमीं डोळे मिटून असतात. पण जर ते उघडे असले तर चमकून दिसतात. ध्यानावस्थेंत असतांना परीक्षा पाहण्यासाठीं त्यांना कोणीं डागलेंहि आहे. त्यांच्या खाण्यापिण्याविषयीं कांहीं व्यवस्था असल्याचें कोणासच कांहींसुद्धां माहिती नाहीं. एकेका ठिकाणीं बसले म्हणजे महिनामहिना जागचे हालतसुद्धां नाहींत. 'आमचे समक्ष एकदां दहापंधरा शेर दूध व मिठाई त्यांस भरवली असतां त्यांनीं खाल्ली आहे. त्यांचें वय शंभर वर्षांचें पुढील आहे ' असें वृद्ध मंडळींच्या बोलण्यावरून समजलें. बदरीनारायण, केदारच्या पहाडांत ते कोठेंतरी असतात.

## विष्णु प्रयाग

जोशी मठ ज्या डोंगराचे माथ्यावर आहे त्याच्याच पायथ्याशीं विष्णुप्रयाग आहे. माथ्यावरून पायथ्याशीं येण्यास दोन मैलांत बाराशें फूट उतरावें लागतें. पायथ्याशीं अलकनंदा आणि धौलीगंगा ह्यांचा संगम आहे. धौलीगंगेस विष्णुगंगा असेंहि नांव आहे. अलकनंदेपेक्षां धौली गंगा सर्वच दृष्टीनें मोठी आहे. तिचा उगम सत्तर मैलांवरील १६६२८ फूट उंचीच्या नीती घाटांतून झालेला आहे. तिच्या प्रवाहाचा वेगहि फारच जोराचा आहे. धवलगंगा शरिरानें अशी एवढी मोठी असली तरी अलकनंदेचा महिमा पुण्यपावन, पवित्र स्वर्नदीच ती, म्हणून अलौकिक आहे. संगमस्थानासच विष्णुप्रयाग म्हणतात.

विष्णुप्रयाग येथें उभे राहण्याइतकीसुद्धा सपाटी नाहीं. एकमेकीस काटकोन करीत असलेल्या दोन खिंडींतून येऊन ह्या दोन्ही नद्या कोपऱ्यावर संगम पावतात. संगमापासून वाट पन्नासपाऊणशें फूट उंचीवरून जाते. तेथपर्यंतच काय पण पुढें वरपर्यंतसुद्धां भिंतीसारखा उभा चढ आहे. वाटेवर चट्टी वा धर्मशाळा नाहीं. हातगाडीवर घालून जिन्नस विकावे त्याच धर्तीचीं दोन दुकानें उतारावर आहेत. वाटेवरून संगमापर्यंत उतरण्यास जागा मिळाली. त्यांत लहानलहान कमी-अधिक उंचीच्या पायऱ्या खोदल्या आहेत. अर्ध्या वाटेंत एक लहानसें अन्नपूर्णेचें देऊळ बांधलेलें आहे.

संगमावर पांच–सात माणसें उभीं राहातील असा खडक आहे. दोन्ही नद्यांच्या पाण्यास ओढ मनस्वी आहे. पाण्याची खोली किती असेल त्याचा अदमास लागत नाहीं. आंत उतरण्यास ठाव नाहीं आणि धाडसहि होत नाहीं. पाणी गारठणक असतें. कांठाशीं बसून तांब्यानेंच स्नान करावें लागतें. पाण्यावर कंबरेइतका आलेल्या गोटयावर बसून संध्यादि नित्यकर्म आटोपलें. तेव्हां गंमत पाहावयास सांपडली कीं, एकदां आचमनाकरितां तोल संभाळून जवळजवळ आडवें होऊनच आचमनास पाणी घेतां येई, तर दुसरे वेळीं पाण्याची लाट बसलेल्या गोटयावरून जाई. दोन्ही नद्यांच्या प्रवाह – घोषानें वातावरण निनादून सोडलें आहे. दोन्ही वेगवान नद्यांच्या संगमांत पाण्याचा कल्लोळ

माजून उचंबळलेल्या पाण्याचे फवारे उडतात. त्याचा देखावा तेथून दृष्टि काढूंच देत नाहीं. त्यांतच इंद्रधनुषी रंगाचा सारखा नाच इतस्ततः चालू असतो. खरोखर पाहिलें तर, इतक्या अवघड वाटेनें जीव मुठींत धरून खालीं उतरून जावयाचें, त्या अकुंचित खडकावर भोंवतीं पाण्याची धुमश्चक्री उडाली आहे तेथें बसून स्वस्थपणें हा देखावा पाहावयाचा, म्हणजे ही सुळावरील पोळीच वाटण्याचा संभव आहे. एखाद्या नवख्यास असें वाटलें तर नवल नाहीं. पण असल्याच वातावरणांत जवळजवळ तीन साडेतीनशें मैल प्रवास झाल्यानंतर दैनंदिन सरावानें भयभीतीची बूझ आपोआप नाहींशी होऊन गेलेली असते. संगमस्नान करण्याचा ओढा मनावर असतो. आणि अशाच नैसर्गिक घटनेंत परमेश्वरी गूढ, अगाध सामर्थ्याचें गुणदर्शन होऊन मनावर चिरकालिक ठसे उमटत असतात, ह्या जाणिवेनें धास्ती शिवतसुद्धां नाहीं.

नऊदहा मैलांची चाल झाली होती. ऊन लागून थकवा आला होता. अशा वेळीं गंगेच्या स्नानानें सर्व शिणवा निघून जाऊन नवचैतन्य आलें. संध्या अभिषेक करून प्रसन्नता वाटली. पाण्याच्या धुमाकुळाकडे लक्ष लागून राहिलें होतें. तेथपर्यंतचा प्रवास पदरांत पडल्याची कृतकृत्यता वाटत होती. विचार सुचला कीं, देवदर्शनाकरितां देवळांत गेलें तर देवाचें मंदिर, त्याची प्रत्यक्ष मूर्ति, त्याची सजावट व त्याचे पूजन अर्चनाचे सर्व भोग, ह्या सर्व गोष्टी मनुष्यकृतच असल्यामुळें त्यांत देवदर्शन झालें तरी तें मानवी गुणांचेच होणारें असतें. देवदर्शन माझ्यासारख्या माणसास व्हावयाचें असेल तर तें त्याच्या गुणांतच होणारें आहे. अशी दृढ समजूत असल्याकारणानें तेथें विचार उभा राहिला कीं, आपल्यापुढें उभे असलेले हे गगनभेदी पहाड, प्रवाहाची अविरत चाललेली धुमाळी, त्यांत चाललेल्या उलथापालथी, त्या ज्याच्या सत्तेनें चालू आहेत त्याच्या सामर्थ्याचें, शक्तीचें, यथार्थ दर्शन होण्यास ह्या नैसर्गिक देवळापेक्षां अधिक योग्य असें देऊळ कोठें असणार आहे ? त्याचे अगाध गुण कळण्यास तेथें त्याच्या मूर्ति नकोत किंवा पुराणेंहि नकोत. ते साक्षात्कारांतच पाहावें. त्या दृष्टीनें देवळांत जाऊन बसण्यापेक्षां अशा ठिकाणीं अभ्यासा-

करितां येऊन बसणें अधिक परिणामीं आहे. आणि म्हणूनच ऋषी-मुनींनीं इकडे येऊन तपाभ्यास केले असले पाहिजेत.

आणखी एक विचार असा सुचतो कीं, जेव्हां ईश्वरी साक्षात्कारा-सारखे विचार प्रमुख्यानें पुढें उभे राहतात तेव्हां मनाच्या विचार-अवस्थेची पातळी दैनंदिन व्यवहार–अवस्थेच्या पातळीपेक्षां अगदीं भिन्न असते. व्यवहारी अवस्था कोणत्या ना कोणत्या रूपानें स्वार्थी म्हणजेच संकुचित असते. ईश्वरी म्हणजेच यथार्थ विश्वदर्शनास लागणाऱ्या बुद्धीची अवस्था ब्राह्मी म्हणजे सर्वभूति परमेश्वर पाहण्याची असते. त्या दोन्ही अवस्था परस्परविरुद्ध असल्याकारणानें त्यांच्यांत साहचर्य सहजच नाहीं. म्हणून हा जो ब्राह्मी विचार त्याचा मननादि अभ्यास करण्यास व्यवहारक्षेत्रापासून अलिप्त पण त्या अभ्यासास अनुकूल अशी पुण्य व पवित्रभूमि येथें सहजलभ्य आहे.

असल्या प्रकारचे विचारतरंग उठत असतांना बराच वेळ झाला तरी तेथून उठावेसेंच वाटेना. नित्य पठाणांतील गंगेचें माहात्म्य गुण-गुणूं लागलों: 'गांगंवारी मनोहारी मुरारिचरणच्युतं। त्रिपुरारि शिरश्चारि पापहारि पुनातु माम् ॥ पापापहारि दुरितारितरंगधारि। शैलप्रचारि गिरिराजगुहाविदारि। झंकारकारि हरिपादरजोपहारि गांगं पुनातु सततं शुभकारिवारि। भगवति तव तीरे नीर मात्राशनोहं विगतविषयतृष्णः कृष्णमाराधयामि। सकलकलुषभंगे स्वर्गसोपानसंगे प्रचुरतर तरंगे देवि गंगे प्रसीद ॥ विष्णुपादाब्ज संभुते गंगे त्रिपथ-गामिनी। धर्मद्रवेति विख्याते पापं मे हर जाह्नवी॥' मनांत आणखी एक असा विचार डोकावला कीं, नारायणा! आम्ही किती अभागी आहोंत, क्रियाशून्य आहोंत, करंटे परप्रत्ययनेय बुद्धी आहोंत कीं, ह्या सहज उत्पन्न होणाऱ्या प्रचंड प्रवाह–शक्तीचा स्वार्थाकरितां कां होईना उपयोग करून ऐश्वर्यवान होण्याची महत्त्वाकांक्षा आम्हांस का होऊं नये? वर्षानुवर्षें ग्रा शक्तीचा अपव्यय किती काल चालूं राहाणार? हिमालयांतील सर्वच नद्या अशा वेगवती आहेत. त्यांचा उपयोग करून घेतला तर लाखोंच काय पण कोटयावधी गणतीची अश्वशक्ति वीज अत्यल्प खर्चांत म्हणजे त्या मानानें फुकटच पदरांत पडून भारत देशांत पुन्हां सोन्याचा धूर निघूं लागेल!

## पांडुकेश्वर

विष्णुप्रयागहून एक मैल बलदोडा, पुढें तीन मैल घाट व पुढें अडीच मैल पांडुकेश्वर ह्याप्रमाणें चट्टया आहेत. पहिल्या दोन चट्टया वस्तीस राहण्याच्या कामीं अगदीं गैरसोईच्या आहेत.

पांडुकेश्वर हा गांव, वाटेंत लागणाऱ्या मोठ्या गांवांत मोडण्यासारखा आहे. पांचपन्नास घरांची वस्ती आहे. चट्टया, धर्मशाळा आहेत. तेथून पुढें वाढती थंडी होत गेली असल्यामुळें गोरगरीब व साधू—बैरागी लोकांस सात दिवस वापरण्याकरितां पट्टू—बुर्णसासारखीं जाड कांबळीं—काळी कमळीवाले ह्या संस्थेकडून विनामूल्य मिळण्याची सोय आहे.

पांडुकेश्वर गांव डोंगरपायथ्याशीं त्याच्या उतरणीवर अलकनंदेच्या कांठीं वसला आहे. हरद्वारपासून बदरीनारायणास गेलेल्या वाटेवर हा गांव १७२ मैल असून तेथून पुढें बदरी ११ मैल राहाते. त्याची उंची ६००० फूट आहे. विष्णुप्रयागपासून घाट चट्टीपर्यंत, चार मैल वाट गंगेच्या डाव्या व उजव्या कांठाकांठानें पात्रापासून अदमासें दीड ते दोनशें फूट उंचीवरून गेलेली आहे. दोन्ही कांठावरील पहाड सुळाक्यासारखे उभे आणि इतके जवळ जवळ आलेले दिसतात कीं, एखादा काळवीट इकडून तिकडे सहज उडी मारूनसुद्धां जाईल. ह्या गगनस्पर्शी पहाडांचा माथा कितीहि मान वर केली तरी दिसत नाहीं. पक्का म्हणण्यासारखा त्या पहाडांचा दगड आहे आणि म्हणूनच वाट कोसळण्याची भीति नाहीं. बहुतेक वाट अरुंदच आहे. पण त्यांतहि कित्येक ठिकाणीं ती जेमतेम पाऊलभर रुंदीची असून तेथें पाणी झिरपून घसरंडीहि झालेली आहे. वाटेवरून चालतांना फार जपूनच जावें लागतें. एका बाजूस तुटलेला कडा तर दुसऱ्या बाजूस त्याचीच उभी भिंत. खालीं, वर पाहण्याची सोयच नाहीं.

विष्णुप्रयागपासून पांडुकेश्वरपर्यंत अलकनंदेचा प्रवाहमार्ग जितका चित्रमय व आकर्षक आहे तितकीच त्याच्या कांठची वाट डोळे फिरवून भीति उत्पन्न करणारी आहे. कांठच्या दोन्ही पहाडांतील दरी अलकनंदेनें आपल्या प्रवाहानें निर्माण केलेली असो, नाहींतर मूळच्याच दरींतून तिचा प्रवाह वाहात असो, तो लांबून जोरानें वाहात येत अस-

लेला विष्णुप्रयागपासून दिसत असतो. एक मैलपर्यंत पहाड उघडा-बोडका असला तरी पुढें मात्र दाट झाडी आहे. झाडी असो नाहींतर नसो, पहाडाच्या उंचीमुळें वाटेवरून जातांना ऊन लागण्याची शंका-सुद्धां नको. त्याचप्रमाणें पहाडावर ऊन पडून तें भकास दिसण्याचीहि शंका नको. मध्यान्हाशिवाय प्रवाहास सूर्यदर्शनाचा योग नाहीं. पण तो येतो तेव्हां मात्र तेथें एक अलौकिक चमत्कार दृष्टीस पडतो. एवढी मोठी नदी पण वाटेवरून एखाद्या काल्व्यासारखी दिसते. थंडीच्या दिवसांत आपल्याकडे नदीचें पाण्यावर हात दोन हात जाडीचा धुक्याचा दाट थर ढगासारखा अधांतरी लोंबत असलेला दिसतो. अगदीं त्यासारखाच, प्रवाहाच्या आदळआपटीनें उडविलेल्या तुषारांचा ढग येथील प्रवाहावर लोंबत असलेला दिसतो. त्यावर दुपारीं ऊन आलें म्हणजे दरीमध्यें सर्व वाटभर एकापुढें एक अशीं अनंत इंद्रधनुष्यें दिसत असतात. ह्या ठिकाणचा देखावा मोठा रमणीय आहे. पण अलकनंदेच्या प्रवाहाचा चाललेला मूळचाच उच्च घोष आणि त्यांतच प्रचंड पहाडांच्या खोल दरींत उठलेला उच्चतर प्रतिघोष ह्यांनीं कान-ठळ्या बसून डोकें उठून जातें. घाटचट्टीजवळ दरी संपून वाट उघड्या-वर येते. आगगाडींतून उतरल्यानंतर तिची घरघर संपलेली असली तरी तिचा आवाज डोक्यांत होतच असतो, त्याप्रमाणे स्थिति होते.

पांडुकेश्वर गांवाजवळजवळ यावें तसा गांवाचा देखावा स्पष्ट दिसूं लागतो. बदरीनारायणाच्या गंधमादनादि पर्वताच्या उंच उंच शाखोप-शाखांनीं गांवाच्या भोंवती तीन बाजूंनीं कडें उभारलें आहे. उजव्या हातानें समोरून येऊन अलकनंदा गांवास वळसा घालून वाहात आहे. डाव्या हातानें बदरीची वाट गेली आहे व समोरील बाजूस बदरी-नारायणाचे डोंगर आहेत. गांवाच्या तोंडाशीं जोडीनें उभी असलेली पॅगोडा धाटणीचीं दोन शिखरें प्रवाशांचे लक्ष एकदम वेधून घेतात. असल्या ह्या नैसर्गिक परिसराच्या बैठकीवर पांडुकेश्वर गांवाचा देखावा चित्रमय व मनोवेधक तर दिसतोच, पण तेथील दोन मंदिर-शिखरांनीं त्या चित्रमय देखाव्यास कलापूर्ण व ठसठशीत उठाव आणून त्याचें आकर्षण वाढविलें आहे. अलकनंदेच्या प्रवाहाच्या धिंगाण्याचें यथार्थ दर्शन येथें जवळून घेतां येतें. कापसासारखें पाणी पिंजून निघत

आहे. नारायणाचे पाय अंतरले आणि अध:पतन नशिबीं आलें म्हणून अंगांत आल्यासारखें थैमान घालून ती धुमसत आहे असे वाटतें.

### पांडुकेश्वर नांव पडण्याचें कारण

देवळाशीं निगडित असलेल्या पौराणिक कथा आणि ऐतिहासिक गोष्टी ह्यांवरून पांडुकेश्वरच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश पडतो.

किंदम नांवाचा ऋषि मृगरूपानें मृगीशीं क्रीडा करीत असतां पंडूराजानें त्याची शिकार केली. तो विद्ध होऊन पडला. त्यानें मरतांना राजास शाप दिला कीं, स्वस्त्रीशीं क्रीडा करतांना मजप्रमाणेंच तुला मृत्यू येईल. त्या शापबंधांतून मुक्त होण्यासाठीं पंडूनें तापस वृत्तीनें राहून अरण्यवास पत्करला आणि गंधमादन पर्वतावर जाऊन तपश्चर्या आरंभिली. पांडुकेश्वरचे डोंगर हे गंधमादनाचेच भाग आहेत. येथें पंडुराजानें तपश्चर्या केली म्हणून त्या गांवास पांडुकेश्वर नांव पडलें असें बदरी माहात्म्यांत वर्णन आहे.

पाण्डुना च तपस्तप्तं शप्तेन मृगरूपिणा ।
मुनिना परकोपेन पाण्डुस्थानं ततः स्मृतम् ।

—बदरी माहात्म्य

### ‘ योयच्छ्रद्धः स एव सः । ’ पांडवांचे दर्शन

पांडुकेश्वर येथून जात असतांना वाटेंत आम्हास एक दक्षिणी यात्री भेटला. त्यानें प्रश्न केला कीं, ‘ दादा, ह्या उंच पहाडावर पांडव तपश्चर्येकरितां बसलेले आहेत, त्यांचें दर्शन तुम्हाला झालें कां ? ’ मी त्यास नाहीं म्हटलें; तो म्हणाला, ‘ असें कसें म्हणतां ? मला ते स्पष्ट दिसतात आणि तुम्हास ते दिसत नाहींत असें होईलच कसें ? ’ इतकें म्हणत असतांना त्याची दृष्टि माथ्याकडेच होती. आवाज सद्गदित झाला होता, व त्यानें त्या दिशेकडे तोंड करून दंडवत घातलें. तशाच अवस्थेंत तो दोन तीन मिनिटें निश्चल पडून होता. त्या स्थितींत त्यास सोडून पुढें जाववेना म्हणून त्यास हलवून उठविलें. तो एकदम म्हणाला, ‘ देवा, मला बदरी विशालाचें असें दर्शन झालें नाहीं पण पांडवांचें तरी झालें. माझी यात्रा सफल झाली. ’ ते बघा म्हणून पांडव त्याला दिसत होते तिकडे त्यानें पुन्हां बोट दाखविलें. मला त्याच्या निस्सीम भक्तिभावाबद्दल आदर व कौतुक वाटलें. मीं त्याला नमस्कार

करून म्हटलें कीं तुम्ही बदरीशाचें दर्शन घेऊन आलां आहांत. तुमच्या-वर भगवंताची कृपा झाली आहे. म्हणून त्याच्या प्रसादानें तुम्हास पांडव दिसत आहेत. मला अजून दर्शन घडावयाचें आहे. तुमच्याप्रमाणें माझ्यावर कृपाप्रसाद होण्याचें माझें भाग्य बलवत्तर असलें तर पांडवच काय पण साक्षात् भगवंतांचेंसुध्दा दर्शन आम्हास कां नाहीं होणार ? इतकें म्हणून मी पुढें चालूं लागलों. संध्याकाळचे आंत लांबगड चट्टी गांठावयाची होती.

हा प्रकार पाहून डोक्यांत सारखे विचार घोळूं लागले. शेवटीं निश्चयाला आलों कीं, श्रीमद्भगवद्गीतेनें केलेला उपदेश नुसत्या बुद्धीच्या अधिष्ठानावरून केलेला नसून त्याला प्रत्यक्षानुभवाचा पुरेपूर पाठिंबा आहे. 'श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः' । ह्या श्लोकाचा खरा अर्थबोध वरील प्रात्यक्षिकानें लागोलाग करून दिला !

### पांडव–शिला व योगबदरी

स्वर्गारोहणापूर्वीं तपानुष्ठानाकरितां पांच पांडव आपल्या वडिलांच्या तपोभूमींत म्हणजे जेथें वडिलांनीं तप केले होते त्या ठिकाणीं येऊन राहिले होते. तें तपानुष्ठान–स्थान गांवाशेजारींच अलकनंदेच्या पर-तीरावरील पहाडावर आहे. त्यास पांडवशिला म्हणतात. तो पहाड सुळक्यासारखा उभाच्या उभा असून पायथ्यापासून माथ्यापर्यंत एका दृष्टीच्या टप्प्यांत येऊं शकत नाहीं इतका उंच आहे. शिखर-दर्शन घ्यावयाचें मनांत आणलें तर टोपीस हात लावूनच मान वर केली पाहिजे.

महाव्रती, सत्यधर्मा युधिष्ठिर ह्यास भगवान विष्णूचा साक्षात्कार तेथेंच झाला. म्हणून त्यानीं तेथें नारायणाची स्थापना केली. तीच पंचबदरींपैकीं चौथी योगबदरी होय. गांवाच्या तोंडाशीं दोन सारख्या आकाराचीं एकाशेजारीं एक अशीं जीं देवळें आहेत त्यांपैकीं एक योग-बदरी व दुसरें वासुदेवबदरी आहे. हीं दोन्हीं दगडी बांधणीचीं असून त्यांचे कळस सोन्याचे आहेत, निदान तसे दिसतात खरे. ह्यांचीं शिखरें मोठीं असलीं तरी गाभारे लहानच आहेत. देवळांतील महाविष्णूच्या मूर्ति काळ्या कुळकुळीत पाषाणाच्या असून त्या कमरेइतक्या उंचीच्या सिंहासनाधिष्ठित आहेत. मूर्ति सुबक व शांत ध्यानाच्या आहेत.

## पांडुकेश्वर येथील ताम्रपट

देवालयाबाहेर भिंतीशीं टेंकून ठेवलेला एक ताम्रपट आहे. दोन फूट लांब, सव्वा फूट रुंद व दीड दोरी जाड अशा तांब्याच्या पत्र्यावर ठसठशीत जाड अक्षरांनीं कोरलेला लेख त्यावर आहे. त्यावरील अक्षरें स्पष्ट व सुवाच्य असलीं तरी लिपि अपरिचित असलेमुळें ते पाहून कांहीं एक बोध होत नाहीं. नकलून घेण्यास वेळ नव्हता व फोटो घेण्याचें साधन जवळ असतांनासुद्धां तेव्हां तशी कल्पना सुचली नाहीं. ती आतां सुचते आहे. पण उपयोग काय? इतरास ध्यानीं यावें म्हणूनच केवळ पश्चात्बुद्धीचा उल्लेख केला आहे. अवचित योगायोगानें तो लेख, त्याचा काल, भाषांतर नुकतेंच वाचण्यांत आलें आहे. त्याचा महत्त्वाचा भाग पुढें देत आहें. त्यावरून लक्षांत येतें कीं अडीच तीन हजार वर्षांपूर्वींचा हा लेख आहे.

हिमालयांत इ. स. पूर्व २५०० ते इ. स. ७०० पर्यंत अयोध्येच्या सूर्यवंशी कत्यूरी घराण्याचें राज्य होतें. त्यांचें साम्राज्य असून तें आपणास 'गिरिराज चक्रचूडामणी' म्हणवीत. त्यांचा राज्यविस्तार रोहिलखंडसुद्धां उत्तरेस काबूल–सिकीमपर्यंत होता. त्या घराण्याचा मूळ पुरुष शालिवाहन (शककर्ता नव्हे) होता. प्रथम त्यांची राजधानी जोशी मठ येथें होती व तेथून ती नृसिंह देवतेच्या आज्ञेनें हलविली आणि गोमतीच्या कांठीं करवीरपूर नांवाच्या गांवाजवळ नवीन गांव वसवून तेथें नेली. त्याचें नांव कार्तिकेयपूर असें ठेविलें. ह्या घराण्यांतील एका ललित सूरदेव राजानें आपल्या राणीनें बांधलेल्या देवळांतील भगवान् विष्णूच्या पूजन–अर्चनादि व्यवस्थेकरितां एका विद्वन्मान्य ब्राह्मणाला अलकनंदेच्या कांठचा गोरुन्नसारी हा गांव अग्रहार दिला. त्यासंबंधीचा जो ताम्रपट आहे. तो पाली भाषेच्या कूटलिपींत आहे. त्याच्या संस्कृत विवरणाचा थोडासा वाण येथें उद्धृत केला आहे. एकंदर चौतीस क्रमाकांत हा लेख आहे. त्यावरून त्या कालचा समाज, समजुती, राहणी, धर्मभावना, कर्तव्ये, पराक्रम, विस्तार इत्यादि गोष्टी कळण्यासारख्या आहेत.:—

(१९) पुण्येहनी उत्तरायण संक्रांतौ गंध पुष्प धूप दीपोपलेपन नैवेद्यबलि चरु नृत्यगेय वाद्य सत्वादि प्रवर्ताय खंडस्फुटित संस्करणाय

अभिनव करणायच (२०) भृत्य पदमूल भरणायच गोरुन्नसायां महादेवी श्रीसामदेव्या स्वयंकारायित भगवते श्रीनारायण भट्टारकाय शासन-दानेन प्रतिपादिताः प्रकृति परिहार युक्तः । श्लोकः--

सर्वानेतान् भाविनः पार्थिवेंद्रान् भूयो भूयो याचते रामभद्रः--।
सामान्याऽयं धर्मसेतुर्नृपाणां कलिकाल पालनियो भवद्भिः ।।
सकलमिदमुदाहृतंच बुध्द्वा न हि पुरुषैः परकीर्तयो विलोप्याः
श्रीमिम्बरस्तत्पादानुध्यातः। श्रीमदिष्टगणदेवः तत्पादानु ध्यातः ।।
श्रीमल्ललितशूर देवः क्षितीशः ।

### हेमकुंड – लोकपाल

घाटचट्टीपासून पुढें एक मैलावर एक वाट फुटते. ती अलकनंदा ओलांडून शीख लोकांचें तीर्थक्षेत्र जें हेमकुंड–लोकपाल त्यास जाते. तें स्थान तेथून ११ मैलांवर आहे. वाटेंत सहा मैलांवर भ्युंडार गांव आहे. तेथपर्यंतची वाट भ्युंडार गंगेच्या कांठाकांठानें असून थेटपर्यंत सारखा चढ आहे. तेथून पुढें वस्ती नाहीं. तेथून तीन मैलांवर घांग-रिया ठाव आहे. तेथें एक लहानशी धर्मशाळा आहे. तेथून पुढें झाडी संपते. एक मैलावर एक गुहा आहे व पुढें एक मैलावर हेमकुंड आहे. ह्या स्थानाची माहिती गुरु गोविंदसिंगांनीं आपल्या आत्मकथेंत लिहून ठेवलेली आहे. याचा शोध इ. स. १९३६ ह्या वर्षीं लागून तेथें आतां गुरुद्वार व धर्मशाळा झाली आहे. जवळच एक सरोवर आहे. चहूबाजूंनीं बर्फाच्छादित पहाडांचें वेष्टन आहे. ह्या स्थानाची उंची १४,२०० फूट आहे. असें हें निरामय दिव्य तपोभूमीचें स्थान आहे. पण येथें सररहा जाण्यासारखी चांगली वाट अजून झालेली नाहीं.

खालसा ( एकी ) शीखपंथाचे संस्थापक गुरु गोविंदसिंग हे तप-श्चर्येकरितां येथें येऊन राहिले होते. त्यांस दृष्टान्त झाला कीं, हिंदु-धर्मविरुद्ध औरंगजेबानें चालविलेल्या आक्रमणास त्यानें तोंड देऊन धर्मरक्षण करावें. ही परमेश्वराची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यानें खालसा पंथ काढून आक्रमणास तोंड देण्याची शिकस्त केली.

### पुष्पवाटिकांचें नंदनवन

वर उल्लेखिलेल्या घांगरिया ठावापासून एक वाट उत्तर दिशेनें जाते. त्या वाटेनें दोन मैलांवर एक साकू ओलांडून गेलें म्हणजे एक

मोठें पठार लागतें, तेथूनच भ्युंडार गंगेचा उगम झालेला आहे. तिच्या दोन्हीहि कांठीं व पठारावर शेंकडों जातींच्या रंगावासांचीं लहानमोठीं फुलें रानोमाळ इतकीं अमोप उगवलेलीं असतात कीं, पाऊल ठेवण्यासहि जागा मिळूं नये. नंदनवनदेवीचें सौगंधिक आणि मनोहर पुष्पवाटिकांचें हें उद्यान पाहून देहभान विसरून जावें असें तें रमणीय आहे. सन १९३१ ह्या वर्षीं कामेट शिखरावरून परत मार्गीं असतां मि. स्मिथच्या नजरेस हें उद्यान पडलें. तेव्हांपासून येथें गोऱ्यांची येरझार सुरू झाली. त्यांनीं ३–४ शें प्रकारच्या फुलांचें बीं नेऊन त्यांची आपल्या देशांत लागवड केली. त्यामुळें हें स्थान जगविख्यात झालें आहे.

### पांडुकेश्वर ते बदरी नारायण

पांडूकेश्वरापासून तीन मैल लामबगड व पुढें तीन मैल हनुमान-चट्टी आहे. ह्या सहा मैलांत २,५०० फुटांची चढण आहे. पण ती सावकाश असल्यामुळें जाणवत नाहीं. मंडलचट्टीपाशीं मागें राहिलेली वनदेवी उभ्या उभ्या येथें येऊन गिरिराज रत्नसानु–हिमालयाचा अखेरचा निरोप घेते. ती उभ्या घाईनें आलेली असली तरी तिज-बरोबर तिच्या ऐश्वर्याचा सर्व थाट असतोच.

### हनुमानचट्टी–वैखानस तीर्थ

हनुमानचट्टी येथें वैखानस मुनींचा आश्रम होता. त्यांनीं तेथें मोठा यज्ञ केला होता. त्यास सर्व देवगण उपस्थित होते. यज्ञद्रव्यांच्या आहुतीचा अंगारा अजून येथें सांपडतो म्हणतात. घृतगंगा येथें येऊन अलकनंदेस मिळते. हनुमानचट्टीस वैखानस तीर्थ असेंहि नांव आहे. हनुमंतानें भीमाचा गर्व परिहार केल्याची कथा येथेंच घडल्याचें सांगतात. येथें सात आठ चट्ट्या अलकनंदेच्या कांठींच आहेत.

### अलकनंदेचें थैमान

लामबगडपासून थेट बदरीकाश्रमापर्यंत अलकनंदा डाव्या हातास राहते व तेथील सर्व वाट तिच्या अगदीं कांठाकांठानेंच गेलेली आहे. हनुमानचट्टीपासून अगदीं उभ्या चढाची नागमोडी वाट असली तरी गंगेची संगती इतकी निकटवर्ती असते कीं, सहज दगड फकला तर तो तिच्या पात्रांत पडेल. हनुमानचट्टीपासून तिच्या प्रवाहाचें रूप

पालटून ती प्रपाताचें रूप धारण करते. अर्थात् घोष वाढतोच. चार पांच ठिकाणीं वाट बर्फांत बुडून गेली होती. आम्हांस त्या बर्फावरून जावें लागलें. तेथें गंगा बर्फाखालीं गडप होऊन गेलेली असे. कोठें कोठें ती दोन्ही तीरावरील बर्फराशींच्या खिंडीमधून वाहात असलेली दिसे, किंवा बर्फाच्या बोगद्यांत शिरतांना व आंतून बाहेर पडतांना दिसे. बर्फाच्या पुलाखालून किंवा कमानीखालून वाहतांनाहि ती दिसली. महिना पंधरा दिवस अगोदर तिकडे कोणी गेले असते तर त्यास गंगा बर्फाखालीं सर्वस्वींच गुप्त झालेली आढळली असती.

बदरीनारायण वाटेवरील शेवटचा चढ तीन मैलांचा असून तो हनुमानचट्टीपासून सुरू होतो. अलकनंदा डाव्या हाताकडून वाहात आहे म्हणण्यापेक्षां ती मोठ्यानें आरडाओरडा करून धाडधाड उड्या घेत, वाटेंत आलेल्या दगडाधोंड्यांचा व खडकांचा चक्काचूर उडवीत भरधाव निघालेली दिसते.

## उद्धाराकरितांच अवतार

गंगा कपर्दि शंकराच्या मस्तकीं त्याच्या जटाजुटांत काय, किंवा भगवान् महाविष्णूच्या पायाजवळ काय, ती एखाद्या योग्याप्रमाणें ध्यानमग्न अवस्थेंत मेरुप्रमाणें हैम रूपानें अक्षय्य निश्चल असावयाची, तें रूप टाकून तिनें एवढ्या लगबगीनें धांवपळीचा अकांड-तांडव–अवतार कां घेतला असावा हा विचार पुढें उभा राहतों. आम्ही तिच्या मूळ आश्रयस्थानाकडे वर वर खेंचले जात होतों. तर ती खालीं लोटून दिल्यासारखी कोसळून पडत होती. आम्हीं स्वेच्छेनें कष्ट सोसूनहि जसा हा उन्मार्ग धरला होता तसाच तिलाहि कोणा भाग्यवंताच्या उद्धाराकरितां जाणून बुजून हा अधोमार्ग पत्करावा लागला होता कीं काय न कळे. ‘परोपकाराय सतां विभूतयः।’ तसेंच ‘देह कष्टविती उपकारें’ असें म्हणतात तेंच खरें. ही तर परोपकारित्वाची कसोटीच आहे. आणि म्हणून त्यांना विभूतिमत्त्व प्राप्त झालेलें असतें. विभूतिमत्त्वास पोहोंचलेल्यांना कधींहि अध वा ऊर्ध्व मार्ग राहिलेलाच नसतो. त्यांचें स्थान एकच एक अढळ असतें. आम्ही आपल्या संकुचित दृष्टीनें त्याजकडे पाहून त्या मार्गाला अध वा ऊर्ध्व म्हणतों इतकेंच.

ह्या दृष्टीनें अलकनंदेस अधोमार्ग पत्करावा लागला असें वर म्हटलें आहे. पण त्या दिसणाऱ्या अधोमार्गांत तिचें खरोखर अधःपतन नसून तो तिचा अवतार आहे. आणि अवतार म्हटला म्हणजे त्यांत उद्धाराची कल्पना अंतर्भूत झालेली असतेच असते. म्हणजे एकाचा अवतार दुसऱ्याच्या उद्धाराकरितां असतो. त्यांत अवतार होतो त्याचें पतन तर नसतेच नसते पण त्याच्या आश्रयानें अधःस्थानीं असणाऱ्याचा उद्धार मात्र होत असतो.

भगवंतांना अनेक वेळां वैकुंठावरून भूस्थळीं उतरावें लागलें हें खरें आहे. पण तितकेहि वेळां त्यांनीं कोणाना कोणाचा उद्धार केला असल्याचें आपण पुराणांत वाचतों. ह्या अवतार कृत्यांतून त्यास तात्कालिक कसलाच मल लागला नाहीं असें नाहीं. पण ते त्यांत रंगले नाहींत, किंबहुना त्यांनीं यत्किंचितहि लेप चिकटू दिला नाहीं. 'पद्मपत्रमिवांभसा।' एवंच त्यांचें सामर्थ्यच असें असतें कीं, एकतर ते लेप लागून देणार नाहींत, लागलाच तर चिकटूं देणार नाहींत, आणि इतक्या उपर चिकटलाच तर त्याचेंच शुद्धीकरण करून टाकतील. हे विविध प्रकार गंगेच्या संबंधांत तर स्पष्टपणें कोणाच्याहि लक्षांत आल्यावांचून राहात नाहींत. असा तो अलकनंदेचा प्रवाह तेथें विशेष प्रकारचा उद्बोधक आहे.

## देवदेखणी

हनुमानचट्टीपासून एक मैलावर घोरसिल पुलापर्यंत साधारण सपाटी असून पुढें खडी चढण लागते. ती चार मैल वाट नागमोडी असून तितकी चांगली नाहीं. चढतां चढतां जीव रंजीस येतो. हिमालयांतील चारहि धामांच्या ठिकाणीं शेवटचे चढ माणसाची कसोटी पाहणारेच ठरतात. वाट संपतां संपत नाहीं. वाटेवर झाडाझुडांची सावली नाहीं, उन्ह लागतें ह्यामुळें थकवाहि आलेला असतो. वास्तविक दहा हजार फूट उंचीवर थंडी कडक असते. पण चढणीच्या श्रमानें घाम फुटतो आणि एरवीं गोड वाटणारें उन्ह नकोसें होऊन जातें. चढण्याच्या वेळीं कितीहि थंडी असली तरी ती पत्करते, पण ऊन खपत नाहीं. म्हणून उन्हापूर्वीच चढणीचा प्रवास संपवावा. चढ संपून वाट उजवीकडे वळते तेथेंच गणोबारायांचें लहानसें देऊळ आहे.

त्यास देवदेखणी म्हणतात. येथून अर्ध्या मैलावर राहिलेल्या बदरी धामाचें प्रथम दर्शन होतें.

बदरीकाश्रम

देवदेखणीपासून पुढें साधारण सपाटीच आहे. तेथून गांवाकडे गेलेली वाट, अलकनंदेचा प्रवाह व तिजवरील पूल, गांवची वस्ती आणि तेथूनच बदरीनारायणाच्या मंदिराचीं उंचावलेलीं व उन्हानें तळपत असलेलीं सुवर्णमंडित शिखरें, ह्यांचें प्रथम दर्शन झालें. चढण्याचे कष्ट संपले. वाटेंत तापदायक झालेलें ऊन नकोसें वाटत होतें, पण तेंच वर पोहोंचल्यावर आल्हादकारक होऊन हवेंसें वाटूं लागलें. त्यावेळपर्यंत लांबून दिसणाऱ्या हिमशिखरांच्या सान्निध्यांत जाऊन उभे राहिलों. असें वाटलें कीं, भगवंताच्या पायाशीं एक अर्ध्या घटकेच्या आंत पोहोंचून दर्शन घेतां येईल. इतके दिवसांच्या आतुरतेनें मनांत धर-लेल्या इच्छापूर्तिद्वारापाशीं तर येऊन ठाकलों. असा तो कृतकृत्यतेचा घांस तोंडाशीं आल्याचें समाधान आम्हांस जसें झालें होतें तसेंच तें इतर यात्रींच्याहि चर्येवर झळकत असलेलें दिसून आलें. अंतःकरण सद्गदित होऊन आनंदातिशयानें डोळयांत अश्रु उभे राहिले आणि नारायणापुढें माथा तेथेंच नमला.

प्रत्यक्ष गांव अर्धा पाऊण मैल दूर असलें तरी बदरीपुरीची शीव तेथूनच लागली म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. जवळच कांचनगंगा अलकनंदेस मिळालेली दिसते. गांवाजवळ ऋषि गंगा व अलकनंदा यांचा संगम आहे. ऋषि गंगेवरील पूल ओलांडून गांवांत प्रवेश होतो. पुलाच्या अलीकडेहि नवीन वस्ती होत असल्याचें दिसतें. तेथून अलक-नंदेचा प्रवाह, कांठापासून वर होत गेलेला गांवाचा विस्तार, बदरी-शाच्या देवळाचें महाद्वार व शिखरें, तप्त वा अग्निकुंडाचें मंदिर, पार्श्वभागीं गंधमादन पर्वताचीं हिमशिखरें आणि गांवाच्या तोंडाशींच असलेला अलकनंदेवरील पूल, हें सर्व सामग्र्यानें चित्रांत पाहिल्या-प्रमाणें दृष्टीपुढें येऊन हा देखावा मोठा पवित्र व मनोहर वाटतो.

ऋषि गंगेवर स्नानादि नित्य कर्म आटोपून शुचिर्भूत होत्साते प्रसन्न चित्तानें उल्हसित होऊन गेलेले सर्व यात्री बदरीशाच्या दर्शनाकरितां मोठ्या आतुरतेनें बदरिकाश्रमांत–गांवांत प्रवेश करितात.

ऋषि गंगेपासून ब्रह्मशिलेपर्यंत गांवाची पूर्व–पश्चिम लांबी अर्ध्या मैलाचेवर नाहीं व रुंदीहि अर्ध्या पाऊण फर्लांगापेक्षां अधिक नाहीं. जी काय वस्ती आहे ती सर्व देवळाभोंवतीं आहे. नारायण पर्वताच्या दक्षिण उतारावरील अलकनंदेच्या उजव्या कांठाच्या थडीवर गांव वसला आहे. ही थडी पात्रापासून तीस चाळीस फूट उंचीची आहे.

गांवांत मोठमोठ्या व चांगल्या सोईस्कर धर्मशाळा पुष्कळ आहेत. शिवाय पंड्यांचीं घरेंहि आहेत. तेथें शें–पन्नास उंबरठा आहे. सर्व घरें पक्क्या बांधणीचीं व निवाऱ्याचीं आहेत. माड्यांचीं घरेंहि आहेत. कित्येक घरांवर पऱ्हळी पत्रे, तर कांहींवर कौलांप्रमाणें फरशा शाकारलेल्या, तर कांहींवर भूर्जपत्रें अंथरून त्यावर धाबें केलेलें आहे. एकंदरींत वस्ती साधी सुधी असली तरी टुमदार दिसते.

गांवास सांडपाण्याच्या मोऱ्या केलेल्या नाहींत. माणसांची प्रत्यहींची आवक जावक फारच मोठी. त्यामुळें प्रत्येक घराच्या आवारांत सांठलेल्या घाणीचा दर्प येत असतो. उतरण्यास जागेची सोय चांगली असली तरी यात्रींच्या घाणेरड्या राहणीची किळस आल्यावांचून राहात नाहीं.

राज्यशासनानुसार सरकारी व्यवस्था चांगली असली तरी तिचा योग्य उपयोग करून घेणें न घेणें ही गोष्ट आमच्या स्वैर, अडाणी, अचरट, बिनजाणिवेच्या वृत्तीवर अवलंबून असल्यामुळें तेथील त्या पुण्यतपोभूमीचें पावित्र्य आम्ही अपवित्र करून टाकीत असतों. ही स्थिति देवाच्या द्वारीं आलेल्या भाविकांच्या लक्षांत येत नाहीं, याची कींव वाटते. ‘सर्वो दण्डजितो लोको दुर्लभोहि शुचिर्जनः।’ (महाभारत शांतिपर्व.) सर्व लोक दंडाच्या भयानें तेवढे नीट वागतील. पण स्वभावतःच कांहीं तसें कोणी शुचिर्भूत वागणार नाहींत. दुर्दैव ! ह्यापेक्षां दुसरें काय ?

आम्ही गेलों त्या वर्षी बदरीनारायणास आजमासें ३५,००० यात्रा आलेली होती. गांवाच्या तोंडाशींच नाकें आहे. तेथें नवीन येणाऱ्या यात्रींची नांवनिशी नोंदून घेतात. त्यावरून प्रतिवर्षाची यात्रा कळते. सन १९४५ म्हणजे पुढें दहा वर्षांनीं हा आंकडा पन्नास हजारांवर गेलेला आहे. येथें एक गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो कीं, बदरी-


नारायणास जर १०० यात्रा गेली तर केदारनाथास वीस जाते, गंगोत्रीस पांच व यमुनोत्तरीस दोनच असें प्रमाण पडेल. महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें पाहिलें तर त्यांचें प्रमाण सहस्रांत पांच तरी पडेल किंवा नाहीं ह्याचीच शंका वाटते. आणि त्यांतहि जाणाऱ्या ह्या अल्पसंख्येंत शेंकडा ८० श्रीमती बायकाच असतात.

ह्या सहस्रांत पांच महाराष्ट्रीयांत वीस ते तीस वर्षांचा यात्री, स्त्री वा पुरुष औषधासहि दिसला नाहीं. एकंदरच यात्रींत बहुतेक लोक वयाच्या उतरणीस लागलेले असतात. हा आमचा अनुभव पंधरा वर्षांपूर्वीचा आहे.

एवढी मोठी यात्रा दरवर्षी तेथें लोटते त्या मानानेंच खाण्यापिण्याच्या तयार पदार्थांचीं–शिरा, पुरी, भात, मुगाचें वरण, भजीं, शेव, लोणचें, पापड, लाडू, मेवामिठाई त्याचप्रमाणें वाण जिन्नस व इतर जिन्नस, तसेंच तसबिरी, छायाचित्रें, अंगठ्या, कंकणें, टाक–पत्र्यावरील मूर्ति, पुस्तकें, टॉर्च, बॅटऱ्या, कॅनव्हस बूट, वगैरे सर्व प्रकारच्या वस्तूंचीं भरपेट दुकानें आहेत. पण महागाई मात्र विलक्षण आहे. त्यावेळच्या जिनसांच्या भावावरून कल्पना येईल. भाव दर शेरास होते ते:— तांदूळ आठ आणे, साखर बारा आणे, बेसन आठ आणे, तूप दोन रुपये, दूध बारा आणे, आणि सर्पण–रायवळ लाकडाच्या फाट्या दोन माणसाच्या एक वेळच्या भात–पिठल्यास पुरतील त्यास चार आणे.


नारायण पर्वताचा वरचा भाग आणि त्या पर्वतापलीकडील सर्वच रांगा बर्फात अक्षय्यच गढून गेलेल्या असतात. यात्रेच्या दिवसांत उन्हाळा असल्यामुळे बर्फ वितळून त्याचें शुध्द, स्वच्छ व गारठणक हिमोदक पावसाळी ओघांप्रमाणें वाहूं लागतें. लहान ओघास धारा व मोठ्यास गंगा असें म्हणण्याचा परिपाठ आहे. उगम अथवा संगमस्थानांच्या वैशिष्ट्यावरून त्यांस तशीं नांवें पडलीं आहेत. ओघ लहान म्हणून त्यास धारा म्हटलें असलें तरी त्यांचा प्रवाह व वेग एवढा मोठा असतो कीं, माणूसच काय पण एखादें मोठें जनावरसुद्धां त्यांत बोलबोल म्हणतां वाहून जाईल.

जवळचा उगम आणि संकुचित प्रवाह ह्या कारणांमुळें गंगेपेक्षां धारेचें पाणी अधिक स्वच्छ असतें. ह्यासाठींच तेथें खाण्यापिण्याच्या




**श्रीबदरीकाश्रम**

( १ ) गंधमादन पर्वत  ( २ ) बदरीनाथ मंदीर
( ३ ) अग्निकुंड  ( ४ ) नारदशिला



बदरीनारायण मंदीर महाद्वार पान २८०

कामीं अलकनंदेचें गढूळ पाणी न घेतां पुरीस लागून असलेल्या कूर्म-धारेचें पाणी वापरतात.

## बदरी विशालाचें मंदिर

गंगेच्या उजव्या कांठीं, गांवांत साधारण मध्यावर, बदरी विशालाचें भव्य मंदिर आहे. रस्त्यापासून तें दीड दोन पुरुष उंचीवर असून तेथपर्यंत चढून जाण्यास प्रशस्त पायऱ्या आहेत. पायऱ्या संपल्या म्हणजे एक औरस चौरस चौथारा आहे. त्याच्या पुढें महाद्वार असलेली एक घई ओसरी व त्यावर माडी आहे. तिचे दर्शनी अंगास नक्षीदार कमानी असून बांधकाम डौलदार व प्रेक्षणीय आहे. महाद्वाराच्या आंतल्या बाजूस दोन्ही अंगें देवडया आहेत. दोन्ही बाजूस तळघरांत कोठार आहे. माडीवरची जागा धर्मशाळेसारखी मुक्तद्वार आहे. महाद्वार पर्वतीच्या देवळाप्रमाणें मोठें व शोभिवंत आहे.

त्यामागें थोडी मोकळी जागा सोडून दोन दालनी मंदिर आहे. त्यांतील पुढचा भाग सभामंडप व मागचा भाग गाभारा. सभामंडप एका वेळीं शंपन्नास माणूस मावेल एवढा मोठा आहे. त्याच्या तीन बाजूंस मोठाल्या कमानी असून भरपेट हवा, उजेड येण्यासारखा तो मोकळा आहे. पण गाभारा आणि सभामंडप ह्यास जोडणारा भाग अंधाराचा आहे. गाभाऱ्यांतहि अंधार आहे. गाभारा देवतायतनास पुरेसा आहे. आंत समया—निरांजनांचा काय उजेड पडेल तेवढाच. संबंध देऊळ दगडी बांधणीचें आहे. सभामंडपावर घुमुटाकार मोठा डेरेदार उंच कळस आहे व गाभाऱ्यावर पॅगोडा पद्धतीचें दोन छपरी शिखर आहे. ह्या छपरी शिखरावर सोन्याचे पत्रे ठोकून तें चहूं अंगें मढविलें आहे. देवळाभोंवतीं प्रदक्षिणेकरितां दहा पंधरा फूट मोकळी वाट राखली आहे. देवळाच्या आवारांतच डावे उजवे हातास सोपे व घरें आहेत. त्यांत पाकशाळा, कचेऱ्या व रावळजींचें राहणें असतें.

नारायणाचें देवालय गढवाल संस्थानच्या महाराजांनीं तेराव्या शतकाच्या शेवटीं बांधलें; व श्रीमती अहिल्याबाई होळकर ह्यांनीं त्यावर सोन्याचा कळस बसविला अशी माहिती लागते.

## देवतायतन

गाभाऱ्यांत कमरेइतक्या उंचीच्या सिंहासनावर मधोमध काळ्या

कुळकुळीत पाषणाची पद्मासनस्थ, ध्यानमुद्रा लावून बसलेली भगवंतांची चतुर्भुज मूर्ति आहे. तिची उंची अडीच तीन फूट आहे. दोन हात जुळलेले व दुसऱ्या दोहोंत शंखचक्र आहेत. नारायणास नेहमीं सुवर्ण मुखवटा घातलेला असतो. मुकुट, छत्रचामर सोन्याचेच आहेत. मुकुट हिरेजडित आहे. डाव्या अंगास लक्ष्मी चवरी ढाळीत उभी असून तिच्या पलीकडे नरनारायणांच्या चतुर्भुज शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेल्या दोन मूर्ति आहेत. उजव्या अंगास कुबेर व गणपति आहे. ह्या पंक्तीच्या खालच्या पायरीवर उजव्या बाजूस गरुड, मध्यें उद्धव व डाव्या बाजूस नारद आहेत. नारदापलीकडे अक्षय्य नंदादीप आहे.

नारायणाची मूर्ति ही फार प्राचीन काळची म्हणजे पुराणकाळची आहे असें पंडे लोक सांगतात. बौद्ध कालांत बुद्ध लोकांनीं ती अलकनंदेंत टाकून दिली. पुढें सातव्या आठव्या शतकांत श्रीमदाद्य शंकराचार्य ह्यांना दृष्टांत होऊन त्यांनीं ती नारदकुंडांतून काढून तप्तकुंडाशेजारीच असलेल्या गरुडकोटी गुंफेंत तिची स्थापना केली. बौद्धधर्मी लोक ही मूर्ति भगवान बुद्धाची आहे असें समजतात, तर जैनधर्मी ती त्यांचा पहिला तीर्थंकर जो ऋषभदेव किंवा पारसनाथ त्याची आहे असें मानतात. असे समज असले तरी बौद्ध किंवा जैन ह्या यात्रेंत एकहि आढळला नाहीं. शंकराचार्यांनीं ह्या मूर्तीची स्थापना केली असल्यामुळें त्यांच्या जातीच्या नंबुद्रि ब्राह्मणाकडेच पूजेअर्चेचे सर्व अधिकार परंपरेनें चालत आलेले आहेत. मुख्य पुजारी ह्यासच रावळ म्हणतात. शंकराचार्यांनीं भारतांत धर्मरक्षणाकरितां चार दिशांना चार मठ स्थापिले त्यांतील उत्तरेचा बद्रिकाश्रमीं आहे.

### नारायणाची मूर्ति परिसाची आहे काय?

नारायणाची मूर्ति परिसाची आहे म्हणून गाभाऱ्यांत कोणास जाऊन देत नाहींत, अशी किंवदंती कानीं होती. पण त्या नुसत्या भुमका आहेत. ती मूर्ति परिसाची तर नाहींच पण सुवर्णाची सुद्धां नाहीं.

देवाजवळ कोणास जाऊं देणें, न देणें हा त्याच्या पावित्र्यरक्षणाचा प्रश्न असतो; तसा तो तेथें नाहीं. देवाजवळ जाऊन दर्शन व प्रत्यक्ष पूजन करण्याचें महत्त्व वाढविलें म्हणजे जवळ जाण्याची किंमत आपोआपच वाढते आणि त्यामुळें पुजाऱ्यास अधिक पैसे उकळण्याची

सोय होते. त्याप्रमाणें ही बंदी पुजाऱ्यांच्या प्राप्तीसाठीं आहे.

लोखंडाचें सोनें करणें हा जसा परीसाचा गुण समजला जातो तसाच देव, देवता, साधू, संत, ह्याचाहि गुण 'आपणासारिखें करिती तात्काळ,' असा आहे. नराचा नारायण होणें हा प्रकार त्यांतलाच आहे. लोखंडाचें सोनें होणें हें स्थित्यंर जड अणूंचें आहे. अणू तेच पण मांडणी निराळी एवढेच. पण नराचा नारायण होण्यांत चिच्छक्तिची जागृति आहे. ही जागृती केवळ मनुष्यांतच होणारी आहे. जड अणूंची मांडणी कशीहि असली तरी तिचा चिच्छक्तिच्या जागृतींत प्रतिबंध होत नाहीं. ही जी भक्ताला सायुज्यता प्राप्त करून देणारी किमया ती मात्र बदरीनारायणांत आहे आणि त्या दृष्टीनें तो परीसाला परीसपण देणारा परीस आहे.

## इतर देवळें

प्रदक्षिणेच्या वाटेवर भोगमंडी, लक्ष्मी, गणपति, घंटकर्ण–नगरपाल, ह्यांचीं देवळें असून महाद्वारांतून आंत गेलें म्हणजे डाव्या हातास एका कमानींत वीर मारुतीची मोठी मूर्ति आहे. ही रामदासांनीं स्थापन केली अशी बोलवा आहे.

देवळासमोर गंगेच्या पात्रापर्यंत उतरून जाण्यास घाट आहे. अर्ध्या वाटेवर केदारनाथाचें देऊळ आहे. जे यात्री बदरीकेदारीं जाऊं शकत नाहींत त्यांना बदरी केदाराचें दर्शन तथेंच व्हावें, त्याचें पूजनहि करतां यावें म्हणून तेथें केदारनाथाची स्थापना केलेली आहे.

## देवाला संस्थानचा नैवेद्य

प्रतिदिवशीं देवाच्या नैवेद्याकरितां दोन तीन मणाचा भात शिजतो. व त्या मानानें आमटीहि होते. ते नैवेद्याचे पदार्थ शिजविण्याचें काम तत्प्रांतीय ब्राह्मण करतात. तो नैवेद्याचा भोग देवाला चढविण्यास दुपारीं दोन तीन वाजण्याची वेळ येते. नंतर त्या नैवेद्याचा भात प्रसाद म्हणून विकला जातो. आठ आण्यांच्या कढत कढत भातांत तिघांचें पोट भरतें. तेथें ब्रह्मकपाटीं पिंडदान–श्राद्धांकरितां लागणारे पिंडहि त्याच भाताचे केलेले आयते विकत मिळतात. अशी ती सोय असल्यामुळें शेंकडा नव्याण्णव यात्री चूल पेटविण्याच्या भानगडींत पडत नाहींत. अपवादात्मक म्हणजे दक्षिणी व मद्रासी सोवळ्या बायका.

तेथें मिळणारा भात व आमटी तीच प्रसाद म्हणून पंडेजी आणून देतात व यात्रींकडून दुप्पट पैसे उकळतात. बाजारांत मिळणारे पक्व जिन्नस शिळेपाकेहि असतात. शिरा, पुरी, लाडूसारखे पदार्थ तेथील थंड हवेंत पचण्यास जड असल्यामुळें ते बाधतात; तरीसुध्दां लोकांचें तिकडे दुर्लक्षच होत असतें.

### दर्शनेच्छू पेंढार

देवदर्शनाकरितां सकाळीं ६ ते ११ व संध्याकाळीं ४ ते ७ वाजे-पर्यंत कपाटें मोकळीं असतात. देवाची त्रिकाळ आरती होते. त्यांत दुपारच्या आरतीचा सोहळा मोठा असतो. तेव्हां माणसांची खेंचाखेंच होते. गाभाऱ्यांत पुजाऱ्याशिवाय कोणासच प्रवेश नाहीं. पण पांचशें, हजार रुपयांची पूजा बांधणारास प्रवेश मिळतो.

सभामंडपांतील दर्शनेच्छू भाविकांची उतावळी, शिस्तीचा अभाव, गाभाऱ्यांतील अंधेर, ह्यामुळें देवदर्शन स्वच्छ तर होत नाहींच, पण स्वस्थहि होत नाहीं. बाऱ्या करून लोक आंत सोडतात. शिस्तीनें, स्वस्थपणें, म्हणजे शांताकारं हा श्लोक सबंध म्हणेपर्यंत, पांच पांच लोकांनीं दर्शन घेतलें तर वेळ पुरेल इतका अवधि प्रत्येक बारीस असतो. पण 'मी पुढें'च्या झगडयांत कोणासच स्वस्थ दर्शन न मिळतां बाहेर पडण्याची पाळी येते. मी रावळांना जाऊन भेटलों आणि परवानगी काढली कीं, माळ लावून पांचा पांचांनीं दर्शन घ्यावें. पण लोक काय ऐकतील, तर मग आम्ही हिंदूच कसले ? त्यांनीं मला लोटलें, शिपायास लोटलें आणि एकदम सर्वच लोंढा आंत घुसला. म्हाताऱ्याकोताऱ्या बाया बिचाऱ्या उगीच चेंगरल्या. कसले आलें आहे दर्शन नि बिर्शन ? शिपायाला गत्यंतर उरले नाहीं. लहान मोठा न पाहतां सर्वांनाच हाकलून बाहेर काढावें लागलें.

देवळांतील अंधुक उजेडामुळें मूर्ति स्पष्ट दिसत नाहींत. पण अली-कडे विजेचे कंदील ( टॉर्च ) ह्यांचा उपयोग सररहा सर्व यात्री करीत असल्यामुळें त्याच्या प्रकाशाचा झोत मूर्तीवर पाडून त्यांना चांगलें दर्शन घेतां येतें. अंतर बरेंच असल्यामुळें लहान कंदिलाचा तितका उपयोग होत नाहीं. मोठा असलेला चांगला. दर्शनास कर नाहीं.

## देवस्थानचें उत्पन्न व बहिवाट

देवस्थानच्या संपूर्ण स्वामित्वाची अजमासें २०० व अंशतः स्वामित्वाचीं अजमासें १५० खेडीं असून दर वर्षी अजमासें सात हजार रुपये सरकारला सारा भरावा लागतो. साऱ्याच्या दसपट निवळ उत्पन्न ( वसुली वगैरे व्यय जातां ) धरलें तरी हें उत्पन्न पाऊण लाखाच्या घरांत जातें. ह्याशिवाय यात्रींनीं देवापुढें ठेवलेले व रावळ भेटींत दिलेलें द्रव्य यात्रेच्या मानानें दीड दोन लाखांपर्यंत होत असावें.

ह्या उत्पन्नाचा आयव्यय रावळजींचे हातीं असला तरी त्यावर सरकारी देखरेख असते. कारकून खजिनदार वगैरे कामगार कचेरी आहे. येथील रावळ शंकराचार्यांच्या जातीचे नंबुद्री ब्राह्मण नेमले जात असत. पण अलीकडे ती गादी वंशपरंपरेची झालेली आहे. पूर्वी देवाचे पुजारी संन्यासी असत, पण ती प्रथा मोडून तेथें गृहस्थाश्रमी पुजारी आले. त्यांचे संबंध पंडुकेश्वरच्या रजपुतांशीं झालेले आहेत.

## पंच शिला व पंचतीर्थें

बदरी क्षेत्रांत पांच शिलास्थानें आहेत. त्यांचें दर्शन व त्यावर दानधर्म करावयास सांगतात. त्यांचें माहात्म्य काय हें समजलेलें नाहीं. त्या पंचशिला येणेंप्रमाणें:— गरुड शिला ही मोठी असून गाभाऱ्यांत आहे. नारद शिला व मार्कंडेय शिला ह्या दोन्ही देवळाच्या आवारांत आहेत. वराह शिला व नृसिंह शिला ह्या दोन्ही अलकनंदेच्या पात्रांत आहेत.

येथें पंच-शिलांप्रमाणें पंचतीर्थें आहेत. ( १ ) ऋषि गंगा, (२) कूर्म धारा, ( ३ ) प्रल्हाद धारा, ( ४ ) तप्तकुंड वा अग्निकुंड आणि ( ५ ) नारद कुंड. ऋषि गंगेचा उल्लेख वर आलेलाच आहे. अलकनंदेच्या कांठीं बाकीच्या धारा व नारद कुंड आहे.

## अग्नि वा तप्तकुंड

केदारनाथाच्या देवळाच्या उजव्या हातास अग्निकुंड आहे, ह्यास तप्तकुंड असेंहि नांव आहे. यमुनोत्तरीस प्रत्यक्ष उगमाजवळच उष्णोदकाचे झरे आहेत. गंगोत्तरी व बदरीकेदार येथेंहि ते दहा-पंधरा मैलाच्या अंतरांत आहेत. बदरीनारायण येथें ते देवासंनिधच आहेत. हा एक अपूर्व योगच म्हटला पाहिजे कीं, दहा अकरा हजार फूट

उंचीवर जेथें बारा महिने अक्षय्य बर्फ टिकून असतें तेथें उकळत्या पाण्याचीं उन्हाळीं असावींत ही दैवी घटना आश्चर्यजनकच आहे. उन्हाळ्यांमुळेंच तेथील थंडीची असह्यता अल्पांशानें तरी सह्य झाली आहे. शिवाय स्नानास व इतर वापरास आयतें ऊन पाणीहि मिळतेंच. ह्या पाण्यास गंधकाचा वास थोडा तरी येतो व तें मचूळ लागतें.

अग्निकुंड गौरीकुंडापेक्षां मोठें आहे. तें अकरा हात लांब, नऊ हात रुंद आणि दोन–अडीच हात खोल असें आहे. त्यावर पन्हळी पत्र्यांचें छप्पर आहे. कुंड चांगलें बांधीव आहे. आंतील पाणी सोडून देण्याची सोय आहे. गोमुखांतून, अंगास चटकाच बसेल इतक्या कढत पाण्याची एक मनगटासारखी धारा कुंडांत पडत असते. ती धारा दट्या बसवून बंद करतां येते. केदार देवळाजवळ पायऱ्यांच्या शेजारीं उकळत्या पाण्याचा मुख्य झरा आहे. तोहि बांधून काढून त्यास दारें बसविलेलीं आहेत. तेथील पाणी अधणाचेंच असतें. तेथून तें तप्तकुंडांत व अन्यत्र खेळविलें आहे. कुंड मोठें व हवाहि गार ठणक, त्यामुळें पाणी लवकर निवतें व म्हणून आंत उतरून स्नान करवतें. दहा–पांच मिनिटांपेक्षां अधिक वेळ पाण्यांत बसून राहवत नाहीं. डोकें हलकें होऊन घेरी करूं लागतें. चालून आल्याचा शिणोठा व हवेंतील थंडी ह्या कारणांनीं कुंडांत उतरल्यावरोबर परम आल्हादकारक वाटतें. अंग मोकळें होऊन सर्व शिणवठा नाहींसा होतो. केदार देवळाच्या उत्तरेस अलकनंदेच्या पात्रापासून अजमासें पुरुष दीड पुरुष उंचीवर उष्णोदकाचीं दोन टाकीं आहेत. तीं एक माणूस आंत उतरून उभ्यानें मोकळेपणीं स्नान करील एवढालीं, आहेत. त्यांच्या कांठच्या डोंगर–कपाऱ्यांतून उष्णोदक झिरपून टाक्यांत येतें, व अधिक होणारें अलकनंदेंत जातें. तेथील पाणी कढतच असतें. पण टाकीं प्रवाहकांठीं व मोकळ्यावर असल्यामुळें स्नान थोडें अधिक वेळ सोसतें. तेथें ह्या प्रवाहांत उष्णोदकाचे झरे असल्याचें ऐकलें.

टाक्यापासून प्रवाहापर्यंत उतरण्यास पायऱ्या बांधल्या आहेत. पण त्या हाताहाताच्या उंचीच्या आहेत. प्रवाहावर तर दृष्टि ठरत नाहीं. अशा ठिकाणीं उतरून गंगेचें स्नान आणि तेंहि साक्षात् बर्फाच्या गार-ठणक पाण्याचें म्हणजे तें एक दिव्यच आहे.

## अलकनंदेचा उगम

अलकनंदेची पुराणोक्त उत्पत्ति पान १५६–१५७ वर भागीरथी गंगेच्या उत्पत्तिकथेंत आलेली आहे. अलकनंदेस विष्णुगंगा असेंहि नांव आहे. हीच ती पौराणिक विष्णुपदी. भरतभूमींत अवतरल्यावर अलकनंदा नांवानें प्रसिद्ध झालेली आहे.

सतोपथ वा सत्यपथ ह्या तीर्थाच्या वाटेवर, बदरी नारायणापासून सहा मैल अंतरावर, लक्ष्मीबन नांवाचें स्थान आहे. त्याच्या जवळच अलकापुरी आहे. तेथें भागीरथी व सत्यपथ ह्या डोंगरांतून आलेले हिमप्रवाह एकत्र मिळतात. त्यांतूनच अलकनंदेचा उगम झालेला आहे. उगमाजवळ काय किंवा वसुधारेच्या पुढें सरस्वती नदी मिळते त्या केशवप्रयागपर्यंत काय अलकनंदेचा बाल प्रवाह एखाद्या ओढयासारखा संकुचित झालेला दिसतो. प्रवाहपात्रांत लहान सहान दगड धोंडे सुद्धां उघडे पडलेले दृष्टीस पडतात. कांठावर व पात्रांतहि जागजागीं बर्फराशी पुष्कळ आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं तर तो प्रवाह त्या राशींखालीं गडप होऊन गेल्यामुळें दिसत सुद्धां नाहीं.

उगमापासून पांच–सहा मैलांवरील माना गांवापर्यंत म्हणजे केशवप्रयागपर्यंत अलकनंदा पूर्वाभिमुखी वाहाते. तेथून पुढें तीं बदरी नारायणावरून थेट विष्णुप्रयागपर्यंत दक्षिणवाहिनी झालेली आहे. केशवप्रयागपासून पुढें बदरी नारायणाच्या रहाळांत तिचा प्रवाह बालरूप सोडून युवारूप धारण करितो. तो देवदेखणीपासून हनुमान चट्टीपर्यंत प्रपातरूपानें उसळून वाहात आहे.

## ब्रह्मकपाल

बदरिकाश्रमापासून उत्तरेस अर्ध्या मैलावर अलकनंदेच्या उजव्या कांठीं एक प्रशस्त, भूमिसपाट खडक आहे. तेथेंच गंगेच्या काठाशीं घाट खोदून दोन पायऱ्याहि केलेल्या आहेत. ह्या स्थानास ब्रह्मकपाल वा पितृतीर्थ असें नांव आहे. तेथें पिंडपितृयज्ञ म्हणजे पितरांचें पिंडदानपूर्वक श्राद्ध केलें व तेथेंच गंगेवर तिलोदकानें पितृतर्पण केलें म्हणजे पुन्हां पिंडश्राद्ध करावयाची गरज राहत नाहीं.[*]

तत्रैव बदरीक्षेत्रे पिंडदातुं प्रभुः पुमान् । मोहाद्गयायां दद्यात् यः स पितॄन् पातयेत स्वकान् ।। सनत्कुमार संहिता–१।३८, ह्याचा अर्थ

असा कीं, ज्याला तेथें जाऊन पिंडदान करण्याचें सामर्थ्य, (अर्थात् शारीरिक व सांपत्तिक) आहे तो जर मानसिक दौर्बल्य (मोह, आळस, सुखलोलुपता एवढ्या कष्टाच्या यात्रा करतांना सुखाचा जीव कोठें दु:खांत घाला, ही बुद्धि) ह्यामुळें गया क्षेत्रीं जाऊन पिंडदान करील तर तो आपल्या पितरांचें अध:पतन करितो.

गया क्षेत्रीं जाऊन पितरांचें श्राद्ध करून विष्णुपदीं त्यांच्या नांवानें पिंड दिले म्हणजे मनुष्य पितृऋणांतून मुक्त होतो व पितरांना विष्णुलोक प्राप्त होतो, असें विष्णुवचन वायुपुराणांत आहे. पण ब्रह्मकपालीं पितरांचें पिंडदानपूर्वक श्राद्ध केलें तर ते ब्रह्मलोकास जातात, म्हणजे त्यांचा पितृ–लोकवास संपून त्यांस सायुज्य मुक्ति प्राप्त होते.

'दद्यात्ब्रह्मकपाले ऽस्मिन्पिंडं पुत्रोऽथवा परः। नाम्ना यस्य स वै ब्रह्मलोकं याति सनातनम्।' बदरी माहात्म्य.

श्रद्धया यत्कृतं तत् श्राद्धम्

तेथें पितरांना पिंड द्यावयाचा तो पुत्रानें वा गोत्रजांनीं दिला पाहिजेच; पण इतरांनींहि दिला तरी चालतो. आप्त, इष्ट, मित्रांनाहि पिंड द्यावा, इतकेंच नव्हे तर शत्रूंनाहि द्यावा. कारण श्राद्ध हें कर्तव्य आहे. शिवाय 'मरणांतानि वैराणि'. शास्त्रीयत: श्राद्धादि पितृकर्म करणें आमचें कर्तव्यच आहे. पण आधुनिक दृष्टीनें पाहिलें तरी प्रस्तुत काळींसुद्धां आपण मोठमोठ्या व्यक्तींची कृतज्ञतेनें स्मृतिजागृति ठेवण्यासाठीं त्यांचे सांवत्सरिक दिवस गाजावाजा करून पाळीतच असतों. त्याची पद्धत वेगळी एवढेंच. ह्याच न्यायानें ज्यांनीं आपणांस जन्म दिला, लहानाचे मोठे करण्यांत हाडाचीं काडें केलीं, आपणांस सुविद्य करण्यासाठीं पोटास चिमटे घेऊन काटकसर केली, त्या मातापितरांविषयीं कृतज्ञतेनें वर्षदिनीं पुण्यकर्म म्हणजेच शास्त्रानुसार श्राद्धकर्म करणें आपलें कर्तव्यच ठरतें. हें कर्म पूज्य भावनेनें व श्रध्दायुक्त अंत:करणानें केलेलें असतें म्हणूनच त्याला श्राद्ध नांव आहे. पितरांचें आपणावर ऋण आहे. त्यांतून उतराई होण्याचे जे प्रकार आहेत त्यांपैकींच श्राद्ध करणें हा एक आहे. गयेस विष्णुपदीं पिंडदान करून आपण ऋणमुक्त होतों. पण पितरांस मुक्ति मिळालेली नसते. ती ब्रह्मकपालीं पिंडदान केल्यानें मिळते. अर्थात् त्यांना ब्रह्मसायुज्यता प्राप्त झाल्यामुळें पितृऋण

संपतेंच. आपण जिवंत आहोंत तोंपर्यंत पितरांची स्मृति जागृत राहणारच. त्याकरितां पिंडदानाशिवाय श्राद्धांचे पार्वण, हिरण्य वगैरे अन्य श्राध्दविधि आहेतच.

### श्राद्ध–संकल्पाची सोय

श्राद्धविधि सांगण्यासाठीं पंड्यांनीं एक अधीत द्रावीड ब्राह्मण तेथें आणून ठेवला आहे. त्यास सर्व विधि यथासांग येत असतो. पण दक्षिणेचा मोठा भाग पंड्यांना जातो आणि ह्याच्या वांट्यास अल्पांशच राहात असतो. म्हणून त्याची वृत्ति लादलेली वेठ कशी तरी वारून टाकण्याची असते. एकाच वेळीं दहा–पांच जणांचे श्राद्धविधि एकाच मंत्रोच्चारानें तो करीत असतो. प्रत्येकाचें गोत्र वेगळें, प्रत्येकाच्या पितरांची नामावलि वेगळी. पण तो सगळ्यांची उद्धारगत एकाच उच्चारानें करून टाकतो. त्याच्यापुढें जसा लभ्यांशाचा प्रश्न असतो तसाच आलेल्या सर्व लोकांचे विधि उपलब्ध वेळांत उरकण्याचाहि प्रश्न असतोच. श्राद्धविधि करणारांस तो करतांना आपण काय करीत असतों इकडे लक्ष ठेवण्याची संवय असेल तर त्यानें चालविलेला हा एकतंत्र व गणान्त विधि त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं, आणि मग अशा प्रकारें कांहींतरी करण्यापेक्षां न करणें बरें अशी त्यांची प्रवृत्ति होते.

बदरी नारायणाच्या यात्रेंतील मुख्य गोष्टी दोन. एक नारायणाचें दर्शन व दुसरी ब्रह्मकपालीं पिंडदान. इतक्या कष्टानें तेथपर्यंत जाऊन श्राद्धविधि करावयाचा नाहीं हा विचार मला मानवेना. सगळ्याच क्षेत्रीं असा एकतंत्री गणान्त प्रकार असतो, असलेली थोडी फार श्रद्धा तेथें विकून यावें लागतें, असा प्रवाद जाण्यापूर्वी कानीं होताच. म्हणून त्या विधीची संथा घेण्याचें ठरविलें होतें; पण जमलें नाहीं.

त्या द्राविडाची खाजगी गांठ घेऊन त्यास मनोगत सांगितलें कीं, यथासांग विधि झाला पाहिजे. त्यानें आपली पोटदुखी सांगितली. त्यावरचें सुंठगुळाचें औषध मीं लगेच त्याच्या हातावर ठेवलें. त्याच्या अपेक्षेप्रमाणें त्यास अपेक्षित दक्षिणा मिळाली; त्यांत पंड्याचा भाग कांहीं नव्हता. आम्हांस त्यानें वेळ दिली त्याप्रमाणें आम्ही ब्रह्मकपालीं गेलों.

आयता विकत मिळणारा भात व पिंड घेऊन लोक श्राद्धविधि एकदाचा कसा तरी उरकून टाकतात. जशी कांहीं एक वेठ त्यांच्यावर लादलेली असते. पण तें माझ्या स्वभावास पटण्यासारखें नव्हतें. सर्व विधि अगदीं घरींच आहोंत असें समजून करण्याचें ठरविलें होतें. थोडेसे कष्ट व दोन रुपये अधिक खर्च ह्यापेक्षां आणखी त्यांत होतेंच काय ? अदल्याच दिवशीं मुकटा व शाल धुऊन सोवळ्यांत वाळत लावली. समस्त पितरांचें तें शेवटचेंच पिंडदानयुक्त श्राद्ध होतें म्हणून पंचपक्वान्नाचा नैवेद्य करावयाचें ठरविलें होतें. दर्भ, तीळ, यव, गंध, पुष्प वगैरे पूजासाहित्य भटजींकडे सोंपविलें होतें.

## देवास आमचा नैवेद्य

श्राद्धविधी व देवास नैवेद्य एकाच दिवशीं करावयाचा बेत ठरविला. पिंडाकरितां भात व खीर तेवढी निराळी केली म्हणजे बाकीचा स्वयंपाक देवाचा नैवेद्य व पिंडाचा नैवेद्य ह्यास एकच चालण्यासारखा असतो. श्राद्धाकरितां ब्राह्मणास क्षण देऊन बोलवावयाचें मनांत आणलें तरी तेथें वेदविद् ब्राह्मण मिळणारच कसा ? श्राद्ध चटावरच करावे लागते.

पंचपक्वान्नाचा नैवेद्य करावयाचें मनांत आणलें खरें, पण वाटेल तें पक्वान्न करण्याची सोय तेथें नव्हती. मिळाल्या त्या साहित्य सामुग्रींत करितां आलीं तीं म्हणजे शिरा, लाडू, खीर पुरी, साखरभात व पुरणपोळी हीं पक्वान्नें केलीं. पुरणपोळी हें पक्वान्न मंगल कार्यासच करितात. तें पितृकार्य—श्राद्ध पक्षादिस चालत नाहीं. पण ज्या वर्षी आपलें घरांत मंगलकार्य झालें असेल त्या वर्षी पितरांचे नैवेद्यास पुरणपोळी करण्याची प्रथा आहे. यथासांग नैवेद्य वाढून घेऊन आम्ही महाद्वारातून आंत गेल्यानंतर द्वारपालानें आम्हास हटकावून सांगितलें कीं, पक्व अन्न आंत नेण्यास बंदी आहे. तो विचित्र प्रकार पाहून आमचा अगदीं विरस झाला.

प्रत्यक्ष षोडशोपचार पूजेस बंदी असली तरी मानस—दर्शन—पूजन ह्यास बंदी नव्हती. म्हणून बदरीशाचें दर्शन घेऊन ध्यान करतांना श्लोक म्हटलें, विष्णू सहस्र नाम म्हणून नंतर मानस पूजनार्थ परापूजा म्हटली व आरती केली. विरस झाल्याकारणानें जो गहिंवर आला त्यायोगें मानसपूजा एकाग्रतेनें होऊन आपोआप प्रसन्नता उत्पन्न झाली.

ध्यानाचे श्लोक

शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशम् ।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम् ।।
लक्ष्मीकांतं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यम् ।
वंदे विष्णुं भवभयहरं सर्व लोकैकनाथम् ।।
नमोऽस्त्वनंताय सहस्रमूर्तये । सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।।
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते । सहस्त्रकोटीयुगधारिणे नमः ।।
नमः कमलनाभाय नमस्ते जलशायिने ।
नमस्ते केशवानंत वासुदेव नमोऽस्तु ते ।।
वासनाद्वासुदेवस्य वासितं भुवनत्रयम् ।
सर्वभूतनिवासोऽसि वासुदेव नमोऽस्तु ते ।।
नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहितायच ।
जगतद्धिताय कृष्णाय गोविंदाय नमोनमः ।।
कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।
प्रणतःक्लेशनाशाय गोविंदाय नमोनमः ।।
आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कारं केशवं प्रतिगच्छति ।।

* शंकराचार्यकृत परापूजा

पूर्णस्यावाहनं कुत्र सर्वाधारस्य चासनम् ।
स्वच्छस्य पाद्यमर्घ्यं च शुध्दस्याचमनं कुतः ।। १ ।।

---

* ह्या परापूजेंतील मूळ कल्पना श्रीमदाद्यशंकराचार्य ह्यांची असून ती त्यांच्या निर्गुण मानसपूजेंत स्पष्ट आहे. शिष्यरूपानें ' अखण्डे सच्चिदानंदे निर्विकल्पैकरूपिणी । स्थितेऽद्वितीयभावेऽपि कथं पूजा विधीयते । ' पहिल्याच श्लोकांत असा पूर्व पक्ष उत्पन्न करून पुढील सात श्लोकांत पूजनाच्या षोडशोपचारांपैकीं प्रत्येक संभवतोच कसा अशी पृच्छा केली आहे. ह्या प्रश्नास तेहतीस श्लोकांत उत्तर दिलें आहे. तीच मानसपूजा. ती ' आत्मबुध्यात्वमेवाहम् ' ह्या प्रकारची पूर्ण अद्वैती आहे. सत्ताविसाव्या श्लोकार्धांत तसें स्पष्ट म्हटलें आहे.– ' विश्वोवंद्योऽहमेवास्मि नास्तिवंद्योमदन्यतः ' । ह्या मानसपूजेंतील दोन श्लोकावरून तिची कल्पना येईल.

निर्मलस्य कुतः स्नानं वस्त्रं विश्वोदरस्य च ।
निरालंबस्योपवीतं पुष्पं निर्वासनस्य च ॥ २ ॥
निर्लेपस्य कुतो गंधो रम्यस्याभरणं कुतः ।
नित्यतृप्तस्य नैवेद्यस्तांबूलं च कुतो विभोः ॥ ३ ॥
प्रदक्षिणा ह्यनंतस्य ह्यद्वयस्य कुतो नतिः ।
वेदवाक्यैरवेद्यस्य कुतः स्तोत्रं विधीयते ॥ ४ ॥
स्वयंप्रकाशमानस्य कुतो नीरांजनं विभोः ।
अंतर्बहिश्च पूर्णस्य कथमुद्वासनं भवेत् ॥ ५ ॥
एवमेव परापूजा सर्वावस्थासु सर्वदा ।
एकबुध्दचा तु देवेशे विधेया ब्रह्मवित्तमैः ॥ ६ ॥

ऽ परापूजा मराठी अनुवाद

चराचरी तूं आवाहन ये काय तुझ्या कामीं ।
सकलाधारा द्यावें तुजला काय आसना मीं ॥ १ ॥
स्वच्छ जो तया केलें ठरती अर्घ्य पाद्य वायां ।
कर वाहेना आचमन तुला शुद्धाला द्यायां ॥ २ ॥

---

आराधयामि मणिसन्निभमात्मलिङ्ग –
मायापुरी हृदयपङ्कजसन्निविष्टम् ।
श्रद्धानदीविमलचित्तजलाभिषेकै –
र्नित्यं समाधिकुसुमैरपुनर्भवाय । ९
एवं वेदान्तकल्पोक्तस्वात्मलिङ्गप्रपूजनम् ।
कुर्वन्नामरणं वापि क्षणं वा सुसमाहितम् । ३२

ह्या मानसपूजेंतील प्रश्नरूपी आठ श्लोकांचा भावार्थ बहुतेक त्याच शब्दांत थोडें गाळून व फिरवून पांचच श्लोकांत कोणत्या तरी पुढील शंकराचार्यांनीं आणून त्यास 'परापूजा' असें नांव दिलें आहे. ती आद्यशंकराचार्यांच्याच नांवावर मोडते. ती 'बृहत्स्तोत्ररत्नाकरांत' छापली आहे. ती मात्र अद्वैती नसून पूर्ण द्वैती आहे.

ऽ वरील मराठींतील परापूजा ही वरील संस्कृत परापूजेपेक्षां मानसपूजेंतील पूर्वपक्षाचे जे सात श्लोक आहेत त्याचें रूपांतर आहे. ते बालबोध, साधे, रसाळ व म्हणण्यास अगदीं सोप्या चालीवर आहेत.

घालूं कैसें तुला निर्मला देवा स्नानातें ।
विश्वोदर तूं तुला वाहावा पट कवण्या हातें ।। ३ ।।
निरालंब तूं उपवीतांचें महत्त्व कां तूतें ।
गंधाची थोरवी काय तुज नसे लेप ज्यातें ।। ४ ।।
नसे वासना फुलें सुवासिक सुवास का तुजला ।
स्वत: रम्य तूं फिकी तुजपुढें पडे रत्नमाला ।। ५ ।।
निर्गंधव्या सुगंधिक कशीं हीं द्रव्यें तुजशी ।
धूपातीता प्रसन्न कैसा धूपें तूं होशी ।। ६ ।।
तेजोरूपा विश्वदीप हे धूपदीप तुजसी ।
भक्तजनांच्या आर्तिहरा का आर्तिक्यें होसी ।। ७ ।।
सदातृप्त तूं नैवेद्याची काय तुला वाणि ।
कर्माकर्मस्वयं फलद का सेवूं सुफलांनीं ।। ८ ।।
विभो तुष्ट तुज कसें करावें म्यां तांबुलानीं ।
विश्वश्रीदा रिझवूं कैसें स्वर्ण–दक्षिणांनीं ।। ९ ।।
नसे अनंता प्रदक्षणेचें बल माझे ठायीं ।
अगम्य पद तव मग कैसें म्यां लागावें पायीं ।। १० ।।
तुजला स्तवितां हात टेकिले जेथें वेदांनीं ।
कशी टिकावी तेथें वाणी मम बापुडवाणी ।। ११ ।।
स्वयंप्रकाशा काय तुजपुढें नीरांजन – ज्योती ।
विसर्जन तुला कोठें विश्वें नांदविशी पोटीं ।। १२ ।।
कळूनि सारे सजलों देवा तुझ्या पूजनासी ।
भय न लेंकरा वाटे जाया निज जननीपाशीं ।। १३ ।।

---

पुण्यांत सन १९०६ चे सुमारास उपाशी विठोबाचे देवळांत कै० विनायकबोवा फाटक योगाभ्यासी ह्यांनीं काढलेल्या संध्याश्रमांत धपार्तीच्या वेळीं ही मराठींतील 'परापूजा' प्रत्यहीं म्हटली जाई. तेव्हांपासून ती आमच्या घरांत तशीच इतर अनेक ठिकाणीं म्हटली जात आहे.

कोणी एका विनायक कवीनें ह्या मराठींतील परापूजेच्या सोळा श्लोकांचे तेरा श्लोक करून त्यांतील दहापांच शब्द इकडे तिकडे करून किंवा बदलून ती आपण केल्याचें भासविलें आहे.

अजाण मी लेंकरूं तुजकडे जननीचें नातें ।
तव सेवेचा देवा ओढा असे मात्र मातें ।। १४ ।।
चुकले मुकले शब्द मुलांचे गोडचि जननीतें ।
बालिश लीला बघूनि तिच्या मनीं हर्ष दाटे ।। १५ ।।
होइल तैसी करितों सेवा गोड करुनि घ्यावी ।
आत्मपदाची जोड *केशवा निजभक्ता द्यावी ।। १६ ।।

## पिंडदान व पितृतर्पण

देवळांत जाऊन स्वस्थपणें पूजा अर्चा नैवेद्य, अर्थात मानसिक, आटोपून ब्रह्मकपाटीं आम्हीं जाईपर्यंत भटजीनीं बहुतेकांचे विधि उरकीत आणलेच होते. माझ्याबरोबर आमचेच एक स्नेही श्री. चांदेकर ह्यांच्याशिवाय अन्य कोणीहि नव्हते. श्राद्धविधि यथासांग मनाप्रमाणें झाला. पितृ तर्पण सांगणारा माणूस निराळा असतो. त्यास दक्षिणा देऊन सांगितलें कीं, माझ्या नित्य कर्मांतील तो एक भाग आहे. मी तो करितों. मनाप्रमाणें गोष्टी घडून आल्या म्हणजे समाधान होऊन किती आनंद होतो तें अनुभवानेंच कळण्यासारखें आहे. घरीं स्वयंपाक करून ब्रह्मकपालीं सोवळ्यानें नुसती एक शाल अंगावर घेऊन गेलों हें पाहून भटजींना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, " अंगांत उबदार कपड्यांवर कपडे घालून सुद्धां लोक थंडी, थंडी, म्हणून कुडकुडत असतात आणि विधि लवकर उरकण्यासाठीं आमच्यामागें निकड लावतात. तुम्ही तर जवळ जवळ उघड्यासारखेंच झालां आहांत. चार पांच वर्षांच्या माझ्या येथील वास्तव्यांत आपला आचार पाळून इतक्या आस्थेनें श्राद्ध करणारे आपणच येथें—आलेल्यांत पहिले मला दिसतां आहां." पितरांची याद करून मीं भटजींजवळ दिली होती. त्यांतील गुरुस्थानांत टिळकांचें नांव पाहून त्यांनीं विचारलें कीं, हें नांव लोकमान्यांचें दिसतें ! त्यांच्याबरोबर साठे, वझे हीं नांवें होतीं. ते कोण म्हणून त्यांनीं पृच्छा केली. ही सर्व मंडळीं मी गुरुस्थानीं मानतों असें सांगून त्या सर्वांचे संबंधहि सांगितले.

---

* मुळ पाठांत 'मोरया' असा शब्द आहे. नारायणास उद्देशून म्हणून केशवा शब्द आम्ही घातला आहे.

## आत्मपिंड

पितरांच्या उद्धाराकरितां मुलगा आप्तेष्ट वा कोणीहि तेथें पिंडदान केलें तरी पितर ब्रह्मलोकास जातात. ज्यास पुत्रसंतान नाहीं व आपणांस आपल्या मृत्यूनंतर कोणीहि पिंड देण्याचा संभव नाहीं अशा लोकांना जिवंतपणींच आपल्याला पिंड देऊन ठेवितां येतो.

रत्नागिरीकडील एक शिवराम महादेव परांजपे नांवाचे गृहस्थ मला तेथें भेटले. त्यांना स्वतःला आत्मपिंड द्यावयाचा होता. वृध्दापकाळ, एकाकी व अननुकूल स्थिति ह्यामुळें ते उदास झालेले होते. स्वतःच्या श्राद्धाकरितां लोकांजवळ पैसे मागण्याचा संकोच वाटत होता. माझी गांठ पडली तेव्हां मीं त्यास म्हटलें कीं, तुम्ही पैसे मिळवून आपल्या श्रमाच्या मिळकतीनें आपलें श्राद्ध करा म्हणजे तुम्हांस खरें समाधान लाभेल. त्यास कमी पडत होते तेवढे पैसे देऊन सांगितलें कीं, ह्या पैशांत तुम्हांस करतां येतील तितक्या केदारेश्वरास एकादशण्या करा किंवा विष्णुसहस्रनामाचे पाठ करा. तो ब्राह्मण आनंदानें गहिंवरून गेला.

## भोट लोकांची वस्ती व व्यवसाय

बदरी नारायणापासून दोन मैलांवर उत्तरेस माणागांव आहे. गंगेच्या उजव्या कांठानें ब्रह्मकपालावरून तेथपर्यंत गेलें म्हणजे गंगा ओलांडून माणागांवापाशीं वाट जाते. तेथें भोट लोकांची वस्ती आहे. ह्या लोकांचा धंदा मेंढ्या पाळून लोंकर उत्पन्न करणें, ती पिंजून तिचें सूत कातणें, त्याचे पट्टू, कांबळीं विणणें, तिबेटमध्यें चार महिने मेंढ्या चारणीस नेऊन जातां येतां मेंढ्यांवरून नेतां येईल अशा मालाची–लोंकर, धान्य, मीठ, सवागी वगैरे जिनसांची–वाहतूक व व्यापार करणें हा आहे. हे लोक शेतीहि करितात. आम्ही तेथें असतांना ज्येष्ठ मासीं गहूं निघून पुन्हां बटाटे व गव्हाची पेरणी करण्याची तयारी होती. पांच सहा महिने जमिनी बर्फांत बुडून जातात. तेव्हां पेरलेल्या धान्याचे मोड मरत नाहींत. बर्फ पाघळून गेलें कीं, ते वाढतात. धान्य यावयाचें तसें येतें. बर्फ काळांत हे लोक आपलें बिऱ्हाड–बाजलें घेऊन खालीं जोशी मठापर्यंत येऊन राहातात.


## केशवप्रयाग

माणागांवजवळ अलकनंदेस सरस्वती नदी येऊन मिळते. ह्या संगमासच केशवप्रयाग असें नांव आहे. सरस्वती नदीचा उगम तेथून सुमारें अठ्ठावीस मैलांवर असलेल्या माणाघाटीपासून ( उंची १८,४०२' फूट ) झालेला आहे. माणागांवची उंची १०४००' फूट आहे. सरस्वती नदीचा प्रवाह कोसळून पडत असल्याप्रमाणें धोधाटचाचा व उच्च घोषाचा दुमदुमून चालला आहे. ह्या खडकावरून त्या खडकावर पाण्याची आदळ-आपट इतकी होत आहे कीं, उसळलेल्या पाण्याचा नुसता फेसच दिसतो. आम्ही उभे होतों तेथून खालीं २५-३० फूट खोलीवर हा पाण्याचा धिंगाणा चाललेला होता. तरी सुद्धां पाण्याचे तुषार इतक्या उंच उडत कीं, फोटो घेईघेईपर्यंत कांचेवर ( लेन्स ) तुषारांचें आवरण होऊन बसलें.

## व्यासाश्रम वा व्यासगुंफा

माणागांवाजवळ सरस्वतीच्या कांठीं गणेश वा व्यास गुंफा आहे. तेथेंच महर्षि व्यास मुनींनीं भारत-भागवत पुराणें लिहिलीं. श्रीमदाद्य शंकराचार्यांनीं आपलें भाष्य ग्रंथ तेथेंच लिहिले. सद्‌गुरु रामदासस्वामी ह्यांना धर्मप्रचार करून लोकजागृति करण्याची स्फूर्ति तेथूनच मिळाली. आधुनिक काळांतील रामतीर्थ परमहंस, स्वामी विवेकानंद, क्रांतिवीर बाबू सुभाषचंद्र बोस ह्यांना आपापलीं कार्यें करण्यास त्याच भागांत प्रेरणा झाली.

अलकनंदा-सरस्वती संगमस्थानाचें अलौकिक माहात्म्य प्राचीन काळापासून तों अगदीं आधुनिक काळापर्यंत चालत आलेलें डोळ्यांपुढें झगझगीत उभें आहे. तेथें अनुग्रहित होऊन परम सिध्दि प्राप्त झालेल्या लोकांची-नर, नारायण, उध्दवादि विरक्त व ज्ञानी ऋषिमुनींचीं उदाहरणें आहेत. त्याचप्रमाणें संसारी जीवनास सद्‌बोध करून, सन्मार्ग दाखवून कार्यप्रवृत्त करणारे प्रवृत्तिमार्गी ज्ञानी महर्षि-व्यास, रामदासस्वामी, रामतीर्थ परमहंस ह्यांसारख्यांचींहि उदाहरणें आहेत. वैष्णवमतप्रवर्तक श्री मध्वाचार्य ह्यानीं तेथेंच जाऊन समाधि घेतली. त्यांचें वृंदावन तेथें असल्याचें ऐकलें.




वसुधारा दृश्य मानागांवापासून पान ३०७



वसुधारा पान ३०७

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. नं. ........



बद्रीनारायण - गांव, मंदीर, अलकनंदा प्रवाह विहंगम दृश्य पान २८० ( फोटो – प्रा० शिरोळे )

## मुचकुंद गुंफा

मानागांवापासून थोडयाच अंतरावर मांधाता पुत्र राजऋषि मुचकुंद ह्यांची गुंफा आहे. हा राजा महापराक्रमी होता. कार्तिकस्वामींच्या अगोदर देवांचें सेनाधिपत्य ह्यांच्याकडेच होतें.

स्वबलाची परीक्षा पाहण्याकरितां ह्यानें कुबेरावर स्वारी केली. तेव्हां त्यानें राक्षसांचें साहाय्य घेऊन ह्याचा पराभव केला. ही अप्रतिष्ठा सहन न होऊन मुचकुंदानें आपले पुरोहित ब्रह्मऋषि वसिष्ठ ह्यांच्या तपःसामर्थ्याचें साहाय्य घेऊन कुबेराचा वचपा काढला. तेव्हां कुबेर त्यास म्हणाला, ‘तूं आपल्या शौर्यानें मजशीं लढ. ब्राह्मणाची मदत कशाला घेतोस ?’ मुचकुंदानें उत्तर केलें कीं, ‘तप आणि मंत्र ह्यांचें बल ब्राह्मणांजवळ व अस्त्रविद्या क्षत्रियांजवळ असते. म्हणून ह्या दोहोंचाहि उपयोग करून राजानें राष्ट्राचें कल्याण केलें पाहिजे.’

ह्या उत्तरानें कुबेर संतुष्ट होऊन त्यास पृथ्वीचें राज्य देऊं लागला, पण ही आयती देणगी मुचकुंदानें नाकारली व त्यास उत्तर दिलें, ‘मी आपल्या बाहुबलानें तें मिळवीन.’ बोलल्याप्रमाणें त्यानें कृति केल्याचें वर्णन पुराणांत आहे.

त्यानें कालयवनास नुसत्या दृष्टिक्षेपानेंच जाळून भस्मसात् करून टाकलें. असा तो महान् तपस्वीहि होता. ह्याच गुंफेंत तपश्चर्या करून त्यानें विष्णुपदाची प्राप्ति करून घेतली. असें ह्या गुंफेचें माहात्म्य आहे.

## मातामूर्ति मंदीर

मातामूर्ति हें स्थान मानागांवाच्या वायव्येस अलकनंदेच्या उजव्या कांठीं एक मैलाच्या आंत आहे. दक्षप्रजापतीची मुलगी मूर्ति ही धर्मास दिली होती. त्यांच्या पोटीं नर व नारायण ह्यांचे जन्म झाले. हे दोघेहि महा तपस्वी होते. इंद्रास भय उत्पन्न होऊन त्यानें त्यांच्या तपोभंगाकरितां अप्सरा पाठविल्या होत्या. तेव्हां त्यांनीं त्यांचा सत्कार करूनच त्यांना परत पाठवून दिल्या. इतकेंच नव्हे तर देवलोकींहि नाहीं अशी एक सुंदर अप्सरा आपल्या तपःसामर्थ्यानें निर्माण करून इंद्रास लाजविण्यासाठीं ती त्यांजबरोबर स्वर्गास पाठवून दिली. असे हे नरनारायण बंधुद्वय ऋषि शुकासारखे कडकडीत ब्रह्मचर्य व्रतधारी व तपोनिष्ठ होते. तेच ऋषि, पुढें कृष्णार्जुनरूपानें अवतरले आहेत. त्यांचा आश्रम

बदरिकाश्रमीं होता. त्यांच्या मातेचें तेथें मंदिर आहे. गोकुळअष्टमी-पासून वामन द्वादशीपर्यंत तेथें मोठी जत्रा भरते. त्या वेळीं उद्धवाच्या मूर्तीची मिरवणूक मोठ्या समारंभानें वाजत-गाजत बदरी नारायणाहून तेथें जाते. मातामूर्तिहूनच पुढें सतोपथाकडे वाट जाते.

### भीमगोड

भीमगोड–मानागांवापाशीं ज्या खडकांतून सरस्वती उचंबळून वाहात आहे त्या खडकांच्या दरडीवर एक भली मोठी वीस-पंचवीस फूट लांबी-रुंदीची शिला पडलेली आहे. तिचा उपयोग अनायासें पुलासारखा होतो. एवढी मोठी अवाढव्य शिला तेथें आणून टाकण्यास भीमाशिवाय अचाट शक्ति कोणास असणार आहे ? म्हणून त्याचेंच हें काम असलें पाहिजे ह्या समजुतीनें तिला भीमगोड असें नांव पडलें असावें.

### हवेची विरलता

मानागांवापासून वसुधारा तीन मैल वायव्य दिशेस अलकनंदेच्या डाव्या कांठीं आहे. मानागांवची उंची साडेदहा हजार फूट तर वसुधारेपाशीं ती बारा हजार फुटांच्यावर निश्चित आहे. तेथपर्यंत सारखा चढ आहे. उजव्या हातास वसुधारेचा पहाड व डाव्या हातास अलकनंदेचा प्रवाह व त्याच्या पलीकडे नारायणाचा पहाड. ह्या शें-दीडशें फूट रुंदीच्या खिंडींतून कांठाकांठानें वाट काढीत जावें लागतें. तेथें वाट अशी नाहींच. पवाली आणि तुंगनाथ येथें आढळलेलीं पांच पाकळ्यांचीं बहुविध रंगांचीं फुलें वाटेवर जागजागीं भरगच्च होतीं. मला श्वासोच्छ्वासास अडचण वाटूं लागली. त्याचबरोबर थकवाहि वाटूं लागला, पण तसेंच रेटून पुढें जात होतों. वसुधारेच्या अगदीं जवळ पोहोंचलों. सौभाग्यवतीस भोवळ येऊन डोकें फिरूं लागलें. ती वाटेंत बसलीच. तेव्हां प्रथम लक्षांत आलें कीं हा सारा खेळ हवेच्या विरलतेचा आहे. जों जों समुद्रसपाटीपासून उंच उंच जावें तों तों हवेवरील दाब कमी कमी होत जाऊन हवा विरल होत जाते. ह्यामुळें नेहमींच्या संवयीप्रमाणें एका घुटक्यांत जितका श्वास आपण आंत घेत असतों तितक्यांत असणारा प्राणवायु ( ऑक्सिजन ) श्वसनकार्याच्या कामीं अपुरा पडतो आणि त्यामुळें जीव गुदमरूं लागतो. हाच प्रकार तुंगनाथ

येथें झाला होता. ती गोष्ट तेथें लक्षांत आली. तेथें दुसरीहि एक गोष्ट लक्षांत आली. पांच पाकळ्यांच्या फुलांना दर्प येतो आणि त्यानें भोंवळ, मळमळ, वगैरे विकार उत्पन्न होतात, हा जो लोकसमज आहे तो खरा नाहीं. त्याचें प्रत्यंतर अनुभवूनच पाहिलेलें होतें. पण तीं फुलें जेथें उगवतात तेथें तेथेंच हे विकार उत्पन्न होतात ही गोष्ट खरी आहे. हीं फुलें साधारण अकरा हजार फूट उंचीच्या खालीं आढळतच नाहींत. तीं म्हणजे उंची मोजण्याचें एक गमकच आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. बारा हजार फूट उंचीवर तीं असतात व तेथें हवा विरळ झालेलीहि असतेच. हवेचा दोष फुलांना चिकटविण्यांत कार्य-कारणसंबंध चुकत असला तरी सावधगिरीकरितां लोकसमज अनुभवान्वित आहे.

## वसुधारा

अलकनंदेच्या डाव्या हातच्या पहाडावरून दोन जलधारा अक्षय्य पडत आहेत. त्यांना वसुधरा नांव आहे मानागांवाजवळून त्या प्रथम दिसतात पण पुढें जवळ जाईपर्यंत त्या दिसेनाशा होतात. त्यांतील एक लहान व एक मोठी असून त्या चारशें फुटांपेक्षांहि अधिक उंचीवरून पडत आहेत. वरून पडत असतांना त्या धारारूपी दिसत असल्या तरी खालीं पोहोंचेपर्यंत त्यांचें रूपांतर पावसांतील सरीप्रमाणें तुषारांत होतें. ह्या धारांतून बर्फाचे खडे पडत असतात, तेव्हां त्यांच्या आदळ–आपटीचा कडकड आवाज होतो, तो सारखा ऐकूं येत असतो. एखाद्या वेळीं बर्फाचा मोठासा खडा वर तोंडाशीं अडकला तर धारा कांहीं वेळ थांबल्यासारखी होते, पण मग एकदम तुंबारा फुटून धुमधडाका होऊन ती कोसळते. त्या पहाडाच्या आसपास सर्वच डोंगरावरून बर्फ गच्च भरून राहिलेलें आहे. तें सारखें ढासळून पडत असतें. त्याच्या पडण्यानें नेहमीं धाड, धाड, धाड, आवाज ऐकूं येतात. ते तेथेंच तेवढे ऐकूं येतात असें नसून बदरी गांवांतहि ऐकूं येत असतात. ह्या धारा खालीं पडतात तेथपासून तों गंगेच्या पात्रापर्यंत दोन चारशें फूट लांबी–रुंदीचा बर्फ सारखा पसरलेला आहे. धारांचें पाणी त्याच्या खालून अलकनंदेंत वाहून जातें.

तेथल्याइतकी थंडी कोठेंच नव्हती. तेथील उंची बारा सहस्र फुटां-

पेक्षां निश्चित अधिक भरेल. धारेखालीं जाऊन अंघोळ करणें तर शक्यच नव्हतें, पण नुसतें जवळ जाण्याचेंहि धाडस झालें नाहीं. तेथें वारें मनस्वी असतें, त्यामुळें थंडी अंगास झोंबते. धारेचे तुषार हवेबरोबर शें–पन्नास फुटांपर्यंत उडून येतात. जो भाग्यवान असेल त्याच्याच अंगावर ते येतात, इतरांच्या अंगावर मुळीच येत नाहींत, अशी समजूत आहे.

येऽशुद्ध पितृजाः पापाः पाखंडमतिवृत्तयः ।
न तेषां शिरसि प्रायः पतंत्यापः कदाचन ।

तेथें अष्टवसूंनीं तपश्चर्या केली म्हणून त्या धारेस वसुधारा नांव पडलें. किंवा चयनयागांत अग्निरूपी रुद्र जो महादेव त्याच्यावर घर्माची–दूध व तूप यांच्या मिश्रणाची–जी अखंड धारा धरितात, तीस वसोर्धारा म्हणतात. त्या कल्पनेवरून ह्या अखंड धारेस वसोर्धारा–वसुधारा नांव पडलें असावें. तेथूनच पुढें स्वर्गारोहणाची वाट लागते.

वसुधारेला सकाळीं लवकर निघून जाऊन यावें हेंच श्रेयस्कर आहे. दुपारीं वारा, पाऊस, गारा, धुकें ह्यांच्या त्रासाची भीति फार असते. जाऊन येण्यास आम्हांस सात तास लागले होते.

### नीलकंठ शिखर

बदरीनारायणाचे पश्चिमेस पांच मैलांवर नीलकंठ शिखर आहे. हें शिखर २१६४०′ फूट उंचीचें असून अक्षय्यच बर्फाच्छादित असतें. ह्याच्यापेक्षां उंचीचीं कामेटसारखीं शिखरें माणसानें पायाखालीं घातली असलीं तरी नीलकंठाचे माथ्यास अजून तरी कोणाचा पाय लागलेला नाहीं. त्याचें लांबून दर्शनच तेवढें घ्यावयाचें.

### चरण पादुका

बदरीपुरीच्या पाठीशीं अर्थात् पश्चिमेस जो नीलकंठ पर्वत आहे त्यावरील बर्फाच्छादनांत चरण पादुका आहेत. आषाढ अखेर वा श्रावणांत त्या मोकळ्या होतात.

### शेषनेत्र

बदरीपुरीच्या समोर अलकनंदेच्या डाव्या तीरीं डाक बंगल्याचे पाठीमागें एक शिला आहे. त्यावर शेषाचा डोळा स्पष्ट दिसतो.

### सतोपथ

सत्यपद, सत्यपथ वा सतोपथ हीं सर्व एकाच तीर्थाचीं नांवें आहेत.

तें तीर्थक्षेत्र बदरीनारायणाचे पुढें बारातेरा मैलांवर आहे. तें एक स्वर्गीय सरोवर आहे. त्याचा आकार तिकोनी असून त्याचा परीघ तीन मैलांचेवर आहे. भोवतीं हिमाच्छादित शिखरांचें कडेंच आहे असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. त्याची उंची मानस सरोवरापेक्षां सहाशेंच फुटांनीं कमी आहे (मानस १५०००′ फुटावर आहे. ) त्याच्या कोपऱ्यांना ब्रह्मकुंड, विष्णुकुंड व महेश्वरकुंड अशीं निरनिराळीं नांवें आहेत. त्या कुंडांतून स्नान केलें असतां महापातकांचाहि नाश होतो असें पुराणें सांगतात. तेथील स्नानाचें इतकें मोठें माहात्म्य आहे.

पुराणांत सांगितलेली फलश्रुति केवळ अर्थवादात्मक नाहीं. महापातकांची जाणीव होऊन त्यांच्या कर्त्यास टोचणीं लागली, पश्चात्ताप वाटूं लागला कीं, त्यांतच खरें प्रायश्चित्त आहे. आणि असाच माणूस एवढी जीवावरची यात्रा कष्ट सोसून करणार आणि अग्निदिव्यासारखें निर्वाणीचें हिमजल–स्नान–तेंहि एकच नव्हें तर एकाच दिवशीं तीन; आणि तीहि साडेचौदा हजार फूट उंचीवरील बर्फमय परिसरांत कीं, जेथें निवारा नाहीं, पाणी अक्षय्यच गोठून जात आहे अशा रक्तहि गोठून जाणाऱ्या थंडीच्या कडाक्यांत. ही मनाची सिद्धता म्हणजेच अर्धें अधिक पापक्षालन आहे. खरी शुद्धि प्रायश्चित्तांत आहे. त्याचाच धागादोरा स्नानापर्यंत पोहोंचतो. भगवंतांनीं असेंच सांगितलें आहे—

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसतोहि सः ।

अशीं उपरती झालेलीं माणसे असोत, नाहींतर स्वभावतःच भावभक्तीची असोत, तींच तेवढीं आपल्या निष्ठेच्या बळावर ह्या कुंडांतून स्नानें करितात. त्या कुंडातून स्नानें करणें ही गोष्ट इतकी सोपी नाहीं. आपणांस घरीं बसून त्याची यत्किंचितहि कल्पना येणार नाहीं. तें एक अग्निदिव्यच आहे.

तेथें भोंवतीं बर्फच बर्फ, भणभण वारे, निवारा कसा तो नांवालाहि नाहीं, थंडीचा कडाका एवढा कीं हाताचीं बोटें, नाक, गाल जांभळे दिसतात. पाणी जरा निश्चल झालें कीं थिजूं लागतें. अशा स्थितींत नुसतें मार्जन करणेंसुद्धां जिवावरचें वाटतें. पाण्याला बोट

लागलें कीं चटकाच बसतो व त्याची आकडी वळते. उन्ह सुद्धां निष्प्रभ व थंड वाटत असतें. ह्यावरून सुद्धां स्नानाची खरी कल्पना येथून करवणार नाहीं.

सरोवरांतील पाणी अर्धवट गोठलेलें असतें. पाण्यांत जाडजूड बर्फाच्या कांड्या तरंगत असतात. झुंबरास हेलकावा बसल्यावर त्याचे लोलक जसे खळखळ वाजतात त्याचप्रमाणें पाणी हललें कीं, त्या कांड्या खळखळ वाजतात. संथ पाण्याकडे पाहात बसले तर एक आश्चर्यकारक गम्मत दिसून येते. पाणी गोठावयास लागून त्यावर सायटच्या सारखा थर धरूं लागतो तेव्हां त्याच्यांतून बारीक बारीक मोहरी एवढाले बर्फाचे वाटोळे कण हातभर उंच उडत असतात.

त्या सरोवरापासून अर्ध्या मैलावर चंद्रकुंड व पुढें एक मैलावर सूर्य-कुंड आहे. तेथें एकापेक्षां एक उंच बर्फाच्छादित शिखरें आभाळास जाऊन भिडलेलीं दिसतात. तीं बहुतेक ढगांत दडलेलीं असतात; तरी-सुद्धा मधून मधून झरोक्यांतून डोकावल्याप्रमाणें ती दृष्टीस पडतात. त्या उंचावत गेलेल्या धवल शिखरांचा स्वर्गावर चढून जाण्याचा एक सोपानच झालेला असावा असें वाटतें. म्हणूनच त्यास 'स्वर्गारोहिणी' नांव पडलें आहे.

सतोपथ येथें कांहीं काळ राहून पांडवांनीं आपले देह तेथें ठेवून समोर दिसणाऱ्या 'स्वर्गसोपानानें' स्वर्गारोहण केले असावें असें वाटतें.

सतोपथ सरोवराचें जल हिमोदकच असल्यामुळें तें निर्मल, शुद्ध, पारदर्शक, गारठणक, दिव्य म्हणूनच पवित्र पुण्यपावन आहे हें सांगणें नकोच. तेथील वातावरण गूढ, शांत, पवित्र व रम्य आहे. परमेश्वरी वैभवाचा आविष्कार एकदम उठावून मनांत भरतो. एकटेपणाची भयभीति वाटत नाहीं. निसर्गांतील चमत्कार पाहून अचंबा वाटतो. मन प्रसन्नतेनें रमतें. तेथेंच तळ देऊन राहावे असें वाटतें. पण थंडी-मुळें शरीर मनाची साथ करण्यास कचरतें. जन्मास येऊन एकदा तरी अशा ठिकाणीं बर्फसांन्निध्यात निदान घटकाभर तरी काळ काढावा म्हणजे जन्मसाफल्य झालेसें वाटेल ह्यांत शंका नाहीं.

वनश्री, दऱ्याखोरीं, जलप्रवाह, चढउतार ह्यांची शोभा पुष्कळ ठिकाणीं हिमालयांत पाहावयास मिळते. पण जेथें झाडझूड नाहीं,

अशाहि ठिकाणीं निसर्गानें केवढी अद्‌भुतरम्यता निर्माण करून ठेवली आहे ह्याचें कौतुक वाटतें. मानस सरोवराची कल्पना आणून देण्यास सतोपथ सरोवर योग्य आहे. तें म्हणजे मानसाची संकोचित आवृत्तिच आहे. दोन्ही ठिकाणची उंची जवळ जवळ सारखीच, वातावरण तर एकच म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. जें काय अंतर आहे तें विस्तारांत आहे. दोन्ही स्थानें स्वर्गातच आहेत. सतोपथ हें नारायण पर्वत जो महाविष्णूचें निवासस्थान त्याच्या पायथ्याशीं आहे, तर मानस हें कैलास पर्वत जो महादेवाचें निवासस्थान, त्याच्या-पायथ्याशीं आहे. दोघांचेंहि पावित्र्य सारखेंच. 'एकमप्यस्थिता सम्य-गुभयोर्विन्दते फलम्' । इतक्या उच्च भूमिकेवर गेल्यानंतर तेथें भेद राहाणारच कसा ? तेथें हरिहरांचें तादात्म्यच आढळणार.

चारहि धामांच्या ठिकाणाजवळ बर्फ दिसत असला तरी त्याचे अगदीं जवळ जाऊन राहण्याची संधि लाभत नाहीं. हिमालयांत जाऊन जर हिमवंताची प्रत्यक्ष भेट नाहीं तर तेथें जाणें व्यर्थच समजलें पाहिजे. ह्या जाणिवेनें तरी बदरीनारायणास गेल्यानंतर सतोपथास जाऊन आल्याशिवाय राहूं नये. तेथें जाणें विशेष कष्टाचें व पैसे लागणारे आहे असें नाहीं.

बदरीनारायणाहून सतोपथास दोन मार्गांनीं जातां येतें. तेथें जाण्यास आषाढ–श्रावणमासाशिवाय बर्फ वितळून जाऊन वाट मोकळी झालेली नसते. बदरीपुरीहून सहा मैलावर अलकापुरी असून जवळच लक्ष्मीवन आहे. अलकनंदेचा प्रवाह त्या वनांतून जातांना मोठा चित्रमय दिसत असतो. तेथून पुढें चार मैल चढून गेले म्हणजे चक्रतीर्थ लागतें. नारायण पर्वतावरून सहस्त्रो धारा वाहून येऊन त्या तीर्थांत पडत आहेत. भोंवतीं बर्फाच्छादित उंच शिखरें, डोंगरउतार व वरूनच वाहात येणारे हिम व जलप्रवाह हें दृश्य अलौकिकच आहे. इतरत्र असा देखावा दृष्टिस पडणें अशक्यच आहे. डोंगर थोडेसे दुरावल्यामुळें तो भाग जरा सपाटीचा व मोकळा वाटतो. तेथें खऱ्या एकांताचें व बर्फमय प्रदेशांतहि रमणीयता असूं शकते ह्याचें प्रत्यंतर अनुभवास येते. ह्यासाठींच ती स्वर्गीय भूमि समजली गेली असावी. चक्रतीर्थापुढें अर्ध्या मैलावर एक भली मोठी शिळा पडलेली आहे.

पेक्षां निश्चित अधिक भरेल. धारेखालीं जाऊन अंघोळ करणें तर शक्यच नव्हतें, पण नुसतें जवळ जाण्याचेंहि धाडस झालें नाहीं. तेथें वारें मनस्वी असतें, त्यामुळें थंडी अंगास झोंबते. धारेचे तुषार हवेबरोबर शें-पन्नास फुटांपर्यंत उडून येतात. जो भाग्यवान असेल त्याच्याच अंगावर ते येतात, इतरांच्या अंगावर मुळीच येत नाहींत, अशी समजूत आहे.

येऽशुद्ध पितृजाः पापाः पाखंडमतिवृत्तयः ।
न तेषां शिरसि प्रायः पतंत्यापः कदाचन ।

तेथें अष्टवसूंनीं तपश्चर्या केली म्हणून त्या धारेस वसुधारा नांव पडलें. किंवा चयनयागांत अग्निरूपी रुद्र जो महादेव त्याच्यावर घर्माची—दूध व तूप यांच्या मिश्रणाची—जी अखंड धारा धरितात, तीस वसोर्धारा म्हणतात. त्या कल्पनेवरून ह्या अखंड धारेस वसोर्धारा—वसुधारा नांव पडलें असावें. तेथूनच पुढें स्वर्गारोहणाची वाट लागते.

वसुधारेला सकाळीं लवकर निघून जाऊन यावें हेंच श्रेयस्कर आहे. दुपारीं वारा, पाऊस, गारा, धुकें ह्यांच्या त्रासाची भीति फार असते. जाऊन येण्यास आम्हांस सात तास लागले होते.

### नीलकंठ शिखर

बदरीनारायणाचे पश्चिमेस पांच मैलांवर नीलकंठ शिखर आहे. हें शिखर २१६४०′ फूट उंचीचें असून अक्षय्यच बर्फाच्छादित असतें. ह्याच्यापेक्षां उंचीचीं कामेटसारखीं शिखरें माणसानें पायाखालीं घातली असलीं तरी नीलकंठाचे माथ्यास अजून तरी कोणाचा पाय लागलेला नाहीं. त्याचें लांबून दर्शनच तेवढें घ्यावयाचें.

### चरण पादुका

बदरीपुरीच्या पाठीशीं अर्थात् पश्चिमेस जो नीलकंठ पर्वत आहे त्यावरील बर्फाच्छादनांत चरण पादुका आहेत. आषाढ अखेर वा श्रावणांत त्या मोकळ्या होतात.

### शेषनेत्र

.बदरीपुरीच्या समोर अलकनंदेच्या डाव्या तीरीं डाक बंगल्याचे पाठीमागें एक शिला आहे. त्यावर शेषाचा डोळा स्पष्ट दिसतो.

### सतोपथ

सत्यपद, सत्यपथ वा सतोपथ हीं सर्व एकाच तीर्थाचीं नांवें आहेत.

तें तीर्थक्षेत्र बदरीनारायणाचे पुढें बारातेरा मैलांवर आहे. तें एक स्वर्गीय सरोवर आहे. त्याचा आकार तिकोनी असून त्याचा परीघ तीन मैलांचेवर आहे. भोवतीं हिमाच्छादित शिखरांचें कडेंच आहे असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. त्याची उंची मानस सरोवरापेक्षां सहा-शेंच फुटांनीं कमी आहे (मानस १५०००′ फुटावर आहे. ) त्याच्या कोपऱ्यांना ब्रह्मकुंड, विष्णुकुंड व महेश्वरकुंड अशीं निरनिराळीं नांवें आहेत. त्या कुंडांतून स्नान कलें असतां महापातकांचाहि नाश होतो असें पुराणें सांगतात. तेथील स्नानाचें इतकें मोठें माहात्म्य आहे.

पुराणांत सांगितलेली फलश्रुति केवळ अर्थवादात्मक नाहीं. महापातकांची जाणीव होऊन त्यांच्या कर्त्यास टोचणीं लागली, पश्चात्ताप वाटूं लागला कीं, त्यांतच खरें प्रायश्चित्त आहे. आणि असाच माणूस एवढी जीवावरची यात्रा कष्ट सोसून करणार आणि अग्निदिव्या-सारखें निर्वाणीचें हिमजल—स्नान—तेंहि एकच नव्हें तर एकाच दिवशीं तीन; आणि तीहि साडेचौदा हजार फूट उंचीवरील बर्फमय परिस-रांत कीं, जेथें निवारा नाहीं, पाणी अक्षय्यच गोठून जात आहे अशा रक्तहि गोठून जाणाऱ्या थंडीच्या कडाक्यांत. ही मनाची सिद्धता म्हणजेच अर्धें अधिक पापक्षालन आहे. खरी शुद्धि प्रायश्चित्तांत आहे. त्याचाच धागादोरा स्नानापर्यंत पोहोंचतो. भगवंतांनीं असेंच सांगितलें आहे—

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसतोहि सः ।

अशीं उपरती झालेलीं माणसे असोत, नाहींतर स्वभावतःच भाव-भक्तीची असोत, तींच तेवढीं आपल्या निष्ठेच्या बळावर ह्या कुंडां-तून स्नानें करितात. त्या कुंडातून स्नानें करणें ही गोष्ट इतकी सोपी नाहीं. आपणांस घरीं बसून त्याची यत्किंचितहि कल्पना येणार नाहीं. तें एक अग्निदिव्यच आहे.

तेथें भोंवतीं बर्फच बर्फ, भणभण वारे, निवारा कसा तो नांवा-लाहि नाहीं, थंडीचा कडाका एवढा कीं हाताचीं बोटें, नाक, गाल जांभळे दिसतात. पाणी जरा निश्चल झालें कीं थिजूं लागतें. अशा स्थितींत नुसतें मार्जन करणेंसुद्धां जिवावरचें वाटतें. पाण्याला बोट

लागलें कीं चटकाच बसतो व त्याची आकडी वळते. उन्ह सुद्धां निष्प्रभ व थंड वाटत असतें. ह्यावरून सुद्धां स्नानाची खरी कल्पना येथून करवणार नाहीं.

सरोवरांतील पाणी अर्धवट गोठलेलें असतें. पाण्यांत जाडजूड बर्फाच्या कांड्या तरंगत असतात. झुंबरास हेलकावा बसल्यावर त्याचे लोलक जसे खळखळ वाजतात त्याचप्रमाणें पाणी हललें कीं, त्या कांड्या खळखळ वाजतात. संथ पाण्याकडे पाहात बसले तर एक आश्चर्यकारक गम्मत दिसून येते. पाणी गोठावयास लागून त्यावर सायट्या सारखा थर धरूं लागतो तेव्हां त्याच्यांतून बारीक बारीक मोहरी एवढाले बर्फाचे वाटोळे कण हातभर उंच उडत असतात.

त्या सरोवरापासून अर्ध्या मैलावर चंद्रकुंड व पुढें एक मैलावर सूर्य-कुंड आहे. तेथें एकापेक्षां एक उंच बर्फाच्छादित शिखरें आभाळास जाऊन भिडलेलीं दिसतात. तीं बहुतेक ढगांत दडलेलीं असतात; तरी-सुद्धा मधून मधून झरोक्यांतून डोकावल्याप्रमाणें ती दृष्टीस पडतात. त्या उंचावत गेलेल्या धवल शिखरांचा स्वर्गावर चढून जाण्याचा एक सोपानच झालेला असावा असें वाटतें. म्हणूनच त्यास 'स्वर्गारोहिणी' नांव पडलें आहे.

सतोपथ येथें कांहीं काळ राहून पांडवांनीं आपले देह तेथें ठेवून समोर दिसणाऱ्या 'स्वर्गसोपानानें' स्वर्गारोहण केले असावें असें वाटतें.

सतोपथ सरोवराचें जल हिमोदकच असल्यामुळें तें निर्मल, शुद्ध, पारदर्शक, गारठणक, दिव्य म्हणूनच पवित्र पुण्यपावन आहे हें सांगणें नकोच. तेथील वातावरण गूढ, शांत, पवित्र व रम्य आहे. परमेश्वरी वैभवाचा आविष्कार एकदम उठावून मनांत भरतो. एकटेपणाची भयभीति वाटत नाहीं. निसर्गांतील चमत्कार पाहून अचंबा वाटतो. मन प्रसन्नतेनें रमतें. तेथेंच तळ देऊन राहावे असें वाटतें. पण थंडी-मुळें शरीर मनाची साथ करण्यास कचरतें. जन्मास येऊन एकदा तरी अशा ठिकाणीं बर्फसांन्निध्यात निदान घटकाभर तरी काळ काढावा म्हणजे जन्मसाफल्य झालेसें वाटेल ह्यांत शंका नाहीं.

वनश्री, दऱ्याखोरीं, जलप्रवाह, चढउतार ह्यांची शोभा पुष्कळ ठिकाणीं हिमालयांत पाहावयास मिळते. पण जेथें झाडझूड नाहीं,

अशाहि ठिकाणीं निसर्गानें केवढी अद्‌भुतरम्यता निर्माण करून ठेवली आहे ह्याचें कौतुक वाटतें. मानस सरोवराची कल्पना आणून देण्यास सतोपथ सरोवर योग्य आहे. तें म्हणजे मानसाची संकोचित आवृत्तिच आहे. दोन्ही ठिकाणची उंची जवळ जवळ सारखीच, वातावरण तर एकच म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. जें काय अंतर आहे तें विस्तारांत आहे. दोन्ही स्थानें स्वर्गांतच आहेत. सतोपथ हें नारायण पर्वत जो महाविष्णूचें निवासस्थान त्याच्या पायथ्याशीं आहे, तर मानस हें कैलास पर्वत जो महादेवाचें निवासस्थान, त्याच्या-पायथ्याशीं आहे. दोघांचेंहि पावित्र्य सारखेंच. 'एकमप्यस्थिता सम्यगुभयोर्विन्दते फलम्' । इतक्या उच्च भूमिकेवर गेल्यानंतर तेथें भेद राहाणारच कसा ? तेथें हरिहरांचें तादात्म्यच आढळणार.

चारहि धामांच्या ठिकाणाजवळ बर्फ दिसत असला तरी त्याचे अगदीं जवळ जाऊन राहण्याची संधि लाभत नाहीं. हिमालयांत जाऊन जर हिमवंताची प्रत्यक्ष भेट नाहीं तर तेथें जाणें व्यर्थच समजलें पाहिजे. ह्या जाणिवेनें तरी बदरीनारायणास गेल्यानंतर सतोपथास जाऊन आल्याशिवाय राहूं नये. तेथें जाणें विशेष कष्टाचें व पैसे लागणारे आहे असें नाहीं.

बदरीनारायणाहून सतोपथास दोन मार्गांनीं जातां येतें. तेथें जाण्यास आषाढ–श्रावणमासाशिवाय बर्फ वितळून जाऊन वाट मोकळी झालेली नसते. बदरीपुरीहून सहा मैलावर अलकापुरी असून जवळच लक्ष्मीवन आहे. अलकनंदेचा प्रवाह त्या वनांतून जातांना मोठा चित्रमय दिसत असतो. तेथून पुढें चार मैल चढून गेले म्हणजे चक्रतीर्थ लागतें. नारायण पर्वतावरून सहस्त्रो धारा वाहून येऊन त्या तीर्थांत पडत आहेत. भोंवतीं बर्फाच्छादित उंच शिखरें, डोंगरउतार व वरूनच वाहात येणारे हिम व जलप्रवाह हें दृश्य अलौकिकच आहे. इतरत्र असा देखावा दृष्टिस पडणें अशक्यच आहे. डोंगर थोडेसे दुरावल्यामुळें तो भाग जरा सपाटीचा व मोकळा वाटतो. तेथें खऱ्या एकांताचें व बर्फमय प्रदेशांतहि रमणीयता असूं शकते ह्याचें प्रत्यंतर अनुभवास येते. ह्यासाठींच ती स्वर्गीय भूमि समजली गेली असावी. चक्रतीर्थापुढें अर्ध्या मैलावर एक भली मोठी शिळा पडलेली आहे.

तेथून सुमारे दीड मैलावर सत्यपथ सरोवर कृष्णपर्वताच्या पायथ्याशीं आहे.

मातामूर्तीकडून जशी वर उल्लेखलेली एक वाट जाते तशीच मानागांवाहून वसुधारा व पुढें सतोपथ अशी दुसरीहि पण वाट आहे.

वसुधारेपासून पश्चिमेस केदार पर्वताच्या कड्याची पाठबाजू दिसते. त्याची उंची २२७७० फूट आहे. तेथून नीलकंठ शिखर दिसतें, तसेच कामेट शिखरहि दिसत असतें. त्याची उंची २५४४७ फूट आहे. हे अलौकिक बर्फाच्छादित शिखरांचे कडे पाहात पाहात अजमासें दोन मैल जावें म्हणजे तेथें एक खिंडींचा चव्हाटा लागतो. त्यांतील एक खिंड बदरीपुरीहून वसुधारेकडे आलेली आहे. दुसरी एक समोर उत्तरेकडे गेलेली आहे. ती तर आपादतलमस्तक बर्फांत गढून गेलेली दिसते. भोंवतींच्या डोंगरांचीं हिमशिखरें ढगांत लुप्त होऊन बसलेली असतात. ह्याच स्थानास 'स्वर्गारोहिणी' नांव आहे. तिसरी खिंड पूर्व बाजूनें गेलेली असून ती कोठें जाते तिचा पत्ता नाहीं. चौथी खिंड वायव्य दिशेस आहे. तींतून अजमासें सात मैल गेलें म्हणजे सतोपथ स्थान येतें.

त्या चव्हाटयापासून ७–८ मैलावर भागीरथीचें उगमस्थान जें 'गोमुख' तें आहे. तसेंच १०–१२ मैलांवर बदरीकेदार हे स्थान आहे. बदरीनारायण व बदरीकेदारचा पुजारी एकेकाळी एकच होता व तो दोघांची नित्य पूजा प्रतिदिवशीं तेथें तेथें जाऊन करी असें सांगतात.

सतोपथाची यात्रा चालण्याच्या दृष्टीनें इतकी कठिण नाहीं. तेथें थंडी विशेष आहे ही गोष्ट खरी असली तरी उबदार कपडे व तसेंच हंतरूण पांघरूण बरोबर घेतलें म्हणजे काळजी वाटावयास नको. प्रबल इच्छा, तत्पूर्तिकरितां चिकाटी आणि सोशिकपणा असला म्हणजे झालें. सिद्धसाधनपूर्वक तेथें जाण्याचा प्रयत्न करावा, न सोसेसें वाटल्यास परत फिरावें.

कपड्यांशिवाय पोटपूजेचीहि सोय बदरीनारायणाहूनच करून घेतली पाहिजे. तिकडे विस्तव करण्यास लाकूडफाटा मिळणारा नाहीं. अर्थात् बरोबर खाद्य जिनसा घ्यावयाच्या त्या लाडू, पुऱ्या, पोहे, लोणचें असे असावेत. म्हणजे विस्तव लागण्याची आवश्यकताच पडू

नये. जाऊन येण्यास तीन दिवस पुरतात. चार दिवस पुरतील एवढे खाद्य पदार्थ बरोबर घ्यावे. स्टोव्ह बरोबर घेतला तर बोजा वाढतो. व तांदूळ शिजण्याचे कामीं त्याचा उपयोग होत नाहीं तो नाहींच. वरच्या उंचीला हवेचा दाब कमी झाल्यामुळें पाण्यास थोड्या उष्णतेनेंच आधण येतें. त्यामुळें तांदूळ, कितीहि वेळ शिजत ठेवला तरी शिजत नाहीं. हा आमचा कैलास वाटेंतील अनुभव आहे. वाटेंत उतरण्यास चट्टया नाहींत. झाडाझुडांचा निवाराहि नाहीं. तीन चार ठिकाणीं गुहा आहेत. त्यांचा आसरा घेत जावयाचें. वसुधारेच्या अलिकडे मानागांव लागतें तेथील बोजेवाले केले म्हणजे त्यांना त्या टापूची विशेष माहिती असल्यामुळें निराळा वाटाड्या बरोबर घ्यावयास नको. ज्यांला परवडणार असेल त्यांनीं लहानशी राहुटी बरोबर घेतली तर दोन दिवस स्वर्गीय वातावरणांत राहण्याच्या संधीचा सहज लाभ घेतां येईल.

बदरीनारायणास एवढी मोठी यात्रा प्रतिवर्षी लोटत असते पण त्यांतील सहस्त्रांत चारदोन तरी त्या स्वर्गीय, आजच्या स्वतंत्र भरतखंडांतील, बालरूप मानस सरोवराचें दर्शन घेत असतील किंवा नाहीं ह्याची वानवाच आहे.

कैलास–मानस–पथ

वसुधारेपासून तसेंच पुढें गेलें म्हणजे खिडींचा एक चव्हाटा लागतो. त्यांतील उत्तरेच्या मार्गानें गेलें म्हणजे बदरी नारायणापासून सुमारे अठ्ठावीस मैलांवर माना खिड (उंची १८४०२′) आहे. तेथून पुढें तिबेट देश लागतो. त्यांत पाऊणशें मैलांवर थोलिंग मठ, पुढें दीडशें मैलांवर श्री कैलास शिखर व त्याच्याहि पुढें सोळा मैलावर मानस सरोवर आहे. थोलिंग मठ हा बौद्धांचा असला तरी तेथें महादेवाचें स्थान अजून सुप्रतिष्ठित आहे असें म्हणतात. ह्या मार्गापेक्षा अल्मोऱ्याकडून जाणें सर्वच दृष्टीनें सोयीचें आहे. त्याची माहिती कैलास–यात्रा भागांत सविस्तर देऊं.

अनिच्छेनें का होईना परतणें येते.

बदरी नारायण येथें नारायणाचें दर्शन, ब्रह्मकपाटीं पिंडदान, वसुधारेच्या तुषारांचें मार्जन–स्नान आणि सतोपथाचे दर्शन हीं सर्व

झाल्यानंतर हिमालयांतील पूर्वसंकल्पित चार मुख्य धामांपैकीं, बदरी नारायण–यात्रा निर्विघ्नपणें पदरांत पडली. अनुषंगानें तेथपर्यंतच्या प्रवासांत उत्तर–काशी, गुप्त–काशी, उखीमठ, तुंगनाथ, त्रिजुगी नारायण, गोपेश्वर, पांडुकेश्वर वगैरे पवित्र स्थानें अनायासें पाहावयास सांपडलीं. तसेंच पंचप्रयागशिवाय हरद्वार, हरप्रयाग, सोनप्रयाग भास्करप्रयाग इत्यादि पुण्यतीर्थांच्या ठिकाणीं स्नानाचे योग लाभले.

आतां पुढचा प्रवास राहिला नाहीं. परत मार्गी घराचीच वाट धरावयाची. पण तीस चाळीस दिवसांच्या अनुभवानें असो, नाहींतर पूर्वजन्माच्या संस्कारामुळें म्हणजेच स्वभावधर्मानुसार असो, इकडील शांत, उत्साही व पवित्र अशा नैसर्गिक वातावरणांतून घराकडील जीवनकलहाच्या धक्काबुक्कीच्या शहरीं वातावरणांत परत फिरण्यास मन उद्युक्त होईना. ते खट्टू, उदास होऊन बसलें. वास्तविक इक-डील प्रवास म्हणजे सुखाचा जीव आपण होऊन दुःखांत घालणें होय, असें कित्येक समजतात. तें अंशतः खरें आहे. प्रवास अवघड, कष्टाचा व प्रसंगोपात जिवावरचा आणि दैनंदिन निवास, तोहि सर्वच प्रका-रच्या गैरसोयींचा. असें प्रत्यक्ष अनुभवलें असतांना सुद्धां हिमालय–वासाची मोहिनी इतकी प्रबल होऊन बसली कीं, जिवाभावाच्या माणसांत घरीं जाऊन आरामांत राहण्याचा ओढा निर्बल ठरला.

बोजेवाल्यांचा करार संपत आलेला, बरोबरची मोजकी सामुग्री व पुंजी तीहि दिवसेंदिवस संपुष्टांत येऊं लागलेली, हिमालयांतील मुसळधारी पावसाळा तोहि डोक्यावर उभा राहिलेला, अशा ह्या अडचणींमुळें निरुपाय होऊन परतीचा मार्ग अनिच्छेनें कां होईना पतकरणें प्राप्तच झालें.

## अखेर दर्शन व निरोप

सुप्रभातीं स्नानादि सर्व विधि उरकून घेतले. पंडेजींची गांठ घेऊन त्यांचें देणें चुकतें केलें. त्यांनीं आम्हां सर्वांस उतरण्याकरितां माडी-वरील जागा दिली होती. लागतील तीं भांडींकुंडीं व सर्वच प्रकारचें साहाय्य देऊन कसलीहि अडचण पडू दिली नव्हती. इतकेंहि करून नसताच गयावळी हव्यास किंवा अडवणूक केली नव्हती. असली मंडळी तेथें नसती तर हिमालयाच्या गिरिकुहरांमधील यात्रा आमच्या-

सारख्या संसारी माणसांनीं करणें दुर्घटच होतें. पंडेजींच्या बहुमोल सहाय्याबद्दल कृतज्ञेनें त्यांची संभावना केली. तेहि संतुष्ट होऊन त्यांनीं आम्हांस प्रसाद व आशीर्वाद दिले. त्यांचा निरोप घेतला; नको, नको, म्हणत असतांनासुध्दा ते पुलापर्यंत पोहोंचवावयास आलेच.

बदरीशाचें शेवटचें दर्शन घेऊन निघावें म्हणून मंदिरांत गेलों, पण दरवाजे उघडले नव्हते. शिखर-दर्शन घेऊनच निरोप घ्यावा लागला.

देवदेखणीपर्यंतचें अंतर जेमतेम अर्धापाऊण मैल भरेल. ती सगळी सपाटीच आहे. पण तेथपर्यंत पोहोंचण्यास आम्हांस एक तासाच्या वर वेळ लागला. पन्नास वर्षांपूर्वीं मुलींचीं लग्नें लहानपणीं होत असत. तेव्हां माहेरून सासरीं जातांना त्यांचें पाऊल किती जड होऊन जाई, पुन्हां पुन्हां त्या थांबून कितीदा मागें वळून घराकडे पाहात, डोळे भरून येऊन त्यांना वरचेवर कसे हुंदके येत, ह्या अवस्थेचें प्रात्यक्षिक अनुभवास पुरेपूर आलें. माझे एक स्नेही कै. साठे प्राध्यापक मेयो कॉलेज, ह्यांची मनःस्थिति तंतोतंत माझ्याप्रमाणेंच झाल्याचें त्यांनीं मला सांगितलें होतें. देवदेखणीपाशीं वाट वळते व उतरणीस लागते. ह्यापुढें अलकापुरीची पवित्र तपोभूमि आणि त्यावरील भगवंताच्या देवळाचें पुण्यपावन शिखरदर्शन दृष्टी आड होऊन जाणार म्हणून भावनावशतेनें खालींच बसण्याची पाळी आली लवकरच उठून त्रिवार साष्टांग दंडवत घातले. आणि अधोमार्गास लागलों.

## हिमालयाचे रुक्षस्वरुप

बदरीनारायणापासून हरद्वारपर्यंत १८३ मैलांची सरळ पायदळ वाट आहे. ही सर्व देवप्रयागपर्यंत अलकनंदेच्या व पुढें हरद्वारपर्यंत भागीरथी गंगेच्या कांठाकांठानें आहे. बदरी नारायणापासून चमोलीपर्यंतच्या ४८ मैल वाटेचें वर्णन मागें येऊन गेलेलेंच आहे. राहिलेली १३५ मैलांची वाट ही सर्व हिमालयाच्या पायथ्यापायथ्यानेंच गेलेली आहे असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं. डोंगरांची उंची कमी कमी होत जाऊन त्यांचें रूपांतर टेकड्यांत झालेलें दृष्टीस पडतें. वनश्रीचीहि संगति सुटून गेल्याकारणानें त्यांचा भव्यपणा आणि ऐश्वर्य मावळून जाऊन ते रुक्ष आणि भकास दिसतात. ही सर्व वाट कोणत्या ना कोणत्या गंगेच्या कांठानें गेलेली असली तरी वस्तीच्या ठिकाणीं

पाण्याचें दुर्भिक्षच आहे. शेंकडोशें फूट अंतरावरून नळाचें पाणी आणून चट्टयांवर सोडलेलें आहे. पण एकच नळ आणि यात्रींची पाण्याकरितां एकाच वेळीं दाटी. बारींत पाळी येईपर्यंत माशा मारीत उन्हांत तळपत उभें राहावें लागतें. हवेंत उकाडा आणि पाणी येतें तेंहि कोंबट. तें बेचव लागून तहानमोड होते. अशा या नीरस भागांतील प्रवासास प्रखर उन्हाची सांथ मिळून अगोदरच थकून भागून गेलेल्या शरीरास हा परत मार्ग म्हणजे एक कडक शिक्षाच वाटते. तापसी भूमिकेवरून संसारी भूमिकेवर उतरतांना हा देहदंड मुकाटयानें सहन करणें भागच आहे. उन्मार्गी असतांना यात्रेच्या औत्सुक्यानें हीच कडक शिक्षा प्रायश्चित्तार्थ म्हणून कीं काय सुसह्य होत असते.

हरिद्वारपासून चमोलीपर्यंत १३५ मैलांची बदरीनारायणाची वाट मोटारीनें जाण्यायेण्यासारखी नुकतीच झाली आहे. त्यामुळें वर म्हटलेली शिक्षा चुकते, पण वाटेंत लागणाऱ्या ३ – ४ पवित्र तीर्थक्षेत्रीं देव देवतांचें दर्शन, स्नान, दान वगैरे आंचवतें. पायीं यात्रा करणारास तो लाभ सहज व अनायासें घडत असतो. इकडील यात्रा करण्यांत प्रवासाच्या सोयी गैरसोयींचा प्रश्न महत्त्वाचा नसून तीर्थक्षेत्रीं जाण्याचा प्रश्न मुख्य असतो. शिवाय 'त्या जाण्यांत,' पावला गणिक शरीराची कणीक चांगली तिंबून जाऊन ते शरीर मनानुकूल व्हाव-याचें असतें. असें झाल्यानंतरच मनाचा रेडिओ दर्शन – संस्कारक्षम होण्याचा संभव. नाहींतर नित्य देवदर्शनें काय थोडी घेत असतो! ह्या तपाचरणांतच खरें देवदर्शन आहे. आणि म्हणूनच तर हिमाल-यांतील तीर्थक्षेत्रांची एवढी महती. तें एक तपाचरण आहे. मोटा-रच्या सोयीमुळें तपाचरण तर अंतरणारच; पण दर तीर्थक्षेत्रीं उतरून तेथील स्थान महात्म्याचा तरी लाभ घेतां येईल किंवा नाहीं ह्याची शंका वाटते.

## पंचबदरी

बदरीकेदारचे जसे पंचकेदार आहेत त्याचप्रमाणें बदरी नारा-यणाच्या पंचबदरी आहेत. (१) बदरीविशाल—प्रत्यक्ष बदरी नारा-यण येथें. (२) योगबदरी—पांडुकेश्वर येथें. (३) भविष्य बदरी—जोशी मठाहून सात मैलावर. (४) ध्यान बदरी—जोशी मठाहून

मैल दोन मैलावर. (५) आदि बदरी——कर्णप्रयागहून अकरा मैलावर.

ह्या पंचबदरीपैकीं बदरीविशाल म्हणजेच बदरी नारायण. ह्याचीच यात्रा मुख्य असून तिच्या करितांच तर एवढी मोठी यात्रा प्रतिवर्षीं तेथें लोटत असते. दुसरी योगबदरी. ती पांडुकेश्वर येथें आहे. ती नारायण पर्वताच्या पायथ्याशीं असून अगदीं वाटेवरच आहे. तें दर्शन अनायासें, न सांगताहि होत असतें. राहिलेल्या तीन आडवाटेवर आहेत. पण त्यांची आगाऊ माहिती असून तेथें जाण्याचा आपला विचार असेल तरच त्यांचें दर्शन घेतां येईल. पंच केदार, पंच बदरी करावयाच्या असतील तर बोजेवाल्यांशीं करार करतांना त्याचा उल्लेख झालेला पाहिजे. नाहींतर आयत्यावेळीं अडवाअडवी होऊन अधिक पैसे द्यावयाची पाळी यावयाची.

तिसरी भविष्यबदरी ही जोशी मठाजवळ आहे. जोशी मठाच्या ईशान्येस सात मैलावर तपोवन आहे. ह्या वाटेंत जागजागी उष्णोदक कुंडें आहेत. तपोवनाच्यापुढें मैल दीड मैलावर भविष्यबदरी मंदिर आहे. जोशी मठाचे खालीं विष्णु प्रयाग आहे तेथून बदरी नारायणाची वाट जाते. विष्णु प्रयाग म्हणजे एक अरुंद लहान खिंडच आहे. ती का बंद झाली कीं बदरी विशालाचें दर्शन घेण्याचें नांवच नको. अशा वेळीं भविष्यबदरी येथेंच बदरी नारायणाचे दर्शन पूजन विहीत आहे. कुमार संहितेंत सांगितलें आहे कीं जोपर्यंत भगवान महाविष्णूचे वास्तव्य ज्योतिर्मठ—जोशीमठ येथें आहे तोपर्यंत विष्णु प्रयाग येथून जाणारा मार्ग बंद होणार नाहीं. परंतु जोशी मठाहून भगवंताचे अधिष्ठान हालले कीं, मग मात्र बदरीनाथाची वाट अगम्य झाली म्हणूनच समजावे.

चौथी ध्यान बदरी ही जोशी मठाच्या अलिकडे पांच मैलावर हनोल्टी चट्टी लागते तेथें जवळच आहे. पांचवी आदि बदरी कर्णप्रयाग पासून अकरा मैल पूर्वेस आहे. ह्या पांचहि ठिकाणीं जाण्यास वाटा चांगल्या आहेत. आम्हांस पंचबदरी व पंचकेदारची माहिती त्यावेळी नव्हती म्हणून तीं ठिकाणें राहून गेलीं.

चमोलीपासून हरद्वारपर्यंतच्या मार्गांत लक्ष वेधून घेऊन रमणीय वाटेल असें हिमालयाचें वैभव जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. पण चार प्रयाग—नंद, कर्ण, रुद्र व देव आणि दोन क्षेत्रें—

बिल्व केदार व कमळेश्वर आणि हिमालयीन वस्तीच्या गांवांतील मोठें म्हणतां येईल असें 'श्रीनगर' गांव, एवढीं ठिकाणें महत्त्वाचीं आहेत.

### वाटेंतील कांहीं अनुभव

चमोली येथें अलकनंदेच्या डाव्या कांठची वाट हरद्वारास जाते व उजव्या कांठची केदारनाथाकडे जाते. उजव्या कांठच्या वाटेनें आम्ही केदारकडून आलों होतों व आतां परत मार्गी डाव्या कांठानें निघालों. तेथून सहा मैलांवर नंदप्रयाग गांव येतें. वाटेंत कुहेड व मैठाणा चट्ट्या लागतात. मैठाणा येथें चट्टीचे अंगणांत एक पेरूसारखें पण जरा उंच झाड होतें. त्याला अगदीं पेरूसारखीं फळें लागलीं होतीं. तीं बाहेरून हिरवीं दिसत असली तरी गाभूळलेलीं होतीं. एका पैशास तीन प्रमाणें मिळालीं. त्यांची चव पेरूसारखीच होती. चावण्यास चुरचुरीत पण आंत पेरूप्रमाणें बियांची अडगळ नाही. फळाच्या गाभ्यांत एकच बीं व तेंहि जर्दाळूंतील बीं प्रमाणें व तेवढेंच होतें. त्याचें टरफल फोडलें कीं आंत साधारण वाटोळीच बदाम बी निघे. त्याची चवहि जर्दाळूंतील बदामासारखीच होती.

### आदरातिथ्य

चमोलीपासूनचा प्रवास म्हणजे सोलापूर जिल्ह्यांतील प्रवास समजावा. उन्हाचा मारा सकाळपासून जाणवूं लागतो. पाण्याचा दुष्काळ, झाडाझुडांची सावली शपथेस सुद्धां नाहीं आणि माशांचा अतिशय मोठा उपद्रव. तेथपर्यंत ह्या प्रांतीं मार्गांत भाजीपाला दिसला सुद्धां नव्हता. मग मिळतो कोठून ? एक ठिकाणीं भातखाचरांत पांढरें अळू दिसलें. तेथेंच एक पांढऱ्या केसाची बुढ्ढी होती. तीच शेताची मालकीण समजून त्यांतील थोडें आळू मिळेल का म्हणून तिला विचारलें. तिनें तोंडावर शहारे आणून सांगितलें कीं, त्याची तरकारी ( भाजी ) खाल्ली तर हिंव लागते. आम्हीं हट्टच धरला तेव्हां ती म्हातारी त्या खाचरांतून झपाझप चढून गेली आणि अळू घेऊन मुलांप्रमाणें त्या पायऱ्या पायऱ्यांच्या खाचरांतून उड्या घेत घेत धांवत आल्यासारखी आली. तिच्या पाठीशीं एक कमरेइतक्या उंचीचें उभट टोपलें बांधलेलें होतें. रानांतून पानपाचोळा गोळा करून आणण्यासाठीं किंवा सामान वाहून नेण्यासाठीं तें अक्षयींचेंच शेत-

कन्यांच्या पाठीशीं असतें. त्यांत तिचें कांहीं तरी सामान होतें. त्यासह ती पन्नासाच्या पुढच्या वयाची बाई त्या चढउतारावरून धावत पळतच नव्हे तर उड्या मारीत आली गेलेली पाहून मी थक्कच झालों. शहरापेक्षां ग्रामीण राहणीमुळें अंगांत कसा चिवटपणा आणि चुटचुटीतपणा आलेला असतो हें लक्षांत आलें. त्या अळूचे मी तिला दोन आणे देऊं लागलों. ते घेण्याचें नाकारून ती म्हणाली, 'माझा थोरला मुलगा नारायणास पंड्या आहे. एवढ्याशा पाल्याचे पैसे कसले घ्यावयाचे ! तुम्ही माईजीसह आज माझे घरींच चला.' मीं म्हटलें, 'आज एकादशीचा उपास आहे. हा रुपया बदरी विशालाचा प्रसाद म्हणून तुमच्या नातवंडास मीं खाऊ म्हणून देतों. तो घ्यावयास अडचण नाहीं.' तिनें मानेनेंच नकार दर्शवून आमच्यापासून पळ काढिला. न जाणों आम्ही देण्याकरितां पुढें केलेल्या रुपायाचा तिला विटाळ होईल !

हिमालयांतील ग्रामीण लोकांच्या आदरातिथ्याच्या कल्पना सुधारलेल्या म्हणविणाऱ्या शहरवासीयांस मान खालींच घालावयास लावतील. हा आमचा पहिलाच अनुभव. पण 'कैलास-मानस' व 'मुक्तिनारायण' यात्रेंत कितीतरी अनुभव त्याहिपेक्षां वरचढ आले. ह्यावरून चांगलें पटतें कीं मनुष्यपण हें आधुनिक सुधारणेंत नसून तें आचारधर्मानें हाडींमांसीं खिळून बसलेल्या संस्कृतींतच आहे.

तेथेंच आम्हांस कैऱ्या मिळाल्या. आम्हीं पन्हें करून जणूं वसंतपूजाच केली. आमचे पुणेंकर सहयात्री तेथें थांबलेले होते. आम्ही पन्हें पीत आहोंत हें पाहून बोजेवाले व चट्टीवाले विस्मयचकित होऊन गेले. प्रथम त्यास देऊं लागलों तेव्हां त्यांनीं एकविचारें घेण्याचें नाकारलें. पण आम्हीं घेतल्यानंतर मग त्यांनीं अर्ध अर्ध भांडेंच घेतलें. त्यांची समज कीं, ह्या आंबट पेयानें ते हिंव लागून पछाडतील.

### नंदप्रयाग

नंदप्रयाग गांव पूर्वी गोहना महापुरांत वाहून गेला होता. तो आतां गंगेपासून दूर व उंचावर वसला आहे. पूर्वेकडील शेजारच्या कुमाऊ-कूर्माचल ( आजचा अल्मोड जिल्हा ) ह्या प्रांतांतील पर्वतापासून (उंची २२,३६० फूट) निघालेली नंदाकिनी तेथें अलकनंदेस डावीकडून येऊन मिळते. तेथील उंची २८८० फूट आहे. नंदप्रयाग—संगम-

स्नानाचें मोठेंच माहात्म्य आहे. तेथें एक दिवस तरी वास करावा असें आहे. पण पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळें राहणें परवडत नाहीं.

कण्व मुनींचा आश्रम तेथेंच होता. त्या गांवाला पूर्वीं कण्वाश्रम नांव होतें. त्याचा अपभ्रंश होऊन तें कनासू झालें. सरकारी कागदपत्रांत तशी नोंद आहे. कालांतरांत नंदराजानें तेथें यज्ञ केल्यावरून नंदप्रयाग नांव चालू झालें. तो गांव वाटेच्या दोन्ही अंगांस वसला असून तेथें शें–पन्नास उंबरठा आहे. तेथें चण्डिका, वसिष्ठेश्वर महादेव आणि नंदगोपाळ ह्यांचीं देवालयें आहेत. नंदप्रयागचे पूर्वेस ६–७ मैलांवर पहाडांत, एक शंकराचें स्थान आहे. तेथें जाण्यास वाट कठीणच आहे. त्या स्थानाची अशी पुराणोक्त कथा सांगतात कीं, तेथें रावणानें शंकराची आराधना केली होती; म्हणून त्या टापूस दशमौली नांव पडलें. त्याचेंच अपभ्रष्ट रूप 'दसौली' होऊन तें आजहि प्रचारांत आहे.

नंदप्रयागहून एक वाट गरुड मोटार स्टेशनकडे जाते. तें स्थानक ४७ मैलांवर आहे. तेथून राणीखेत व पुढें हलद्वानी वा काठगोदाम हें आगगाडीचें स्थानक आहे. हा मार्ग यात्रींच्या सोयीचा नाहीं.

### कर्णप्रयाग

नंदप्रयागहून कर्णप्रयाग तेरा मैल आहे. वाटेंत ३–४ मैलावर सोनला, लंगासू, उमट्टा, ह्या चट्टया आहेत. कर्णप्रयाग गांव लहानसाच आहे, पण बाजारपेठ बरी आहे. कर्णप्रयाग येथें कर्णगंगा–पिंडरगंगा अलकनंदेस येऊन मिळते. त्या स्थानाची उंची २३०० फूट आहे. नंदाकोट शिखर (उंची २२,५३० फूट) अल्मोडा जिल्ह्यांत आहे. त्याच्या पायथ्याशीं पिंडरी ग्लेशिअर (हिमप्रवाह) १३–१४ हजार फूट उंचीला आहे. ह्या ठिकाणीं जाण्यास अल्मोड्याहून चांगली सोय आहे. तेथून ते ६६ मैल अंतरावर आहे. जवळ जाण्याच्या सोयीचें, एवढें मोठें व प्रेक्षणीय ग्लेशिअर असें दुसरें नाहीं. म्हणून पुष्कळ लोक नेहमीं तेथें फेरफटका करून येतात. या पिंडर हिमप्रवाहापासून पिंडर म्हणजेच कर्णगंगेचा उगम झालेला आहे. कर्णप्रयागचें माहात्म्यहि इतर प्रयागप्रमाणेंच मोठें आहे. पंचप्रयागपैकींच तो एक आहे. संगमावर उमादेवीचें देऊळ आहे. द्वापारयुगांत महारथी व दानशूर असा प्रसिद्ध असलेला राजा कर्ण

ह्यानें तेथें उमादेवीच्या सान्निध्यांत मोठा यज्ञ केला होता. त्यावरून त्या स्थानास कर्णप्रयाग नांव पडलें. तेथेंच त्यानें भगवान सूर्यनारायणाची आराधना करून अजिंक्यपद प्राप्त करून देणारीं कवचकुंडलें मिळविलीं होती, अशीहि कथा ऐकू येते. तेथून अकरा मैलावर पंच बदरीपैकी पांचवी ' आदिबदरी ' आहे.

संगमावर वाळवंटांतच स्नानसंध्यादि उरकलें. तेथें घाट नाहीं, व तिकडील नद्यांवर तो होण्यासारखी पात्रांची स्थिति नसते. पात्र अति विस्तीर्ण. यंदां प्रवाह ह्या कांठाशीं तर पुढल्या वर्षी दुसरीकडेच. पुरांत वाळूचे ढिगारे एवढाले होऊन बसतात कीं, पूर ओसरून गेल्यावर प्रवाह त्या ढिगाऱ्यावरून होता म्हणून सांगितलें तर खरें सुध्दां वाटणार नाहीं. त्याचप्रमाणें पात्रांत कित्येक ओहोळहि पडलेले असतात.

कर्णगंगेच्या पाण्यांत बारीक रेती ओतप्रोत भरून तें इतकी रेताड झालें होतें, कीं त्यांत स्नान केल्यामुळें अंगास चिकटून राहिलेल्या रज:कणांची जाणीव दुसऱ्या दिवशीच्या स्नानापर्यंत होत होती.

कर्णगंगेवरील झूला दोनशें फुटांपेक्षां अधिक लांबीचा आहे. साखळदंडी तारांच्या दोरखंडांचे किंवा सुंभांच्याहि दोरखंडांचे झूले त्या वेळपर्यंत बरेच दिसले. तेथील झूला दोरखंडाऐवजीं लोखंडी पाटे दहाबारा फूट लांब, वीतभर रुंद व बोटभर जाड असे एकमेकास मळसूत्रानें जोडून त्यांचा केलेला आहे.

कर्णप्रयागहून चार निरनिराळ्या मार्गांनीं आगगाडीचीं चार निरनिराळीं स्थानकें गांठतां येतात.

( १ ) कर्णप्रयागपासून रुद्रप्रयाग–श्रीनगर देवप्रयाग–हरद्वार १२४ मैल.

( २ ) कर्णप्रयागपासून श्रीनगर–पौडी–कोटद्वार १२८ मैल.

( ३ ) कर्णप्रयागपासून राणीखेत–काठगोदाम–हरद्वार ११० मैल.

( ४ ) कर्णप्रयागपासून भिकियासैण–रामनगर ११० मैल.

ह्या चार मार्गांपैकीं आम्ही पहिल्या मार्गानें गेलेलों असल्यामुळें त्याची प्रत्यक्ष अनुभवलेली सर्व माहिती, वर्णनांत आलेली आहे.

### महाराष्ट्रियांच्या आचाराचा प्रभाव

कर्णप्रयागपासून चार मैलांवर चटुवापीपल चट्टी लागली. तेथें

पोहोंचण्यास बारा वाजून गेलेले, कडक उन्हाचा मारा बसून जीव कासावीस झालेला, पाण्याकरितां तोंड कोरडें पडलेलें, अशा स्थितींत अगदीं दमूनभागून गेलों असतां चट्टीवर पोहोंचलों. आमच्या सावकाश चालीमुळें वस्तीच्या ठिकाणीं पोहोंचण्यास आम्हांस नेहमींच उशीर होई. पण चट्टीवर जागा मिळाली नाहीं असें कधीं झालें नव्हतें. तो अनुभव मिळण्याचें राहून जाऊन एक वैगुण्य राहीलें असतें म्हणूनच कीं काय त्या दिवशीं तेथील सर्व चट्ट्या ठेचून भरल्या जाऊन बसण्यापुरतीहि जागा आढळेना. एका चट्टीच्याबाहेर तिच्या सावलींत बोजेवाल्यांची वाट पाहण्यासाठीं वाटेवरच बसून राहिलों.

चट्टीवाल्यास काय वाटलें असेल, कोण जाणें ! तो बुढ्ढा होता. त्यानें जवळ येऊन नमस्कार केला आणि आम्ही कोठले, काय चवकशी केली. पुण्याच्या नांवाची ओळख त्यास पटेना. पण दक्षिणेंतील मुंबई, सातारा ही ओळख त्यास लगेंच पटली.

त्यानें एकदम ओळखून म्हटलें कीं,तुम्ही ब्राह्मण आहांत. मी हो म्हणतांच तो चट्टींत गेला आणि जेवणखाण आटपून विश्रांतीसाठीं अडवारलेल्या यात्रींस थोडी जागा मोकळी करून देण्यास सांगूं लागला. लोकांनीं कानाडोळाच चालविला. तेव्हां त्यानें त्यांचे बोजे उचलून चट्टीचे बाहेर ठेवण्यास प्रारंभ केला. लोकांनीं तो रुद्रावतार पाहून थोडी जागा मोकळी करून दिली. त्यानें पोलिशी थाटानें लोकांना हटवून जवळ जवळ एक खण मोकळा करून घेतला.

मला तो म्हणाला, " पंडितजी तुमच्याकरितां जागा मोकळी केली आहे. तुम्ही आंत बसा. " मी म्हटलें, " लोकांची गैरसोय करून आम्हाला एवढी जागा कशाला ? " तो म्हणाला, " तुमच्या दक्षिणी बायकांचा आचार अतिशय कडक व शुद्ध असतो." तो कसा काय म्हणून विचारतां त्यानें सांगितले कीं, " माईजी येथें येऊन उतरल्या म्हणजे प्रथम जमेल त्या साधनांनीं जागा झाडून सडा टाकून तीं शुध्द करून घेतील. तसेंच दगड धुऊन घेऊन मगच चूल पेटवतील. स्नान करून वाळलेल्या कपड्यांनीं किंवा ओलेत्यानेंच रसोयी करून जेवतील. इतका पवित्र आचार तुमचेच तेवढे लोक पाळतात. हा आमचा कित्येक वर्षांचा अनुभव आहे. तुम्ही लोक आम्हांस वंद्य व

आदरणीय वाटतां. तुमची सोय प्रथम करून देणें हें आमचें कर्तव्यच आहे. शिवाय तुमच्याकडून आम्हांस प्राप्ति होत नाहीं असें थोडेंच आहे ? ती होऊन शिवाय तुमची अल्प–स्वल्प सेवा घडल्याचें समाधान आम्हास अनायासें लाभतें. इतर लोक गैदी असतात. तें पाहा, पलीकडे, आतांच आलेले लोक खरकटचा चुलीवर रोटचा भाजून पहिलीं खरकटीं न झाडतांच त्यावर बसून जेवण करीत आहेत. आपण दख्खनचे लोक मोठे पंडित असून कडक आचार पाळतां."

हें त्याचें बोलणें आणि त्यानुसार आमच्या पूर्वी ह्या यात्रेस येऊन गेलेल्या महाराष्ट्रीय ब्राह्मणांची कृति पाहून–त्यांत माझ्या समजुतीप्रमाणें शेंकडा ९५ च्या वर स्त्रियाच होत्या–त्याविषयीं कौतुक व आदर वाटून अभिमानहि उत्पन्न झाला. शुद्धाचरणाचा चिरस्थायी पगडा ह्या दूरस्थ लोकांवरहि कसा राहिला आहे आणि अजूनहि ते आम्हांकडे त्याच भावनेनें कसें पाहतात ह्या गोष्टी कळून समाजांत ब्राह्मणाची किंमत कां व किती होती हें दिसून आलें. आपल्यावर परंपरागत असलेल्या उत्तरदायित्वाची जाणीव पटली. कैलास यात्राप्रसंगीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या एका सभासदाबरोबर झालेल्या सहवासांत असाच अनुभव आलेला आहे.

सोवळचा-ओवळचाच्या कल्पनेमागें शुध्दाचाराचें किती महत्त्व आहे व तें किती अनुकरणीय आहे ह्याकडे दुर्लक्ष होतां उपयोगी नाहीं. त्यांतील मिथ्याचाराकडे बोट दाखवून अशुध्दाचार योग्य ठरतो असें नाहीं. ब्राह्मणांनीं शुध्दाचार पाळून इतरांस मार्गदर्शक होण्याचें त्याजकडे आलेलें उत्तरदायित्व राखलें पाहिजे.

## गोचर

कर्णप्रयागपासून रुद्रप्रयागचे मार्गांत सहा मैलांवर 'गोचर' म्हणून एक भलें मोठें विस्तीर्ण व सपाट असें पठार आहे. एवढें मोठें दुसरें एखादें सपाट पठार ह्या किंवा कैलास यात्रेच्या प्रसंगीं हिंदुस्थानच्या सीमेंतील हिमालयांतील वाटेंत कोठेंहि आढळलें नाहीं. अशीं पठारें नेपाळांत आहेत. गोचर येथें विमानतळ होऊन विमानाची वाहतूक चालू झाली होती. तेव्हां हरद्वारपासून तेथपर्यंत ११८ मैल अंतराचा प्रवास विमानानें अवघ्या ४५ मिनिटांत होई. त्या विमान–कंपनीनें

मागेंच गाशा गुंडाळला तेव्हांपासून ती सोय संपुष्टांत आली.

त्या क्षेत्रास 'गोचर' असें नांव पडण्याचें कारण आमच्या बोजेवाल्यानें सांगितलें कीं, तेथील शेताचा धनी आपल्या शेतांतील पीक एक गाय खात होती म्हणून तिला जोरजोरानें मारीत होता. हें त्याचें निर्दय कृत्य पाहून एका दयाळू व धनसंपन्न यात्रीस कळवळा येऊन त्यानें त्या शेतकऱ्याच्या पिकाची भरपाई करून गाईस तर सोडविलेंच, पण तें सर्व पठार ज्यास गोचर म्हणतात तें विकत घेतलें आणि गाईंना चारण्यासाठीं गायरान म्हणून मोकळें टाकलें.

तेथें चट्टी आहे पण पाणी मात्र नाहीं. वस्तीहि आहे. तेथें कार्तिक महिन्याच्या अखेरीस भोटिया लोकांची एक आठवडा जत्रा भरते. त्यावेळीं तिबेटशीं व्यापार करणारे लोक लोंकर, लोंकरी कापड, कांबळीं, गालिचे, शाली वगैरे विकण्यासाठीं मंडी–बाजार–भरवितात.


## रुद्रप्रयाग

गोचरपासून १५ मैलांवर रुद्रप्रयाग आहे. वाटेंत ३।४ चट्टया आहेत. तेथेंच केदारनाथाहून आलेली मंदाकिनी आणि बदरीनारायणाहून आलेली अलकनंदा ह्यांचा संगम आहे. त्यासच रुद्रप्रयाग असें म्हणतात. तो प्रयाग नांवाप्रमाणेंच मोठा व रौद्रस्वरूपाचा आहे. मंदाकिनी नांवाप्रमाणें संथ तर अलकनंदा उफाळयांनीं वाहणारी आहे. संगम झाला तरी दोघींचें पाणी लांबवर निरनिराळें दिसतें. संगमाच्या दुबेळक्यांत घाट बांधला आहे. अलकनंदेचा प्रवाह इतका जोराचा आहे कीं, त्यांत समुद्रासारख्या लाटा उसळत असतात. गुडघाभर पाण्यांत सुद्धां हातांत साखळी धरल्याशिवाय उतरण्याची छाती होत नाहीं. साखळी धरून उतरले तरी धडकी भरलेलीं असते.

रुद्रप्रयाग गांव अलकनंदेच्या दोन्ही कांठीं आहे. वस्ती बेताचीच आहे. धर्मशाळा व चट्टया आहेत; पण पाणी लांब आहे. अलकनंदेवर पक्का झूला २४० फूट लांबीचा आहे, पण मंदाकिनीवर इंग्रजी V अक्षराच्या आकाराचा सुंभाच्या दोरखंडाचा झूला आहे. याची छायाचित्रावरून चांगली कल्पना येईल. घाटाच्या वरच्या अंगास रुद्रनाथ म्हणजेच रुद्रेश्वर महादेवाचें एक चिरेबंदी चांगलें देऊळ आहे. देवळाभोंवतीं बाग असून त्यांत रुद्राक्षाचीं २–३ झाडें आहेत. रुद्रप्रयागाची



देवप्रयाग – भागीरथी – अलकनंदा संगम पान ३३३



हरीची पायरी हरद्वार पान १२

उंची अवघी २००० फूट म्हणजे पुण्याइतकीच आहे. तेथें उकाडा मनस्वी होतो. भोंवतीं डोंगर लागून आहेत, त्यामुळें हवा खेळती नसते. शिवाय डोंगर तापले म्हणजे उष्मा अतोनात वाढून जीव गुदमरून जातो. त्यांतच माशांच्या त्रासानें माणूस काहून जातो. हें गांव तिकांड्यावर आहे. म्हणजे येथें तीन रस्ते येऊन मिळतात. येथून हरद्वार ९६ मैल, बदरीनारायण ८७ मैल आणि बदरीकेदार ५४ मैल आहे. बदरीकेदार व बदरीनारायण किंवा नुसतें बदरी-नारायण ह्यांची यात्रा ज्यांना करावयाची असते ते हरद्वार – देवप्रयाग रुद्रप्रयाग मार्गानें येतात. बदरीकेदारकडे जाणारी वाट येथें फुटून ती मंदाकिनीच्या कांठानें जाते व बदरीनारायणास जाणारी वाट अलक-नंदेच्या कांठानें जाते.

### सच्चिदानंद स्वामी

संगमावर स्नान करून संध्यादि कर्म आटोपून रुद्रनाथास अभिषेक केला. तेथें देवळांत एक जन्मांध शास्त्री भेटले. ते विद्वान् असून सहज समजेल अशा सोप्या संस्कृत भाषेंत बोलत होते. त्यांचें नांव सच्चिदा-नंद स्वामी. त्यांच्या खटपटीनेंच धर्मशाळा, घाट व गंगेचें देऊळ बांधलें गेलें आहे असें ऐकलें. त्याचप्रमाणें तेथें संस्कृत पाठशाळा, महाविद्यालय व रुग्णालयहि स्थापन केलें गेलें आहे. अंध असूनहि चारहि धामांची माहिती त्यांस प्रत्यक्ष पाहिल्यासारखी आहे.

### रुद्रप्रयागचें विहंगम दृश्य

रुद्रप्रयागपासून श्रीनगर १९ मैल आहे. वाटेंत ५।७ चट्ट्या आहेत. पहिल्या ५।६ मैलांत जाणवण्यासारखे तीन चढ आहेत. पहिला दीड मैलाचा चढ व त्याचें पठार. त्यावरून रुद्रप्रयागचें विहंगम दृश्य नैसर्गिक घटनेचें चमत्कृतिपूर्ण दिसतें. पुरोभागीं अफाट संगमपात्र, त्याच्या मागें मध्यावर दोन गंगांच्या विळख्यांत सांपडलेल्या थडीवर गांव व उंचावलेलें रुद्रेश्वराचें शिखर, बाजूस हिरवेगार वृक्ष, पायथ्यास उजव्या अंगानें संथ वहाळीची मंदाकिनी व डाव्या अंगें चवताळून धिंगाणा घालणारी अलकनंदा, पार्श्वभागीं अस्पष्ट होत गेलेले डोंगर व नील आकाश, हें दृश्य मोठें आकर्षक व रमणीय आहे. घटकाभर स्वस्थ बसून त्याकडे पाहात राहिलें तरी तृप्ति होत नाहीं.

तेथून हलूं नये असें होऊन जातें. एकाग्रता साधण्यास असलीं दृश्यें फारच उत्तम. हिमालय तर असल्या दृश्यांचें कोठारच आहे म्हणूनच तर निसर्गप्रेमी ऋषिमुनींनीं इकडे येऊन निवास केला. त्याचेंच फळ म्हणजे ही तपोभूमि होऊन राहिली आहे.

### श्रीनगर

हें श्रीनगर म्हणजे काश्मीरांतील नव्हे. तें ब्रिटिश गढवालांत जीं दोन शहरवजा मोठीं गांवें ह्या यात्रामार्गांत आहेत त्यांपैकीं एक आहे. हरद्वार सोडल्यानंतर एवढें मोठें दुसरें गांव एकहि लागत नाहीं. पंचावन्न वर्षांपूर्वी प्रसिद्ध गोहना महापुरानें तें वाहून गेलें होतें. त्या ठिकाणापासून सुमारें एक मैलाच्या आंत हें नवीन श्रीनगर वसलेलें आहे. पहिल्या जागीं पडक्या घरांचे कांहीं ठाव तेथें एके काळीं वस्ती असल्याची साक्ष देतात. त्या पुरांतून दोन तीन देवळें मात्र वांचलीं. बाकीच्यांचा मागमूसहि राहिलेला नाहीं. सर्वत्र शेतें झालीं आहेत.

श्रीनगर गांव शहराएवढें नसलें तरी परिपूर्ण शहरी थाटाचें आहे. वस्ती दोन अडीच हजारच पण रस्ते मोठे, त्याच्या बाजूनें बांधीव पायवाटा, चौकांत कारंजाभोंवतीं शोभिवंत फुलझाडें, विजेचे दिवे, मोठी बाजार पेठ, गांवाबाहेर बंगले, आंबराया अशा धाटणीचें तें आहे. आंबे पिकलेले दिसले नाहींत, बाठा धरलेल्या कैऱ्या होत्या पण त्या पोफळापेक्षां मोठ्या नव्हत्या. एकंदरींत आंब्यांचीं झाडें मोठीं असलीं तरी आंब्याची जात लहानच होती. जिल्ह्याच्या गांवाप्रमाणें सरकारी अठरा खातीं येथें आहेत. हायस्कूल, संस्कृत पाठशाळा, वसतिगृहें ह्या सोयीहि आहेत.

शहरांतून मिळणाऱ्या सर्व वस्तु तेथें मिळतात. भाजीपालाहि तेथें मिळतो. गंगेकांठीं काळी कमळीवाल्यांची मोठी थोरली धर्मशाळा आहे, मधोमध मोठा चौक असून चौफेर खालीं व माडीवर प्रशस्त खोल्या आहेत, तींत नळाच्या पाण्याची सोय चांगली आहे.

### कमलेश्वर महादेव

श्रीनगर येथें पाहण्यासारख्या गोष्टी दोन. एक कमलेश्वर महादेवाचें देऊळ व दुसरें श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्यांनीं स्थापन केलेलें 'श्री' यंत्र. कमळेश्वर महादेवाचें देऊळ एक मैलावर पूर्वीं वाहून

गेलेल्या श्रीनगर गांवांत आहे. देवळाचा सभामंडप उंच, चौकोनी असून त्यावर घुमटाकार शिखर आहे. बांधकाम काळ्या दगडाचें असून त्यांत पांढऱ्या दगडाच्या पैलूदार कमानी आहेत. त्याच्या तीन बाजू मोकळ्या असून एक बाजूस देवळाचा गाभारा आहे. तो सभामंडपापेक्षां लहान आहे. त्यांत शाळुंका पिंडी आहे. बाहेरच्या अंगास देवळासमोर चौथऱ्यावर नंदी असून त्यावरहि शिखर आहे. रुद्रप्रयागापासून महादेवास बेल वहाण्याची प्रथा दिसून येते. तेथें वैकुंठ चतुर्दशीस मोठी जत्रा भरते. त्या दिवशीं पुत्रार्थी स्त्रिया तुपांत महादेवासमोर वाती लावून रात्रभर जागर करितात. जिची वात सूर्योदयापर्यंत अखंड तेवत राहील तिची कामना–तृप्ती होणार अशी त्या लोकांची परंपरागत चालत आलेली समजूत आहे.


### कमलेश्वर महादेवाचे ठिकाणीं श्रीकृष्णास ‘सुदर्शन चक्राची’ प्राप्ती

श्रीकृष्ण हे महादेवाचे मोठे उपासक होते. हिमालयांत जाऊन त्यानीं शंकराची उत्कटतेनें उपासना चालविली असतांना शंकरास सहस्र कमलें वाहण्याचा त्यानीं संकल्प केला होता. त्याप्रमाणें कमळें जमवून तीं ते वाहूं लागले. तेव्हां त्यांच्या ध्यानीं आले कीं, संकल्पित संख्येंत एक कमल कमी पडत आहे. गोंधळून न जाता किंवा आतां काय करावें, अशा विचारांत न पडतां त्यानीं आपला नेत्र हेंच कमल समजून तो स्वत: काढला आणि शंकरास वाहून संकल्प पुरा केला. श्रीकृष्णाच्या भक्तिची अलौकिक परिसीमा पाहून शंकर त्याजवर प्रसन्न झाले आणि ‘परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्’। एवढ्यासाठींच हा महाविष्णूचा अवतार आहे हें जाणून त्यानीं आपलें ‘सुदर्शन चक्र’ त्यास दिलें. हा कथा भाग तेथें घडला म्हणून तेथील महादेवास कमलेश्वर महादेव हें नांव पडलें आहे.

श्रीकृष्णानीं कमी आलेल्या कमळाचे जागीं आपला डोळाच काढून शंकरास वाहिला व त्या भक्त्युत्कटतेमुळेंच शंकरानीं त्रिभुवनाचें रक्षण करण्याकरितां अवतरलेल्या श्रीकृष्णास आपले ‘सुदर्शन चक्र’ दिलें. ही कथा पुष्पदंतानीं ‘महिम्न स्तोत्रांत’ अतिशय थोडक्यांत आणि रसाळ गायिली आहे.

हरिस्ते साहस्रं कमलबलिमाधाय पदयो-
र्यदेकोने तस्मिन्निजमुदहरन्नेत्रकमलम् ।
गतो भक्त्युद्रेकः परिणतिमसौ चक्रवपुषा
त्रयाणां रक्षायै त्रिपुरहर जागर्ति जगताम् ।

श्री–यंत्र



कमलेश्वर देवळाच्या आवारांत उजवीकडे माडीवर आद्य शंकराचार्यांची गादी आहे. शेजारच्या माडींत वीत लांबी–रुंदीचे दोन ताम्रपट आहेत. त्यांवर 'श्रीयंत्र' कीरलेलें आहे. श्रीयंत्र त्रिकोणांत त्रिकोण उलटेसुलटे मिळून नऊ, असे काढलेले असतात कीं, मोठ्या दोन्ही त्रिकोणाचे सहा कोन भोंवतीं काढलेल्या परिघास चिकटले जावेत. ह्या परिघाबाहेर आणखी दोन वर्तुळें असतात. त्यांत बाहेरच्या वर्तुळांत १६ व आंतल्यांत ८ कमलदलें असतात. तेथेंच तळहाताएवढाल्या स्फटिकाच्या दगडांवर अशींच आणखी दोन 'श्रीयंत्रें' आहेत. हीं तांब्याचीं व स्फटिकाचीं 'श्रीयंत्रें' निरनिराळ्या चौरंगांवर मांडलेलीं आहेत. तीं आद्य शंकराचार्यांच्या वेळचीं असल्याचें समजलें. त्यांची नित्य पूजा–अर्चा पहाडी ब्राह्मणांकडून होत असते.

कमलेश्वर महादेवाच्या आवारांत एक मोठा दगडी ओटा आहे. त्यावर पादुका उमटलेल्या आहेत. कपिल महामुनींनीं तेथें तप केलें. त्यांचा आश्रम येथें असल्याचें सांगतात.

## यंत्र–मंत्र–तंत्रात्मक उपासना

येथें यंत्र म्हणजे एंजिन, मोटार, घड्याळ असलें यंत्र अभिप्रेत नाहीं.

यज्ञसंस्था बंद पडल्यानंतर अग्न्युपासनेची जागा देवता–उपासनेनें घेतली. ती देवतोपासना निर्गुण निराकार करणें बहुजनसमाजास जमण्यासारखी नव्हती. म्हणून त्याठिकाणीं सगुण, साकार आकृति, आल्या. त्या ज्या विशिष्ट आकृति त्यांनाच यंत्र असें म्हणतात. त्या त्रिकोण, चौकोन, वर्तुळात्मक, वा त्यांच्या एकत्रित मांडणींतहि असतात. ह्या आकृतींतील विभागांवर निरनिराळीं अक्षरें काढलेलीं असतात. त्यांस सांकेतिक अर्थ असतो. ते विभाग देवतांचे गुण व स्थानें दर्शक असतात. एक आकृति म्हणजे एक यंत्र ते त्या देवतेचें गुण, रूप व कार्य दर्शक ह्याचें चिन्ह असतें. यंत्राच्या मध्यबिंदूवर मुख्य देवता व भोंवतीं उपदेवतांचीं स्थानें असतात. मुख्य देवतेची प्राप्ति उपदेवतांच्या अनुकूल्याशिवाय होणारी नसते. म्हणजे तो एक पंचायतनपूजनाप्रमाणेंच प्रकार आहे; किंवा रामचंद्राचा हनुमान, विष्णूचा गरुड त्याप्रमाणें आहे.


यंत्रपूजन ही शिव–शक्तीची उपासना आहे. त्याचे मंत्र आहेत. यंत्र म्हणजे नुसती आकृति व मंत्र म्हणजे नुसतीं अक्षरें असें नसून तत्तत्स्थानीं साक्षात् शिवशक्तीचा आविर्भाव झालेला असतो. आणि त्यामुळें तें यंत्र सिद्ध झालेलें असतें. त्याच्या ठिकाणीं कर्तुम्, अकर्तुम्, अन्यथा कर्तुम्, ही शक्ति जागृत असते. यंत्र–सिद्धीचा कांहीं विधि असतो, त्यास तंत्र म्हणतात. वेदानंतर व पुराणांच्या अगोदर ह्या मधल्या काळांत आगम शास्त्र निर्माण झालें. त्यांत ही यंत्र–तंत्र–मंत्र उपासना चालू झाली.

ह्या उपासना–विधि आचारण्यास त्याचीं पथ्यें फार कडक व जिकीरचीं पाळावीं लागतात. म्हणून तो विधिहि बहुजनसमाजास झेपण्यासारखा नव्हता. पुराणकालांत ही उपासना वेद–बाह्य समजली गेली म्हणून असो, नाहीं तर तींत वाम मार्ग ( शाक्त पंथ–ज्यांत मद्य, मांस, स्त्रीविषयक गर्हणीय आचार ) शिरले म्हणून असो, ती उपासना मागें पडून तिचें स्थान भक्तिमार्गातील देव, देवता–मूर्तिपूजनानें घेतली. तंत्रोपासना व्यक्तिगत होती तर भक्तिमार्ग सामुदायिक रीतीनें आचरण्याकरितां मंदिरें झालीं.

श्री–यंत्रांत मध्यबिंदूचे स्थानीं त्रिपुर सुंदरी नांवानें शिवशक्तीचा वास असतो. म्हणजे ही शिवशक्तीची उपासना आहे. आद्य शंकराचार्य

हरिस्ते साहस्रं कमलबलिमाधाय पदयो-
र्यदेकोने तस्मिन्निजमुदहरन्नेत्रकमलम् ।
गतो भक्त्युद्रेकः परिणतिमसौ चक्रवपुषा
त्रयाणां रक्षायै त्रिपुरहर जागर्ति जगताम् ।

श्री-यंत्र



कमलेश्वर देवळाच्या आवारांत उजवीकडे माडीवर आद्य शंकराचार्यांची गादी आहे. शेजारच्या माडींत वीत लांबी-रुंदीचे दोन ताम्रपट आहेत. त्यांवर 'श्रीयंत्र' कीरलेलें आहे. श्रीयंत्र त्रिकोणांत त्रिकोण उलटेसुलटे मिळून नऊ, असे काढलेले असतात कीं, मोठ्या दोन्ही त्रिकोणाचे सहा कोन भोंवतीं काढलेल्या परिघास चिकटले जावेत. ह्या परिघाबाहेर आणखी दोन वर्तुळें असतात. त्यांत बाहेरच्या वर्तुळांत १६ व आंतल्यांत ८ कमलदलें असतात. तेथेंच तळहाताएवढाल्या स्फटिकाच्या दगडांवर अशींच आणखी दोन 'श्रीयंत्रें' आहेत. हीं तांव्याचीं व स्फटिकाचीं 'श्रीयंत्रें' निरनिराळ्या चौरंगांवर मांडलेलीं आहेत. तीं आद्य शंकराचार्यांच्या वेळचीं असल्याचें समजलें. त्यांची नित्य पूजा-अर्चा पहाडी ब्राह्मणांकडून होत असते.

कमलेश्वर महादेवाच्या आवारांत एक मोठा दगडी ओटा आहे. त्यावर पादुका उमटलेल्या आहेत. कपिल महामुनींनीं तेथें तप केलें. त्यांचा आश्रम येथें असल्याचें सांगतात.

## यंत्र-मंत्र-तंत्रात्मक उपासना

येथें यंत्र म्हणजे एंजिन, मोटार, घड्याळ असलें यंत्र अभिप्रेत नाहीं.

यज्ञसंस्था बंद पडल्यानंतर अग्न्युपासनेची जागा देवता–उपासनेनें घेतली. ती देवतोपासना निर्गुण निराकार करणें बहुजनसमाजास जमण्यासारखी नव्हती. म्हणून त्याठिकाणीं सगुण, साकार आकृति, आल्या. त्या ज्या विशिष्ट आकृति त्यांनाच यंत्र असें म्हणतात. त्या त्रिकोण, चौकोन, वर्तुळात्मक, वा त्यांच्या एकत्रित मांडणींतहि असतात. ह्या आकृतींतील विभागांवर निरनिराळीं अक्षरें काढलेलीं असतात. त्यांस सांकेतिक अर्थ असतो. ते विभाग देवतांचे गुण व स्थानें दर्शक असतात. एक आकृति म्हणजे एक यंत्र ते त्या देवतेचें गुण, रूप व कार्य दर्शक ह्याचें चिन्ह असतें. यंत्राच्या मध्यबिंदूवर मुख्य देवता व भोंवतीं उपदेवतांचीं स्थानें असतात. मुख्य देवतेची प्राप्ति उपदेवतांच्या अनुकूल्याशिवाय होणारी नसते. म्हणजे तो एक पंचायतनपूजनाप्रमाणेंच प्रकार आहे; किंवा रामचंद्राचा हनुमान, विष्णूचा गरुड त्याप्रमाणें आहे.

यंत्रपूजन ही शिव–शक्तीची उपासना आहे. त्याचे मंत्र आहेत. यंत्र म्हणजे नुसती आकृति व मंत्र म्हणजे नुसतीं अक्षरें असें नसून तत्तत्स्थानीं साक्षात् शिवशक्तीचा आविर्भाव झालेला असतो. आणि त्यामुळें तें यंत्र सिद्ध झालेलें असतें. त्याच्या ठिकाणीं कर्तुम्, अकर्तुम्, अन्यथा कर्तुम्, ही शक्ति जागृत असते. यंत्र–सिद्धीचा कांहीं विधि असतो, त्यास तंत्र म्हणतात. वेदानंतर व पुराणांच्या अगोदर ह्या मधल्या काळांत आगम शास्त्र निर्माण झालें. त्यांत ही यंत्र–तंत्र–मंत्र उपासना चालू झाली.

हा उपासना–विधि आचारण्यास त्याचीं पथ्यें फार कडक व जिकीरचीं पाळावीं लागतात. म्हणून तो विधिहि बहुजनसमाजास झेपण्यासारखा नव्हता. पुराणकालांत ही उपासना वेद–बाह्य समजली गेली म्हणून असो, नाहीं तर तींत वाम मार्ग ( शाक्त पंथ–ज्यांत मद्य, मांस, स्त्रीविषयक गर्हणीय आचार ) शिरले म्हणून असो, ती उपासना मागें पडून तिचें स्थान भक्तिमार्गातील देव, देवता–मूर्तिपूजनानें घेतली. तंत्रोपासना व्यक्तिगत होती तर भक्तिमार्ग सामुदायिक रीतीनें आचरण्याकरितां मंदिरें झालीं.

श्री–यंत्रांत मध्यबिंदूचे स्थानीं त्रिपुर सुंदरी नांवानें शिवशक्तीचा वास असतो. म्हणजे ही शिवशक्तीची उपासना आहे. आद्य शंकराचार्य

श्री–यंत्राचे उपासक होते; आणि म्हणूनच तर ती यंत्रें श्रीनगर येथें त्यांच्या पीठांत आहेत. श्री–यंत्राप्रमाणेंच गायत्र्यादि यंत्रें आहेत.

### बिल्वकेदार वा भिल्लकेदार

श्रीनगरपासून बिल्वकेदार तीन मैल आहे. दोन तीन चट्टया आहेत. तेथें चट्टीजवळच एका उंचवटयावर महादेवाचें लहानसें देऊळ आहे. त्यासच भिल्लकेदार किंवा बिल्वकेदार म्हणतात. तेथील शिवलिंगास बिल्वपत्र वाहाण्याचें फार मोठें परंपरागत महत्त्व आहे. देवळाच्या डावे अंगास एका दगडावर हात दीड हात लांब व दीड वीत रुंद असें उजवें पाऊल उठलेलें दिसतें. तें अर्जुनाचें असल्याचें सांगतात.

### अर्जुनाची सत्वपरीक्षा व त्यास पाशुपतास्त्र प्राप्ती

शंकराची आराधना करून पाशुपतास्त्राच्या प्राप्तिसाठीं इंद्रकीट पर्वतावर अर्जुन तपश्चर्या करीत होता. तो इंद्रकीट पर्वत बिल्व-केदार जवळ अलकनंदेच्या पलीकडील कांठीं आहे. अर्जुनाच्या तपश्चर्येनें शंकर संतुष्ट होऊन वरप्रदान करण्यास सिद्ध झाले असतां त्यांच्या मनांत अर्जुनाची सत्त्वपरीक्षा पाहण्याचें आलें. म्हणून त्यांनीं वराहरुपी मूक राक्षस त्याजवर सोडला. अर्जुनानें गांडिवाला बाण लावून त्या मत्त वराहाचा वेध केला. इतक्यांत शंकरांनीं किराताच्या वेषांत अर्जुनाला न कळूं देतां बाण मारून वराहास यमसदनास धाडले. अर्जुनास वाटलें कीं, ती शिकार आपल्याच बाणानें झाली. शिकार कोणीं केली ह्यावरून किरात आणि अर्जुन ह्या दोघांत तंटा पडला. दोघेहि बोलाचालीवरून हातघाईवर आले व युद्ध जुंपलें. बराच वेळ झटापटी झाल्या. अर्जुनाचे मुष्टिमार, धडाके व शस्त्राचे तडाखे किरातानें लीलया सोसले. तें पाहून अर्जुन विस्मित झाला. तो किराताच्या रट्टयानें एकदां तर मूर्च्छित होऊन पडला होता. शुद्धींत आल्यावर त्यानें एक शिवलिंग करून त्यास बिल्वपत्र वाहिलें आणि अनन्यभावानें प्रार्थना केली. नंतर पुनरुत्साहित होऊन तो दुप्पट जोमानें युद्धास सिध्द झाला. शिवलिंगास वाहिलेलें बिल्वपत्र किराताच्या माथ्यावर दिसलें, तेव्हां अर्जुनास कळून चुकलें कीं, हा किरात नसून साक्षात् शंकरच आहे. तो शंकरास शरण गेला. अर्जुनाचा पराक्रम, त्याचें युध्दनैपुण्य पाहून शंकर प्रसन्न होऊन प्रगट झाले. अशा रीतीनें

अर्जुनाची सत्त्वपरीक्षा पाहिल्यावर शंकरांनीं त्यास पाशुपतास्त्राचा उपदेश केला. त्याचा विनियोग, त्याचें रहस्य व उपसंहार ही सर्व विद्या त्यास दिली. तेव्हां तें अस्त्र अर्जुनाजवळ येऊन उभें राहिलें.

### एक बिल्वम् शिवार्पणम् चें महात्म्य

हें जें युध्द झालें त्यास किरातार्जुन युध्द असें पुराणान्तरीं नांव आहे. किरात म्हणजे भिल्ल. तो प्रसंग ह्या ठिकाणीं घडला म्हणून त्या स्थानास भिल्ल केदार असें सार्थ नांव प्राप्त झालें आहे. त्याचप्रमाणें अर्जुनानें त्याच ठिकाणीं शिवलिंग करून त्यास अनन्य भक्तिभावानें बिल्वपत्र वाहिलें आणि त्यामुळें त्याला शंकराचें दर्शन झालें म्हणून त्या स्थानाचें बिल्वकेदार हें नांवहि सार्थच आहे. 'एक बिल्वं शिवार्पणम्' चें महत्त्व केवढें आहे हें ह्या कथेवरून चांगलें दिसून यतें. आणि म्हणूनच तेथील शिवलिंगास एक तरी बिल्वपत्र वाहण्याची प्रथा विशेषत्वानें रूढ होऊन बसली आहे.

तेथें जवळपास गांव किंवा वस्ती दिसली नाहीं. तरी एका दुकानांत मुळे, वांगीं वगैरे भाजीपाला विक्रीस होता. गंगेच्या पैलतीरीं कीर्तिशहा महाराजांनीं वसविलेलें कीर्तिनगर आहे. देवळाजवळच खांडव गंगा अलकनंदेस मिळते. त्या संगमास भिलप्रयाग किंवा भिलकेदार म्हणतात. तेथेंच शिवप्रयाग नांवाचें तीर्थ आहे.

अलकनंदेचें जल इतकें गढूळ व रेताड झालेलें होतें कीं, निरुपायच होई म्हणून कसें तरी करून घोट दोन घोट पाणी प्यावें लागे. पण खाण्डवगंगेचें जल इतकें निर्मल होतें कीं पांच सात दिवसांची झालेली तहानमोड खांडवगंगेच्या जलपानानें तृप्त करून घेतां आली.

हिमालयांत निरनिराळ्या गंगेच्या ठिकाणीं कांठचीं कांहीं गांवें पुण्यक्षेत्रें म्हणून समजलीं गेलीं आहेत. अशा ठिकाणच्या गंगाकांठीं दहा दहा मैलांवरून सुद्धां प्रेतें दहनाकरितां वाहून आणतात. प्रेतास अग्निस्पर्श होऊन तें अर्धवट जळले कीं, चितेंतून बाहेर ओढून गंगेंत लोटून देतात. काशींतहि अशीच चाल असल्याचें कानीं आहे. भिलकेदार हें एक अशाचपैकीं पुण्यक्षेत्र मानलें गेलें आहे.


### देवप्रयाग

हरद्वारपासून देवप्रयाग अठ्ठावन मैल आहे. तेथपर्यंत मोटार–

रस्ता वीस वर्षांपूर्वीच झालेला आहे. तो भागीरथीच्या उजव्या कांठानें आहे; आणि जुनी पायदळ वाट आहे ती लक्ष्मण झूला ओलांडून तिच्या डाव्या कांठानें गेलेली आहे. भिल्लकेदार किंवा बिल्वकेदारपासून देवप्रयाग अजमासें पंधरा मैल राहतो.

देवप्रयाग हा गांव भागीरथी व अलकनंदा ह्या नद्यांच्या संगमावर त्यांच्या दुबेळक्यांत, राघव पर्वताच्या उतरणीवर आहे. तो अलकनंदेच्या उजव्या व भागीरथीच्या डाव्या कांठीं वसला आहे. कांहीं भाग अलकनंदेच्या डाव्या कांठींहि आहे. दोन्ही नद्यांवर पोलादी दोरखंडाचे पक्के झूले आहेत. त्यामुळें गांवांत जाण्यायेण्याची सुलभ सोय आहे. हे दोन झूले रोखून धरले कीं गांव कडेकोट झाला. भरतखंड हें त्रिकोणी द्वीप, दोन बाजूंनीं हिंदी महासागराच्या दोन बाहूंनीं— अरबी समुद्र व बंगालचा उपसागर—व तिसऱ्या बाजूनें हिमालय पर्वतानें संरक्षित झालेलें आहे. त्याचप्रमाणें देवप्रयाग दोन बाजूंनीं दुर्लंघ्य अशा महावेगवती भागीरथी व अलकनंदा ह्या नद्या आणि तिसऱ्या बाजूस राघव पर्वत व उत्तरोत्तर उंचावत गेलेल्या पर्वतश्रेणी ह्यामुळें हा तिकोनी गांव सुरक्षित आहे. ह्या गांवांत मुख्यत्वें बदरीनारायणाचे पंड्यांची वस्ती आहे. दोन चारशें उंबरा आहे. घरें माड्यावर माड्यांचीहि आहेत. गांव उतारावरच असल्याकारणानें सांडपाण्यानें होणारी घाण कमी आहे. बाजारहाट हरद्वारच्या खालोखाल आहे. एवढा मोठा बाजारहाट चारहि धामांच्या यात्रा--वाटेंत दुसरा कोठेंहि नाहीं. सर्व प्रकारचे जिन्नस मिळतात. किंमतीहि बेतानेंच असतात. पाण्याची मात्र मोठीच गैरसोय आहे. नदीच्या पात्रापासून शंभर दीडशें फूट उंचीवर गांवची वस्ती आहे व नदीशिवाय पाण्याचें दुसरें साधन नाहीं. एक गोष्ट बरी आहे कीं, पाणी कावडीनें आणून घालणारीं माणसें मिळतात. पोलीस, दवाखाना, तार व टपाल घर वगैरे सरकारी गांवव्यवस्था सर्व प्रकारची आहे. ओझेवाले, दांडी कंडी मिळवून देण्याचा अड्डा ( Agency ) आहे.

तेथें ठराविक दरानें बोजेवाले मिळतात. त्यांची तेथें नोंद झालेली असते. त्यामुळें त्यांच्याकडून कसलीहि आगळीक झाली तर त्याची लागलीच चौकशी होऊन निकाल लागतो. तेथें मोठमोठ्या धर्मशाळा



स्वर्गाश्रम हृषीकेश पान ३८



कमलेश्वर महादेव श्रीनगर पान ३२७

श्रीनगर बाजार पेठ पान २२६





कीर्तिनगर व श्रीनगर ह्यामध्ये गंगा प्रवाह पान २२६

[library stamp]

व सदावर्तेंहि आहेत. संस्कृत व इंग्रजी पाठशाळा आहेत. गांवाभोंवतीं व वर दाट झाडी असली तरी गांवाची उंची पंधराशें फुटाच्या सुमारांत असल्यामूळें तेथें पुण्यापेक्षांहि अधिक असह्य उकाडा वाटतो.

भागिरथी—अलकनंदा संगम म्हणजेच देवप्रयाग

देवप्रयाग येथें भागीरथी दक्षिणवाहिनी व अलकनंदा पश्चिमवाहिनी असून त्यांचा प्रेक्षणीय संगम आहे. उगमापासून दोनहि नद्यांची तेथपर्यंतची लांबी पांच चार मैलांच्या अंतरानें सारखीच म्हणजे १२५ ते १३० मैलांजवळ येईल. अलकनंदेची वहाळ जोराची व गर्जून असली तरी भागीरथीचा प्रचंड ओघ ह्यापुढें ती फिकी पडून संथच भासते. गंगेचा प्रवाह अलकनंदेच्या प्रवाहास थोपवून ठेवून पुढें जात असतो. त्यावेळीं दोन्ही नद्यांस पावसाळी पूर येऊन त्या दुथडी भरून वाहात होत्या, त्यांचें पाणी गढूळ रेंदाड झालेलें होतें.

भागीरथी-अलकनंदा संगम देवप्रयागच्या नैर्ऋत्य कोन्यावर झालेला आहे. तेथें संगम—स्नानाचे सोयीकरितां कांठाशीं खडकांत दोन तीन पायऱ्या खोदून एक लहानसा घाट केला आहे. त्यावर लोखंडी साखळदंड पक्के बसविले आहेत. त्यांच्या टोंकास अडकविलेलीं वाटोळीं कडीं एका हातानें घट्ट धरून मगच पाण्यांतील पायरीवर उतरून स्नान करावें लागतें. नाहींतर प्रवाहपतित होऊन जलसमाधि मिळण्यास अवधीच नाहीं. साखळीच्या आधाराशिवाय गुडघाभर पाण्यांत सुद्धां जाण्याची मी, मी, म्हणणाऱ्या खंद्या पोहणारांची छाती होत नाहीं. घाटाचे वरचे अंगास एक छपरी घातली आहे तींत तीर्थविधि पिंडदान करितात. अशा त्या ओघवान व मनस्वी ओढ असलेल्या प्रवाहांत हरद्वार हृषीकेशप्रमाणें मोठमोठाले मासे आहेत. ते धारेच्या उलट सुलट सहज लीलेनें विहार करीत असतात.

देवप्रयागचे महात्म्य

अलकनंदा नारायणाच्या पायापासून निघते म्हणूनच तिला 'विष्णुपादाब्जसंभूता' आणि भागीरथी शंकराच्या मस्तकावरील जटेंतून निघते म्हणूनच तिला 'त्रिपुरारि शिरश्चारी' असें वाल्मिकी ऋषीनीं गंगाष्टकांत संबोधिलें आहे. अशा त्या मूळच्या स्वर्गंगेच्या

सप्तधारांपैकीं दोन्ही हरिहरांच्या पुण्यपावन स्पर्शानें आणि सान्नि-ध्यानें पवित्र झालेल्या गंगा देवप्रयागास येऊन मिळतात. म्हणून तेथील प्रयाग–माहात्म्य विशेष आहे. शिवाय प्रभू रामचंद्रानीं वन-वासांत असतां तेथें राहून ती पूर्वींचीच स्वर्भूमि तपोभूमि करून ठेवली आहे. त्यानंतर बलराम, विदुर ह्यांनींहि त्या भूमीवर तपें केलीं आहेत. अशा प्रकारें देवप्रयागला महान्तीर्थत्व प्राप्त झालें आहे. स्नान, दान, श्राद्धादिविधि करण्यास त्यापेक्षां श्रेष्ठ व स्वयंभू प्रयाग हिमालयांत कोठें सांपडणार आहे ? ज्याला आपण संगम म्हणतों त्यालाच तिकडे प्रयाग म्हणत असतात. हिमालयांत असे लक्ष प्रयाग असल्याचें रुद्रप्रयागाचे विद्वान् स्वामी सच्चिदानंद ह्यांनीं सांगितलें. अलकनंदेच्या उगमापासून ती भागीरथीस मिळेपर्यंत जे मुख्य पंच-प्रयाग–विष्णू, नंद, कर्ण, रुद्र व देव त्यांतील देवप्रयाग हा सर्वश्रेष्ठ आहे. गंगा–यमुना–संगमींचा जो तीर्थराज प्रयाग त्याचे खालोखाल देवप्रयागाची प्रतिष्ठा आहे. तें पितृतीर्थ असून तेथें प्रयाग–अला-हाबादप्रमाणें तीर्थविधि करावा लागतो.

## राघव पर्वत व राममंदिर

देवप्रयाग गांव ज्या पर्वताचे पायथ्याकडील शें–दीडशें फूट उंचीं-तील उतारावर वसलेला आहे त्या पर्वताचें नांव राघव पर्वत असें आहे. त्या पर्वतावर पाणी नसलें तरी तो झाडाझुडांनीं व्यापून जाऊन हिरवागार दिसतो. तो आठ नऊशें फुटापेक्षां अधिक उंच आहे. त्या पहाडाचे मध्याचे सुमारास म्हणजे चार साडेचारशें फूट उंचीवर प्रभू रामचंद्राचें एक मोठें देवालय आहे. तेथपर्यंत जाण्यास वरपर्यंत पायऱ्या बांधून वाट केलेली आहे. देवळाचें शिखर उंच, भव्य व ब्रह्मी थाटाचें आहे. देवळांत काळ्या रामाची एक सुंदर व मोठी उभी मूर्ति आहे. ह्या मूर्तिची स्थापना श्रीमज्जगद्गुरु आद्य शंकरा-चार्य ह्यांचें हस्तें झालेली आहे. सन १९०३ मधील भूकंपाचे हादऱ्यांत देऊळ ढासळलें. त्याचा जीर्णोद्धार दौलतराव महाराज शिंद्यांनीं केला. प्रदक्षिणा वाटेवर आणखी देवदेवतांच्या मूर्ति आहेत.

अलकनंदेत वसिष्ठकुंड व भागीरथींत ब्रह्मकुंड आहे. श्री बहिर-वाचें मंदिर व वागीश्वराचें स्थान रम्य आहेत. भागीरथीच्या पली-

कडे दशरथ पर्वत आहे. तेथें दशरथानें तपश्चर्या केली होती. शिवाय तेथें हनुमान पर्वत, सूर्यकुंड वगैरे प्रेक्षणीय स्थळें आहेत. पण तीं आडमार्गी असल्यामुळें तिकडे यात्रींचें दुर्लक्ष होत असतें.

### देवप्रयाग—एक उत्कृष्ट चित्रमय देखावा

डोंगर, हिमशिखरें, पाण्याचे प्रवाह, बहुविध वनश्री ह्यांच्या संभारसमृध्दींत हिमालय हा अगणित अशा चित्रपूर्ण जिवंत देखाव्यांचा विश्वसंग्रहच आहे. ' भिन्नरुचिर्हि लोकाः ' । निरनिराळ्या लोकांच्या निरनिराळ्या आवडी निवडी राहतात. प्रत्येकाला आपआपल्या आवडीचे देखावे तेथें हवे असतील तेवढे आणि तसतसे मिळण्यासारखे आहेत. तेथें इच्छाभोजनच आहे आणि तेंहि मुक्तद्वार आहे. कोणीहि तेथें जाऊन आतृप्ति भोजन करावें. उपाशी परतण्याची भीति नाहीं. माझे स्नेही श्री. नवाथे—हे नुकतेच 'पी. एच्. डी.' चे अभ्यासासाठीं इंग्लंडला गेलेले आहेत. ह्यांना देवप्रयागचें दृश्य जागतिक चित्रमय देखाव्यांत वरच्या क्रमांकांत बसेलसें वाटतें. " नेपल्स् पहावे व मग मरावे " असे युरोपांत म्हणतात इतके नेपल्स् सुंदर व चित्रमय आहे. परंतु कांहीं बाबतींत देवप्रयाग त्याहीपेक्षां सरस आहे. त्यांत कांहीं उणीवा आहेतहि. पण तीच तर – रुचिभिन्नता.

ह्या देखाव्याच्या पुरोभागीं दोन महावेगवती तुडुंब भरून वाहणाऱ्या मोठ्या नद्यांचे प्रवाह आणि त्यांचा उचंबळून झालेला संगम आहे. मध्यभागीं कांठापासून शें सवाशे फूट उंचीवर डोंगर उतरणीला देवप्रयाग गांवाची बैठक आहे. गांवांतील घरें माड्यांची असली तरी तशीं ती फार मोठीं उंच माड्यावर माड्या बांधलेलीं आहेत असें नाहीं. तथापि मागचीं घरें पुढच्या पुढच्या घरापेक्षां उंचावरच असल्यामुळें तीं एकावर एक माड्यांची असावींत असा भास होतो. हें विहंगम दृश्य नदीच्या पलिकडील कांठावरून, अर्थात गांवाच्या समोरून, गांवाच्याहि पेक्षां उंचीवरून दिसत असल्याकारणानें घरांचीं लहानमोठीं व निरनिराळ्या आकाराचीं कौलारें व गच्चीवजा सपाट पाखी त्यांच्यांतील निराळेपण स्पष्ट दाखवितात. लहानमोठ्या खिडक्या, दरवाजे व झरोकीं ह्यामुळें त्या छोटेखानी गृहपुंजांतील घरास उठावदार वैचित्र्य लाभलें आहे. ह्या देखाव्याच्या पार्श्वभागीं दृष्टीकक्षे-

बाहेर उंचावत गेलेला राघव पर्वत आहे. तो डेरेदार वृक्ष व हिरवीं-गार झाडेंझुडपें ह्यांनीं थेट वरपर्यंत झाकून टाकला आहे. हिरव्यागार दाट झाडीमध्यें पहाड–उंचीच्या मध्याचे सुमारास पण गांवापासून थोडें उंचीवर व गांवापासून तुटक असें प्रभु रामचंद्राचें देवालय आहे. त्यांचें तें एकाकी भव्य उंच नि धवल शिखर त्या दाट झाडीमधून वर मान करून, पाहणारांचें लक्ष एकदम वेधून घेतें. ह्या देखाव्याचा मांड चित्रसृष्टीस शोभण्यासारखा आहे ह्यांत शंका नाहीं. त्यांत हिम–शिखर नाहीं हा कांहीं दोष नाहीं. हिमालय म्हटला म्हणजे तेथें प्रत्येक ठिकाणीं हिम असतेंच असें नाहीं. तसें पाहिलें तर आठ दहा सहस्र फूट उंचीपर्यंत तें क्वचितच असते. हिमालयांत हिमाशिवायहि चित्रसृष्टीला अनुरूप असे उत्तमोत्तम देखावे आहेत. ह्याचें उदाहरण म्हणून देवप्रयागाकडे निःशंकपणें बोट दाखवितां येतें.

चर्मचक्षूंना दिसणाऱ्या चित्रमय देखाव्यानें मन मोहून गेलें, पण राम–मंदिराच्या त्या उंच, भव्य नि धवल शिखर–दर्शनानें तेंच मन उद्‌बोधित झालें. वैदिक पौराणिक कालांतच काय पण ऐतिहासिक कालांतूनहि अद्ययावत् हिमालयाची तपोभूमि अखंड पवित्र राहिली आहे. अधर्मी, विधर्मी, निधर्मी, असे कित्येक कालचक्रांचे फेरे आले नि गेले. सर्वभक्षक कालाच्या उदरांत ते नामशेष झाले. पण आपल्या धर्म-क्षेत्रांचें माहात्म्य सूर्यप्रकाशासारखे उज्ज्वल व अबाधित टिकून आह. 'सत्यधर्माभिरक्तानां नास्ति मृत्युकृतं भयम्' सत्यधर्मानें चालणाराला प्रत्यक्ष मृत्यूचेंहि भय वाटत नाहीं. अशा ध्येयनिष्ठ, धर्मनिष्ठ माणसाला अधार्मिक वा निधर्मी राजदंडाच्या भयाची काय क्षिति वाटणार आहे? हाच तर सनातन वैदिक धर्माच्या संस्कृतीचा विजय आहे.

बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति

इतकें हें मोहक व उद्‌बोधक दर्शन झाल्यानंतर ह्या देखाव्याचें छायाचित्र घेण्याची अनिवार इच्छा झाल्याशिवाय कशी राहील? दर्शन कोठूनहि होऊं शकतें, पण छायाचित्र काढण्यास विशेषच दृष्टिकोन साधावा लागतो. त्या ठिकाणीं जाण्यास वाट तर नव्हतीच, पण वावहि दिसत नव्हता. उतरणीवर वाळलेलीं काटेरी झुडपें व कुसळी गवत ह्यांनीं पाऊल टेकण्यापुरतीहि जागा मोकळी ठेवली

नव्हती. दहावीस पावलेंच जावें लागणार होतें, पण तेवढ्यांतच जिवाचा खेळ करण्याचा प्रसंग होता. विचारावर विकारानें प्रभाव गाजविला आणि कॅमेरा घेऊन निघालों. सौभाग्यवतीनें हें धाडस न करण्याविषयीं काकुळतीनें विनविलें होतें, पण डोळ्यावर धुंदी आल्या-प्रमाणें तिच्या विनवणीकडे कानाडोळा करून निघालों.

### देव तारी त्याला कोण मारी ?

दहापांच पावलें गेलों असेन नसेन तोंच पुढें पाय टेकून मागचा पाय उचलणार इतक्यांत पायाखालचा ढिसूळ मातीमुरमाड जमि-नीचा धर कोसळला आणि उपडा पडून दोन तीन वाव खालीं घसरलों. खूप धूळ उधळली. फारसें खरचटलें नव्हतें, तरी त्या त्या ठिकाणीं फार आग होत होती. काटचाकुटचांची बोंच जाणवत होती. अडवा पडून होतों, हातपाय कापूं लागले होते. एका मोठचा गोटचानें धर दिला म्हणून वांचलों, नाहींतर संगमांत मुक्तिच होती. धोंडयाच्या आधा-रानें जिवांत जीव आला. हातापायावर खरडत खुरडत थोडें पुढें सरून सावरतां आलें. तेव्हां तेथून छायाचित्रहि घेता आले. मोठ्या सावध-गिरीनें भीत भीत, 'चाल चाल माते' करीत परत ठिकाणावर येऊन एकदाचा पोहोचलों. 'देव तारी त्याला कोण मारी,' ह्याशिवाय असल्या घटनांना उत्तर नाहीं.

### बोजेवाल्यांची संभावना व त्यांस निरोप

आम्हीं ह्या यात्रा केल्या त्यावेळीं देवप्रयागपर्यंत मोटारीनें जाण्या-येण्याची सोय झालेली होती. अडीच तीन महिने खाणारा प्रवास आम्ही बरोबर दीड महिन्यांत संपविला होता. आमचे बोजेवाले सराव-लेले तरणेताठे होते तरी सुध्दां ते दमून भागून कंटाळून गेले होते. शिवाय पावसाळा चालूं झाला असल्याकारणानें शेतीच्या कामासाठीं त्यांची घराकडे जाण्याची ओढ वाढली होती. देवप्रयागपासूनच गांवाकडे परत जाण्यांत त्यांची आणखी एक सोय अशी होणारी होती कीं, हरद्वार-पर्यंत जाऊन पुन्हां तेथें परत येईपर्यंतची शंभर सवाशें मैलाची चाल आणि काळ अनायासा वांचणारा होता. हरद्वार पर्यंतच्या राहिलेल्या वाटेवर त्यावेळपर्यंत दृष्टीस पडलेल्या स्थळांपेक्षां अधिक कांहीं नव्हतें, किंवा एखादें तीर्थक्षेत्रहि नव्हतें, त्यांचा करार हरद्वारपर्यंत येण्याचा

असला तरी तेवढ्या अंतराचे योग्य होतील ते पैसे कापून देण्यास त्यांची संमति होती. ह्या कारणास्तव त्यांनीं आमची सारखी मनधरणी चालविली होती कीं, आम्ही देवप्रयापासून हरद्वारला मोटारीनें जावें आणि त्यांना त्यांच्या घरीं जाण्यासाठीं तेथूनच करारांतून मुक्त करावें.

बोजेवाल्यांच्या जिवावरच कोणाची काय यात्रा पार पडत असते. त्यांच्या साह्याशिवाय आमचें पाऊलहि जागचें हललें नसतें, ही जाणीव सदैव आमचे दृष्टीसमोर होती. साधू बैराग्यांप्रमाणें एका वस्त्रानिशीं अन्नच्छत्री जेवण व देवळीं बिऱ्हाड, अशा पद्धतीनें किंवा आपल्या सामानाचा बोजा आपणच वाहून न्यावयाचा, अशी खंबीरी असली तरच बोजेवाल्यांच्या साह्याची गरज पडणार नाहीं. आमच्या हातून अशा प्रकारें त्यांचें साहाय्य घेतल्याशिवाय यात्रा झाली नसती. त्यांनीं केलेले कष्ट, त्यांचा विश्वासूपणा, त्यांचा आज्ञाधारकपणा, त्यांची गरिबी, आणि त्यांचा आपुलकीचा भाव ह्यामुळें त्यांजविषयीं सहानुभूति व अनुकंपा आपोआपच उत्पन्न झालेली होती. हिमालयांतील यात्रा आणि बोजेवाले ह्यांचें साहचर्य एकरूपच होऊन बसल्यासारखें आम्हांस वाटतें. म्हणून ते आम्हांस घरच्या मंडळीसारखे वाटत असत. त्यांनीं आमचें काम केलें आणि त्याकरितां आम्हीं त्यांस पैसे दिले. एवढ्यानें कायदेशीर व्यवहार संपतो. ही पद्धत आपल्याकडे इंग्रजांनीं पुरस्कृत केली व आजहि लोकशाहीच्या नांवानें आपण तिचा कित्ता गिरवीत आहों. पण ती आपल्या संस्कृतीची शिकवण नाहीं. धर्म, न्याय, नीतीची दृष्टि तिच्यांत नाहीं. वेळ प्रसंग येऊन पडला म्हणजे माणुसकी, दया, धर्म आठवूं लागतो. तेव्हां कायदेशीर व्यवहाराचें सहानुभूतिशून्य कोरडें स्वरूप उघडें होतें. अशी आमची समजूत असल्याकारणानें बोजेवाल्यांच्या साह्याविषयीं आम्हांस कृतज्ञता वाटत होती. त्याकरितां त्यांची मागणी मान्य करणें हा आमचा धर्मच होता. त्यांत आम्ही त्यांच्यावर कांहीं उपकार करणार नव्हतों. त्यांचे राहिलेले पैसे चुकते देऊन त्यांस बक्षिशीहि दिली. यात्रेनिमित्त म्हणून घेतलेलीं भांडीकुंडीं कुपडे लत्ते सर्व त्यांनाच वांटून दिलें. त्यांना संतोष झाला. चारहि क्षेत्रांच्या ठिकाणीं त्यांना खिचडीचें जेवण द्यावयाचें ठरलेलें होतें. त्याप्रमाणें देऊन शिवाय तीर्थस्थानीं जो कांहीं ओला-

कोरडा जिन्नस मिळून नैवेद्याकरतां गोडधोड करीत होतो, त्याचा प्रसादहि त्यांना पोटभर देत होतों. देवप्रयाग हें कांहीं ठरावांतील क्षेत्र स्थान नव्हतें. तेथें त्यांची आमची अक्षयीचीच ताटतूट होणार होती. पुन्हां या जन्मीं गांठीभेटी होण्याची आशासुद्धां नव्हती. स्मृतीभेटच अधूनमधून प्रसंगोपात व्हावयाची. ह्या विचारानें त्यांस एक इच्छा-भोजन दिलें. त्यांना सांगितलें कीं, तुम्हास आवडेल तो जिन्नस करून पोटभर खा. इतकेंच नव्हें तर आम्ही दिलेला खाऊ म्हणून आपल्या मुलाबाळांसहि घेऊन जा. एका दुकानदाराची व त्यांची गांठ घालून दिली व त्यास सांगून ठेवलें कीं, हे लोक मागतील ते जिन्नस व तितके त्यास द्यावे, त्याचे पैसे मी देईन. त्यांनीं गुळाचा शिरा केला. साखर कां नाहीं घेतलीत? म्हणून विचारतां ते म्हणाले कीं, "आम्ही नेहमीं असाच करतों, म्हणून तो आम्हास आवडतो." प्रत्येकानें अजमासें दोन मुदांएवढालाच घरीं नेण्यासाठीं घेतलेला आम्हास दाखविला. फुकट मिळतो आहे म्हणून हात मारून उकळला नाहीं.

आम्ही जातों आपुल्या गांवा असाच लोभ असो द्यावा

आम्ही निघण्याचे अदल्याच दिवशीं म्हणजे जेवण दिलें त्याच दिवशीं आपआपल्या गांवीं जाण्यास त्यांना आम्हीं मोकळीक दिली होती. पण तेहि कांहीं अगदींच भाडोत्री, वेठीस धरलेल्या नात्याचे नव्हते. त्यांनीं सांगितलें कीं, तुमचें सामान मोटारीवर पोहचवूं व तुमची मोटार चालूं झाली कीं, तसेंच आम्हीहि चालूं लागूं.

घर सोडून मुलांमाणसांचा निरोप घेऊन निघतांना जी आमची आवस्था झाली होती, तिचीच पुनरावृत्ति तेथें झाली. थोड्याच दिवसाचा सहवास पण त्यानें हृदयाशीं ठाव घेतला. कंठ दाटून आले, शब्द फुटेना, डोळे भरून आले, कांहीं दिसेना.

गृहस्थाश्रमापासून दूर अरण्यांत राहणाऱ्या कण्व ऋषींचीहि सहवासजनित सौहार्दानें अशीच अवस्था शकुंतला-वियोगकालीं झाल्याचें वर्णन महाकवि कालिदासांनीं केलेलें आहे.

'कण्ठःस्तम्भित बाष्पवृत्तिकलुषश्चिताजडं दर्शनम् ।
वैक्लब्यं मम तावदिदृशमपि स्नेहादरण्यौकसः ।'

घरचीं आकर्षणें सुटावीत म्हणून कांहीं दिवस स्वेच्छेनें अरण्यवास

पत्करला. पण तेथेंहि न कळत कां होईना घरचीं आकर्षणें उत्पन्न झालींच.

आमची मोटार हलली तेव्हां पुन्हां निरोप देणेंघेणेंचे काम मनोमयच पण हातवाऱ्यांच्या खुणांनीं मूक भावानेंच करण्याची पाळी आली.

हरद्वारला परत आलों तों तेथें सोमवती आमावास्येची पर्वणी अनायासें साधली. अवघ्या पंचेचाळीस दिवसांत हिमालयांतील साडेसहाशें मैलांचा प्रवास झाला. त्या अवधींत आमचे दहा पांच पौंड वजन घटलें. पण त्यानें शरीरावर अनिष्ट असा कोणताच परिणाम झालेला नाहीं. ती घट लौकरच भरून निघाली. गंगामाई, बदरीकेदार, बदरीविशाल ह्यांची कृपा. त्यांना आमचे बरोबर येथें घेऊन आलों आहों. त्यांची कृपा आहे म्हणून ते अजून आमचे हृदयस्थ राहिले आहेत व पुढेंहि असेच राहतील अशी आशा आहे.

# हिमालयदर्शन

## उपसंहार

# उपसंहार

## एकता मासिक–कर्त्यांचे आभार

हिमालय आणि त्यांतील आपलीं तीर्थक्षेत्रें ह्यांकडे महाराष्ट्रीयांचें पण त्यांतलें त्यांत तरुण पिढीचें लक्ष अधिक वेधलें जावें ह्या हेतूनें अलिकडील सत्प्रवृत्त व संघटनशील तरुणांचें आवडतें मासिक जें 'एकता' त्यांत 'हिमालय–दर्शन'–लेखमाला ज्येष्ठ शके १८७१ ते भाद्रपद शके १८७३ पर्यंत प्रसिद्ध केली. तींत चार भागांपैकीं एक भाग–यमुनोत्तरी, गंगोत्तरी, बदरीकेदार व बदरीनारायण–पुरा झाला.

ह्या मासिकाचा ग्राहकवर्ग बारा सहस्राचे सुमारास असल्या-कारणानें ती लेखमाला लाख अर्धा लाख माणसांच्या डोळ्यांखालून गेलेली आहे असें समजून चालण्यास अडचण नाहीं. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या ठिकाणांहून अनेक लोकांकडून ह्या लेखमालेविषयीं प्रशस्तीपर उद्गार समक्ष व लेखी आले आहेत. आपल्या जनता-मासिकांत 'हिमालय–दर्शन' लेखमालेस शब्द टाकण्याबरोबर स्थान दिलें ह्याकरितां 'एकता' मासिककर्त्यांचे कृतज्ञतेनें आभार मानितों.

## प्रसादचिन्हानि पुरःफलानि

लोकांची जिज्ञासा वाढून गेल्या दोन वर्षांत पांचपन्नासचे वर तरुण मंडळी समक्ष भेटून किंवा पत्रोत्तरानें माहिती घेऊन यात्रा करून आलेहि. कित्येक लोकांनीं प्रशंसोद्गाराबरोबरच ही लेखमाला सचित्र व सविस्तर पुस्तक रूपानें छापून काढण्याविषयीं आग्रहपूर्वक सूचना केल्या आहेत. ह्या सर्वांचा मतितार्थ मी इतकाच समजतों कीं, आपलें लिखाण वाचकांच्या पसंतीस उतरलें आहे आणि 'हिमालय–दर्शन' लेखमालेच्या पहिल्याच प्रास्ताविक लेखांत उल्लेख केलेला मुख्य हेतु जो 'हिमालयाकडे आणि विशेषतः तेथील तीर्थक्षेत्रांकडे महाराष्ट्रीयांचें लक्ष अधिक वेधावें, त्यांची जिज्ञासा जागृत करून त्यांच्यांत तिकडे जाण्याची आवड उत्पन्न करावी, हिमालयांतील यात्रा करण्यांत खरा पुरुषार्थ आहे, वगैरे,' तो हेतु इतक्या तांतडीनें सिद्धीस जाऊं लागला आहे, हे पाहून केलेले श्रम सार्थकीं लागले, जनता जनार्दनाची सेवा रुजू होत आहे ह्याचें समाधान मानतें.

## पुस्तक छापण्याची आवश्यकता

मासिकांतील लेख टिपणीसारखे असतात. त्यांत विस्तारपूर्वक वर्णनें, स्थानमाहात्म्य, निगडित इतिहास, कथा, त्यावर सुचलेले विचार, भाष्य वगैरे विषय–गौरव फारसा करितां येत नाहीं. त्याकरतां होईल तेवढा संकोचच करावा लागतो. हें विस्तारपूर्वक काम स्वतंत्र पुस्तकांतच करितां येते. मासिकांतील लेख खंडित व विखुरलेलेच असावयाचे. ते एकतंत्री वाचावयास मिळण्याची पंचाईत पडते. एका अंकांतील लेख वाचून त्याचा पुढचा भाग दुसऱ्या अंकांत पानें चाळून शोधून काढीपर्यंत मधेंच विषयांतर झाल्याप्रमाणें, धागा तुटतो आणि विरस होऊन जातो. शिवाय असले लेख केवळ तात्कालिक महत्त्वाचे नसतात. त्यांचें महत्त्व चिरकाल टिकणारें असतें. त्यांतील विषय वास्तव मार्गदर्शन करणारा असल्यामुळें त्याची नेहमींच आवश्यकता भासते. ते लेख स्वतंत्र मिळण्याची सोय असलीच पाहिजे. ‘ एकता ’ मासिकातील लेखमालेनें त्यांची योग्यता व उपयुक्तता मापली जाऊन एक प्रकारें गाजावाजा होऊन त्यास मोठीच प्रसिद्धि मिळाली आहे. हीं सर्व कारणें लक्षांत घेऊन ‘ हिमालयदर्शन ’ पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे. मासिकासारखी बंधनें नसल्याकारणानें करावा लागत असलेला संकोच दूर करून अवश्य तो विस्तार व वाढ पुस्तकांत केली आहे. आमचे अनुभव, झालेले संस्कार व बोध आणि छायाचित्रें व नकाशे देऊन पुस्तक सर्वांगपरिपूर्ण होईल अशी घेता आली ती सर्व काळजी घेतली आहे.

## थोडे आत्म–निवेदन

आम्हीं बदरीनारायणादि हिमालयांतील चार धामांच्या यात्रा केल्यास उणीपुरीं सतरा वर्षें होत आलीं. त्यावेळीं तेथें जें काय आम्हीं पाहिलें, ऐकलें अनुभवलें, आणि जे कांहीं संस्कार आमच्यावर झाले त्यांचें यथास्मृति, यथामती वर्णन येथपर्यंत केलें. त्यांत व्यक्तिगत म्हणून ज्या गोष्टींचा उल्लेख केला नाहीं, त्यांपैकीं कांहीं यात्रेच्छुस मार्गदर्शक होण्याचा संभव वाटतो, म्हणून त्या येथें देतों.

हरद्वार येथें पोहोंचून भागीरथी गंगेच्या ऐश्वर्याचें स्वरूप प्रथमच दृष्टीस पडलें, तेव्हां दिपूनच गेलों. चार दिवस तेथेंच राहून प्रत्यहीं

त्रिकाळ स्नानसंध्यादि करण्याचा मोह अनावर झाला. वाटलें कीं, पुढें अगदीं उगमाशीं आतांचे आतां धांवत पळत गेलों तरी तेथें कोणतें मोठें असें अधिक ऐश्वर्य आपणाकरितां वाढून ठेविलें आहे ? त्याकरितां आयती लाभलेली घरच्यासारखी पुणेंकर यात्रींची संगती सोडून देऊन तेथेंच तीन दिवस निवास वाढविला. त्यामुळें सर्व प्रवास एकाकीच करण्याची आपत्ति ओढवून घेतली खरी, पण ती शेवटीं इष्टापत्तिच ठरली. उत्तरदायित्व अंगावर पडल्यामुळें स्वावलंबनाचे पाठ मिळून आत्मविश्वास दृढावला. ह्या यात्रा म्हणजे तें एक मोठें साहसच आहे, असें जें वाटत असतें ती बूज नाहींशी झाली. इतकेंच नव्हें तर ह्या यात्रांपेक्षां अधिक कठिण व खऱ्या साहसाच्या म्हणतां येतील अशा दोन यात्रा म्हणजे श्रीकैलास–मानस व श्रीमुक्तिनारायण, ह्याहि करण्याचें अवसान उत्पन्न झालें, व त्या बेडर वृत्तीनें करितां आल्याहि.

ह्या यात्रेंत आमचा जवळ जवळ सहाशें मैलांचा पायीं प्रवास झाला व तो हरद्वारपासून निघून पुन्हां तेथें परत येईपर्यंत बरोबर पंचेचाळीस दिवसांत झाला. दांडी, झंपन वा कंडी ह्या वाहनांचा आधार मुळींच घ्यावा लागला नाहीं. प्रतिदिवशीं सरासरी तेरा मैलांची चाल पडली, तशीच ती अधिकांत अधिक बदरीनारायणापासून देवप्रयागपर्यंतचे परत मार्गीं प्रत्यहीं वीस एकवीस मैलांची झाली. ह्यांत एक वैशिष्टच आहे म्हणून हा उल्लेख बुध्द्या करीत आहे.

निश्चयाचें बळ तुका म्हणें तेंची फळ

एक चाळिशीच्या घरास पोहोंचलेली बाई, जिला सहा मुलें झालेलीं होती, जी दोन वर्षें हंतरुणास खिळून शेवटीं सन १९२० ह्या वर्षीं वीस तास नाड्या सुटून वेशुद्धावस्थेंत–घोंगडीवर काढलेली- प्रत्यक्ष प्रेतावस्थाच ती–पडलेली होती, जी यात्रेपूर्वीं तीनच वर्षें एका बाळंतपणांत प्लूरसीनें पछाडलेली होती, अशी बाई प्रत्यहीं एवढाले वीस वीस मैलांचे टप्पे चालूं शकते, इतकेंच नव्हें तर वसतीस पोहोंचल्यानंतर चूल पेटवून स्वयंपाक बनविते. ह्या यात्रेनंतर पुढील सहा वर्षांत त्याच बाई पशुपति, मुक्तिनारायण, कैलास–मानस ह्या हिमालयापारच्याहि यात्रांत सातआठशें मैलांचा पायीं प्रवास करतात.

त्यांची प्रकृति दगडासारखी निकोप झालेली अजूनहि तशीच राहिलेली आहे. हीच गोष्ट पुरुषाची असती तर तिला कांहीं महत्त्व आहे असें वाटण्याचें कारण नाहीं. पण ही प्रत्यक्ष घडलेली गोष्ट एका संसारी स्त्रीची आहे. त्यावरून कोणासहि निःशंक विश्वास उत्पन्न होण्यास अडचण नाहीं कीं, हिमालयांतील यात्रांचा जो अवास्तव वागुलबोवा व आपल्या सामर्थ्याविषयीं जो उगाचच न्यूनगंड वाटत असतो तो व्यर्थ आहे. कोणासहि ह्या यात्रा करणें अवघड नाहीं. मात्र त्यास अढळ निष्ठा, प्रबळ इच्छा, चिकाटी व काटकपणा असला म्हणजे तो सर्व अडचणी बाजूस सारतो, वेळेची व पैशाची सवड काढूं शकतो आणि यात्रा–संकल्प सिद्धीस नेतो.

### दैनंदिनचा–कार्यक्रम

आमच्या दैनंदिन कार्यक्रमाची रूपरेषा कळली तर तिचाहि उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं. हरद्वारहून निघाल्यानंतर पुढें प्रत्यहीं पहाटे तीन वाजण्याचे सुमारास स्वस्थ व पूर्ण झोंप होऊन आदल्या दिवसाच्या चालीनें आलेला सर्व शिणोठा जाऊन पूर्ववत् तरतरी येई. अंधारांत सर्वच आडोसा म्हणून प्रातर्विधि लवकर उरकून घेऊन निघण्याची सिद्धता करीत असूं. निजण्यापूर्वीं सकाळकरितां लागणारें पाणी आणून ठेवीत होतों. साडेचारचे सुमारास 'गिरिराज नमस्तुभ्यम्' करून मार्गस्थ होत होतों. सकाळीं दोन तीन तासांच्या चालींत वाटेवर कोठें तरी स्नानायोग्य स्वच्छ व विपुल पाणी लागेच. तेथें अंघोळ, संध्यावंदनादि नित्यकर्म, कपडे धुणें, वगैरे होत असे. धोतर उपरण्याबरोबर अंगांतील पैरण व पंचा हें सर्व प्रत्यहीं धुतलेलेंच वापरण्याचा आमचा नित्याचा प्रघात आहे. कपडे वाळेपर्यंत फराळ करून घेत असूं. त्याकरितां डिंकाचे लाडू, पोहे, फुटाणे, भाजलेले गहूं–त्यास तिकडे 'गिहू' म्हणतात व ते वाटेंत जागजागीं मिळतात–खारिक, खोबरें, काजू, बेदाणा, भुईमूग दाणे, अक्रोड घेतलेले होते. अर्ध जेवणा पेक्षांहि कमी ही न्याहारी असे. आमच्या सावकाश चालीमुळें लवकर पोहोंचून दूध मिळण्याचा योग आम्हांस कधींच साधता आला नाहीं. आमच्या न्याहारींत आम्ही बरोबर घेतलेला गडी ह्यास अल्पांशानें भागीदार करीत असूं.

## प्रातःस्मरणांत श्रमपरिहार

अंघोळीपर्यंतच्या वाटचालींत प्रभातकाळच्या प्रशांत वेळीं प्रसन्न मनानें प्रातःस्मरण, भूपाळ्या, गंगाष्टक, गंगालहरी, महिम्न, हरिपाठ, विष्णुसहस्रनाम, भगवद्गीता व उपनिषदें ह्यांपैकीं भाग म्हणत असूं, किंवा त्यावर चर्चाहि करीत असूं. चालतां चालतां हें म्हणणें होत असल्याकारणानें चालण्याचे श्रम कधींच कळून आले नाहींत. उलट मन अधिकच रंगून जाई आणि पाण्याजवळ थांबण्याची वेळ आली तर थोडा विरसच होई. ह्या वेळपर्यंत उन्ह पडून थंडी तर निघून जाईच, पण घाम फुटून उबदार कपडे नकोसे झालेले असत.

## भोजन एकच वेळ

सुमारें आठदहा मैलांच्या चालीनंतर सोयीस्कर चट्टीवर थांबून पोटपुजेची व्यवस्था करीत असूं. स्वयंपाकास लागणारीं भांडीं गड्या-बरोबर घेतलेलीं असतच. जेवण एकदांच दुपारचें असे. त्यांत नुसता भात, आमटी, लोणचें, मेतकूट, मिरची एवढेच जिन्नस असत. जेवणास मध्यान्ह उलटून गेलेली असे. वाटेंत विशेषतः यमुनोत्तरी, गंगोत्तरीकडे उत्तम साजुक तूप कित्येक ठिकाणीं मिळत गेलें, पण तें पुढें बदरीनारायणाच्या वाटेंत मिळालें नाहीं. निघतांना बरोबर घेतलेल्या दोन शेर तुपाचा उपयोग तेथें चांगला झाला. संध्याकाळीं फराळाची सुद्धां कधीं अपेक्षा वाटली नाहीं. दुपारीं नुसता भात व तोहि ताक, दूध, भाजीपाल्याशिवाय. ह्यामुळें त्याची शिसारी बसली. पावशेर सव्वा पावशेर तांदुळाच्या भातांत आमचे दोघांचें पोट भरून कांहीं उरेहि. आहार तुटला व वजनहि आठदहा रतलांनीं घटलें. तरी उत्साह व शक्ति कमी पडली नाहीं. परत घरीं आल्यानंतर थकवा कळून आला. पण तो कांहीं रोग नव्हता. ती उपासमार होती. महिन्या दीड महिन्यांत सर्व घट भरून निघाली. ज्यांनीं कणकेच्या रोटयावर हात मारला त्यांच्या मागें पोटदुखी, आमांशादि विकार लागल्याचें माहीत आहे.

एका गोष्टीचा उल्लेख बुध्द्या करितों. आमच्या घरचीं तोंडी-लावणीं अळणी असल्याचा आक्षेप आहे. एखादे वेळीं बाहेरचे जवणांत भाजीपाल्यांत चुकून मिरचीचा तुकडा लागला तर जीभ भाजून हाय

हाय करावें लागतें. असें असतांना चारहि धामांच्या ठिकाणीं वा त्या उंचीवर मीं सबंध एक दोन मिरच्या अर्थात् लोणच्यांतील खाल्ल्या तरी कांहीं वाटत नसे. पण त्याच जेव्हां खालच्या उंचीवर चाखल्या तेव्हां हाय हाय होई. दुसरी एक गोष्ट लक्षांत आली कीं, त्या उंचीवर टार्चच्या बॅटऱ्या निकामी पडल्या व त्याच खालच्या उंचीवर चांगल्या उपयोगी आल्या.

### प्रत्यहीं चाल दोन वेळ

आम्ही दोन वेळ चालत होतों, म्हणजे जेवणापूर्वी व त्यानंतर. त्यांत सकाळचा भाग मोठा व दुपारचा भाग पांच चार मैलांपेक्षां अधिक नाहीं. दिवसा उजेडींच प्रवास थांबवावयाचा. अस्तमानाचे सुमारास सायंसंध्या उरकून घेऊन चालतां चालतां स्तोत्रपाठ होत असे. वसतीस पोहोंचल्यानंतर अंधार पडेपर्यंत बोजेवाले तेथें येऊन पोहोंचत असत. बिस्तारे लावण्याचाच अवकाश कीं, झोंप पाठ जमिनीस लागण्याचीच वाट पाहात असे. एकदम 'सुखंचमे, शयनंचमे'.

आमचे पैसे आम्हीं आपल्याजवळ कमरेस कशांत बांधून बाळगिले होते. बरोबर स्टोव्ह व त्याचीं अवजारें आणि एक हरीकेन घेतला होता. अशा प्रकारचा दैनंदिन मुख्य कार्यक्रम होता. तो मार्गदर्शक होईल म्हणून दिला आहे.

### यात्रेच्छू बरोबर हितगुज

प्रवासेच्छू अनेकविध दृष्टीचे असतात. त्या सर्वांसाठीं प्रवासांकरितां उपयुक्त होईल अशी देतां येईल तेवढी सर्व माहिती व सूचना परिशिष्टांत दिली आहे. ती काळजीपूर्वक पाहिली असतां प्रवासांत कोणतीहि अडचण पडणार नाहीं. ज्यांची विशेष दृष्टि म्हणजे भौगोलिक, ऐतिहासिक, भूगर्भ व वनस्पतिसंशोधनात्मक इत्यादीविषयीं असेल त्यांकरितां माहिती देण्याचें हें स्थल नव्हें.

उपसंहार करतांना यात्रा करण्याचे हेतू, त्याचे साधन मार्ग व त्याची फलश्रुती त्याच्या महत्त्वासाठीं पुनरुक्तिचा दोष पत्करूनहि देणें आवश्यक वाटते. तीर्थयात्रात्मक दृष्टीच्या प्रवासेच्छूंबरोबर व निव्वळ त्यांजकरितांच दोन हितगुज गोष्टी करण्याचा मोह आवरत नाहीं, म्हणून माझे झालेले ग्रह त्यांचे कानीं घालतों.

तीर्थक्षेत्र–महात्म्य

देव–देवतांचा निवास । तीर्थ क्षेत्रीं रात्रंदिवस । स्वर्नद्यांचाहि सहवास । पुण्यभू म्हणोनी ।। सद्विचारें साधुसंतें । तपोबळें पुण्यवंतें । प्रेमभावें भक्तिवंतें । भारूनी ठेलीं तीर्थक्षेत्रें ।। तीर्थक्षेत्रीं सद्विचारतरंग । आसमंतीं वावरती अभंग । अनुरूप चित्तीं करूनी संग । प्रसवती सद्भावा ।। '

आपलीं सर्वच तीर्थक्षेत्रें हीं पवित्र स्थानें आहेत. एक तर तीं आपल्या विलक्षण गुणवैशिष्ट्यांमुळें स्वयंभूच विभूतिमत् आहेत. ' यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ।। ' दुसरें असें कीं, तेथें देवदेवतांचें व स्वर्नद्यांचें अक्षय्य सान्निध्य आहे. शिवाय ह्या स्थानांतून आजपर्यंत आपल्या पूर्वज तपोधन ऋषीमुनींनीं दीर्घ कालपर्यंत महान् तपश्चर्या करून तीं स्थानें अक्षय्यचींच भारून ठेवलेलीं आहेत.

अशा तीर्थक्षेत्रांतहि हिमालयांतील क्षेत्रें म्हणजे साक्षात् भगवंताचींच तीं प्रतीकें आहेत. ' स्थावराणाम् हिमालयः । ' त्याचप्रमाणें ' स्रोतसामस्मि जान्हवी । ' म्हणजे स्वर्गांतून पृथ्वीवर अवतरलेली जी स्वर्नदी ती ही भगवंताचेंच रूप आहे. ती नदी सात धारांनीं शंकराच्या जटांतून–(सबंध हिमालय हेंच शंकराचें रूप कल्पिलें आहे. –त्यावरील जटा म्हणजेच शिखरें व अरण्यें–त्यांमधून) बाहेर पडत आहे. त्या सात धारा (सप्त सिंधू) म्हणजे सिंधु, शतद्रु (सतलज), यमुना, भागीरथी, गण्डकी, शरयू आणि ब्रह्मपुत्रा ह्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. ह्या सातहि नद्यांचा उगम भगवंताचें निवासस्थान परम पवित्र जो कैलासादि हिमालय त्यामध्यें झाला आहे. अशा तऱ्हेनें हिमालयांतील तीर्थक्षेत्रांइतकीं पवित्रतम क्षेत्रें अन्यत्र कोठेंहि आढळत नाहींत. अशांपैकींच बदरीनारायणादि चार धाम हीं क्षेत्रें आहेत. ह्या क्षेत्रांचा महिमा थोडक्यांत असा आहे.

अशा ठिकाणीं आपण जात आहों ही भावना अक्षय्य जागृत ठेवली पाहिजे.

तीर्थयात्रा–यज्ञ तप–पूजन

तीर्थयात्रेस जाणें ही एक उपासना आहे. हा एक यज्ञ आहे. हें

एक पूजन आहे. यज्ञ काय किंवा पूजन काय, हें अनेक अंगांनीं सिद्ध होणारें असलें तरी त्यांतलें मुख्य अंग श्रद्धा, भाव किंवा भक्ति हेंच असतें.

श्रद्धा, भाव, भक्ति हे मनाचे धर्म आहेत. म्हणून तीर्थयात्रेंतील मुख्य साध्य मनाची कमावणी करणें हें आहे. हिमालयांतील तीर्थयात्रेंत हा हेतु साध्य होण्यासारखी तेथील परिस्थिति अनुकूल असते. तीर्थयात्रा करणें हें एक, वरील दृष्टीनें, तपाचरण आहे. तप म्हणजे शरीर व मन हें कामास लावून तें इतकें तापविणें कीं आपणांस पाहिजे तसें व तेथें तें सुखेनैव वाकेल, म्हणजेच तें संपूर्णतया आपल्या स्वाधीन राहील; नेहमींप्रमाणें त्याच्या आधीन राहण्याची पाळी आपणावर येणार नाहीं.

### शारीरतप

तेथील दैनंदिन प्रवासांत इतके कष्ट आहेत कीं जीव रंजीस येतो. सारखे चढउतार करतां करतां पाय मेटाकुटीस येतात. थंडी, वारा, पाऊस वा उन्ह लागून शरीर कोळपून निघतें. तहानभुकेनें पंचप्राण डोळयांत येतात व शेवटीं तहानभूक मारली जाऊन रोजच खऱ्या अर्थाचे निराहार करावे लागतात. शरीरावरील बाळसें पार झडून जातें. आणि हें सर्व कशाकरितां? तर देवपूजनाकरितां. ह्यापेक्षां देहदंड आणखी कोणता असणार आहे? ह्यालाच म्हणतात शारीरतप. 'देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं ............ शारीरं तप उच्यते।' हा देहदंड दुसऱ्या कोणीं लादलेला नसतो. तो नुसत्या स्वेच्छेनेंच नव्हे तर आवडीनेंहि पत्करलेला असल्यामुळें त्यांत कष्ट तर वाटत नाहींतच, पण उलट तो सुखावहच वाटावयास लागतो. ह्या शारीरतपामुळें शरीर कांटक, सुदृढ, सुटसुटीत, हलकें, चपळ व निरोगी बनतें.

### मानसतप

शारीरतपाबरोबर मानसतपहि आपोआप घडत असतें. शरीर व मन सर्वस्वीं परस्परावलंबी आहेत. शरीराशिवाय मनास राहावयास आधार नाहीं व मनाशिवाय शरीरेंद्रियांचीं कार्यें—पाहणें, ऐकणें, बोलणें इत्यादि होणार नाहींत. साधारणपणें असें असलें तरी मनाची योग्यता फार मोठी आहे. शरीर कितीहि सुदृढ असून मन दुबळें असलें तर हातून कांहींहि होणार नाहीं. पण उलट तेंच मन सुदृढ असून शरीर

दुबळें असलें तरीहि माणूस मनांत आणील तें करून दाखवील.

'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो: ।'

ही गोष्ट लक्षांत ठेवून मानसतप अधिक दक्षतेनें आचरलें पाहिजे. त्यास उपाय भगवंतांनींच सांगून ठेविला आहे कीं, 'अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ।' हा अभ्यास व वैराग्य इकडील प्रवासांत सहजसुलभ आहे. अभ्यास म्हणजे प्रतिदिवशीं नित्य नियमानें त्याच त्या गोष्टी करणें. रोजचे रोज शारीरिक कष्ट मुकाटद्यानें सोसण्याचा अभ्यास तहान–भूक सोसण्याचा अभ्यास, उन्ह, थंडी, वारा ह्यांची तमा न बाळगण्याचा अभ्यास, व इतकें सर्व उल्हासानें व आनंदानें करण्याचा अभ्यास, हा सर्व अभ्यास चालू असतांच परमेश्वराचे गुणगानांत तल्लिनता.

## एकाग्रतेचा अभ्यास

येथें एक गोष्ट प्रामुख्यानें लिहावीशी वाटते, ती ही कीं, एका बाजूनें हा कष्टप्रद प्रवास शरीर रेटीत असतें त्याच वेळीं ह्या जगड्व्याळ सृष्टींतील एकापेक्षां एक भव्य नि विशाल बर्फाच्छादित पर्वतशिखराकडे, निसर्गरम्य वनश्रीकडे किंवा लहानमोठ्या जलप्रवाहांकडे पाहून मन विस्मित होऊन परमेश्वरी लीलेच्या कौतुकांत गर्क होऊन जातें. आपोआपच ईश्वरी गुणांचे एका आंतील एक पापुद्रे उलगडून पाहतांना त्याच्या गुणांचें चिंतन व मनन होत जातें. ह्यासच मी गुणगान म्हणतों. शारीरतपाबरोबर मानसतप कसें होत जातें त्याचें हें एक उदाहरण आहे. ह्या उपरिनिर्दिष्ट अभ्यासानें मन निग्रही बनतें. आवडीचें व स्वेच्छेचे कार्य करीत असल्यामुळें कष्ट होत असले तरी अंत:करण प्रसन्न ठेवण्याची संवय लागते. इकडील प्रवासांत राहणीचा व्यय अतिशयच थोडा असतो. रोजीं पुरे चार आणेसुद्धां लागत नाहींत. त्याचप्रमाणें बिकट मार्गांतील, वेळेनुसार जीव धोक्यांत घालूनहि केलेले बोजेवाल्यांचे कष्ट पाहून त्यांस आपण जे आठ बारा आणे प्रमाणें दिवसास देतों ते कांहींच नाहीं असें आपणांस वाटत असतें. अशा स्थितींत स्वार्थानें लोभ उत्पन्न होऊन लबाडी करण्याची इच्छा होण्यास अवकाशच राहिलेला नसतो. ह्या व्यवहाराशिवाय तिकडे दुसरा कसलाच व्यवहार करावयाचा नसतो, म्हणून

बुद्धींत खोडसाळपण उत्पन्न होत नाहीं; ती सरळपणें व उदारपणें चालते. ही सरळपणाची संवय कशी असते ह्याचे धडे प्रत्यहीं गिरविले जातात. कठिण, दुर्घट मार्गांतून चढता उतरतांना घडोघडीं काळजाचें पाणी होत असतें. अशा वेळीं मनाच्या एकाग्रतेची बिनचूक शिकवण मिळून तो अभ्यास एकाग्रतेंतच होत असल्यामुळें पक्का होतो.

चारहि धामाजवळ, पवाली, तुंगनाथ, वसुधारा वा सतोपथ येथील चढउतार करतांना आपण हतबल होऊन जातों. कोणासहि जिवापेक्षां अधिक प्रिय असें जगतांत कांहींहि नसतें, म्हणून त्यास प्रत्येकजण अतिशय जपत असतो; त्याची पराकाष्ठेची काळजी वहात असतो. आणि इतकेंहि करून न जाणों तो एखाद्या घातुक प्रसंगांत अवचित सांपडेल कीं काय म्हणून भीत असतो. अशा वेळीं ईश्वराचा आधार घेतल्याशिवाय गतीच कोठें असते ? जेथें आत्मबल खचतें, इतरांची मदत होऊंच शकत नाहीं, तर्कबुद्धि स्तंभित होऊन जाते, कडेलोट वा प्रवाहपतनरूपीं मृत्यूचा जबडा आ वासून पुढें उभा असलेला दिसत असतो, तेथें मनास धीर देण्यास, शरीरास अवसान चढण्यास परमेश्वरी प्रेरणेशिवाय अन्य कांहींहि नाहीं. अशाच वेळीं अनुभवात्मक बोध ठसून बिंबतो. परमेश्वरविषयक निष्ठा दृढावत जाण्यास हे प्रसंग चांगलाच हातभार लावतात. त्याजबरोबर आपल्या बलाबलाचा आवांका मापला जाऊन आपलें पंगुत्व कळून येतें. तेथेंच मीपणाचा ताठरपणा, कर्तृत्वाची ऐट, शहाणपणाची घमेंड, जिरून जाते. अशा अनुभवात्मक शिक्षणानें माणूस परमेश्वराचे ठिकाणीं लीन होतो. तसाच तो विनीत म्हणजे सुविचारशीलहि होतो. त्यामुळें त्याचें चित्त शान्त व समाधानी राहण्याचा त्यास अभ्यास घडूं लागतो. एवंच यात्रेस निघाल्यापासून परत येईपर्यंत शारीर व मानसतपाचा अभ्यास ह्या प्रकारें सारखा व आपोआप घडत असतो.

## अनासक्तियोग

मनास वैराग्याच्या शिकवणीचा ओनामा तर यात्रेस निघण्याच्या प्रस्थानाबरोबरच मिळतो. यात्रेस जाऊन निर्विघ्न परत येणें म्हणजे पुनर्जन्मच आहे असें निदान निघतांना तरी वाटत असतें. त्यामुळें आपण कदाचित् परत न आलों तर आपल्यामागें कुटुंबास त्रास होऊं

नये म्हणून देण्याघेण्याची सर्व निरवानिरव करून स्वस्थचित्त होऊनच माणूस घरांतून पाय बाहेर काढतो. मुलेंमाणसें, घरदार, चीजवस्तु, व्यापारटापार वगैरेंवरची आसक्ति स्वेच्छेनें सोडून देतो. हा वैराग्याच्या अभ्यासाचा पहिला पाठ. माणसाच्या दैनंदिन वागणुकीत त्यानें आपल्या गरजा शतशः वाढविलेल्या असतात. त्यांतील धूम्रपान चहापानासारखीं व्यसनें, नाटक–सिनेमासारखीं करमणुकीचीं साधनें, पोषाखांच्या व कपड्यांच्या नाना तऱ्हा, तसेंच अन्य चोचले, चुरचुरीत, चमचमीत व गोडधोड खाद्यांचे प्रकार, हे व आणखीहि असले वरेच अनवश्यक प्रकार आहेत, त्यांशिवाय घटकाभरहि त्याचें चालत नाहीं. ज्यांत आपला कोणताच स्वार्थ, ऐहिक वा पारमार्थिक, साधणार नाहीं असलें नीरस व थिल्लर वाङ्मय वाचल्याशिवाय ज्यांचें ज्ञानोपार्जन नाहीं, असल्या सर्व संवयी देवदर्शनेच्छू सोडून देण्यास तयार होतो; इतकेंच नव्हे तर प्रवासांत असतांना त्याची ठाम समजूत होऊन जाते कीं, आपण आतां कांहींहि केलें तरी त्या वस्तु आपणांस ह्या प्रांतीं मिळणें अशक्य आहे. एकदां त्याची अशी समजूत झाली म्हणजे पुढें पुढें तो त्यांची आठवणहि विसरून जातो. हा वैराग्याचा दुसरा धडा. याप्रमाणें जन्माचा परिवार–ज्याच्यांत अहोरात्र रमलेले असावयाचे, जे व्यवसाय, ज्या संवयी स्वभावच होऊन गेलेल्या असावयाच्या–त्या सर्व सुखानें व शान्त चित्तानें (म्हणजे तळमळीनें नव्हे) दूर करीत करीत विसरूं लागावयाच्या. ह्यापेक्षां वैराग्याचा अभ्यास आणखी कोणता असणार आहे ? हें वैराग्य हटयोगानें इंद्रियदमन करून किंवा विषय मारून टाकून केलेलें नव्हे, तर तें चित्तास दुसऱ्या मोठ्या आकर्षणांत गुंतवून झालेलें असतें. एवढ्या विस्तारावरून हें कळून येईल कीं, तीर्थयात्रांचें महत्त्व शारीर व मानसतपाचरणांत आहे.

### संस्कारक्षम मनाची सिद्धि

हिमालयांतील यात्रा ही एक व्यवहारी शिक्षणाची शाळा आहे. तेथें नुसतें एकेरी बौद्धिकच तेवढें शिक्षण दिलें जात नसून त्या शिक्षणाच्या प्रात्यक्षिक भागाचेंहि शिक्षण दिलें जातें. एवढेंच नव्हें तर वळण गिरवून अक्षर घटवावें, किंवा कुस्तींत डाव घटवावे त्याप्रमाणें विषय आत्मसात् करण्याचा अभ्यासहि त्यांत तेथल्या तेथेंच आहे.

मन कमावणें म्हणजे मनोनिग्रह, त्याची एकाग्रता, त्याची शान्ति, त्याची सुविनीतता व त्याची परमेश्वराच्या ठिकाणीं अनन्यनिष्ठा प्राप्त करून घेणें होय. ह्या सर्वांचा लाभ अनायासें ह्या प्रवासांत कसा होतो हें आपण येथवर पाहिलेंच आहे.

श्रीबदरीनारायणदर्शन म्हणजे त्या मूर्तीपुढें उभें राहून तिला पाहवेल तितका वेळ डोळे भरून पाहात राहणें, एवढाच त्याचा संकुचित अर्थ नव्हे. हें दर्शन म्हणजे त्या विश्वंभर मूर्तीचें पूजन आहे. पूजन म्हटलें म्हणजे जसे षोडशोपचार आले तसें हें पूजन म्हणजे यात्रेस निघून परत येईपर्यंतचे तत्संबंधींचे सर्व व्यवहार हे पूजोपचारच आहेत. अशी दृढ भावना धरून चाललें तरच तें पूजन यथा सांग झालें असें म्हणतां येईल.

सद्भावे साधुभावेच सदित्येतत्प्रयुज्यते ।
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ।

तिकडील प्रवासांत कायिक व मानसिक तपानें मन तिंबलेल्या कणकेप्रमाणें लुबलुबीत व संस्कारक्षम आपोआप होत असतें, म्हणून तेथील वातावरणांत भरून राहिलेल्या सद्विचारभावतरंगांचे ठसे त्या मनावर कायमचे उमटतात. असलें कमावलेलें मन म्हणजे तो एक जणूं रेडिओ सेटच आहे; व तो तेथील वातावरणांतील विचारस्पंदन किंवा लहरी घेण्यायोग्य लावलेला आहे.

### साक्षात्कारी देवदर्शन

हिमालय ही एक पुण्यभूमि आहे. तेथें देवदेवतांचें सान्निध्य आहे. गंगा-यमुनादि सप्तसिंधूंचें अक्षय्य वास्तव्य आहे. ती एक तपोभूमि आहे. तेथें आजपर्यंत नरनारायण, वसिष्ठ, वामदेव, नारद वगैरेंसारख्या ऋषीमुनींनीं तप करून ती भूमि पवित्र करून ठेवली आहे. संत, महंत, साधुपुरुषांनीं त्या पावित्र्यांत भर टाकिली आहे. अशा त्या भारलेल्या क्षेत्रांतील विचारलहरी त्या कमावलेल्या मनावर सहज उमटतात. त्याचें प्रत्यंतर म्हणजे श्रीवेदव्यासांना भागवत लिहिण्यास, आद्य शंकराचार्यांस प्रस्थानत्रयीवरील भाष्य लिहिण्यास, श्रीसमर्थ रामदासस्वामींस प्रेरणा मिळण्यास, आणि स्वामी रामतीर्थ व विवेकानंद ह्यांस धर्मप्रसार करण्याचे कार्यास तेथेंच स्फूर्ति मिळाली

अशा त्या पवित्र वातावरणांत व संशुद्ध भावनेच्या भरांत साक्षात्कारांचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाहीं हा अनेकांचा अनुभव आहे. हा अनुभव एकानें दुसऱ्यास सांगून पटवितां येण्यासारखा नाहीं. तो स्वसंवेद्यच असतो. ज्याची त्यानें खटपट केली पाहिजे. परमेश्वर कांहीं आपला नोकर नाहीं कीं आपण त्यास हांक मारिली कीं, धांवत येऊन तो पुढें उभा राहील. पण आपण जर त्याचे संशुद्ध मनानें, अनन्य भक्त असलों, तर 'मागें पुढें उभा तू सर्वकाळीं । राहोनी सांभाळिशी ऐन वेळीं ।। ' असा तो पाठीशीं सदा उभा आहे.

हिमालयांत चारहि धामांच्या ठिकाणचें वातावरण निसर्गरम्य तर आहेच, पण त्याच बरोबर तें शुद्ध, पवित्र, शांत, उत्साहवर्धक व मनाला अक्षय्य प्रसन्न ठेवणारें आहे. आणि म्हणूनच ती खरी तपोभूमि होऊन राहिली आहे. त्या तपोभूमीचा यात्रिकांनीं अधिकांत अधिक लाभ करून घेण्यास चुकूं नये. त्याकरितां त्या वातावरणांत नित्य नियमानें कांहीं तरी पुरश्चरण, जप, जाप्य, भजनपूजन, मनन, चिंतन, पठनादि अवश्यमेव करावें. तदाकारवृत्ति वनविण्याचे अभ्यासास ती तपोभूमी सर्वस्वी योग्य साधनानुकूल आहे. यात्रेला निघण्यापूर्वींच असल्या प्रकारच्या अभ्यासाची संवय लावून घेतलेली असावी. इतकेंच नव्हे तर तें एक व्रत म्हणून घेतलेलें असावें. व्रत म्हणजे ती एक प्रतिज्ञाच असते. कोणत्याहि कारणानें वा परिस्थितींत ती मोडता येत नाहीं.

'देह जावो अथवा राहो । आमुचा पांडुरंगीं भावो । '

जप, मंत्र, तंत्र, योग ह्यांच्या सिद्धि त्या तपोभूमींत सहज सुलभ आहेत. 'अभीष्टार्थ देईल ही भूमी वेगें' असा तिचा महिमाच आहे. व्रतपरिपालनानेंच खरें देव–दर्शन होत असतें. देव–दर्शन घेण्यास आवश्यक असलेला 'चष्मा' (दृष्टि) कोणांतहि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य व्रतपरिपालनांत असतें.

साध्यासुध्या गोष्टीसुद्धां नेहमींच्या दृष्टीला दिसत नाहींत अशा स्थितींत इष्टदेवतेचें दर्शन तिनें दिलें तरी ( ती अक्षय्य दर्शनास मोकळीच असते. ती केव्हांहि लपून बसलेली नसते ) कसें होणार ? म्हणून नेहमींची दृष्टि त्या देवतेला पाहण्यायोग्य करण्यासाठीं व्रतांचें

तपाचरण आवश्यक असतें. अशा प्रकारची दृष्टि साक्षात् भगवंताच्या प्रसादानें–उपदेशानें–शिकवणीनें अर्जुनास प्राप्त झालेली होती तेव्हांच त्याला विश्वरूप–दर्शन घेतां आलें.

'न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥'

असल्या अभ्यासानें देवता–दर्शन व्हावयाचें असेल तेव्हां होतच असतें. पण तत्पूर्वींच सद्यःफलदायी म्हणून त्याचा एक लाभ अनायासें पदरांत पडतो. तो असा कीं, क्षुल्लक कारणांनीं वाटणारी चिंता, हुरहूर आणि तज्जन्य उदासीनपणा व्रतधाऱ्यास शिवत सुद्धां नाहीं. उलट तो शांत चित्त, प्रसन्न व समाधानी वृत्तींत सदा आनंदित असतो. यात्रींनीं एवढी 'दृष्टि' प्राप्त करून घेतली तरी यात्रेचें खरें सुकृत जोडलें असें होईल.

## यात्रेपासून ऐहिक लाभ

बुद्धिवादी किंवा तर्कशास्त्री कांहींहि म्हणोत, त्यांच्या चाळणींतून सांसारिक अनुभव व रहस्येंसुद्धां चाळून निघूं शकत नाहींत. तेथें असले दैवी, मनोमय व ज्याचे त्यासच कळून येणारे अनुभव त्यांस कधींच चाळतां येणार नाहींत.

ऐहिक दृष्टीनें विचार केला तरी असेंच दिसून येतें कीं, माणसाचा एकलकोंडा स्वभाव जाऊन तो मनमिळाऊ होण्यास, संकुचित दृष्टि जाऊन व्यापक दृष्टि येण्यास, त्याच्या ज्ञानास अनुभवाची जोड मिळून शहाणपण शिकण्यास, त्याचप्रमाणें समयसूचकता, प्रसंगावधान, चौकसबुद्धि, बहुश्रुतपणा वगैरे गुण येण्यास प्रवासांतील प्रसंग फार उपयोगी असतात. साहसी वृत्ति, बेडरपणा, धाडस, कृतनिश्चय इत्यादि गुणांची आवड उत्पन्न करून ते अंगीं मुरविण्याचा सराव होण्यास हिमालयांतील यात्रांशिवाय नागरी आयुष्यांतील कोणत्याहि व्यवसायांत दुसरें एखादें सुलभ साधन सापडणार नाहीं.

आधुनिक काळांतील जीवनकलहाच्या व्यक्तिगत व राष्ट्रीय झगड्यांत ह्या गुणांचें केवढें महत्त्व आहे हें पाश्चात्यांनीं अहर्निश अहमहमिकेनें चालविलेल्या प्रत्येक क्षेत्रांतील धडपडीवरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. बहुतेक प्रतिवर्षीं गिर्यारोहणप्रेमी पाश्चा-

त्यांच्या झुंडी हें ना तें, शिखर चढून जाण्यासाठीं आपापल्या राष्ट्राच्या पाठिंब्यानें हिमालयावर स्वारी करीत असतात. हें पाहून तरी, आतां आपण स्वराज्यांत आहोंत ह्या जाणिवेनें असल्या पौरुषी गुणांच्या वृद्धीकरितां यात्रानिमित्तानें का होईना प्रवास केला पाहिजे. व्यक्ति, समाज व शासन–संस्था ह्या सर्वांवरच ह्याचें उत्तरदायित्व आहे. ह्या गुणांनींच राष्ट्राचें भवितव्य उज्ज्वल होणार आहे. हाहि लाभ कांहीं लहान सहान नाहीं.

मला आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते. ती अशी कीं, धांवपळीचा प्रवास करून खरा लाभ होत नाहीं. प्रवास हा अन्नासारखा आहे. अन्न हें घासाघासानेंच खावयाचें असतें. तें कांहीं कोणी एकदम पोटांत भरीत नाहीं. तसें केलें तर त्याचा परिणाम म्हणजे त्याचा एकदम निचरा होतो. म्हणून चर्वण करीत करीत जेवावें, त्याचें पचन होऊन तें अंगांत मुरलें म्हणजे मग पुन: जेवण करावयाचें असतें. त्याचप्रमाणें प्रवास हा अंगीं मुरत मुरत झाला पाहिजे. मन लागेल, म्हणजे प्रसन्नतेनें रमेल, अशा ठिकाणांतून चार दोन दिवस निवास करीत करीत प्रवास केला तर तो अधिक फलदायी होतो. आठ पंधरा दिवसांची सवड व पांचपंचवीस रुपयांचा अधिक व्यय एवढी योजना आधींच करून प्रवासास निघावें. वरचेवर इतक्या लांब उठून जाणें आपल्यासारख्या दूरस्थ महाराष्ट्रीयांस परवडण्यासारखें नाहीं. माझी जी चूक झाली व ज्याबद्दल हळहळ वाटते तशी पाळी इतरांवर येऊं नये म्हणून हें हितगुज करीत आहें.

# कृतज्ञता

हिमालय–दर्शन पुस्तकाचें सर्व वर्णन लिहून हतावेगळें होईपर्यंत मला सारखी टोंचणी वाटत आहे कीं, आपण हें काम करावयास अधिकारी नाहीं. एक तर तसें शिक्षण झालेलें नाहीं, त्याचा व्यासंग नाहीं व सराव तर नाहींच नाहीं. आपण कधीं काळीं आपले प्रवास–वृत्त छापून काढूं अशी कल्पना मनोराज्यांतहि डोकावलेली नव्हती. अर्थात् त्यामुळें प्रत्यक्ष प्रवास करतांना तसें निरीक्षण करून त्याचीं टिपणेंटाचणेंहि केलेली नव्हतीं. ह्या कारणांनीं पुस्तकांत पुष्कळच उणीवा राहिलेल्या असणार ह्याची जाणीव आहे. परंतु प्रवासाचें साहस अंगीं मुरल्यामुळें हाहि एक त्यांतलाच भाग म्हणून प्रयत्न करण्यास धजावलों. त्यांतून वर्णन तरी कशाचें करणार तर गंगा-यमुना नद्यांच्या माहात्म्याचें. हाहि एक त्यांच्या पूजनाचाच प्रकार आहे. प्रत्यहीं स्नानानंतर सहा अर्घ्य–प्रदान असतात. ते म्हणजे गंगा, यमुना व सरस्वती ह्यांचें जल घेऊन त्यांनाच अर्घ्य द्यावयाचे असतात.

ब्रह्मकमंडलोद्भूते गंगे त्रिपथगामिनी ।
त्रैलोक्यवन्दिते देवी गृहाणार्घ्यं नमोऽस्तु ते ।
किरणाधूतपापा च पुण्यतोया सरस्वती ।
गंगा च यमुना चैव गृहाणार्घ्यं नमोऽस्तुते ।

वगैरे. त्या भावनेनें–त्यांच्या गुणकीर्तनानें–त्यांची पूजा करीत आहें. गंगेला माई म्हणजे मातोश्री म्हटल्यानें आम्हांकडे मुलाचें नातें आलेंच. कमी अधिक होऊन चुका होणें हा तर मुलांचा स्वभावच आणि तो मातोश्रींजवळ क्षम्य असणें हाहि त्यांचा स्वभावच.

अजाण मी लेंकरूं तुजकडे जननीचें नातें ।
तव सेवेचा देवी ओढा असे मात्र माते ।
चुकले मुकले शब्द मुलांचे गोडचि जननीतें ।
बालिश लीला बघुनी तीच्या मनीं हर्ष दाटे ।

वास्तविक ह्या प्रयत्नांत माझें असें कांहींच नाहीं. माहात्म्य त्याचेंच स्फूर्ति देणाऱ्याहि त्याच, म्हणून कृतज्ञतेनें मातोश्रींचे कितीहि आभार मानले तरी ते अपुरेच.

मूकं करोति वाचालम् । पङ्गून्लंघयते गिरीम् ।
यत्कृपातमहं वन्दे । परमानंद माधवम् ।

माझा असा समज आहे कीं, ज्या कोणी हा श्लोक केला त्यानें माझें चित्रच डोळ्यांपुढें ठेवून त्याची रचना केली असावी. कारण त्यांत वर्णिलेले दोष अक्षरशः मला लागू पडतात, एवढेंच नव्हें तर कृपाप्रसादहि तसाच सर्वशः अनुभवास येत आहे.

एका पायाचा गुडघा खेळांत मुरगळल्यामुळें तो पाय जन्माचा अधू व दुखरा होऊन बसला आहे व दुसऱ्या पायाचें पाऊल हाडव्या-व्रणामुळें वहातें व त्यावर दोन चार वेळच्या शस्त्रक्रियेनें तेंहि अधू होऊन बसलेलें. अशी स्थिति गेल्या पसतीस वर्षे आहे. पण सांगाव-याचें आश्चर्य असें कीं, गेल्या सोळा सतरा वर्षांत हिमालयांतील घडलेल्या सुमारें तेराशें मैलांवरील पायी प्रवासांत एकहि दिवस पंगुत्व आडवें आलें नाहीं. घरीं असतांना तें वारंवार अडवून धरत असतें. 'पंगुन्लंघयते गिरीम्' इतकेंच नसून उल्लंघयते गिरीम् म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. आणि गिरी म्हणजे तोहि एखादा सामान्य नाहीं. तो तर गिरीणाम् गिरिराजच असा एकमेव हिमा-लय. तो ओलांडून जाण्याचें सामर्थ्य परमेश्वरीकृपेशिवाय कोणाचें असणार आहे ?

यात्रेला जाऊन येण्यापूर्वीं चार चौघांत तोंड उघडण्याचा धीर होत नसे. एकदां प्रयत्न केला होता, पण तोंड कोरडें पडलें, छातींत दम भरून आल्यासारखें झालें, पाय कापूं लागले व काय बोलावें हें सुचेचना. पण बदरीकेदार, बदरीनारायणाचें दर्शन झाल्यानंतर मला तोंड फुटलें आहे असें वाटतें. अशा प्रकारें त्यांची कृपा असल्याचा अनुभव येत आहे.

ह्याशिवाय त्यांची कृपा नाहीं कशांत ? असेंच म्हणण्याची पाळी आहे. संतति, संपत्ति, आयुरारोग्य, पात्रतेपेक्षां अधिक आहे असें घडोघडीं प्रत्ययास येत आहे. यात्रेनंतर चित्ताला शांति आणि समा-धानाचा मार्ग सांपडल्यामुळें कशाचीच काळजी वा चिंता पहिल्या-प्रमाणें सतावीत नाहींत. माणसाच्या मागें हात धुऊन लागलेल्या एषणाहि जिरून जाऊन सुप्त वा मृतावस्थेस पोहोंचल्या आहेत.

वयाच्या पंधराव्या वर्षापावेतों उनाड उडाणटप्पू मुलांचा सहवास होता. पण त्याची कृपा अशी कीं, त्यांच्या सहवासांत वाहून जाण्याची बुद्धि झाली नाहीं. पुढें मिळत गेली ती चांगल्यांची संगति सुटली नाहीं.

वयमानानें स्मृति मंदावत चाललेली असतांना सोळा वर्षांपूर्वींचे यात्राप्रसंग व तेथील दृश्यें आजहि डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभीं असल्यासारखीं दिसावीं याचें माझें मलाच आश्चर्य वाटत आहे. पण त्याचीच कृपा असली म्हणजे सर्वच आश्चर्य.

त्याच्या कृपेची एक अगदीं प्रस्तुत प्रकरणीं घडून आलेली गोष्ट सांगण्याचा मोह आवरत नाहीं. 'एकता' मासिकांत लेख देतेवेळीं त्यांना एक अट घालावी कीं, आमच्या लेखाच्या दर अंकांतील पांचशें प्रती निराळ्या छापून विनामूल्य त्यांनीं आम्हांस द्याव्या. हेतू असा कीं तेवढीं पुस्तकें अनायास विनामूल्य तयार होतील. ह्यावेळीं चिरंजीवांनीं विरोध करून म्हटलें कीं, 'तुम्ही आपल्या कर्तृत्वानें एवढा मोठा अद्ययावत् सुधारलेल्या यंत्रसामुग्रीचा छापखाना उभा केला, तसेच ठसे ( झिंको ब्लॉक्स ) करण्याची यंत्रसामुग्री घेतली आणि हा सर्व कारखाना आमचे सर्वस्वीं स्वाधीन केला. स्वतःच्या बलावर हिमालयांतील अवघडांतील अवघड अशी कैलास–मानसादि यात्राहि केल्या, स्वतः छायाचित्रें घेतलीं, स्वतःच प्रवासवृत्त लिहिलें; एवढें सर्व स्वावलंबन डोळ्यापुढें धादांत पाहात असतांना, घरचाच छापखाना, व ठसे करण्याची घरचीच सोय हाताशीं असतांना पुस्तकाच्या छपाईचें काम तेवढें तरी परावलंबी करून घेणें आम्हास कमीपणाचें वाटतें. तें काम आम्ही करूं. तुम्हास त्याची काळजी नको.' सन १९५१ ह्या वर्षीं म्हणजे सद्यःकालांत, स्वातंत्र्याच्या स्वैर कल्पनेच्या भरांत, मुलांनीं कृतज्ञतेनें आपल्या वडिलांविषयीं अशा प्रकारें सादर भावना प्रकट करावी इतकेंच नव्हे तर उद्‌गार लगोलग कृतींत आणून दाखवावे ह्यापेक्षां प्रापंचिक दृष्टीनें महद्भाग्य लाभण्याची अधिक मोठी कोणती परमेश्वरीं कृपा असणार आहे ?

स ब्रह्मः स शिवः स हरिः सेन्द्रः सोक्षरः परमस्वराट् अशी श्रुती आहे. बदरी केदार काय किंवा बदरी विशाल काय एकच. त्यांची कृपा असल्यावर काय कमी आहे. महद्भाग्याचें सर्वच अपूर्व योग

अनुभवास आले व येत आहेत. त्याकरितां त्यांची कशी स्तुती करावी हेंच कळत नाहीं.

काय म्या पामरें। बोलावीं उत्तरें। परि त्या विश्वंभरें बोलविलें।

लंगडा तरी चढुनी आलों पर्वतीं।
अनभ्यस्त तरी गातो तुझी कीर्ति।
ही तुझीच कृपा आम्हांवरती।
अशीच राहो निरंतर।

तुजला स्तविता हात टेकिले जेथें वेदांनीं।
कशी टिकावी तेथें वाणी मम बापुडवाणी।
इत्येषां वाङमयी पूजा। श्रीमच्छंकर पादयोः।
अर्पिता तेन देवेश। प्रीयतां मे सदाशिवः।

परमेश्वराविषयीं कृतज्ञता प्रकट केल्यानंतर वाचकवर्गाचे प्रथम आभार मानणें आवश्यक आहे. योगायोग असा आहे कीं, पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वींच वाचकांनीं गुणग्रहण करून पुस्तक प्रसिद्ध करण्यास प्रोत्साहन दिलें आहे. त्यांना एवढीच विनंती करावयाची कीं,

चुकलें मुकलें सोडुनी द्यावें।
न्यूनाधिक झालें मानुनी घ्यावें।
सार मात्र तें ग्रहण करावें।
हंसक्षीर विवेकें॥

पुस्तक लिहिण्याचे कामीं कोणाचें विशेष साहाय्य झालें असें सांगतां येत नसलें तरी माझी जुनी झालेली माहिती पडताळून पाहण्यासाठीं व मला नसलेली घेण्यासाठीं ( पंच केदार, पंच बदरी, सतोपथ ) ‘ तपोभूमि बदरिकाश्रम ’ लेखक गोविंदप्रसाद नौटियाल ह्यांच्या पुस्तकाचा उपयोग केला आहे. ‘ कुमाऊनचा इतिहास ’ लेखक बदरीदत्त पांडे ह्या पुस्तकाचा उपयोग जोशीमठ व पांडुकेश्वर येथील माहिती देण्याचे कामी झालेला आहे. वैदिक माहितीचे कामीं श्री. काशीकर, सोनटक्के, व पौराणिक माहितीचे कामीं श्री. गुर्जरशास्त्री ह्यांचें कोठें कोठें साहाय्य झालेलें आहे. ह्या सर्वांचा मी आभारी आहें.

छापखान्यांतील मंडळी हे तर मी आपलें भाग्यच समजतों. त्यांतील घरची मंडळी व हंगामी मंडळी ह्याविषयीं बोलण्याचें कारणच

नसलें तरी त्यांना धन्यवाद देणें प्राप्तच आहे. छापखान्याच्या जन्मापासून माझ्या पायांत पाय बांधून आत्मीयतेनें काम करणारें श्री. नामदेवराव करपे ह्यांचा साभिमान उल्लेख करणें अवश्य आहे. खिळे जुळणीचे कामीं छापखान्यास त्यांचें सर्वस्वीं साहाय्य असते.

ज्यांनीं ज्यांनीं मला प्रत्यक्ष शिक्षण दिलें आणि ज्यांच्या ज्यांच्या कडून अप्रत्यक्षपणें मला बोध घेतां आला ते सर्व माझे ज्ञानदाते होत. त्या सर्व गुरुजींच्या पुण्यस्मृतिला मी आदरपूर्वक अभिवादन करितो.

जसे प्रथम कृतज्ञता दाखवावयाची म्हणजे माझ्या मातामही-विषयीं—कारण यात्रा करण्याचा बीजांकुर त्यांच्यामुळेंच रुजला—तसेंच शेवटीं कृतज्ञता दाखवावयाची म्हणजे त्यांच्याच सूनबाई—अर्थात माझ्या मामी कै. गं. भा. पार्वती मामी गोखले, त्यांनींच तो अंकुर संवर्धन करून त्यास योग्य वेळीं फळ धरण्यास सर्वस्वीं साहाय्य केलें. ह्यांविषयीं त्यांचे दोन वर्षांपूर्वीं पावेतों आमच्यावर मातृवत् छत्र होतें. थोडक्यांत कल्पना द्यावयाची म्हणजे त्यांचें साहाय्य नसतें तर आमच्या हातून ह्या जन्मीं हिमालयांतील एकहि यात्रा घडण्याचा योग आला नसता. ह्या चारहि यात्रांचें सर्व श्रेय त्यांनाच आहे.

वाडवडिलांच्या शुभाशिर्वादें ।
संतसज्जनाच्या कृपाप्रसादें ।
आप्तेष्टमित्रांच्या धन्यवादें ।
सिध्दीस गेला यात्रासंकल्प ।

# हिमालयदर्शन

## परिशिष्टें

स. ग्रं.

# परिशिष्ट १

## उपयुक्त सूचना

यात्रेला निघण्यापूर्वीं यात्रास्थानें, अनुषंगानें सहज पाहतां येण्यासारखीं उप-स्थानें व सर्वांचे मार्ग ह्याविषयींची सविस्तर माहिती मिळविणें आवश्यक असतें. ती पुस्तकावरून, तशीच जाऊन आलेल्या लोकांच्या गांठीभेटी घेऊन मिळते. आपणा महाराष्ट्रीयांस हिमालय फारच दूर पडतो; पुन्हां पुन्हां तिकडे जाणें परवडत नाहीं. शिवाय तिकडील प्रवास अतिशय कष्टाचा, पैशाचा व काळ लागणारा आहे, म्हणून एकाच खेपेंत पदरीं पाडून घेतां येईल तितका दर्शन-लाभ करून घ्यावा. अगोदर कळलें नाहीं, आयत्या वेळीं सवड राहिली नाहीं, विसरून गेलों अशीं कारणें घडून पश्चात्तापाची पाळी, आमच्यावर आली होती तशी, येऊं देऊं नये.

यात्रेचीं स्थानें, त्यांचा मार्ग, त्यास द्यावयाचा काळ व त्याकरितां करावयाचा व्यय ह्याचें निश्चित योजनापत्रक करावें.

ह्या यात्रेंत आपल्याबरोबर 'तुमच्या संगतीनें आम्हीहि येतों' अशांचा घोळका जमवूं नये. दोहो-तिहीपेक्षां अधिक माणसें झालीं तर विनाकारण घोटाळा होऊन अडचण वाटूं लागते. सगळ्यांचे स्वभाव, राहणी, आवडी, हेतू सारखे नसतात. त्याकारणानें संकोच व भीड उत्पन्न होऊन आपलें स्वातंत्र्य तर जातेंच पण इतके पैसे, काळ व कष्ट ह्यांचा व्यय करूनहि इच्छा व हेतु यांस मुरडी घालणें प्राप्त होतें. सांगातींची अडचण पडत नाहीं. भेटेल तो यात्री निकटचा सांगाती होतो. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्,' प्रत्यही नवे नवे सांगाती नाहींतर एकच एक राखतां येतो.

हा प्रवास धांवपळीचा करूं नये. त्याकरितां उचलून पुढें पडलेलें प्रत्येक पाऊल ईश्वर-दर्शनार्थ म्हणजे यात्रा प्रीत्यर्थच असतें. हा प्रवास अन्नासारखा चर्वण करीत करीतच केला म्हणजे सुफलदायी होतो. मन प्रसन्नतेनें रमेल अशा ठिकाणीं चार दोन दिवस वास करीत करीत प्रवास केला तर ईश्वर-दर्शन व तपश्चर्या झाली असेल तर साक्षा-

त्कार ग्रहण करण्यास मन संस्कारक्षम होईल. आठ पंधरा दिवसांची अधिक सवड व पांच पंचवीस रुपयांचा अधिक व्यय एवढी खूण-गांठ हृदयाशीं बाळगावी.

प्रकृति निकोप असावी हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. तथापि 'रक्त–दाब', हृदय, व फुप्फुस–विकार नसावे. निघण्यापूर्वी 'कॉलरा इंजेक्शन' वा 'कॉलरा पिल्स' घेऊन मग निघावें.

हृषिकेश येथें काळी कमळीवाले ह्यांचे संस्थेस भेट द्यावी म्हणजे त्यांजकडून बरोबर लागणारी औषधी, प्रवासांतील सूचना व जाग-जागच्या धर्मशाळांच्या चौकीदारास तेथें जागा देण्यास आज्ञापत्र मिळतें. आम्हांस त्याचा चांगलाच उपयोग झाला. बऱ्याच ठिकाणीं आम्हांस स्वतंत्र खोल्या मिळाल्या. आपण बरोबर घेतलेले पैशाची जोखीम संभाळीत बसण्यापेक्षां थोडे जवळ ठेवून बाकीचे काळी कमळीवाले ह्यांचे पेढीवर ठेवावे, व पुढें वाटेंत आपणास कोठें कोठें लागतील त्या त्या ठिकाणीं तितके तितके मिळण्याविषयीं त्यांस सांगावें, म्हणजे तशी त्यांजकडून चोख व्यवस्था होते. किंवा ते जवळ बाळगावयाचेच असतील तर ते कशांत घालून तो अक्षय्य कमरेस बांधून ठेवावा. नेहमीं दहा पांच रुपयांची मोड जवळ बाळगावी. लहान चट्टयांवरून दहा रुपयाची नोटसुद्धां मोडली जात नाहीं.

तिकडे सर्वांत मोठया गैरसोयी दोन. बहिर्विधीस अडोशाची जागा मिळत नाहीं. कोठें कोठें जागा राखून ठेवलेल्या आहेत, पण तेथेंहि आडोसा नसतोच. ह्याकरितां तो विधि पहाटे किंवा अस्तमानानंतर करून घ्यावा. अंधार पडला म्हणजे सगळाच आडोसा. दुसरी गैरसोय श्मश्रूची. एकटया बुढाकेदार येथेंच तेवढें मला न्हावी मिळाला.

पिण्याच्या पाण्यासंबंधानें कितीहि काळजी घेतली तरी ती अधिक घेतलीसें होणार नाहीं. तिकडील सर्व नद्यांचें पाणी अभ्रक व लोह-मिश्रित असतें. तें पचनास जड असून आंतडयास अपायकारक होतें. तें कधींहि पिऊं नये. पिणेंच झालें तर उकळी आणून गार करून प्यावें. वाटेंत झरने किंवा स्वच्छ पाण्याच्या धारा जागजागीं लागतात, त्यांचें पाणी पिण्यास अडचण नाहीं, पण त्यांत ॲटिमिडीनसारखें जंतुघ्न औषध घालून तें प्यावें.

प्रत्यही स्नान केल्यावांचून राहूं नये. कितीहि थंडी असली तरी तें करावेंच. फार तर पाणी तापवून करावें. त्या हवेंत श्रमानें घाम येतो व अंगावर उवा पडतात.

आहार हलका व अल्प असावा. गव्हाचा पदार्थ पचण्यास जड जातो. त्यामुळेंच पोटदुखी व शौचाचे विकार जडतात. ह्याकरितां भातावर भागवितां येईल तेवढें भागवावें. तूप दूध जोडीला घ्यावें. थोडें वजन घटलें तरी तो कांहीं अपाय नाहीं, परत आल्यानंतर महिन्याभरांत भरून येतें. पण अपचनामुळें विकार उत्पन्न झाला तर महिनोन् महिने वेदना देत बसण्याची पाळी येतें.

प्रवास उन्हापूर्वी जितका करून घेतां येईल तितका करून घ्यावा. हिमालयांत आपल्या इकडील पेक्षां फारच लवकर उजाडतें. पहाटे चार वाजल्यापासून वाटा चांगल्या दिसूं लागून यात्रींचा राबता-वर्दळ सुरू होते. इतक्या लवकर ओझेवाले निघण्यास संमत नसतात. ते सकाळींच भात करून जेऊन निघतात. आपले बोजे बांधून निर्धोक त्यांचे स्वाधीन करून आपण चालूं लागावें.

उन्ह पडल्यानंतर वाटेंत प्रथम जेथें चांगलें वाहतें विपुल पाणी लागेल तेथें राहिला असल्यास प्रातर्विधि, स्नानसंध्यादि अन्हिक, कपडे धुणें व वाळविणें करावें. त्याच वेळीं फराळ करून घ्यावा. अनशेपोटीं फार चाल केली तर गलबलावयास लागतें. प्रत्यही ७–८ तास वाटचालींत जातात. दहा वाजण्याचे सुमारास एखादी सोयीस्कर चट्टी लागेल तेथें थांबावें. थोडा वेळ स्वस्थ विश्रांति घेऊन पाकसिद्धि करून भोजन उरकावें. पुन्हां विश्रांति व टांचणटिपण, गप्पागोष्टी करून तीन चार मैलांत निवासायोग्य चट्टी, धर्मशाळा वा दुकान मिळण्यासारखें असल्यास पुढे जावें. हिमालयांत जसें लवकर उजाडतें तसें तेथें उशीरा मावळतें. आठ वाजेपर्यंत सुद्धां वाटा चांगल्या दिसतात. दोन वेळीं प्रवास करण्यापेक्षां तो एकाच टप्प्यांत केलेला अधिक सोयीस्कर. संध्याकाळीं थोडें रिकामपण मिळून आस-पास फेरफटका करून माहितीहि मिळवितां येते. अस्तमानाचे सुमारास पाणी लागेल तेथें संध्यावंदनादि पाठ उरकावें. जेवण उशीरां झाल्याकारणानें संध्याकाळीं खाण्याची आवश्यकता राहात नाहीं.

अंधार पडला कीं दुसरा उद्योग कांहींच नसतो. दिवसाच्या वाटचालीनें पाठ जमिनीस लागण्याचा अवकाश, कीं झोंप ठेवलेलीच. गाढ व स्वस्थ झोंप होऊन दोन वाजतांच जाग येते. सर्व शिणवा जाऊन पूर्ववत् तरतरी व उत्साह वाटूं लागतो. जाग आल्याबरोबर उठून प्रातर्विधि उरकून बांधाबांध करून निघण्याच्या विचारास लागावें.

चालतांना उन्ह फार लागतें, घाम येत असतो, व शोषहि पडतो. तो कांहीं खरी तहान नसते. म्हणून तो जर एकदा मारला तर सुखावह होतें. नाहींतर कितीहि पाणी प्यायलें तर आणखी आणखी प्यावेंसें वाटतच असतें. त्याकरितां सैनिकांच्या गळ्यांत असते तसली 'वॉटर–बॉटल' जवळ ठेवावी. उन्हाकरितां छत्री घेणें गैरसोयीचें होतें. एक हात काठीस गुंतलेला असतो व दुसरा छत्रीस गुंतला म्हणजे तोंडावरची माशीसुद्धां हाकतां येत नाहीं. त्या तर माणसाचा सारखा पिच्छा पुरवीत असतात. त्याकरितां डोक्यावर पंचा किंवा एखादा धडपा वेळेनुसार ओला करून घेणें सुखावह होतें. पुढें येणाऱ्या मोठ्या पट्टीची घडी होईल अशी बोअर हॅट ह्या कामीं फार उपयोगी आहे. त्याचप्रमाणें अतिशय पातळ जाळीदार कापडाचा एक चौकोनी रुमाल, डोक्यावरून टाकला कीं तो खांद्यांपर्यंत यावा, असा घेतला म्हणजे माशांचा उपद्रव होणार नाहीं.

गळ्यांत अडकविण्यासाठीं बरोबर एक पिशवी घ्यावी. वाटेंत वेळेनुसार लागणाऱ्या जिनसा त्यांत ठेवता येतात. उदाहरणार्थ, सकाळच्या न्याहारीचा डबा, अंघोळीच्या वेळचे कपडे, स्मेलिंग साल्टची बाटली, असल्यास कॅमेरा, नोंदवही, भांडें, टार्च, लवंग–सुपारी, चाकू, बिब्बा, आयडीन. उतरावयाच्या ठिकाणीं दूध मिळेलच असा भरंवसा नसतो. जातांना तें कोठेंहि मिळालें तर घेण्याची सोय असावी. म्हणून दुधाकरितां एक घट्ट बुचाची बाटली.

पाऊस अंगावर घेऊन कधींच निघूं नये. वाटेंत आलाच तर त्याकरितां मेण कापडी तुकडा किंवा घोंगडी जवळ बाळगावी. ज्यांना परवडणार असेल त्यांनीं एक बोजेवाला असा करावा कीं, त्यानें नेहमीं आपल्याबरोबरच चाललें पाहिजे. त्याचे जवळ वीस

शेरापेक्षां अधिक बोजा द्यावयाचा नाहीं. आपण सांगूं तें सर्व काम त्यानें करावयाचें. म्हणजे पाणी आणणें, भांडीं घासणें, कपडे धुणें, जागा स्वच्छ करणें. सकाळीं चालीस निघावें तेव्हां थंडी असते. पण जरा चाल झाली कीं ऊन्न येते. उन्ह पडलें कीं घाम फुटून थंडीच्या वेळीं गोड वाटणारे उबदार कपडे नकोसे होतात. तें अंगावर असतात तेव्हां त्यांचें ओझें वाटत नाहीं, पण ते हातांत घेऊन चालावयाचे म्हणज ओझें वाटतें. त्याचप्रमाणें पिशवी, 'वॉटरबॉटल' गळ्यांत अडकवून चालणें जड वाटत असतें. अशा वेळीं गडी बरोबरच असला तर त्याचेजवळ ते देता येतात.

सकाळचे वेळीं वस्तीस पोहोंचल्यावर स्वयंपाक सुरू करितां येईल अशीं चार भांडीं व बदलावयाचे कपडे आणि सायंकाळचे वेळीं, त्या ऐवजीं हंतरुण पांघरुण, वगैरे त्या त्या वेळीं लागणाऱ्या वस्तु त्याचे जवळ दिल्या म्हणजे सामानाकरितां खोटी व गैरसोय मुळींच होत नाहीं. उतरण्याचे ठिकाणीं बोजेवाल्यास येऊन पोहोंचण्यास आपल्यापेक्षां तास दोन तास उशीर होत असतो. दोघातिघांत मिळून असा एक बोजेवाला केल्यास परवडण्याचा प्रश्न तितका जड वाटणार नाहीं. बरोबरच्या गड्याजवळचे सामानांत एक कांबळें, तरट वा सतरंजी दिलेली असावी म्हणजे वाटेंत कोठेंहि थोडा वेळ विश्रांति घेण्याची आवश्यकता वाटल्यास बसण्याची सोय होते. पाण्याचा फिरकीचा तांब्या अक्षय्य भरलेला बरोबर ठेवण्याची सोय होते. वाटेंत वहातें स्वच्छ पाणी लागलें कीं जुने ओतून टाकून नवे भरून घेण्यांची वहिवाट ठेवावी. तांब्या घेतला असतां 'वॉटर–बॉटल' घेण्याची आवश्यकता नाहीं.

इतक्या सोयी झाल्यानंतर चालण्याचे श्रम सोसणें जड जात नाहीं. दांडी, कंडी, झंपनची आवश्यकता राहात नाहीं. जो कोणी आपल्या इकडे पांच सहा मैल चालूं शकतो, तोच तिकडील हवेंत न दमतां दुप्पट चालूं शकतो. म्हाताऱ्या स्त्रिया सुद्धां त्या हवेंत दहा बारा मैलाची चाल सहज करतात.

चालण्याची संवय व्हावी, वहाणा, बूट लागूं नये, त्याचाहि सराव व्हावा. पुरुषांना प्रत्यही पांच सहा मैल सहज चालण्याची संवय

असते तशी बायकांना नसते, म्हणून आम्ही उभयतां ह्या यात्रेस निघण्यापूर्वी प्रत्यही पुण्याच्या आसपासच्या डोंगर–टेंकड्यावरून निदान सात आठ मैल एक टप्पी–वाटेंत कोठेंहि न थांबतां–नियमानें फिरून येण्याचा महिनाभर क्रम ठेविला होता. त्याचा उपयोग कल्पनेबाहेर झाला. सौभाग्यवती माझेबरोबर वीस वीस मैलाचे पल्ले न दमतां करुं शकली.

एवढ्या सूचना ध्यानीं बाळगल्या म्हणजे कसलीच अडचण वाटणार नाहीं. प्रसंगानें माणूस अनुभवित होऊन जमवून घेण्याची, निभावून जाण्याची काळजी घेतच असतो. तो त्याचा जन्मजात स्वभावच आहे.

दोन गोष्टींकडे त्याचें लक्ष विशेषत्वानें ओढावें असें वाटतें. बोजेवाल्यांच्या जिवावरच आपल्या यात्रा पार पडत असतात. त्यांस आपण पैसे देत असलों तरी त्यांची कामगिरी व संगत निव्वळ भाडोत्री असते असें समजू नये. त्यांची ती सेवा आहे असें समजून त्यांस आपुलकीच्या भावनेनें वागवावें. त्यांचें जेवणखाण आपल्या अंगावर नसलें तरी त्यांचे देखत आपण न्याहारी करतांना त्यांचे हातावर थोडा अंश ठेविल्याशिवाय एकट्यानें खाणें, ते मागत नसले तरी माणुसकीचें व आपलेपणाचें नाहीं.

दुसरी गोष्ट अशी कीं, जागजागीं आपण उतरतों तेथील चट्टीवाले दुकानदार, चट्टीचे धनी हे कोणी धंदेवाईक गयावळ नाहींत कीं कसेंहि करून यात्रींकडून पैसे उकळून काढतात. चार दोन आण्यांकरितां घिसघिस घालीत बसूं नये. त्यांचीं दुकानें, चट्ट्या नसत्या तर आपलें किती नडलें असतें ही जाणीव ठेवावी. आपले मागून आपले अनेक महाराष्ट्रीय भाऊबंद तिकडे जातील. त्यांच्याकरितां आपली शुद्ध राहणी, सरळ व उदार व्यवहाराची परंपरा अबाधित राहील अशी दक्षतेनें काळजी घ्यावी. तें उत्तरदायित्व आपणांवर आहे हें विसरूं नये.

बोजेवाले करणें ते थोडे महाग पडत असले तरी गढवालीच करावे. ते काळी कमळीवाले किंवा अन्य पेढीकडूनच ( एजन्सी ) करावे. ठरलेल्या अटी लेखी व स्पष्ट असंदिग्ध असाव्या. त्यांत पैसे

किती व केव्हां केव्हां द्यावयाचे, कोठें वस्ती अधिक करावी लागली किंवा केली तर त्या दिवसाचा आकार किती, त्यांची बक्षिशी, प्रत्यही अधिकांत अधिक चाल किती, त्यांनीं किती वजनाचा बोजा घ्यावयाचा, पंचकेदार, पंचबदरी, गोहनाताल, हेमकुंड–लोकपाल, भ्युंडारघाटी, वा फुलांचें नंदनवन, मातामूर्ति, चरण पादुका, शेषनेत्र, अलकापुरी, सतोपथ, वगैरे वगैरे स्थानीं जावयाचें असल्यास अटींमध्यें त्यांचा स्पष्ट उल्लेख असावा. त्यांचें जेवण आपल्या अंगावर पत्करूं नये. आपल्याबरोबर स्वतंत्र गडी घेतलेला नसला तर बोजेवाल्यासच प्रत्यही चार दोन पैसे ' चबिना ' म्हणून दिले तर ते सुद्धां आपलीं भांडीं घासणें, पाणी आणून देणें वगैरे कामें आनंदानें करितात. बोजेवाल्यांतहि ब्राह्मण बोजेवाले मिळूं शकतात.

यात्रेस योग्य वेळ– हिमालयांतील चार धामांच्या यात्रेस जावयाचे ते अक्षततृतीये नंतर निघावे. अगोदर गेल्यास बर्फ वितळून वाटा मोकळ्या झालेल्या नसल्याची भीति व उशीरा गेल्यास पावसाची भीति. उशीरापेक्षां लवकर जाण्यांत बर्फावरून जाण्याची संधी तरी मिळेल. पावसांत मात्र सगळीच परवड. चट्टयांतून खूप गळत असते.

# परिशिष्ट २

## बरोबर घ्यावी लागणारी सामुग्री

हिमालयाचे यात्रेंत तीनहि ऋतूंचा अनुभव येत असतो. एक शेर ओझें वाढलें तर अडीच ते तीन रुपये अधिक पडतात, म्हणून ओझें जितकें हलकें होईल तितकें वाहतुकीचें मोल कमी पडतें. यात्रेला जाणें म्हणजे सुखविलास किंवा चैन करण्यासाठीं प्रवास करणें नव्हें. तो एक कायिक, वाचिक, मानसिक, तपाचरणाच्या अभ्यासाचा भाग आहे. अभ्यास कधीं गाद्यांवर लोळून होत नसतो. त्याला हाडाचीं काडेंच करावीं लागतात. ह्या दृष्टीनें बरोबर घ्यावयाच्या सामुग्रीची अनुभवयुक्त यादी दिली आहे. प्रत्येकानें आपापल्या आवडीनिवडी, खातखोडीप्रमाणें त्यांत अधिक उणें करावें. आवश्यक असेल तेवढें सर्व घेतलेंच पाहिजे, पण संयमानें कमी करतां येईल तेवढें कमी करून स्वावलंबन शिकलें पाहिजे.

कपडे— नेसावयाचीं धोतरें शहरी थाटाचीं घेऊं नयेत. त्यांचा उपयोग तर नाहींच पण उगीचच अडचण वाटते. गुडघे झाकतील अशा बेताचे सातवारी ३६–४० इंची पंचे घ्यावे. किंवा गुडघ्यापर्यंतच्या चोळणेवजा चड्डया घ्याव्या. चालण्याचें कामीं त्या अगदी सुटसुटीत वाटतात. दोन चड्या व दोन पंचे असले म्हणजे सर्व काम भागतें. मग अंगपुसणें निराळें नको. नुसते पंचेच वापरावयाचे असतील तर एक अधिक घ्यावा.

अंगांत घालण्यासाठीं तीन पैरणी; पैकीं एक लांब बाह्यांची व दोन आखुड बाह्यांच्या असाव्या. लोकरीची विणलेली सबंध बाह्यांची पैरण वा जर्सी अवश्य घ्यावाच. एक सुती वा लोकरी कानटोपी आणि एक लोकरी चौकोनी रुमाल वा मफलर, त्याचप्रमाणें एक खादीचें उपरणें चांगलें लांबरुंद व शाल किंवा गिरणीची पातळ धाबळी. एवढे कपडे असले म्हणजे अठरा सहस्र फूट उंचीवरील प्रवासाचीहि थंडी निवारण होते. उन्ह लागू नये म्हणून चालत असेल त्यानें मोठ्या कडेची वोअर हॅट घ्यावी. छत्रीस हात न गुंतवतां तिनें उन्हापासून संरक्षण चांगलें होतें.

पायांत चढाऊ जोडा— रबरी तळाचा कॅनव्हस शू व पायमोजे दोन जोड, त्यांतील एक लोकरीचा असावा. बुटाची सवय नसेल त्यांनीं वहाणा वापरण्यास अडचण नाहीं. पण पायमोजे मात्र अवश्य वापरावे व त्याकरितां अंगठा बाहेर निघण्यासाठीं व वहाणांचा दुसरा बंद बोटांचे बेचकळींत बसण्यासाठीं पायमोजास भोंकें पाडून काज्याप्रमाणें त्याभोंवतीं शिवण घालावी, किंवा पठाणी वहाणा वापराव्या म्हणजे पायमोजांच्या फाडाफाडीची अडचण नाहीं. उघड्या पायानें चाल होतांना धूळ बसून पाय फुटतात व भेगा पडतात. एवढ्या कपड्यापेक्षां अधिक कपडे लागत नाहींत. ओव्हर कोट नि रेन कोट यांचा उपयोग होत नाहीं. चढ–उतारीं घाम फुटत असतो. सर्वच प्रवास तसा असतो. त्यामुळें अधिक कपड्यांची अडगळ होऊन बसते.

बायकांकरितां नेसण्याचीं तीन पातळें, तीन कमरेइतकीं सुती पोलकी, त्यांत एक सबंध बाह्यांचे व एक लोकरी पोलके सबंध बाह्यांचे, एक कान टोपी व एक लोकरी रुमाल आणि एक शाल किंवा

पातळ धाबळी. पादत्राणें वरीलप्रमाणेंच. आपापल्या संवयीप्रमाणें कमी अधिक करावें. एक जुनें स्वच्छ फाडण्यायोग्य धोतर संग्रही ठेवावे.

हंतरुण–पांघरूण–हंतरुणास बाहेरून गुंडाळण्यासाठीं सतरंजीऐवजीं एक ७ ' × ५ ' फूट लांबी–रुंदीची ताडपत्री किंवा घट्ट विणीचा जाड कॅनव्हसचा तुकडा, त्याला चोहोंबाजूंनीं भोकाच्या पितळी चाक्या ( आयलेट ) बसविलेल्या असल्या म्हणजे त्यातून दोरी ओवून वळकटी घट्ट ताणून बांधता येते. आधुनिक पडशी ( होल्डॉल ) पेक्षां ही सोय अधिक कामीं येते. हंतरावयास एक घोंगडी किंवा गाशा–लेपासारखी पातळ गादी, पांघरावयास एक दुहेरी घोंगडी वा मारवाडी दुहेरी धाबळी वा ब्लँकेट वा रग, व ह्यांस आंतून जोडण्यासाठीं एक लांब रुंद पासोडी वा चादर. पलंगपोसाकरितां चादर वा दुहेरी धोतर. एवढ्यानें हंतरुण सजलें. वळकटी बांधण्यास जाडशी चाक्यांच्या भोकांतून शिरेल अशी दहा बारा हात लांबीची नवट सुताची दोरी.

भांडींकुंडीं–ज्या चट्टींत आपण उतरूं तेथें भांडींकुंडीं आपणास विनामोल मिळतात. पण त्याजकडूनच शिधासामुग्री विकत घेतली पाहिजे. त्याजकडे मिळणारीं भांडीं फारच जाडजूड व मोठीं असतात. म्हणून त्यांचा खरा उपयोग होत नाहीं. शिवाय अलिकडे बहुतेक ठिकाणीं धर्मशाळा झालेल्या आहेत. तेथें उतरण्याची सोय स्वतंत्र खोल्या मिळूनहि होते. ह्यासाठीं आपलीं भांडीं आपण घ्यावीं हें उत्तम. बरोबर जितकीं माणसें असतील त्यामानानें लहानमोठीं भांडीं घ्यावींत सर्व भांडीं अल्युमिनियमचीं असावींत, तीं वजनास हलकीं असतात. भात, आमटी, भाजी, दूध, दहीं, पाणी वगैरे करितां चार पातेल्यांचा गंज. तसाच चार वाट्यांचा एक गंज. परातवजा एक झाकणी किंवा थाळी व एक ताट, पळी, चमचा, लहानसा व हलका तवा व कढई. पाणी पिण्याचें भांडें व फिरकीच्या झाकणाची तपेली. हीं सर्व भांडीं मावतील अशी एक बादली. बादली पाणी आणण्यास व कपडे धुण्यास फार आवश्यक आहे. नाहींतर मोठी गैरसोय होते. पाण्याजवळ धुण्याची सोय नसते व दगडाजवळ पाणी नसतें. त्यामुळें कपडे नुसते खळबळूनच वाळवावे लागतात. त्यामुळें ते फार मलिन राहातात.

शिधासामुग्री– तांदूळ, आटा, डाळ, मीठ, मिरची, मसाला, गूळ,

साखर, हे जिन्नस तिकडे मिळतात. पण एक दिवसा पुरता सर्वच शिधा नित्य संग्रहीं राखावा. नेहमींच चांगले जिन्नस मिळतील असें नाहीं. मीठ, मसाला, हळद, चिंच, अमसूल किंवा हिरवे आंबे किसून वाळवून त्याची केलेली पूड ही आपण घरूनच बरोबर घ्यावी. तिकडे मीठ अगदीं काळें मिळतें. अंबोशी मिळते, पण ती बरी नसते. मसाला जिन्नस सर्वच ठिकाणीं मिळतात असें नाहीं. बेसन पीठ मिळत नाहीं. तें बरोबर शेरभर तरी घ्यावें. तूप सर्वच ठिकाणीं मिळतें; पण ते चांगलेंच मिळेल असें नाहीं. कोठें कोठें चांगलें मिळतेंहि. म्हणून शेर दोन शेर बरोबर घ्यावें. दूध वाटेंत मिळते पण 'हजीर तो वजीर' ह्यामुळें त्याचा भरवसा धरता येत नाहीं, म्हणून गोठवलेले दूध–डबे किंवा दुधाची–भुकटी जवळ बाळगावी. चहावाल्यांनीं चहा व असली दुधाची सोय अवश्य बरोबर घ्यावी. साखर ही शेर दोन शेर घ्यावी. लोणचें, त्यांतील मिरच्या, पापड, सांडगे हीं तोंडीलावणीं बरोबर असावींतच. महिना दोन महिने टिकतील असे खाद्य जिन्नस लाडूगडू पोहे, खिसमिस, बदाम, खारीक, काजू, खजूर हे जिन्नस हरद्वार येथें घ्यावेत. चांगले व नेमस्त भावानें मिळतात. कणकेच्या फुलक्या–दशम्या. त्या भाजऱ्या म्हणजे सपाट तव्यावर फडक्याचत्रा बोळ्यानें त्यांतील एकेक दाब दाबून फिरवून फिरवून इतकी भाजावयाची कीं ती पापडाप्रमाणें कोरडी चुरचुरीत होऊन जाईल. त्यास खाकरे म्हणतात. हे खाकरे मारवाड्यांकडे करितात. ते चांगले दोन दोन तीन तीन महिने टिकतात. त्यास बुरसा येत नाहीं किंवा वास लागत नाहीं. सुकामेवा तीन शेर, पोहे तीन शेर व खाकरे तीन शेर घेतले म्हणजे प्रत्यहींची न्याहारी व आवश्यकता भासेल तेव्हां संध्याकाळच्या पाणी पिण्याच्या आधाराची सोय झाली. ह्यामुळें एक वेळच्या स्वयंपाकावर म्हणजे जेवणावर उत्तम भागतें. उपवास असतील त्या मानानें ते ते जिन्नस घेण्यास विसरूं नये. तिकडे सर्पण मिळतें पण लांकडें म्हणजे फाट्या. त्या रायवळ व दमट असल्यामुळें चांगला जाळ लागत नाहीं. सारखें फू, फू, करून जीव रंजीस येतो. त्यांतच धुराचा मारा. म्हणून स्टोव्ह घेणें अधिक बरें. त्याचीं अवजारें–पिन्स्, वाशर, स्पॅनर, काकडा हीं बरोबर असणें आवश्यक आहे. स्पिरीटची

बाटली. तें तिकडे मिळणार नाहीं. राकेल सर्वत्र मिळतें. स्टोव्हमध्यें राकेल भरून घेतांना अर्ध सांडतें. दुकानदाराजवळ नसराळे नसतें.

इतर जिन्नस– सर्वच प्रवास चढउतारी, त्याकरितां हातांत धरावयास डोकीच्या उंचीची पायाच्या अंगठ्याच्या जाडीची हलकी वेळूची काठी, आपला सर्व भार तिच्यावर आला तर ती मोडणार नाहीं, अशी पाहून घ्यावी. त्या हरद्वार येथें चांगल्या मिळतात. तीस खालचे टोकास अणकुचीदार शेंबी पक्की बसवून घ्यावी. हरद्वार येथें ती बसवून मिळते. पावसापासून निवारण करण्यासाठीं दोन मेणकापडी तुकडे ४ × ६ फूट लांबीचे चांगले पाहून घ्यावे. मेणकापड कडक नसावें. किंवा घडी केली असतां तें चिकटून जाऊं नये. एक तुकडा बोजेवाल्याजवळ आपल्या बोजावर घालण्यासाठीं व दुसरा स्वतःकरितां.

विजेचा दिवा– टार्च व त्याच्या दोन डझन बॅटऱ्या, एक मेणबत्तीचा पुडा, कागद, पेन्सिल, कार्ड, पाकिट, चाकू मोठा, वेळेनुसार बटाटे चिरण्यास उपयोगी पडावा, काटा काढण्यास चिमटा, गंगा भरून आणण्यास पाऊण शेराची घट्ट बुचाची बाटली. तशीच एक दुधाकरितां, पण जरा लहान. हैड्रोजन पॅरॉक्साईडची बाटली चांगली असते. तिला घट्ट बूच असून ते सहज काढतें घालतें असतें.

औषधी–कँफरपिल्स हगवणीवर उपयोगी, सुंटीच्या वड्या, कोयनेल गोळ्या शें–पन्नास, मेंथाल क्रिस्टल्स, टिंक्चर आयोडीन, सिबिझॉल, सोडा, हिंगाष्टक, लवंगा, व्हॅसलीन, कोकमतेल, स्मेलिंग साल्टची बाटली, खोकला, पोटदुखी ह्यावरील औषधें, बिब्बे, एवढीं औषधें असली म्हणजे पुरें आहेत. अलिकडे जागजागीं वैद्यकीय मदतीची सोय झालेली आहे. काळजी करण्यासारखी परिस्थिति राहिलेली नाहीं.

सोय असेल त्यानें कॅमेरा बरोबर घ्यावा. तो रिफ्लेक्स व फिल्मचा असावा. ३५ मिलिमीटरचा असला तरी चालेल. त्यावरून हवी तेवढी मोठीं चित्रें काढतां येतात. पँक्रोमॅटिक फिल्मस वापराव्यात. शें–दीडशें फोटो घेता येतील इतक्या बेतानें रोल्स घ्यावे.

# परिशिष्ट ३

## यमुनोत्तरी

### चट्ट्यांची यादी

**हरद्वार-मसुरी-यमुनोत्तरी १०४ मैल.**

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| हरद्वार० / डेहराडून | आगगाडी ४८ | ६–१४ |
| डेहराडून० / राजपुरी० / मसूरी० | मोटार ७ / पायवाट७ | २४ते२८ / ४१ते४६ |
| सुआखोली | ६ | |
| झाळकी | १ | ४८ |
| धनोल्टी | ८ | ४९ |
| कानाताल | ८ | |
| भल्डियाना | ८ | ५४ |
| गट १ ला मैल ३८ | | |
| छाम | ५ | |
| नगून | ५ | |
| धरासू० | ५ | ६१ |
| गट २ रा मैल १५ | | |
| कल्याणी | ४ | |
| गेऊला | ५ | |
| सिल्क्यारी | ५ | |
| राडीधार | ५ | |
| डंडालगाऊ | २ | |
| सिमली | २ | ६४ |
| गट ३ रा मैल २३ | | |
| गंगाणी | २ | ७५ |
| जम्ना | ६ | ७५ |
| ओजरी | ६ | |
| डडोटी | २ | |
| राणागाऊ | २ | |
| हनुमान चट्टी | २ | ७६ |
| खरसाळी–जानकी | ४ | ७९ |
| यमुनोत्तरी | ४ | ८४ते१०४ |
| गट ४ था मैल २८ | | |
| एकूण मैल– | १०४ | |

**हरद्वार-देवप्रयाग-यमुनोत्तरी १६९॥ मैल.**

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| हरद्वार ते देवप्रयाग | मोटार व पायवाट गट २३ प्रमाणें ५८ | ५९ |
| खरसारा | १० | |
| कोटेश्वर | ४ | |
| बण्ड्या | ६ | |
| क्यारी | ८ | |
| टिहरी० | ६ | |
| गट ५ वा मैल ३४ | | |
| टिहरी० | ० | |
| सराई | ५॥ | |
| भल्डियाना | ६ | ५४ |
| गट ६ वा मैल ११॥ | | |
| यमुनोत्तरी | ६६ | ८४–१०४ |
| गट २, ३, ४ प्रमाणें | | |
| एकूण मैल १६९॥ | | |

**हरद्वार-टिहरी-यमुनोत्तरी १४२॥ मैल.**

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| हरद्वार० | ० | ६–१४ |
| ऋषीकेश० | १५ | २८–३६ |
| नरेंद्र नगर० | १० | |
| फकोट | १० | |
| नागणी | ९ | |
| चमुआ | ११ | |
| टिहरी० | १० | |
| सराई | ५॥ | |
| भल्डियाना | ६ | ५४ |
| गट ७ वा मैल ७६॥ | | |
| यमुनोत्तरी | ६६ | ८४–१०४ |
| गट २–४ प्र. | | |
| एकूण मैल १४२॥ | | |

# गंगोत्तरी

## यमुनोत्तरी तें गंगोत्तरी १०२ मैल

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| यमुनोत्तरी } * | ० | गट ४ |
| सिमली } | २८ | प्रमाणें |
| जंगलचट्टी | २॥ | १०६ |
| सिंगोट | ५ | १०७-८ |
| नाकोरी | ३॥ | १०८ |
| गट ८ वा मैल ११ | | |
| नाकोरी | ० | |
| उत्तर काशी० | ६ | १०९ |
| गंगोरी, अस्सी-संगम | ३ | ११३ |
| मणेरी | ७ | ११३ |
| कुल्हाटी | ४ | |
| मल्लाचट्टी | २ | ११३ |
| गट ९ वा मैल २२ | | |
| मल्लाचट्टी | ० | |
| भटवाडी | २ | ११४ |
| भुक्की | ६ | ११६ |
| गंग्णाणी | ३ | ११६-२१ |
| लोहारी नाग | ४ | १२१ |
| सुक्खी | ५ | १२३ |
| झाला | २॥ | १३२ |
| हरसील | ३ | १३२-३८ |
| धराली | २॥ | १३८ |
| जंगला | ४ | १३९ |
| भैरवघाटी | २॥ | १४० |
| गंगोत्तरी | ६॥ | १४३ते६९ |
| गट १० वा मैल ४१ | | |
| एकूण– मैल १०२ | | |
| गोमुख | १८ | १४८ |

## हरद्वार ते गंगोत्तरी १६७॥ मैल

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| हरद्वार-हृषीकेश-नरेंद्रनगर-टिहरी-भलिडचाना ७६॥ | | गट ७ प्रमाणें |
| धरासू० | १५ | गट २ प्रमाणें |
| दुंडा | ९ | |
| नाकोरी | ४ | |
| नाकोरी } गंगोत्तरी } | ६३ | गट ९ व १० प्रमाणें |
| एकूण मैल १६७॥ | | |

## हरद्वार–देवप्रयाग–धरासू–गंगोत्री १९४॥ मैल

| | | |
|---|---|---|
| हरद्वार } देवप्रयाग } | ५८ | गट १७ प्रमाणें |
| देवप्रयाग } टिहरी } | ३४ | गट ५ प्रमाणें |
| टिहरी } भलियाना } | ११॥ | गट ६ प्रमाणें |
| भलियाना } धरासू } | १५ | गट २ प्रमाणें |
| दुंडा | ९ | |
| नाकोरी | ४ | |
| | | गट ९ व २० प्रमाणें |
| गंगोत्तरी | ६३ | |
| एकूण मैल १९४॥ | | |

* यमुनोत्तरी ते सिमली गेल्या वाटेनें परत.

# बदरीकेदार

## गंगोत्तरी ते बदरीकेदार मैल १२३॥

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| गंगोत्तरी } मल्लाचट्टी } | * ४१ | गट १० प्रमाणें |
| सौराकी गाड | ३ | १७३ |
| फयालू | ३ | |
| छूणा | ३ | १७८ |
| बेलख | ४ | १७७ |
| पंगराणा | ५ | १७८ |
| झाला | ४ | ,, |
| बुढाकेदार | ५ | १७८ |
| भैरवचट्टी | ६॥ | १८१ |
| भौंटा | ३ | १८३ |
| घुतु | ९ | १८४ |
| गौमांडा | ४ | १८५ |
| दुफंदा | ३ | १८८ |
| पवाली | ३ | १८९ |
| मग्गुकीमांडा | ९ | १९२ते१९५ |
| त्रिजुगी नारायण | ५ | १९९ |
| सोनप्रयाग | ३ | २०३ |
| गट ११ वा मैल ७२॥ | | |
| सोनप्रयाग | ० | |
| मुंडकाटा गणेश | १ | २०४ |
| गौरीकुंड | २ | २०४ |
| रामवाडा | ४ | २०६ |
| केदारनाथ० | ३ | २०७ते२३३ |
| गट १२ वा मैल १० | | |
| एकूण मैल | १२३॥ | |

* गंगोत्तरी ते मल्लाचट्टी गेल्या मार्गानें परत.

## हरद्वार–देवप्र०रुद्रप्रयाग–केदार १४४

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| हरद्वार } देवप्रयाग } | ५८ | गट १७ प्रमाणें |
| देवप्रयाग } रुद्रप्रयाग } | ३८ | गट १८ व १९ प्र. |
| छतोली | ५ | |
| सोरगड | ४ | |
| अगस्तिमुनी० | २॥ | |
| चंद्रापुरी | ४ | |
| भीरी | २॥ | |
| बटवालचारी | २॥ | |
| कुंड | १ | |
| गुप्तकाशी० | २॥ | २३९ |
| गट १३ वा मैल २४ | | |
| गुप्तकाशी० | ० | |
| नाला | १॥ | २३८ |
| नारायणकोटी | २ | २३८ |
| मैखंडा | ३॥ | २३८ |
| फाटा | २ | २३७ |
| रामपूर | ३ | २३७ |
| सोनप्रयाग | २ | २०३ |
| गट १४ वा मैल १४ | | |
| सोनप्रयाग } बदरीकेदार } | १० | गट १२ प्रमाणें |
| एकूण मैल | १४४ | |

गु. काशीपासून उखीमठ एक २४१
मैल व सोनप्रयाग पासून
त्रिजुगीनारायण ३ मैल आहे. १९९
तेथें अवश्य जाऊन यावे.

# बदरीनारायण

## बदरीकेदार ते बदरीनारायण १०४मैल

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
| --- | --- | --- |
| केदार* } सोनप्रयाग } गुप्तकाशी } | गट १२ व १४ प्रमाणें २४ | |
| गुप्तकाशी० | ० | २३९ |
| उखीमठ० | २ | २४१ |
| गणेश वा ब्रह्मचट्टी | ३ | २६५ |
| पोथीवासा | ५ | |
| चोपता | ३ | २४५ |
| तुंगनाथ | ३ | २५९ |
| भीमद्वार | ३ | २५९ |
| पांगरवासा | २॥ | |
| मंडलचट्टी | ४ | २६५ |
| गोपेश्वर | ४॥ | २६६ |
| चमोली० | ३ | २६६ |
| गट १५ वा मैल ३३ | | |
| चमोली० | ० | |
| मठचट्टी | २ | २६८ |
| बावला | २ | |
| पिपल कोटी० | ५ | २६८ |
| गरुड गंगा | ४ | २६९ |
| पाताळ गंगा | ४ | २६९ |
| गुलाब कोटी | २ | |
| हेलंग० | २ | २७० |
| खनोटी | २ | २७० |
| स्युंगधार | ४॥ | |
| | २७॥ | |

| चट्टीचें नांव | मैल | सं. पान |
| --- | --- | --- |
| | २७॥ | |
| जोशीमठ० | ॥ | २७० |
| विष्णुप्रयाग | २ | २७४ |
| घाटचट्टी | ४ | २७७ |
| पांडुकेश्वर० | २ | २७७ |
| लांमबगड | ३ | २८३ |
| हनुमानचट्टी | ३ | २८३ |
| बदरीनारायण० | ५ | २८५-३०३ |
| गट १६ वा मैल ४७ | | |
| एकूण मैल १०४ | | |

## बदरीनारायण ते वसूधारा

| | | |
| --- | --- | --- |
| बदरीनारायण० | ० | |
| ब्रह्मकपाल | १ | २९५ |
| मानागांव | १ | ३०३ |
| वसुधारा | ३ | ३०७ |
| | ५ | |

## बदरीनारायण ते सतोपथ

| | | |
| --- | --- | --- |
| बदरीनारायण० | ० | २८५–३०७ |
| मातामूर्ती | २ | ३०५ |
| चमतोली | ४ | |
| लक्ष्मीबन | २ | |
| सौधारा | २॥ | |
| चक्रतीर्थ | ३ | |
| सतोपथ | २॥ | ३०८-३१२ |
| सोनकुंड | १॥ | ३०९ |
| विष्णुकुंड | ॥ | ३१० |
| | १८ | |

* केदार ते सोनप्रयाग गेल्या वाटेनें परत.

# बदरीनारायण

**हरद्वार ते बद्रीनारायण मैल १८३**

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| हरद्वार० | ० | |
| सत्यनारायण | ८ | ६ ते २८ |
| ऱ्हषीकेश० | ७ | २८ |
| मुनीकीरेती | १ | ते |
| लक्ष्मण झूला० | १ | ३८ |
| गरुड चट्टी | २ | |
| गुलार चट्टी | ४ | |
| महादेवसैण | २ | |
| छोटी विजनी | ३ | |
| कुंड चट्टी | ४ | |
| बंदरभेल | ३ | |
| महादेवचट्टी | ३ | |
| सेमल चट्टी | ४ | |
| कांडी | ३ | |
| व्यास घाट | ४ | |
| छालरी | ३ | |
| उमरासू | २। | |
| सौर | २॥ | |
| देवप्रयाग० | १। | ३३१–३३७ |

गट १७ वा मैल ५८

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| देवप्रयाग० | ० | ३३१ |
| विद्या कोटी | ३ | |
| राणीबाग | ५ | |
| रामपूर | ४ | |
| भिलकेदार | ५ | ३३० |
| श्रीनगर० | ३ | ३२६ |

गट १८ वा मैल २२

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| श्रीनगर० | ० | |
| सुक्राता | ५ | |
| भट्टीसेरा | २॥ | |
| खांकरा | ३॥ | |
| गुलाबराय | ५ | |
| रुद्रप्रयाग० | २ | ३२४ |

गट १९ वा मैल १८

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| रुद्रप्रयाग० | ० | ३२४ |
| सुमेरपूर | २॥ | |
| शिवानंदी० | ४॥ | |
| नगरासू | ३ | |
| गोचर० | ५ | ३२३ |
| चटुवापीपल० | २ | १२१ |
| कर्ण प्रयाग० | ४ | ३२० |

गट २० वा मैल २१

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| कर्णप्रयाग० | ० | ३२० |
| उमट्टा | २ | |
| लंगासू० | ४ | |
| सोनला | ३ | |
| नंदप्रयाग० | ३ | ३१९ |

गट २१ वा मैल १२

| चट्टीचें नांव | मैल | संदर्भ पान |
|---|---|---|
| नंदप्रयाग० | ० | |
| मैठाणा | ३ | |
| चमोली० | ४ | |

गट २२ वा मैल ७

चमोली ते बदरीनारायण } गट १६ प्रमाणें ४७

एकूण मैल १८३

## कर्णप्रयाग ते राणीखेत

| | |
|---|---|
| कर्णप्रयाग० | ० |
| सिमली० | ४ |
| भटोली | ३॥ |
| आदिबदरी | ३॥ |
| जोकपाणी | ४॥ |
| दिवाळीखळ | २ |
| ग्वाड गधेरा | २॥ |
| धुनार घाट० | ३॥ |
| मैलचौरी | ५ |
| सेमलखेत | २॥ |
| गणाई० (चौखुटिया) | ५॥ |
| गट २३ वा मैल | ३७ |

| | |
|---|---|
| | ३७ |
| महाकालेश्वर | ४॥ |
| द्वाराहाट० | ६ |
| चंद्रेश्वर | २॥ |
| कफडा | ३॥ |
| गगास | ३ |
| राणीखेत* ० | ४ |
| ते | ६० |
| काठगोदाम० स्थानक | ५० |
| | ११० |
| राणीखेत* ते काठगोदाम वा हल्द्वानी | मोटार ५० |

## कर्णप्रयाग ते रामनगर

| | |
|---|---|
| कर्णप्रयाग | ० |
| गणाई गट २३ प्र. | ३७ |
| ल्याड | ४॥ |
| मासी | २॥ |
| वृद्धकेदार | ४ |
| भिकियासैणऽ | ३ |
| बासकोट | ४ |
| गवालीकाना | ३ |
| गुजरघाटी | ३ |
| मछोड | ३ |
| | ६४ |

| | |
|---|---|
| | ६४ |
| गोदी | ४ |
| तुटाआम | ६ |
| कुमरिया | ५ |
| मोहन | ३ |
| गरजिया | ५ |
| रामनगर० | ८ |
| आगगाडी | ९५ |
| भिकियासैणऽ ते रामनगर मोटार मिळते. | ४४ |

## कोटद्वार ते कर्णप्रयाग

| | |
|---|---|
| कर्णप्रयाग ते श्रीनगर | ५९ |
| गट १८ व १९ प्र० | |
| पौडी० | ८ |
| अधवानी | ९ |
| कांसखेत | ३ |
| कलेथ | ६ |
| | ८५ |

| | |
|---|---|
| | ८५ |
| बांगघाट | ३ |
| द्वारीखाल | ७ |
| डाडा मंडी | ६ |
| डुगड्डा | ६ |
| कोटद्वार० | १० |
| आगगाडी | ११७ |

० अशी खूण असलेल्या ठिकाणीं टपाल व तार घर आहे.

# परिशिष्ट ४

## व्ययाचा अंदाज

चारहि धामांची यात्रा पायीं करावयाच्या म्हटल्यास ६५० मैलांचा प्रवास हरद्वारपासून निघून पुन्हां तेथें परत येईपर्यंत होतो. एवढा प्रवास प्रत्यहीं १० मैलप्रमाणें केल्यास दोन महिने लागतील. तीर्थाचे ठिकाणीं दोन तीन दिवसांचा निवास व इतर अनपेक्षित चालण्याचे खाडे धरले तर सर्व मिळून अडीच महिने लागतील. शिवाय हरद्वारपर्यंत जातायेता चार दिवस तरी लागतात. असा हा अडीच ते पावणेतीन महिन्यांचा प्रवास होईल. त्यांत चाल व निवास कमी अधिक झाला तर दिवसगत त्या मानानें कमी अधिक होतीलच.

एक माणसाचे सामानाचें ओझें चाळीस शेरांपेक्षां अधिक होत नाहीं.

### चार धामांचा पायीं प्रवास

| | |
|---|---|
| बोजेवाल्यास सबंध प्रवासाचे | रु. ३०० |
| प्रत्यहींचें भोजन १ रुपयाप्रमाणें. | ७५ |
| आगगाडी भाडें हरद्वारपर्यंत जातां येतां. (बी. बी. सी. आय. म्हणजे वेस्टर्न रेल्वेनें) | ४८ |
| बरोबर सामान, औषधी वगैरे घेण्यासाठीं. | १०० |
| हमाली, मोटार, वगैरे भाडें. | १० |
| धर्मादाय, पंडे संभावना वगैरे. | ५० |
| किरकोळ. | २५ |
| | ६०८ |

### मोटारनें केवळ बदरीनारायणच.

| | |
|---|---|
| मुंबई हरद्वार मेल वा एक्सप्रेस जातां येतां मैली ६ पै प्रमाणें. | ४६ |
| भोजन प्रत्यहीं अजमासें १ रु. प्रमाणें. (दिवस २२) | २२ |
| बोजेवाला चमोली ते नारायण व तेथून परत (दिवस १३) | ४० |
| प्रवासोपयोगी वस्तु औषधें वगैरे. | ६० |
| दानधर्म पंडे संभावना. | १५ |
| मोटार भाडें जातां येतां. | २० |

| | |
|---|---|
| हमाली वगैरे. | ५ |
| बक्षिशी. | १५ |
| किरकोळ. | १० |
| | २२५ |

बदरीकेदार करावयाचें झाल्यास— रुद्रप्रयाग ते केदार ४८ मैल व केदार ते चमोली ५७ मैल एकूण १०५ मैल प्रवास वाढेल.

| | |
|---|---|
| १२ दिवस लागतील त्याकरितां बोजेवाला. | ३५ |
| भोजन. | १० |
| किरकोळ दानधर्म वगैरे. | १५ |
| | ६० |

दोन्ही मिळून एकूण ३०० रुपये खर्च होईल.

दांडी करावयाची असल्यास आणखी चार बोजेवाल्यांचा आकार अधिक पडेल. कंडी केल्यास आणखी एक बोजेवाल्याचा आकार पडेल.

बदरीनारायणाची यात्रा सुखासीन करतां येण्याच्या सोयी दिवसें-दिवस वाढतच आहेत. सध्यां हरद्वारपासून चमोलीपर्यंत १३६ मैल मोटारची सोय झालेली आहे. वर्षा दोन वर्षांचे आंतच ती जोशी-मठापर्यंत पुरी होऊन १८३ मैलांपैकीं २० मैलच काय ती पायवाट चालावी लागेल. म्हणजे केवळ बदरीनारायणाचीच तेवढी यात्रा पायीं करण्यास घरून निघाल्यापासून जे ४५ दिवस लागावयाचे तेच आतां मोटारच्या सोईमुळें पंधराच दिवसांत भागणार. एक महिन्याचा काळ वांचेल, तसेच सर्व कष्टहि वांचणार. बोजेवाल्यांना द्यावे लागणारे पैसे निदान रुपयांत दहा आणे तरी वांचतील. एक महिन्याचे पोटगीचे दाम वांचतील, तर मोटारला भाडें द्यावें लागेल. म्हणजे जी यात्रा अवघड व पैसे लागणारी म्हणून आवांक्याबाहेरची एक गोष्ट वाटत असे, तीच आतां कोणाहि माणसास सहज सुलभ झाली आहे. पायीं प्रवासानें होणारे लाभ अंतरले तरी जातां येतां होणाऱ्या चाळीस मैलांच्या पायचालींत त्यांची चुणूक कळून येण्या-सारखी आहे. शिवाय नारायणाचे दर्शनाबरोबरच हिमालयाच्या अंतरंगाचें दर्शन होण्याचा लाभ हा कांहीं लहानसहान नाहीं.

चारहि धामांच्या सर्व वाटांवरील चट्ट्यांची यादी परिशिष्ट तीन-मध्यें पाहावयास सापडेल.

चट्ट्यांचीं तींच तींच नांवें पुन्हां पुन्हां छापावयास नकोत म्हणून त्यांच्या नांवांचे गट पाडून त्यांस क्रमांक दिले आहेत. जेथें गटक्रमांकाचा उल्लेख आला तेथें त्या गटांतील चट्ट्यांचीं नांवें आहेत असें समजावें.

आगगाडीच्या चार निरनिराळ्या शेवटच्या स्थानकांवरून बदरीनारायणाच्या वाटेस लागता येते. पैकीं– ( नकाशा क्रम १ पहा )

( १ ) हरद्वार हें आगगाडीचें एकच स्थानक असें आहे कीं, जेथून बदरीनारायणाचे वाटेस प्रारंभ होत असल्यामुळें इतर वाहनांची आवश्यकता पडत नाहीं. ह्या मार्गाचें वर्णन वर आलेंच आहे.

( २ ) कोटद्वार स्थानकाहून श्रीनगर ( हें काश्मीरमधील नव्हे. तें नारायणाचे वाटेवरील आहे. पान ३२६ पाहा ) ५८ मैल असून तेथपर्यंत मोटारींची वहातूक आहे. तेथून पुढें मुख्य वाटेवरील ५८ मैल मोटारची सोय चमोलीपर्यंत होते. ह्याहि वाटेनें पायचाल पडत नाहीं.

( ३ ) रामनगर स्थानकापासून भिकियासैण ४४ मैल आहे. तेथपर्यंत मोटारची सोय आहे, पण पुढें ५२ मैल कर्णप्रयागपर्यंत पायचाल करावी लागते. पुढें १९ मैल चमोलीपर्यंत मोटारची सोय आहे.

( ४ ) काठगोदाम स्थानकापासून दोन वाटांनीं जातां येतें.

( १ ) राणीखेतपर्यंत ५० मैल मोटारची सोय व पुढें ५० मैल पायचाल कर्णप्रयागपर्यंत. पुढें १९ मैल मोटार चमोलीपर्यंत.

( २ ) राणीखेतपर्यंत ५० मैल व पुढें गरुड ६० मैल अशी ११० मैल मोटारची सोय व पुढें ४० मैल पायचाल कर्णप्रयागपर्यंत. पुढें १९ मैल मोटार चमोलीपर्यंत.

वरील चार मार्गांपैकीं हरद्वारमार्ग १३६ मैल व कोटद्वारमार्ग ११६ मैल चमोलीपर्यंत मोटारनें जाण्यासारखे आहेत. दुसरा २० मैलांनीं कमी आहे, पण त्यांत हरद्वार, हृषीकेश, देवप्रयाग हीं क्षेत्रस्थानें अंतरतात. ह्यासाठीं एका मार्गानें जावें व दुसऱ्यानें परतावें.

कोणत्याहि मार्गानें गेलें तरी श्रीनगरहून तीन मैल कीर्तिनगर आहे तेथपर्यंत मोटार बदलण्यासाठीं पायीं जावेंच लागतें.

हरद्वारमार्गें गेल्यास हृषीकेश, देवप्रयाग व श्रीनगर तीन ठिकाणीं मोटार बदलावी लागते व कोटद्वारमार्गें गेल्यास एकच ठिकाणीं–श्रीनगर येथें बदलावी लागते.

वर उल्लेख केलेल्या आगगाडीच्या चार स्थानकांपर्यंत जाण्याचे मार्ग व त्यांचीं अंतरें. ( नकाशा क्रम २ पहा )

पूर्वीची बी. बी. सी. आय. रेल्वे म्हणजे आजची वेस्टर्न रेल्वे
,, जी. आय. पी. रेल्वे ,, सेंट्रल रेल्वे

मुंबई ते दिल्ली दोन्ही आगगाड्यांनीं जातां येतें. पण वेस्टर्न गाडीनें सेंट्रल गाडीपेक्षां अंतर. ९६ मैल कमी आहे. अर्थात् त्या मानानें भाडें कमी पडून वेळहि कमी लागणार.

( साहरणपूर–लक्सर मार्गें )

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | वेस्टर्न रेल्वे |
| | दिल्ली–हरद्वार | १६३ | दिल्ली व साहरणपूर |
| | एकूण | १०२४ | येथें गाड्या बदलणें. |

( मुरादाबाद–लक्सर मार्गें )

| | | | |
|---|---|---|---|
| ( २ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | दिल्ली येथेंच तेवढी |
| | दिल्ली–हरद्वार | २०४ | एकदा गाडी बदलणें |
| | एकूण | १०२५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ३ ) | मुंबई ते मथुरा | ७७१ | थेट जाणाऱ्या गाडीस मथुरा |
| | ते कासगंज | ६५ | व बरेलीस बदल |
| | ते बरेली | ६४ | नाहींतर मथुरा कासगंज व |
| | ते काठगोदाम | ९६ | बरेली येथें बदल |
| | | ९९६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ४ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | दिल्लीस बदल व |
| | मुरादाबाद | १०० | थेट हरद्वारच्या |
| | नजिबाबाद | ६१ | गाडीनें नजिबाबाद |
| | कोटद्वार | १५ | येथें बदल |
| | | १०३७ | |

| | | |
|---|---|---|
| ( ५ ) मुंबई ते दिल्ली | ८६१ | दिल्ली व मुरादा- |
| मुरादाबाद | १०० | वाद येथें गाडी- |
| रामनगर | ४८ | बदल. |
| | १००९ | |

पायवाटांच्या दृष्टीनें पाहिलें तर पायवाट, मोटारवाट व आगगाडी रस्ता ह्यांचा सोबतचे नकाशांवरून स्पष्ट बोध होईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ हरद्वार | बदरीनारायण | १८३ मैल | आगगाडी | १०२४ मैल |
| २ कोटद्वार | ,, | १६३ ,, | ,, | १०३७ |
| ३ रामनगर | ,, | १६५ ,, | ,, | १००९ |
| ४ काठगोदाम | द्वाराहाटमार्गे १७६ / गरुडमार्गे २२३ | ,, | ,, | ९९६ |

कोटद्वार, रामनगर, काठगोदाम ( द्वाराहाटमार्गे ) हरद्वार व काठगोदाम ( गरुडमार्गे ) असे लांबीच्या दृष्टीनें क्रम लागतील. ४ था मार्ग सोडला तर राहिलेल्या मार्गांत दहा पांच मैलांचेंच अंतर आहे म्हणून एका मार्गानें जावे व एकानें यावें. त्यांत एक हरद्वारचा मार्ग असावाच.

# परिशिष्ट ५

## गंगोत्रीचें गाणें

हें गाणें आमची आजी—कै. श्री. गोपिकाबाई गोखले. ह्यांचें म्हणण्यांत असें. त्यानीं सुमारे सत्तर वर्षांपूर्वीं हिमालयांतील चार धामांच्या यात्रा केल्या होत्या. ( अगदी बाल वयांत असतां पासून तें आम्हास ऐकावयास सांपडलें. आणि त्यामुळेंच त्या यात्रा करण्याची आवड मला उत्पन्न होऊन बसली.) ह्या गाण्याचा कर्ता कोण हें कांहीं माहीत नाहीं. पण ते पुष्कळ बायकांच्या पाठांतरांत आहे. त्यांत पाठभेद पुष्कळच आढळतात. व त्यामुळें कित्येक ठिकाणीं ते अर्थहीन वाटते. तथापि एक नमुना म्हणून पाहण्यासारखे आहे. तें गाणें परंपरेनें आमचें येथें अजूनपर्यंत जीवंत आहे. त्या वेळचा लोकांचा भाव, त्यांचें निरीक्षण, वर्णनाची पद्धत त्यांत चांगली दिसून येतें.

।। हरिद्वार हें द्वार हरीचें प्रथम करुनियां तीर्थविधी । पिंडदान आणि ब्राह्मणभोजन गंगापूजन यथाविधी । गंगाद्वारे कुशावर्तें बिल्व-तीर्थ दळ धार सुधी । स्नात्वाच कनखले तीर्थें तया जन्म मृत्यूना कधीं । तियुनि करुनिया प्रयाण सारे हृषिकेशाची मजल साधी । तपोवनीं ते भरत लक्ष्मण पाहतां हरती आधीव्याधी । शिवकोटीचा मुक्काम दुसरा पुढें लागे चाळिसी नदी । झपाट्याहुनि जन हे येती टेरीची वाट सुधी । मग उत्तर काशी नयनीं पाहिली पुढें। तेथें पिंडदान मानवा कदाचित् घडे । शत जन्मांतरींचे किल्मिश सर्वहि झडे । दरकोशी चालतां भटवाडी दृष्टीस पडे । राम घाटी नऊ कोसाची चढ उतारी बहू असे । गंगोत्री केदार बद्रीनारायण पाहूं चला कसे । हिमालयाचे सुंदर वारे गार शरीरा लागतसे । ( वा ) गार शरीरा लागतसे । गंगोत्री केदार बद्रीनारायण पाहूं चला कसे ।। १ ।।

प्रभातकाळीं मुखमार्जन जन करुनि पंथालागीं लागतसे । कोणी झंपा कोणी करंडे कोणी ओझीं नेत असे । कोठे चढाव, कोठे उतार, कोठे मार्ग सोपा असे। पत्र पुष्प फल मूल तरुवर पर्वत गगना चुंबित दिसे। ठायि ठायिं जळ पुष्कळ सुंदर, शिकाळीचें काम नसें। देवदारु-तरु दाट लागले जसे बगीचे रम्य दिसे । सर्प व्याघ्र आणि वृश्चिक श्वापद यांची भीति लवही नसे । वस्तु कुणाची कुठे पडो वा चोर तया स्वप्नीं न पुसे ।। चाल ।। तेथें निवासस्थळ रात्रीं करती वनीं भारी । काष्ठ फुकाची तापत बसती सारी । घरधनी जागृती स्वप्न-सुषुप्ति कोणी भजन नांदी गात वसे । गंगोत्री ।। २ ।।

अहिल्याबाईचे पुण्य न वर्णवे धर्मशाळा बांधिल्या किती । असंख्य शिंके सांगे झूले त्यावरुनि जन येती जाती । छप्पर घाटी वहुत चढाई खालि पाहतां नेत्रे फिरती । पाऊल वाट कठीण मोठी भय वाटे फाटे छाती । सुक्खी, झाला, धराली, वरुनि धान्य खरेदी बांधुनी घेती । सात दिवस पुढें अन्न मिळेना म्हणूनी जन संग्रह करती । भैरवघाटी चढुनी दर्शन भैरवनाथाचे घेती। पूर्व पुण्य तें फलासि आलें गंगोत्रीं नेत्री पाहाती ।। चाल ।। तेथें आचार्य स्वामिचे मर्यादास्थान। बारा सूर्यतीर्थीं प्रथम करुनिया स्नान । भगिरथ शिलेवर करिती

चारहि धामांच्या सर्व वाटांवरील चट्ट्यांची यादी परिशिष्ट तीन-मध्यें पाहावयास सापडेल.

चट्ट्यांचीं तींच तींच नांवें पुन्हां पुन्हां छापावयास नकोत म्हणून त्यांच्या नांवांचे गट पाडून त्यांस क्रमांक दिले आहेत. जेथें गटक्रमांकाचा उल्लेख आला तेथें त्या गटांतील चट्ट्यांचीं नांवें आहेत असें समजावें.

आगगाडीच्या चार निरनिराळ्या शेवटच्या स्थानकांवरून बदरीनारायणाच्या वाटेस लागता येते. पैकीं– ( नकाशा क्रम १ पहा )

( १ ) हरद्वार हें आगगाडीचें एकच स्थानक असें आहे कीं, जेथून बदरीनारायणाचे वाटेस प्रारंभ होत असल्यामुळें इतर वाहनांची आवश्यकता पडत नाहीं. ह्या मार्गाचें वर्णन वर आलेंच आहे.

( २ ) कोटद्वार स्थानकाहून श्रीनगर ( हें काश्मीरमधील नव्हे. तें नारायणाचे वाटेवरील आहे. पान ३२६ पाहा ) ५८ मैल असून तेथपर्यंत मोटारींची वहातूक आहे. तेथून पुढें मुख्य वाटेवरील ५८ मैल मोटारची सोय चमोलीपर्यंत होते. ह्याहि वाटेनें पायचाल पडत नाहीं.

( ३ ) रामनगर स्थानकापासून भिकियासैण ४४ मैल आहे. तेथपर्यंत मोटारची सोय आहे, पण पुढें ५२ मैल कर्णप्रयागपर्यंत पायचाल करावी लागते. पुढें १९ मैल चमोलीपर्यंत मोटारची सोय आहे.

( ४ ) काठगोदाम स्थानकापासून दोन वाटांनीं जातां येतें.

( १ ) राणीखेतपर्यंत ५० मैल मोटारची सोय व पुढें ५० मैल पायचाल कर्णप्रयागपर्यंत. पुढें १९ मैल मोटार चमोलीपर्यंत.

( २ ) राणीखेतपर्यंत ५० मैल व पुढें गरुड ६० मैल अशी ११० मैल मोटारची सोय व पुढें ४० मैल पायचाल कर्णप्रयागपर्यंत. पुढें १९ मैल मोटार चमोलीपर्यंत.

वरील चार मार्गांपैकीं हरद्वारमार्ग १३६ मैल व कोटद्वारमार्ग ११६ मैल चमोलीपर्यंत मोटारनें जाण्यासारखे आहेत. दुसरा २० मैलांनीं कमी आहे, पण त्यांत हरद्वार, हृषीकेश, देवप्रयाग हीं क्षेत्रस्थानें अंतरतात. ह्यासाठीं एका मार्गानें जावें व दुसऱ्यानें परतावें.

कोणत्याहि मार्गानें गेलें तरी श्रीनगरहून तीन मैल कीर्तिनगर आहे तेथपर्यंत मोटार बदलण्यासाठीं पायीं जावेंच लागतें.

हरद्वारमार्गें गेल्यास हृषीकेश, देवप्रयाग व श्रीनगर तीन ठिकाणीं मोटार बदलावी लागते व कोटद्वारमार्गें गेल्यास एकच ठिकाणीं– श्रीनगर येथें बदलावी लागते.

वर उल्लेख केलेल्या आगगाडीच्या चार स्थानकांपर्यंत जाण्याचे मार्ग व त्यांचीं अंतरें. ( नकाशा क्रम २ पहा )

पूर्वीची वी. बी. सी. आय. रेल्वे म्हणजे आजची वेस्टर्न रेल्वे
,, जी. आय. पी. रेल्वे ,, सेंट्रल रेल्वे

मुंबई ते दिल्ली दोन्ही आगगाड्यांनीं जातां येतें. पण वेस्टर्न गाडीनें सेंट्रल गाडीपेक्षां अंतर. ९६ मैल कमी आहे. अर्थात् त्या मानानें भाडें कमी पडून वेळहि कमी लागणार.

( साहरणपूर–लक्सरमार्गें )

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | वेस्टर्न रेल्वे |
| | दिल्ली–हरद्वार | १६३ | दिल्ली व साहरणपूर |
| | एकूण | १०२४ | येथें गाड्या बदलणें. |

( मुरादाबाद–लक्सरमार्गें )

| | | | |
|---|---|---|---|
| ( २ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | दिल्ली येथेंच तेवढी |
| | दिल्ली–हरद्वार | २०४ | एकदा गाडी वदलणें |
| | एकूण | १०२५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ३ ) | मुंबई ते मथुरा | ७७१ | थेट जाणाऱ्या गाडीस मथुरा |
| | ते कासगंज | ६५ | व बरेलीस बदल |
| | ते बरेली | ६४ | नाहीतर मथुरा कासगंज व |
| | ते काठगोदाम | ९६ | बरेली येथें बदल |
| | | ९९६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ४ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | दिल्लीस बदल व |
| | मुरादाबाद | १०० | थेट हरद्वारच्या |
| | नजिबाबाद | ६१ | गाडीनें नजिबाबाद |
| | कोटद्वार | १५ | येथें बदल |
| | | १०३७ | |

चारहि धामांच्या सर्व वाटांवरील चट्टयांची यादी परिशिष्ट तीन-मध्यें पाहावयास सापडेल.

चट्टयांचीं तींच तींच नांवें पुन्हां पुन्हां छापावयास नकोत म्हणून त्यांच्या नांवांचे गट पाडून त्यांस क्रमांक दिले आहेत. जेथें गटक्रमांकाचा उल्लेख आला तेथें त्या गटांतील चट्टयांचीं नांवें आहेत असें समजावें.

आगगाडीच्या चार निरनिराळ्या शेवटच्या स्थानकांवरून बदरी-नारायणाच्या वाटेस लागता येते. पैकीं– ( नकाशा क्रम १ पहा )

( १ ) हरद्वार हें आगगाडीचें एकच स्थानक असें आहे कीं, जेथून बदरीनारायणाचे वाटेस प्रारंभ होत असल्यामुळें इतर वाहनांची आवश्यकता पडत नाहीं. ह्या मार्गाचें वर्णन वर आलेंच आहे.

( २ ) कोटद्वार स्थानकाहून श्रीनगर ( हें काश्मीरमधील नव्हे. तें नारायणाचे वाटेवरील आहे. पान ३२६ पाहा ) ५८ मैल असून तेथपर्यंत मोटारींची वहातूक आहे. तेथून पुढें मुख्य वाटेवरील ५८ मैल मोटारची सोय चमोलीपर्यंत होते. ह्याहि वाटेनें पायचाल पडत नाहीं.

( ३ ) रामनगर स्थानकापासून भिकियासैण ४४ मैल आहे. तेथपर्यंत मोटारची सोय आहे, पण पुढें ५२ मैल कर्णप्रयागपर्यंत पायचाल करावी लागते. पुढें १९मैल चमोलीपर्यंत मोटारची सोय आहे.

( ४ ) काठगोदाम स्थानकापासून दोन वाटांनीं जातां येतें.

( १ ) राणीखेतपर्यंत ५० मैल मोटारची सोय व पुढें ५० मैल पायचाल कर्णप्रयागपर्यंत. पुढें १९ मैल मोटार चमोलीपर्यंत.

( २ ) राणीखेतपर्यंत ५० मैल व पुढें गरुड ६० मैल अशी ११० मैल मोटारची सोय व पुढें ४० मैल पायचाल कर्णप्रयागपर्यंत. पुढें १९ मैल मोटार चमोलीपर्यंत.

वरील चार मार्गांपैकीं हरद्वारमार्ग १३६ मैल व कोटद्वारमार्ग ११६ मैल चमोलीपर्यंत मोटारनें जाण्यासारखे आहेत. दुसरा २० मैलांनीं कमी आहे, पण त्यांत हरद्वार, हृषीकेश, देवप्रयाग हीं क्षेत्र-स्थानें अंतरतात. ह्यासाठीं एका मार्गानें जावें व दुसऱ्यानें परतावें.

कोणत्याहि मार्गानें गेलें तरी श्रीनगरहून तीन मैल कीर्तिनगर आहे तेथपर्यंत मोटार बदलण्यासाठीं पायीं जावेंच लागतें.

हरद्वारमार्गें गेल्यास हृषीकेश, देवप्रयाग व श्रीनगर तीन ठिकाणीं मोटार बदलावी लागते व कोटद्वारमार्गें गेल्यास एकच ठिकाणीं– श्रीनगर येथें बदलावी लागते.

वर उल्लेख केलेल्या आगगाडीच्या चार स्थानकांपर्यंत जाण्याचे मार्ग व त्यांचीं अंतरें. ( नकाशा क्रम २ पहा )

पूर्वींची बी. बी. सी. आय. रेल्वे म्हणजे आजची वेस्टर्न रेल्वे
" जी. आय. पी. रेल्वे " सेंट्रल रेल्वे

मुंबई ते दिल्ली दोन्ही आगगाड्यांनीं जातां येतें. पण वेस्टर्न गाडीनें सेंट्रल गाडीपेक्षां अंतर. ९६ मैल कमी आहे. अर्थात् त्या मानानें भाडें कमी पडून वेळहि कमी लागणार.

( साहरणपूर–लक्सरमार्गें )

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | वेस्टर्न रेल्वे |
| | दिल्ली–हरद्वार | १६३ | दिल्ली व साहरणपूर |
| | एकूण | १०२४ | येथें गाड्या बदलणें. |

( मुरादाबाद–लक्सरमार्गें )

| | | | |
|---|---|---|---|
| ( २ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | दिल्ली येथेंच तेवढी |
| | दिल्ली–हरद्वार | २०४ | एकदा गाडी बदलणें |
| | एकूण | १०२५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ३ ) | मुंबई ते मथुरा | ७७१ | थेट जाणाऱ्या गाडीस मथुरा |
| | ते कासगंज | ६५ | व बरेलीस बदल |
| | ते बरेली | ६४ | नाहींतर मथुरा कासगंज व |
| | ते काठगोदाम | ९६ | बरेली येथें बदल |
| | | ९९६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ४ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | दिल्लीस बदल व |
| | मुरादाबाद | १०० | थेट हरद्वारच्या |
| | नजिबाबाद | ६१ | गाडीनें नजिबाबाद |
| | कोटद्वार | १५ | येथें बदल |
| | | १०३७ | |

चारहि धामांच्या सर्व वाटांवरील चट्ट्यांची यादी परिशिष्ट तीन-मध्यें पाहावयास सापडेल.

चट्ट्यांचीं तींच तींच नांवें पुन्हां पुन्हां छापावयास नकोत म्हणून त्यांच्या नांवांचे गट पाडून त्यांस क्रमांक दिले आहेत. जेथें गटक्रमांकाचा उल्लेख आला तेथें त्या गटांतील चट्ट्यांचीं नांवें आहेत असें समजावें.

आगगाडीच्या चार निरनिराळ्या शेवटच्या स्थानकांवरून बदरी-नारायणाच्या वाटेस लागता येते. पैकीं— ( नकाशा क्रम १ पहा )

( १ ) हरद्वार हें आगगाडीचें एकच स्थानक असें आहे कीं, जेथून बदरीनारायणाचे वाटेस प्रारंभ होत असल्यामुळें इतर वाहनांची आवश्यकता पडत नाहीं. ह्या मार्गाचें वर्णन वर आलेंच आहे.

( २ ) कोटद्वार स्थानकाहून श्रीनगर ( हें काश्मीरमधील नव्हे. तें नारायणाचे वाटेवरील आहे. पान ३२६ पाहा ) ५८ मैल असून तेथपर्यंत मोटारींची वहातूक आहे. तेथून पुढें मुख्य वाटेवरील ५८ मैल मोटारची सोय चमोलीपर्यंत होते. ह्याहि वाटेनें पायचाल पडत नाहीं.

( ३ ) रामनगर स्थानकापासून भिकियासैण ४४ मैल आहे. तेथपर्यंत मोटारची सोय आहे, पण पुढें ५२ मैल कर्णप्रयागपर्यंत पायचाल करावी लागते. पुढें १९ मैल चमोलीपर्यंत मोटारची सोय आहे.

( ४ ) काठगोदाम स्थानकापासून दोन वाटांनीं जातां येतें.

( १ ) राणीखेतपर्यंत ५० मैल मोटारची सोय व पुढें ५० मैल पायचाल कर्णप्रयागपर्यंत. पुढें १९ मैल मोटार चमोलीपर्यंत.

( २ ) राणीखेतपर्यंत ५० मैल व पुढें गरुड ६० मैल अशी ११० मैल मोटारची सोय व पुढें ४० मैल पायचाल कर्णप्रयागपर्यंत. पुढें १९ मैल मोटार चमोलीपर्यंत.

वरील चार मार्गांपैकीं हरद्वारमार्ग १३६ मैल व कोटद्वारमार्ग ११६ मैल चमोलीपर्यंत मोटारनें जाण्यासारखे आहेत. दुसरा २० मैलांनीं कमी आहे, पण त्यांत हरद्वार, हृषीकेश, देवप्रयाग हीं क्षेत्र-स्थानें अंतरतात. ह्यासाठीं एका मार्गानें जावें व दुसऱ्यानें परतावें.

कोणत्याहि मार्गानें गेलें तरी श्रीनगरहून तीन मैल कीर्तिनगर आहे तेथपर्यंत मोटार बदलण्यासाठीं पायीं जावेंच लागतें.

हरद्वारमार्गे गेल्यास हृषीकेश, देवप्रयाग व श्रीनगर तीन ठिकाणीं मोटार बदलावी लागते व कोटद्वारमार्गे गेल्यास एकच ठिकाणीं–श्रीनगर येथें बदलावी लागते.

वर उल्लेख केलेल्या आगगाडीच्या चार स्थानकांपर्यंत जाण्याचे मार्ग व त्यांचीं अंतरें. ( नकाशा क्रम २ पहा )

पूर्वींची बी. बी. सी. आय. रेल्वे म्हणजे आजची वेस्टर्न रेल्वे
,, जी. आय. पी. रेल्वे ,, सेंट्रल रेल्वे

मुंबई ते दिल्ली दोन्ही आगगाड्यांनीं जातां येतें. पण वेस्टर्न गाडीनें सेंट्रल गाडीपेक्षां अंतर. ९६ मैल कमी आहे. अर्थात् त्या मानानें भाडें कमी पडून वेळहि कमी लागणार.

( साहरणपूर–लक्सरमार्गे )

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | वेस्टर्न रेल्वे |
| | दिल्ली–हरद्वार | १६३ | दिल्ली व साहरणपूर |
| | एकूण | १०२४ | येथें गाड्या बदलणें. |

( मुरादाबाद–लक्सरमार्गे )

| | | | |
|---|---|---|---|
| ( २ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | दिल्ली येथेंच तेवढी |
| | दिल्ली–हरद्वार | २०४ | एकदा गाडी बदलणें |
| | एकूण | १०२५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ३ ) | मुंबई ते मथुरा | ७७१ | थेट जाणाऱ्या गाडीस मथुरा |
| | ते कासगंज | ६५ | व बरेलीस बदल |
| | ते बरेली | ६४ | नाहींतर मथुरा कासगंज व |
| | ते काठगोदाम | ९६ | बरेली येथें बदल |
| | | ९९६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ४ ) | मुंबई–दिल्ली | ८६१ | दिल्लीस बदल व |
| | मुरादाबाद | १०० | थेट हरद्वारच्या |
| | नजिबाबाद | ६१ | गाडीनें नजिबाबाद |
| | कोटद्वार | १५ | येथें बदल |
| | | १०३७ | |

| | | |
|---|---|---|
| (५) मुंबई ते दिल्ली | ८६१ | दिल्ली व मुरादा- |
| मुरादाबाद | १०० | वाद येथें गाडी- |
| रामनगर | ४८ | बदल. |
| | १००९ | |

पायवाटांच्या दृष्टीनें पाहिलें तर पायवाट, मोटारवाट व आगगाडी रस्ता ह्यांचा सोबतचे नकाशांवरून स्पष्ट बोध होईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ हरद्वार बदरीनारायण | १८३ मैल | आगगाडी | १०२४ मैल |
| २ कोटद्वार ,, | १६३ ,, | ,, | १०३७ |
| ३ रामनगर ,, | १६५ ,, | ,, | १००९ |
| ४ काठगोदाम द्वाराहाटमार्गें | १७६ ,, | ,, | ९९६ |
| गरुडमार्गें | २२३ ,, | ,, | ९९६ |

कोटद्वार, रामनगर, काठगोदाम (द्वाराहाटमार्गें) हरद्वार व काठगोदाम (गरुडमार्गें) असे लांबीच्या दृष्टीनें क्रम लागतील. ४ था मार्ग सोडला तर राहिलेल्या मार्गांत दहा पांच मैलांचेंच अंतर आहे म्हणून एका मार्गानें जावे व एकानें यावें. त्यांत एक हरद्वारचा मार्ग असावाच.

# परिशिष्ट ५

## गंगोत्रीचें गाणें

हें गाणें आमची आजी—कै. श्री. गोपिकाबाई गोखले. ह्यांचें म्हणण्यांत असें. त्यानीं सुमारे सत्तर वर्षांपूर्वीं हिमालयांतील चार धामांच्या यात्रा केल्या होत्या. (अगदी बाल वयांत असतांपासून तें आम्हास ऐकावयास सांपडलें. आणि त्यामुळेंच त्या यात्रा करण्याची आवड मला उत्पन्न होऊन बसली.) ह्या गाण्याचा कर्ता कोण हें कांहीं माहीत नाहीं. पण ते पुष्कळ बायकांच्या पाठांतरांत आहे. त्यांत पाठभेद पुष्कळच आढळतात. व त्यामुळें कित्येक ठिकाणीं ते अर्थहीन वाटते. तथापि एक नमुना म्हणून पाहण्यासारखे आहे. तें गाणें परंपरेनें आमचें येथें अजूनपर्यंत जीवंत आहे. त्या वेळचा लोकांचा भाव, त्यांचें निरीक्षण, वर्णनाची पद्धत त्यांत चांगली दिसून येतें.

॥ हरिद्वार हें द्वार हरीचें प्रथम करुनियां तीर्थविधी । पिंडदान आणि ब्राह्मणभोजन गंगापूजन यथाविधी । गंगाद्वारे कुशावर्ते बिल्व-तीर्थ दळ धार सुधी । स्नात्वाच कनखले तीर्थे तया जन्म मृत्यूना कधीं । तियुनि करुनिया प्रयाण सारे हृषिकेशाची मजल साधी । तपोवनीं ते भरत लक्ष्मण पाहतां हरती आधीव्याधी । शिवकोटीचा मुक्काम दुसरा पुढें लागे चाळिसी नदी । झपाटचाहुनि जन हे येती टेरीची वाट सुधी । मग उत्तर काशी नयनीं पाहिली पुढें। तेथें पिंडदान मानवा कदाचित् घडे । शत जन्मांतरींचे किल्मिश सर्वहि झडे । दरकोशी चालतां भटवाडी दृष्टीस पडे । राम घाटी नऊ कोसाची चढ उतारी बहू असे । गंगोत्री केदार बद्रीनारायण पाहूं चला कसे । हिमालयाचे सुंदर वारे गार शरीरा लागतसे । ( वा ) गार शरीरा लागतसे । गंगोत्री केदार बद्रीनारायण पाहूं चला कसे ॥ १ ॥

प्रभातकाळीं मुखमार्जन जन करुनि पंथालागीं लागतसे । कोणी झंपा कोणी करंडे कोणी ओझीं नेत असे । कोठे चढाव, कोठे उतार, कोठे मार्ग सोपा असे। पत्र पुष्प फल मूल तरुवर पर्वत गगना चुंबित दिसे। ठायिं ठायिं जळ पुष्कळ सुंदर, शिकाळीचें काम नसें। देवदारु-तरु दाट लागले जसे बगीचे रम्य दिसे । सर्प व्याघ्र आणि वृश्चिक श्वापद यांची भीति लवही नसे । वस्तु कुणाची कुठे पडो वा चोर तया स्वप्नीं न पुसे ॥ चाल ॥ तेथें निवासस्थळ रात्रीं करती वनीं भारी । काष्ठ फुकाची तापत बसती सारी । घरधनी जागृती स्वप्न-सुषुप्ति कोणी भजन नांदी गात वसे । गंगोत्री ॥ २ ॥

अहिल्याबाईचे पुण्य न वर्णवे धर्मशाळा बांधिल्या किती । असंख्य शिंके सांगे झूले त्यावरुनि जन येती जाती । छप्पर घाटी बहुत चढाई खालि पाहतां नेत्रे फिरती । पाऊल वाट कठीण मोठी भय वाटे फाटे छाती । सुक्खी, झाला, धराली, वरुनि धान्य खरेदी बांधुनी घेती । सात दिवस पुढें अन्न मिळेना म्हणूनी जन संग्रह करती । भैरवघाटी चढुनी दर्शन भैरवनाथाचे घेती। पूर्व पुण्य तें फलासि आलें गंगोत्रीं नेत्री पाहाती ॥ चाल ॥ तेथें आचार्य स्वामिचे मर्यादास्थान। वारा सूर्यतीर्थी प्रथम करुनिया स्नान । भगिरथ शिलेवर करिती

पिंडदान। स्थापित मूर्तिचें करिती पूजन। त्रिरात्र राहुनी आज्ञा वंदुनी जन निघती अति उल्हासें ।। ३ ।। गंगोत्री, इ. ।।

गिंडी तांब्या चंबु घागर गंगाजळ तीर्थें आणती। श्रीनगरीचे राजदूत ते भटवाडी मधें हाशिल घेती। दरकुची दरकुची चालुनी प्राणी कठोर ग्रामातें येती। तेथुनी वृद्ध–केदाराचें भाविकजन दर्शन घेती। शिवासाठीं देवी भिल्लीण झाली म्हणुनी भिल्लीणग्राम म्हणती। सायुज्य पवालीची दांडी बर्फाची नाहीं गणती। त्रिजुगी नारायणाशीं जातां अती आनंदें जन होती। नाभिपासुनी त्रिमूर्तीच्या अखंड जलधारा वाहती। अमृत, रुद्र, कुंडी, न्हाता पातक विलयातें जाती। असें परम रमणीय स्थळ दुजें नाहीं भूवरतीं। पार्वतीच्या लग्नाचा अग्नी–धूम्र आद्यापि जळती की। तद्‌भस्मातें भाळीं रेखिता ब्रह्मराक्षस पळताती ।।चाल।। श्रीराम, सांब, नारायण, नभी माथा। झिळमिळचा पाटण पुढें साठ्यावरीं जाता। हर्षती जन गणपतीचे पद नमिता। मुरकुटया गणेशा नमुनी पुढें जातां ।। गौरी कुंडीं तप्त उदकी नाहतां माहेरघर सुख भासे ।। गंगोत्री ।। ४ ।।

गौरी कुंडीं नाहुनी शित कुंडी नाहतां सकल जन हे तरती। स्वयंभू शंभू–स्वस्त्रीसहीत देवीचें दर्शन घेती। पिंडदान आणि ब्राह्मणभोजन गंगापूजन जन करीती। तेथुनी करूनिया प्रयाण सारे भिमकुंडा लागीं येती। बर्फ अतिशय शीत वाजतां पूर्वज मनुजा आठवती। मंदाकिनीचें स्नान करतां सुरवर सुमनें वर्षीती। संध्या तर्पण दान करुनिया नर केदाराला जाती,। गंध पुष्प आणि पुडे मेव्याचे भस्म शिवाला अर्पिती। रेतउदक आणि उदक तीर्थ ठेऊनी निरहारें राहती। त्या योगानें परम पावन ती हृदयीं दाटे शिवमूर्ति। सहावा दिवस राहुनी तिथें सप्तम दिवशीं जन निघती। गौरी कुंडीं करुनी पारणें सकल व्रतें साफल्य होतीं ।। चाल ।। तेथेंच आहे महापंथाची वाट। ऐकुनिया चालती यात्रा घनदाट। साहेबानी चौकी वसविली आडवाट। कुणी देह त्यागितां बंदी घाली लाट। देह त्यागितां जन्मूनी पृथ्विपति प्राणि तो होत असे। गंगोत्री ।। ५ ।।

तेथुनी निघतां नारायण कोटी पाहुनिया गुप्त काशी। उखी मठ पुढें तुंग पाहतो बहुत चढाई आकाशीं। षोडश कोशी चढ उतारे

दुर्लभ दर्शन प्राण्याशीं । गोपेश्वर पुढें अलकानंदनंदा यात्रा आली सांग्याशी । पिप्पल–चट्टी गरुड गंगा, गणेश गंगा, रम्य जशी । पांडुकेकेश्वरी सुवर्णमूर्ति दुजी नाहीं हो ऐशी । जोशीमठाचें दर्शन करुनी जाती विष्णुप्रयागाशी । विष्णुप्रयागीं स्नान करती धरुनी साखळ दंडाशीं । क्षेत्रपाळ पुढें चरी उल्लंघुनी हणमंताच्या गंगेशीं । उठूनी प्रातःकाळीं सारे जाती बदरीधामाशीं ।। चाल ।। पाहा सुवर्ण रेषा ऋषि गंगा । तेथें स्नान करितां पाप जाय भंगा । सरस्वतीनदीचा उल्लंघुनी सांगा । कल्याण कुटीची बहुत रम्य जागा । पर्वत शिळापासूनि शिखरें पाहतां अतिशय मन हर्षे । गंगोत्री ।। ६ ।।

वामभागीं नरनारायण नारद तिथें असती कीं । सव्यभागीं श्रीकुवेर उद्धव अक्रुर सज्जन वसती कीं । मध्यभागीं श्रीबद्रीनारायण त्रिमूर्ती या सजिती कीं । कंठीं ताईत, कटी मेखळा सुवर्ण भूषणें शोभती कीं । मंदिल सुंदर अखंड ज्याचा दिपवाळीच्या ज्योती कीं । गरुडधन मार्कंड पायीं मार्कंड ब्रह्मशीळा त्या असती कीं । पंचशिळेच्या मधें निरंतर प्रसाद सर्वदा सेविती कीं । तत् प्रसादीं ब्रह्मकपालीं पिंडदान जन करिती कीं । पुन्हा पिंड नाहीं उर्वीवरती पूर्वज मोक्षा जाती कीं । इंद्रधारा, वसुधारा, केशव – प्रयाग दृष्टी पाहती कीं । देवकी वसुदेव आहे तेथें तप केलें त्या मूर्ती कीं । त्या योगानें रामकृष्ण प्रभू उदरीं ज्याच्या जन्मती कीं ।। चाल ।। ह्या स्थळीं आहे ऋषींचें निजस्थान । क्षण मात्र राहे त्या होय तत्त्वज्ञान । प्रत्यक्ष सुरांचें ज्याला दर्शन । अति आनंदें जन करिती प्रस्थान, । साहामहिने राहूनी तेथें सुरपुजा षण्मासाते । गंगोत्री ।। ७ ।।

नंदप्रयागीं नंदगंगा तप केलें त्या नंदानीं । कर्णप्रयागीं तप केलें त्या रविनंदानीं । रुद्रप्रयागीं काय वदावा महिमा मतिमंदांनीं । श्रीनगरीहूनी पुढें चालतां सिताकुटी श्री वंदोनी । गोविंद कुटीमधें तप आचरलें प्रत्यक्ष गोविंदांनीं । देवप्रयागीं आली यात्रा नाचतगातीं आनंदानीं । दशरथानीं तप आचरलें गंगाअलकनंदानी । व्यासगंगेचें आरक्त पाणी विजयी घाटी उलंघुनी । मग भंगनचित्त गंगा पाहतां गेले निजमनीं रंगुनी । पाहाडांतील स्त्री पुरुष भाविक अती लंपट आनंदानी । पाषाणाचीं सदनें सारीं दीप तसे त्यांच्या सदनीं । कांच भूषणें स्त्री

पिंडदान। स्थापित मूर्तिचें करिती पूजन। त्रिरात्र राहुनी आज्ञा वंदुनी जन निघती अति उल्हासें ।। ३ ।। गंगोत्री, इ. ।।

गिंडी तांब्या चंबु घागर गंगाजळ तीर्थें आणती। श्रीनगरीचे राजदूत ते भटवाडी मधें हाशिल घेती। दरकुची दरकुची चालुनी प्राणी कठोर ग्रामातें येती। तेथुनी वृद्ध—केदाराचें भाविकजन दर्शन घेती। शिवासाठीं देवी भिल्लीण झाली म्हणुनी भिल्लीणग्राम म्हणती। सायुज्य पवालीची दांडी बर्फाची नाहीं गणती। त्रिजुगी नारायणाशीं जातां अती आनंदें जन होती। नाभिपासुनी त्रिमूर्तीच्या अखंड जलधारा वाहती। अमृत, रुद्र, कुंडी, न्हाता पातक विलयातें जाती। असें परम रमणीय स्थळ दुजें नाहीं भूवरतीं। पार्वतीच्या लग्नाचा अग्नी—धूम्र आद्यापि जळती की। तद्‌भस्मातें भाळीं रेखिता ब्रह्मराक्षस पळताती ।।चाल।। श्रीराम, सांब, नारायण, नभी माथा। झिळमिळचा पाटण पुढें साठ्यावरीं जाता। हर्षती जन गणपतीचे पद नमिता। मुरकुटच्या गणेशा नमुनी पुढें जातां ।। गौरी कुंडीं तप्त उदकी नाहतां माहेरघर सुख भासे ।। गंगोत्री ।। ४ ।।

गौरी कुंडीं नाहुनी शित कुंडी नाहतां सकल जन हे तरती। स्वयंभू शंभू—स्वस्त्रीसहीत देवीचें दर्शन घेती। पिंडदान आणि ब्राह्मणभोजन गंगापूजन जन करीती। तेथुनी करूनिया प्रयाण सारे भिमकुंडा लागीं येती। बर्फ अतिशय शीत वाजतां पूर्वज मनुजा आठवती। मंदा-किनीचें स्नान करतां सुरवर सुमनें वर्षीती। संध्या तर्पण दान करुनिया नर केदाराला जाती,। गंध पुष्प आणि पुडे मेव्याचे भस्म शिवाला अर्पिती। रेतउदक आणि उदक तीर्थ ठेऊनी निरहारें राहती। त्या योगानें परम पावन ती हृदयीं दाटे शिवमूर्ति। सहावा दिवस राहुनी तिथें सप्तम दिवशीं जन निघती। गौरी कुंडीं करुनी पारणें सकल व्रतें साफल्य होतीं ।। चाल ।। तेथेंच आहे महापंथाची वाट। ऐकुनिया चालती यात्रा घनदाट। साहेबानी चौकी वसविली आडवाट। कुणी देह त्यागितां बंदी घाली लाट। देह त्यागितां जन्मूनी पृथ्विपति प्राणि तो होत असे। गंगोत्री ।। ५ ।।

तेथुनी निघतां नारायण कोटी पाहुनिया गुप्त काशी। उखी मठ पुढें तुंग पाहतो बहुत चढाई आकाशीं। षोडश कोशी चढ उतारे

दुर्लभ दर्शन प्राण्याशीं। गोपेश्वर पुढें अलकानंदनंदा यात्रा आली सांग्याशी। पिप्पल–चट्टी गरुड गंगा, गणेश गंगा, रम्य जशी। पांडुकेकेश्वरी सुवर्णमूर्ति दुजी नाहीं हो ऐशी। जोशीमठाचें दर्शन करुनी जाती विष्णुप्रयागाशी। विष्णुप्रयागीं स्नान करती धरुनी साखळ दंडाशीं। क्षेत्रपाळ पुढें चरी उल्लंघुनी हणमंताच्या गंगेशीं। उठूनी प्रातःकाळीं सारे जाती बदरीधामाशीं ॥ चाल ॥ पाहा सुवर्ण रेषा ऋषि गंगा। तेथें स्नान करितां पाप जाय भंगा। सरस्वतीनदीचा उल्लंघुनी सांगा। कल्याण कुटीची बहुत रम्य जागा। पर्वत शिळापासूनि शिखरें पाहतां अतिशय मन हर्षे। गंगोत्री ॥ ६ ॥


वामभागीं नरनारायण नारद तिथें असती कीं। सव्यभागीं श्रीकुवेर उद्धव अक्रुर सज्जन वसती कीं। मध्यभागीं श्रीबद्रीनारायण त्रिमूर्ती या सजित्ती कीं। कंठीं ताईत, कटी मेखळा सुवर्ण भूषणें शोभती कीं। मंदिल सुंदर अखंड ज्याचा दिपवाळीच्या ज्योती कीं। गरुडधन मार्कंड पायीं मार्कंड ब्रह्मशीळा त्या असती कीं। पंचशिळेच्या मधें निरंतर प्रसाद सर्वदा सेविती कीं। तत् प्रसादीं ब्रह्मकपालीं पिंडदान जन करिती कीं। पुन्हा पिंड नाहीं उर्वोवरती पूर्वज मोक्षा जाती कीं। इंद्रधारा, वसुधारा, केशव–प्रयाग दृष्टी पाहती कीं। देवकी वसुदेव आहे तेथें तप केलें त्या मूर्ती कीं। त्या योगानें रामकृष्ण प्रभू उदरीं ज्याच्या जन्मती कीं ॥ चाल ॥ ह्या स्थळीं आहे ऋषींचें निजस्थान। क्षण मात्र राहे त्या होय तत्त्वज्ञान। प्रत्यक्ष सुरांचें ज्याला दर्शन। अति आनंदें जन करिती प्रस्थान, । साहामहिने राहूनी तेथें सुरपुजा षण्मासाते। गंगोत्री ॥ ७ ॥

नंदप्रयागीं नंदगंगा तप केलें त्या नंदानीं। कर्णप्रयागीं तप केलें त्या रविनंदानीं। रुद्रप्रयागीं काय वदावा महिमा मतिमंदांनीं। श्रीनगरीहूनी पुढें चालतां सिताकुटी श्री वंदोनी। गोविंद कुटीमधें तप आचरलें प्रत्यक्ष गोविंदांनीं। देवप्रयागीं आली यात्रा नाचतगातीं आनंदानीं। दशरथानीं तप आचरलें गंगाआलकनंदानी। व्यासगंगेचें आरक्त पाणी विजयी घाटी उलंघुनी। मग भंग्नचित्त गंगा पाहतां गेले निजमनीं रंगुनी। पाहाडांतील स्त्री पुरुष भाविक अती लंपट आनंदानी। पाषाणाचीं सदनें सारीं दीप तसे त्यांच्या सदनीं। कांच भूषणें स्त्री


पुरुषाला कंबल वसनें परिधानीं। तेथुनि सारा पर्वत सरला देव भूमि सांगानी । निरहारी निरंतर राहाती जैसे योगी योगानीं । राजगिरा कुट्टूची भाजी भक्षिती भोजन भागांनीं । बा वैरागड चालता मार्ग क्रमिला लक्ष्मणझुला उलंघुनी । मुनींचा ऋषीकेशाहुनी हरिद्वारी आला मेळा । ही यथामतीनें वर्णन केली प्रभु–लीला । हेरंबात्मज प्रभुला तनमन धन साष्टांगीं तो वंदितसे । गंगोत्री. ॥ ८ ॥

# परिशिष्ट ६

## यात्रा मार्ग



# रेल्वे मार्ग


हरद्वार
रुरकी
मुझफरनगर
मीरत
गाझीयाबाद
दिल्ली
दिल्ली हरद्वार १२५ मैल
मोटार वाट
डेहराडून
सहारणपूर
रुरकी
हृषीकेश
हरद्वार
कोटद्वार
लक्सर
रामनगर
निर्जीबाबाद
काठगोदाम
दिल्ली
गाझीयाबाद
मुरादाबाद
बरेली
कासगंज
मथुरा
आग्रा फोर्ट
आग्रा कँट
फत्तेगड
लखनौ
कानपूर
ग्वाल्हेर
झांशी
सवाई
कोटा माधवपूर
बीना
नागडा
रतलाम
उज्जैन
फत्तेहाबाद
इंदोर
हुशंगाबाद
भोपाळ
इटारशी
बडोदे
खांडवा
भुसावळ
अमरावती
नागपूर
कल्याण
मुंबई
पुणे
जी. आय. पी. आर. सेंट्रल रेल्वे
बी. बी. सी. आय. आर. वेस्टर्न रेल्वे

# परिशिष्ट ७

## यात्रा मार्गांतील
## समुद्रसपाटीपासून गावांच्या उंच्या ( फुटामध्यें )

### यमुनोत्तरी

हरद्वार ९२४. हृषिकेश ११०६. नरेंद्रनगर ४०००. टिहरी २९००. भलड्याना ३३००. धरासू २७५०. सिलक्यारी ५०८०. गंग्णाणी ३१००. जमुनाचट्टी ४१००. हनुमानचट्टी ६६००. यमुनोत्तरी १००००.

### गंगोत्तरी

सिंगोट ७५००. उत्तरकाशी ३७४०. मणेरी ४२००. कुम्हाल्टी ४८१०. भटवाडी ५०९०. गंगणानी ६१४०. सुकी ८१००. हरशील ८२००. भैरवघाटी ९२१०. गंगोत्री १०३००.

### बदरीकेदार


मल्ला ५०५०. फल्यालू ६६८०. सौराकीगाड ५८१०. छूणा ७४९०. बेलक ९७००. पंगराणा ७७८०. बुढाकेदार ६०३०. झाला ५८७०. घुत्तुचट्टी ५४९०. रायपूरचट्टी ६३५०. गौमांडा ८४८०. दुफंदा ९९९०. पवाली ११३६४. त्रिजुगीनारा. ७५८०. गौरीकुंड ९०००. रामवाडा ९२००. केदार ११७००.


### बदरीनारायण


फाटा ५८२०. व्युंग ५११०. उखीमठ ५१२०. देहेडा ५७३०. गुप्तकाशी ५११०. पोथीवासा ६९७०. दोगडवीठा ८१८०. वन्याकुंड ८८८०. चोपता ९८४०. तुंगनाथ १२०००. जंगलचट्टी ८५०० मंडल ४३९०. चमोली ३६२०. पिप्पलकोटी ४८००. गरुडगंगा ५२००. पाताळगंगा ५०५०. गुलाबकोटी ५३००. हेलंग ५०००. जोशीमठ ६१००. विष्णुप्रयाग ४९३०. घाटचट्टी ५८००. पांडुकेश्वर ६०००. लांमबगड ७३००. हनुमानचट्टी ९९८०. बदरीनारायण १०२४४. वसुधारा १२०००. माना १०५६०. सतोपथ १४४००.


सोनला २८००. नंदप्रयाग ३०००. कर्णप्रयाग २६००. गोचर ३०००. रुद्रप्रयाग २०००. श्रीनगर १९००. देवप्रयाग १७००. पौडी ५५५०. राणीखेत ५९८०. ग्वालदम ६०००.


# यात्रा मार्गांचे आलेख


बदरीनारायण वाटेच्या उंचीचा आलेख
बदरीनारायण
विष्णुप्रयाग
जोशीमठ
नंदप्रयाग
कर्णप्रयाग
रुद्रप्रयाग
श्रीनगर
देवप्रयाग
हरद्वार
१०२४४
२०००
१७००


बदरीनारायण वाटेच्या उंचीचा आलेख
केदारनाथ
सोनप्रयाग
गुप्तकाशी
पोथीवासा
तुंगनाथ
चमोली
पीपलकोटी
जोशीमठ
विष्णुप्रयाग
बदरीनारायण
माना
वसुधारा
सतोपंथ
७६००
४८००
१०२४४


केदारनाथ वाटेच्या उंचीचा आलेख
गंगोत्तरी १०३००
मल्लाचट्टी
झाला
पवाली
सोनप्रयाग
रामवाडा
केदारनाथ
११७००


गंगोत्तरी वाटेच्या उंचीचा आलेख
यमुनोत्तरी
१००००
सिमली
सिंगोट
७६००
उत्तरकाशी
मल्लाचट्टी
गंगनाणी
हरशिल ८२००
भैरवघाटी
गंगोत्तरी १०३००
गोमुख


यमुनोत्तरी वाटेच्या उंचीचा आलेख
हरद्वार
डेहराडून
राजपूर
मसूरी
७६००
३३००
धरासू
सिलक्यारी
सिमली
हनुमानचट्टी
यमुनोत्तरी
१००००

REFBK-0007792

REFBK-0007792